# जन जसवंत

( लेखक—रा. शंकर श्रीकृष्ण देव )

[ मंडळापुढें मी हें साधुचरित्र, जरा भीत भीत च वाचीत आहे. तथापि त्यांत हि इतिहास आहे म्हणून मी हें धाडस करीत आहे. ]

या सत्पुरुषाविषयीं फारच थोडी माहिती प्रकाशित आहे. ( १ ) महिपतींनीं भक्तविजयाच्या ३६ व्या अध्यायांत जन जसवंत हे सावकार असून फार खर्चिक होते, दानधर्मांत सारा पैसा खर्च करीत, म्हणून त्यांच्या मुलांनीं राजाकडे तक्रार केल्यावरून राजानें जसवंतांची मोट बांधून त्यांना हौदांत टाकलें. पण तेथें श्रीरामानें त्यांचें रक्षण केलें, तसें च ( २ ) भक्तलीलामृताच्या ५० व्या अध्यायांत हे माध्यंदिन शाखेचे ब्राह्मण असून तापीचे कांठीं "बरेठ" गांवीं राहत, एकदां तापीला मोठा पूर आला, गांव वाहून जातें कीं काय अशी भीति पडली, तेव्हां जसवंतांना श्रीरामाचा दृष्टान्त होऊन त्यांनीं मारुतीरायाची धातूची मूर्ति पाण्याजवळ नेऊन ठेवली, मूर्तीनें पाणी प्राशन केलें व पुन्हां सोडलें, ती मूर्ति नंदुरबारपरगण्यांत "निझव्यास" त्यांचे वंशजाजवळ हल्लीं आहे, अशी माहिती दिली आहे. ( ३ ) शिरगांव मठपति भीमस्वामींनीं जसवंत हे शिपायी होते असें सांगून कांबिटाची तलवार कशी झाली, पाणी मागितलें असतां प्रत्यक्ष सीतेनें पाणी कसें दिलें व राजानें यमुनेंत टाकलें असतां तेथें श्रीरामानें त्यांचें रक्षण कसें केलें, अशा तीन आख्यायिका सांगितल्या आहेत. या शिवाय जसवंतांची विशेष माहिती कोठें वाचण्यांत नाहीं. नाभाजीच्या भक्तमालेंत किंवा राजारामप्रासादींच्या भक्तमंजरीमालेंत जसवंतांचा उल्लेख नाहीं. नुसत्या संतनामावलींत मात्र त्यांचा निर्देश बहुधा आहे, त्यांचें एकाद हि पद किंवा दोहरा छापलेला नाहीं.

या माहितींत कांहीं भर टाकली पाहिजे. कोणी रघुनाथदास यांनीं वर्णिलेलें जसवंतांचें पंचाध्यायी चरित्र उपलब्ध झालें आहे तें, त्यांच्या वंशजांकडून कांहीं पदें, दोहरे व सनदापत्रें मिळालीं आहेत तीं व जसवंतांच्या स्थलांचें प्रत्यक्ष दर्शन यांच्या साहाय्यानें ही भर टाकावयाची आहे.

मराठ्यांचें राज्य होण्यापूर्वीं मोगलांच्या रियासतींत खानदेशांतील सातपुड्याच्या दक्षिणेचा मुलुख लहान लहान तद्देशीय राजांच्या स्वतंत्र अंमलाखालीं होता, असें दिसतें. हल्लीं नाशिक जिल्ह्यांत सामील झालेला बागलाण व मध्य प्रांतांत मोडत असलेलें बऱ्हाणपूर हीं दोन्हीं खानदेशांत च गणलीं जात. प्रतापशा नामें

करून * शक १५३० चे आधीं व नंतर बागलाणचा राजा होता; त्याचें मुख्य ठाणें मुल्हेरीच्या किल्ल्यावर असे. राजाच्या आईचें नांव चंद्रावती होतें. जनार्दन नामें-करून वाजसनेयी शांडिल्य गोत्राचा ब्राह्मण त्याचा पुरोहित होता. तो फार बुद्धिमान् असून राजाची त्यावर विशेष कृपा असे. जनार्दनपंतांनीं राजकारणांत हि केव्हां केव्हां राजास हितोपदेश करावा. जसवंत हे त्या जनार्दनपंतांचे पुत्र होत.

जसवंतांचा जन्मशक सांगतां येत नाहीं. लहानपणापासून साधुसेवेचा त्यांना फार छंद असे. गणपतिधुऱ्यास कोणी योगी आले होते त्यांना यांनीं नित्य नियमानें दहीभात नेऊन द्यावा व मग आपण घरीं येऊन भोजन करावें. तिसरे प्रहरीं पुन्हां त्यांच्याकडे जाऊन त्यांच्या सेवेंत व आत्मानात्मविचारश्रवणांत यांनीं काळ कंठावा; असें एक वर्ष लोटलें. पुढें एके दिवशीं नित्याप्रमाणें दहीभात घेऊन जात असतां मार्गांत दोघे घनसावळे बटु ब्राह्मण यांना भेटले. आपणांस भूक लागली आहे हा दहीभात जेऊं घाला असें त्या बटूंनीं यांना म्हटलें. हा भात साधूस नेऊन देतों व पुन्हां तुम्हांकारणें घरून निराळा आणतों असें म्हणून जसवंत पुढें गेले. साधूच्या मठीं जाऊन पाहतात तों तेथें साधु आढळेनात! बटु भेटले होते त्या ठिकाणीं परत येऊन पाहतात तों ते हि तेथें नव्हते! जसवंत मनीं प्रस्तावले. त्यांना अन्नोदक गोड लागेना. ते बटु खचित श्रीरामलक्ष्मण असावेत असा निर्धार करून, कष्टी होत्साते, जसवंत त्यांच्या शोधार्थ घराबाहेर पडून अरण्यांत शिरले. त्यांना दुसरें तिसरें कांहीं दिसेना, ऐकूं येईना व भासेना हि. श्रीरामाचा त्यांनीं सारखा धांवा आरंभिला. त्यांचा कंठ शोषला, जीव श्रमी झाला व किंचित् डोळा लागला. " पंचवटीस जाऊन पुरश्चरण करावें, तेथें आपण दर्शन देऊं " असा श्रीरामाचा दृष्टान्त होऊन जसवंत पंचवटीस गेले. पंचवटीस अयाचित वृत्तीनें राहून त्यांनीं एका गुहेंत पुरश्चरण केलें. श्रीरामदर्शन झालें! प्रत्यक्ष देवदर्शन होऊन हि गुरूवांचून व्यर्थ आहे, तरी काशीस जाऊन तुलसीदासास गुरु करावें, अशी श्रीरामाची त्यांना आज्ञा झाली.

जसवंत मुल्हेरीस आले व त्यांनीं आपला मनोदय लोकांस कळविला. त्यांच्या बरोबर पुष्कळ च लोक यात्रेस निघाले. आपलें कुटुम्ब व मेव्हणा तात्याजी यांस जसवंतांनीं बरोबर घेतले. सेंधव्याच्या घाटांतून जात असतां मुलुख ओसाड पडलेला पाहून तेथील भिल्ल राजास जसवंतांनीं त्याचें कारण विचारलें. सुभ्याचें व आपलें भांडण होऊन सुभेदारानें आपला मुलगा अटकेंत ठेवला, सबब आपण हा मुलुख हैराण केला असें भिल्लानें सांगितलें. जसवंतांनीं उभयतांस बोलावून

---

* While talking of the A.D. year 1610, which corresponds with Shaka 1532, the Khandesh Gazetteer says that Nizampur, a large town, was under Pratapshah of Baglan.

२ ]

आणून त्यांना सदुपदेशाच्या चार गोष्टी सांगून त्यांचा समेट करून दिला. भिल्ल राजाला अनुताप होऊन तो जसवंतांचे भजनीं लागला. रयतेचें जें नुकसान झालें होतें तें जसवंतांनीं कानगो * देसाई यांचेकडून भरून देवविलें.

पुढें यात्रा माळव्यांतून चालली असतां जसवंतांची कीर्ति ऐकून हजारों लोक त्यांच्या दर्शनास येत. त्या सर्वांना जसवंतांनीं स्वहिताचा बोध करावा. प्रत्यहीं रात्रीं मुकामाचे ठिकाणीं त्यांनीं हिंदुस्थानी भाषेंत कीर्तन करावें. अशा रीतीनें लोकांना सन्मार्ग दाखवीत यात्रा प्रयागास पोंचली व तेथून वाराणशीस गेली. तेथें यात्राविधि करावयाचे ते सर्व करून जसवंतांनीं देवदेवतांचीं दर्शनें घेतलीं. तुलसीदास महाराज एका गुहेंत राहत असत, बहुधा बाहेर येत नसत; त्यांच्या दर्शनास जसवंत गेले. सद्गुरूंना सच्छिष्य भेटले. उभयतांना आनंद झाला. जसवंतांचे आग्रहावरून तुलसीदास गुहेबाहेर आले त्यामुळें काशीकरांना हि अत्यानन्द झाला व लाखों लोक या सत्पुरुषांच्या दर्शनास लोटत. तुलसीदासांची परवानगी घेऊन बरोबरीच्या मंडळीसह जसवंत गयेस गेले. तेथील सर्व विधी उरकून परत काशीस आल्यावर तात्याजीसह कुटुम्बास व इतर बरोबर आलेल्या यात्रेकरूंस स्वदेशास पाठवून जसवंत महाराज एकटे च गुरुमहाराजांजवळ राहिले. तुलसीदासांचा जसवंतांस अनुग्रह झाला.

तुलसीदासांना बरोबर घेऊन अयोध्या, मथुरा इत्यादि यात्रा कराव्या असें जसवंतांचे मनांत आलें. त्यांनीं गुरुजीस विचारलें. तुलसीदास म्हणाले, आपण अयोध्येस येऊं, पण मथुरेस येणार नाहीं.

" मेरो नेम सुनो जसवंता। मेरो मन और नही लुभंता ॥ रामबिना दर्सूं नही कोई। रामबिना स्पर्सूं नही कोई। फोरूं नयन और जो दर्सूं। काटुं कर और जो स्पर्सूं ॥ "

मथुरेस हि राम च असले तर मग दर्शनास तर कांहीं हरकत नाहीं ना? असा करार करून उभयता गुरुशिष्य निघाले. प्रथम ते मथुरेस गेले. जसवंतांनीं आपल्या गुरुजींचा नियम श्रीकृष्णचरणीं सादर करून त्यांना रामरूप घेण्याविषयीं प्रार्थिलें. त्याप्रमाणें श्रीकृष्णांनीं केलें, नंतर तुलसीदास दर्शनास आले. त्यांना सर्वत्र राम च दिसले. तेथून गोकुळ, वृंदावन करून उभयता अयोध्येस गेले तेथें चार मास मुक्काम केला. तेथून जगन्नाथाची यात्रा करून दोघे हि परत काशीस आले.

---

* हें ऐतिहासिक घराणें मोगलांचे वेळेपासून नंदुरबारेस आहे त्याची हकिकत पुढें मागें लिहूं.

नंतर काशीस कांहीं काळ गुरुसंनिध राहून गुरूंची आज्ञा घेऊन व त्यांनीं प्रसाद म्हणून दिलेली श्रीमारुतीरायांची मूर्ति बरोबर घेऊन जसवंत स्वदेशीं यावयास निघाले. वाटेंत त्यांना चारपांचशें साधूंचा मेळा भेटला. तो मेळा द्वारकेकडे जात होता. त्याबरोबर जसवंत हि गेले. तेथून मेळ्यासह डाकुरास आले. पुढें मेळा निघाला, त्याबरोबर आपण निघाले. मार्गांत एक निर्जल असें अरण्य लागलें. जलावांचून साधूंचे फार हाल होऊं लागले, तेव्हां श्रीसमर्थांनीं शिवरायासाठीं जसें कुबडीतीर्थ प्रगट केलें, तद्वत् जसवंतांनीं साधूंच्या साठीं एक कुवा निर्माण केला. तो कुवा गुजराथेंत अद्यापि प्रसिद्ध आहे, असें म्हणतात. साधूंच्या करितां जसवंतांनीं जल निर्माण केलें म्हणून त्यांना सर्व साधु " **जल जसवंत** " म्हणूं लागले. " जल " चें " जन " होऊन " **जन जसवंत** " असें नांव रूढ झालें. तेथून मेळा दुसरीकडे गेला व जन जसवंत मुल्हेरीस आले.

मुल्हेरीस कांहीं काळ बरा गेला. जसवंत परत आला आहे व तो कवित्व फार उत्तम करतो वगैरे गोष्टी प्रतापशा राजाच्या कानीं गेल्या. राजानें जसवंतास सन्मानानें राजवाड्यांत आणवून आपल्यावर कांहीं कवित्व करावें अशी इच्छा प्रगट केली. राजाची स्तुति भाटानें करावी किंवा राजापासून ज्यांना कांहीं मिळवावयाचें असेल अशा मतलबी लोकांनीं त्याचे गोडवे गावेत किंवा ज्यांना राजाचें भय वाटत असेल अशांनीं नसते गुण राजाच्या माथीं लादावेत; मी भाट नाहीं, मला कांहीं मतलब साधावयाचा नाहीं किंवा मला कोणाचें भय हि उरलें नाहीं, असें जसवंतांनीं उत्तर दिलें.

" नरगुण गाई सो खरमुख होई । तूं भूपती जैसो करे तैसो होई ॥ पुरभान पश्चिम जो करे । तो ही जसवंत और नहीं डरे ॥ हरिथे बिमुख भया क्युं राजा । हत्तिघोडेदेशदाम सब है कामिनिको काजा ॥ कहत जसवंत दुःख झगि मानो । हरिथे बिमुख भया क्युं राजा ॥ "

या उपदेशांतील रहस्य किती हि सत्य असलें तरी तें त्या मानी राजास पसंत न पडून, राजाची आज्ञा अमान्य करणाऱ्या जसवंताची मोट बांधून तलावांत टाकावी, असा त्यानें, क्रोधावश होऊन हुकुम केला. साधूचा छळ करूं नका, साधूचा छळ करून आजपर्यंत कोणाचें कल्याण झालें नाहीं, वगैरे तऱ्हेनें लोकांनीं राजास पुष्कळ सांगून पाहिलें, तरी हि राजानें आपला हट्ट सोडला नाहीं. राजसेवकांनीं जसवंतांची मोट बांधून ती पाण्यांत टाकली. केव्हां हि भक्ताची उपेक्षा न करणाऱ्या श्रीरामानें कूर्मरूप धारण करून ती मोट सुखरूप परतीराला नेली. मोट निर्विघ्न तीरावर आलेली पाहून लोकांनीं जयजयकार केला. त्या प्रसंगाचें खुद्द जसवंतांचें एक पद आहेः—

" कोई वंदो कोई निंदो कोई कैसो कहो रे । रघुनाथसाथे प्रीत बांधी होय जैसो होय रे ॥ ध्रु० ॥ कमलयाने[1] मोट बांधी नीर था भरपूर रे । रामचंद्रने कूर्म होकर राखिलीनी[2] पीठे[3] रे ॥ १ ॥ चंद्र सूये जिनी[4] जोतें स्तंभविन आकाश रे । जळउपर पाषाण तारे क्यूं न तारे दास रे ॥ २ ॥ जपत शिवसनकादि मुनिजन नारदादिक संत रे । जन्मजन्मके स्वामि रघुपति दास जन जसवंत रे ॥ ३ ॥"

अशा दुष्ट राजाचे राज्यांत राहणें नको असा संकल्प करून घुसवारीच्या मार्गानें जसवंत तापीतीरास आले. तेथें बोरठें गांवीं त्यांनीं मुक्काम केला. भक्तलीलामृतांत ' बरेठ ' गांव छापण्यांत छापणाराची चूक आहे. जसवंतांनीं आपलें बाकीचें आयुष्य बोरठ्यास कंठिलें. त्यांचे काळीं बोरठ्यास गुजरांची वस्ती बरीच होती. ते धनसंपन्न आणि भाविक होते. तेथील पाटील हि गुजर च होता. सर्वांनीं जसवंतांना आपल्या गांवीं ठेवून घेतलें. श्रीरामाकरितां लोकांनीं एक मंदीर बांधून दिलें. तिकडे जसवंतांनीं मुल्हेर सोडल्यावर त्या राजावर मोगलांची स्वारी येऊन मोगलांनीं त्याचा किल्ला घेतला, त्यास बाटविलें व बोरनाटीं नेऊन ठेविलें. तेथें त्याचा वंश अद्यापि आहे, असें परस्पर ऐकतों, शोध केला पाहिजे; असो.

जसवंत बोरठ्यास असतां एकदां तापीला फार मोठा पूर आला व गांव वाहून जातें कीं काय अशी भीति पडली. तेव्हां मारुतीची मूर्ति तीरावर नेऊन ठेविली, तिनें पाणी प्राशन करून पुन्हां सोडले, इत्यादि कथाभाग भक्तलीलामृतांत आला च आहे. ती मारुतीची मूर्ति महिपतींचे वेळीं नंदुरबार परगण्यांत निझऱ्यास त्यांचे ( जसवंतांचे ) वंशजांजवळ होती. त्या गांवाचें नांव निझर्वे नसून निझरें आहे. एकदां केव्हां तरी छापणारानें चुकी केली ती च परंपरेनें चालत आली. आज मित्तीला ती मूर्ति निझऱ्यास नसून कुकुरमुंड्यास त्यांचे आणखी वंशज आहेत त्यांचे जवळ आहे. बोरटें गांव तापीच्या दक्षिण तीराला आहे. बोरठ्यापासून दोन कोस तापीच्या उत्तर तीरावर तळोदें तालुक्यांत कुकुरमुंडे आहे. तेथें श्रीरामाचा मठ असून प्रतिवर्षी उत्सव होत असतो. शके १८२९ च्या वैशाखांत मठास आग लागून मठांतील पोथ्या, पुस्तकें, कागदपत्रें, वगैरे दग्ध झालीं ! ईश्वरास माहीत किती महत्त्वाचा संग्रह नष्ट झाला. त्या आगींतून एक दप्तर वांचलें, त्यांत सात सनदा व इतर किरकोळ कागद आहेत. सनदा महत्त्वाच्या आहेत. त्या अस्सल आहेत.

(१) पहिली सनद संवत् १६५६ म्हणजे शके १५२१ तील जशीच्या तशी च देतों. ती अस्सल असून भाषा व लिपी गुजराथी आहेत. पूर्वी नंदुरबार, तळोदें हे तालुके गुजराथेंत मोडत होते व हल्लीं हि या दोन तालुक्यांत गुजरांची वस्ती फार आहे.

---

१ कामळ्यांत. २ राखली. ३ पाठ. ४ ज्याच्या योगानें. ५ प्रकाशतात.

श्रीवालेर
।।। ।।।->
दूरंगजी

।।। श्रीवालेर माहा वीखम दूरंग
माहाराजा अध्यराज माहार
णा श्री दूरंग बाजी वीजेराज
आदेशा मौज आकलकुवो
गाम दादाजीने राजे रूष्णा
जसवंतजी
रपण कीधू छे जा लगे वाले
रनु राज रेहे अम्हारा वशम हे
गाम लो पोतेनी माउपेरे गध
डो जाय छे जेष्ठ शुद १३ रवउ
संवत १६५६ वरसे

यांत उल्लेखिलेलें वालेरचें राज्य म्हणजे अलिकडे ज्याला बुधावलचें राज्य म्हणत तें होय. शके १७४० त चंद्रसिंग नांवाचा बुधावलचा राजा होता. पुढल्या च वर्षी तो मेला व त्याचा मुलगा भगवानसिंग गादीवर बसला. याच भगवानसिंगनें शके १७५८ त दिलेली एक सनद् पुढें देणार आहे. भगवानसिंग १७६१ त मेला व त्याचा भाऊ गणपतसिंग गादीवर बसला. गणपतसिंगचें वर्तन इंग्रज सरकारास पसंत न पडून त्याला शके १७६७ त पदच्युत करून तो १७७६ त निपुत्रिक मेला तेव्हां त्याचें राज्य खालसा केलें. अशा रीतीनें महाराजाधिराज महाराणा श्री दुरंगबाजी यांनीं आपल्या वंशजांना घातलेली धोपट शपथ कोणी मोडील अशी भीति उरली नाहीं. अक्कलकुवा गांव कुकुरमुंड्याजवळच आहे व तो जसवंतमहाराजांच्या वंशजांनीं कांठी संस्थानाकडे लावून दिला आहे, असें समजतें. " जसवंतजी " हीं अक्षरें दोन ओळींच्या मध्यें शोधासारखीं दिसतात. रवउ म्हणजे रविवार.

( २ ) दुसरी सनद् संवत् १६७६ म्हणजे शके १५४१ तील आहे. जसवंताचे वडील चिरंजीव विष्णुदास यांच्या नांवची ती आहे. अर्थात् शके १५४१

च्या पूर्वीं जसवंत महाराजांनीं समाधी घेतली असली पाहिजे. शिक्का मराठींत असून बाकीच्या मजकुराची भाषा व लिपी गुजराथी आहेत. सनद जितकी लावतां आली तितकी देतों.

॥ श्रीराम ॥




+ + [illegible]

॥ श्रीराज आदेशा + सपशी
श्रीमाजोग्य + + वष्णुदा
सजांनें पूये गाम आपू छे
जे गाम कोडथा हे छे माटे
आजपूठि हे गाम कोडत पु
र पूते अ बाच जे होये +
नलिया जे अ बाब शर्त
साथे आपू छे माटे हे गां
म तफत पाटन फाहणी क॥
वदे १० सं १६७६ ली

( ३ ) तिसरी सनद संवत् १६७८ म्हणजे शके १५४३ तील आहे, ती अशीः—





श्री दीवान माहाराजाधीराज
माहाराणा श्री दुरंगबाजी पटे
हेनार्यतें धीरणदास तम्होने

चर्णक्षाळ स्वस्ती वचन कारी
मौ। पाणीबारु आपु छे चंद्रार्क
लगे तम्हे खावु देसील कुलधाय
दीधु छे मु॥ कार्तीक सुद १
सं॥ १६७८ मु॥ बेज

या सनदेंतील पाणीबारा गांव कुकुरमुंड्याचे पश्चिमेस तीन कोस आहे. बेज गांव पाणीबाऱ्याजवळच आहे.

पुढील सनदांचा उल्लेख करण्यापूर्वी जसवंतांचा वंशवृक्ष दिला पाहिजे. जसवंतांना गंगा, गोमती, जानकी व प्यारी अशा चार मुली व विष्णुदास, तुलसीदास, नारायण व शामदास असे चार मुलगे, मिळून आठ अपत्यें होतीं. त्यांचा वंशवृक्ष असा:—




(४) चैत्र व. ३ संवत् १७६० म्हणजे शके १६२५ तील हें ताकीदपत्र आहे. " बोरठाणा विसनव (वैष्णव) केशवदास शामदासने मौजे उठवू आपेलू छे ते मधें झोड झबाडे ती बाजे कशी वाते अंतर न देशो " इत्यादि.

( ५ ) पांचव्या सनदेचा अर्धा भाग फाटून गेला आहे. " तुमचे संस्थान निझरेस होते दग्यामुळें किल्ले मजकुरीं ( कुकुरमुंड्यास ) येऊन राहिला त्यास सालगुदस्ता सरकारांतून तुम्हांस घर बांधून दिल्हे देवाचे पूजासाहित्य व नैवद्य व तुमचा कालक्षेप चालला पाहिजे याजकरितां मौजे कोंठरज येथील जमीन सेत गोसावीवाले परतने ५ धर्मार्थ सरकारांतून दिल्हे आहे " इत्यादि मजकुराची ही सनद शके १६९४ त कुकुरमुंड्याचा सुभेदार बालाजीराम यानें रामभट बिन यदुपतिभट यांस करून दिली आहे. यांत जो दग्याचा निर्देश आहे तो असा कीं निझऱ्यास यदुपतिबावा असतां बंडखोरांनीं निझऱ्यावर चाल केली होती. यदुपतिबावा देवाच्या मूर्ति देईनात म्हणून त्यांना बंडखोरांनीं ठार केले. मूर्ति पोटाशीं धरून यदुपतिबावा लढले. देवाप्रीत्यर्थ त्यांनीं आपले प्राण खर्चिले. त्यावर मग रामबावा कुकुरमुंड्यास रहावयास गेले, असें दिसतें.

( ६ ) संस्थान बुधावल गड वाल्हेर येथील राणा श्रीरामचंद्रसेवेशीं तत्पर भगवानसिंगजी यांनीं सुहुर सन १२४६ म्हणजे शके १७५८ त श्रीरामनवमीचे उत्सवाकारणें मौजे सामोवल येथील दीड परतन जमीनीचें हें इनामपत्र बाळकृष्णबावा देवस्थान कुकुरमुंडे यांचे नांवे करून दिलेलें आहे. वर दिलेल्या वंशवृक्षांतील अन्याबुवा ते च हे बाळकृष्णबावा होत.

( ७ ) त्या च बाळकृष्णबावांना शके १७७१ त कांठीसंस्थानचे उमेद लक्ष्मण पाडवी यांनीं मौजे बोरी गांवचें हें इनामपत्र करून दिलेलें आहे.

या घराण्याचे याहून जास्त कागद तूर्त तरी उपलब्ध नाहींत. ज्या गांवीं जन जसवंत राहात होते तें बोरठें गांव उजाड च झालें आहे म्हणावयाचें. आज तेथें एक हि गुजर राहत नाहीं व घर म्हणतां येईल अशी एक हि इमारत तेथें उरली नाहीं. आज फक्त पंधरा वीस भिल्लांचीं गवताचीं झोपडीं तेथें आहेत. हा कालमहिमा होय.

संवत सोळसो चौओतरा । रवितनयाके तीर । फाल्गुन शुद्ध अष्टमी । जसवंत त्यजे शरीर ॥

तापीचे कांठीं संवत् १६७४ म्हणजे शके १५३९ च्या फाल्गुन शुद्ध अष्टमीस जसवंतमहाराजांनीं समाधी घेतली. बोरठ्यास च तापीचे पात्रांत एका नैसर्गिक खडकावर यांच्या पादुका आहेत. दोन्ही बाजूंना दोघा मुलांच्या पादुका असून कुटुम्बाची समाधी जरा खालच्या बाजूस पात्रांत च पण निराळा चबुतरा बसविलेली अशी आहे. जसवंतमहाराजांचें थोडें फार कवित्व सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहांत आहे. तें सारें हिंदुस्थानी भाषेंत आहे. त्या कवित्वाची कल्पना व्हावी म्हणून च वर एकाद दुसरें त्यांचें पद दिलें आहे. गोदा आणि कृष्णा यांच्या

२

कांठीं अनेक साधु होऊन गेले, त्याप्रमाणें च तापीचा तीर हि साधुचरणांनीं पुनीत झालेला आहे, हें मला नव्यानें समजलें.

## २ दासोपंतांविषयीं आणखी माहिती

( लेखक–रा. शंकर श्रीकृष्ण देव )

आणखी म्हणण्याचें कारण असें कीं, दहा वर्षांमागें या सत्पुरुषाविषयीं कांहीं माहिती प्रथम रा. राजवाडे यांनीं त्या वेळीं चालू असलेल्या " ग्रंथमाला " मासिकांत दिली होती. त्यानंतर ' महाराष्ट्र सारस्वत ' मासिक सुरू होऊन त्यांत दासोपंतांचीं १३९४ पदें छापलीं गेलीं व मासिक अस्तंगत झालें. दासोपंतकृत गीतार्णवांपैकीं अध्याय पहिला, दुसरा व बारावा पूर्ण व अध्याय तेरावा अपूर्ण छापून " महाराष्ट्र कवि " हि विराम पावला. " कवी " नें च दासोपंतांचें एक ओंवीबद्ध पण अगदीं अलीकडे कोणीतरी लिहिलेलें चरित्र प्रकाशित केलें होतें. तथापि एकदां रा. राजवाडे यांनीं दासोपंतांविषयीं जीं चार पृष्ठें लिहिलीं त्याहून जास्त माहिती इतरत्र देण्यांत आलेली नाहीं. त्या माहितींत आज थोडी भर टाकावयाची आहे.

दासोपंतकृत ग्रंथांची यादी रा. राजवाडे यांनीं दिली आहे, तिच्याहून थोडी जास्त विस्तृत यादी " महाराष्ट्र कवी " नें दिलेली आहे. परंतु या दोन्ही याद्या थोरल्या देवघरांतील संग्रहाच्या आहेत. पहिल्यांदा मी जेव्हां आंब्यास गेलों तेव्हां मला देखील धाकट्या देवघरांतील ग्रंथांचा थांग लागला नव्हता; परंतु गेल्या चैत्रांत दुसऱ्यांदा तेथें गेलों असतां धाकट्या देवघरांत मला डोकवावयास सांपडलें. तेवढ्यांत मला तेथें दासोपंतांची अपूर्व कृति पहावयास मिळाली. ईशकेनादि दशोपनिषदांवर दासोपंतांचें भाष्य आहे ! आचार्य ही पदवी या प्राकृत कवीला यापुढें कां न लावावी ? दासोपंताचार्यांनीं केलेली व्याख्या अद्वैतमतानुयायी असून छापलेल्या सर्व ग्रंथांपेक्षां निराळी आहे*. जरी बरेचसे पूर्वपक्ष गीताप्रतिपादित

---

* देवघराच्या मालकांनीं कृपाकरून ईश व कठ हीं दोन उपनिषदें मजबरोबर दिलीं, तीं मीं ह्या हेतूनें आणलीं कीं " आनंदाश्रमा " च्या मार्फत तीं प्रकाशित झाल्यास पहावें. आश्रमाच्या व्यवस्थापकांस पत्र लिहून पंधरा वीस दिवस झाले, उत्तर नाहीं ! भारत-इतिहास-संशोधकमंडळानें हीं उपनिषदें प्रकाशित करण्याचा विचार करावा.

☞ छपाईच्या खर्चाची तरतूद करून हें काम मंडळ अवश्य अंगावर घेईल.

चिटणीस.

तत्त्वावर अवलंबून आहेत, तरी श्रुतिवचनमूलक हि पुष्कळ आहेत. रचनेवरून ही वृत्ति दिसते, तथापि कित्येक ठिकाणीं अशी शैली स्वीकारली आहे कीं, हिला भाष्य म्हटलें असतां हि शोभेल ! स्वतः दासोपंतांनीं आपल्या भाष्याला "**उपनिषदर्थप्रकाश***" असें नांव दिलें आहे.

मराठी भाषेंत †लाखों ग्रन्थरचना करणारा असा हा एक च सत्पुरुष दिसतो कीं, ज्यानें संस्कृतामध्यें हि तितकी च ग्रन्थरचना केली आहे ! आम्हा महाराष्ट्रियांना या गोष्टीचें मोठें भूषण वाटलें पाहिजे व त्याबरोबर च हें सर्व ज्ञानभाण्डार प्रकाशित करण्याची, निदान संग्रहित करण्याची योजना मंडळानें त्वरित केली पाहिजे.

दासोपंतांविषयीं ही एक नवीन गोष्ट मंडळास आज मला सांगावयाची होती. दुसरी गोष्ट म्हणजे दासोपंतांच्या घराण्यांतील एक अस्सल "जयपत्र" मला पहावयास मिळालें, तें मंडळापुढें सादर करितोंः—

## श्रीलक्ष्मीनृसिंहो जयति

स्वस्ति श्रीमन्नृपशालिवाहन शके १६१७ युवनाम संवत्सरे अधिकाषाढ वदि सप्तमी रविवारीं विश्वंभर गोसांवी पुत्र दासोवा गोसावियांस ‡उदयगिरिसमीपवर्ति निडेबनग्रामीं सभ्य सभापति मिळोन जयपत्र करून दिधलें ऐसें जें दासोवा गोसांवी व सर्वज्ञ गोसांवी उभयता एउन आमचा व्यवहार पद्धत्यनुसारें करून यथान्याय करा मणून अंगीकार जाले मग न्याय करतां सर्वज्ञ गोसावियांस पराजयस्थानें विरुद्ध निराबाध निरर्थकादिकें प्राप्त जालीं तें अवघीं स्छलपत्रामध्यें उद्धरलीं आहेत आणि दोघांचीं प्रतिज्ञापत्रें तदनुसार निर्णयप्रकार हि स्छलपत्रावरून सविस्तर कळों येईल तस्मात् सिद्धांत ऐसा जाला किं दासोगोसावियानें मंत्रांगसहित मंत्रोपदेश करून आपलें संप्रदाय °गुरुपद चालवावें शिव गोसांवी पुत्र सर्वज्ञ गोसावियानें ज्ञानांगसहित ज्ञानोपदेश करून आपलें सद्गुरुत्व° सांभाळावें परस्वापहार करणें सर्वथा उचित नव्हे ऐसें सिद्ध जालेंसें जाणोन सभ्य सभापतिस पुशिल्या-

---

* तर मग दासोपंताचार्यांचा "प्रकाश" प्रकाशित करण्याची जबाबदारी विद्यमान "उपनिषत्-प्रकाश" कारांवर येते. ईश्वर कोणाला तरी बुद्धि देवो !

† दासोपंतांचा सवा लाख "गीतार्णव" व सवा लाख "पदार्णव" मराठींत असल्याचें आपणांस ठाऊक च आहे.

‡ उद्गीर.

° मंत्रोपदेश करणारा तो गुरु व ज्ञानोपदेश करणारा तो सद्गुरु हा भेद विचारांत घेण्यासारखा आहे.

वांचून च सर्वज्ञ गोसांवी पळोन गेले याकरतां पराजित जाले हें जयपत्र करून दिधलें सत्य ॥ अन्यवादी क्रियाद्वेषी नोपस्छायी निरुत्तरः । आहूत प्रपलायी च हीनः पंचविधः स्मृतः ॥ १ ॥ यास जो वादी अथवा प्रतिवादी अन्यथा करील तो आपल्या श्रीस्वामीचा द्रोही होईल ते हीं प्रतिज्ञापत्री ऐसें स्वहस्ताक्षरें करून लिहिलें आहे जें पद्धतिविरुद्ध जो करील तो श्रीस्वामीचा द्रोही होईल.

| मोर्तब सुद |
|---|

साक्षि

नगोजी नारायण देशहस्त

मीर मा। जाफुर दीवान सुभे हैदराबाद

आणाजी विश्वनाथ बागलानी

गोविंद कोडदेउ नोकर सा। निंबालकर

| फारशी शिक्का |
|---|

मोहर बनाम रे॥ *मलजी राजे निंबालकर फौजदार ठाणे निडेबन

सीवाजी गोविंद दीवान रा॥ मलजी राजे निंबालकर

(फारशी शिक्का)

रामाजी कोनेर + + +

नोकर निंबालकर

असें तें जयपत्र आहे, त्याचा विचार आपण करावा. आद्य दासोपंतांचे पुत्र दत्ताजीपंत, नातु दासोबा व पणतु विश्वंभर होत.

दासोपंतांची समाधी जोगाईच्या आंब्यास च आहे.

---

* श्रीसमर्थशिष्य "स्वानुभवदिनकर" ग्रन्थकार तिसगांव मठपति दिनकर यांचे शिष्य ते हे च असावेत.

स्वा. दि. प्रस्तावना पान १३.

## ३ हे कोकिळ कोण ?

( लेखक-रा. शंकर श्रीकृष्ण देव )

निर्णयसागर छापखान्यांत अनेक कविकृत "पदसंग्रह" छापला आहे, त्याच्या तिसऱ्या भागांत कोकिळांचें एक च पद देऊन हे कोकिळ कोण असा प्रश्न टिपेंत केला आहे. त्याचें कांहींसें उत्तर देतों. या कोकिळांचें नांव गंगाधर. जुन्या बाडांतून यांचे अभंग, पदें, वगैरे सांपडतात, त्यांत कोठें नुसतें कोकिळ तर कोठें गंगाधर कोकिळ असें नांव दिलेलें आढळतें सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहांत कोकिळांचीं शें दोंडशें पदें, अभंग वगैरे आहेत. एका बाडांत नृहरिसुतकृत "श्री मुकुंदराजचरित्र" दिलेलें आहे, त्यावरून असें दिसतें कीं या मुकुंदराजांचे गुरु कोकिळ होत. मुकुंदराजांनीं देवीची आराधना केली, तेव्हां त्यांना दृष्टान्त झाला.

म्हणे ऐक पा माझें वचन । कोकिळ नामा ब्राह्मण ।
नृसिंह क्षेत्र वस्तिस्थान । त्या स्थळा जाईं झडकरीं ॥ २२ ॥

हें नृसिंह क्षेत्र म्हणजे औरंगाबाद जिल्ह्यांतील गंगातटाकीं असलेलें सायखेडें गांव होय. येथें गंगा दुभंग होऊन मध्यें बेट बनलें आहे, त्या बेटांत नृसिंहाचें देवालय आहे. सायखेड्यास गंगाधर कोकिळांची समाधी आहे. गंगाधर हे योगी होते. त्यांची परंपरा अशी:—

गंगाधर कोकिळ
|
महादेव आबा
|
त्रिंबकराज भाऊ
|
सीताराम आपणा
|
उद्धव ( विद्यमान )

या परंपरेवरून पाहातां गंगाधर कोकिळ सुमारें सवाशें वर्षांमागें होऊन गेले असें अनुमान निघतें व तें खरें आहे. मुकुंदराजांच्या चरित्रांत त्यांनीं म्हणजे मुकुंदराजांनीं शेवटीं चतुर्थाश्रम घेतला होता व त्या आश्रमीं त्यांचें नांव ब्रह्मानंद होतें, असें दिलें आहे. ब्रह्मानंदांनीं पैठणास शके १६९७ त वैशाख व. १ स भौम वासरे जलसमाधी घेतली, व त्यांचें चरित्र नृहरिसुतांनीं त्या च शकाच्या ज्येष्ठांत वर्णिलें असल्यामुळें तें अत्यन्त विश्वसनीय मानण्यास हरकत नाहीं. मुकुंदराजांनीं

आपला देह गुरुसेवेंत फार कष्टविला. ते ब्रह्मचारी होते. त्यांच्या एका शिष्यानें "दास" हें नांव धारण करून कांहीं अभंग, पदें, केलेलीं आहेत. संशोधकांनीं जपलें पाहिजे. दोन मुकुंदराज व दोन दास झाले ! माहादेव आबांची समाधी धारूरच्या रानांत आहे व विद्यमान वंशज उद्धव हे धारूरपासून पश्चिमेस सहा कोसावर असलेल्या विडे गांवीं राहतात. धारूर, केज, विडे, सायखेडें, पैठण इत्यादि ठिकाणीं शोध केल्यास गंगाधर कोकिळांची कविता सांपडण्याचा फार संभव आहे. त्यांचें एक पद देतों:—

कलयुगीं विठ्ठल नाम प्रधान ॥ध्रु०॥ न्यासासन जप माळा मुद्रा । नाहीं कांहिं विधान

पुण्य असे पदरीं तरि लागे । नामीं अनुसंधान ॥ २ ॥
हरिभक्ताचें जीवन केवळ । प्रियकर नाम निधान ॥ ३ ॥
रामकृष्ण हरि जपतां वाचे । उघडे मोक्ष पिधान ॥ ४ ॥
**कोकिळ गंगाधर** न विसंबे । रामाचें अभिधान ॥ ५ ॥

## ४ परळी वैद्यनाथ

( लेखक—रा. शंकर श्रीकृष्ण देव )

मोगलाईत परभणीपासून चवदा कोस दक्षिणेस किंवा अंबाजोगाईपासून सात कोस ईशान्येस परळी क्षेत्र आहे. तेथें गांवाबाहेर च जगमित्रनागाचें स्थान आहे. गांवांत रामाचे तीन मठ आहेतः—( १ ) काळा राम, ( २ ) गोरा राम, ( ३ ) सावळा राम.

( १ ) काळाराम मठ रामदासी नाहीं परंतु जुना च आहे. देवालयांत एका खांबावर पत्रा असून त्यावर लेख कोरला आहे, तो असाः—

श्रीराम
स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शके नंदा
कगोत्रेंदुभिः कात्यामीश्वरवत्सरेऽयहुल
के पक्षे तथा फाल्गुने । सप्तम्यां शिशिरेऽ
ब्जधस्त्रउदिते हंसे सुरज्येष्ठभे चक्रे श्रो
त्रियवामनः सुविधिना श्रीरामसंस्था
पनां ॥ १ ॥ श्रीराम जय राम जय जय राम

( २ ) गोरारामः हा मठ रामदासी असून श्रीसमर्थशिष्य दादेगांवमठपति देवदास यांचे शिष्य काळुजी यांनीं स्थापन केला.

( ३ ) सावळाराम मठ रामदासी खरा पण अगदीं च अलिकडचा म्हणजे शक १८०४ तील आहे; तथापि मठ जरी नवीन असला तरी मठांत प्रतिष्ठित केलेली श्रीरामाची मूर्ति फारच पुरातन आहे. परभणीस एका तळ्यांत ही मूर्ति सांपडली. मूर्ति फार सुबक आहे व जाणत्यांचा अभिप्राय असा आहे कीं ही मूर्ति पांचसहाशें वर्षामागची असावी. वामांकित सीतेसह श्रीरामाला मारुतींनीं आपल्या हातावर धरले आहे.

या तीन संस्थांशिवाय परळीचें वैद्यनाथ ज्योतिर्लिंग सुप्रसिद्ध च आहे. वैद्यनाथांचें देवालय प्रचंड असून भोंवतालीं मार्कंडेय, हरिहर इत्यादि मोठमोठालीं तीर्थें आहेत. पेशव्यांनीं या गांवच्या समस्त ब्राह्मणांना ४४ चाहूर जमीन ( १ चाहूर = १२० बिघे ) म्हणजे ५२८० बिघे जमीन इनाम दिलेली आहे. शिवाय अहल्याबाईची हि साक्ष येथें आहे. आपल्या या भरतखंडांत असें क्वचित् च क्षेत्र असेल कीं जेथें देवी अहल्याबाईची कांहीं तरी आठवण ( Memorial ) नाहीं. श्रीवैद्यनाथांचे देवालयांत शिलालेख आहे, तो असाः—

॥ श्रीवैद्यनाथ प्रां प्रासादो नृपशालिवाह ॥
॥ नशके षट्शून्यसप्तेंदुभिश्शके संप्रमिते भृगौ ॥
॥ मधुशुचौ पक्षे तिथौ पंचमे ॥ खंडेरायसुकांत ॥
॥ या सुनतया मल्लारिनाम्नो विभोरब्देक्रोधिनि ॥
॥ चैव होलकरया कांत्या श्रुषाहल्यया ॥ १ ॥ श्री ॥

म्हणजे शके १७०६ त अहल्याबाईनीं मंदिराचा जीर्णोद्धार केला.

## ५ त्रिंबकजी डेंगळे व त्याचे साथीदार

( लेखक–रा. शंकर श्रीकृष्ण देव )

आमच्या खानदेशांत जीं पांच पंचवीस ऐतिहासिक घराणीं आहेत त्यांत नंदुरबारच्या देसायांचें घराणें प्रमुखांपैकीं एक आहे, यांत शंका नाहीं. मोगलबादशहांच्या वेळेपासून हें घराणें प्रसिद्ध असून त्याच्या दप्तरांत मोगल, शिंदे, होळकर, गायकवाड, बांडे, पेशवे इत्यादिकांचा व खानदेशांतील च लहानमोठ्या सरदारांचा पत्रव्यवहार सांपडण्याचा संभव फार आहे. त्या दप्तरांतील कांहीं थोडीं पत्रें विद्यमान देसाई यांनीं कृपा करून माझ्या हवालीं केलीं आहेत, त्यांत पुढील एक पत्र आहे, तें अनेक दृष्टींनीं विचार करण्यासारखें आहे असें जाणून आज मंडळाकडे पाठवीत आहे.

ज्येष्ठ शु. ६ शके १७३८ श्री. ता. १ जून सन १८१६ इसवी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री रामचंद्र बाबूराव का॥दार माहालानिहाये तालुके तालुके कुकुरमुंडे गोसावी यांसीः—

शेवक बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार सु॥ सबा आशर मया तैन व अलफ त्रिंबकजि डेंगला कुंपिणी इंग्रजबाहादर याचे कैदेंतून पळोन बंड करित फिरतो त्याची चौकशी करून डेंगला मा॥र याचे ठिकाण लाऊन जिवंत अगर मेला सरकारांत हवाला करून देईल त्याजला बक्षिस दोन लक्ष रुपये व हजार रुपयाचा गांव ईनाम इंग्रज बाहादूर याचे वियमानें दिल्हा जाईल या प्रें॥ खातर-जमा राखोन सरकारचाकरी करून दाखवावी याची पूर्ति चौकसी करून जो त्रिंबकजीस धरून आणून देईल त्याजवर सरकारची सर्फराजी होईल येविशीं कोणी अनमान करील त्याजवर सरकारची इतराजी होईल समस्त गरिब रयत ब्राह्मण व मराठे व परदेशी व मुसलमान व वाणी उदमी बेरड भील व मांग रामोसी व रहदार वगैरे जे कोणी त्रिंबकजी डेंगला याचा पत्ता आमुक जाग्यावर आहे असा प्रत्यक्ष सरकारांत दाखऊन देतील त्यास पांचहजार रुपये बक्षिस व एक चाहूर जमीन इनाम इंग्रजबाहादूर याचे वियमानें पावेल डेंगला मा॥र याचा पत्ता ठाऊक आसोन जर कोणी सरकारांत समजाविण्यास आलस केला असे विदित जालें तर त्याचें पारपत्य होईल त्रिंबकजी डेंगला बंडवाला याच्या मिलाफी आसामी

बि त॥

१ बापू गायकवाड सेट फलकर १ भोगाजी १ रविराव सिंदे केणीकर १ तिमापा वोतुरी १ माहादाजीपंत नातेपोतेकर १ गोधाजी डेंगला १ सयाजी मुळे १ आपाजी पा॥ कुरबावीकर १ निंबाजी जाधव फलटणकर १ महिपतराव डेंगला १ बापू बरडकर १ दाजी डधले.

१२

एकून बारा आसामी याचे कुटुंबाचीं मुलेंमाणसें कैद करून बेड्या घालून बंदोबस्तानें हुजूर पोचती करणें व त्याचीं घरें जमीनदोस्त करून घरांतील चीज-वस्त सुतलिचे तोड्यासुद्धां जप्त करून त्याचा आकार होईल तो जाजती सिबंदी वगैरे खर्च लागेल त्या ऐवजीं घेणें व त्याचीं इनामें वतनें वृत्ती असतील त्या जप्त करणें या बारा आसामी पै॥ जे कोणी त्रिंबकजी डेंगल्यास धरून आणून देतील त्याचा आपराध माफ होऊन वर लिहिल्याप्रों॥ बक्षीस पावेल या बारा आसामीं खेरीज करून स्वार बंडाचे मिलाफी स्वार व पायदळ व कारकून व शागीर्द पेशा वगैरे बंडाची चाकरी सोडून आपलाले घरीं येऊन जमीनदार व मोकदम यास रुजू

होऊन राहिले असतां त्यास बंडाचे मिलाफाचा आपराध माफ केला जाइल बंडाचा चाकरी सोडून न आल्यास बारा आसामीचें पारपत्य करण्याचें लि॥ आहे त्याप्रों। याचें पारपत्य करणें बंडाचे मिलाफी गरीब लोक यांतून कोणी त्रिंबकजी डेंगला याचा पत्ता लाऊन प्रत्यक्ष सरकारांत दाखऊन देईल त्यास वर लि॥ प्रों। बक्षिस पावलें जाईल जाणिजे छ० ४ रजब आज्ञाप्रमाण मोर्तब

लेखन सीमा

## ६ कृष्णाजी नाईक जोशी व रा. पांगारकर

[ लेखक–रा. काशिनाथ नारायण साने ]

१ राजश्री लक्ष्मणराव पांगारकर यांचें " मोरोपंताचें चरित्र " यांतील पाध्ये–जोशी–पेशवे वादाचा स्पष्ट निकाल रा. वि. का. राजवाडे यांनीं जो अस्सल निवाडा प्रसिद्ध केला त्यानें एकदांचा लागला. आतां त्याबद्दल लिहिण्याची जरुरी नाहीं. ( " जोशी, पाध्ये व नानासाहेब पेशवे " ह्या माझ्या लेखाचें कलम ७, भा० इ० सं. मंडळाचा अहवाल शके १८३२, पृष्ठ ७६, येथें पाहावें ).

२ ह्याच चरित्रांत " ठळक गोष्टींची शकावली " रा. पांगारकर यांनीं दिली आहे तींत त्यांनीं " शके १६३० [ १७०८ ] बाबूजी नाईक बारामतकर जोशी यांस शाहू महाराजांकडून मराठी राज्याची पोतदारी मिळाल्यामुळें त्यांचें सातान्यास आगमन. " असें विधान केलें आहे, तें साफ चुकीचें आहे. शाहू महाराजांबरोबर उत्तरेकडून सातान्यास आले ते कृष्णाजी नाईक जोशी. त्यांस शाहू महाराजांनीं राज्यावर बसल्यानंतर पोतदारी दिली असें चिटणीसकृत " शाहू महाराजांचें चरित्र " यांत लिहिलें आहे. सेरीज त्या वेळीं जोशी हे बारामतकर झालेही नव्हते. त्यांचें राहाणें शाहू महाराजांपाशीं सातान्यासच होतें.

३ पुढें पृष्ठ ५३ मध्यें रा. पांगारकर लिहितात, " तेव्हां सदाशिव नाईक यांची संपत्ति व इभ्रत पाहून त्यांनीं ( शाहू महाराजांनीं ) त्यांस दक्षिणेंत आणिलें व मराठी राज्याची पोतदारी दिली. " सदाशिव नाईक म्हणजे मोरोपंताचे यजमान जे बाबूजी नाईक त्यांचे तीर्थरूप. त्यांस दक्षिणेंत शाहू महाराजांनीं आणिलें व त्यांस पोतदारी दिली अशाबद्दल दाखला रा. पांगारकरांस कोठें मिळाला कोण जाणें ! दक्षिणेंत आले ते व पोतदारी संपादन करणारे ते कृष्णाजी नाईक होत, असें चिटणीस यांच्या चरित्रावरून स्पष्ट होतें. हें चरित्र रा. पांगारकर

यांस उपलब्ध असून त्यांनीं त्याचें अध्ययनही केलें होतें, असें त्याच्या ग्रंथावरून उघड होत आहे. तथापि कृष्णाजी नाईक यांचें नांव न देतां सदाशिव नाईक व बाबूजी नाईक यांचींच नांवें पोतदारीचे संपादक म्हणून देण्याचें कारण काय असावें ? ही नजरचूक नसावी. मोरोपंताचे यजमान बाबूजी नाईक, व त्यांचे तीर्थरूप सदाशिव नाईक एवढ्या खातरच त्यांचीं नांवें तेवढीं पुढें केलेलीं दिसतात असें म्हणावें लागतें.

४ पृष्ठ ५२ व ५३ यांच्या दरम्यान नाईक जोशी यांची वंशावळ रा. पांगारकर यांनीं दिली आहे. तींत ह्या कृष्णाजी नाइकाचें नांवही नाहीं हें मोठें आश्चर्य आहे. तो खरोखर कर्ता पुरुष व पोतदारीचा मूळ संपादक असतां त्याचें नांव न देतां केसोबा नाईक जोशी यांस सदाशिव नाईक हा एकच पुत्र असें दर्शविलें आहे. कदाचित् श्री. बावडेकर यांजकडून मिळालेल्या वंशावळींत कांहीं कारणामुळें कृष्णाजी केसोबा यांचें नांव गाळलें असेल. पण ज्याअर्थीं कृष्णाजी नाइकाचें नांव रा. पांगारकरांस परिचित होतें, त्याअर्थीं त्यांनीं त्या पुरुषाबद्दल चौकशी करून ह्या मूळ संपादकाचें स्थळ वंशावळींत दाखविणें जरूर होतें. तें त्यांनीं करण्याचें वर्जिलें ह्यावरून वर कलम तीनमध्यें जें अनुमान केलें आहे त्यास पुष्टी येते. असा अन्याय कृष्णाजी नाइकासंबंधें करणें योग्य नव्हे.

५ कृष्णाजी नाईक यास पोतदारी दिल्याबद्दल दाखला शाहू महाराजांचे चरित्रांत आहे. श्री. बावडेकर यांजकडील कागदपत्रांतही असा दाखला मिळण्याचा संभव आहे. हल्लीं बावडेकरांकडे पिंपरी, तालुके हवेली, हा गांव इनाम चालत आहे. त्या गांवचें संपादकत्वही कृष्णाजी नाईक यांजकडेच आहे असें त्या गांवच्या सनदेवरून होत आहे. त्या सनदेंत सदाशिव नाईक याचें नांवही नाहीं. कदाचित् हा गांव इनाम मिळाला त्या वेळीं सदाशिव नाईक दक्षिणेंत आलेही नसतील. हा गांव कृष्णाजी नाईक यांस इनाम दिला त्याजबद्दल जी सनद दिली, तिची नक्कल मला उपलब्ध झाल्यास सुमारें १।२। वर्षें झालीं. बाबूजी नाइकाचे वंशज श्री. बावडेकर यांजकडे हा इनामगांव चालत आहे. तेव्हां अस्सल सनद त्यांजकडे असली पाहिजे. ती मिळविण्याबद्दल गतवर्षीं ८।१० महिने खटपट केली, परंतु ती मिळाली नाहीं. अस्सल सनद पाहाण्याची अवश्यकता अशी होती कीं, मिळालेली नक्कल अस्सल बरहुकूम आहे कीं नाहीं ह्याजबद्दल मनाची पक्की खातरी व्हावी. बावडेकर यांचे आप्त व त्यांचे मित्र यांच्या मार्फत अस्सल सनदेचें मागणें केलें. मीही स्वतः त्यांजकडे ही अस्सल सनद पाहाण्यास मिळावी म्हणून गेलों होतों. सनदेवरून नक्कल फक्त रुजू घेणेंची होती. पण अस्सल न मिळाल्यामुळें रुजू घेणें तसेंच राहिलें. आतां ही नक्कल जशीच्या तशीच आपणांजवळ पुष्कळ

काळपर्यंत ठेवणें बरें न वाटल्यामुळें आज ती मंडळापुढें दाखल करीत आहें. पुढें-मागें बावडेकर यांच्याकडे कोणाचा वशिला पोंचून अस्सल मिळाल्यास रुजुवात घेतां येईल, आणि अस्सल व नक्कल यांचे दरम्यान कांहीं फरक नजरेस आल्यास तोही मंडळापुढें दाखल करतां येईल. बाकी मला नक्कल मिळाली आहे ती भरं-वसेलायक माणसाकडूनच मिळाली आहे हें सांगणें जरूर आहे. असो. इतका प्रस्ताव ह्या सनदेबद्दल करून व पुढील आवृत्तींत कृष्णाजी नाइकास योग्य तो न्याय रा. पांगारकरांनीं द्यावा अशी त्यांस सूचना करून नक्कल मंडळापुढें सादर करितों.

श्री

वर्धिष्णुर्विक
[ मै ] विष्णोः सामूर्ति
[ रिव ] वामनी शंभु-
सू [ नो ] रसौ मुद्रा
शिव [ रा ] जस्य रा
जते *

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ४७ शार्वरी संवछरे पोष शुध पंचमी गुरुवासरे क्षेत्रीय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी यांणीं रा. कृष्णाजी नाईक बिन केसोबा‡ नाईक उपनाम जोतिषी यांस दिल्हे इनामपत्र ऐसाजे तुम्ही स्वामी-संनिध किले सातारेचे मुकामीं विनंती केली जे आपण स्वामीची शेवा निष्टेनें करीत असों आपणांस एक गांव इनाम करून देऊन वंशपरंपरेनें चालविलें पाहिजे म्हणून त्यावरून मनास आणून तुम्ही स्वामीची शेवा एकनिष्ठपणें करीत आहां तुमचें चालविणें स्वामीस अवशाक जाणोन स्वामी तुम्हांवरि कृपाळू होऊन मौजे

---

* हा शिक्का अष्टकोनी आहे. चौकटीच्या कौसांतील अक्षरें स्पष्ट उठलेलीं नाहींत. तीं संदर्भावरून मीं घातलीं आहेत. ह्या शिक्यांतही ' शिव ' असेंच शाहू-महाराजांस म्हटलें आहे. भा. इ. सं. मंडळाचा अहवाल शके १८३२ यांत दिलेल माझा लेख. कलम ४, पृष्ठ २१, पाहावें.

‡ ' कैसोवा ' असें मूळ नकलेंत आहे. मग पूर्वी " बा " प्रत्यया ऐवजीं "वा" असें घालीत कीं काय न कळे. अस्सल सनद मिळाल्यास कदाचित् ह्याचा निकाल लागेल.

पिंपरी, ता। हवेली, प्रां। पुणें हा गांव पेशजीच्या मुकाशियाकडून दूर करून हाली कुलबाव कुलकानू देखील हलीपटी व पेस्तरपटी, जल तरू तृण पाषाण निधी निक्षेप खेरीज इनामदार व हकदार तुम्हांस व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम करून दिल्हा असे तरि तुम्हीं मौजे मजकूर चतुःसिमापूर्वक मर्यादेप्रमाणें आपले

० श्री ~
राजा शाहू नरपति
हर्षनिधान बाजीराव
बल्लाळ मुख्य प्रधा-
न

० श्री ~
श्री आई आदि
पुरुष श्री राजा शाहू
छत्रपति स्वामी रुपानिधी
तस्य श्रीनवा-
स परशुराम
प्रतिनिधी

दुमाले करून घेऊन, तुम्ही व तुमचे वंशपरंपरेनें इनाम अनुभवून सुखरूप राहणें. लेखनालंकार तारीख १ रविलावल इहिदे अशरीन

मर्यादे
यंराजते

## ७ आगरी कुणबी

( लेखक रा. काशिनाथ नारायण साने )

आगरी जातीचे कुणबी यांचा भरणा कर्जत ( कुलाबा ) व कल्याण ( ठाणें ) तालुक्यांत मोठा आहे. ते आपणांस ' अगडी ' म्हणतात. अलीकडे त्यांतील शिकलेले लोक आपणांस ' अगळे ' ' आगळे ' असें म्हणवूं लागले आहेत. यांची भाषा देशी कुणब्यांच्या भाषेहून बरीच भिन्न आहे. दोन आगरी पुरुष एकमेकांशीं झपाट्यानें बोलत असतां अपरिचित पांढरपेशास त्यांच्या बोलण्याचा उलगडा चटकर होत नाहीं. आगरी बायका बोलूं लागल्या तर त्यांचें

बोलणें समजून घेण्याचे कामांत त्या पांढरपेशाची त्रेधाच उडते. असो, भेद कोणते आहेत ते आतां सांगूं:—

१ वर्ण (१) 'ग' च्या ठिकाणीं मूर्धन्य 'ज' चा प्रयोग करितात उ. 'जेला' = 'गेला'. 'गेला' ह्या रूपापेक्षां 'जेला' हें रूप मूळ धातु जो 'जा' त्याशीं अधिक मिळतें आहे. ह्याप्रमाणेंच 'घ' च्या ऐवजीं मूर्धन्य 'झ' योजितात. उ. 'झेतलें' = 'घेतलें' 'झ्या' = "घ्या." पण 'क' 'ख' यांच्या ऐवजीं 'च' 'छ' यांचा प्रयोग करीत नाहींत.

(२) 'ड' च्या बद्दल 'र' ची योजना करितात. उदाहरण 'उराला' = 'उडाला' आणि कधीं कधीं 'र' च्या ऐवजीं 'ड' योजितात. 'वाडा' = 'वारा' 'अगडी' = 'अगरी.' 'लय मोठा वाडा आला नी वारा उरून जेला' = 'फार मोठा वारा आला आणि वाडा (गुरांचा गोठा-रानांत बांधितात तो-) उडून गेला.'

(३) कधीं कधीं 'र' च्या ठिकाणीं 'ल' ही ऐकूं येतो. उ. 'मुलगा लरतो' = 'मुलगा रडतो.'

२ नामें. (१) 'गोंड' = भोसकूं, कुंपणांत पाडलेली वाट. उ. 'टोणग्यांनीं वईत तीन गोंड पाडलें' = कुंपणांत तीन भोसकीं करून वाटा केल्या.

(२) 'हेतू' = 'आठवण,' 'स्मरण.' उ. 'त्या कामाची मला हेतू राहिली नाहीं.' असा 'हेतू' शब्दाचा स्त्रीलिंगी प्रयोग 'आठवण' ह्या अर्थी करितात.

(३) 'अदावत' = अडचण. उ. 'हें शेत घेतां पण त्यांत लय 'अदावत' आहे' = अडचण आहे. 'गाडीवाटेंत दगड, ओहोळ, झाडें, किती तरी अदावत.'

३ सर्वनामें (१) देशी 'म्यां' ह्या तृतीयेच्या रूपाऐवजीं 'मी' सर्वनामास तृतीयेचा 'नीं' प्रत्यय जोडून 'मिनीं' असें रूप साधितात. उ. 'मिनीं काय केलें.' = 'म्यां किंवा मीं काय केलें?' मना = मला.

(१) सदरहूप्रमाणें 'तूं' याचें रूप 'तुनीं' असें योजितात.

(२) 'काय' या सर्वनामास द्वितीया, चतुर्थी विभक्तींचा प्रत्यय 'ला' तृतियेचा प्रत्यय 'शीं' व षष्ठीचा प्रत्यय 'चा' लावून त्या त्या विभक्तींचीं रूपें उपयोजितात; मात्र 'काय' यांतील 'का' स ऱ्हस्वत्व देतात. 'कयाला' = कशाला; 'कयाशीं' = कशाशीं 'कयाचा, कयाची, कयाचें' = कशाचा कशाची, कशाचें. 'कशाला' इत्यादि प्रचलित मूळ रूपांतही 'का' स ऱ्हस्वत्व देऊन 'क' ची योजना झाली आहे. 'ऐशी विद्या काशाला,' 'ऐशी

बाइल काशाला, ' ' कासया धरियेला हय तो तुवां ' वगैरे पद्य सर्वश्रुत आहे. तेथें ' काय ' यांतील ' का ' दीर्घच राहिला आहे. पण प्रचलित भाषेंत त्यास ऱ्हस्वत्व देऊन ' कशाला ' इत्यादि रूपें योजितात. तशींच ' कायाला, कायाशीं, कायाचा ' अशीं रूपें न करतां ' कयाला, कयाशी, कयाचा, ' अशीं रूपें आगरी उपयोजितात. मराठींत दोन दीर्घ स्वर एकत्र आले असतां एकास, विशेषतः पहिल्यास, ऱ्हस्वत्व देण्याचा स्वाभाविक जो प्रचार त्यास अनुसरूनच ' का ' स ऱ्हस्वत्व आलें आहे.

( ३ ) ' कती ' = ( किती ) हें संख्यावाचक प्रश्नार्थक सर्वनाम वापरतात तें मराठींतील ' किती ' पेक्षां संस्कृत ' कति ' ला फारच मिळतें आहे. उ. ' कती दिवस लागतील ? ' = किती दिवस लागतील ? ' कती चुना मळला ? ' = किती चुना मळला ?

( ४ ) ' बिसरा ' = ' दुसरा. ' उ. ' बिसरा उपाय काय ? ' ' दुसरा उपाय काय ? ' बिसरा ' पासूनच ' बिसरून ' = दुसरून- दुसऱ्यानें, पुन्हा असें अव्यय सिद्ध केलें आहे. येथें ' दु ' च्या ठिकाणीं ' धु ' व्हावयाचा पण ' धु ' पालटून ' बि ' च होते.

**४ क्रियापदें:-** ( १ ) ' सांग ' धातूच्या भूतकाळचें रूप साधितांना शिष्ट भाषेंतील मध्यंतरींचा ' त ' आदेश न योजितां, धोपट मार्गाचें रूप ' सांगलें ' असें साधितात. ' मिनीं सांगलं = मीं सांगितलें. ' ' मागणें ' याचें ' मागलें ' ( हिंदी ' मंगना ) ' त्यानें मागलं म्हणून मिनीं दिलें. ' आपलीं मुलेंही प्रथम बोलूं लागलीं म्हणजे ' मी करलं ' असेंच धोपट मार्गाचें रूप करितात.

( २ ) कांहीं क्रियापदें किंवा त्यांचे अर्थ देशावर माहित नाहींतः—

**हिलगणें** = अडकणें, अडकून राहणें. ' गवताची मोळी जाळींत हिलगली ' ( अडकली ). हें क्रियापद हिंदींत व ऊर्दूंत प्रसिद्ध आहे.

' **पोगळणें** ' = सुटणें, मोकळा होणें, विस्कळित होणें. उ. ' गवताचा भारा **पोगळला** ' = सुटला, विस्कळित झाला. ' **कलणें** ' = ' **कळणें** ' = ' दिसणें '. उ. ' झाडावर जांभळें आहेत म्हणतां, पण मला **कलत नाहींत** ' = ' दिसत नाहींत, माझ्या नजरेस येत नाहींत. '

**ओरडणें** = हांक मारणें, बोलावणें. उ. ' दादा तुला ओरडतात ' = ' हांक मारतात. '

' **बोलणें** ' = ' उत्तर करणें ' उ. ' मिनीं सांगलं लौकर ये; तो बोलतो ( उत्तर करतो ) काम आटपून येईन. '

**५ अव्ययें:—** ( १ ) ' **पासून** ' याची योजना ' पेक्षां ' ह्यांच्या ऐवजीं करितात. ' बाजारी सोयरेलापासून नारळाचे तेल लय नामी ' = बाजारी सोयरेला-

पेक्षां नारळाचें तेल फार चांगलें. ' काळ्यापासून लाल्या जबाद तलख ' ' काळया-पेक्षां लाल्या अधिक तलख. '

**विसरून**:—दुसरून, दुसऱ्यानें, पुन्हा, वर ' **विसरा** ' पाहा. मंग = मग.

६ आगरी लोकांचीं कांहीं आडनांवें. ( १ ) **भोईर, धुळे, डांगरे, मुंढे, मेहेर, शेणे, कराळे, डाइरे, जोगले, वेखंडे, गोडे, ठाणगे** इ.

( २ ) खेरीज मराठ्यांचीं आडनांवें त्यांच्यांत आढळतात तीं:—**पोवार, जाधव, मोहिते, महाडिक, घोरपडे** इ.

( ३ ) धंद्यावरून व गांवावरून आडनांवें आहेत तीं:—**भोपी, माळी,** भगत, **इरमाळी, झसकर, कोंढिलकर, खारकर** इ.

७ आगरी लोकांचीं कांहीं नांवें ( १ ) पुरुषांचीं— **हशा, उंड्या, हेंड्या, झावऱ्या, बेंड्या, चांग्या, पोशा, बामा, गोमा, धाया, डुंया, जैत्या.** ( २ ) बायकांचीं-**वाळकी, मुंढी, नामी, धाकली, काळी** इ.

८ आगरी लोकांमध्यें किंवा त्यांच्याशेजारीं जे मराठी कुणबी राहातात, त्यांची भाषाही आगरी लोकांसारखीच बनलेली असते. हा संगतीचा गुण होय.

---

## ८ रत्नाकर स्वामी

( लेखक-रा. गो. का. चांदोरकर )

शके १८०७ मध्यें ' दीपरत्नाकर ' नांवाचा एक ग्रंथ मुंबईत छापला गेला आहे. या नंतर या ग्रंथाच्या आणखी कांहीं नवीन आवृत्ति निघाल्या असतील असें वाटत नाहीं.

या ' दीपरत्नाकरा ' चा कर्ता रत्नाकर. यांची माहिती उपलब्ध तर आजपर्यंत नव्हती च परंतु तत्प्रीत्यर्थ जिज्ञासा हि होती कीं नव्हती याबद्दल संशय आहे. मला जी माहिती उपलब्ध झाली ती अशी:—

( मूळपुरुष ) महदुबा = गंगाबाई
|
हिराजी
|
हरिहर = अनुबाई
|
**रत्नाकर** = सावित्री.

यांचें उपनांव सदाव्रते गोत्र भार्गव. यजुर्वेदीय मानवसूत्र. पूर्वी गृहस्थाश्रमी असून अविंधाच्या पदरीं शेकदारी, अमीनी वगैरे दर्जाच्या नोकऱ्या केल्या. पूर्वकर्मानुसार उपरति होऊन, मुल्हेरकर उद्धव स्वामींचे गुरू जे '**रामानंद**' त्यांचा यांस अनुग्रह झाला. शक १६२५ संवत्सर १७६० सुभानु आषाढ शु. ११.

अनुग्रहापूर्वी सन्यस्त नव्हते. परंतु तपोबलानें श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा साक्षात्कार होऊन त्यांच्या अनुज्ञेनें रामानंदाचा उपदेश घेतलेला आहे.

उपदेशानंतर देशपर्यटन करून खानदेशांत पिंपळनेर तालुक्यांत मुल्हेरच्या शिवे शेजारी सरित्तटाकीं 'पानखेडें' म्हणून हल्लीं एक खेडे आहे तेथें सद्गुरूसमाधि सन्निध 'दीपरत्नाकरा' ची रचना करून कांहीं कालानें गुरू शेजारीं च 'स्वामीं'नीं हि देह ठेविला. शक १६४१ विकारी नाम संवत्सरे अश्विन वद्य १३.

पानखेडे येथें अद्याप श्री रामानंद व रत्नाकर स्वामी यांच्या समाधी जीर्ण स्थितींत शेजारीं शेजारीं उभ्या आहेत.

दीपरत्नाकरावरून रत्नाकर स्वामींचे परम गुरू 'सिद्धानंद' म्हणून होते असें दिसतें.

रत्नाकर स्वामींनीं ग्रंथांचा एक महोदधी उत्पन्न केलेला आहे. इतकेंच नाहीं परंतु कांहीं ग्रंथ गुजराथी व व्रिज या भाषेंत त्यांनीं रचिले आहेत, व आनंदाची गोष्ट ही कीं ते ग्रंथ अद्याप बऱ्हाणपुरीं बऱ्या स्थितींत आहेत.

स्वामींचे शिष्य खानदेश व गुजराथ यांच्या मध्यंवर्ती भागांत बरेच आहेत व कांहीं नाशिक जिल्ह्यांत आहेत.

कळवण येथें त्यांच्या परंपरेचा एक मठ आहे. आज आठ वर्षांपूर्वी त्या मठाचे अधिपति बाबाजी बुवा म्हणून होते. हा मठ स्वामींचे **जयदेव** म्हणून उपदेशित होते त्यांनीं स्थापिलेला आहे.

ग्रंथः—'दीपरत्नाकरा' खेरीज आणखी जे ग्रंथ स्वामींनी रचिले त्यापैकीं कांहीं हे होतः—

१ सिद्धान्तरत्नाकर २ वैराग्यरत्नाकर ३ उपदेशरत्नाकर ४ प्रकाशरत्नाकर ५ निश्चयरत्नाकर ६ निःसंदेहरत्नाकर ७ भिक्षुगीत ८ विश्वरूप नमन ९ ब्रह्मानुभव स्तोत्र १० सद्गुरू अष्टक ११ संगमचरित्र १२ ॐकार वर्णन १३ रत्नाकर उपदेश

या खेरीज आणखी मला माहित असे हजार दोन हजार पावेतों अभंग व शिवाय पदें वगैरे.

स्वामींनी सबंध भागवत आपल्या गुजराथी शिष्यांकरितां गुजराथींत केलेलें आहे. हा ग्रंथ अप्रतिम आहे व तो अद्याप बऱ्या स्थितींत उपलब्ध आहे. तसें च गीतेवर एक टीका हि प्राकृतांत केलेली आहे. वर दिलेला ' प्रकाश रत्नाकर ' ( ग्रंथांक ४ ) हा ब्रिज भाषेंत आहे.*

## ९ श्रीउद्बोधनाथ-कृत श्री ज्ञानेश्वर-चरित्र

( लेखक-रा. गो. का. चांदोरकर )

श्रीक्षेत्र पैठण येथें शिवदिनकेसरींचा मठ आहे हें सर्वश्रुत च आहे. या शिवदिनांची परंपरा श्री ज्ञानेश्वरमहाराजांपासून आहे. शिवदिननाथांचे गुरु केसरीनाथ व त्यांचे गुरु उद्बोधनाथ. यांचा एक चरित्रात्मक अभंग पैठण येथील शिवदिन मठांतील संग्रह चाळीत असतां मिळाला. या अभंगांत ज्ञानेश्वरांचें साग्र चरित्र त्रोटक रितीनें सशक वर्णन केलेलें आहे. तो अभंग असाः—

श्री

दूजा **पद्मनाभ ज्ञानदेव** मूर्ति । एक सहस्रावर्ति ज्याण्णवीचे ॥ १ ॥
श्रावण अष्टमी कृष्णपक्ष बरा । नंदन वत्सरा माजि जन्म ॥ २ ॥
निवृत्तिप्रसाद तयावरि झाला । मार्गशीर्ष पूर्णा प्रमाथेसी ॥ ३ ॥
रविशकशत एक तयावरी । दीक्षापट धरी **ज्ञाननाथ** ॥ ४ ॥
भानुशत भानू रची ज्ञानेश्वरी । विकृत सवत्सरीं ज्ञानरूप ॥ ५ ॥
याच शकीं रिपू म्हैसा बोलविला । चालवी भिंतीला वसुमाजी ॥ ६ ॥
लोकोत्तरापूर्व चमत्कार केले । समाधि आधीलें योगबळे ॥ ७ ॥
कार्तिकाची वद्य एकादशी पाहो । सूर्यअष्टदाहो शकशत ॥ ८ ॥
जगासी दुर्मुख म्हणोनि दुर्मुख । संवत्सर देख समाधीसि ॥ ९ ॥
प्रतिष्ठान **आपेगांवीं** ज्याचा जन्म । समाधि अलंके उद्बोधांत ॥ १० ॥

ज्ञानेश्वरमहाराजांचा जन्मशक ११९३ हा गणलेला आहे. त्या शकीं प्रजापति संवत्सर येतो नंदन येत नाहीं. परंतु संवत्सराची नामसंगति जुळत नसली तरी संख्या जुळते.

---

* मु. कळवण येथून मि. मार्गशीर्ष शु. १।३४ चे पत्रांत रा. पां. न. पटवर्धन लिहितात कीं ' येथें स्वामी रत्नाकर यांचे शिष्यपरंपरेंतील मठ आहे खरा; परंतु त्याचा जयदेवाशीं कांहीं संबंध नाहीं. मठांत, दीपरत्नाकर (अध्याय १४ ओं. ३३१६) व प्राकृत गीता एवढे च ग्रंथ आहेत. रत्नाकर मैत्रायणी असून ' चंडीपूर ( चणकापूर ता. कळवण ) येथील मूळ राहणारा. ' चिटणीस.

४ •

तसें अ.' वसु ' माजी भिंतीला चालविलें म्हणून वर्णन आहे. वसु आठ आहेत, तेव्हां १२०८ मध्यें भिंतीस चालविलें कीं कसें ?

## १० विनायकी लिपि

( लेखक—रा. गो. का. चांदोरकर )

कन्नड येथील जुन्या ग्रंथांचा संग्रह चाळीत असतां त्यांत वैद्यकावरील कांहीं ग्रंथ या विनायकी लिपींत लिहिलेले आढळले.

स्वर व स्वरचिन्हें या लिपींत आपले ' बालबोध ' देवनागरी लिपीप्रमाणें च आहेत. परंतु व्यंजनें सांकेतिक आहेत. इतर सांकेतिक लिपींत व या लिपींत असा फरक आहे कीं इतरत्र एका वर्णाबद्दल दुसरा वर्ण योजिलेला असतो परंतु दोन्ही हि वर्ण देवनागरींतलि च असतात. उदाहरणार्थ ' महानुभावांची ' सांकेतिक लिपी अथवा ' पेशवाईतील एक सांकेतिक पत्र ' याची लिपी. ( भा. इ. सं. मंडळ अहवाल शक १८३२ पृ. ७८।७६ )

तसें या विनायकी लिपीचें नाहीं. इच्यांत देवनागरींतील एका वर्णाऐवजी निराळें च एक सूचक चिन्ह गृहीत धरलें आहे. यामुळें इच्यांतलि वर्णांत व देवनागरींतील वर्णांत आकृतिसाम्य मुळींच नाहीं.

संयुक्त वर्णांचे बाबतींत या लिपीचें व पूर्व कालीन अशोक लिपीचें अथवा त्या च अशोक लिपीचा आधुनिक प्रगल्भ तर्जुमा जी मोडी अथवा मौर्यी लिपि तिचें अत्यंत साम्य आहे.

देवनागरी अथवा बालबोधींत स्वरावांचून व्यंजनाचा जसा अर्धा—अस्फुट—उच्चार व त्या उच्चारानुरूप जसें त्या वर्णाचें अर्धें रूप तसें अशोक लिपींत नाहीं, मौर्यींत म्हणजे मोडींत नाहीं, व तसें च या विनायकी लिपींत हि नाहीं. उदाहरणार्थ ' ख्य ' ( ख् + य् + अ ) हें जोडाक्षर देवनागरींत अथवा आधुनिक बालबोधींत जसें अर्धा ' ख ' काढून त्यास ' य ' जोडून साधतां येतें तशी अशोक लिपींत, मौर्यी अथवा मोडी लिपींत किंवा विनायकी लिपींत अर्धा ' ख ' काढण्याची सोय नाहीं. यांत ' ख्य ' आणि खय हीं दोन्हीं एक च स्वरूपाचीं आहेत. असो.

त्या या विनायकी लिपीचें वर्णरूप सोबत जोडलेल्या चित्रपटावरून ध्यानांत येईल.

| | |
|---|---|
| क | 𑘎 |
| ख | 𑘏 |
| ग | 𑘐 |
| च | 𑘓 |
| छ | 𑘔 |
| ज | 𑘕 |
| ट | 𑘘 |
| ठ | 𑘙 |
| ड | 𑘚 |
| ण | 𑘜 |
| त | 𑘝 |
| थ | 𑘞 |
| द | 𑘟 |
| ध | 𑘠 |
| न | 𑘡 |

| | |
|---|---|
| प | 𑘢 |
| ब | 𑘤 |
| भ | 𑘥 |
| म | 𑘦 |
| य | 𑘧 |
| र | 𑘨 |
| ल | 𑘩 |
| व | 𑘪 |
| श | 𑘫 |
| ष | 𑘬 |
| स | 𑘭 |
| ह | 𑘮 |
| ळ | 𑘯 |
| क्ष | 𑘎𑘿𑘬 |

## ११ मेस्तकपुस्तक

( लेखक–रा. वि. का. राजवाडे )

१ हें मेस्तकपुस्तक मसूरास सांपडलें. पोथी आहे. नकल शक १६६७ त केली. अर्थात् आज १३३ वर्षें झालीं. पानें ६३ आहेत. पैकीं ३ व ४ पानें गहाळ. ओवी संख्या नकल करणारानें ७२१ लिहिली; परंतु वस्तुतः ७२० आहे.

२ नकलकारानें कोठें अनुस्वार दिले नाहींत, कोठें ऱ्हस्वदीर्घांच्या चुक्या केल्या आहेत; अवश्य वाटल्या स्थळीं दुरुस्ती केली आहे. बाकी पाठ जशाचा तसा ठेवला आहे. सबंद नकल मीं स्वतः केली.

३ ग्रंथकर्त्याचें ग्रंथांत नांव नाहीं. त्यानें चोवीस वर्षें मजमूची नोकरी केली. कोठें, कोण्या राजाच्या पदरीं, तें सांगितलें नाहीं. तथापि ग्रंथकार राजारामाच्या वेळचा दिसतो.

४ हेमाद्रीच्या मेस्तकाला धरून आपण ग्रंथ लिहिला म्हणून ग्रंथकार म्हणतो. अर्थात् त्याच्या वेळीं हेमाद्रीचीं मेस्तकें होतीं. तीं मेस्तकें अस्सल शुद्ध मराठींत किंवा संस्कृतांत लिहिलेलीं सांपडल्यास बहार होईल. अंदाज आहे कीं, तीं मेस्तकें गोदातीरीं सांपडावीं.

५ नकल करणारानें भाषा आधुनिक अनेक स्थलीं केलेली दिसते.

६ ग्रंथांतील मजकुराचें पृथक्करण अन्यत्र केलें जाईल.

७ पिशाचालिपि म्हणजे पिसाऊर प्रांतांतील ऊर्फ पैशाची लिपि, तिचें अनुकरण हेमाडपंतानें केलेलें दिसतें. मोडी ऊर्फ मोरी ऊर्फ मौर्यी लिपि मूळ पिसाऊर ऊर्फ पेशावर प्रांतांतील. तिचा प्रसार हेमाडपंतानें जलद लिहिण्यास्तव केला.

८ ह्या मेस्तकांत शणवई, शणोपण, हा शब्द चार वेळ आला आहे. शणवई म्हणजे कारकून असा येथें अर्थ आहे.

( १ ) श्रेणीपति = सेणीवइ = सेणीवी = सेणवी
श्रेणी म्हणजे व्यापाऱ्यांचा किंवा कारागिरांचा संघ. त्याचा मुख्य म्हणजे श्रेणीपति.

( २ ) सैन्यपति = सेण्णवइ = सेणवी. सेनापति म्हणजे शेणवी.

ह्या दोन्ही व्युत्पत्त्या येथें कारकून किंवा कुळकरणी या अर्थी लागू पडत नाहींत. तेव्हां शणवइ, शेणवइ, शणोई, या शब्दाचें तिसरें आणीक कांहीं तरी मूळ आहे. सेनापति व श्रेणीपति हे तर दोन अर्थ आहेत च. परंतु, कारकून असा तिसरा हि एक अर्थ आहे, ह्यांत संदेह नाहीं.

# पुस्तक मेस्तक

श्रीगुरुगणेश प्रसीद् । श्री सरस्वत्यै नमः । कुलदेव्यै नमः । निर्विघ्नमस्तु । शुभं भवतु ॥ १ ॥ श्रीगणेशाचें स्मरण । काया वाचा अभिवंदन । बोलों इछितसें वचन । कांहीं येक ॥ १ ॥ शारदा वाङ्मयमूर्ती । भावें नमिली भारती । आनंदसुखाची कल्याणमूर्ती । सर्वार्थदा ॥ २ ॥ आतां नमू दामोदरू । सद्रूप चिद्रूप सद्गुरू । लीले चि तारी भवसागरू । तारका निश्चयेसी ॥ ३ ॥ नमूं पंडीतशिरोमणी । अलोलीक जयाची करणी । या विश्वाची बुझावणी । जेणे केली ॥ ४ ॥ कलयुगीं विपरीत आचार । द्विजासि नाही अध्ययनीं आदर । राज्य यवन अकर्माकार । होतील पुढें ॥ ५ ॥ योगयागाचा उछेद । यजनयाजन कैंचा वेद ॥ चहूं वर्णाचा भेद । उरों न शके ॥ ६ ॥ उत्तम करिती अधमशेवा । तैं वर्णाश्रम कैंचा उरावा । ऐसा अधर्म प्रवर्तावा । असे पुढें ॥ ७ ॥ म्लेंछसेवन विप्रासि । घडे ऐसें निश्चयेसी । जाणोनिया निजमानसी । कृपा द्रवली ॥ ८ ॥ तरी नीच सेवितां नीचत्व न ये । स्वधर्मश्लाघ्यता राहे । ऐसा स्वयातीला उपावे । शोधिला जेणें ॥९॥ अप्रसिद्ध जगामाजी । पिशाचलीपि हे योजी । जीर्णे प्रतिष्ठा समाजीं । विप्र पावती ॥१०॥ ऐसा अनागतद्रष्टा । हेमाद्रि नामप्रतिष्ठा । जेणे ब्राह्मणाचिया इष्टा । योजूनि ठेविलें ॥ ११ ॥ त्यांसि साष्टांगीं नमन । करूनियां ग्रंथारंभण । केलें रिघोनि शरण । लेखकजनासी ॥ १२ ॥ सूत्र कारिका प्रमाण । धरूनि करिती धर्माचरण । तैसें मेस्तक हें जाण । लेखकविषईं ॥ १३ ॥ तरि मेस्तक म्हणतां कैसी । हा संदेह बहुतांसी । जैसी रीति जये देसी । ते तैसे चि म्हणताती ॥ १४ ॥ नाना देश नाना भाषा । नाना लीपी बुध्धिविशेषा । त्या त्या पाहतां ही अशेषा । विशेष हे चीं ॥१५॥ औषधींमाजि संजीवनी । कां वनितांमाजि भवानी । अथवा त्रैलोक्यगामिनी । स + + + + + ॥ १६ ॥ ( येथपासून पुढें दोन पाठपोट पानें गहाळ- त्यांत २४ ओव्या होत्या. पैकीं लेखकपरीक्षेंतील ओव्या १५ व मंगळाचरण ओव्या ९. ) बहु बोलतां विस्तार । ग्रंथ होयील अनादर । श्रोतयाचा आदर । अरुची पावे ॥ १६ ॥ या कारणे संक्षेपता । मुख्य लक्षणे अपारता सांगितली कर्तव्यता । आतां कैसी ॥ १७ ॥ हुजरात आणि गैबती । सेवनमार्ग द्विधा असती । दोहीत मुख्य हुजराती । सन्निध सेवा ॥ १८ ॥ दीपाचिये जवळिकें । वेदार्थ सोज्वळ दीसती निके । ते चि दूर ठेवितां कौतुकें । मंदत्व दिसे ॥ १९ ॥ पुत्र जातां देशांतरासी । पिता हि विश्वासे ना त्यासि ॥ मा स्वामिसेवका कैसी । चित्तशुद्धि उरे ॥ २० ॥ या लागि सेवक निकटवर्ती । ते चि जाणावे विश्वासमूर्ती । दुरिलाची अपकीर्ति । न करिता ही होय ॥ २१ ॥ म्हणोनि मुख्य

हुजराति । ऐसे सर्व ही जाणती । परि दैवाधीन असे प्राप्ती । अन्यथा नव्हे ॥ २२॥ त्या ही माजि नामाधिले । हुद्दे सांगेन मिळाले । जैसे वर्णाश्रम ले । वेदश्रुती ॥२३॥

॥ इति लेखकपरिक्षा ॥

## ॥ अथ कौशल्यविधी ॥

राजनियत्वाचें सूत्र । हातीं ये जयाचे स्वतंत्र । ते प्रधानत्व विचित्र । केलें साध्य ॥ १ ॥ सर्वदां राजचिद्वृत्तिगवेषणा । तदनुसार करी सूचना । कोश–देश–सेना– । पाळणसावध सदां ॥ २ ॥ दुर्गपर्वताची दृढता । ते तंवं संग्रहाधीन सर्वथां । ते ही करणे यथोचिता । मिळे तैसें ॥ ३ ॥ देशांतरींचे भूपतीं । देशधने वरीष्ट होती । त्यांसि विरोध सर्वार्थी । घडो चि नेंदी ॥ ४ ॥ न्यून अथवा समाने । त्यांसी दर्प-दर्शविग्रहने । सामदंडभेदें धने । साधी तयांची ॥ ५ ॥ चार अपार वेषधारी । करुनि धाडी देशांतरीं । गुप्त वार्ता परोपरी । आगावी सकळां ॥ ६ ॥ परनृपाचें वर्तणे न्यून । पडिलेसें देखोनि जाण । विचार आत्मसाधन । तो मंत्री नव्हे ॥ ७ ॥ कां आमिषा या जोडी । बकासा ध्यान मांडी । हें जाणे तो लक्षकोडी । मध्ये कोणी ॥ ८ ॥ राजसेवक लाहन थोर । यथोचितें परम आदर । कोणाचा हि अव्हेर । वृथा न करी ॥ ९ ॥ लेखक जितुके हुजरातिचे । लळे पाळावे तयांचे । तेणे गणन राज्याचे । हृद्गत होय ॥ १० ॥ अवित्पन्न असें म्हणती । प्रधानत्व सर्व भूपती । तेणे सौम्य सेवकांप्रति । किमर्थ वर्तिजे ॥ ११॥ सत्ताबळें सकळांचें । मान भंगावे नियमाचे । तरी च रूप आक्रमाचे । दिसोनि ये ॥ १२ ॥ ऐसें न म्हणावें सर्वथा । विनयरुाध्य प्रधानता । जय विजय नेणतां । पतन चि पावे ॥ १३ ॥ पाहे पां उदकाची नम्रता । ते भेदी सकळ पदार्था । शस्त्रादिकां तीव्रता । चाले जेथें ॥ १४ ॥ पाणिये शस्त्र मोलें चढे । सुपाणीं तें मोतीं आवडे । बहु असो पाणिये वाढे । चराचर ॥ १५ ॥ पाणियाची जाति कैसी । शस्त्री तीव्रता चि प्रकाशी । सुढाळपणे मुक्ताफळासी । रूपा आणी ॥ १६ ॥ नराश्वपशुजाति । तेजा-धिक्यें पाणी म्हणती । नम्रपणे भूमी प्रति । तोय वर्ते ॥ १७ ॥ एवं सर्वांचें जीवन । वस्तुभेदें विलक्षण । तैसे चि विविध गुण । औषधीभेदें ॥ १८ ॥ तैसी जयाची स्फूर्ती । विवेकाची अवगमली मूर्ती । कीं नीतिमार्गीची प्रकाशवाती । दीपिका हो ॥१९॥ इत्यादि नाना कळा । जाणे तो अमात्य आगळा । मेरू जैसा क्षितितळा । आश्रय–भूत ॥ २० ॥ मजमू दुसरें अधिष्ठान । राजश्रियेचें मंडण । तेथील कर्तव्य गहन । बहुनां परी ॥ २१ ॥ स्वता चि पाहिजे लेखनज्ञान । आणि प्रज्ञा असा-धारण । धृतीचें अधिष्ठान । हृदय जयाचें ॥ २२ ॥ कारखाने देश सेना । त्यासि जे गणिती हृदयस्थाना । पूसतां सांगे कागदे विना । धारणाबळें ॥ २३ ॥ देशिचें द्रव्य यथाकाळें । यथोचित वेळवेळे । आलें राहिलें कळे । प्रतिमासीं ॥ २४ ॥

सेवकजनाचें वेतन । प्रतिमासीं अवलोकुन । यथान्यायें संमपन—।—करणें निवडी ॥ २५ ॥ मुकासे व इनाम चालती । त्यामाजि जीं द्रव्यें साधिती । तिं ही चिकिछा युक्ती । निवडि आणावी ॥ २६ ॥ कारखानीयांच्या नाना वस्तू । ज्यासि नित्यता वेच होत । अथवा अव्यय संग्रहार्थ । जो जो पाहिजे ॥ २७ ॥ तो करवी यथाविहित । जें जें पाहिजे जेथजेथ । अपव्यय नित्य नियत । सर्वासि करी ॥ २८ ॥ व्यर्थ व्यय करूं चि नेंदी । तुळा तुकिल्या सर्व विधी । कार्य ऐसा आपादीं । जे अल्पें चि संपादी ॥ २९ ॥ अनागत लेखनविधी । जेथें हि पारंगतबुध्धि । पृछा जितुकी निरवधी । निवडूनि ठेवी ॥ ३० ॥ पुसो न पुसो भूपती । परंतु निवडूनि ठेवी आयंती । न पूसतां ही राजनीती । प्रसंगीग बोले ॥ ३१ ॥ दंश जो जो लेखनाचा । हृद्गत वसे जयाचा । वर्म भेद चतुष्पदांचा । केशरी जाणे ॥ ३२ ॥ जया सन्मुख कोण्ही वार्ता । न बोले कारकुनी सकळार्था । दंशासि सूचवी सकळ पदार्था । चिंतामणी मानवरूपें ॥ ३३ ॥ ऐसें राजश्रियेचें आवरण । नीतिमार्गाचें प्रकटीकरण । ते मजमू जाणा भूषण । मुख्य सभेचें ॥ ३४ ॥ राजा प्रधान सेना प्रजा । जयाचेनि समस्त समजा । टाकू न सकति वोजा । आंगबळें ॥ ३५ ॥ ऐसें सकळांचें नीतिसूत्र । ते मजमू जाणावी पवित्र । सकळार्थ पिके—तें क्षेत्र । भूभुजाचें ॥ ३६ ॥ मजमू नव्हे शारदा । हृदयपद्मी राजन्हदा । निर्माण जाली विद्गदा । लेखकभ्रमरा ॥ ३७ ॥ कीं पुण्यें अपार पाळिलीं । तीं चि कल्पलता जाली । मजमूमिसें वोळगली । विशांपतीतें ॥ ३८ ॥ राजाश्रियेचें निवासस्थान । सर्व नीतीचें सांटवण । ते मजमू जाणावी विचक्षण । राजसंनिधींची ॥ ३९ ॥ आतां खुरनिशी ते कैशी । जिचा त्रास लेखकांसी । कमावीसदारीं अहिर्निशीं । वाहिजे धाक ॥ ४० ॥ कर्मी वाय दिसे थोडा । परि पतन देऊनि गाढा । जया विणे वेद बापुडा । रेखा नुलंघी ॥ ४१ ॥ स्मृतीनें भय वाहिजे । शास्त्रीं अनुकूळ वर्तिजे । पुराणीं तेथें काय कीजे । न चले कांहीं ॥ ४२ ॥ प्रत्यवाय सांपडला । तो कोणा न वंचे सोडविला । वयांति मृत्यु आला । कैंवी टळे ॥ ४३ ॥ तैसे अर्मीन आणि लेखक । कमावीसदार आणि मापक । त्यांसि लागे धाक । खुरनिसांचा ॥ ४४ ॥ उजू चि ते कागद वांकडे । करूनि देह तंवं वेडें । याचेनि मोसचा निवडे । कोणे रीती ॥ ४५ ॥ तूप साजूक खादलें । मांडी वरी दोंद आलें । याचेनि कागद निवडिले । कैंवि जाती ॥ ४६ ॥ तुमार पाहे अवलोकुनी । घडणी समजे आपुला मनीं । सुशब्द न वदे वाणी । वक्र चि पाहे ॥ ४७ ॥ माहाल दस्तें पुरला । उसूल हंगामी जाहला । परंतु न म्हणे भला । कारकून हा ॥ ४८ ॥ कदीम रकमाले आले कानुनाती । ते पन्हाम केले असती । कर्मामुळें दस्त साधिती । रकम ते चि ॥ ४९ ॥ जरी प्रजांचा संव्हार जाहला । तऱ्ही म्हणे पैका बुडविला । निजा काढी मना आला । खुकाखुक ॥ ५० ॥ हुजरून करी निपमु । कीं अमुकाचा कमाविसीचा

धर्म । विलक्षण तो निजे कर्म । हें हीं नसे ॥ ५१ ॥ जमा वासील सनदवार । कागदा कागद कमावीसदार । परि व्यंगोक्ती वाग्व्यापार । सांडी च ना ॥ ५२ ॥ इत्यादि नाना अवगुण । हें चि वाटे परम भूषण ॥ लेखनधर्मी अति निपुण । मानी आपणां ॥ ५३ ॥ मार्गें पुढें बोढितां । कर्वत न राहे कापितां । कां अही प्राशन करितां । विष चि वर्मी ॥ ५४ ॥ असो बहुसाल बोलतां । भंग होयील मनोरथा । मुख्य हुद्दे दूषितां । अज्ञान म्हणती ॥ ५५ ॥ अल्पज्ञ जालियां सुरनिस । येणे रीतीनें होयील नाश । राजनीतीचा विकाश । संकोच पावे ॥५६॥ आधीं च हुद्दा सुरनिसी । तो हातां चढतां पापबुध्धीसी । राजनीति उरेल कैसी । काय नेणा ॥५७॥ आतां सुरनीस कैसा । असावा प्रतिपदेचा चंद्र जैसा । कळा वाडती दिवसादिवसां । प्रकाशबळें ॥ ५८ ॥ एवं सुरनीस नामाथिला । तो ही सांगेन वहिला । जेणे सकळ हि सोडविला । लेखकजन ॥ ५९ ॥ आकाश न पुरे सांटवणा । तो आधार नव्हे रवि देखणा । तात्काल करी तमउगाणा । उदया सवें ॥ ६० ॥ किंवा गंगत्वात्र-गाहनो । जन्मार्जिताचि धुणी । होऊनि सुकृतउभारणी । विराजे जगीं ॥ ६१ ॥ तैसे कागद सुरू होतां । वोहट पडे सर्व दुरिता । किं पूर्वे उगवतां सविता । दश दिशा सोज्वला ॥ ६२ ॥ माहालिचे कमावीसदार । शतसहस्त्रधा अपार । कमावीस करितां आदर । लेखनी नाहीं ॥ ६३ ॥ कमाविशींची जाति कैसी । हे न पुसती लेखकासी । राहाटि मन माने तैसी । करूं आवडे ॥ ६४ ॥ संमत सुभे हवालदार । ठाणेदार तर्फदार । निशिंदे पतकी हुदेदार । निगेवान हरकारे ॥ ६५ ॥ कारखानीस कुळकरणी । मसातीआ कटुवाणी । करिताति गळत मदाणी । ते ही वेगळे ॥ ६६ ॥ पाटील चौगुले ठाणगे । माहार कोरवो वोसंगें । वराती इनामी दाटगे । मुकासी सिरजोर ॥ ६७ ॥ इत्यादि आवघे कमावीसदार । मोसची येकटा लिहिणार । पुसणार ते अतिचतुर । गोविनी त्यासी ॥ ६८ ॥ मुख्यापासूनि सेवट परी । तें जें केलें कमावीसदारीं । ठाउकें नसतां लिहिणारीं । उत्तर द्यावें ॥ ६९ ॥ त्या सकळांचे अन्याय । आणि लिहिणाराशी शब्दघाय । धन्य जयाची माय । तो चि निस्तरे ॥ ७० ॥ ऐसी येकाची घेउनि पुसी । जो शुद्ध करी सकळांसी । दूषण त्या सुरनिसासी । कोण ठेवी ॥ ७१ ॥ भागीरथीचें स्नान । करी तो चि पावन । इतरांचे दोष दहन । केंवी होती ॥ ७२ ॥ कल्पतरू कामधेनू । कल्पकासी च दैव-हीनु । करी विरचिला जनु । जैसा तैसा ॥ ७३ ॥ परिसें पालटे पूर्वधातु । अन्यत्रासि नव्हे हेतु । प्रत्येक पाहिजे पुनरुक्त । जितुकीं सकळें ॥ ७४ ॥ सुरनीस तैसा नव्हे । येकलें स्वकरीं निवाहे । सर्वथा गुणदोष न पाहे । आणिकाचे ॥ ७५ ॥ गंगा घोवामाजि सांटवी । वोहळाची हिरे निवडी । सरितेतें सांटवी । समुद्र जैसा ॥७६॥ तैसें येकें मोहसवा दिधला । म्हणजे कारकुनेसिं देश सूटला । तो नव्हे तरी भविष्ठळा । आट सकळां ॥ ७७ ॥ या विषइचें समाधान । ग्रंथांतीं निरूपण । करावें

ठागेल म्हणऊन । पुरे येथें ॥ ७८ ॥ सुरनिसांचेनि धर्में । लेखकांचीं दुष्ट कर्में । दहन होती नेमें । अन्याय नाहीं ॥ ७९ ॥ जेसे बाळकांचे अवगुण । माता ठेवी आच्छादून । प्रशंसवी त्यांचें ज्ञान । सकौतुकें ॥ ८० ॥ सुरनीस निकुरा जाय । त रक्षणार कोण आहे । राजा प्रधानसमुदाय । उगे चि राहती ॥ ८१ ॥ या कारणें गैचतिचा । हुद्दा केला असे मजमूचा । तो चि सुरनीस नियमाचा । भूपती करी ॥ ८२ ॥ तें चि घडे यथान्याय । कोणी न पवति अपाय । राजद्रव्य वाया नव जाय । यथोचित जें ॥ ८३ ॥ मुकासी मश्रीफ सबनिसां । स्वतंत्र कर्तव्य नाहीं यांसी । अंतर्गत मजमूसी । मिळोनि असती ॥ ८४ ॥ प्रत्येकें विस्तार बोलतां । अनावर होयील कथा । संक्षेपें विज्ञानवंता । कळोनि जाइल ॥ ८५ ॥ हेजबी आणि डबीरी । दोहीं युक्ति बरोबरी । समयोचित उत्तरीं । जिणावी सभा ॥८६॥ मधुर आणि सखोल । बोधक आणि अनकूळ । विवेकियाचे शीळ । स्वभाव जैसे ॥ ८७ ॥ तैसें बोलणें व लेखन । विहित या उभया लागुन । सभे बैसलिया रंजन । महीभुजाचें ॥ ८८ ॥ पाहिजे पुराणांत श्रवण । नीतिशास्त्रपरमर्शन । तर्कशास्त्रआलोडन । आणि काव्यनाटकीं ॥ ८९ ॥ देशांतरलीपिभाषा । अभ्यास करणे विशेषा । गीतसंगीतपरीक्षा । आणि धर्मशास्त्र ॥ ९० ॥ एवमादि नाना गुण । पाहिजेति उभया लागुन । पूर्या चि अनवछन्न । तें चि जोडे ॥ ९१ ॥ आतां सांगो सामान्यता । तरि पुढें कळेल प्रसंगता । येथें बोलतां पुनरुक्तता । होऊ पाहे ॥ ९२ ॥ हें कौशल्य असे जयासी । तें चि भूषण राजसभेशिं । पूर्णचंद्रें जैसी निसी । पौर्णिमेचि ॥ ९३ ॥ अमात्यादि आघवे । नृपें साहसें मेळवावे । तरी च राज्य शोभा पावे । आणि विस्तारे ॥ ९४ ॥ राज्य म्हणावें यासी । विराजे सर्व जनेसीं । बृहस्पतितुल्य सभेसि । अमात्यादि ॥ ९५ ॥ श्रुतज्ञ सभेसि नाहीं । ते सभा चि नव्हे पांहीं । राज्य नव्हे ग्रामाई । ग्रामकाची ॥ ९६ ॥ कुळीन आणि युक्तिवंत । हे लोक नाहीत जेथ । तें राज्य आहे भूत । प्रजापीडक ॥ ९७ ॥ प्रजा जालियां दैवंहत । राजा कैसेनि धनवंत । सेनासमुदाय दुर्गें पर्वत । बळहीन होती ॥ ९८ ॥ अमात्यादि हें राज्यमुळ । राजा तो वृक्ष चि केवळ । सेना शाखा प्रजा फळ । सहज चि असे ॥ ९९ ॥ तें मुळ चि जेथें निर्मुळ । तैं वृक्ष कैंचा शार्दुळ । पतन होतां कोण वेळ । परचक्रवातें ॥ १०० ॥ राजा जाणावा विष्णुप्रतिमा । पाळणधर्म त्याचा महिमा । तेणे जिंकोनि क्रोधकामा । नीतिधर्मा भजावें ॥ १०१ ॥ लक्ष कोटि स्वार्थ टाकिजे । परंतु राजनीति परिपाळिजे । कीर्ति लोकीं उरविजे । जन कीजे परलोक ॥ १०२ ॥

॥ भारत ॥

**न हि ज्ञातव्यो न मंतव्यो मनुष्य इति भूमिपः ।**
**महती देवता तत्र नररूपेण तिष्ठति ॥ १ ॥**

राजा भोजोऽधिराट् क्षत्रियो भूपति नृपः ।
एवं यः स्तूयते शब्दैः कथं नोर्चितुमर्हसि ॥ २ ॥

राजा पाळी तैं स्वधर्म चाले । अन्यथा वेदशास्त्र वायां गेले । अधर्मकारक लोक जाले । राजसत्ता ॥ १०३ ॥ राजा न टाकी नीतीसी । तैं दुःख कैचें प्रजांसी । राजीक दैवीक न ये देसी । सर्वथा नव्हे ॥ १०४ ॥ विशेष बोलावें विस्तारें । कासया येथें अनादरें । ये अर्थी पुराणांतरें । गर्जत आहेती ॥ १०५ ॥

॥ इति श्री हेमाद्रिपंताविरचिते पिशाचलीपिकाकौशल्याविधिप्रकरणं संपूर्णमस्तु ॥ श्रीराम ॥

## ॥ अथ लेखनाधिकारकर्तव्यादिविधिः ॥

आतां लेखनक्रियेचा आरंभु । बोलिला हेमाद्री प्रभू । त्याचा प्रस्तुत आलाभू । दिसोनि आला ॥ १ ॥ लेखन करिती मतिमंत । जमा खर्च वासील बाकी समस्त । परंतु कारिका सांप्रदाययुक्त । न लभे कोण्हा ॥ २ ॥ तरि शिष्य शागिर्द बहुसाल । प्रवर्तक बुध्धिमंत केवळ । ते जाणती सकळ । उल्लेखमात्रें ॥ ३ ॥ परंतु बाळा वृद्धा सकळांसि । लेखनकळा कळावी कैसी । म्हणऊनि आरंभ मेस्तकासी । करणे लागे ॥ ४ ॥ जमाखर्च वासीलबाकी । झडती म्हणजे कवण येकी । कर्तव्य नामाधिकीं । त्रिधा भेद ॥ ५ ॥ तरि वासीलबाकी ते कवण । जमाखर्चाचें काय लक्षण । झडती म्हणती लेखकजन । ते ही कैसी ॥ ६ ॥ माहालिचे दस्त जमा धरिजे । वासील आणि खर्च पुरविजे । बाकी त्रिधा काढिजे । शिलकी आणि निसबती ॥ ७ ॥ या नांवं वासीलबाकी । लेखकीं लिहिजे निकी । झडती करावी नेटकी । ते ही कैसी ॥ ८ ॥ न पुरता सरसाल बारमाही । तूट मुदती कागद पाही । दस्त जमा धरणे नाहीं । झडती लिहिणे ये रीती ॥ ९ ॥ अथवा जिनस येक चि जमा असे । नाना जिनस कांहीं नसे । तिये नांवं झडती ऐसें । वित्पन्न म्हणताती ॥ १० ॥ अथवा वेगळाले । झाडे करिती वेळचे वेळे । तया माजि नामाथिले । ऐका ते ही ॥ ११ ॥ नाणेझडती जिनसझडती । रसदझडती बाबझडती । माहालझडती कारखानेझडती । प्रसिध्ध आहे ॥ १२ ॥ केली झाडे वजनी झाडे । हक्क झाडे बोसगी झाडे । हासील झाडे तकट झाडे । करावे आधीं ॥ १३ ॥ तसैर झाडे नुकसान झाडे । पडि झाडे खेप झाडे । तोफेर झाडे राबणूक झाडे । जाहाजाती ॥ १४ ॥ जमाखर्च कोणे ठाई । ते चि सांगेन नवाई । आनसारिखे पाहीं । नाहीं सर्वथा ॥ १५ ॥ रखनखाना शुभसमता । जेथे माहालिची दस्ते न येति जमा धरितां । आला उधूळ जमाखर्च करितां । बाकी निघे ॥ १६ ॥ याशि बोलिजे जमाखर्च । ऐसें नामत्रय निर्वेच । जाणोनि करिजे साच । असेल तैसें ॥ १७ ॥ तरी हूजराती लेखक । जमाखर्च करिती देख । काय निमित्य तें ही ऐक । सांगि-

जेल आतां ॥ १८ ॥ जमाखर्च हुजरातिचा । तौताक जालिया साचा । इतुलेनि राजसमृध्दिचा । शब्द फुटे ॥ १९ ॥ अनेक भूपतींचे दूत । चार घालूनि घेती वृत्त । जमाखर्च होतां नेमस्त । कळे यासी ॥ २० ॥ देशकोशसेनासमृद्धि । परासि कळलिया यथाविधि । आवश्यकता विघ्न बाधी । परचक्र होय ॥ २१ ॥ म्हणोनि लेखकी बुद्धिमंती । कागद घेऊ नये हुजराती । राजसमजाविसी निकी । सुमंती निवडावी ॥ २२ ॥ जैसें मंत्राचें वीर्य पाहें । प्रकट बोलतां नसोनि जाय । गुप्त असतां होय । सर्वसिद्धि ॥ २३ ॥ आतां वासीलबाकी । शेणवै लिहिताति निकी । ते शागीर्द–हीं कौतुकी । शिकावी लागे ॥ २४ ॥ तरि ऐका सावधानमनें । न कळतां ही नेंदावी दूषणें । अधिक असेल तें सांगणें । मानूनि आम्ही ॥ २५ ॥ नाना देशीं नाना रीती । नाना लेखन नाना युक्ती । इतुकी कैंची वित्पत्ती । कीं सर्वत्र आकळे ॥ २६ ॥ तुंगभद्रेचे उत्तर तीर । आणि सिंधुनदीचें दक्षणाधर । संख्या पाहतां अपार । देश असती ॥ २७ ॥ त्या माजि गोदा–तीर । जें कमाविशीचें माहेर । देश वराडी कौशल्य थोर । समुद्रतीर सविशेष ॥ २८ ॥ तेथील कैसी कर्तुती । लेखक वित्पन्न लिहिती । सांगेन शागीर्दा प्रति । यथोचित ॥ २९ ॥ कागद करोनि वर्ख । निक सव्यें मोडावे कौतुकें । च्यारी रकाने नेटके । समान करावे ॥ ३० ॥ चहूं माजि विभागता । नांवे सांगेन ऐक आतां । पहिला रकाना म्हणतां । येक चि जाणिजे ॥ ३१ ॥ रकाने दोनि लिहिजेति । जिल्हे ऐसें तयाशि म्हणति । तीन रकाने जें सांपडती । तें मशूदर ॥ ३२ ॥ मधील दोनि लिहिजेती । तें बिंति ऐसें तया म्हणती । त्यांत अर्धार्ध सांडिती । तें तैनेतं ॥ ३३ ॥ त्यांत हि सांडिती दोहींकडे । मध्यें दोनि अक्षरें लिहिणे घडे । तें किर्दार म्हणतां आवडे । शेणवयासी ॥ ३४ ॥ येणे चि माने जिल्हेचा । विभाग नेमिला साचा । बिंत–बिंतैनाचा । तपसील निका ॥ ३५ ॥ रकाना मोईन अक्षरें च्यारी । सांडूनि येका अक्षराची वारी । रेखा वोढिजे मशूदरी । तें हर्फ जाणिजे ॥ ३६ ॥ टाकितां अर्ध रकाना । दफाते दफात म्हणती विचक्षणा । जाणोनि ऐशिया मना । लेखन कीजे ॥ ३७ ॥ पुढील सांडतां रकाना । मागील तीनि रकाने विचक्षणा । हमंदर लिहिती लेखना । आदीसा व किताबती ॥ ३८ ॥ च्यारी रकाने कायती । शरायनी जीस लिहिती । जीणे न्यून पूर्ण पुरे पडती । कागद देखा ॥ ३९ ॥ हुद्दा जालिया गैबतीसी । भोजनापूर्वीं जावें माहालासी । याहूनी उत्तम मुहुर्तासी । पैवस्ता होयिजे ॥ ४० ॥ देशमुख देशपांडिये । देशाची सीमा जेथें आहे । शेटे माहाजन गांवपांडिये । तेथें भेटती ॥ ४१ ॥ यथोचित भेटावयासि । कोणकोण ते चि सांगती आपणासी । सांगितलियाचें मानसीं । स्मरण धरावें ॥ ४२ ॥ देशातून माहालासि येतां । कसबे मौजे वाटेसि लागतां । पांडे मोकदम भेटतां । आपादतां पुसावे ॥ ४३ ॥ माहालाशि आलिया लौकरी । मुहुर्त बसावें सदरेवरी । जो येऊनि नम-

स्कार करी । त्यासी पाने देयिजे ॥ ४४ ॥ लोक भेटती अनोळख । जवाळि बोलाऊनि देशमुख । मोख्तेसर जे जे लोक । तयांशि पुसावे ॥ ४५ ॥ सबनीस आणोनि सामोरा । घ्यावे शेवकांचिया जोहारा । पुशि पाचार मोख्तेसरा । येरां पाने मात्र द्यावी ॥ ४६ ॥ या उपरी कारकुन । बैसले असती पहिले च भेटोन । ते कोण कोण हे अनुसंधान । पुसोनि समजणे ॥ ४७ ॥ माजी जे जाले असती । शिलीक मागावी तयां प्रती । सिके निथेनसी ठेविजेति । लखोटा करूनी ॥ ४८ ॥ मग पागेचें अवलोकन । कोठी पाहावी शिलिक घेऊन । बाजे कारखाने अवलोकन । मात्र करावे ॥ ४९ ॥ हाल–माजीच्या अवसरी । नादान लोक करिती चोरी । शिलीक मागतां गईवरी । नेऊं पाहती ॥ ५० ॥ ऐसें कांहीं एक पाहोनी लांछन । एकदोघांशि करावें स्वल्प ताडण । इतुलेनि दर्पदर्शन । सकळांशि होय ॥ ५१ ॥ वेळ न लगतां हे करावें । मग निवासस्थानासि जावें । आधीं द्वारपाळ ठेवावे । जितुकीं द्वारें ॥ ५२ ॥ मग जाऊनि भीतरी । निवास पाहिजे चौं मेरी । यथोचितें स्थळा माझारी । विधीनें उतरावें ॥ ५३ ॥ उलफा मोईन माहालिची । फिरवितां अपशकुन तो चि । घेऊनि त्याहावें खर्ची । आपुले नांवें ॥ ५४ ॥ लोटलीया तो दिवस । सकाळी बैसावें सदरेस । माहालचें वर्तमान सावकाश । मना आणिजे ॥ ५५ ॥ जरि असेल अवल साल । तरि लावावी माहालीं तहसील । बाजे कमाविशीचा अमल । पेस्तर पाहिजे ॥ ५६ ॥ अथवा निमे साल भोगलें - आणि हाल माजी जाले । तरि गुदस्ताची दस्तअमलें । बाकी मागिजे ॥ ५७ ॥ हें हि नसे जालें । साल चि बहुतेक भोगलें । बाकी पुसतां नसे देखिलें । बहूतकरूनी ॥ ५८ ॥ तरि कांहीं दस्तामाफिक । पटी करावी सुरेख । तहसलि न चालतां आणिक । गुंती न काढिजे ॥ ५९ ॥ तहसील चाली लागली । पोत्याची माहामुरी जाली । मग पाहिजे केली । कमावीश माजी ॥ ६० ॥ झडती आणि दस्तअमल । जमीन जुमले कानू असेल । इनामत बागाइत न्याहाल । आणि बादर बकाया ॥ ६१ ॥ असामी आणि रकमाले । सादीलवार कैसे जाहाले । किताबती कमाविशी माहाल । असेल तरि तें ही पाहिजे ॥ ६२ ॥ ऐसे गांवगनाचे कागद । पाहोनि अवघे सनदशुद्ध । मग ज्याचा जैसा बुध्धिभेद । ते तैसे समजति ॥ ६३ ॥ ते लिहितां ग्रंथरीती । संख्या होयील सहस्रशतीं । शाहाणे शागीर्दाचिया मती । बोले चि ना ॥ ६४ ॥ म्हणऊनि संक्षेपमात्र । जैसें शास्त्रकाराचें सूत्र । मतीनें सार विचित्र । वाखाणिती ॥ ६५ ॥ तैसे चि लेखनसांप्रदायी । जयाचे हृदयीं देखणेपण नाहीं । त्यासि या वीण चांड नाहीं । यथार्थता ॥ ६६ ॥ असो हें अप्रासंगिक । प्रस्तुत कमाविशी अलोलिक । हित आणि सौख्यदायक । नीतिमार्गें ॥ ६७ ॥ द्रव्य तहशिलेसि आलें । रोजकीर्दीशि जमा जालें । बाकी सालमजकूर निवाडिलें । पाहिजे बाबवारा ॥ ६८ ॥ तेथें रसद आणि वरात । दोन्ही लिहिजे यिथंभूत ।

बाच उगवणी सालमजकुरांत । लागे सहजे ॥६९॥ जे जे बाबेची तहसील आली । गांव मस्मू जमा जाली । सनद रोजवार उगविली । पाहिजे आधीं ॥ ७० ॥ जाला अमल रोजकीर्दीसी । उगविला पाहिजे सनदेसी । तरी च कागद–चडणीशी । उशीर न लगे ॥ ७१ ॥ येथें जेणें काहली केली । तेणे जीविका बुडविली । कागद घडतां मुदत लागली । त्रिगुणी जें ॥ ७२ ॥ रोजनामा कीर्दी जे नीतीनें । नख्त जिनस जमा धरणे । बाकी सालमजकूर उद्धरणे । यथारीती ॥ ७३ ॥ बाकी रोजगुदस्तांची । आणि रसद रोजमजकुरची । तेरीचवंत जमेची । बेरीज घडे ॥ ७४ ॥ ज्यामाजि जो जो खर्च जाला । सनद मस्मू लिहिजे वहिला । हापाते रोजनामा जेणे उगवला । तो चि दक्ष ॥ ७५ ॥ बाकी निघाली शिलक । ऐन आणि तसलिमात देख । ऐन जिनस येक येक । साधूनि लिहिजे ॥ ७६ ॥ ऐसा रोजनामा जाला । पोताचा अमल उगवला । बाजे कारखाना हि निवडिला । रोजबरोज पाहिजे ॥ ७७ ॥ या नंतरें खतावणी । मोफर्द आवजा समान दोनी । मेस्तक प्रमाण जाणोनि । आधीं च लिहिजे ॥ ७८ ॥ सनदी आणि समजाविसी । दोनि कागद करिती त्यासी । चोरी करणे निश्चयेसी । संदेह नाहीं ॥७९॥ लेखनधर्में करील चोरी । तो यश न पावे लोकोत्तरी । बेडी बंदखाना हाण मारी । उदंड मरतां देखिले ॥ ८० ॥ जयाची करावी सेवा । तो ईश्वरसा कल्पावा । त्यासि वर्तता अन्यभावा । कोण दैवां पावेल ॥ ८१ ॥ चोरीने जरि पोट भरे । तरि श्वान हिंडताति चौमेरें । चोरी करितां गांव न पुरे । पोट न भरे सर्वथां ॥ ८२ ॥ या कारणे वेतन तें चि खावें । येर तें चंडीश मानावें । ऐसी वर्तणूक करितां भावें । ते सर्वार्थ पावले ॥ ८३ ॥ अथवा अमीन ही जाला । तेणे चि मदें फूगला । कार्यभाग मना आला । तैसा चि करी ॥ ८४ ॥ तन्हा तमुळी सुरीत चोरी । हे सारासार हरामखोरी । ती न करी येक करी । तो काय अमीन म्हणो ये ॥ ८५ ॥ यथाशक्ति यथामति । यथान्याय यथारीती । चुकी चि न ये हे शर्ती । स्वामिसेवेचि ॥८६॥ जैसें पतिव्रतेचें चित्त । स्वामिसेवा वांछी नित्य । येणे प्रकारें अनुरक्त । तो चि सत्य सेवक ॥ ८७ ॥ सात पांच करी चोरी । कार्य नाहीं सहस्त्रवरी । सेवक नव्हे तो वैरी । अंतकरंग ॥ ८८ ॥ लांच अथवा शेणोपणे । युक्तीने द्रव्य मेळवणे । भाग वांटा उद्दीम करणे । चारी द्वारें चोरीचीं ॥ ८९ ॥ पांचवें नाहीं च सर्वथा । हें कळलें आहे लेखकां बहुतां । परि करूं न ये सर्वथां । कर्म ऐसें ॥९०॥ कुटुंबाची तडातोडी । वेतन न पुरे थोर जोडी । तथापि चोरीची सोडी । असो नये ॥ ९१ ॥ राजा अथवा राजचक्र । यासि वृत्त सांगावें समग्र । पारपत्य नव्हतां देशांतर । सुखें करावें ॥९२॥ आंगीं असेल पुरुषार्थ । कोण सायासें जोडतील अर्थ । परंतु चोरीमुळें जो स्वार्थ । तो अनर्थ रोकडा ॥ ९३ ॥ अमीन आणि पुरुषार्थी । सर्वथा न पडे अनर्थी । कृपा करिजेल ज्ञानपार्थी । काय उणे तयांशि ॥ ९४ ॥

जरि आंगी पुरुषार्थ नाहीं । तरि चोरी करितां न पुरे कांहीं । प्रतिवर्षी पडे अपाई । सुख नाहीं सर्वथा ॥ ९५ ॥ राजा न धरी विश्वास । चक्र हि प्रतिकूळ तयास । एवं व्यर्थ वयाचा करणे नाश । सुख स्वार्थ नसतां चि ॥ ९६ ॥ किती सांगों वारंवार । करी चोरी बुडे घर । अमीन तो राजसमोर सिरजोर । आणि निःशक ॥ ९७ ॥ बखैरी रोजनामे कारखानाचे । रोजगारी उगवी नेमाचे । बिनसिकी सनदेचे । जातक नसावे ॥ ९८ ॥ आणीक जे झाडे । ते उगवावे वाडेकोंडें । जेणे पुढें अटक न पडे । घडणी करितां ॥ ९९ ॥ फड-झाडे जिनस-झाडे । बार-झाडे शिलक-झाडे । मोईन-झाडे रसद्-झाडे । करावे लागती ॥ १०० ॥ तसलि-मात-झाडे कर्ज-झाडे । दास्तान-झाडे कलम-झाडे । जे जे पडती माहाल-झाडे । ते ते निवाडें उगवावे ॥१०१॥ आवर्जा शिलकी घालणें । नफर देणे निकें साधणें । तें बारमाही वांटणें । तौतांक आधीं ॥ १०२ ॥ लिडती कसीद्की बेलकटी । नव-माही जे जनानपटी । नाणेचढाव सिंहपटी । वजा करणें ॥ १०३ ॥ पैवस्तगी सुरनिसी । गफेरोज निमरोज ऐशी । कब्जीं वजा होऊनि आपैसीं । बेरीज उरे ॥ १०४ ॥ ते करावी बारमाही । निका महिना बैसेल पांहीं । पोतें वराता आदा तो ही । तपसीलवार ॥ १०५ ॥ ऐन आदा फाजील माहे गुद्स्तां । नागा मुद्-तीचा रस्ता । ऐसा येक वेळ हिशेब करितां । दुसरा न लगे ॥ १०६ ॥ सरसाल चाकरी करी । कीं बाद मयत गयाळ जरी । गोवि न पडे ऐशी परी । जरि जाणिजे ॥ १०७ ॥ गयाळ नफराचें फाजिल । कारकुनी देणे लागेल । यास्तव शिरचांदीं देणे फाजिल । पाहावें आधीं ॥ १०८ ॥ भागस्थळ आले देश । गल्ला येईल हर-जिनस । तैसें फ़ोख्त रहीशीस । रुजू घालूनि करावें ॥ १०९ ॥ कानूचे जिनस येती । शेळ घैल बकरे जुंती । खांब दळें नालद्बे येती । रुई सूत गोणपाट ॥ ११० ॥ शेल पासोडीया कांबळे । अथवा वानगीचे नाना जिनस आले । जका-तिमुळें जमा जाले । ते जिनस बहुविधा ॥ १११ ॥ कीं जाहर्जी थोर जिनस । गैरमहसूल हि अशेष । याचे तसैर मोख्त शिलकेस । उरलें किती ॥ ११२ ॥ हें वरिच्या वरी पाहिजेल । तरी च सत्वर कागद होयिल । नव्हता वाहार लागेल । लिहिणियां ॥ ११३ ॥ ऐसी कमाविस करावयाची । युक्ति लिहितां नावरे चि । यास्तव संक्षेपते चि । बोलिलों असे ॥ ११४ ॥ नाकीर्दि असेल जुमला पैकीं । ते कीर्दि करावी निकी । इस्तावेनि चढेल कौतुकीं । जमा धरणें ॥ ११५ ॥ प्रजांसि निष्ठूर न बोलावें । कौलाचें सत्व राखावें । दिधलें वचन न पालटावें । सर्वथैव ॥ ११६ ॥ हा चि पाया मामुरिचा । समुदाय मिळे प्रजाचा । नामोश वाढे कार-कुनाचा । राजा लोभ करी ॥ ११७ ॥ प्रजांसि मावतां दुःख । कीर्दि कैंची तेथें देख । गुदस्तां साधतां अनेक । पापें घडती ॥ ११८ ॥ प्रजा सुखरूप राहे । तैं कीर्दीस उणें काय । कीर्दी वाढतां द्रव्य नये । हें तों न घडे ॥ ११९ ॥ कारकून

म्हणवि कोणासि । सर्वस्व देखतां भूपतीसी । विषम न वाटे प्रजांसी । हे समजाविशी जो जाणे ॥ १२० ॥ प्रजा ही म्हणती मायबाप । राजा देखे हितस्वरूप । ऐसी वर्तणूक निः + + + । करूं जाणे ॥ १२१ ॥ ते बहुसाल होतील कैंचे । दुर्लभत्व चिंतामणीचें । दुराराध्य संजीवनीचे । मूळ जैसें ॥ १२२ ॥

॥ इति करणकौशल्य ॥

## ॥ अथ जमेलेखनविधिः ॥

न पुरतां सालाची लावणी । आधीं च घडिजे खतावणी । जे वाशीलबाकींची करणी । ऐका निकी ॥ १ ॥ सिद्र लिहिजे मशूद्र । हर्फे ऐन जमा सुंदर । दफाते मामले मजकूर । लेखा निके ॥ २ ॥ कर्त साल मजकूर । यिति महसूल बाबवार । तो अष्टधा प्रकार । सांगिजैल ॥ ३ ॥ आठ बाबा महसूल म्हणती । तेथील कैसी कर्तुती । ते यथामती लेखकां प्रती । बोलो आवडे ॥ ४ ॥ तेथें पहिलें जकायती । जरायीब दुसरी म्हणती । तिसरी जाण बागाइती । बारनगजग ते चौथे ॥ ५ ॥ बरगुजार ते पांचवी । बातरख्त साहावी । कटुबाण ते सातवी । आठवी जुजुया ॥ ६ ॥ सांगितालिया बाबांचीं नांवें । कर्तुत्व कैसें बोलखावें । ते ही परिसा स्वभावें । बोलिजेल ॥७॥ मशूद्र म्हणिजे जकायती । दुतपसील अमानत वा इजारती । परि लिंहितां अमानताची रीती । बोलावी लागेल ॥ ८ ॥ तया तळीं थावर म्हणिजे । पहिला तपसील जाणिजे । तेथें बाब उद्धरिजे । तया तळीं ॥ ९ ॥ हांडी हुंडा अश्वजकाती । मेंढी स्थळ जूंपि निगुती । वऱ्हाड पाटदाम जाणिजेति । तया तळीं ॥ १० ॥ चूलिदाम राहाटसारा । वोवांडे खंड अवधारा । गांवखंडी किरकोळ विकरा । सिंगशिंगोटी ॥ ११ ॥ मख्तखंड असती जे जे । तें तें स्थावर बोलिजे । बाबा अनेक जाणिजे । देशविशेषें ॥ १२ ॥ आतां ऐन जकाती । ते ऐकावी मतिमंती । याशि प्रमाण माहालरीती । कानू प्रमाणें ॥१३॥ पहिलें चौत्रा लिहिला । ऐन हासील काढी वहिला । महिना अनुक्रमें आला । तया तळीं ॥१४॥ महिनिया तळीं तेरिखा । नीट लिहिजेति सुरेखा । वस्ती आंत निका । तपसील दिसे ॥ १५ ॥ निकालु आणि पैसारू । तेरिखे तळीं उद्धारू । उभा मार्ग प्रांजळू । जेथें म्हणिजे ॥ १६ ॥ जळवाटे जाइजे येती । अथवा बंदरा रवाने होतीं । कानू प्रमाणें कीजेति । हासील जमा ॥ २० ॥ पाळणूक वजा यावी । कौली सोडी उद्धरावी । कानू कमावीश घालावी । रुजू देखा ॥ २१ ॥ ऐन हासिल जिनस वानगी । खर्डा घालावा लागवेगीं । दूसरें सद्र अनेगीं । बाबी घडे ॥ २२ ॥ जकाति चोरिति वाणी । खंड मोयीन अकरागुणी । अथवा गैरमहसुलाची करणी । विचित्र ते ॥ २३ ॥ येवं तेरीखमुळें महिना । साधूनि लिहिजे विचक्षणा । ऐसा चौत्रा घडलिया जाणा । पथकें लिहिजेति ॥ २४ ॥ जीं जीं असतीं पतकें । तीं लिहिजेति या च लेखें । एवं चौत्रा आणि पथकें । ऐन जकाती ॥ २५ ॥ ऐन जकाती आणि था-

वर । मिळोनि जकायतीचें सदर । बहु बोलतां विस्तार । आवरे ना ॥२६॥ अथवा इजारती जैं चाले । तैं लिहिणें चि न लगे इतुलें । कतबेवार जमा धरिले । उसूल घेयिजे ॥ २७ ॥ पाणखांदार सरवांदा । यांच्या जाणोनिया भेदा । वसूल घेतला तरि फांदा । न पडिजे पुढें ॥ २८ ॥ अन्यथा हे मोईन न कळतां । वसूल भोळेपणे घेतां । सोत करूनिया बदरस्ता । पाय पसरितीं ॥ २९ ॥ मग न चले कांही । पैका बुडविला पांहीं । हें समजोनि करिजे जिहीं । तो चि लेखक ॥ ३० ॥ जरायीब बाब दूसरी । ते ही ऐकावी चतुरीं । इजारती अमानतीं कसरी । तपशिलेंसीं ॥३१॥ मीठकेणी तेलकेणी । तूपमधुकेणी गोदानी । बकरेकेणी पत्रकेणी । आणि तंबाकु ॥ ३२ ॥ जिनस मस्मू जाले इजारती । ते जरिबे जाणिजेति । कदांचित अमानत हि असतीं । ते तैसे ल्याहावे ॥३३॥ आतां बागाईत तें कैसें । तें हीं ऐका सविलासें । जिये देसीं असे जैसें । तेशी रीती ॥३४॥ मोट पाट कानू वेगळी । कितियेक राहाट-तळीं । त्रिविध वेगळी वेगळीं । जाणोनियां ॥३५॥ बारमाही नवमाही । त्यांत ही तपसील निघती पांहीं । सामान्य तिसरें सामाही । उदका सारिखें ॥ ३६ ॥ तमाखू आणि अफीन । हे ही जिनस गहन । सामाहीमाजि प्रजाजन । विशेष पिकविती ॥ ३७ ॥ किमतिकानूप्रमाणें । जमे तपसिलें साधणें । चावरातीने करणे । मसाती आधीं ॥ ३८ ॥ अथवा खंडमख्ते असती । तरि लिहिजे ते चि रीती । येथें प्रमाण कानु-नाति । कदीम जे ॥ ३९ ॥ बारनगजग अंबराई । इजारति-अमानतेंसि पांहीं । लेहोन ठायिचा ठायीं । हासील घडे ॥ ४० ॥ न्याहाल रुजू घालणे । मुकासा इनाम वजा देणे । उरला हसील जमा करणे । बारनगजगीं ॥ ४१ ॥ अथवा खर्ची लि-हिणे । तरि बाद न घालणे । पडिलें सारिखें करणे । जाणोनियां ॥ ४२ ॥ बर-गुजारत पानवेली । त्रिविध पाहिजे विचारिली । सिसाल कानू वेगळाली । असेल जेथें ॥ ४३ ॥ बिघावणी कोठें असे । आलें गणतीं विशेषें । मख्ता खंड कौली असे । तरि तें लेहीं ॥ ४४ ॥ नव लावणीचे सडगला । दूसरे सालीं तें चि मुद्-गल । तिसरे सालीं नाउगळ । गोदातीरीं ॥ ४५ ॥ नवबिं खांडबिं आणि खांडें । हें प्रसिद्ध कोंकणीं समुद्रकांठे । आगर आहेति मोठमोठे । जमे सारा ॥ ४६ ॥ हे कानूप्रमाणे तपसीलवार । जमा साधी तो कमावीशदार । घडणी आणि जे संदर । बरगुजारती ते ॥ ४७ ॥ बारदस्तीं झाडें हसिलीं । तीं च पाहिजेत लिहिलीं । संक्षेपता नावं भलीं । सांगों आतां ॥ ४८ ॥ अनार अंजीर फणस । द्राक्षी जंबीरी बहुवस । निंबोणी पोफळी बहुवस । नारेळवनें ॥ ४९ ॥ बोरी भोंकरी जांबळी । सेप तुतें रायआवळी । इडी सत्यानि कंकोळी । उंडणी कविठी ॥ ५० ॥ अनास आणि चंदन । पतंग देवदार जाण । पारंगे रातंजन । शिरसी सर्वे ॥५१॥ अक्रोट बादामी खर्जुरी । भिल्लावि चारें भरी । आवळी कोकंबी करदळी । चिंचा चापे मोगरे ॥ ५२ ॥ आणीक हि झाडें हासिलीं । तीं तीं पाहिजेत लिहिलीं । देश-

विशेष कळली । असतील तैसीं ॥ ५३ ॥ इजारत व अमानत । असेल तैसें यिथं- भून । लेहानिया बारदस्त । रस्तबाब साधावी ॥ ५४ ॥ आतां मुख्य बाब ती कटुबाण । कैसी लिहितात विचक्षण । ते ही परिसा सावधान । गुणवंत हो ॥५५॥ कटुबाण बाब एकली । परि कमाविशीनें फांकली । लिहितां बुध्धि आपुली । विशाळ करावी ॥ ५६ ॥ कसबे आणि विलायती । पहिले सदरे आणिजेती । तया तळीं लिहिजेति । कसबे आधीं ॥ ५७ ॥ तया तळीं खताविला । कसबा येक नामाथिला । तपसील पाहिजे निवडिला । मुजेरी व मोहतर्फा ॥ ५८ ॥ मुजेरी बाब पहिली । पहिलें पाहिजे खताविली । रुजू घालूनि दस्तअमलीं । घडावी जमे ॥ ५९ ॥ भागस्थळ असेल रीती । भागागळानें जमे साधिती । चावराना तरी घालिती । कानू रुजू ॥ ६० ॥ नख्त कटुबाण असला । रुजू घालिजे दस्तअमला । गले कटुबाणी ही होईल । ऐसी च जमे ॥ ६१ ॥ तेथें सांडिजे दस्तअमल । कौलीं बादर्कार्दीमुळें पडेल । इस्ताव्यानें जे चढेल । तें जमा करावें ॥ ६२ ॥ जमीन असल चावराना । किताबती प्रमाणें भिन्नभिन्ना । त्या दस्तअमलाचिया विंदाणां । विरळा जाणे ॥ ६३ ॥ ऐशी साधूनि जमे निगुती । कीजे लेखनधर्मे वासिलाति । रोजकीर्दी रोजनामे बोलिती । माहनेमें तेरिखवार ॥ ६४ ॥ रसद आणि वराती । दुतपसील वासिलाती । बाकी राहे तें यथारीती । तीस मोझ्या पाहिजे ॥ ६५ ॥ कागदीं बाकी निघेल । मोझ्याकरितां नाकबूल । चोरी न करतां घडेल । पतन लेखकासी ॥ ६६ ॥ वासिलातिची हे रीती । सकळ बाब उसलाती । लेहोनि बाकी निरुती । मोझे रुजू काढिजे ॥ ६७ ॥ ऐशी जाली मुजेरी । मोहतर्फा बाब दूसरी । जाणोनि लिहिजे चतुरीं । ताइफेवार ॥ ६८ ॥ ताइफे अनेक असती । मोहीन वाहतर वदती । अनुक्रमे शागिर्दा प्रती । सांगणे लागेल ॥ ६९ ॥ बकाल चाटे सौदागर । सराफ जोहरी सोनार । बोहरे तांबट कल्हेगार । तिरकार चितारी ॥ ७० ॥ मणियार पटवे सिकलगार । तेली तांबोळी परगार । कातारी सुतार जिनगर । बागवान चुनाडे ॥ ७१ ॥ क्षेत्री चपरसी फणिगार । जोगी फु- लारी खुशबईगार । लोहार धोबी कुंभार । कासार शिंपी व चांबटे ॥ ७२ ॥ कोष्टे रंगरेज धणगर । मोमीन साळी रंगारे । दलाल काचारी सफाफगार । पव्हेलाटी धावडे ॥ ७३ ॥ तिवासी बापरगार । जरगार साडीगार । कमाणगार पिसणार । घरटी आणि कायाडी ॥ ७४ ॥ कौसदोज कागदगार । कसाब पेंढारी सरेकर । वोंड गौंडे गडेगार । संगतरास हमाल ॥ ७५ ॥ गौळी मासोंदे आडेगार । बुरूड भोंग आणि महार । लोणारी पत्रावळीगार । ऐसी बाहर जाणिजे ॥ ७६ ॥ ताइफे मोकदमा लिहितां । कदीम जर्दीद काढिजे निगुता । गयाळ मयत बाद देतां । आळस न करावा ॥ ७७ ॥ साधिलें दस्त ताईफ रुजू । उसूलीं लिहिजे बरवा-

उजू । बाकीचा ही माल उजू । मोझ्यासूद पाहिजे ॥ ७८ ॥ एवं मुजेरी व मोहतर्फा जाला । दोन्ही बाकी सवा घडला । आतां मामला पाहिजे लिहिला । यथारीती ॥ ७९ ॥ बिंत अथवा मशूदर । जैसें अनुक्रमें येयील सदर । विलायती एकंदर । लिही वहिला ॥ ८० ॥ तया तळीं मौजा । बरवा लिहिजे वोजा । काहली करितां न ये काजा । निश्चयेंसी ॥ ८१ ॥ दुस्तामल रुजू घालावा । कानूमस्मू जमा धरावा । जमीन जुमला ल्याहावा । खेरीज इनामती ॥ ८२ ॥ बाकी उरे खालिसा । जेथील जुमला जैसा । चावर धुरुंग ठेंकें ऐसा । नेम नांहीं ॥८३॥ रुके तिवडे परतने । खांडिया मुडे नेतने । कुडव सेर पैसे माने । देशपरत्वें आहेती ॥ ८४ ॥ पाठिं कीर्दि दाखवावी । बेरीज बेरिजे आणावी । तेथें साकल्य उद्धरावी । विविक्षा ॥ ८५ ॥ हें जालें ऐनदस्त । किरकोळ मोहतर्फा बाजेदस्त । ऐसें मिळोनि दुरुस्त । सदर दुसरें ॥ ८६ ॥ दुनपशील मौजा घडला । असल मोकासा चालिला तरि लिहितां दुमाला । विलंब कवणां ॥ ८७ ॥ जरि खालसा असेल । तरि लिहिणे लागेल । वसूल तो आवघा प्रांजळ । सांगीतला मार्गे ॥ ८८ ॥ ऐसे मौजे तर्फा अनुक्रमें । ल्याहावे आवघे या चि नेमें । मामला येकंदर संभ्रमें । ऐसा लिहिणे ॥ ८९ ॥ एवं कसबा व विलायती । सदर घडे येणे रीती । दूसरे रुदरेची कर्तुती । खास बाग व सेरी ॥ ९० ॥ त्यांत पहिले खासबाग । नीतीनें लिहिजे अव्यंग । तो ही सांगेन विभाग । कळेल तैसा ॥ ९१ ॥ मौजा व नेशकर । ल्याहावे जिनस मोकदर । तर मेवे अपार । असतील ते ॥ ९२ ॥ त्या उपरि साग सबजी । जिनस लिहिजेति समाजीं । ऐशीं दस्तें नाना जीं जीं । ऐशीं लिहिणें आधीं ॥९३॥ उतारवर्क जमावर्क । तर्तुरवर्क निरखवर्क । खर्चवर्क बाहवर्क । करावे आधीं ॥९४॥ वसूल जमा वर्क चि तेथें । आणि जिनस वेचल ते । ऐसा नेम खास बागेतें । असे देखा ॥ ९५ ॥ नख्त फुरोकाचें आलें । ऐन जिनस इरसाल गेलें । दोहीं प्रकारें साधिलें । दस्तमोहे मोकदरा ॥ ९६ ॥ या नंतरें शेरी । तेथें जिनस परोपरी । उपजवर्क जमावर्क कूसरी । करावें निकें ॥ ९७ ॥ भूस विदळ काबाह जिनस । जे जे उपजति शेरीस । सनद उपजवर्क त्यास । विशेष नांहीं ॥ ९८ ॥ शेरी खासबाग येकंदर । हें जाणिजे दुसरें सदर । मिळोनि घडी ते थोर । कट्याण ते ॥ ९९ ॥ आतां जुजुया कैसी । नाना बाबांची सांटवण ऐसी । ते सांगतां शेण वयासी । संतोश वाटे ॥ १०० ॥ जात्रा बाजार मेट बोलावी । आनप तरी नाव जाणावी । ढोकरा थडिया ऐशिया नांवी । बाबा देखा ॥ १०१ ॥ भुतफुरोसी जेजारी । भोग राहाण डांकारी । गोंधळे आवट अश्वधारीं । अश्वयात्रा ॥ १०२ ॥ पारधि मारिती श्वापदासी । त्यासि खंड अथवा भागविशेषीं । ते जमा होती परि ऐशी । जुजुया तळीं ॥ १०३ ॥ जंगल सागवानी हरजिनसी । लांकडें तोडूनि विकिती त्यासी । कोडी प्रमाणें जिनसेंसी । जमा धरणे ॥ १०४ ॥ वैरागरी उपजाति

६

हिरे । मोतियें सोधिजति पाणिचरें । प्रवाळलतिका आदरें । जमा होती ॥ १०५ ॥ समुद्रतीरीं लवंगाचें । वोशाण लागे नियमाचें । अथवा जीवजात सागरीचे । आपण चि मरती ॥ १०६ ॥ ऐशिया बाबा अगाध । जुजुया तळीं प्रसिद्ध । लिहिती लेखकविध । राजहंस ॥ १०७ ॥ अष्टधा प्रकृति ईश्वराची । तैसें चि बाबाष्टक माहासुलाची । हे मूळपीठिका जमेची । जन्मभूमि ॥ १०८ ॥ ऐसा माहासूल जाला । तो येक सदरेशि लिहिला । दुसरे सदरीं उदेला । दस्तवजू तो ॥ १०९ ॥ दस्तवजू दूसरे बिती । शागीर्दी लिहिजे निगुती । ते परिसावी कर्तुती । करिती कैसी ॥११०॥ मुकासा अथवा इनाम चाले । त्या पूर्वी दस्त जाले । तें पाहिजे लिहिलें । सनद सुद्धां ॥ १११ ॥ अथवा न होतां सरसाल । बाजावर्द अमानत होयिल । तें जमा धरणे लागेल । दस्तवजीं ॥ ११२ ॥ अथवा मिरासीचें भांडण होतां । वृत्ति अमामत वरिती सर्वथा । तो ही दस्तवजू अन्यथा । घडो न सके ॥ ११३ ॥ ऐसा दस्तवजू आणि माहासूल । मिळोनि ऐन ऐसें सदर होयिल । ते ही लिहिणे लागेल । मशूदर देखा ॥ ११४ ॥ दूसरिये मशूदरीं । बाजेवजाची नवल परी । सर्वज्ञ लेखक नवलपरी । लेखन करिती ॥ ११५ ॥ समुद्राचेनि कांठें । सारलें पाणी भरे वोहटे । बांद बांधोनि संकटें । करिती सारिया ॥ ११६ ॥ अथवा जमिनी सारिखें । मिठागर करिती निकें । ते हि लिहिजेति कौतुकें । बाजेवजीं ॥ ११७ ॥ खांडिजेति डोंगर । बोरले करिती अपार । नाचणी वरई जिनसवार । पिकविती पिकें ॥ ११८ ॥ खेरीज जुमला जमीनीचा । नव जमीन साधनाचा । उपाय तो चि बाजेवजूचा । आगम देखा ॥ ११९ ॥ ऐसा जाला बाजेवजू । ऐनेसी मेळविजे उजू । एवं ऐन बाजेवजू । सदर होय ॥ १२० ॥ ऐन व बाजे उजू जाला । आतां लिहिजे बाजे माहाला । क्रमु अनायासें आला । मेस्तकासी ॥ १२१ ॥ उलफा भेटी आणि नजर । सौगत अथवा यादगार । संतगा आणि बलायदूर । वारेवणी ॥ १२२ ॥ देशसमंधें घेणे । सालेंसाल जमा धरणें । ते ते बाबा लिहिणे । बाजेमाहालीं ॥ १२३ ॥ पायपोसी तेजीपटी । खर्चपटी मोहीमपटी । तोफापटी तख्तपटी । ईद ईदैन सुभराता ॥१२४॥ +++ तोरणपटी । मुनकतार नाम पटी । यथार्थता सिंहस्तपटी । जारता पीर वालिदा ॥ १२५ ॥ ऐन व बाजे माहाल घडले । सालमजकूरचें सदर वहिलें । गैरमहसूल विस्तारलें । दुसरे सदरीं ॥ १२६ ॥ गैरमहसुलाचा तपसील । तो सकळाहूनि सखोल । लेखकांशि येती डोल । श्रवणा सवें ॥ १२७ ॥ कसर मुतालबा नागावा । खून दफीने सांडावा । पिदास्ति शिराणा जाणावा । भागस्थळीं ॥ १२८ ॥ निपुत्रीक आणि सत्तावन । मूठमर्दी तकसिमातिगहन । पाडाव मसाले करिती आपण । जमा होती ॥१२९॥ रुयानाति रुषवति चंद्रतवाई । अमानत शिलकावणी सेरणी पांहीं । ++++ सेला व हरकी ॥१३०॥ दिव्य वाति आणि कोश । व्यवहार प्रायश्चित्त विशेष । जमानाति नेमोत्तर समाप ।

धव नेम खंड पत्र ॥ १३१ ॥ मुंडमोकळावण अजान । बांदी बरदा अकस्मात । सांपडलिया जमा होत । निभ्रांत जाणा ॥ १३२ ॥ पुराडे आणि शिकस्ती । जाहजे अथवा इमारती । कोणाचीं मोडिजेती । तो ही जिनस जमा कीजे ॥ १३३ ॥ ऐशा बाबा अनेका । गैरमहसुली निवती देखा । सहजें चि निपुण लेखकां । कळोनि जाति ॥ १३४ ॥ ऐन वगैरे महसूल । मिळोनि सालमजकूर होयिल । आतां बकाया बहुसाल । कठिण लिहितां ॥ १३५ ॥ दूसरिये कर्ने । बाकी-बकाया वर्ते । तो क्रमु कैसा वर्ते । ऐका वहिले ॥ १३६ ॥ शिलीक बकाया कलम । खर्चहीन जें कदीम । तिचा आगम सुगम । लिहितां असे ॥ १३७ ॥ दास्तान आणि दुकाना । आवघा निर्वेच कारखाना । चौत्रे ठेवणी बेवाना । नाना वस्तू ॥ १३८ ॥ भांडीं फिरंगा अलम निशान । सदर फराशिया फान । लंगर सामा आणि गहन । अन्नछत्राचा ॥ १३९ ॥ हवा हमानी नजरखुशी । ऐशा वस्तु वच नव्हे जयांसी । त्या लिहिजेति जिनसेंसी । मिळती तैशा ॥ १४० ॥ नख्त नाणे नानाविध । अथवा वजनी धातूचे भेद । जवाई व तवाई प्रसिद्ध । जिनस रुजुवाति ॥ १४१ ॥ कैलीं मापें देशविशेषें । ते लिहिजेति सजिनसें । वजनी विचित्र भेद ऐसे । ते ही लिहिजे ॥ १४२ ॥ नेबी बरेदी टकबंदी । सवाके व सुपलभेटी । एवं गुंजा मासे तोळे विधी । समजोनि लिहिणे ॥ १४३ ॥ सुमारा तळीं जिनस । जे जे मिलती जयास । ते ते लिंहिजेति विशेष । सामान्यरीती ॥ १४४ ॥ तैसे चि आठरा कारखाना । अवेच वस्तू नाना । त्या कदीम शिलकेसि आणा । तसलिमातळीं ॥ १४५ ॥ ऐन आणि तसलिमाति । दुतपासिल कदीम शिलक निरुती । सर्वे चि सिलकेचि रीती । ती हीं ऐका ॥१४६॥ तरि आठरा ही कारखाना । जमा होय जिनस नाना । तैसास व उसत असिना । खर्च हि करितां ॥ १४७ ॥ खर्च होतां साल पुरलें । बाकी जिनस कारखाना राहिले । तेतया अनुक्रमे पाहिजे लिहिले । लेखनधर्में ॥ १४८ ॥ अविलायती व तसलमाती । जैं कारखानयांसी मिळती । ते बाजे सिलकेशि येती । सदरें दोन्ही ॥ १४९ ॥ ऐशी शिलीक जाली । निसबती पाहिजे निवडिली । ते ही पाहिजे कळली । लेखकासीं ॥ १५० ॥ तेथें म्हणजे विलायती । कसबा मामले निवडजेती । तया तळीं सहजे येती । मौजे ही ॥ १५१ ॥ मौजेस गांवचावे तळीं । बकासिवाय गांवांतळीं । न करितां परड चंगाळि । लिहितां न सरे ॥ १५२ ॥ ये च रीतीने जरि वैसति । विलास काढूनि बाबे लिहिजेति । यथालाभें अमानती । इजारतीसी ॥ १५३ ॥ जकायत आदिकरुनि आठ बाबा । जेवजादि बाजे बाबा । निसबतितळीं सबाबा । नपार्शिळेसि विस्तारा ॥ १५४ ॥ बाकी पैकीं राहे बाकी । ते बकाया लिहिजे निकी । येवं बाकी बकाया वोळखी । असली पाहिजे ॥ १५५ ॥ गैरमहसूल यथानिसबती । वारंवार सांगो किती । जाणनेनो तुम्हां प्रती । कळलें चि आहे ॥ १५६ ॥ ऐशी

थाकी सालमजकूर । मिळतां दफाते सालमजकूर । दुसरिये दफाते थोर । इजाफतीं ॥ १५७ ॥ दफाते इजाफति लिहिली । बाब चिती पाहिजे रेखिली । सविस्तर तपशिळी । यथारीती ॥ १५८ ॥ तह आणि तौफेर नाणे चढाव । कर--पाडा पारखाव । वाजगस्त आणि वांटाव । भेटी यादगार ॥ १५९ ॥ उलफा तफावत सौकर्ते । नालबंदी आणि दायितें । अथवा नदीकिनारा उपजतें । नाना जिनसा ॥ १६० ॥ नदीकिनाराचा उपजु । पाहतां पडत नाहीं रुजू । कोण्ही म्हणवितां बाजेवजू । लेखकमर्ते ॥ १६१ ॥ नदीचें वाळुवंट चढे । खरबुजें तरबुजें पीकतीं अपाडें । सवें चि ते चि होड पडे । अकस्मात ॥ १६२ ॥ तेव्हां न चले कांही । बळात्कार कोणाचा नांहीं । यास्तव इजाफतीचा ठायीं । लिहिलें पाहिजे ॥ १६३ ॥ अथवा तळीं उदक असे । तेथें बांद बांधोनि असोसें । भात पिकविली साहासें । नाना परी ॥ १६४ ॥ माहालोमाहालींचे आले । किंवा ऊट हुजरूनि पाठविलें । वजावजाई सदनसूद जालें । ते इजाफति ॥ १६५ ॥ निजा आणि मुस्तरद । बेलकटी सनद-सूद । गुजारहूालबाजी विशद । बाबा ऐशा ॥ १६६ ॥ भूस कवडी कचकल-बाजी । थेरटकावणी गुराची नियोजी । इजाफतीची बाब जी जी । ते इजाफ-तीसी ॥ १६७ ॥ एवं पंचवीस बाबा इजाफती । साकल्य लेखक जाणती । दे नि च्यारि अधीक हि होती । देशपरत्वें ॥ १६८ ॥ हासील अमल हर्फेवार । बरवा लिहिजे नागर + + + । तपासिलेसि ॥ १६९ ॥ जाहाजाति आणि सौदागरी । कर्ज फायदा तया वरी । खरीदी फरोख्त अवधारी । अनुक्रमे ॥ १७० ॥ कर्दन आणि बस्तन । या वेगळें रासकर्दन । इस्तमेल परम गहन । नाना विधी ॥ १७१ ॥ कर्ज हासन गिरिफ्तन । जाहाजभाडें कर्जआमदन । उदिमावरि साधे जाण । नफा नाना जिनसी ॥ १७२ ॥ टांकसाळेचा हासिल । तो ही जाण हासील-अमल । संदेह धरितां नासेल । लेखनकळा ॥ १७३ ॥ एवं पंधरा बाबेचा हासील-अमल । मोयिनेचा समजतां तपसिल । + + + दुर्घट आहे ॥ १७४ ॥ बाब लिहिली नाममात्र । कर्तुत्व तेथिचें विचित्र । लेखक जाणति पवित्र । धारणाचळें ॥ १७५ ॥ पहिली जाहाजाति लिहिली । आमदानी तेरीख खताविली । तेथील जमे साधिली । नख्त नाणी नाना जिनसी ॥ १७६ ॥ ऐन जिनस तया वरी । तो ही लिहिजे वरिचे वरी । वजनी केली सुमारी । रास राशी चोचीना ॥ १७७ ॥ नर्मीना पशमीना जरेगारी । चर्मीना मोतीं हिरे माणिकें अवधारी । पाच पेरोज नाना परी । लसणे पुष्पराजा ॥ १७८ ॥ सफाफी पितळी कांसवट । तांबें अहिनी कासट । सापरसूत अति चोखट । पंचरसाचें ॥ १७९ ॥ रसडी पाटपडमी सुती । रेसमी काथा आणि ताथी । अनुक्रमी लिहिजेति । सुगमी नानाभिधानी ॥ १८० ॥ ऐते जिनस नानाविध । क्रमे लेहोनि यथातथ्य सिद्ध । त्याप्रमाणें करा सनद । बंदर-रुजू ॥ १८१ ॥ जिये बंदरीहूनि आलें । तेथील माप वजन रुजू पाहिलें । चड

अथवा नुकसान जालें । वाजपूशी करावी ॥ १८२ ॥ बंदरीचे खरेदीखत । लीपि-भाषाभेद असत । तेविशी जे पारंगत । लेखक मेळवावे ॥ १८३ ॥ स्वस्ता चि असेल अवगत । मग कायसें आणिकाचें मत । कागदें कागद पाहोनि तथ्य । पाहिजे त्याचे ॥ १८४ ॥ बंदरलिपीचा तर्जमा कीजे । हिंदवीं तैसा चि लिहिजे । गोही मुकाबला मना आणिजे । कळेल तैसा ॥ १८५ ॥ ऐसा जिनस आला । तो पाहिजे जमा धरिला । त्यामाजि जो वेचला । तो खर्च सर्फी ॥ १८६ ॥ आतां सौदागरी ते कैसी । आकाशीं अभ्रे जैसीं । पार चि नाहीं गणनेसीं । कोण करी ॥ १८७ ॥ जेथें ऐसें चि पाहिजे लिहिलें । खरेदी केलें अमुकेनि मुदलें । अमक्या नफ्यानें विकिलें । मिळकत आमकी ॥ १८८ ॥ अथवा जाहा-जाति आदिकरुन । पंचदश बाबा मिळून । जिनस आला तो जमा धरून । तसैर लिहिणें ॥ १८९ ॥ मुदल घालिजे पोटीं । नफा बेरिजे तळवटीं । एवं मुदल व नफा सेवटीं । निवडोनि ये ॥ १९० ॥ कर्ज फायदा बाब तीसरी । ती लिहिजे अति कूसरी । मुदल पोटीं फायिदा सदरीं । प्रकट दिसे ॥ १९१ ॥ खरीदी फ्रोख्त तसैर । हा तंवं उघडा चि प्रकार । जें जें करी कमावीशदार । तैसी जमा ॥ १९२ ॥ कर्दन आणि बस्तन । रहींशी रुजू घालून । करावें जाणोनि मान । फायद्याचें ॥ १९३ ॥ रासकर्दन अति कठिण । तेथें कारखाने-रुजू ले-खन । जें जें आणिजे जेथुन । तें जमा करणें ॥ १९४ ॥ ते नाना प्रकार जि-नस । वेचोनि करिजेति रास । ते चि जातील सदरास । येर तपशील पोटिचा ॥ १९५ ॥ केली वजनी सुमारी । खुमाससीनें रुपें रत्नें अवधारी । कापूस सूत रेशीम जर परोपरी । किमखाब आणि चर्मीना ॥१९६॥ या प्रकारें नाना जिनस । खर्च होउनि घडे रास । सुमारी उपजे जिनस । रासकर्दन त्या नांवं ॥ १९७ ॥ इस्तमेल कैसी जाली । ते पाहिजे लिहिली । यथानुक्रमे आली । मेस्तकासीं ॥ १९८ ॥ सोजी मैदा कणिक । गोधूमाचे प्रकार अनेक । सूत रुई बनोले का-पुसाचे देख । जिनस होती ॥ १९९ ॥ भाताचे तांदूळ होती । तेल-पेंडी-कारणे तिळ गाळिजेति । तेलें वोखदें रसायण करिती । ते इस्तमेली ॥ २०० ॥ केली वजनी सुमारी खर्ची पडे । आणि केली किंवा वजनी जिनस घडे । ते चि इस्तमेली न घडे । आणीक येथें ॥२०१॥ कर्जहसना कर्ज घेतलें । तें कळंतरपोटीं जाणविलें । मुदल बेरिजेति आणिलें । पाहिजे सर्वथा ॥ २०२ ॥ कर्ज घेऊनि बुडविलें । तें गिरिफ्तन बोलिलें । किंवा मागणाराचें निर्मूळ जालें । यास्तव बुडे ॥ २०३ ॥ पर-बंदरीं कर्ज घेतलें । तें बंदरीचें आमदरफ्त राहिलें । तें हि जागावें गिरिफ्तन जालें । जमा कीजे ॥२०४॥ यानंतर जाहाजभाडें । दुकानभाडें आवासभाडें । वाडेकोडे + + । लिहिलें जाणा ॥ २०५ ॥ नफा पावनी हुंडींचा । अथवा मामला वरातेचा । विकत घेतला नफियाचा । फायदा जमा ॥ २०६ ॥ टांकसाळेशी विचित्र नाणे । घडे

तांबें रुपें सोनें । तें यथानुक्रमें लिहिणें । लेखकजनीं ॥ २०७ ॥ ऐसा जिनस खर्च पडे । नाणवट अपार घडे । तेथें मुद्दल नफा प्रांजळ निवडे । ऐसें लिहिजे ॥२०८॥ जो जो जिनस आटिला । त्याच्या च त्याहावें मुद्दला । उपका पाहिजे जमा केला यथोचित जो ॥ २०९ कोणकोण कैसा जिनस । किती पडिला आटणीस । येकत्र जालिया कोण कस । हिशेबीं होता ॥२१०॥ तो मासला उतरला । तरि च कारकुनाचा विवेक उरला । तें न कळे तरी केला । दगा करणारीं ॥ २११ ॥ नाणेउतार कसमोयिनी । तो चि उतार करिजे आटणी । हें नेणतां गाफिलपणी । ख्यानती च लागे ॥ २१२ ॥ अथवा सौदागरांचा जिनस आला । भांजणीदे नाणवट केला । तरि हाशिलीं च जमा जाला । मोयीनप्रमाणे ॥ २१३ ॥ तांबे हि अपार आटिलें । खुर्दे नाना जिनस केले । ते हि लिहिजेत मुद्दलें । कायभेदें ॥ २१४ ॥ येवं मुद्दल अमकें टांकसाळेसि पडिलें । नाणें इतकें निर्माण जालें । फायदेजाति निवडिलें । सहजचि दिसे ॥ २१५ ॥ ऐसी हासीलअमलीची कर्तुती । संक्षेपे बोलिली यथामती । वित्पन्न ते आवघे जाणती । हेळामात्रें ॥ २१६ ॥ सकळाहूनि कठिण लिहिणे । हाशीलअमलीचीं विंदाणें । जाणिजे तरी च सूटणें । अन्यथा बुडिजे ॥ २१७ ॥ लेखकाचें मायपोट । तो हासीलअमल्र बरवट । नेणे तयाचे सपाट । निसंतान ॥ २१८ ॥ पोहो जाणे तया नदी माय । इतरां अग्निप्रवेश होय । जना सुदीन उल्का राहे । निगूढपणे ॥२१९॥ ऐशी हाशीलअमलाची मिळकती । शाहाणेपणे काढीन म्हणती । ते मूर्ख चि निश्चिती । लेहों जाणतां ॥ २२० ॥ ऐशी जमे यथाज्ञानें । कथिली श्रीगुरुप्रसादानें । कर्तव्य न जाणतां दूषण न ठेवणें । लेखकजनी ॥ २२१ ॥ हें च मागणें तुम्हा प्रती । वारंवार विनऊं किती । आपुले आपणा प्रती । गोड चि मानिजे ॥ २२२ ॥ आतां साष्टांगीं नमन । नमस्कारिले लेखकजन । जमासमाप्ति जाली येथुन । यथामती कळली ते ॥२२३॥ संतोषोनि आज्ञा कराल । तरी च लिहिजेल वासिल । जेथें कौशल्य बहुसाल । समजतां लागे ॥ २२४ ॥ इति श्री हेमाद्रिपंतविरचिते पिशाचलीपिका जमेलेखनविधिप्रकरणं सपूर्णमस्तु ॥

## ॥ अथ वासीलविविक्षापूर्वलेखकविधि ॥

जमे यथाज्ञानें कथिली । जे देशरीनीने असे चालिली । लेखकीं पाहिजे क्षमा केली । न्यूनपूर्णविषई ॥ १ ॥ आतां लिहिजे वासिल । पाहतां जमेहूनि सखोल । ते ही कीजे प्रांजळ । कळेल तैसी ॥ २ ॥ त्यासि वासील झडती आणि खर्च । हा त्रिविध नामनिर्वच । वृथा कीं पाहिजे साच । लेखनमतें ॥ ३ ॥ सारे दस्त जमा जाले । वासील सुद खर्चीं पुरले । द्विविध बाकीने रूपा आले । शिलकी आणि निसबती ॥ ४ ॥ ते चि म्हणिजे वाशिल । खर्च तों जाणावा उसूल । मळझाडा तो केवळ । येकजिनसी ॥ ५ ॥ हा तपसील विस्तारें । जमेशि लिहिला नि·

धांरें । म्हणुनि आतां पुरे । संक्षेपे चि ॥ ६ ॥ तयामाजि थोरपणें । वासील आधीं समजणें । येर दोन्ही सांगणें । वगळे न लगती ॥ ७ ॥ वासील मशूदरीं रेखा । हर्फ ऐन खर्च देखा । मामलेमजकूर खर्च देखा । दफातेर्सी ॥ ८ ॥ कर्ते सालमजकूर । चिंती लिहिजे तपसीलवार । रख्तखाना सदर थोर । तया तळीं ॥ ९ ॥ ऐन रख्तखाना पहिलें । मशूदर मागुती आले । ते ही लिहिजे दुतपसिलें । तहवेली आणि शाहीरद्द ॥ १० ॥ तहवेली बिंती आली । कारखाना मशूदर तया तळीं । ते विवंचना वेगळी । जाणावी लागे ॥ ११ ॥ कारखाने उदंड असती । परि मोइनी अठरा लेख्क लिहिती । किरकोळ ते आटती । तया तळीं ॥ १२ ॥ पोतें खजाना जामदारखाना । पागा आणि पीलखाना । जरगरखाना जिरातखाना । कोठीं आणि मुदबख ॥ १३ ॥ थटी आणि सुतरखाना । अबदारखाना शराबखाना । फराशखाना अलमखाना । सिकारखाना आणि कोठार ॥ १४ ॥ बहिलीमाहाल आतसखाना । इमारती आणि अंबरखाना । या वेगळे हि नाना । आणीक असती ॥१५॥ अडरा मोइनी लिहिजेति । वरकड अंगभूत असती । वित्पन्न सहजें चि जाणती । सांगणें काय ॥ १६ ॥ इरसाल खाना जालें । फेरिस्तें पाहिजे उद्धरिलें । साल माहाल बराबरी गेलें । तें हीं ल्याहावें नामाथिलें ॥ १७ ॥ नाणवट नाना जिनस । खुर्दे तैसे चि देशविशेष । यथानुक्रमे सावकाश । ल्याहावें आधीं ॥ १८ ॥ ऐन जिनस तया वरी । बरवें ल्याहावें कूसरी । सोनें रुपें तवे सदरी । आधीं लिहिणे ॥ १९ ॥ कैली वजनी सुमारी । त्याचे जिनस नानापरी । समजोनि ल्याहावे चतुरीं । मोला सारिखे ॥ २० ॥ रास रासील चौबीना । सर सनगें विचित्र जाणा । देशांतरीचीं ठावकीं कोणा । असतील ते जाणाति ॥ २१ ॥ ऐन खाना इरसाल । राहाखर्च वाटभाडें पडेल । तें दुतपसिलें घडेल । सदर तेथें ॥ २२ ॥ तैसें चि बाकी सालमजकुर । बाब उगाविजे सविस्तर । तरी च जमे बाबवार । रुजू पडे ॥ २३ ॥ इरसाल हुजूर गेलें । कारखानेवार जमा जालें । तेथील जमा वर्कमुळें । हुजति चाले ॥ २४ ॥ पाडा पारखाव तफावत नाणे । वाटाव खुर्दे मुळे जाणणे । वजनी कैलीची नुकसाने । वजा होती ॥ २५ ॥ तीं बाद देऊनि निकी । हुजती चाले येकी । कारखाने रुजू नेटकीं । सनद सूद ॥ २६ ॥ ते महालास आलियावरी । बारजमा धरणे कूसरी । नाणेवाद जाणोनि चतुरीं । साधूनि घेयिजे ॥ २७ ॥ खर्च ल्याहावा कारखानेवार । तेथें वजा नेंदावें बादर । इरसालमुळें सदर । ल्याहावें आधीं ॥ २८ ॥ त्याशि तपसील काढिजे । सनदसूद बादर लिहिजे । बाबेचा ही तपसील उगविजे । यथंभूत ॥ २९ ॥ एवं संकळितें लिहिलें । जाणतेयासी च कळलें । शागीर्दासि पाहिजे समजलें । कारखानामुळें ॥ ३० ॥ कोणे ठायीं काय जमा । कळली पाहिजे हे सीमा । पुनरुक्त न म्हणावें क्षमा । केली पाहिजे ॥३१॥ तरि पोतें आणि खजाना । येक चि मानिती जाणा । न जाणोनिया विंदाणा ।

शणोपणाच्या ॥ ३२ ॥ नित्य वेच जेथें होय । माहालिचा ऐवज तेथें जाय । तें पोतें म्हणतां काय । अनुमान असे ॥ ३३ ॥ खजानाचा ऐवज नेमिती । नाणे हुजूर आणविती । चौत्रे दुनीनें करिजेति । तो खजाना ॥ ३४ ॥ पोतें खजाना येक केला । तो राजा नव्हे कळवंत भला । मंत्रिसमुदाय भ्रांत जाला । पारकें मानिति ॥ ३५ ॥ पागा म्हणता अश्वजाती । आणि त्यासि खर्च जे जे होती । प्रसिद्ध चि लेखक जागती । लिहिणे कासया ॥ ३६ ॥ पीलखाना म्हणतां हस्ती । अथवा त्यासि नाना वेच होती । ते यथाप्रकारें लिहिजेति । जाणोनियां ॥ ३७ ॥ जरगरखाना घडीत नगाचें । आणि नाना वस्तूंचें । गणन न करवेल जिनसांचें । बहूवसपणें ॥ ३८ ॥ नाना देशीं नाना लेणी । नाना नांवें नाना करणीं । ऐशी कोणाची बुद्धि देखणी । असेल तरि असो ॥ ३९ ॥ सोनें रूपें आणि मिने । तैसे चि डांकाचे जिनसाने । हिरे माणिकें पाचू न गणे । मोल अज्ञाना ॥ ४० ॥ नीळ गोमेद पुष्कराज । लसणे आणि पेरोज । मोतें काहली आणि हुरमोज । लाजावर्तें पोवळीं ॥ ४१ ॥ आणीक ही रत्ने विशेष । उपजति जे जे देशीं देश । किंवा जडले असतां नगास । तरि नगाचे तपशिलीं ॥ ४२ ॥ आतां जिरातखाना जुझंती । सकळ सामुग्री आइती । शस्त्रें शिलेकमाना किती । परोपरीच्या ॥ ४३ ॥ जिरे आणि कंगाल । चिलखतें बंद तबेल । घुगी ताज पाखर विक्राळ । सनीना आणि जंजीरी ॥ ४४ ॥ बरचें सैत्या सरनेजे । तोडे मगगटीं जाणिजे । गुपूकी सुरई विराजे । विचित्रपणें ॥ ४५ ॥ आंगराखी आणि पंजे । मोहळीं गजाचीं जाणिजे । टोप टोपिया बिनी साजे । अर्धचंद्र ॥ ४६ ॥ ढाला आणि तरवारा । तरकस खंजीर कटारा । पटे हातबरसे अवधारा । वागनखें विंचू ॥ ४७ ॥ बिचवा माहुसाण खंडे । भाले तुबखा हातखांडे । गुरगुज टोणपे सोटे । नाना जिनसी ॥ ४८ ॥ भांडी फिरंगा जंबूरे । नाली सुतर नाना प्रकारें । आसबा लस्करा पुरे । समेत गाडी बैलेंसीं ॥ ४९ ॥ दारू गोळी आणि गळोले । बाण चंद्रज्योती आणि नळे । कोकबाण दाणनळे । फुलबाजी हवायिया ॥ ५० ॥ हुके खजाने हातबाग । दरखजाह जेंजाळ बाण । नाना दारूचे जिनस संपूर्ण । कोण जाणे ॥ ५१ ॥ जिरातखाना आसतखाना । दोनी येक चि जाणा । नामें वेगळीं परि कारणा । येक चि असे ॥ ५२ ॥ कोठीस बैलसमेत साज । हें सर्वांस ठाउकें सहज । केली वजनी सुमारी साज । बैलाचे नानाविध ॥ ५३ ॥ मुदबख रसोयांचे । जिनस लागती तयाचें । गणन करितां आयुष्य वेचे । तरी न सरती ॥ ५४ ॥ थटी म्हणिजे गायी म्हैसी । शेळी मेंढी ही विशेषीं । व्याली मेंढी देखील दुभतेसीं । लिहिजेताती ॥ ५५ ॥ सुतरखाना म्हणिजे उंटें । देखील खर्च नेटपाटें । अबदरखाना पाणवटें । पात्राविशेषें ॥ ५६ ॥ शरबतखाना मेवे वोखदें । तरमेवे आणि सुगंधें । मारविखें तेलें विविधें । नाना परीचीं ॥ ५७ ॥ नाना विषांचे

उतार । अथवा संभोगाचे संकोचकार । घुटगे पाहतां अपार । गोळिया अंजनें ॥ ५८ ॥ यत्नसाध्य दिव्य औषधी । मोहरे गुणवंत नाना विधी । अव्हा संख्यादि ज्या ज्या निधी । त्या त्या ठेविजेति ॥ ५९ ॥ फराशखाना सदर बिछाने । कनाता रख्त सामीने । जमीदोज हवादोज शामीने । नौगजी राहाटिया ॥ ६० ॥ न्याहालिया अंदर बिछाने । हवा हमामे लंगरखाने । तख्त तयारी पिहुदाने । मखीदाने कंदूरिया ॥ ६१ ॥ चिका पडदे असमानी । बाजवा थोरा निमाजदानी । तिरिपी चांदवे खलघतखानी । शिखंबी आणि दुखंबी ॥ ६२ ॥ ऐसे जिनस नाना । तपसील लिहितां पुरवेना । संक्षेप च जो समजेना । त्यासि विस्तार ही न कळे ॥ ६३ ॥ अलामखाना वाद्ययंत्रें । शुभसूचक पवित्रें । जीं वाजतांचि येकसूत्रें । सेना प्रजा धांवती ॥ ६४ ॥ राजमंत्राची सूचना । प्रत्यक्ष बोलों न ये कोणा । वाद्य वाजतां विचक्षणां । आधींच कळे ॥ ६५ ॥ छत्रें पालखिया सुखासनें । तख्त तयारी जिनसाने । चवरडोल हौदे सुखढाळ बहुमाने । नाना जिनस ॥ ६६ ॥ वाद्याचे विशेष ल्याहावे । तरि स्वदेशीचें सकळाशि ठावे । देशांतरिचे कैंचे आणावे । चाड हीं नाहीं ॥ ६७ ॥ सिकारखाना चित्ते । वाग रिसें वानरें कुत्ते । हरिण सांबरें चील निरुते । घोरपडा आणि जवादी ॥ ६८ ॥ राही खबुतरें खुलगे रावे । सारिका बदकें बाज गव्हे । दुराज, तितर निका लांव्हे । मैना ससाणे ॥ ६९ ॥ लगड कुहिका काक कव्हे । कोले बाउल सुरुंग गवे । येडके मयूर पारवे । मुंगस चुवे वनगायी ॥ ७० ॥ भोगराज शाहामृग मनोहर । सारस गेंडे माहाथोर । ऐसे नाना जिनसी अपार । दृढदेहीं ॥ ७१ ॥ मृग नाना जातिचे । पक्षी हि तैसे च पर्वतिचे । ते आवघे शिकारखानिचे । नेमें जाणा ॥ ७२ ॥ अंबरखाना चांगला । वख्त गैरवख्त कामा आला । तो चि राजा शोभला । जगतीतळीं ॥ ७३ ॥ परचक्राचिये वेळे । देशसेना अवघी च गळे । तेधवां अंबरखाना मोकळे । करावे नृपें ॥ ७४ ॥ धान्य आणि दुर्गें । शाबीत असतां शत्रु भंगे । सेना देश आवघे । सहज चि मिळती ॥ ७५ ॥ घांसलकडीचे कोठार । सहल मानिती पामर । सकळ राज्याचें जिव्हार । हें चि जाणा ॥ ७६ ॥ पांच कारखाने राजमंडण । तो न वांचती तृणे विण । राज्य बुडतां उसीर कोण । जरि नसे कोठार ॥ ७७ ॥ वहिली माहली रथ घोडे । अथवा वहिलिया याच पाडें । कोण्ही न म्हणों वांकडे । नीट चि आहे ॥ ७८ ॥ इमारती प्रसिद्ध आहे । बोलावी च नलगे पाहे । एवं कारखाने जालिया हे । तहवेली जाली ॥ ७९ ॥ इमारतीच्या ऐवजास । वरातां चालताति अशेष । अथवा नाना जिनस । देतील चौचीना ॥ ८० ॥ शाहिन्ह दूसरें सदर । मुकासें इतलाख तपसीलवार । जाणोनिया सविस्तर । लिहिजे देखा ॥ ८१ ॥ तो ही आवघा अनुक्रम । भागिजेल अति सुगम । तो चि जाणतां दुर्गम । सकळांशी आहे ॥ ८२ ॥ पहिलें लिहिजेति माहालाति । कदीम वालिदानी असती । दादे पडदादे बोलिजेति ।

७

त्या अनुक्रमे ॥ ८३ ॥ तया तळीं हरिमसराय । पहिलेपासूनि शेवट होय । ते च रीतीनें लिहिजेत पाहें । इतलाख व मुकासे ॥ ८४ ॥ सुरती व नाटकसाळा । दायी जवळिकेच्या भूपाळा । प्रीतिपात्रा ज्या सकळा । नेमस्त लिहिणे ॥८५॥ या वेगळ्या ।चि कबिलियाच्या । बहिणी लेंकी माच्या । सुना नाती ज्या नियमाच्या । जाणोनि लिहिणे ॥ ८६ ॥ यानंतरें प्रधान अमात्य । मंत्री सरखेल व सरनोबत । कार मुलकी आणि हुकमत । जे जे असती ॥ ८७ ॥ तया तळीं वजारती । आधीं लिहिजेनि भूपती । क्षेत्रीं नामाथिले होती । यथाक्रमें लेहुनी ॥ ८८ ॥ हिंदू जे जे देशरीती । ते ही लिहिजेति यथाजाति । समजोनि तारतम्यप्रवृत्ती । रस्तखानाची ॥ ८९ ॥ सरदार आणि जमातदार । मोथिनी आणि शिलेदार । नतनी आणि बारगीर । जाणा वहिले ॥ ९० ॥ मदनी आणि विलायती । पागी मेहनती । रस्तखाना जे जे रीती । असतील तैसे ॥ ९१ ॥ अकारीब मजालसी । मोथीन कामी नाहीं तयांसी । जे मंडन राजसभेसि । नीतिमार्गस्थापक ॥ ९२ ॥ काजी पंडित । जोसी जे जाणती सिध्धांत । वस्ताद जे पढविंत । शास्त्रज्ञ रायासि ॥९३॥ सर्वस्व जावों आतां । परि नीति न संडिती सर्वथा । राजा कोपतां ही राजहिता । उदास न होती ॥ ९४ ॥

॥ भर्तृहरिणोक्तः ॥

निंदंतु नीतिनिपुणा यदि वा स्तवंतु ।
लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्टं ॥
अद्यैव मे मरणमस्तु युगांतरे वा ।
न्याय्यात्पथः प्रविचलंति पदं न धीरा ॥ १ ॥

ज्याचे मीनीचेनि बळें । तुछ्य करिती राज्य सकळें । शासनरूप वदतां भूपाळें । ऐकों न ये ॥ ९५ ॥ या लोकांचा संग्रह जेथ नाहीं । तें राज्य नव्हे पांहीं । सुंदर देहीं विवेक नाहीं । तैं महत्व कैंचें ॥ ९६ ॥

॥ किराते ॥

स किंसखा साधु न शास्ति यो नृपं ।
हितं न यः संश्रुणुते स किंप्रभुः ॥
सदानुकूलेषु च कुर्वते रतिं ।
नृपेष्वमात्येषु च सर्वसंपदः ॥ १ ॥

कारकून मोहरीर । कारखानी तपसीलवार । निविसिंदे व हरकारे । नाना परीचे ॥ ९७ ॥ आतां कारकून ते कोणते । जाणावे लागती निरुते । मजमू मुकासनीस निरुते । म्यावती आणि सुरनीस ॥ ९८ ॥ हेजीब लाहान थोर । जाणोनि

ल्याहावे विल्हेवार । पारसी हिंदवी दबीर । तैसे चि जाणा ॥ ९९ ॥ सबनीस
आणि वाकेनीस । मुख्तसर जे हसमनीस । अर्जबेग बहुवस । असतील तेही
॥ १०० ॥ वैद्य जे कां नाना विध । व्यवहारे कां जे राजसंनिध । वेतने मुकासे
प्रसिद्ध । असती ज्यांसीं ॥ १०१ ॥ या उपरि दूसरे सदरीं । मोहरीर म्हणिजे
दफ्तरी । ते लिहिजेति अवधारीं । दफ्तर मस्मु ॥ १०२ ॥ दफ्तरा तळीं नकराचे ।
तपसील असतील नेमाचे । हवालदार यारदी हरकार ज्याचे । समूह देखा ॥१०३॥
दफ्तरी जालियावरी । कारखानी तैसे चि अवधारीं । त्याचा अनुक्रम सदरीं । का-
रखाने मुळें ॥ १०४ ॥ आणीक ही या वेगळे । हरकारे कामागळे । जागोनि वेगळे
वेगळे । लिहिणे लागती ॥ १०५ ॥ या उपरि पाउखलक । त्यांचा तपसील अनेक ।
परंतु जाणावया कांहीं येक । सांगावा लागे ॥ १०६ ॥ कटकी जमाति बाजे लोक ।
हे तपसील त्यांचा देख । त्यामाजि पहिलें लेख । कट चि लिहिती ॥ १०७ ॥
तुळवे आढाउ लकेकरी । तुबकी कमानी इटेकरी । आहीर चाणकरी । गोलंदाज
गुंडगल ॥ १०८ ॥ जरि जिनसवार जुमले असती । तरि लिहिजेति येणे रीती ।
सरभेसळी जिनस असती । तरि जुमलेवार ल्याहावे ॥ १०९ ॥ जुमलेमुळें जिनस-
वार । सहजें चि येतील सदर । समजोनि लिहिताति लिहिणार । येरां काय कळे
॥ ११० ॥ आतां खिजमती बाजे लोक । तपसील वेगळा सदर येक । आधीं
खिजमती येकें येक । जाणोनि लिहिणे ॥ १११ ॥ सरखवास आणि हुद्दे चाल-
विती । बीर्दे जवळी हुजूर असती । माहालदार मुख्तेसर होती । दहा वीस ते
॥ ११२ ॥ बाजे लोक नाना विध । समजोनि याचे भेद । जैसी जे जे प्रसिद्ध ।
तें चि ऐका ॥ ११३ ॥ अफराद आणि माहालदार । भोंयी छत्रे नेजदार । दिवटे
हिलाली सकेकार । बेलदार पखाली ॥ ११४ ॥ जेठी राजगुरू मर्दनी । भाट गुनी-
जन कथनी । गपी चितारी माचगार्णी । भांड शाहीर विनोदी ॥ ११५ ॥ आणीक
हि जे जे असती । ते सांगो विस्तारें किती । जाणते लोक वीद घेती । म्हणोनि
असां ॥ ११६ ॥ ऐन शाहिरू जालें । आता रस्तखाना लिहिजे वहिलें । त्याचा
तपसील पहिलें । इनामति ऐसा ॥ ११७ ॥ त्या हि माजि ऐन इनामति । तपसील
विशेष विस्तारति । ते ही ऐका यथामति । कळतील ते ॥ ११८ ॥ दायिरे किर
वालिंदाचे । मोयिनीखर्च मसीदीचे । तैसे चि देवस्थानाचे । लाहान थोर ॥११९॥
काजी खतीफ मुलाणे । ब्राह्मणाची आग्रहारें व ठिकाणें । लंगर अन्नछत्रें गहनें ।
फकीर आणि तपस्वी ॥ १२० ॥ इनामति जालियावरी । मोईनखर्च अवधारीं ।
सांडी चोळी निवाले कंदोरी । पीरवालीदानी ॥ १२१ ॥ उरूस जात्रा खैराति ।
चारि ईदा मोहीन होती । नागर वसंत पुराणे निरुती । जिकीर आणि हरिकथा
॥ १२२ ॥ ऐसा ऐन रस्तखाना जाला । आतां किल्ले कोट लिहीं वहिला । त्याचा
अनुक्रम पहिला । कोठूनियां ॥ १२३ ॥ त्या ही माजि नामाथिला । आधीं पाहिजे

लिहिला । मुकासा तनखा नेमिला । असेल तैसा ॥१२४॥ इस्ताद् नाना जिनसी । दारू हंगामी गोळी जकीरा ऐसी । मोईन प्रमाणे तयासी । हंगामी च देणें ॥१२५॥ जो हंगामी जिनस आहे । तो हंगामी न पवे पांहे । तो सेवक नोहे । होय ऋणायितें ॥१२६॥ जरि सामान न पावे हंगामी । तरि कोट किल्ले निकामीं । हें जाणोनि सेवाधर्मी । चुकों नये ॥ १२७ ॥ या वेगळी इमारती । ऐवज मोयीन देवविती । तो पावविजे यथानिगुती । तरि काम चाले ॥ १२८ ॥ आणि शाकार वर्षाातें । तें ही चालविलें पाहिजेति । चुंडी वोंडे कांबळे जूंती । कोकणप्रांतें पाहिजे ॥१२९॥ येणे प्रमाणें कोट घडले । किल्ले हि तैसे च वहिले । येवं ऐशिये रीती घडले । कोट आणि किल्ले ॥१३०॥ ऐन रख्तखाना किल्लेहाय । मिळोनि रख्तखाना होय । बाजे खर्चाचें पाहे । सदर दुसरें ॥ १३१ ॥ बकशिसें आणि देहंदगी । दे शूरवर्षासन अनेगी । खैराति उलफे यादगार वेगीं । मालेकरीं - बंदवान ॥ १३२ ॥ गर्क आणि मयत । तैसें चि पाहा हो जळित । लूटि सांडावा अकस्मात । घाला पडे ॥ १३३ ॥ ऐसा नाना प्रकारिचा वेच । त्यासि बोलिजे बाजे खर्च । जरि लिहिजे आहाचवाच । तरि बुडिजे किं ॥ १३४ ॥ बाजेखर्च व रख्तखाना । मिळोनि आकार रुजू दिवाणा । माहालखर्च विचक्षणा । दुसरें सदरीं ॥ १३५ ॥ त्यामध्यें पहिले हुजराति । सुभे संमना लिहिजेति । बदल मुशाहिरे म्हणिजेति । तया तळीं ॥ १३६ ॥ तेथें पहिले नामजादि । वजीर सरदार नानाविधी । मजालसी व अमीन आधीं । असतील ते ल्याहावे ॥ १३७ ॥ यानंतरें माहालमजकूर । संमत अथवा सुभेदार । असेल तो मजमूदार । अनुक्रमे चि ॥ १३८ ॥ दबीर हेजीब फडनिस । दफ्तरदार कारखान्निस । निशिंदे हरकारे पारसानिस । जे जे असती ॥ १३९ ॥ यानंतरें लश्करी । हशम बरवे परी । बाजे नफर अवधारीं । तया तळीं ॥ १४० ॥ ऐसा मुशाहिरा जाला । बाजे खर्च प्रवर्तला । तो तपसील सकळाहूनि आगळा । लिहितां कठिण ॥१४१॥ सदरखर्च पानसुपारी । रोशनायी शायी कागद अवधारीं । हें लिहिजे मोकदरीं । सनद सुद ॥ १४२ ॥ उलफे आणि देहंदगी । खलीति इरसाल कानगी । मजूरी तामेरी अनेगी । तश्रिफा आणि बकशिसें ॥ १४३ ॥ एवं बाजेखर्च मुशाहिरा । दुबाची आकार हुजुरा । दुसरी गैबत्ती अवधारा । ये च रीतीं ॥ १४४ ॥ मामले परगणे तपे कर्याती । असतील तितुक्या लिहिजेति । एकंदर जालियां म्हणति । माहालखर्च ॥ १४५ ॥ माहालखर्च व रुजू दिवाण । मिळोनि सालमजकूर जाण । मीनकबळ दुसरें स्थान । तें ही ऐका ॥ १४६ ॥ कोणीं देशीं ऐशी रीती । पुढील सालिचा वसूल घेती । साल हाली जमा करिती । मुस्तकबल म्हणऊनी ॥ १४७ ॥ तो दस्त साल हालिचा । गुदस्तां जमे जाला साचा । बाद देतां जमेचा । आकार न कळे ॥ १४८ ॥ म्हणोनि दस्तीं जमा धरांवें । मुस्तकबल मीनकबली खर्च ल्याहांवें । सनदेशी रुजू घालावें । गुदस्ताचे ॥ १४९ ॥ ऐसें

जालया सालमजकुर । खर्च बकाया दशाचार । काण लिहिताति लिहिणार । तो ही प्रकार सांगेन ॥ १५० ॥ जाहाजें रवाना होती । तीं दुसरे सालीं येती । यास्तव ते दुसरे सालीं काढिती । खर्च बकाया ॥ १५१ ॥ किंवा खासबाग सेरी । तुकुम खास्तगी परोपरी । उपज नव्हता सालमजकुरीं । खर्च बकाया म्हणती ॥ १५२ ॥ अथवा फाजिलें नफरांची । पुढिले सालीं पडती खर्ची । ते ही खर्च बकायाची । बाब होय ॥ १५३ ॥ खर्च बकाया ऐन बाकी । सालगुदस्तां उरली निकी । तो खर्च बकाया कौतुकीं । येथें लिहिजे ॥ १५४ ॥ खर्च बकाया सालमजकुर मिळोनि जालें समंतमजकूर । मुजाफतीचा प्रकार । तो ही ऐका ॥ १५५ ॥ आपले माहालींचे गेले । दुसरे माहालीं जमा जालें । तें पाहिजे लिहिलें । पहिले सदरीं ॥ १५६ ॥ परमाहालींचे लोक येतां । जातां खर्च होय वाटेशि राहातां । ते ही जाणिजे तत्वता । मुजाफती ॥ १५७ ॥ ऐशी मुजाफती आणि समंत मजकुर । मिळोनि ऐन खर्च सविस्तर । सर्फे अमल येकंदर । दुसरे सदरीं ॥ १५८ ॥ पंधरा बाबा हासील अमली । जमे असेल जैसीं लिहिली । त्याचा अनुक्रमे हाली । सर्फ लिहिजे ॥ १५९ ॥ हासीलअमली जमा जाले । त्यामुळें जें जें खर्चलें । तें तें सर्फे अमलीं लिहिलें । पाहिजे सत्य ॥ १६० ॥ पुनरुक्त किती सांगावें । लिहिणार म्हणाति निसिंदा नव्हे । पालाळ केसिया बोलावें । असो आतां ॥ १६१ ॥ ऐन खर्च आणि सर्फे अमल । मिळोनि घडलें वासिल । निवडोनि गेला अमल । दुर्जय बाकीचा ॥ १६२ ॥ बाबवार जमा वासील । जाणोनि लिहिताति सखोल । नाना निसिंदे म्हणती फोल । त्याविणे चाड काय ॥ १६३ ॥ तैसें व्यापार करिती सहस्रशतें । लिहिणार पांच सात तेथें । अतुळ विद्या जगन्नाथें । दीधली जया॥१६४॥ बाकी उरे तपसीलवार । शिलकी निसबतवार । विषद तो ही प्रकार । जमेसी च आहे ॥ १६५ ॥ जैसी सेना लक्षवरी । परंतु जुझावें तें जुझारीं । येरां पाहवे ना दृष्टिभरी । जवळि राहोनि ॥ १६६ ॥ बाबवार उतरे बाकी । तेथें आधीं जाणिजेस कीं । त्यांत कदीम जदीद नेटकी । कुसरी लिहिजे ॥ १६७ ॥ शिलकी दुतपसील होती । कदीम अवघे चि म्हणती । कारखानेमुळे बाकी उरती । ते दुसरी जाणिजे ॥ १६८ ॥ दोनि तपसील निसबती । नफर आणि विलायती । बाबे साले लेहों म्हणति । न ऌगवे गुंती सर्वथा ॥ १६९ ॥ याकारणें नफर अथवा गांवांतळीं । जे जे बाबेची बाकी उतरली । तेणे चि बाब निसबत उगविली । थोडियामध्यें ॥ १७० ॥ ऐन बाकी खर्च बकाया । बरवी निवड करूनियां । त्याहावें तैं च अपाया । पासूनि सूटिजे ॥ १७१ ॥ रस्कील अथवा कैफती । नस सालेंसाल वोढिती । असेल ने ते कैफती । मना आणिजे ॥ १७२ ॥ सनद घेऊनि हुजरातिचीं । मसलासी करवावी विनतीची । असेल ते बाद करावयाची । तरि करावी ॥ १७३ ॥ अथवा सनद कैफतीची । माहालीं करावी नियमाची । हे रीती बका-

येची । काळांतरीचे ॥१७४॥ आपुलिये कारकीर्दीची । बाकी काढावी नियमाची । तेणेप्रमाणे मोझ्याची । सनद घेयिजे ॥ १७५ ॥ बाकी मोझा सनदवार । कागद घेऊनि करावे तयार । मोहसबियास जे जाणार । ते कैसे असावे ॥ १७६ ॥ सुघड बोलिके कुलवंत । लेखनी निपुण अत्यंत । प्रसिद्ध जे ख्यातिवंत । जिहीं मोहसबे दीधले ॥ १७७ ॥ कदांचित पडतां वाजपूशी । तेथील तेथें चि जाणोनि निरसी । प्रसंग पडतां भूपतीसी । यथोचित्त बोलों जाणे ॥ १७८ ॥ सुरनीस जें जें पुसे । तें तें अवघे सिद्ध असे । केलें असती पहिलें चि ऐसें । कागद जिहीं ॥ १७९ ॥ ऐसा मोहसबा जालिया पाठीं । पारखनिसीची आटाआटी । बोलका तो चि उठाउठीं । निर्गम करी ॥ १८० ॥ धर्मनीतिपारंगत । ते चि पारखनिशी करीत । दुरिकार यथोचित । निवडूनि देती ॥ १८१ ॥ तेणेप्रमाणे निजे जाबता । उसीर कायसा लिहिता । येणेप्रमाणे युक्तिवंता । ठावकें चि आहे ॥ १८२ ॥ ऐशे रीतीने व्यापार करी । तो चि लेखक जाणावा चतुरीं । अपार होतां नाना परी । तो कोण्हा नावरे ॥ १८३ ॥ सांप्रदायिक लिहिणार । ते चि जाणती हे प्रकार । इतरांशि येथिचा विचार । कामा नये ॥ १८४ ॥ चोरी आणि तजकरा । जिहीं केंरण परंपरा । ते येथिचिया विचारा । योग्य नव्हती ॥ १८५ ॥ सन्मार्गें राजसेवन । करावें खाऊन वेतन । तेणे कदापि नव्हे पतन । आणि भय नाहीं ॥ १८६ ॥ चोरी करूनि द्रव्य मेळवणे । येपेक्षां भीक पांच घरें मागणें । सद्विद्या असोनि नीच होणे । चोरीसाटीं ॥ १८७ ॥ चिंतामणी घालूनि कंठीं । चोरीस जाय उठाउठीं । तेथें चिंती ते शेवटीं । साध्य होय ॥ १८८ ॥ तैसें चोरी करूनि द्रव्य मेळवी । तें राजा हरूनि ने सर्वस्वीं । पूर्व संपत्ति जे आघवी । त्या ही सगट ॥ १८९ ॥ लेखन असोनि करी चोरी । तो चि सदांचा भिकारी । दैन्य वदन लाहान थोरी । अवमानिजे ॥ १९० ॥ लांच घेती जयापासुनि । तो सत्ता करी जैं साधनीं । हा तया प्रती उंच वदनी । बोलों न सके ॥ १९१ ॥ ग्रामलोकांचें हे चि मत्त । कारकून जो नवा येत । येक वेळ लांच देत । त्याचे बुध्धी सारिखा ॥१९२॥ तो कारकून जोंवरि असे । तंव कार्यें आपुलीं असोसें । घेऊनि ही अंतरीं नसे । उपकार कांहीं ॥ १९३ ॥ जेव्हां त्याचा हुद्दा फिरला । दुसरा कारकून आला । तो वाजपूशि करता जाला । प्रकट पसारा ॥ १९४ ॥ सात पांच असती घेतले । सांगती वरि देऊनि चिंदुळें । इतुलेनि सहज चि जालें । निसंतान ॥ १९५ ॥ येक कलम खरें होतां । अवघीं लटकी च ये सर्वथां । तिंहीं आरोपिती माथां । शासन सगट ॥ १९६ ॥ सर्वस्व नेती आजन्माचें । तथापि चित्त तृप्त नव्हे त्यांचें । निक्षेप ठेवणे तयाचें । असेल देशांतरीं ॥ १९७ ॥ यास्तव करिती मार । बेडी सगट कारागार । रांडा पोरें दारोदार । अन्नालागि हिंडविती ॥ १९८ ॥ ऐशे रीती जिवें मेला । तरि म्हणती पैका बुडाला । यानें पैका ठेविला । पुत्रालागी ॥ १९९ ॥

जिवें सहित सर्वस्वें जाय । अपकीर्ति लोकोत्तर होय । प्रपंचाशी मकि पाहे । याव- ज्जन्मी न चुके ॥ २०० ॥ येक वेळ चोरी केली । तरि जन्मवरी अवकळा आली । सद्विया वांयां दवडिली । लोभीपणें ॥ २०१ ॥ ऐसें सर्वथा न करावें । केलें वेतन भक्षावें । स्वामिकार्य नीतिनें करावें । यथोचित ॥ २०२ ॥ तितुलेनि आपुलें संसारिक । चालवावें नित्यनैमित्तिक । भला भला म्हणती लोक । याहुनी काय पाहिजे ॥ २०३ ॥ लेखकांसि हे मेस्तक । नीतिवंता नीतिशास्त्र देख । राजकी लोकांसि विवेक । प्रगट करी ॥ २०४ ॥ शिष्य शागीर्दा जीविका । आश्रय चि प्रजादिकां । भांडार हें नृपनायकां । वेचितां न सरे ॥ २०५ ॥ हात जोडोनि शागीर्दासी । विज्ञप्ति केली येकि ऐसी । जतन करा इजतीसी । चोगीशि चित्त नेंदावें ॥ २०६ ॥ तरि च कौशल्य येथिचें । कळेल चातुर्य लेखकाचें । हें बीज कल्पद्रुमाचें । संदेह नांहीं ॥ २०७ ॥ हें मेस्तक केलें जेणें । ऐका तयाचें करणें । राजसेवा मान्यपणें । उदंड दिवस केली ॥ २०८ ॥ हुदे केले मजमूचे । सात पांच नियमाचे । तर्पे दोनि नृपातिचे । वेतन भक्षिलें ॥ २०९ ॥ वेतना विरहित रुका । तो शिवस्व मानिला देखा । तजकरा कैसा तो ठाउका । मुळीं च नांहीं ॥ २१० ॥ सात पांच शागीर्द केले । ते यथामतीनें लीहों शिकविले । ते ही प्रसिद्ध ख्यातिवंत जाले । आपुलेनि प्रसादें ॥ २११ ॥ लेखणी दिधली ज्याचे हातीं । तो स्वीकारिला सरस्वती । लेखनकळा वर्षा आरती । साधली तया ॥ २१२ ॥ आतां ही जे आत्ता धरिती । येणे प्रमाणें लिहिती । त्यांसि पावेल सरस्वती । संदेह नांहीं ॥ २१३ ॥ विशेष बोलावी वित्पत्ति । लोक मानिती आत्मस्तुती । तरि लेखन अपार माझी कीर्ती । बुद्धि तेथें ॥ २१४ ॥ परंतु जें रीतीसारिखें । जें बोलिलों साचें लटिकें । तें परिसोनि नेटकें । मना आणावें ॥ २१५ ॥ गुरूनें जें शिकविलें । शतसहस्र उपतिष्ठलें । तद्नरूप ऐसें बोलिलें । शागिर्दा प्रती ॥ २१६ ॥ अनंत बोलतां अनंत रीती । अनंत विद्या अनंत मती । अनंत कळा अनंत शक्ती । बुध्धीस कैंची ॥ २१७ ॥ न्यून पूर्ण तें करावें । शिष्यशागिर्दा उपदेशावें । अधीक तें परतें सारावें । जरि युक्ति दिसेल ॥ २१८ ॥ वारंवार विनति हे चि । उभारणी मेस्तकाची । होय कृपा सरस्वतीची । प्रकट जालियां ॥ २१९ ॥ केला साष्टांग नमस्कार । लेखकजनाशि जोडुनि कर । त्यांचे कृपेने सविस्तर । ग्रंथ संपला ॥२२०॥

॥ इति श्रीमत् हेमाद्रिपंडितलेखनपिशाचलीपिकान्वितसेवनलेखनकौशल्यव्यापारांगभूतप्रचारानुरूप मेस्तकपरिभाषानामग्रंथ समाप्त ॥

॥ ग्रंथसंख्या लिखिते ॥

| | | | |
|---|---|---|---|
| मंगळाचरण | २५ | संस्कृत श्लोक | ४ |
| लेखनपरिक्षा | २३ | भारतीचा | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| कौशल्यविधि | १०६ | भतृहरीचे | १ |
| लेखनाधिकार | १२२ | किरातचा | १ |
| जमे लेखनविधि | २२४ | | |
| वासीलबाकी | २२१ | | |

एकून संख्या ७२१

॥ इदं पुस्तकं लिखिते शके १६६७ क्रोधन नाम संवत्सरे आषाढशुद्ध येकादसो भृगुवासर गणेशात्मजमहादेवेन लिखितं मसूरस्थः ग्रामलेखकार्गार्णिकः ॥ छ ॥

॥ मेस्तक संपूर्णमस्तु ॥

## १२ शक १५९१ मधील एक महजर

( लेखक—रा. रा. गं. ना. मुजुमदार )

)[१]

फारसी मजकूर

द॥[२] नारोजी सुर्याजी देसपांडिये प्र॥ मजकूर दसकत माहादाजी देसमुषे[३]

सके १५९१ सौम्य नाम संवत्सरे[४] जेष्टे[५] श्रुध[६] सप्तमी वार श्रुक्रवार ते दिवँसी मीरीसीपत्र[७] त्रिंबक[८] जोसी बिन मोरजोसी कसबे[१०] भींगार हवेली[११] अहमदनगर यांसी

| मोकदम | चोगुले |
|---|---|
| १ अनसोजी बिन नागोजी पाा[१२]टील गुरव मोा[१३] | १ लखमजी बिन म्हळोजी गोदळ |
| १ जाऊजी बिन काळोजी बाहसेर मो॥ | १ गोविंदे[१४] बिन सखाजी काळा |
| १ एसाजी बिन जाखोजी काळे मो॥ | १ दिपाजी बिन बगेजी[१५] काळा |

१ अलीफ. हें अक्षर मंगलार्थी फारसी लेखांत संस्कृत. श्रीप्रमाणें मथळ्यावर लिहितात. २ दसकत = द॥. ३ ष = ख. ४ रे वे सारखा काढला आहे. ५ जे=ज्ये; ष्ट = ष्ठ. ६ शु श्रु सारखा लेखक काढितो. ७ ह्या मोडी लेखांत सर्व अक्षरें दीर्घ आहेत. पैकीं सध्यांच्या लेखनपद्धतिप्रमाणें तीं तीं प्रायः अक्षरें ऱ्हस्व दीर्घ छापिलीं आहेत. कारण मोडीमध्यें प्रायः ऱ्हस्व वेलांटी क्वचितच येते. ८ समास. ९ अनुस्वार दिला नाहीं. १० कसबा इ भिंगार = भिंगारचा कसबा. ११ इजाफत. १२ प ला दोन काने दिले आहेत. १३ मोकदम = मो. १४ वि वर अनुस्वार नाहीं १५ गो असावा. परंतु मूळांत गे स्वच्छ आहे.

व समस्त दाहीजन मौजे कवीठे पा[16] नीवास[17] सा[18] अहमदनगर सुबे खुद[19]स्तेबुंनियाद मिरासपत्र लेहोन दिधले ऐसे जे मौजे मजकुरीचे कुळकर्ण तुम्हा पासुन रुप[20] ६०१ ससे एक घेऊन विकत दिधळे असे तुम्ही लेकुरांचे लेकुरी[21] कुळकर्ण खाने आपळे गांवी कुळकर्णी मिरासदारी[22] होता तो दुकळी[23] काळे बुडाला त्याचा कोण्ही वारीसदार नाही मग गावास नातवाणी जाली त्या मुळ आपण तुम्हास विकत दिधळ असें सानीने[25]-हाल कोण्ही उभा राहेळ त्यास आपण समजाउ तुम्हासी समंध लागो न देऊ तुम्ही कुळकर्ण मिरासी लेकुराचे लेकुरी अर्जानी[26] करणे कोणे बाबे शक न धरणे घर व वाडी बा। नरसोजी ताकिया गतकुळ त्याचे बुडाले आहे ते देखील अडतेही[28] मिरासी करून दिधले असे यास हिलाहरकिती जो करीळ त्यास आपण वारू तुम्ही आपळा हक व मुशाहरा व तेल व जोडा व चवाले वगौरे[29] हक घेत जाणे यास आपण बेईमानी करूनें[30] तरी आपल्या पूर्वजाची व कुळश्वामीची आण असे हे मिरासपत्र लिहुन दिधले सही अधी पैका घेतळे मग महजर लेहून दिधळे हे सही

तेरीख छ० ५ माहे मोहरम
सन १०७९ हिजरी सन १०८०
मुताबिक सन १२

निशानी नागर
( चित्र नांगराचें )
विकलम जनार्दन यादव कुळे[31]-
र्णी मौजे चाद प॥ मजकूर

गौही

साक्षी आउभट खरवंडीकर मूळे । भोजजी मोकदम मौजे चांदे । मल्हारजी पटारा चौगुला मौजे चांदे । एसाजी डांकिया मौजे चांदे । बि॥ नागोजी कुलकर्णी मौजे चांदे । एसाजी वलद संताजी हिगना मौजे मजकुर । सटवाजी बिन रतन पाटील बेरड का॥ भिंगार प्र॥ हवेली अमधनगर । सभाजी व॥ तुलसोजी काले । सवाजी व॥ लखमजी । परसोजी व॥ जाउजी मुले मौजे सिराल । सितोजी बिन कान्होजी सुतार मौजे मजकूर । नागोजी मोकदम व समस्त दाही जन मौजे सिंगवे तुकाईचे । यादवभट बिन नागभट मुळे मौजे म॥ । सितोजी सुतार बिन सान + सुतार मौजे म॥ । बुवाजी गुरव राउत फड राजजी मोकदम मौजे चादे १ । विठोजी सेटिया मौजे चादे १ । बापुजी डाकिया मौजे चादे १ । एमाजी दहतोजी मौजे चांदे १ । कान गावडा व॥ जेबगावडा । कृस्णाजी मोकदम

---

१६ परगणा = पा. १७ नीवास = नेवासें. १८ सरकार = सा. १९ खु० = औरंगावाद. २० रुप = रुपये. २१ ल व ळ ह्या अक्षरांचा उच्चार लेखक एक च करतो. २२ र हवा. २३ दुकळा ही षष्टी. २४ का वर मात्रा पाहिजे. २५ अन्य वेळीं, भविष्य काळीं, पुढें. २६ अर्जानी करणे = अनुभविणें. २७ बेशमी. २८ अडतेही = अळुतेही. २९ वगैर बद्दल वगौर काढला आहे. ३० करून = करूं. येथें अनुनासिकाबद्दल न स्पष्ट लिहिला आहे. ३१ क लिहिला नाही.

८

कसबे मिरी वृत्तीकार । पेम नाईक व॥ जाख नाईक माहार मौजे म॥ । भंडारनाक १। तुलनाक १ बगाऊ मौजे म॥ । संता माग मौजे म॥ । बाद मेहतर चाभार मोकदम व बालोजी झिंपुर्डे मौजे राजन गौ प्र॥ सेवगौ । बि॥ बालाजी कुलकर्नी मौजे म॥ । तुकोजी पाटील मोकदम मौजे बुन्हाणपुर । काऊजी नाईकवडी व लाडजी नाईकवडी प्र॥ नेवासे । सेकोजी अहीर मोकदम मौजे म्हालसे पिपलगौ । बि॥ गोविंध भुतो कुलकर्नी मौजे म॥ । नरसोजी मोकदम मौजे करज गौउ । खडसेट व॥ जानसेट मौजे पेडगांव । ब्रह्मनी व॥ राउजी । मालजी व॥ रभाजी ढवले । जमालखां मुल्लां खिजमत पीर दावल । जाख वरटा परीट । राय माहाला वरीक

सदरहु समाकुळ मौजे मजकुर वगौर कुळकर्णाचा हक सुदामत प्रमान यासी मुकरार केळ असे.

ब॥ त॥— मुशारा गला दर चावरी मन पका १ एकून २॥ ४ अडीच खडी च्यार मन अकी दोन खडी चौदा मन व नगद दर चावरी रुपय एक एकन रुपय ५४ चौपन करार सुदामत आहे तेन प्रमा तुम्ही खात जान या सिवाय हुरडा व निबूर व वावरपेंढी व गाडेवाहनी व सलई देखील वानवळ व चाभारा जोडा व तेलियाच तेळ सेर बारा ६।२ व साळ व कोस्टी व ताबोळ व माळ व धनगर व वानी व सिपी व सोनार व कासार वगैर जो का काही जिनस होत जाईल तो सिर-स्तावमोजीब घेतने यास कोन्ही नवदिगर करील त्यास आपलेया पूर्वजाची आनी असे आनी आपले कुळस्वामीची आण असें हे महजर लिहिले सही.

☞ या महजरांतील फारसी मजकुराखालीं शिक्के नसल्यामुळें प्रस्तुत महजर अस्सल नसून नकल असावी असें मानण्याकडे मनाचा कल होतो. नकल पुष्कळ जुनी आहे. सहरहु महजरांत पूर्वीच्या वतनदार लेकांच्या चमत्कारिक हक्कबाबींचा उल्लेख झाला असल्यामुळें त्या दृष्टीनें हि महजर विचारार्ह आहे. रा. विनायक गोविंद कस्तुरे कुळकर्णी मौजे कवठे ता॰ नेवासें जि॰ अहमदनगर यांजकडे प्रस्तुत महज-राच्या आणखी दोन नकला मिळाल्या. त्या माझे संग्रहीं आहेत.

## १३ नागेश कवीचा काल

( लेखक—रा. वि. ल. भावे )

१. श्री. मुजुमदार यांनीं वाचलेल्या शक १५९१ मधील महजरांत मिरा-सवतन घेणारा त्रिंबक जोशी बीन मोरजोशी हा ' सीतास्वयंवर ' ' चंद्रावळी-वर्णन ' वगैरे यमकबद्ध काव्यें लिहिणाऱ्या नागेश कवीचा वडील भाऊ होय. मोरजो-शास पुत्र तीन. थोरला मल्हारी, मधला हें वतन घेणारा त्रिंबक व धाकटा मराठी कवि नागेश.

२. हें पत्र अथवा हा महजर शके १५९१ मधील आहे, हें त्यावरून उघड आहे. नागेश कवि हा याच्द काळीं विद्यमान होता हें उघड आहे.

३. ' महाराष्ट्रकवींत ' छापलेलें सीतास्वयंवर ज्या प्रतीवरून घेतलें ती प्रत शके १६१६ मधली आहे. म्हणजे नागेशाच्या हयातींत च किंवा हयातीनंतर लगेच ही प्रत केली गेली असावी असें दिसतें.

४. इतके दिवस या कविचा काळ अनिश्चित होता. परंतु आतां शके १६०० असा तो मानण्यास हरकत दिसत नाहीं. नागेशानें आपल्या काव्यांत उल्लेखिलेला कोकाच्या यशवंतराव हा हि या च सुमारास होता असें दिसतें.

## १४ शिवदिनकेसरीचें एक पद

( लेखक-रा. द. वा. पोतदार )

आजि तुम्ही ऐका । सखा सोहदर म्हणजे पैका ॥ धृ० ॥ पैका पदार्थी चढवीतो। पैका न घडल तें घडवितो। पैका सखेत्व तोडितो । आप्त लोका ॥ आजि० ॥ १ ॥ पैका मायेचें मुळ जीव । पैक्या पासुन भक्तदेव । आनंद करीती मोहोछाव । लाउन पताका ॥ आजि० २ ॥ पैका साधनाचें सार । पैका सींह्याचें जीव्हार । पैका चालवि राजदरबार । करुन मुद्रिका ॥ आजि० ॥ ३ ॥ शीवदिन म्हणे केशरीनाथा । ऐक पैक्याची हे कथा । इंद्रचंद्र ब्रह्मादिका । आवडे लोका ॥ आजि० ॥ ४ ॥

' काव्यसंग्रह ' द्वारा शिवदिनकेसरीचीं ४० पदें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांत हें नाहीं. शिवदिनकेसरीची चांगली कविता अद्याप बरीच अप्रकाशित आहे.

## १५ व्यंकटेश कवि

( लेखक- रा. द. वा. पोतदार )

शेवटील विसाव्या श्लोकावरून ' प्रख्यात शिवभक्त राघवसुताच्या आज्ञेवरून व्यंकटेश कवी हें काव्य रचिता झाला ' या पलीकडे त्याची जास्त माहिती कळत नाहीं. हा राघवसुत कोण ? बाजीराव रघुनाथ असेल काय ? रा. भाव्यांच्या यादींत व्यंकट कवि आहे. परंतु सदर काव्याचा उल्लेख नाहीं. नारायण पंडित कोण ?

॥ श्रीगणेशायनमः ॥

श्लोकपत्रिका प्रत्योत्तर कृष्णाचे रुक्मिणीसः—

वंदूनियां हरिपदांबुरुहास आर्यी । जें सेविल्या हरति सर्व हि अंतराधि । प्रत्योत्तरार्थ रचना करुं माधवाची । तो धन्य जो परमभाव धरूनि वाची ॥ १ ॥ वाचूनि रुक्मिणिचिया वरपत्रिकेला । प्रत्योत्तरार्थ रचना मग येत केला । घालूनि केशररसां मणिहेमपात्रीं । कृष्णे येथार्थ लिहिली तिस दिव्य पत्रि ॥ २ ॥ तों जे प्रिये लिहियले शुशुपाळ आला । त्या लागि साह्य मगदाधिप सिद्ध जाला । बंधु म्हणे मज तयासि च सत्य द्यावें । जिंकोनि त्यास सदया मज शीघ्र न्यावें ॥ ३ ॥ आश्चर्य हेंचि गमले मज राजकन्ये । हा आर्थ काय घडतो सुरलोकमान्ये । माझा तुझा सहज योग अनादि आहे । हा अर्थ तूं स्वहृदईं समजोनि पाहे ॥ ४ ॥ मारी जसा मृगपती मृगसावकातें । तैसा वधीन शुसुपाळ ससैन्य हातें । जे चैद्यमागधनृपादिक अ नि त्रपाते । मारीन मी न लवतां नयनार्धपातें ॥ ५ ॥ उत्पात्तिपालनलयास हि तूं करीसी । ब्रह्मादिकां सुरवरां सुख पाववीसी । वृत्तांत हा निज पुरातन ऐक देवी । व्यासादिकीं कथियला बरवा सदेवी ॥ ६ ॥ जालों जईं उदधिच्या च जळांत मासा । होतीसि तूं श्रुतिमुखीं घडला तमासा । संखासुरें तईं समग्र हि वेद नेला । त्याला वधूनि हरिलें सुरवेदनेला ॥ ७ ॥ केली जळांत जइ आकृति कासवाची । संपत्य काढुनि दिल्ही तइ वासवाची । जालीसि तूं क्षिति तईं मग राजवर्या । त्या वर्णिली विमळ त्याप्रति आत्मचर्या ॥ ८ ॥ जालो वराहतनु यज्ञ मही विराजे । तै दक्षणा धरणि हे तुज नाम साजे । म्या मारिला दैत्यधुरीण जेव्हां । तो स्थापिले सनिमगागम धर्म तेव्हां ॥ ९ ॥ जालें नृसिंह परमाद्भुत रूप माझें । तेव्हां जया म्हणुनि बोलति नाम तूझें । तैं त्या हिरण्यकश्यप क्षितिकंटकातें । संव्हारुनि पद दिल्हें सुरनायकातें ॥ १० ॥ होऊनि वामन बळिप्रति भूमि थोडी । मागें तईं चरण अंडकटाह फोडी । तेथूनियां प्रगटली सुरनिम्नगा ती । तैं तूज वेदवति नाम मुनींद्र गाती ॥ ११ ॥ जालों जईं परशराम महाप्रतापी । तेव्हां धरा असिसि आश्रय विश्वरूपी । त्री सप्तवार नृप जिंकुनि कार्तवीर्या । मारूनि सर्व मग रक्षिली धर्मचर्या ॥ १२ ॥ जालों जईं दशरथात्मज राम लोकीं । सीता असे सकळ लोक तुतें विलोकी । मारूनि रावण सबांधव तूज आणी । आतां तशी च पुरवीन तुझी सिराणी ॥ १३ ॥ मी कृष्ण यादव आलि नृप भीमपुत्री । तूं रुक्मिणी वरिन सत्वर वो सुनेत्री । सोळा सहस्र शत येक हि आठ रामा । तूझ्या कला वरिन सर्व मनोभिरामा ॥ १४ ॥ होईन बोध्य तईं नाम दयाख्य तूझें । मोहूनि दैत्य हरुं सर्व अधर्म वोझें । मी कल्कि नाम विजया म्हणतील तूतें । मारीन दुष्ट यवना अवघ्या रिपूतें ॥ १५ ॥ मी विष्णु हे रमा तूं कमळभुवन मी शारदा नाम ते तूं । मी शंभू पार्वती तूं सुरपति म्हण मी जे सची मुख्य ते तूं । मी चंडांश प्रभा तूं हिमकर तव मी रम्य हे चंद्रिका तूं । मी पाथोनाथ गौरी तुज जन म्हणती मीं यमः शामळा तूं ॥ १६ ॥ यज्ञीं स्वाहा

असी तूं धनद सि म्हणवी जे महारिद्धि ते तूं । वेदव्यासीं श्रुती तूं परम सुकविता वाल्मीकिमार्जि ते तूं । सेनानी मी चमू तूं रुषभ मि सहजे जे दयामूर्ति ते तूं । ऐशा योगा पहा तूं नृपवर तनये व्यग्र जालीसि कां तूं ॥ १७ ॥ विघ्नेसी सिद्धि ते तूं कपिल मुनिवरीं योगसिद्धि असी तूं । ? द्रति ज्ञानप्रदा तूं नरपतिवर मी कीर्ति विख्यात ते तूं । ब्रह्मीं चिच्छक्ति ते तूं तुज मज सहसा, तूं नको भेद चिंतूं । + आलों वरी तूं त्वरित सुनयने कृष्ण मी नोवरी तूं ॥ १८ ॥ ऐसी पुढें पाठविली सुपत्रि । आनंद पूर्ण मग वाचितसे सुनेत्रि । उत्कंठिता परम होउनि मार्ग लक्षी । तो पावला कमललोचन सर्व-साक्षी ॥ १९ ॥ श्रीमद्विष्णुपुराणभाव हृदईं आणूनियां नेटका । हे नारायणपंडितीं करविली श्रीकृष्णसत्पत्रिका । जेव्हां श्रीशिवभक्त राघवसुत प्रख्यात आज्ञा करी । तेव्हां हें कवि व्यंकटेश रचिता हे चालिली वैखरी ॥ २० ॥

## १६ चांगदेवाचा एक अप्रसिद्ध अभंग

( लेखक—रा. द. वा. पोतदार )

बा सखीये सांगातिणी । कांडू दोघी जणी । बारा सोळा जणी । मिळोनिया ॥ १ ॥ देह हें उखळ । मन हें मुसळ । कांडीले तांदूळ । विवेकाचे ॥ २ ॥ प्रकृति हांडी आधण ठेवीलें । ईंधण जाळीलें । कामक्रोध ॥ ३ ॥ मदनाचा कढ देतो वेळो-वेळा । चढ़ हातो । जवळी ? सबधीर ॥ ४ ॥ अंबृताचें ताट । करूनिया चोखट । पाहुणा बरवंट । आत्माराम ॥ ५ ॥ चांगदेव म्हणे । भळी चो मुक्ताबाई । ज्ञानाचिये सोये । दाखविली ॥ ६ ॥ ७ ॥

हा चांगदेव चांगा वटेश्वर होय हें ६ व्या चरणावरून उघड आहे.

## १७ शाहुमहाराजांनीं दिलेली एक सनद

( लेखक—रा. द. वा. पोतदार )

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ६५ कालयुक्त नाम संवत्सरे फाल्गुन सुध दशमी भृगुवासरे क्षत्रीये कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपती स्वामी याणी राजमान्यराजश्री बापुजी श्रीपत यांसि आज्ञा केली ऐसी जे राजश्री शंकराजी भानगीरे हवालदार रत्न-शाला यांचे मीरासीचें सेत मौजे हडपसर ता हवलां पुणे या गावी आहे तें सेत देश-मुख ता हवली मा याणी व गांवकऱ्याने दुसऱ्या कुणब्यास वतन करून दिल्हें आहे म्हणून विदित जालें तरी हे गोष्ट त्यांस करावयास गरज काय तरी तुम्ही पंचाईत

मेलवून पंचाईताचे मतें यांचे सेत यांचे दुमाला करणे पुढें मागे याच्या सेतास काही कुसुर न होये ते गोष्ट करणे मारनिल्हे हुजुर स्वामीसंनिध निष्ठेने सेवा करितात यांचे स्वामीस अगत्य आहे तुम्ही अगत्य धरून येविसी साहेता करून यांचे सेत यांचे स्वाधीन होऊन ये ते गोष्ट कर्णे *जाणीजे बहुत काय लिहिणे

मर्यादेयं
विराजते

सुरु सुद बार. समत सुद बार.

* येथून पुढें खाशांचें अक्षर.

मोडकांचे जंत्रीवरून शक १६६० फाल्गुन शु. १० स गुरुवार येतो. शुक्रवार युत नाहीं. सनद मात्र अस्सल आहे.

## १८ "कर्मविपाका"चा कर्ता
## अमृत जयानंद

( लेखक—रा. द. वा. पोतदार )

( १ ) शके १८१६ त मुंबईस रा. या. ल. पाठक यांनीं ' कर्मविपाक ' या नांवाचा एक २४८ ओव्यांचा ग्रंथ छापून प्रसिद्ध केला. परंतु त्यांत ग्रंथकर्त्याचें नांव नाहीं. एका बाडांत याच ग्रंथाचा शेवटचा निमा अधिक भाग मला आढळला. त्यांत या कवीचें नांव अमृत जयानंद असें आढळलें. नांव या पूर्वी कधीं हि कोठें ऐकिलेलें नाहीं. छापील प्रतींतील ३० ओव्या लेखी प्रतींत नाहींत व लेखी प्रतींतील शेवटच्या ११ ओव्या छापील प्रतींत नाहींत. पाठभेद हि आहेत. मासल्याकरितां एकच देतो.

ज्याणीं वेदशास्त्र चोरिलें । जातीसीं सांगतां भीड करूं लागले । ते पिंगळे होवोनि जन्मले । पाप न खंडे तयाचें ॥ १६७ ॥ छा. प्र.

लेखी प्रतींतील ही च ओवी येणेंप्रमाणें:—

जेणें वेदशास्त्र चोरिलें । ज्योतिष सांगतां भीड धरुनि बोले । ते पिंगळे होउनी जन्मले । पाप न खंडे तयाचे ॥ १६९ ॥ ले. प्र. कर्मविपाक.

दुसराच पाठ उघडाउघडीं खरा आहे.

( २ ) या नांवाचा ग्रंथ संस्कृतांत आहे. त्याचा च तर्जुमा आपण केला असें अमृत जयानंद स्वतःच लिहितो. खालील ओव्या पहाः—

संस्कृताचें महाराष्ट्र करितां । काणा मात्रा गेला असेल अवचिता । कर जोडुनी प्रणिपात करितों आतां । हें मज करावें क्षमा ॥ २२५ ॥ साधु सज्जन मुनि-

जन । श्रोते येत संत सज्जन । आतां वंदितों तुमचें चरण । केलें कथन तुमच्या प्रसादें ॥ २२६ ॥ जाणतां नेणतां विस्तारिलें ग्रंथा । महाराष्ट्र म्हणोनिया श्रोता । न ठेविजे (?) लकार ॥ २२७ ॥ हरीहर संवाद । शिव उपदेशी गोविंद । म्हणे अमृत जयानंद । महाराष्ट्र करुनियां ॥ २२८ ॥ इति श्री कर्मविपाककथा । शिवे सांगितली अनंता । हा ग्रंथ अवलोकितां । नाठवे विशय ॥ २२९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ छ॥छ॥

( ३ ) अमृत जयानंद नांव नवेंच आहे. यापेक्षां अधिक कांहीं माहिती आज नाहीं.

# १९ दोन देवदास

( लेखक-रा. द. वा. पोतदार )

देवदास ( देविदास ? ) कवीचें ' व्यंकटेशस्तोत्र ' महाराष्ट्रांतील आबालवृद्धांच्या नित्यपाठांतलें आहे. या च कवीचें एक ' संतमालिका ' नांवाचें दुसरें स्तोत्र रा. राजवाडे यांनीं कांहीं वर्षांपूर्वी ' ग्रंथमालें'तू'न प्रसिद्ध केलें होतें. त्यावर, रा. पांगारकर यांनीं ' केसरीं'त एक लेख लिहून त्यांत देवदास कवीनें केलेले ५०० हिंदुस्थानी श्लोक आपणांस मिळाले असल्याचें प्रसिद्ध केलें. वरील स्तोत्रद्वयाचा कर्ता हाच या श्लोकांचा हि पण रचयिता असावा अशी रा. पांगारकर यांची अर्थातच समजूत. पुढें ' समर्थांची कविता खंड १ ला ' या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत धुळ्याचे रा. शंकरराव देव यांनीं समर्थशिष्य ' दादेगांव ' मठाधिपती ' देवदास ' यांच्याबद्दल कांहीं माहिती प्रसिद्ध केली. या माहितींत दोन महत्वाच्या गोष्टी रा. देव यांनीं नमूद केल्या आहेत. ( १ ) ' निजामशाही डळमळीत करण्यास यांचे प्रयत्न बरेच कारणीभूत झाले असावेत असें दिसतें. ' ( पृ. ३५ ) व ( २ ) व्यंकटेशस्तोत्राचा कर्ता व दादेगांवमठाचे मूळ संस्थापक समर्थशिष्य देवदास ह्या अगदीं भिन्न व्यक्ति होत, अशी दादेगांवच्या विद्यमान मठाधिपतींची परंपरागत माहिती. ( पृ. ३६. )

आतां रा. राजवाडे यांनीं आपल्या देवदासावरील निबंधांत संतमालिकेचा काल शके १६०८ हा अगदीं नक्की केला आहे.

निजामशाही इ. स. १६३७ त नामशेष झाली. तिला डळमळीत करण्यास झटणारा दादेगांवकर देवदास अर्थातच ३०।४० वर्षांपूर्वी म्हणजे इ. स. १६०० च्या सुमारासच जन्मला असला पाहिजे. संतमालिका रचिली गेली इ. स. १६८६ त. म्हणजे दादेगांवकर देवदासानें च जर संतमालिका रचिली म्हणावें तर त्यावेळी तो ८६ वर्षांचा जख्खड म्हातारा असला पाहिजे असें मानावें लागतें. इसकी हयात

बळकट प्रमाणावाचून मानणें कधीं हि रास्त होणार नाहीं. तेव्हां दोन देवदास मानण्याकडे च चिकित्सकाची साहजिक प्रवृत्ति होते.

ह्या बाह्य प्रमाणाला विद्यमान मठपतींच्या परंपरागत माहितीची हि जोड मिळून बळकटी येते.

बाह्य प्रमाणांपेक्षां आंतर प्रमाणाची योग्यता फारच मोठी. तशीं दोन आंतर प्रमाणें हि प्रस्तुत प्रकरणीं मिळतात. एकः—संतमालिकेची एक पोथी रा. पांगारकर 'मुमुक्षु' कर्ते यांचे पाशीं आहे. तिच्या शेवटीं असा उल्लेख आहे:—

"ईति श्री करुणांमृत चैतन्यांकित देविदासांकृत संतमालिका ग्रंथ संपुर्णमस्तु" इ. त्याचप्रमाणें धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहीं सदरहू संतमालिकेची एक प्रत आहे. या 'डोमगांव अंक १८' प्रतीच्या शेवटीं हि "चैतन्यांकित देवदासकृत' असा स्पष्ट निर्देश आहे. याचा अर्थ असा कीं सदर संतमालिका करणारा देवदास कोणा "चैतन्या" चा अंकित म्हणजे शिष्य आहे.

ही गोष्ट ध्यानांत घेऊन संतमालिका व व्यंकटेशस्तोत्र ह्या दोन स्तोत्रांकडे नजर फेंकली तर त्यांतील खालील ओव्यांचें वैशिष्टय लक्षांत आल्यावांचून राहाणार नाहीं. आजपर्यंत हें वैशिष्टय कोणाच्या ध्यानांत आलेलें दिसत नाहीं.

संतमालिकेंतील १३४ वी ओवी अशी आहे:—

ऐसा करुणावचेनी देविदास। प्रार्थिला सावळा जगदेश। वोतला चैतन्येकृपेचा सौरस। सुखसंतोष पैं केळा ॥ १३४ ॥

त्याचप्रमाणें व्यंकटेश स्तोत्रांतील १०१ वी ओवी अशी:—

श्रीचैतन्यकृपा अलोलीक। संतोषोनि वैकुंठनायक। वर दिधला अलोलिक। जेणें सुख सकळासी ॥ १०१ ॥

वरील दोन्ही ओव्यांतून ज्या चैतन्यकृपेचा उल्लेख आला आहे त्यांतील चैतन्य शब्द गुरुवाचक आहे.

हा चैतन्यदेवदासांचा गुरुशिष्यसंबंध दृढ करणारें आणखी एक प्रमाण येथें नमूद करतों. चैतन्य आडनांवाचे एक कौनीस गोत्री यजुर्वेदी गृहस्थ माझे मित्र आहेत. त्यांचें कुलदैवत गिरीचा व्यंकोबा आहे; आणि चैतन्यशिष्य देवदासांचे हि कुलदैवत गिरीचा व्यंकोबा च. तेव्हां हा संबंध एकंदरींत योग्य व स्वाभाविक च ठरतो.

भाषा, विषय, इत्यादिकांचा विचार केला तरी हि वरील अनुमानें च दृढ होतात. व्यंकटेशस्तोत्र व संतमालिका यांतील भाषादिकांचें साम्य तर इतकें ठळठळीत आहे कीं, त्यावरून दोन्ही स्तोत्रें रचणारा कवि एकच असावा हें कोणास हि

कळून येतें. देवदास कवीचीं जीं पांचशें हिंदुस्थानी कविता रा. पांगारकर यांस मिळाली आहे त्यांत ठिकठिकाणीं मुसुलमानांवर केलेला कडाखा पाहिला म्हणजे तो समर्थांच्या च शिष्याला शोभण्यासारखा आहे असें दिसून येतें व सदर देवदास म्हणजे दादेगांवकर च असें अनुमान निःशंक करतां येतें.

( रा. पांगारकर यांनीं आपल्या देवदासावरील केसरींतील लेखांत कांहीं श्लोक नमुन्या करतां दिले आहेत. )

तात्पर्यः– ( १ ) देवदासैक्य मानल्यास कवीची धरावी लागणारी फाजील मोठी हयात,

( २ ) विद्यमान मठपतींची माहिती,

( ३ ) 'चैतन्यांकित' असा स्पष्ट अंतिमोल्लेख,

( ४ ) 'चैतन्यकृपे'चा दोन्ही स्तोत्रांतील उल्लेख,

( ५ ) चैतन्यांचा व गिरीच्या व्यंकोबाचा संबंध,

( ६ ) भाषा, विषय इत्यादिकांचा विचार—

ह्या सहा हि प्रमाणांवरून स्तोत्रद्वयांचा कर्ता देवदास निराळा व दादेगांवकर देवदास निराळा असा सिद्धांत ठरतो. स्तोत्रकर्ता देवदास चैतन्यसांप्रदायी व दादेगांवकर देवदास समर्थसांप्रदायी. दादेगांवकर देवदास अगोदर होऊन गेलेला ( म्हणजे अजमासें शके १५३० पासून शके १५७० पर्यंत ) व चैतन्यशिष्य देवदास मागाहून झालेला. ( शके १५८० पासून १६२० पर्यंत ) याप्रमाणें निष्कर्ष निघतो.

स्तोत्रकर्त्या कवीचें नांव देविदास असें सांप्रत प्रचलित आहे. परंतु पोथ्यांतील नामनिर्देशांवरून देवदास हेंच नांव ग्राह्य धरावेंसें वाटतें.

'आपचंद मठांतील बाड १९ यांत' उपलब्ध झालेलें खालील पद रा. शंकरराव देव यांजकडून आलें आहे तें येथें देतों.

## पद

कोण मला सोडवील प्राणसंकटीं । स्वगणगोत कोण्हि कामा न येति शेवटीं । दोष पाहुनिया काळ सत्वर चि कुटी । व्यर्थ वेंचिलें म्यां वय विषयराहटीं ॥ ध्रु० ॥ दुष्ट नष्ट शठ अभक्त । शौचहीन खळ अदत्त । धर्मन्यायनीतिरहित । परधनास परवधूस परम सक्त पतित मी स्वयें । अभाग्य ये क्षितितळांत मी च निश्चयें । पापकुंभनित्र सदा सर्व संशये । स्वरूपशुद्धि नेणतां मि मंद अतिशये ॥ १ ॥ लागतां अपाय घात । दचकलों पडे निवांत । हाय म्हणुनि तळमळत । रडत पडत मूर्ख प्राणि हानि जालि होय घाविरा । स्त्रीसुतादि नित्य नित्य करिति करकरा । पतित मी च पापरूप वेंचलों खरा । वोढवल्या दुःख निकट वदत हरिहरा ॥२॥ नादरिला संतसंग । निंदिल श्री-

गुरुरंग। संतवृंद अंतरंग। छलुनि वळुनि दूषिला मि म्हणुनि दुःख पावलों असो। रात्रि-दिवस श्रमुनि भ्रमुनि व्यर्थ फिरतसे। अणु हि सुकृत पुण्य स्वयें जोडिलें नसे। देवदास अंकित संत वदत मम पिसे ॥ ३ ॥ कोण मला सोडवील प्राणसंकटीं ॥

* जनार्दन रामचंद्रजीकृत कविचरित्रांत (शके १७८२; पृ. १७९ वर) करुणामृतस्तोत्र व संतमालिका अशी दोन भिन्न स्तोत्रें देवीदासानें केल्यानें लिहिलें आहे. तें अर्थातच निराधार असून वरील अनेक उल्लेखांवरून या 'संतमालिकेला'च 'करुणामृत' स्तोत्र हें नांव कवीनें दिल्याचें उघड आहे.

## २० बहिरा जातवेद-कृत

### भागवत दशमस्कन्धावर प्राकृत ओवबिद्ध टीका

(लेखक—रा. द. वा. पोतदार)

१ या अप्रसिद्ध टीकेचे ६० साठ अध्याय मला मिळाले आहेत. या साठ अध्यायांची ओवीसंख्या १६२८४ भरते. शोध करतां, बडोद्याचे डॉ. चिपळोणकर यांस सदर ग्रंथाच्या २।३ संपूर्ण प्रती मिळाल्या असल्याचें कळतें. परंतु कविविषयक माहितीवर कांहीं विशेष प्रकाश त्या पाडूं शकत नाहींत. सर्व अध्याय ९० व त्यांची ओवीसंख्या ३५९४५ एवढें मात्र त्या सांगतात. मजजवळील प्रत बरीच जुनाट आहे, तथापि अशुद्ध आहे. संस्कृत श्लोक व त्यावर मग मराठी ओव्या असा क्रम आहे. संस्कृत श्लोक इतके अशुद्ध लिहिले आहेत कीं ते वाचतांना मारामार पडते.

२ प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं कवी आपलें नांव देतो, क्वचित् गुरूचा हि निर्देश करतो. बहुतकरून कवी आपलें नांव 'जातवेद बहिरा' असें देतो. उदाहरणार्थः—

(अ) जेथें अर्थु तेथें अनर्थु। हें दावितसे श्रीकांतु। तें चि चरित्रें गातु। जातवेद बहिरा ॥ ३२५ ॥ अध्याय ५६

(आ) या जातवेद बहिरयाचा। जो कां स्वामीं यादवाचा। तया समस्तां विरांचा। झोडील दर्पु ॥ ५९० ॥ अध्याय ५३

कोठें बहिरा जातवेद किंवा नुसता बहिरा असा हि उल्लेख करतो. उदाहरणार्थः—

(अ) श्रीगुरुचिंतामणिप्रसादे। बहिरेनि जातवेदें। जें चरित्र केलें गोविंदें। तें गाइलें वाचा ॥ ३०६ ॥ अध्याय ३३

(आ) म्हणौनि सगुण निर्गुण। दोन्हीं येक सत्य श्रीकृष्णं। हां स्वयें बहेरा जातवेद जाणोन। सद्गुरुरूपा ॥ ३०२ ॥ अध्याय ३९

( इ ) जें जें मनें चिंतावें । तें तें श्रीगुरु चिंतामणीनें द्यावें । तरी नां दो यणे दैवें । बहिरा म्हणें ॥ १३० ॥ अध्याय ४९.

या टीकेला सर्वत्र " भैरवी "–बहिरवी–असें नांव देण्यांत आलें आहे. अर्थात च कवीचें मुख्य नांव बहिरव–भैरव–होतें हें उघड आहे. जातवेद हें आडनांव किंवा पदवी असावी. प्रथमाध्यायाच्या शेवटीं कवी म्हणतोः—

" या येकुणा हातरिं श्लोका । मऱ्हाटि भैरवी टिका । जातुवेदु बहिरा म्हणे आईका । नित्यू श्रूतें ॥ ४५४ ॥ ईति श्री भागवतें महां पुराणें दशमस्कंदे । भैरवि टिका प्रथमोध्यायः ॥ १ ॥ "

३ कवीच्या गुरूचें नांव ' चिंतामणी ':—.

मग त्या पवित्रा वाचा । पुसीलें तु रें कवणाचा । जी मीं श्री गुरु चींतामणीचा । पदार्थु येकु ॥ २२ ॥ अध्याय १

४ कवीची कुळदेवता म्हाळसा. तिला प्रथमाध्यायांत ' नमस्कारतांना ' कवी म्हणतोः—

तें समस्तां कुळां कुळदेवता । देवा दानवां नमीतां । जिचिये यकध्वरसता । तीहिं लोकीं ॥ २९ ॥ त्या यौग्य अयौग्य जाणितलें । देव दैय ( त्य ? ) समजाविलें । ज्या आंमृत विभागीलें । म्हाळसा देवि ॥ ३० ॥ वाचाकमळनीचा कमळीं । येहिं पांचै पुष्पांजुळीं । कुळदेवता सावळीं । नमस्कारिलीं ॥ २१ ॥

५ पुढील दोन ओव्यांवरून गुरूनें याचें नांव विष्णु विश्वनाथ ठेविलें अशी शंका येते. ओव्या अशाः—

ऐसी हे आवरणपुजा । जेथे श्रेष्ट श्री गुरुराजा । जो मध्यस्थानी स्वामीं माझा । सर्वद्रष्टा तों ॥ ३२ ॥ जयाचेनि गुरुत्व आलें । तिहिं देवां गुरुत्व बाणलें । जेणें नाम ठेविलें । विष्णुं विश्वनाथुं ॥ ३३ ॥ अध्याय १.

६ मुद्गलगोत्री पद्मनाभ पंडित व चिंतामणी यांचा समागम मला लाधला असें कवी पहिल्या अध्याच्या ६२ ते ६८ पर्यंतच्या खालील ओव्यांत सांगतोः—

तें श्रीकृष्णनाम कीर्तन । त्रीभुवना पुंण्यपावन । मज माघाडा सुलोचन । पद्मनाभी पंडितु ॥ ६२ ॥ तो मुद्गल गोत्रवंशी । नित्य युक्त हरिकथेंसी । जया संगति चिंतामणिसी । प्रेमभावे ॥ ६३ ॥ साटि अक्षराचा लेखा । ते रूप पाणी पळां येका । त्या साटी पळांची घटिका । येकी बोलीजें ॥ ६४ ॥ या साटि घटिकाचा । काळु आहोंरात्रीचा । तो जाय सावधानतेंचा । अक्षरादिकरुनी ॥ ६५ ॥ यें कृष्णचरित्रांची आक्षरें । जे पळें क्षाडिति वैखरें । अैसी घटिकां उत्तरें । सं वेंची प्रतिष्टे ॥ ६६ ॥ या रिती काळेंसी सावधान । नीत्य मुक्तीसी च लग्न ( म्न ) । ऐसे ते जें सज्जन । लाधलै

मज ॥ ६७ ॥ ऐसा सत्समागमु लाधला । जेथें चींतामणि चि प्रगटला । मग त्या अनंदा जेथीलां । रुप आहे ॥ ६८ ॥

७ गुरूचें गोत्र ' अत्रि ' असल्याचें कवी लिहितोः—

जो आत्रिगोत्रउदयाचळीं । बोधप्रकाश किरणमाळि । जयाचि घेति वोदपाळी । मुमुक्षु जन तें ॥ ७३ ॥ त्या चींतामणिचेनी प्रसादें । दशमस्कंद वोविप्रबंधें । बहिरेनी जातवेदे । गायन केलें ॥ ७४ ॥ अध्याय पहिला.

८ कवीचें गोत्र कौंडिण्य. एतत्संबंधीं उल्लेखः—

श्री कृष्णु गुरु चींतामणींचा । प्रसादें मग भाग्याचा । भुवनिं केलों त्या श्रीकृष्णांचा । वाणितां मीं ॥ ७५ ॥ वरिं जन्मु सुद्रंशी । अनंतु लधलां जेयासी । त्या कौंडिण्यऋषीसंतानासी । भक्तिवरदान ॥ ७६ ॥ अध्याय १

चिंतामणीचा गुरु कृष्ण असावा असें यावरून संभवतें.

९. भागवतटीकाकार श्रीधरस्वामी यांचा उल्लेख अनेक ठिकाणीं कवीनें केला आहे व त्यांना अनुसरून आपण टीका करीत आहों अशी ग्वाही हि पण तो देतोः—

आतां कृपाळु तुम्हीं श्रोत । चित्त द्यावें कृष्णकथें । मीं श्रीधराच्या मार्गातें । पाहोंनी चाले ॥ ८८ ॥ अध्याय १

१० प्रस्तुत कवीसंबंधानें यापेक्षां अधिक माहिती त्याच्या ग्रंथांत आढळत नाहीं. काळ, स्थळ इत्यादि बाबीं संबंधानें कांहीं च उल्लेख नाहीं. अशा स्थितींत अनुमानावर च मदार ठेवणें भाग आहे. माझ्या प्रतींत भाषेचें जें स्वरूप नजरेस येतें त्यावरून ग्रंथ दासोपंत अथवा एकनाथ यांच्या काळापेक्षां अलीकडील खास नाहीं, एवढें म्हणतां येतें. कारण तत्कालीन भाषेचा एक जो मोठा विशेष म्हणजे उकारबाहुल्य तें यांत सडकून आहे. कुस्णु, योगु, लोकु, जीवलगु, गंधु, हारु, दैत्यू, येकु, वामतु, शुकु, आनंदु इत्यादि शेंकडों उकारान्त शब्द यांत पदोपदीं योजलेले आहेत. तसेंच बोलतु, फावतुसे, पाहातु, भावतु, विचारितु, जाजावतु, करितु, विस्मितु, मीरवितु, इत्यादि रूपें हि रगड आहेत. उरौनी, ऐकौनि, स्मरौनि, पसरौनि, प्रगटौनी, अवतरौनी, अशीं किंवा असैल, उपजैल, प्रगटैल, बोलजैल, म्हणैल, आठवैल, दिसैल, हीं, अथवा दोघै, त्यांतु, पोटांतुनु, सकळै, म्हणौनि, इत्यादि दासोपंतकालीन रूपें यांत जागजागीं आढळतात. इतकेंच नव्हे, तर, जेयासी ( $\frac{1}{6}$ ) तेयासी ( $\frac{13}{3८}$ ), तेया, सांघै इत्यादि ज्ञानेश्वरकालीन रूपें हि यांत क्वचित् येतात. त्यावरून तर ग्रंथ दासोपंताहून अर्वाचीन नाहीं अशी खात्री पटते. कोणत्या हि शे दोनशें ओव्या वाचतां क्षणींच ( माझ्या प्रतींतील ) बहिरा व दासोपंत यांच्या भाषास्वरूपांतील साम्य तज्ज्ञाला कळण्यास अवकाश लागणार नाहीं. यांत जुन्या शब्दांचा भरणा हि भरपूर आहे.

११ शके १६९० त भारत करणाऱ्या गोपाळ कवीनें द्रोणपर्वाच्या आरंभीं महाराष्ट्रकवींस नमन केलें आहे. त्यांत तो लिहितोः—

प्राकृत कवि ज्ञानदेव । सिंधुसारिखें बुद्धिवैभव । एकनाथ जनार्दन स्वयमेव । जातवेदा हि मुक्तेश्वर ॥ १ ॥

यावरून जातवेद कवी गोपाळाला माहीत हो ता हें उघड आहे. या शिवाय दुसऱ्या कोणाच्या हि ग्रंथांत संतमालिकांत वगैरे जातवेद असें नांव येत नाहीं.

१२ हा बहिरा जातवेद कोण ? महाराष्ट्रीय साधुकवींत बहिरंभट पैठणकर उर्फ बहिरा पिसा ही व्यक्ति प्रसिद्ध आहे. या बहिऱ्या-पिस्याचें चरित्र महीपतीनें ' भक्तविजयाच्या ' ४४ व्या अध्यांत वर्णन केलें आहे. त्यांत या ' षट्शास्त्रीं निपुण, वेदोनारायण ' बहिरंभटानें भागवत दशमस्कन्धावर प्राकृत टीका केल्याचें महीपती सांगतोः—

श्री भागवत दशमस्कन्ध देखा । त्यावरी केली महाराष्ट्रटीका । त्या सप्रेम ओव्या अमोलिका । ऐकतां भाविकां निजसुख ॥ ९६ ॥ आणिक पदपदांतरें शेवटीं । काव्य रचिलें बहिरंभटी । दुरितें पळती उठाउठी । कर्णसंपुटीं ऐकतां ॥ ९७ ॥

' सुंदर व अमोलिक ' असें टीकेचें वर्णन करणाऱ्या महीपतीनें टीका बहुधां पाहिली असावी. भारतवर्षाचा अर्वाचीन कोश करणारे गडबोले यांनीं ' बहिरा पिसा ' याचें चरित्र महीपतीच्या आधारानें लिहून शेवटीं या टीकेचा पूर्वार्द्ध —४९ अध्याय आम्हीं पाहिला, त्याची ओवीसंख्या ४५ हजार आहे, अर्थातच यांत उत्तरार्धाच्या ३० अध्यायांची संख्या अदमासानें मिळविल्यास ग्रंथ पाउण लाख भरेल, असा आभिप्राय व्यक्त केला आहे.

१३ महीपतीच्या उल्लेखावरून बहिरा पिसा म्हणजे च बहिरा जातवेद असा बळकट संशय येतो. डॉ. चिपळोणकरांचा हि असा च समज आहे. या कामीं एक अडचण पुढें येते ती म्हटली म्हणजे गुरूसंबंधानें होय. महीपतीनें बहिऱ्या पिस्याचा गुरु वडवाळ नागनाथ म्हणून लिहिलें आहेः—

ऐसें असतां बहुत दिवसी । हिंडत आला वडवाळेसी । तव नागनाथ सिद्ध त्या ठायासी । सद्गुरुमठासी राहिला ॥ ७१ ॥ ... ... ... ...

नागनाथाची कृपा होतां चि जाण । बहिऱ्या पिस्यास झालें ज्ञान ... ॥ ९४ ॥

परंतु प्रस्तुत टीकेंत तर बहिरा जातवेद हा आपल्या गुरूचें नांव चिंतामणि असें सर्वत्र लिहितो. तेव्हां या भेदाची एकवाक्यता कशी करावयाची ? स्वगुरुनामाबद्दल कवी तर सर्वाहून अधिक प्रमाण. मग काय महीपती चुकला म्हणावें ? अथवा नागनाथाचें पूर्वाश्रमींचें नांव चिंतामणी असावें अशा तर्कानें भेद उडवावा ?

१४ आतां नामभेद आहे अशी शंका कोणीं घेतल्यास त्यांत अर्थ नाहीं. कारण

बहिरंभटाच्या विचित्र वर्तनावरून त्याला "नांव पडलें बहिरा पिसा." जातवेद म्हणजे "जातविद्य"– विद्वान्; आणि 'घरीं अग्निहोत्रादि सत्कर्में नाना' करणारा बहिरंभट तर "आणिक ब्राह्मण पढले श्रुती। परी तयाचे विद्यार्थी म्हणविती।" या अधिकाराचा श्रोत्रिय होता. तेव्हां मागें लिहिल्या प्रमाणें जातवेद हें उपनाम किंवा पदवी असावी. 'पिसा' हें लोकनाम.

१५ परंतु या प्रकरणीं एक महत्वाचें आणि निश्चयात्मक प्रमाण मला नुकतें च उपलब्ध झालें आहे. तें येथें दाखल करतो. दाभाड्यांच्या तळेगावीं जगनाड्यांचे घरीं असलेल्या वह्यांपैकीं बाळोजी जगनाडे–संताजीचा मुलगा–याचे एका वहींत पृ. १५२ वर एक संतस्मरण उतरलेलें आहे. त्याचे शेवटीं असा उल्लेख आहे:––

येही अनंता हरीदासीं तारीळें जगासीः जे पुर्ण हरीसी शरणागतः

चीतामणौ प्रसादें कौडण्य गोत्री वदे पीस्या बहीऱ्याने जातीवेदें स्मरणें केळें हेः॥ ७ ॥ ७ ॥

अर्थातच हें स्मरण करणारा बहिराजातवेद तो च पिसा. जातवेदाचे गोत्र कौडण्य व त्याचा गुरु चिंतामणी असल्याबद्दलच्या त्याच्या स्वतःच्या ओव्या मागें दिल्या च आहेत. यावरून बहीरा पिसा तोच बहिरा जातवेद हे निर्विवाद ठरतें. गुरुभेदाच्या अडचणीचा परिहार पूर्वी च सुचविला आहे.

१७. असो बहिरा पिसा हें नांव सर्वमान्य आहे. तेव्हां या प्रख्यात साधूची ही टीका म्हणजे खरोखर च एक महल्लाभ होय. बहिऱ्याची ओवी खरोखर च 'सप्रेम' व 'अमोलिक' आहे. एतत्संबंधीं महाराष्ट्राची उत्सुकता प्रगट झाल्यास, ती हटकून तृप्त होईल.

## २१ नंदभाषा

( लेखक–रा. द. वा. पोतदार )

( १ ) नामदेवाचे गुरू विसोबा खेचर यांचा खालील अभंग रा. राजवाडे यांचे संग्रहीं आहे. तो प्रथम देतोंः—

मुळु वदनाचा[५] आंगळु हतांचा[१०] । उदाणु[३] नेत्राचा स्वामी माझा ॥ १ ॥ मुगुट जयाचा केवल्या आगळे[२१] काटि । पवित्रु[७] तळवटि चरण ज्याचे । शेलि[६] हे भागले पोकु[४] वेडावले । आवारू खवच[१८] काटि थकित जाहाली ॥ ३ ॥ सद्भावें शरण आवारू[२] जोडुन विसा खेचर चरणि विनटला ॥ ४ ॥

( २ ) प्रस्तुत अभंगांत ज्या शब्दांखालीं आंकडे आहेत, ते शब्द नंद भार्षे-तले असून, त्या त्या आंकड्यांचे ते दर्शक आहेत. एतद्विषयीं ( पृष्ट ४४९ ) मोल्सवर्थच्या कोशांतील खालील उतारा मननीय आहे:—

" नंद M. नंदकी F. ( नंद was a proper name ) A clandestine or covert term, amongst dealers and brokers for दलाली or the fees of brokerage. Devised to keep the secret of trade from the employer of the broker and the mere customer. Its vocabulary is भुरका One Rupee, ढोकळा one pysa ; केवली One, अवारू Two, उधानू Three, पोकू Four, मुळू Five शेली Six, पवित्रू Seven, मंगी Eight, तेवसू or लेवनू Nine, अंगुळू Ten, एकइ Eleven, रेघा Twelve, ठेपरू Thirteen, चोपइ Fourteen, तळी Fifteen. To this last term, the first four numerals successively added ( the sense of addition being expressed by तान ) form successively 16, 17, 18, 19 as भुरका तानतळी, अवारू तानतळी, उधानु तानतळी. काटी Stands for 20; then भुरका तान काटी, अवारू तान काटी &c. express 21, 22, &c. बिटी is 100, ढका 1000, फाटा is Anna, अवारू फाटे Two annas, मंगी फाटे Eight annas, तळी फाटे Fifteen annas. डुकार one anna, चकार Two annas, पकार Four annas, टाली Half a Rupee. The नंद Vocabulary has however variations."

( ३ ) विसोबा खेचर सराफ होता असें गडबोल्यांनीं आपल्या कोशांत लिहिलें आहे. तेव्हां या गूढ व्यापारी भाषेंत त्यांनीं आपल्या इष्ट देवतेचें–शंकराचें–स्तवन केलें हें ठीकच झालें. निदान तेव्हांपासून आतांपर्यंत म्हणजे आज ६०० वर्षें आपल्या इकडे ही भाषा व्यापाऱ्यांत प्रचलित आहे.

( ४ ) महीपतीला हा अभंग व हीं भाषा ज्ञात होती असें त्याच्या ' भक्तविजया 'च्या १८ व्या अध्यायावरून सिद्ध होतें. कारण तेथें असा उल्लेख आहे:—

विसोबा म्हणे नामयाकारण । ऐका शिवाचें निजध्यान । मग नंदभाषे चि बोलून । संशयखंडन करितसे ॥ ८८ ॥ मुळु वदनें जया कारण । उदानु नेत्र देदीप्यमान । अंगळू हस्त शोभत जाण । त्याचे ध्यान सांगतो तुज ॥ ८९ ॥ मस्तक जयाचा पाहतां दृष्टि । असे कैवल्या आगळा काटी । आणि पवित्रूंचे तळवटी । चरण असती तयाचे ॥ ९० ॥ वर्णितां त्याचें महिमान । सेलु लज्जित जाहालें मन । पोकू बोलतां अर्थज्ञान । वेडावले मानसी ॥ ९१ ॥ अठरा वर्णितां नव्हे लेख । तव ढंकार वद-

नाचा आला देख । तेणें गुण वर्णितां सुरेख । जिव्हा दुखंड जाहल्या ॥ ९२ ॥ ऐसा न लगे त्याचा पार । मग अवारू जोडुनिया कर । म्हणे मी ज्ञानेश्वराचा किंकर । याचे चरणीं विनटलों ॥ ९३ ॥

( ५ ) मोल्सवर्थनें हा अभंग दिला आहे. पण त्यांतील तिसरा चरण " ढकार १००० वदनाचा आला वर्णावया । जिव्हा त्याच्या चिरल्या वर्णवेना ॥ ३ ॥ " हा ज्यास्त असून तो महीपतीच्या पाठांत होता हें वरील ओव्यांवरून सिद्ध होतें. आश्विन शु० ५।१८३४ च्या ' केसरीं 'त एका गृहस्थांनीं हा च अभंग दिला आहे. त्याचे पाठ मोल्सवर्थप्रमाणें च बहुधा आहेत. " खेचर विसा म्हणे । स्वामि माझा " या मोल्सवर्थी पाठापेक्षां आम्हीं दिलेला व महीपतीस मान्य असलेला पाठ च अधिक सुंदर आहे.

( ६ ) अभंगाचा अर्थ असा:—

" माझा स्वामी–शंकर–पांच तोंडाचा, दाहा हातांचा व तीन डोळ्यांचा आहे. ज्याचा मुगुट २१ ( स्वर्गें उंच ) आहे व ज्याचे पाय सप्तपाताळापर्यंत ( पोंच-लेले ) आहेत; ( ज्याचें वर्णन करण्यासाठीं ) आलेला हजारतोंडाचा ( शेष ) जिभा फाटल्यामुळें दमला ( व ) साहा ( शास्त्रें ) थकलीं व चार ( वेद ) भ्रांत झाले, ( स्तब्ध झाले–मोल्स० ) व अठरा ( पुराणें ) टेंकीस आलीं, ( आश्विन शु० ५ च्या ' केसरीं 'त या अभंगाचा अर्थ देणाऱ्या गृहस्थांनीं या चरणाच्या आपल्या म्ह० मोल्स० पाठाचा अर्थ " सत्रावी जीवनकळा अथवा उन्मनी यांस ही अंत लागला नाहीं " असा दिला आहे. पण तो चूक आहे. अंगुळमंगी ह्याचा अर्थ १७ नसून अंगुळ म्हणजे १० व मंगी म्ह० ८ तेव्हां १०+८ = १८ असा आहे, व अठरा म्ह० १८ पुराणें. ) (त्या श्रीसदाशिवाला) शुद्ध मनानें दोन (.हात ) जोडून शरण (येऊन विसा खेचर ( त्याचे ) पदीं विनटला.

( ७ ) आगळा हें अधिक या अर्थी व खवच हें ' उणे ' या अर्थी वरील अभंगांत योजलेलें आहे. पैकीं ' आगळा ' हा शब्द ' अधिक ' या अर्थानें अद्याप हि व्यवहारांत प्रचलित आहे.

( ८ ) ' भक्तविजया 'च्या ५२ व्या अध्यायांत पंढरपूरकर हरदासाकरितां ' देशावर ' जमा करण्यास, लोहगांवकर मंडळीस तुकाराममहाराज खालीलप्रमाणें सांगत आहेत असें महीपती वर्णितोः—

ऐकोनि तुकयाची वाणी । अवश्य म्हणती तये क्षणीं । मग दऊत लेखणी पत्र आणोनी । आसाम्या मांडोन दीधल्या ॥ १९० ॥ उत्तम मध्यम कनिष्ठ जाण । नगरांत नांदत असती जन । ते म्हणती तुकया लागोन । पत्रीं अंक घालावा ॥१९१॥ मग उत्तमावरि घालुनियां तुळ । टाळी लिहिली अधमावर । कनिष्टावरि पकार । लि-

हिला सत्वर ते समर्थी ॥ १९२ ॥ ते देखोनि ग्रामवासी । म्हणती हे नये आमुचे चित्तासी । मग तुका उत्तर देत तयासी । जें येईल चित्तासी तें करा ॥ १९३ ॥ त्यांनीं उल्हास धरूनि अंतरीं । मूळु लिहिलें उत्तमावरी । उदाणुकें आंख झडकरी । मध्यमावरि टाकिला ॥ १९४ ॥ पकार होता कनिष्ठावरी । एक आंख घातला त्यावरी । तुकयासी दाऊनी सत्वरी । गांवकरी उठले ॥ १९५ ॥

टाळी म्ह० अर्धा रुपया, पकार म्ह० चार आणे. ( मोल्स० पहा ). तुळ म्ह० बहुधा एक रुपया असावा. ' आंख ' म्ह० अंक असा अर्थ एक गृहस्थ ( आषाढ व० ८।१८३४ च्या ) ' केसरी 'त सुचवितात.

( ९ ) तुकारामबुवांचा हि एक अभंग या भाषेंत आढळतो. हा अभंग ह. भ. प. विष्णुबुवा जोग यांनीं क्षेपकांत गणून त्याचा अर्थ दिला नाहीं. त्याचा विचार आपण न केल्याचें त्यांनीं सांगितलें. सदर अभंग येणे प्रमाणेः—

( अभंग ३४०८—दामोदर सावळाराम मंडळीचा तुकारामगाथा ).

उधानु काटीवरी । चोपडूची आस । नवरा राजस मिरवतसे ॥ १ ॥ जिन्हाळ्याची काटी उबाळ्याचा मोटा । नवरा चोहटा मिरवितसे ॥ २ ॥ तुळशीची माळ नवरीचे कंठी । नोवरा वैकुंठीं वाट पाहे ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसी नोवऱ्याची कथा । परमार्थ वृथा बुडविला ॥ ४ ॥

सदर अभंग उलगडत नाहीं. तज्ज्ञांनीं विचार करावा. आषाढ व॥ ८ ' केसरी'त एका लेखकानें सुचविलेल्या दिशेनें अभंगाचा अर्थ असा बसतोः—

" उधानुकाटी = तीन × वीस = ६० म्ह. साठ वर्षांचा म्हातारा, चोपडूची म्ह. चौदा वर्षांच्या नवरीचा अभिलाष धरतो. ' जिन्हाळ्याचा काठी उबाळ्याच्या मोटा ' याचा अर्थ बसत नाहीं; परंतु " थाटमाटानें " असें त्याचें तात्पर्य दिसतें. हा म्हातारा नवरदेव थाटमाटानें चोहटा—म्ह. चव्हाट्यावर मिरवतो. " लवकरच त्या बिचाऱ्या कोवळ्या पोरीच्या कंठीं तुळशीची माळ "-वैधव्यांत जपजाप्य करण्याकरतां—येते. स्वर्गस्थ पतिराज वैकुंठांत आपल्या प्रियतमेची प्रतीक्षा करीत असतात. तुकोबा म्हणतात, ह्या म्हाताऱ्या नवऱ्यांची कथा अशी आहे. यांनीं सर्व परमार्थ व्यर्थ बुडविला.

( १० ) तुकाराम व्यापारी होता तेव्हां त्याच्या व नामदेव—शिंपी—यांच्या मुखांतून या भाषेंत केलेलें कवन बरेंच बाहेर पडलें असलें पाहिजे.

( ११ ) Poona Gazetteer Part I. page 370 वर या भाषेची थोडीशी माहिती दिली आहे.

( १२ ) ज्ञानेश्वराचे समकालीन जे विसोबा खेचर त्यांच्या वेळेपासून हा कालपर्यंत म्हणजे आज ६०० वर्षें ही मंदभाषा व्यापारी लोकांत जिवंत राहिली आहे.

तिचा उगम केव्हां, कोठून, व कसा झाला, तिला नंदभाषा हेंच नामाभिधान कां व कसें प्राप्त झालें, यांत आणखी इतर कोणकोणते शब्द आहेत, वगैरे अनेक प्रश्न महत्वाचे असून हि त्याबद्दल आज कांहींच माहिती नाहीं. यास्तव शोधकांचें लक्ष या लेखाचे द्वारें इकडे वेधण्याचा यत्न केला आहे.

## २२ ज्योतीपंतदादा महाभागवत

( लेखक–रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन )

(१) शातवाहनाचे सतरावे शतकांत आपल्या ह्या महाराष्ट्रांत जे अनेक कवी होऊन गेले त्यांपैकीं च ज्योतीपंत दादा बुधकर हे एक होत. ह्यांचे वडिलांचें नांव गोपाळराव देशपांडे. हे अथर्ववेदी देशस्थ ब्राह्मण. यांजकडे बुध मलवडी कर्यातीचे देशपांडेपणाचें काम असे. ज्योतीपंतांचा जन्म केव्हां झाला, त्यांचें बालपण कोणत्या स्थितींत गेलें ह्यांबद्दल निश्चयपूर्वक माहिती देतां येण्याजोगीं साधनें अद्याप उपलब्ध झालेलीं नाहींत; तरी पण त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें अवश्य तें शिक्षण ज्योतीपंतांस मिळालें असावें. त्या वेळीं कर्तबगारीचें बीज होण्यास सर्वदृष्टीनें अनुकूल अशी परिस्थिति होती. लवकरच ज्योतीपंत ह्यांची झांशी येथें मोठ्या हुद्याच्या कामावर नेमणूक झाली. तेथें त्यांनीं आपलीं कामें निरपेक्षबुद्धीनें व लोककल्याणाच्या दृष्टीनें केलीं, व रयतेकडून यथार्थ वाहवा मिळविली. पुढें एका ब्राह्मण अपराध्यासंबंधीं न्याय देण्याचे कामीं यांचा व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा खटका उडाल्यामुळें, ह्यांनीं नोकरीस रामराम ठोकला, व तडक आपल्या गांवचा रस्ता सुधारला! ज्योतीपंतांनीं केलेल्या अद्भुत चमत्कारांसंबंधानें, आपणांस आश्चर्य वाटलें नाहीं, तरी त्यांची लोकोत्तर बुद्धिमत्ता, विलक्षण चिकाटी, अनन्यसाधारण धैर्य व परोपकारी, निष्कपट व निर्मळ स्वभाव इत्याद्यनेक दिव्य गुणांचा विचार केला म्हणजे मनास एक प्रकारचा आल्हाद वाटून ह्या भगवद्भक्ताविषयीं प्रेम उत्पन्न होतें. ठिकठिकाणीं त्यांनीं जीं विठोबाचीं मंदिरं बांधिलीं त्यांवरून त्यांची परमेश्वरभक्ति, कर्तृत्वशक्ति व निर्धार हीं व्यक्त होतात. काशीपासून रामेश्वरापर्यंत ह्यांनीं श्रीपांडुरंगाचीं एक हजार देवालयें बांधिलीं अशी हि दंतकथा वृद्धमुखीं ऐकूं येते. ह्या विठ्ठलमंदिरांपैकीं च मुंबईतील विठ्ठलवाडींतील विठोबाचें देवालय व आपल्या पुण्यांतील लकडीपुलावरील प्रसिद्ध विठ्ठलमंदिर हीं होत.

(२) सर्वांत महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे ज्योतीपंतांनीं केलेली भागवतावरील प्राकृत टीका ही होय. भागवताच्या दशमावर शिवकल्याण व कृष्णदयार्णव इत्यादींनीं केलल्या टीका उपलब्ध असून, एकादशस्कंधावरील एकनाथांची टीका तर सर्व-

मान्य च आहे. परंतु समग्र भागवतावर अशी ज्योतीपंतांनीं च काय ती टीका केलेली आहे; व तीसुद्धां एक अभंगबद्ध व दुसरी ओंवीबद्ध अशा दोन रीतीनें. याशिवाय रामायणावरील कविता, प्रवृत्तिनिवृत्ती–ऐक्यता–रत्नावली नामक गद्यात्मक ग्रंथ वगैरे ह्यांच्या कृति आहेत त्या वेगळ्या च. ज्योतीपंतदादांस श्रीवेदव्यासांनीं प्रसादादाखल श्रीभागवतग्रंथ दिल्यापासून व श्रीभागवतावर त्यांनीं स्वतंत्र ग्रंथरचना केल्यापासून त्यांस ज्योतीपंत महाभागवत हें नांव मिळालें. त्यांच्या वंशजांस हि ' भागवत ' अगर ' महाभागवत ' ह्या नांवानें संबोधितात. कविवर्य मोरोपंत, तुका विप्र इत्यादींचे हे समकालीन असून, ते शके १७१० मार्गशीर्ष. कृष्ण त्रयोदशी रोजीं ब्रह्म-स्वरूपीं लीन झाले. ह्यांचा मुख्य मठ चिंचणेर, ता० व जि० सातारा येथें असून, त्यांचे वियमान वंशज हि व्युत्पन्न, बहुश्रुत व प्रेमळ असे आहेत. वर लिहिल्याप्रमाणें ज्योतीपंतांची भागवतावरील दुहेरी प्राकृत टीका व त्यांचे इतर ग्रंथ हे उपलब्ध जाह-ल्यास मराठी वाचकवर्गावर उपकार होतील. काव्येतिहाससंशोधकांनीं व मराठी भाषेच्या आभिमान्यांनीं इकडे लक्ष पुरवावें, अशी माझी विनंति आहे.

( ३ ) राजापूर येथील रा. गोविंद मोतिराम शेट सांपळे यांचे संग्रहीं असलेल्या ज्येतीपंतदादचे अभंगापैकीं कांहीं अभंग मासल्यादाखल येथें देत आहें.

## अध्यात्म रामायण

### १

भुमिभार निवारणा । देवें प्रार्थिला जो राणा ॥ १ ॥ नारायण रघु ( रवि )–कुळीं । अवतरे भूमंडळीं ॥ २ ॥ मायामनुष्य जो होत । सदा विनाशरहित ॥ ३ ॥ निर्मुळ राक्षसांचें कूळ । करुनि पावे निजमूळ ॥ ४ ॥ जीव पाप हरा कीर्ति । स्थीर ठेवूनीया क्षीति ॥ ५ ॥ दोन बंधु सीतापती । ज्योति भजा प्रेमचित्तीं ॥ ६ ॥

## भागवतसार

### ( स्कंधानुक्रमें )

### १

नारदाच्या उपदेशें । ग्रंथ आरंभीला व्यासें ॥ १ ॥ आदौ स्कंध तो प्रथम । उपोद्घात दावी नेम ॥ २ ॥ परिक्षिती जन्म कर्म । प्रायोपवेशी शुक आगम ॥३॥ अध्याय एकोणीस ज्योती । राज प्रश्न शुकाप्रती ॥ ४ ॥

### २

सर्ग विसर्ग तें स्थान । पोष कला उत्ती जाणा ॥ १ ॥ द्वितीय स्कंध दश अध्याय । संक्षेप वर्णन तें होय ॥ २ ॥ उती मन्वंतर । ईश कथालय च्यार ॥ ३ ॥ मुक्ति ऐसी नव ज्योती । आश्रयासी लक्षीताती ॥ ४ ॥

३

विदुर उद्धव संगम । मैत्रेयासी तो उत्तम ॥ १ ॥ तेहतीस अध्याय त्रितीय । सर्ग लक्षण उदय ॥ २ ॥ ब्रह्मांड संभूती । क्षिति वराह धरी दंतीं ॥ ३ ॥ कर्दम-पत्नी देवहूती । कपिल बोधी म्हणे ज्योती ॥ ४ ॥

४.

मनूवंशी यज्ञहरी । दक्षप्रसूती तें वरी ॥ १ ॥ विसर्ग चतुर्थी । एकतीस अध्यायानें कथी ॥ २ ॥ सती, ध्रुव, पृथुकथा । प्राचीन बर्ही यज्ञकर्ता ॥ ३ ॥ शंकर नारद प्रसादें । प्राचेतस ज्योती शुद्ध ॥ ४ ॥

५

प्रियव्रतवंशीं भला । नाभिपुत्र ऋषभ जाला ॥ १ ॥ पंचमीं वैकुंठ प्रियजय । सव्वीस अध्यायें स्थान होय ॥ २ ॥ भरतकथावंशीं दीप । स्वर्गपाताळीं प्रताप ॥ ३ ॥ नरक स्थिति स्थळकार्य । विश्वरूप ज्योतिर्मय ॥ ४ ॥

६

अजामीळ तरुनि जाय । नारायण वर्सी इंद्रराय ॥ १ ॥ षष्टीं पोषण भक्तांचें । एकोणीस अध्यायानें साचें ॥ २ ॥ चित्रकेतू वृत्र जाला । शेष भक्त ज्ञानी भला ॥३॥ विष्णुव्रते दीतिपुत्र । मरुत ज्योती ते पवित्र ॥ ४ ॥

७

शिशुपाळ सायोज्यता । धर्म नारद सांगता ॥ १ ॥ शुभाशुभ कर्मे प्रती । पंधरा अध्यायीं उक्ती ॥ २ ॥ हिरण्य कशिपु पुत्रा छळी । नरहरि प्रगटे तया काळीं ॥ ३ ॥ प्रल्हाद सप्तमीं वर्णिला । धर्म निर्णय ज्योतीं केला ॥ ४ ॥

८

स्वायंभुवा रक्षी यज्ञ । गज सोडविला सूज्ञ ॥ १ ॥ चोविस अध्यायीं हा क्रम । चौदा मनू कथन प्रेम ॥ २ ॥ अमृतमथनीं अजीत । कासवरूप तें धरीत ॥ ३ ॥ बळी पाताळीं वामन । मत्स्य झाला ज्योति म्हणें ॥ ४ ॥

९

सूर्यवंश सोमवंश । नानाकथाभर रस ॥ १ ॥ अध्याय चोविस नवम । ईश-कथा गाती प्रेमें ॥ २ ॥ वैवस्वतमनुसुत । दश इक्ष्वाकादी होत ॥ ३ ॥ ऐलवंशीं यदुकुळीं । ज्योती जन्मे वनमाळी ॥ ४ ॥

१०

भूमिभार हरावया । वासुदेव होत कार्या ॥ १ ॥ नव्वद अध्याय दशम । निग्रह तो होय नेम ॥ २ ॥ मथुरे जन्मुनी । क्रीडा केली वृंदावनीं ॥ ३ ॥ कंसांतक पांडव-मित्र । ज्योति संहारी अमित्र ॥ ४ ॥

## ११

वसुदेव देवकीला । नारदें उपदेश केला ॥ १ ॥ एकादशीं मुक्ती । एकतीस अध्याय निश्चिती ॥ २ ॥ कृष्णउद्धवसंवाद । आत्मविद्याविशारद ॥ ३ ॥ ब्रह्म शाप कुलक्षय । स्वयें सिद्ध ज्योतिर्मय ॥ ४ ॥

## १२

कली धर्मातें निर्दळी । कलंकी विष्णु होत बळी ॥ १ ॥ आश्रय लक्षण द्वादशीं । तेरा अध्याय सारांशीं ॥ २ ॥ परीक्षित ब्रह्मभूत । शुकमुखें अमृत होत ॥ ३ ॥ वेद-भाग मार्कंडेय । कथा सर्व ज्योतिर्मय ॥ ४ ॥

## १३

नारायण विधी सांगे । लाभ नारदा तत्संगें ॥ १ ॥ भागवत संप्रदाय । पर पराक्रम होय ॥ २ ॥ व्यासा नारद बोलत । शुका नारद पढवीत ॥ ३ ॥ ज्ञानदीप परीक्षिती । शोक हर्ता लाभे ज्योती ॥ ४ ॥

# भागवत दशमस्कंध

## १

निवृत्त तर्षै०—

हरि कथा सर्वा गोड । धरा धरा हो आवड ॥ १ ॥ मुक्त जन गाती । तृष्णा त्यागी अहो राती ॥ २ ॥ मुमुक्षा औषध । भवरोग तुटे बंध ॥ ३ ॥ विषयीका जना । गोडी असे श्रवणा मना ॥ ४ ॥ पतीता नावडी । पशू घाती संतां पीडी ॥ ५ ॥ ज्योति म्हणे गाऊं कथा । नावडे तया दोषू आतां ॥ ६ ॥

## २

सुखस्य दुःखस्यः—

सुखदुःख दाता कोणी । दुजा नाहीं आणी मनीं ॥ १ ॥ अन्या आरोप करणें । हें तो कुबुद्धि तूं जाणे ॥ २ ॥ जैसें असे पूर्व कर्म । तैसें घडत हा नेम ॥ ३ ॥

## ३

योगींद्राय नमस्तस्मै । शुकाय ब्रह्मरूपिणे । संसारसर्पदष्टं यो । विष्णुरात ममू-मुचत ॥ १ ॥ तया योगींद्रा नमन । ब्रह्मरूपी शुक जाण ॥ २ ॥ भव सर्प जो दंशिला । परिक्षीत सोडविला ॥ ३ ॥ सदा समाधिस्त । मुखीं गाय भागवत ॥ ४ ॥ ज्योति म्हणे माझें मूळ । ज्याचें नाम सुमंगळ ॥ ५ ॥

# किरकोळ अभंग

## १

देवें व्यापिलेंसें सारें । मुंगीहूनी ब्रह्मवर ॥ १ ॥ नाहीं रिता ठाव कोठें । जनीं वनीं देव भेटे ॥ २ ॥ जळीं स्थळीं पाषाणांत । देवस्वयंभ दीसत ॥ ३ ॥ गुरुबोधें दाखविलें । ज्योती राममय केलें ॥ ४ ॥

## २

पांडुरंग बापा कृपा करीं आतां । वारी भवचिंता कृपानिधे ॥ १ ॥ शरण आलों तूज सर्वस्वीं सद्भावें । अनुसरलों जीवें तूझें पायीं ॥ २ ॥ नारायणा रामा मुकुंदा माधवा । दुर्भाव हरावा माझा सर्व ॥ ३ ॥ ज्योती म्हणे नंदकुमरा श्रीवरा । निर्मळही करा भक्ति–मार्ग ॥ ४ ॥

## ३

सर्व ज्याचें वरें । क्षणमात्र पाप हरे ॥ १ ॥ तया कृष्णा नमस्कार । यश ज्याचे भद्रकर ॥ २ ॥ यशस्वी हा एक । तारी सकलही लोक ॥ ३ ॥ सुखी झाला ज्योती । गातां प्रेमें कृष्ण कीर्ति ॥ ४ ॥ वेदव्यास गुरु । तुम्हा माझा नमस्कारू ॥५॥

## ४

वेद व्यास आमचे गुरू । जे का भवाब्धीचें तारूं ॥ १ ॥ जाणा शुद्ध भागवत । आमुचा संप्रदाय होत ॥ २ ॥ कृष्ण उपास्य देवता । वासुदेव एक सत्ता ॥ ३ ॥ सर्वरूपी नारायण । हेचि मनापई ध्यान ॥ ४ ॥ हरिस्मृतीचें आसन । तदाकार मुद्रा पूर्ण ॥ ५ ॥ एकादशी व्रत । पांडुरंग कुलदैवत ॥ ६ ॥ आत्मा अभेद पाहणें । भूत-दया आचरणें ॥ ७ ॥ द्वादश तिलक । कंठीं तुलसीमाळा देख ॥ ८ ॥ श्रीमद्भागवत कानीं । मनीं वाणीं सदा ध्यानीं ॥ ९ ॥ नवविध भजन । मुखीं नारायण कीर्तन ॥ १० ॥ कलियुगीं ज्योती म्हणे । याचि मार्गी सर्वां येणें ॥ ११ ॥

## ५

काशीविश्वेश्वर बदरी केदारामहं काळसुंदरा ओंकारतो । द्वादश ज्योतिर्लिंगें एक उमावर उद्धरि शंकर सर्वजीवा । सोरटी सोमनाथ परळी वैजनाथ आवढ्या नागनाथ त्र्यंबकराज । घृष्णेश्वर आणि भीमा तो शंकर दिव्य रामेश्वर मल्लिकार्जुन । सायंप्रातर्वाणी किर्तिताहे ज्योति । लाभे भुक्ति मुक्ति भक्ति सदा ॥

## ६

ज्याचें नाम संकीर्तन । सर्व पापाचें भंजन ॥ १ ॥ नमो हरीते आवडी । उत्तम पुरुषा हेचि जोडी ॥ २ ॥ दुःखातें नाशित । कृष्णनमन निश्चित ॥ ३ ॥ ज्योति म्हणे सोपें । केलें साधन व्यासें बापें ॥ ४ ॥

( ४ ) वरील गृहस्थानीं ज्योतिपंतांच्या गुरुपरंपरेविषयीं खालील पद सांगितलें. पदाचा कर्ता दत्तसांप्रदायी निरंजन आहे, हें स्पष्ट आहे. पदांतील पहिल्या ओळींतील ' ज्योति ' पदाखेरीज त्याचा संबंध ज्योतिपंताकडे लावण्यास कांहीं च आधार दिसत नाहीं. शोधकांनीं विचार करावा. तें पद असें:—

### पद

नारायण विधि नारद व्यास स्वयं ज्योतिरूपा । कृपाकटाक्षें निज भजकांच्या वारिसी भवतापा ॥ धृ० ॥ सच्चित्सुखा परमात्मा श्रीहरि गाती उपनिषदा । उपक्रम उपसंहार दाविसी आपुल्या निजपदा । सृष्टि स्थिति प्रलया ने स्वरूपीं द्वैत नाहीं कदा । अन्वय व्यतिरेकानें पाहतां तुझा तूंची सदा ॥ नारा० ॥ १ ॥ दोरीवरता सर्प भासला तिमिराच्या योगें । शुक्तिस्थानीं रौप्य विलोकुनि झळकतसें अंगें । तैसा आत्मा नेणुनि आपणा अहंकारसंगें । मानुनि तादात्म्यानें संसृति भोगु लागवेगें ॥ २ ॥ ऐसें फिरतां फिरतां अनंत जन्में या जीवा । गेले पारि मनीं विश्रांतीचा लेश नाहिं देवा । योगायाग तीर्थव्रत नेमें न पवे सुख ठेवा । अंतर्यामीं तुजला विसरुनि करिती बाह्य सेवा ॥ नारा० ॥ ३ ॥ तव करुणामृत वृष्टी होतां समुळ दृश्य हरपे । व्यापक व्याप्या ठाव नुरुनियां मीपणही लोपे । आहे नाहींपणा ग्रासुनियां स्वताचि स्वस्वरूपें । होऊनि विचरे स्वयें निरंजन जनार्दनरूपें ॥ नारा० ॥ ४ ॥

---

## २३ तुकाविप्राचा प्रयाणकाळ कोणता ?

( लेखक—रा. पां. न. पटवर्धन )

राजापूर येथील रहिवासी रा. गोविंद मोतीराम शेट सांपळे ह्यांचे जवळील एका बाडांत ज्योतीपंतदादा महाभागवत ह्यांचे प्रयाणासंबंधीं तुकाविप्रकृत खालील अभंग सांपडला.

### अभंग

लग्नाचे तांतडी ज्योतीपंत आला । ठाव मागितला कृष्णेपाशीं ॥ १ ॥
कीलक वत्सर मार्गशीर्ष मासीं । कृष्ण त्रयोदशी गुरुवारीं ॥ २ ॥
वैष्णव गर्जती वाजविती टाळ । तव प्रदोष—काळ प्राप्त झाला ॥ ३ ॥
ज्योतीमाजी ज्योती मिळाला देखून । करीत गायन **तुका विप्र** ॥ ४ ॥

या तुकाविप्रकृत अंभगावरून व खुद्द ज्योतीपंत यांच्या पंथांतील एका प्रेमळ भक्तानें रचिलेल्या ' स्वयंज्योतिकथामृत ' नामक ग्रंथांतील ' शके सतराशे दहावरी । कीलक नाम संवत्सरीं । मार्गशीर्ष कृष्ण त्रयोदशी वरी । प्रदोष काळीं जाले आत्म· स्वरूप ' ह्या ओवीवरून* ज्योतीपंतदादांनीं शके १७१० मार्गशीर्ष व॥ १३

---

* ' स्वयंज्योतिकथामृतां'तील तुकाविप्रांचे निर्याणशकासंबंधाची ओंवी मात्र इंदुप्रकाशांत रा. पां. म. बाक्रे यांनीं प्रसिद्ध केलेल्या माहितीवरून दिली आहे. सदरहु ग्रंथ हा वेळपर्यंत हातीं न आल्यामुळें त्याचा प्रपंच करितां आला नाहीं !

गुरुवारीं आपला देह ठेविला हें स्पष्ट होतें. परंतु ह्या कालनिर्णयावरून अशी एक साहजिक शंका उत्पन्न होते कीं, तुकाविप्राचा प्रयाणकाळ तरी कोणता? व एवढ्याचकरितां हा प्रश्न काव्येतिहाससंशोधकांपुढें आज मी मुद्दाम मांडीत आहें. धुळे सत्कार्योत्तेजक सभेमार्फत प्रसिद्ध झालेल्या प्रभात मासिकाचे पहिले वर्षाचे ७ वे अंकांत सांगली येथील रा. दिनकरराव मराठे यांजजवळील राजारामप्रासादीकृत 'भक्तमंजरीमाला' ह्या ग्रंथाधारें रा. वि. का. राजवाडे यांनीं, आपल्या "राजारामप्रासादीकृत भक्तमंजरीमाला" या निबंधांत तुकाविप्राचा प्रयाणकाळ शके १६९० हा ठरविला आहे, व ह्याचे च आधारें 'मुमुक्षु' कर्ते रा. लक्ष्मणराव पांगारकर यांनीं आपल्या 'मोरोपंतांचे चरित्रां'त तोच काल ग्राह्य धरला आहे. परंतु वरील अभंगावरून तुकाविप्राचे प्रयाणकाळाबद्दल शंका येते. शके १७१० मध्यें मृत झालेल्या ज्योतीपंतदादांसंबंधीं—त्यांचे पुण्यतिथीसंबंधीं—उल्लेख करणारा तुकाविप्र अर्थात् शके १७१० नंतर केव्हां तरी गत झाला असला पाहिजे. वरील अभंगावरून तुकाविप्राचा प्रयाणकाळ १६९० मध्यें धरितां येईल किंवा कसें, ह्याबद्दल मात्र शंका घेण्यास जागा झाली आहे. रा. बाळकृष्ण हरी मसूरकर मु० कोपरडें यांनीं 'केसरीं'त तुकाविप्र यांची माहिती प्रसिद्ध केली आहे. त्यांत तुकाविप्रांचें देहावसान अंजनवतीस पौष वद्य चतुर्दशीस झालें, असें दिलें आहे. परंतु शक व वार हीं दिलीं नसल्यामुळें वरील शंका कायम राहते. सदरहु शंकेच्या निरसनार्थ रा. गो. का. चांदोरकर, धुळें यांजकडे हि पत्रव्यवहार केला होता. परंतु धुळें येथील सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहीं असलेल्या 'भक्तमंजरीमाले'च्या नकलेंत तुकाविप्राचे प्रयाणकाळचा शक दिला नसून, 'अमुक नाम संवत्सरे' असा निर्देश आहे. परंतु 'शक सोळाशें' ह्या शब्दांनीं त्याचे पुढील ओंवीस सुरुवात झाल्यामुळें तुकाविप्राचा प्रयाणकाळ शालिवाहन शकाच्या सतराव्या शतकांत केव्हां तरी असला पाहिजे, असा रा. चांदोरकर यांचा तर्क आहे. तुकाविप्रांचे शिष्य बापू विप्र यांचे पणतू मोंगलाईंत अंजनवती येथें राहतात त्यांजकडे अगर पंढरपूर येथें तुकाविप्रांच्या समकालीन कवींच्या वंशजांकडे ह्यासंबंधीं जरूर शोध लागावा. इतिहासजिज्ञासूंना ही गोष्ट चिंतनीय आहे खास.

## २४ "गौरनाल आलपिट्टण"ची मुद्रा.

(लेखक—रा. गं. ना. मुजुमदार)

माझे दप्तरांत एका जुनरी कागदावर मोडींत लिहिलेली नोंद आहे. ती अशीः—

" श्रीमंत महाराज छत्रपती यास राज्याभिषेक इंग्रज कुंपणी सरकार बहादूर याणीं केला १७४३ वृषानामसंवत्सर जेष्ट शु॥ ५ प्रतापसिंह राजे भोसले नामा-

मिधान केलें गौरनाल आलपिष्टण बहादूर मुख्य प्रधान याप्रमाणें मुद्रा दिल्ही शक १७४३ वृषानामसंवत्सरे जेष्ट शु॥ ५ "

कदाचित् ही तत्कालीन लोकांची समजूत झाली असावी. सदरहु मजकुराचे सत्यासत्यपणाबद्दल निर्णय झाला पाहिजे.

## २५ शनवारवाड्याची आग

( लेखक–रा. गं. ना. मुजुमदार )

पुणें येथील शनवारवाडा इसवीं सन १८२७ मध्यें अग्निमुखीं पडल्याबद्दल बॉम्बे गॅझेटियरमध्यें–व्हाल्यूम १८, भाग ३, पान ३४६ वर असें लिहिलें आहे:–

" In 1827 on Thursday, the bright sixth of Phalgun or March-April, the palace caught fire and continued burning abont a fortnight. In spite of all efforts almost the whole of the palace was destroyed. Among the part saved was the Minor Hall, which has since been removed."

त्याचप्रमाणें शनवारवाड्याच्या दिल्लीदरवाजास लागूनच पश्चिमबाजूस बसविलेल्या कोरीव कोनशिलेवर हि " तो राजवाडा सन १८२७ साली आग लागून जळाला " असा उल्लेख आहे.

परंतु मी आपलें स्वतःचें दप्तर चाळीत असतां, ज्या वेळीं सदरहू वाडा जळाला त्याच वेळचें एक अस्सल पत्र सुदैवानें उपलब्ध झालें आहे. तें पत्र माझे पणजे कै॥ ती॥ नीळकंठराव नारायण ऊर्फ रावसाहेब मजमदार यांस पुण्याहून इंदूर मुकामीं फाल्गुन शु॥ १४ रोजीं पाठविलेलें आहे. त्यांत पुढील प्रमाणें स्पष्ट उल्लेख आहे.

" शु॥ ७ गुरुवारीं थोरला वाडा शनवारचा येथें अग्नीचा उपद्रव होऊन चौसोपी व आरसेमहाल गणपती रंगमहाल वगैरे दरोबस्त काम जळालें मोठा प्रलय झाला आठ दिवस जाले चुकून पांच पन्नास खण राहिले साहेबांनी प्रयत्न केला तथापि उपाय चालला नाहीं दोन दिवस आगीचा उपद्रव होता "

मूळ अस्सल पत्रांत इकडील मामूल रिवाजाप्रमाणें शकाचा उल्लेख केलेला नाहीं. फाल्गुन शु० ७ गुरुवार हा योग मोडॅकचें जंत्रीवरून शके १७४३ तच येतो.

यांवरून शनवारवाड्यास आग ता० २८ फेब्रुवारी सन १८२२ रोजीं लागून ता० २ मार्च पर्यंत होती असें स्पष्ट होतें. याशिवाय जुन्या वृद्ध लोकांच्या मुखानें सुद्धां " पेसवाई बुडाल्यानंतर सुमारें चार पांच वर्षांत च शनवारवाड्यास आग लागून

तो जळाला " असें खात्रीपूर्वक समजतें. गॅझेटियरकार यांनीं दिलेली मित्ती फाल्गुन शु॥ ६ शके १७४८ ही व वाड्यावर सांप्रत बसविलेल्या संगमरवरी कोनशिळेवरील आगीचा सन १८२७ चुकीचीं ठरतात.

सदरहू अस्सल पत्र माझ्याजवळ आहे.

## २६ पेशव्यांच्या शिकारखान्याची जागा

( लेखक-रा. गं. ना. मुजुमदार )

मी हल्लीं ज्या वाड्यांत रहात आहें ( पुणें शहर, पेठ कसबा, मुजुमदारांचा वाडा, घरनंबर २९७ ) तेथें पूर्वीं रा० सिवाजी शंकर व नरसिंगराव बल्लाळ मांडवगणे पुणेकर यांच्या मालकीची बखळ जागा होती. तेथें माझे मूळपुरुष नारो गंगाधर व त्यांचे पुत्र निळकंठ नारायण हे इमारत वाडा बांधोन नांदत आले.ती जागा माझे निपणजे नारो नीळकंठ यांस वरील मांडवगणे यांजीं दीडहजार रुपयास खरेदी दिली. त्या खरेदीखतांत चतुःसीमा पुढीलप्रमाणें दिल्या आहेतः—

" पूर्वेस मल्हार राम बापट दक्षणेस मैराल नारायण गपचुप पश्चमेस सरकारचा **सिकारखाना** पलिकडे रस्ता उत्तरेस गली पलिकडे भटंभट ढेरे येणेप्रमाणें हद महमुद आसे "

सदरहू खरेदीखत शके १७०० विलंबी नाम संवत्सरे आश्विन शुद्ध १ रोजीं लिहिलेलें असून त्यावर होनप देशपांडे प्रांत पुणें व सिदोजी नरसिंगराव व मालोजी नाईक सितोळे देशमुख प्रांत पुणें ह्यांच्या सह्या असून शिवाय त्यांचा शिक्का आहे.

यावरून वरील वाड्याचे पश्चिमेस लागूनच श्रीमंत पेशवे सरकार ह्यांचा शिकारखाना होता असें स्पष्ट दिसतें. हल्लीं सदरहु शिकारखान्याचे जागेवर श्रीनरहरींचें देवालय व रा. गुंजाळ यांचें घर आहे. तपासाअंतीं, श्रीनरहरीचें देवालय प्राचीन नसून पेशवाई बुडतांच स्थापन झालेलें आहे, असें समजतें.

## २७ नानाची पेठ

( लेखक-रा. गं. ना. मुजुमदार )

पूर्वीं आमचेकडे कसबे पुणे येथें पंचवीस बिघे इनाम जमीन होती. त्या जमिनीपैकीं सात बिघे जमीन नानाची पेठ वसविण्याकरितां घेऊन त्याबद्दल मोबदला

तितकीच जमीन मौजे धानोरी तालुके हवेली जिल्हा पुणें येथें श्रीमंत सवाई माधवरावसाहेब पेशवे यांनीं दिली.

लेखांक ( १ )—प्रथम बापूजी आनंदराव कमाविसदार कसबे पुणे यांस बाळाजी जनार्दन फडणीस यांचे हवालीं जमीन करण्याबद्दल सनद छ ५ साबान सन तिसैन मया व अलफ वैशाख मास या दिवशीं म्हणजे तारीख २० एप्रिल सन १७९० रोजीं दिली. त्या अर्थी इसवी सन १७९०।९१ सालीं पेठेची वसाहत झाली हें उघड आहे.

लेखांक ( २ )—मोबदला जमीन देणेबद्दल रा. रामचंद्र नारायण यांस दिलेल्या ताकीदीवर छ ५ जिल्हेज सु॥ खमस तिसैन मया व अलफ—म्हणजे तारीख ३ जून सन १७९४ ही आहे. यांत " राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस याणी नवी पेठ वसविली " असें लिहिलें आहे. त्यावरून पेठेच्या वसाहतीचें काम थापूर्वी च संपलें असें स्पष्ट दिसतें.

लेखांक ( ३ )—अव्वल इंग्रजींतील एक पुराव्यादाखल आहे.

लेखांक ( ४ )—पेठेच्या वसाहतीकरितां लोकांस कशा प्रकारच्या सवलती मिळत असत वगैरेबद्दल या कागदावरून विशेष समजण्यासारखें आहे.

वर दिलेल्या वसाहतीचे काळाशीं पुणे गॅझेटियर भाग ३ रा पान २७५ मध्यें दिलेला सदर पेठेच्या मूळ वसाहतीचा काळ जमत आहे.

श्री

लेखांक १

3756

नकल

Inam
A
commission

यादी बाळाजी जनार्दन फडणीस सु॥ तिसैन मया व अलफ शहर पुणें येथें नवी पेठ वसवावयाकरितां कौल देऊन गणेश पेठेचे पूर्वेस नागझरीचे पलीकडे भवानी पेठेचे उत्तरेस रास्ते याचे पेठेचे दक्षणेस वोढा आहे तेथपर्यंत दक्षण उत्तर रुंदी गज ४५० साडे च्यारसे व लांबी पूर्व पश्चम नागझरीपासून गज ६०० साहासे याजप्रों जागा पेठेचे वसाहतीस दिल्हे पाहिजे

साडे ज्यारसे गज रुंदी व साहासे गज लांबी याप्रों नवी पेठ वसवावयास जमीन नेमून दिल्ही असे याप्रों बाळाजी जनार्दन फडणीस याचे हवाली जमीन करणे तर्थ वसाहत करतील म्हणोन बापूजी आनंदराव कमावीसदार कसबे पुणे यास सनद देवावी देणे

छ ५ साबान तिसैन मया व आलफ वैशाखमास

लेखांक २

श्री

2456

Inam
B
Commission

राजश्रीयाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्र नारायण स्वामी गो.

पो॥ माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष राजश्री नारो नीलकंठ मजमदार या(जकडे) कसबे पुणे पो पंचवीस बिघे (जमी)न चालत आहे त्याप्रो सात बिघे जमीन राजश्री बाळाज जनार्दन फडणीस याणी नवी पेठ वसविली त्यांत गेला सबब त्याचे मोबदला जमीन बिघे

| | | |
|---|---|---|
| ॳ५ | बागाइती दर बिघा रुपये ५ प्रों रुपये | २५ |
| ॳ२ | जिराइती दर बिघा रुपये ३ प्रों रुपये | ६ |
| ॳ७ | | ३१ |

एकूण सात बिघे जमीन एकतीस रुपये कमाल आकाराची देविली असे तरी प्रां पुणे पो हरएक गांवी सदरहू प्रों नेमून देऊन मारनिलेचे नांवें खर्च लिहीत जाणे जाणिजे छ० ५ जिल्हेज सु॥ खमस तिसैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंति.

बार

श्री

लेखांक ३

हुकुम कंपणि
इंग्रेज बहादुर
कलकटर पुणे

सरकार कलकटर पुणे नि॥ कुंपणी इंग्रेज बाहादुर त॥ मोकदम कसबे पुणे सु॥ तिसा अशर मया तैन व अलफ राजश्री नारो नीलकंठ मजमदार यांजकडे कसबे मजकुरीं मुंजेरी पैकीं राजपत्रीं इनाम जमीन पंचवीस बिघे चालत होती पो सात बिघे जमीन बाळाजी जनार्दन फडणीस याणी पेठेचे वसाहतीकडे घेऊन मुबादला मौजे धानोरी येथें देविले बाकी बिघे ॥१८ आठरा चालत आहे त्याप्रमाणें चालविली पाहिजे म्हणोन मारानिलेकडील कारकुनानी समजाविले त्याजवरून हे ताकीद सादर केली असे तरी सदरहू आठरा बिघे इनाम जमीन मजमदार यांजकडे चालत आल्याप्रों साल मारीं चालवणे जाणिजे ता। ११ आक्टोबर सन १८१८

( Sd ) Robertson

बार

श्री

लेखांक ४

नकल

( प्रथम वरील लेखांक १ मधील मजकूर अक्षरशः उतरला आहे )

| पेठेसंमंधी | कलमे |
|---|---|
| पेठेत वाणी उदमी वगैरे घरे व दुकाने बाधोन राहतील त्यास दुकानदारास सात साला माफीचा कौल द्यावयाची आज्ञा | पेठ मजकुरी सिबंदी प्यादे व कारकून ठेविला पाहिजे व चावडी बाधिली पाहिजे जो खर्च–लागेल तो पेठेचे महसुला पै॥ देवावा |
| वाणी उदमी सावकार याणी कोणे गोष्टीची अंदेशा न धरिता पेठेची वसाहात करावी येविसी सात साला कौल दिला असे कौल पुरल्यावर शहराची | कारकून व प्यादे याचा खर्च व चावडी बाधणे यास चौकसीने होऊन सरकारात समजावावा कौल भरल्यावर पेठेचे महसुलाचे ऐवजी मजुरा पडेल कौलापूर्वी |

आणखी पेठा आहेत त्याजपासून महसूल घ्यावयाचा सिरस्ता आहे त्याप्रों पेठमजकूरचा घेतला जाईल म्हणोन कौल देवावा देणे

कोतवालीकडील व बटछपाईचा उपद्रव लागो नये

कोतवालीकडील बटछपाईचा उपद्रव सात साला लागणार नाही कौल भरल्यावर सिरस्तेप्रों बटछपाई घ्यावी येणे प्रें॥ करार करावे करार

कौल भरे तोपर्यंत सरकार खरेदीचा उपसर्ग लागो नये

पेठ मजकुरी आमदानी होईल त्यास सरकार खे॥ कौल भरे तोपर्यंत घेऊ नये पुढे सिरस्ते प्रों करावे येणे प्रें॥ करार करावे करार

काइ कमावीस जाली तर सरकारात घ्यावी याप्रों करार करावे करार

पेठेचे सेटेपण फीरंगोजी खाडे याजकडे करार करोन दिल्ही पाहिजे

पेठेची वसाहत करणे कुले आणे आमदानी करणे ही गोष्ट फिरंगोजी खाडे यास सांगितलेली असे व पेठ मजकूरचे सेटे पण करार करोन दिल्हे असे कौल भरल्यावर सेटेपणाचा हाक करार करोन दिल्हा जाईल त्याजप्रो घेत जाऊन तू व तुझे पुत्र पौत्रादि वौशपरंपरेने सेटेपणाचे वतन आनुभऊन सरकार चाकरी करोन सुखरूप राहणे म्हणोन फिरंगोजीचे नावे पत्र देवावे देणें

छ ५ साबान सन तीसैन मया व आलफ वैशाखमास सनद व कौल लिहिणें

सदरहु प्रो पेठेचे वसाहातीस जमीन देविली असे तर तुम्ही आपले हवाली करोन घेऊन वसाहात करणे याप्रों व वरकड पेठे संमधी कलमे लिहून बालाजी जनार्दन याचे नावे सनद देवावी देणे

छ ३ सफर इहिदे तीसैन सनद लिहिणें

---

## २८ वाडीकर व कोल्हापूरकर यांमधील झटापट

( लेखक–रा. पां. न. पटवर्धन )

राजापूर, जि० रत्नागिरी येथील सुप्रसिद्ध सांपळे घराण्यांतील विद्यमान वंशज रा० गोविंद मोतीराम शेट सांपळे यांचेकडे शके १७२९ मध्यें वाडीकर व कोल्हापूरकर यांचे दरम्यान झालेल्या झटापटीसंबंधानें एक खासगी पत्र उपलब्ध झालें. श्रीराम सांवत ऊर्फ रावसाहेब हे शके १७२८ श्रावण शु. १४ स वारल्यामुळें, सांवतवाडी दरबारची स्थिति साहजीकच घोंटाळ्याची झाली. ही स्थिति पाहून आपला फारा दिवसांचा हेतू साध्य करून घेण्याकरितां कोल्हापूरच्या राजानें स्वतः सैन्यासह स्वारी केली.

इकडे दुर्गाबाईचा भाऊ रामचंद्रराव खानविलकर यांनींहि फौज जमा करून कोल्हापु - करांवर उलट चाल केली. हें पत्र उभयतांच्या सैन्यामध्यें शके १७२९ पौष शु. १५ स मालवण येथें झालेल्या झटापटीसंबंधाचें असून, तें पौष व॥ ६ मंगळवारचें आहे. खाजगी पत्रांतूनही राजकीय उलाढालींचा ऊहापोह करण्याचा तत्कालीन लोकांचा परिपाठ होता, हें उघड आहे. सांपळ्यांचें दफ्तर अनेक दृष्टींनीं महत्वाचें आहे. इतिहास-संशोधकांनीं व विशेषतः कोंकण प्रांतस्थ संशोधकांनीं कोंकणांतील ऐतिहासिक घराण्यांचीं दफ्तरें तपासण्याचें मनावर घेतल्यास अतोनात फायदा होईल हें जातां जातां सुचवितों. उपलब्ध झालेलें पत्र असें आहेः—

श्री

शके १७२९

श्रीयासह चिरंजीव राजश्री वासुदेव शेट सांपळे मु॥ बंदर राजापूर यांप्रती गोपाळ पांडुरंग शेट सांपळे मु॥ बंदर मालवण आशीर्वाद उपरी आज ता॥ पौष बहुल ६ मंगलवार प्रातःकालपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष तुम्ही पत्र +++ पाटेल याजबरोबर पा॥ ते प्रा॥ जाहालें लि॥ मा॥र सर्व कळों आला पलिते दहा पा॥ प्रों पोचले इकडील वर्तमान तर वाडीकर सावंत यांचा जमाव आला पौष शु॥ १५ बुधवारीं प्रातःकालीं आला होता त्यांजवर जेंजीरचे लोकांनीं युद्ध करून जमावाचा बहुत नासाड केला कांहीं लोक ठार जाहले कांहीं जखमी जाहाले कांहीं लोक मोडावले कांहीं लोकांचा थांग नाहीं कांहीं वाटेस जात जातां प्राणत्याग केला ऐसी सावंत याच्या लोकांची वाताहात जाहाली. सावंत यांचा जमाव फिरोन नेरूरास गेला तुम्हांस कळावे करितां लि॥ आहे आमची सर्व मुलें माणसें येथें कांहीं जंजेरीवर सुखरूप आहेत सावंत याचा जमाव फिरोन येणार येसी आवाई आहे पुढें काय होईल तें पाहावें करवीराहून फौज सत्वरच येणार आहे लष्करचा मुक्काम याच गावास जाहाला म्हणोन आज पत्रें आलीं आहेत वरकड मुखजबानी ××× पाटेल सांगतां सविस्तर कळों येईल तुम्हीं वरचेवर कागदपत्र पाठवीत असावी वरकड सविस्तर मागाहून लिहितों बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद

## २९ विजयदुर्ग किल्ल्याची हकीगत.

( लेखक—रा. पां. न. पटवर्धन )

श्रीरामेश्वर

अस्सल ब॥ नक्कल

यादी किल्ले विजयदूर्ग हा किल्ला कोणी कोणते शकांत बांधिला व तो बांधावयासी काय खर्च लागला व त्याचे किंमतीचा अजमास काय होतो व आणखी सर-

कारी इमले तेथें असतील त्याची सदरहू चौकशी करणेविषयीं हुजूरचा हुकुम नंबर ( ) ता( ) माहे दिजंबर सन १८३५ चा सादर जाहला त्याजवरून किल्ले मजकुरीं आनंदराव रामाजी सानालेकर शिरस्तेदार जाऊन तेथील राहणार भले माणूस व माहितगार याज-जवळ चौकशी केली तें सुरूसन सीत समसैन मया तैन अलफ शके १७५७ मन्मथ नाम संवत्सरे

१ शिवाजीमहाराज यांचे वडील शाहाजी राजे हे निजामशहा, पादशाहाराजा यांजकडे चाकरीस होते ते समयीं चाकण किल्ला आपले निसवतीस घेतला नंतर आपली जाहागीरी पुणें व कर्नाटक प्रांत घेतला. शाहाजी राजे यांणीं आपली स्त्री जिजाबाई ही गरोदर होती त्यास शिवनेरी किल्यावर ठेवून कर्नाटक प्रांतांत गेले जिजाबाई शिवनेरीवर असतां शिवाजीमहाराज शके १५४९ प्रभव नाम संवत्सरे सन समान अशेरीन अलफ वैशाख बहुल ( ! ) द्वितीयेस जन्म जाहला ते तीन वर्षांचे होतपर्यंत तेथें होते त्यास व जिजाबाई यांस आपले भेटीस आणिली ती महाराज बारा वर्षांचे होतपर्यंत तेथेंच होते, तेव्हां पातशाहाचे भेटीस नेले त्यांणीं पादशहास मुजरा केला नाहीं हें शाहाजी राजे यांणीं पाहोन याची वर्तणूक ठीक नाहीं शेवट-पर्यंत याची बुद्धि अशीच राहिल्यास पादशहास व आपल्यास वैरत्व पडेल अशी करणी याचे हातून होईल यास्तव आपले ज्याहागिरींत रवाना करून द्यावें, असा सिद्धांत करून विजापुराहून जिजाबाईसाहेब व शिवाजीमहाराज यासीं पुणें सुभ्यावर दादाजी कोंडदेव कुळकर्णी हे होते ते बहुत विश्वासु त्याजजवळ पाठविले तेव्हां दादाजीपंत पांच हजार फौज माहाराजाचे हुजुरांतीत ठेविले नंतर महाराज रायगडास घेऊन किल्ले कोट बांधीत गेले त्यास विजयदुर्ग किल्ला हा शालिवाहन शके १५७५ विजयनाम संवत्सरे सन अर्बा खमसैन सालीं बांधिला त्यास सत्तावीस बुरूज आहेत हा विजय संवत्सरीं बांधिला सबब याचें नांव विजयदुर्ग असें ठेविलें तो विजय संवत्सर महा-राज यांचे कारकिर्दीत सदहू शकांत आला यांजवरून १५७५ शकांत बांधिला असें होतें मागील कागदपत्र कोणांजवळ नाहींत हा किल्ला बांधावयास एक कोटी रुपये लागले असतील असा आदमास दिसतो हें काम समुद्रांतील पैका खर्च करूनच होते असें नाहीं महाराज ईश्वरांश पुण्यप्रतापि त्यायोगें करून काम सिद्धीस जाऊन कीर्ति चालत आहे त्यां आलीकडे किल्याचे आंत व इमलें वगैरे कामें केलीं त्यास खर्च लागला असेल त्याचा अजमास रुपये

८२००० आंगरे सरखेल यांणीं काम केलें तें अमुक शकांत एक वेळ चाललें असें माहीत नाहीं

४०००० किल्याचे पूर्वेचे बाजूस फडास जागा पात काम बांधोन तट त्यास तोफांच्या वज्या केल्या आहेत त्यासुद्धां खर्च लागला तें रुपये

१०००० वर किल्याचे आंगावरोबर दक्षिणेकडे पूर्वेपासून पश्चिमेस समुद्रास मिळविला त्यास

३०००० कोठी चिरेबंदी चौआंगे वितीवरपर्यंत तिमजला कौलारू बांधिली खालीं फरसबंदी आहे त्यास

२००० सदर प्रथम बांधिली, त्यावेळीं खर्च लागला ते रुपये

---

८२०००

१७५००० पेशवे यांचे अमलांत मामलेदार ता मारीं आले त्याणीं कामें केलीं ते अमुकच शकांत व एकच वेळ केलें असें मिळत नाहीं त्यास खर्च रुपये

१५००० लादणी यशवंत दरवाजा आंत दक्षिणेस रामसजा नजीक कुलबाजी मांडे हवालदार याणीं माहादाजी रघुनाथ मामलेदार याचे कारकीर्दीत बांधिली

४०००० हौद चिरेबंदी पाण्याचे साटाकरितां महादाजी रघुनाथ बिवलकर मामलेदार यांणीं बांधिला

३०००० लादणी हौदानजीक चिरेबंदी चौफर आंत दारूगोळा ठेवावयाची जागा वर बैठकीची जागा दर्या वगैरे हवा पाहाण्याची जागा या लादणीचें काम प्रथम माहादाजी रघुनाथ यांणीं केलें. त्याजवर गंगाधर गोविंद मामलेदार यांणीं पुरे केले त्यासुद्धां खर्चास अदमास

१०००० घनचक्राचे बुरुजाचे उत्तरेस खालीं खुलवडा म्हणून तट नारो त्र्यंबक याणीं बांधिला त्यास खर्च

८०००० वेताळ बुरूज फुटोन तोलला होता त्याचे कामास मुळापासून गंगाधर गोविंद भानू यांणीं केलें

---

१७५०००

२७५०० हल्लीं सरकार अमल जाहाल्यावर इंजनेर खात्याकडून कामें केलीं ते सन १८२१ पासून सन १८३० पर्यंत दरसाल होत गेले ते रुपये

९५०० महांकाळ बुरूज यासी पायथ्यास भाव मोटी पडली होती ती अजम मेहेरवान जारव्हिससाहेब यांजकडून काम करण्यास विठ्ठल रघुनाथ कामत आले त्यांणीं काम केलें, त्यास रुपये

१८००० अमज पोर्जिटसाहेब यांणीं वेताळ बुरुजानजीक तीन चार भाबी तटास पडल्या होत्या त्या नीट केल्या व कोठी व सदर व नगारखाना व रामसेना व यशवंत दरवाजा वरील तक्तपोशी सुद्धां बंगला व गरूड दरवाजा व हणमंत दरवजा ग्याट एक व विहीर एक किल्याचे दगडुजीचे वगैरे नवे काम केलें त्यांस

२७५००

२८४५०० एक कोटी

एकूण दोन लक्ष चवऱ्यायशीं हजार पांचशे रुपये प्रथम काम करतेवेळीं लागले असतील असा अजमास नजरे येतो हल्लीं सदरहूचा अदमास एक कोटीपर्यंत होईल असें दिसतें

१ किल्ल्यापासून एक कोसपर्यंत लांब पूर्वेच्या अंगास आरमारच्या पालगुराब वगैरे गलबतें छावणीस ठेवण्याबद्दल आंगरे सरखेल यांणीं खणोन खाली पापडी व खाडीचा धका वगैरे इमारत बांधिली आहे, त्याचा अदमास रुपये १०००० हल्लीं किं. रु. ६००० पर्यंत नाके–मेट किल्ल्यापासून दक्षिणेच्या अंगास खुषकी मार्ग आहे याशिवाय दुसरा टापूवर येण्यास खुषकी मार्ग नाहीं हे नाकें आंगरे सरखेल यांणीं बांधिलें. त्याचें काम बुरूज व तट मिळून एकंदर रुपये १००० हाल्लीं किं॥ रु. ५०० अदमासें

येणेंप्रों जंजिरे मजकुरीं इमले हल्लीं आहेत. ता। १३ माहे दिजंबर सन १८३५ मित्ती मार्गशीर्ष व॥ ९ शके मजकूर

सह्या

१ रामभट बिन संभुभट लळीत ज्योतिषी उपाध्ये धर्माधिकारी मौजे गिरे दस्तुर खु॥

१ गंगाजी बिन रामजी नाईक जावकर दस्तूर खु॥

१ बच्याजी महादेव दामले व॥ गोपाळ बागद खु॥

१ कृष्णाजी धोंडदेव लेले दस्तूर खु॥

१ मोरो बापूजी तलाटी पेटा गिरे

# ३० सासवडच्या जगतापांचा करीना

( लेखक–रा. पां. न. पटवर्धन )

श्री

नकल

करीना मुळारंभ मूळ पुरुष राजश्री हरजीराजे तुवर जगथाप यापासुनी वतनाची साधनूक जाहालीयाचा तपसील तेथून वंशपरंपरा चालत आली येणेप्रमाणेः—आलमगीर पातशहा दिलीत त्याहून दक्षण देशास येऊन तख्तबेदरी राहून गड किले याचा बंदोबस्त करावयाकारणे समागमे नामी नामी मोगल पठाण व रजपूतराजे सिवाय परिवार सरजामी फौज बे॥ तोफखाना येणे सरजाम घेऊन बेदरी राहिले त्याणी तमाम मुलुकांत बेवंद भूमिगिरी करीत होते त्याचा बंदोबस्तात जागा जागा जबरदस्ती पोहो चऊन आमीर लोकास ठाणे देऊन मुलुक आबादी करून स्थापना जाल्या मावळ प्रांा गड किले होते तेहि कावीज करीत करीत मीरसाहेब मोगल हे फौज सरजाम जबरदस्त घेऊन थोर थोर पतकी लोक घेऊन आजमगड वजीरगड हे दोन्ही किले सर करून मीरसाो किल्यात खासगत आपले ठाणे बसवून राहिले किल्यापासून लांब पढ वयरान झाडी मातबर याजमुले हाती घोडे उट वे पागा वगैरे किल्या आसपास राहून तमाम रानची चराही करू लागले त्यासी मीरसोबाचे एखत्यारी कुलजमेत राजश्री हरजीराजे तवर जगथाफ नामी पतकी दिलीहून बातशाही नोकर समशेर पराजयी खिबिल्यासुधा दक्षणदेशास आले बादशाहाणी बेदरी ठाणे घातले तेव्हा हरजीराजिम.नी फलटण देसी सासवड गांव तेथे कबिले ठेवून मीरसोबरावर किले सर करावयासी आजमगड वजीरगड सर करून आपणही चडाई करून सिध्धेश्वर माहादेव जुनाट जागा तेथे राहून चारणी करून होते मग हरजीराजयानी आपले कबिले सासवड फलटण (दे)शांतील तेथून आपल्यापासी आनिले काही एक दिवस होते रानात वस्ती नसावी यास्तव सुपियात नाईक जबरदस्त चांदराज व कबराज भूमेच होते परंतु बादशाइ ठाणे येऊन बसले म्हणोन सालसुधीन चालो लागले त्यास भोईकोट सुपियात बांधिला होता वस्तीही होती चांदराज कबराज नाईक यासी व हरजीराजियासी आती भाऊपणा जाला मग हरजीराजियानी आपले कबिले वगैरे सुपियात ठेऊन मीरसोचे ध्राजे आदालतेत मुलाजमेत करून होते पुढे सनतसरडीगांव नादान वस्ती नाही एक दोन घरासी तेथील पाटील माहादजी व येसाजी कुटे आडनाव ते फार नादान चोरीमारी करून गुजारा करीत होते पुढे जबरदस्त ठाणे किल्यांत जाणोन मोलमजुरी करून होते तेव्हा ठाणियातून हुकूम जाहला की मोकदम हाजूर बोलावू (न) गावरान आबाद करण त्यासी कुटे मजकूर याणी हरजी

राजीयासी बहूत अजीजपणे होऊन काहीं कर्जवाम काढून ढोरे बैल घेऊन रानची मरामत करून लावणी करून कौलपत्र घेऊन आबादी करावीयास्तव दोघे भाऊ कुटे पाटील हरजीराजीयास हाकीकत सांगून कौलपत्र मागून घेतला यासी बैल ढोर घ्याव-यासी ताकद नाहीं म्हणोन बहुत कीवकरुणा भाकोन कर्जवाम व दाणादुणा मागून पांच सात ढोरे घेऊन शंभर दोने रुपयांची लावणी केली त्यामधें कौलाप्रमाणे किल्यात व लोकास ऐवज पावता केला थोडाबहुतकरून पाटपाणीही चालविले गेले कर्जऐवज सालदरसाल अधिक जाले नातवाणी फार कर्जाचा हिशेब भारी जाहाला यास्तव पाटील कुटे यासी पैका द्यावयासी न मिळे तेव्हां हरजीराजे जबरदस्त याणी त्यासी तसदी फार लाविली तेव्हा माहादजी येसाजी पाटीलकी गाहाण रुपये ३८५ चा कागद लेहून दिल्हा की आपली पाटीलकी चार साले गाहाण पैका फिटला तरी बरे न फिटला तरी तुम्हास पाटीलकीचा कागद करून देऊन पाटीलकीचा वारसा नाही आसा कागदरोखा करून दिल्हा हरजीराजीयानी कागद घेऊन सुपेकर नाईक याचे माहीतगारीने कागद घेतला त्यासी हरजीराजीयास पुत्र दोन वडील इमत पाटील व धाकटा नेमत पाटील हे आठाविसा वर्षामधे होते ते लस्करात स्वारीबराबर तेव्हा पांचा साहा वर्षांनी राजी-यास भेटीस आले राजीयांनी कुट्याचे कागदपत्र त्यास माहीतगार केले मग त्यानी किल्यास जाऊन कुटे पाटील बोलावून मीरसाहेबाचे कचेरीत खरेदीवतन दरोबस्त करून मेहेजरनामा लेहून घेऊन माहादजी येसाजी याणी रजा घेऊन मुलुकावर उठो गेले पाटीलकीचा हाक आदा व मानपान तमाम आपले केले पाटीलकीचे कामकाज चालते पुढे हरजीराजे सके १३४१ वरसात काल जाला त्याचे थडे सरडीचे पूर्वभागीं बांधिले याउपर इमत पाटील यास पुत्र नरसपाटील १ नेमत पाटलास पुत्र कानपाटील असे दोघे दोघास दोन पुत्र जाहाले थोर पंचविसीत दोघे येऊन दोघेही कर्ते नामी सिपाई जालम असे निवडले त्यानी आपले काजकिर्दीत चहूकडून सिवारसाधना करून गांवची वस्ती व रानाची तजराइ आसामी लोकास कौलपत्रे देऊन आबादी करविली याउपरी काहीएक दिवस उभयेता भावाभावामधे परसपरे कलह प्राप्त होता फारच कटाक्ष वाढला केवळ बेमुरवत होऊंन कजिया जाहला यामुले नरसपाटील रुसून पूर्वी फलटण देशांतील सासवडास उठोन सहकबिल्यासुधा गेले मागे कानपाटील आपण पाटीलकी करो लागला पहिल्यापेक्षा सिवारसाधणा साधून गांवाची व रानाची कीर्तै वाढविली गोरगरिबांचा कौल चालून आबादी करून होते नरसपाटील रुसून गेले होते त्यासी दोन च्यार वर्षे तिकडे सर्व कबिल्यासुधां आसता मागती भावाभावाचा मन-सुबा परस्परे लोकांचे मरामतीनें गोडी उभयेताची सेवटी एकेविच्यारावर आणिले मौजे सुपे येथील मो नाईक चांदराज कबराज याचे दोहो जणाचे दोघे पुत्र नरनाक व बालनाक याणी नरसपाटलासी व कानपाटलासी गोडीचा रहष करून जसे पहिले

ममतेने होते तेच विच्यारें उभयेताची ममता चालू लागली तोपर्यंत सनतसरडी मोजाच होता तेथून पैवस्तीचा आमल चालत आला हा करीना मुळारंभापासून जाला आसे.

## ३१ प्रभूप्रकरणीं दोन निवाड पत्रें

( लेखक—रा. पां. न. पटवर्धन )

श्री

तालीक. ऐनाप्रों

निवाडपत्र शके १६७१ शुक्ल नाम संवछर आषाढ शु॥ ५ गुरु॥ ते दिवसीं राजश्री यशवंतराव माहादेव प्रभु व गोविंद खंडेराव चिटणीस व समस्त गोत्र प्रभु यांणी सातारेच्या मोकामीं श्रीमन्महाराज छत्रपतीस्वामीं संनिध विनंती केली जे:— व्रतबंध गायत्री उपदेश करून ब्रह्मकर्मास अधिकार व्हावा ऐसीयास स्वामीस उभयतांचें अगत्य च होतें त्याचें कार्य करून द्यावे हा मनोगत आणि यासमई त्यांजवर सर्व कारकून व वेदशास्त्रसंपन्न राजश्री माहादेव भट्ट उपनाम आटले कऱ्हाडे सूत्र आश्वलायन व गोविंदभट्ट व रामभट्ट वगैरे ब्राह्मण समुदाय प्रभुपक्षीं असतां या उभयतां प्रभूची चाल दरबारीं कारभारसमंध बहुत त्याजमुळें राजश्री बाळाजी पंडित प्रधान व याचें कारभारी राजश्री महादाजी अंबाजी पुरंदरे यास व मुत्सद्दीमंडळी सरकारातून अष्ट-प्रधान याविसीं विदित जाहाले तपसील नावानिसी

| | |
|---|---|
| १ प्रतिनिधी | १ सुमंत |
| १ प्रधान | १ पंडितराव |
| १ सचीव | १ सेनापति |
| १ आमात्य | १ न्यायाधीश |
| ४ | ४ |

हे मुख्य व दरबारी मुत्सद्दी व ब्राह्मण सिष्ट नगरांतील एकत्र होऊन विचार मनास आणितां अगोदर दोन च्यार वर्षेपर्यंत गांठ घालून आपले जागां प्रभु यांणी परभारें वश केला असतां बहुतकरून द्रव्यद्वारा व कारभारामुळें जड भारी पडून गेली कोणाचा उपाव नांही तेव्हां राजश्री यमाजी शिवदेव व कारभारी निरंवत राजश्री जग-जीवनपंडित प्रतिनिधी यांजकडील कारकून यांस बहुत श्रुत समयोचित जावसाल सुच-

विणार यांणी मनावरं धरून आपलें आंग न दाखवितां परभारें ब्राह्मणांस ताकीदपत्रें पाठवून आणविले ते तपसील

| | |
|---|---|
| १ कऱ्हाडकर | १ वांईकर |
| १ पेणकर | १ नाशिककर |
| १ माहुलीकर | १ माहुलीसंगमीं |
| १ कृष्णाविणीतीरचे | १ ——— |

यांस आणऊन मनास आणितां प्राचीन कर्म नसोन सांप्रत काळाचें ठाईं नूतन ब्रह्मकर्म करावयास अधिकार करितात हें खोटें श्रीमंत महाराज छत्रपती स्वामी यांचे आग्रहामुळें कोणाच्यानें जाबसाल संनिध होत नांही ते समईं येमाजीपंत यांणी वाराणसीक्षेत्रीं मंदाकिनींतीरीं श्रीशंकराचार्य वौंशपरंपरानुग्रहित श्रीमत् गौडाचार्य सरस्वती षडशास्त्रवित्पन्न स्वामी समर्थ श्रेष्ठ मान श्रेष्ठ स्वामी वंद्य वगैरे श्रेष्ठ स्वामी अन्यस्थळींचे वर्तमांनी वर्तनिवेदन केलें त्याजवर स्वामीस विशाद दिसोन आलें जः—नूतन अधिकार द्यावयास नसोन ब्राह्मण कर्मे होतात याजवरून अपूर्व दिसून आलें याचप्रकारें श्रीशृंगेरी मठाहून श्रीमत् परमहंस स्वामीस वर्तमान निवेदन केलें उभयतांस ही गोष्ट मान्य जाहाली नांही त्यांणी उत्तर दिलें कीं कलि धर्मावताररूप प्रघट जाहाला कीं यवंनी एकमय जाहाली अंती होणार असें भविष्य आहे तो समय सांप्रतच दिसतो परंतु दोनीं क्षेत्रीं धर्मस्थान धर्माचरण न करितील त्यांस सिक्षा करावयास योग्य समर्थ येथनिमित्य दोंही स्थलींहून वेदशास्त्रसंपन्न ब्रह्मवृंद रवाना करून दिलें बितपसील

| शृंगेरीमठाहून आले:— | श्रीवाराणसीक्षेत्राहून आले:— |
|---|---|
| १ गोपाळाचार्य | १ गुणाकार पंडीत |
| १ व्यंकटेश पंडीत | १ पुरुषोत्तम पंडीत |
| १ वेणीराम पंडीत | १ नारायणराव पंडीत |
| १ श्रीनिवास पंडीत | १ गोविंदाचार्य |
| १ माधवाचार्य | १ गोविंदनाथ देव |
| ५ | ५ |

१०

येणेप्रों पंडीत व आणखी ब्राह्मण दशग्रंथी समुदायेशाहा वर्तमान सातारेच्या मुकामीं आले ते समईं अन्यस्थलींच्या व कराड वांईकर वगैरे एकत्र ब्राह्मण मिळोन

दाहा हजारपर्यंत दरबारी प्रसंग केला. जे प्रभु यास पुरातनपासोन जे कर्म नसतां नवीन कर्माचा सांक्षेप येदर्थी कलीमध्यें वर्ण दोन ब्राह्मण व शूद्र राहिले क्षत्री व वैश्य या दोनी वर्णांचा क्षय जाहला स ( ह ) देवासी येक पुत्र राहिला तो बद्रिकाश्रमी होता तयाकरितां कली धर्माचा नाश कलंको अवतारीं करील मग क्षेत्रीपुत्रास राज्यास्थानीं स्थापील तेव्हां प्रभु यास तीन कर्मास अधिकार कोठून द्यावा मग भट आठलेकर तसक्षी यांणी उत्तर केलें जे शाणवई यांसी शटकर्माचा अधिकार आहे आणि यास नांही याचा आर्थ काये म्हणतां च मग दोनी स्थळींहून दशविध्र ब्राह्मणाच्या वंशपरंपरा शैयाद्रीखंडी समूळ आद्यांत आहे ती श्रींगेरी मठाहून आणविली ती त्यांत संविस्तर ब्राह्मणाचा आच्यार व देश तपसील

| पंचगौड ते कोण | पंचद्रवीड ते कोण |
|---|---|
| १ मुख्य गौड | १ मुख्य द्रवीड |
| १ कानकुबज | १ महाराष्ट्र |
| १ मयथील | १ तैलंग |
| १ सरस्वत्य | १ कर्नाटक |
| १ उतकील | १ गुर्जेर |
| ५ | ५ |

येणेप्रों दशविध ब्राह्मणाचा कुळियामधें जेष्ट घर गौड यास निमित्यें वेदशास्त्रसंपन्न पुराणोत्पन्न श्रीवारणासी पूर्वदेशी वियाजन्म येत्र येत्र स्थलीं याजकरितां वडिलपणाचा अधिकार त्यांजदल व दुसरे द्राविडांकडे जे श्रीक्षेत्राहून वियाभ्यासी प्राप्त याप्रमाणें म्हणोन कनिष्ट व पंचगौडामधें विच्यार व द्रविडामधें आच्यार हे दोनी मार्ग पुरातनपासोन चालत आहे असें आसतां त्रेतायुगीं श्रीपरशराम अवतार क्षेत्रीये कुळीं सहस्त्रार्जुन माहावाहूचें होऊन व्येभिच्यार धर्में वर्तणूक सर्व हि क्षेत्रीं करूं लागले तेव्हां परशरामानें एकवीसवेळां निक्षेत्री पृथवी करून सुमंत पंच क्षेत्री रुंधीयच नधीमधें तिळोदक मंत्र येज्ञास्थव ब्राह्मण येज्ञ केला उपरांत क्षत्रीकुल आपण सर्वहार केला ब्राह्मणहत्या पातकें जाहलीं म्हणोन पश्चाताप बहुत होऊन पृथवीचें राज्य आपले घरास आले आपणास राज्य काय करावें आपण ब्राह्मण तप करीत आसावें भुर्माभार उतरून स्वस्थ आसावें हा विचार चित्तांत आणून संपूर्ण पृथवीचें राज्य ब्राह्मणांस दान दिल्हे आपणास राहावयास स्थल पाहिजे म्हणोन समुद्रापासून जागा चौदा कोश रुंदी व चौऱ्याहातर गांव लांबी घेऊन तेथें ब्राह्मण स्थापना केली ता।

१ कल्याणच्या नदीपासून राजापूरचे नदी पो महाराष्ट्र देशीचे ब्राह्मण न्हेऊन १ राजापूरचे नदीपासून आचरेचे नदीपर्यंत जागा कराडे यास दिली हेहि देसी

स्थापना केली आणि चित्तपावन नामाभिधान ठेविलें . . . कलम

१ रगवेदी आश्वलायन गोत्र

१ आपस्तंब यजुशाखी

हून न्हेऊन स्थापना केली आश्वलायन शाखी दुसरी शाखा नाहीं हे विषमारक जाणावे . . . कलम

---

४

येणेप्रों पुढें मसूरचे नदीपासून आंकलेश्वरचे नदीपासून माहाल कुडालचे नदीपर्यंत आपणास राहावयास स्थान ठेविलें हरमल तर्फ पेडणे येथें राहिले येज्ञास प्रारंभ आश्वीनमासांमधें करून दोषाचा नाश करावा येदर्थी सर्व साहित्य करून येज्ञास प्रारंभ केला तो येज्ञसमुदाय गौडब्राह्मण पाहिजे तेव्हां गौडदेशाहून सारस्वत्य ब्राह्मण त्रिहोत्रपूर नामक क्षेत्र आहे तेथून दशगोत्री आश्वलायन शाखा रगवेदी आणून स्थापना केली मसूरचे नदीपासून आंकलेश्वरचे नदीपर्यंत हा देश शाश्वत ब्राह्मणास दिला सारस्वत्य ब्राह्मणामध्यें मुख्य शिवशर्मा व देवशर्मा आत्रीगोत्री व विष्णुशर्मा वछ गोत्री व कवंडण्य गोत्री व कंवशीक गोत्री हे तीन गोत्री मुख्य याचसंमंधी भारद्वाज सत्य येकून दशगोत्री यांस शाश्वत स्थापून यांस मोकासा कसबे मजकूरपों निंमे स्थळ देऊन केळोसी कुश स्थली साष्टीनर्जीक गोमांतक त्रिवर्गासी देऊन मसुरेपासून आंकलेसिंव्हेश्वरपर्यंत बारदेसयास दिला तेव्हां दोन प्रस्था पडलीं जे सेणवाई म्हणावयास कारण काय तर ब्राह्मण तमाम कारकून रोजगार करून कालक्षेप केल्यास त्यास पंत अथवा सेणवाई म्हणावें हें पुरातन शैयाद्रीखंडीं कथा आहे असें सांगतां च सर्वांसी समज पडला मग परभुंचा उत्पत्ती कोठून म्हणोन प्रच्छा केली तेव्हां दालभ्य रुषी होते त्याचे दासीपासून त्यांची उत्पत्ति त्यांसी अधिकार कोणते च गोष्टींचा नांही केवळ शूद्रापासून उत्पन्न म्हणून परभू हें नामाभिधान याप्रकारें वर्तमान आसतां आन्यथा मार्ग पदवी जर यांसी दिली तर सिद्धीस जाणें कठीण पहिले वेदशास्त्रसंपन्न कैलासवासी गागाभट यांणी क्षेत्रीशर्मास अधिकार राज्यास घृतबंध करून गाईत्री उपदेश करून स्थापिलें ते कर्म सिध्धीस गेलें नाहीं दोनींहिं वंशानें निर्मूळ जाहलें हें प्रत्यक्ष जाणून आमार्गानें वर्तल्यास साध्य श्री कृपा नांही आपापले मार्गी तत्पर आसावें हे उचित असे व सत्रे वृत्तांत श्रीमन्महाराज राजश्री शाहू छत्रपती स्वामीची निशाखातरी होऊन माहाराजांनीं खोटपत्र ल्याहावयास आज्ञा केली दुसरें येमाजीपंत याणी पाटाच्या स्त्रीया प्रभुच्या घरीं पांच सात पाठविल्या त्या स्त्रिया कुडाळ खोरें वगैरे स्थळांहून आणऊन प्रत्यक्ष दाखविल्या तेव्हां माहाराजांची नाखुषी होऊन खोटपत्रें भाद्रपद शु॥ १३ येोदशीचीं जाहाली एवंच्य प्रभु याचा अधिकार कोणत्या च मार्गाचा च नांही असें खोटें ठरवून ब्राह्मणांनीं सर्वत्र माहावैदिक

दशग्रंथी व पंडित व शास्त्री या सर्वांमीं एक विचार करून माहादेव भट्ट आठले आणखी तत्पक्षी ब्राह्मण द्रव्य भक्षून त्यासारिख्या गोष्टी सांगोन व्यभिचार धर्म करावयास प्रारंभ केला. त्यास कांही शिक्षा करावी परंतु ब्राह्मण येदं-निमित्य वाळीत घालून पंक्ती वेगळे केले मग ब्राह्मणांस संकट पडलें सर्व मंडळीस शरण आले आम्ही शरण आलों आम्हांस मुक्त करावे म्हणाले तेव्हां सर्वांनी आज्ञा केली जे श्रीकाशीक्षेत्रीं जाऊन श्रीगौडाचार्य स्वामी सारस्वत्य यांस शरण गेल्यास ते कृपा करितील आणि पंक्तिपावन करितील हा उपाय सांगोन माहायात्रेस ते भट सर्व आठले वगैरे श्रीक्षेत्रास जाऊन केलेकर्माचा उच्चार करून सर्व स्वामीपांसी विनंति करून घेतली नंतर स्वामी कृपालु होऊन त्यांस पंक्तिपावन केलें नंतर श्रीस्थळी यात्रा करून भटजीमंडळीसह वर्तमान माघारे सातेऱ्यास आले ते मोकामीं माहाराज शाहूछत्रपती यांजपाशीं आले परशराम अवतार भृगुवंशी धरून भुमीभार उतरून अश्वमेध केला त्याची साक्ष अद्यापि आहे. नवे विभूतीचा टिळा दिसतो, याची साक्ष पहावयास मौजे हरमल येथें हुजरे व ब्राह्मण आपले पाठविले ते पाहून आले आणि महाराजांस विदित केलें. सारस्वत्य ब्राह्मण रगवेदी आश्वलायनशाखी हे आपले स्वदेशास जाणेस आज्ञा घेऊन गेले आणि भार्गवराम क्षत्रीं आपण राहिले इतुकें वर्तमान जाहालें येणेंप्रों निवाडपत्र जाहालें आसे

## २

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त ब्राह्मण ब्रंह्मवृंद धर्माधिकारी व उपाध्ये जोतिषी प्रांत वांई स्वामी गोसांवी यांसि:—सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ तिसैन मैया व अलफ कसबे पेडणे परगणे सालसी समस्त ब्राह्मण यांणी हुजूर निवेदन केलें कीं, श्रीमंत कैलासवासी नारायणरावसाहेब यांचे कारकीर्दीस प्रभूचे आचरणांविषई सरकारांतून ठराव करून दिले त्याप्रमाणें त्याणें वर्तावें. तें न करितां आपला धर्म सोडून मनस्वी वर्तणूक करितात येविसीं त्यांस ताकीद होऊन बंदोबस्त जाहाला पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणितां पेशजीं ती॥ कैलासवासी रावसाहेब यांचे वेळेस चौकसी होऊन परभूचे वर्तणुकेविसीं कलमाचा ठराव जाहाला त्याप्रमाणें त्यांनी सरकारांत कतबा लिहून दिला त्यांतील कलमबंदी तपसील

| | | |
|---|---|---|
| १ | वेदमंत्रेंकरून कांहीं च करणार नांही हें सत्य | कलम |
| १ | वेदमंत्र येत असतील त्याचा उच्चार एकंदर करणार नांही | कलम |
| १ | श्राद्धपक्षास अंन्नाचे पिंड करणार नांही | कलम |
| १ | देवीपूजा विहितकर्में पुराणयुक्त च मंत्रें करूनच करूं ब्राह्मणभोजन आपले घरीं करविणार नांही | कलम |
| १ | श्रीशालिग्राम पुजा करणार नांही | कलम |

१ ज्या देवास शूद्रादिक जातात त्या देवास आम्ही जाऊं — कलम
१ ब्राह्मणास दंडवत असें मोठ्यानें म्हणत जाऊं — कलम
१ वैदिक ब्राह्मण व ब्राह्मणाच्या बायका वेवहार पाणके शागीर्द ठेवणार नांही व घरींही ठेवणार नांही — कलम
१ आमचे जातीमध्यें कोणी आपले संतोषानें पाटाच्या स्त्रिया करून घेतील त्यांस अडथळा करणार नांही — कलम

—

९

येणेप्रो णऊ कलमें लिहून दिलीं असतां परभू आपले घरीं चोरून ब्रह्मकर्मे करितील तर त्यामुळां पेणेकर ब्राह्मणाचा व त्यांचा कजिया पडून परभूच्या घरीं कर्मे बंद जाहालें त्यासी येविसींचा हालीं विचार करिताना परभूच्या कर्मास आचरणाविसीं चौकसी होऊन कलमें ठराऊन दिलीं आहेत तीं योग्य असें सिष्टसंमतें ठरऊन पुण्यांत परभूंचीं घरें आहेत त्यांसी हुजूरून ताकीद करून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे तरी प्रांतमजकुरीं परभूंचीं घरें असतील त्यांस निक्षून ताकीद करून सदरहू कलमाप्रमाणें वर्तवीत जाणें जाणीजे छ २३ माहे जाखर आज्ञाप्रमाण

मोर्तब
सुद

सदरहू पत्राचें असल वांई क्षेत्रांतील ब्राह्मणाजवळ आहे.

☞ सदरहू कागदांच्या नकला गोवें प्रांतांतून रा. बापूसाहेब खरे यांचें मार्फत मिळाल्या.

## ३२ तोतयाचें खूळ

( लेखक-रा. म. चिं. केळकर )

श्रीगजानन

लेखांक १

पे॥ छ १२ सफर सीत चैत्र

चैत्र शु॥ १४।१६९८ मंगळवार          शके १६९८ चैत्र शु॥ ९ गुरुवार

सेवेसी नारो बाबाजी फडके कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना त॥ छ ७ सफर प्रातःकाल पावेतो मुकाम रत्नागिरी वर्तमान येथास्थित असे विशेष ज्या कार्यास

स्वामी येथें पाठविलें त्यास येथील मामलेदारानी फाल्गुन शु॥ दशमीस बडी तोडून सर्व सरजाम श्रीमंताप्रो करून दिला उपरान्त मी येथें आलो सनद मामलेदारांस दिल्ही ( एक ओळ गहाळ )

कोणाचे परवानगीने बेडी तोडिली पूर्ववत प्रो बेडी घालून बंदोवस्तानें ठेवावा तेव्हां त्याणी उत्तर केले कीं आज्ञे शिंवाय दुसरा विचार नाहीं परंतु हे भाऊसाहेब खरे याविषयीं आमची खातरजमा जाहली काडीमात्र लढा राहिला नाहीं याजकरितां बेडी तोडिली पुन्हा प्रतिबंध करावयाचा नाहीं याप्रों साफ च सांगितले आणि मजला सांगितलें कीं तुम्हास आपली खातरजमा करून घेणे असीले तरी ज्या प्रों पाहिजे त्या प्रों करून घ्यावी तेव्हा उठोन यावे तर ज्या कार्यास आलो त्याचे काही च न जाहाले याजकरितां आठ चार दिवस येथे राहून या मसलतीत कोणकोण आहेत मामलेदारानी इतके बल कोणतें आश्रयावरी धरिले याचा तरी पक्का शोध लावून यावे या अर्थे येथे राहिलो तीन चार वेळ किल्यांत गेलो त्या ग्रहस्तांचें माझे प्रहरभर बोलणे येकटयाचे च जाहाले त्याणे कारभाराच्या व घरातील कुलगतीच्या वगैरे ज्या फार ऐकिव नाहींत त्या गोष्टी सांगितल्या ( एक ओळ मजकूर गहाळ )

पले येकांती निरनिराळे येकटयाचे च बोलणे जाहाले ते तपसीलवार ज्या स्थलीं जाहाले ते सांगितले आणि बोलिले कीं या प्रो उभयेतास पुसान पाहावे म्हणजे खातरजमा होईल तेव्हा पुसावे असा जिवासरा वाटो लागला तेंव्हा खेरपणाचे जाब-सालाविसी बापूची व आपली खातरजमा केलियावर मग बहुत प्रकार उपदेश केला कीं तुम्ही सांगितले इतके खरे आहे तरी उभयेतास स्वदस्तुरची पत्रे लिहोन घ्यावी तेव्हा दोहो पत्रांत हिंदुस्थानात जाते समईच्या खुणा लिहोन पत्रे दिल्ही ( पुढील मजकूर गहाळ )

लेखांक २ श्री

विज्ञापना तोतया घाटाखाली आहे रामराव नारायण राजमाचकर भेटावयास गेले म्हणून ऐकतो व सदासिव भट सिंत्रे परिक्षेस गेले आहेत त्यांची खातर जमा जाली असें हि ऐकतो राजश्री मोरोबा दादा सिवनेरीस गेले कांहीं राऊत जमा करणार असें बोलतात पक्की बातमी लागेल तें लिहून पाठऊ हे विज्ञापना

लेखांक ३ श्री

विज्ञापना श्रीमंत् सौ पार्वतीबाईसी दुसरीयानें बोलावयाचा मजकूर लिहिला तो कलला त्यास बोलल्यात फल नाहीं तथापि बोलोन पाहातो लिहून पाठवीन हे विज्ञापना

लेखांक ४ श्री

पो छ २६ साबान सव्वा

विज्ञापना तां छ २६ साबान वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीनी छ २५ रोजचे प्रहर रात्रीचे पत्र पा ते प्रातःकाली पावलें बुधवारी तुम्ही कुच करून गेला ते मधी राहीला की पुण्या जवल गेलेत हे कळावे सींध्यानी काल दोन चौक्या मारिल्या तोतयाचे माणूस घाटावर याच तोंडावर आल्याची बातनी आहे तेव्हां भीमरायास इकडे आणावे किंवा तेथे च ठेवावे तुम्ही कुच करून सींद्याजवळ जाणें म्हणून आज्ञा केली त्यास मी बुधवारी प्रहर दिवस राहाता निघालो तो गुलटेकडीवर प्रहर रात्रीस आलों येता त्र सींद्याकडे पत्र पाठविलें जाब आला नाही सींद्यानी काल काम चांगले केले आम्ही काल येथे तीनसे राउतानीसी आलों मागे मानाजी फांकडे मालोजी घोरपडे मालोजी नाईक निंबालकर राहिले त्यासी बोलोन आलो आज येतील वरकड हि लोक घरीहून आज सांयकाल पर्यंत येतील कनीष्ट पक्ष दोन हजार असल्या खेरीज सींद्यांजवल कसे जावे फल काय तथापि जितके असाल तितके जाणें असें असल्यास जाईन भीवरायांचा प्रकार तर सींद्यास लिहिले आहे त्याचे उत्तर काय येते पाहातो तोतया घाट चढला नाहीं असें हि वर्तमान आहे लोक आले असीले तर सींदे आम्ही असतां भीवरायास आणावे न लगे यांत जसें दिसेल तसे करू तोफावीसी व बाणाच्या कैच्या वीसी काल लिहिलें आहे त्या प्रमाणें जलद येत ते करावे- सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

लेखांक ५ श्री

पो छ २९ साबानसवा प्रातःकाल

शके १६९८ भादपद वद्य ३ शनिवार

आश्विन शु॥ १ रविवार १६९८

सेवेसी विज्ञापना त॥ छ २८ साबान वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीनी चिठी पा॥ ते पावली रविवारी पाहाटेस उजाडता सोमवार मुहुर्त पुण्यास यावयाचा आहे त्यास तुमचे मतें कसें ते लौकर लेहून पाठविणें त्या सारखे येऊ अगर राहू म्हणोन आज्ञा त्यास तूर्त स्वामीनी येऊ नये प्रो येते समई विनंति केली च आहे किल्याखाली नेहमी दोन हजार फौज राहिली असा जथ पडला म्हणजे मग येण्यास गुता नाहीं आपण तेथें आहेत तो कोणे गोष्टीची फिकीर नाहीं याजकरिता विनंति लिहिली असे यावयाचे न करावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

लेखांक ६ श्री

शके १६९८ आश्विन शु॥ १ रविवार

सेवेसी विज्ञापना त॥ छ २९ साबान वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीनी दोन पत्रें पा॥ ती पावली सिहगडा कडील मजकूर लिहिला तो कलला तोतयाचे पारपत्य जाले पाहिजे त्यास सिहगडच्या बंदोबस्त राहिला पाहिजे त्यास होलकरानी राहावे आणि सिंद्यानी तुम्ही घाट उतरावा किंवा सिंद्यानी राहावें होलकरानी तुम्ही घाट उतरावा याचा निश्चय सिदे तुम्ही बोलोन टराव करून लिहून पाठवणें म्हणून आज्ञा त्यास आज सिंद्याकडे जाणार होतो परंतु सावकार मंडळी सरकारचे वाड्यांत मेलविली होती म्हणून मी तेथें गेलो होतो सिष्टाचार बोलणी जाली सिधांतात येईल ते खरे यामुळे फावले नाहीं सकाली जाऊन बोलोन मसलत ठरेल ते लिहून पाठवीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

लेखांक ७ श्री

आश्विन १६९८

विज्ञापना राजमाचकर रामराव नारायण यांचा मजकूर लिहिला तो कलला त्यास ऐकतो ते लिहितो येथून पत्र लेहून मुजरत जासूदजोडी पा॥ आहे उतर येईल ते लिहू आज रविवारी बाजारांत दाट आवाई उठली आहे जे राजमाची गेली परंतु तथ्य नाहीं राजश्री भिवराव यांचे पत्र छ २८ साबानचे आलें त्यांत मजकूर तोतया जावुलपाड्यास आहे वरकड बोर घाटाखाली आहेत एकदोन रोजात आम्ही गाठ घालितों म्हणोन लिहिलें आहे आम्हीं त्यास लेहून पाठविलें की उतावळी न करणें जे पाऊल टाकाल तें मजबुदीनें टाकावें दुसरे भिवरायांनी लिहिले होते की दोन हजार माणूस घेऊन गोसावी राजमाचीकडे गेला तेव्हां राजमाचकरांचे सूत्र असेलसे वाटते घडेल तें खरं स्वामींनी लिहिले कीं चिरंजीव से पनास राउत ठेवितात त्यास त्यांचा मनसुबा काय असेल तो देव जाणें कोण्या कारणास्तव ठेवितात हे कशावरून कळावे परंतु लोकवार्ता दादाकडे जाणार असी आहे हे विज्ञापना

लेखांक ८ श्री

पो छ २९ साबान सबा सबैन ( पो १६९८ आश्विन शु॥ १ रविवार )

विज्ञापना तोतया जावुलपाड्यास आहे त्रिंबक सुर्याजी व सुरवाराव बोर घाटाखालीं आहेत त्याणीं सांगून पाठविलें कीं आमचा निभाव घाटावर होत नाहीं त्याजवरून दौलतगीर गोसावी यास कुमकेस पाठविणार आपण जावुलपाड्यास राहाणार या प्रो एक ब्राह्मण आला त्याणें सांगीतलें विदीत जालें पाहिजे हे विज्ञापना

लेखांक ९ श्री

पो छ २९ साबान सबा

विज्ञापना राजश्री बाबूजी नाईक याणी तोतयाकडे बाळाजी बावाजी यास पाठविलें आहे त्याचे पत्र नाइकास खरेपणाचे आले त्याजवरून पागा आणविली तयारी करतात याप्रों त्याचे घरची बातनी आली दसरीयांस किल्यास येणार असे स्वामींनी लिहिलें होते त्यास आपल्यास लिहितात येतो बाळाजी बावाजी तिकडे पा आहेत तेव्हां दुअसफी आहेत असे परिछिन्न जाले याजकरिता राजश्री कृष्णराव यांस लिहून नाइकास हरतऱ्हेनें आपणा जवळ आणावे येविसी उद्योग करावयास चुकू नये हे विज्ञापना

लेखांक १० श्री

सेवेसी विज्ञापना स्वामीनी पत्र पाठविले ते पावले पुण्यास जावे असे राजश्री बापूचे मतें जाहालें आज येतो येथील बंदोबस्त ठीक आहे राजश्री बाबूजी नाइकाचा मजकूर लिहिला तो कलला आपले येणे होते उत्तम आहे येथे आलियावर जसा मनासुबा म्हटले तसा करावयास येईल हे विज्ञापना

लेखांक ११ श्री

सोमवार फाल्गुन व. ३०।१६९८ शक १६९८ आश्विन व॥ १४ शुक्रवार

पों छ २८ सफर सबा

सेवेसी विज्ञापना ताा छ २७ साबानवर्तमान यथास्थित असे विशेष श्रीमंत सौ पार्वतीबाई सासवडास येणार म्हणोण सरंजाम पाठविला होता त्यास मीं येथें आलों मनास आणीता निघावयाची मर्जी नाहीं असी आढलली याजकरितां विसाजी पंत जोग यास बोलावून पुसले त्याणीं सांगितले कीं तुम्ही येकवेळ येऊन विनंति करा म्हणजे निघणें होईल त्यावरून आज प्रातःकाली वाड्यात गेलो चार घटिका पर्यंत येकांती विसाजी पंतानी आम्ही विनंति केली की सर्व गोष्टी येकीकडे आणि लौकीक रक्षण येकीकडे त्यापक्षी जावे हा उत्तम पक्ष जितकी अक्कल चालली तितकी विनंति केली परंतु बोलणें हें च कीं फौजा पुण्याजवळ असतां मजला चिंता काय शरीर प्रकृतीस सासवड व किल्याची हवा मानत नाही याजकरितां येथे राहाते दुसरे वेडेवाकडे अर्थ चित्तांत आणून राहात असेन तर ईश्वराची शफत असे म्हणून बोलिली पुण्यांत राहिले असता तूर्त च प्रसंगास वाईट असे कितेक प्रकारें समाधानच्या गोष्टी बोलिलो परंतु मर्जी यावयाची नाही स्वामीस कलावें म्हणोन लिाा असें सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना होलकराचे उंट आणिले होते ते माघारें पाठवितो हे विज्ञापना

लेखांक १२ श्री

विज्ञापना तोतया राघोजी आगरे याणी धरला येविसी राजश्री महादजी सींदे यांचे पत्र आले ते पो ते पावले मोठी गोष्ट जाहाली पत्रें घेऊन आले आहेत त्यांस इनाम दोनसे रुपयाचे कडे या प्रो प्रथम खबर घेऊन आले त्यास यावें तोफा आम्हाजवळ आहेत आज्ञा पाठवावी म्हणजे सरबती करतों बापूकडे पत्र पाठवावें श्रीमंताचें प्रतापाची सीमा जाली हे विज्ञापना

* लेखांक २–१२ हरिपंत फडके यांच्या स्वदस्तुरचीं हीं पत्रें आहेत.

लेखांक १३ श्री

शके १६९८ आश्विन व. ११ बुधवार

पो छ २४ रमजान सबा

विनंति उपरी आपण पत्र पाठविले ते पावले भीवराव व विसाजीपंत याची पत्रे व राजमार्चास तोतायाकडील विषय सांपडला त्याची यादी पाठविली ती पावली पत्रे यादी पाहिली सर्व समजले काल साडणी स्वाराब॥ जलद दादाकडे जाण्याविसीं पत्रे पाठविली सीद्यास हि लिहिले पत्रे गेली मागाहून भीवराव याची पत्रे आली म्हणोन लि॥ ते कलले भीवराव यास व सीद्यास दादाकडे जाण्याविसी लिहिले ते फार चागले केले सिद्यास लिहिले न जाते तरी ठीक ××× लिहिले ते फार उत्तम केले येके जागा × आहेत पत्रे जावयासी ते येक जागा अस × × × × गाठ पडली सींदे जाणार नाहीत फौज देतीलसे वाटते भीवराव याणी उदासपणी लि॥ आहे त्यास पत्र पाठवावे म्हणोन लिा त्यास उदासपणी लिहिले असे नाही त्याची उमेद स्वामीसेवा येकानिष्टपणे करावी बरे म्हणोन घ्यावे असेच आहे दादाकडे जाणे तेव्हां पैका असावा फौज भरतीस यावी या अर्थे लिहिले आहे त्यास आणखी काही फौज जिवट चांगली गेली पाहिजे त्याची तजवीज करून रवाना होय असे करावे रास्ते याणी त्रिबकचे रोखे दादाचे रोखे जलद जावे असे करावे भीमराव यास पत्र लिहिले आहे पाहून रवाना करावे यादी व पत्रे माघारी पाठविली आहेत भीवराव कल्याणाजवल गेले होते सीद्याजवल आले येणे करून दिवसगत लागेल परतु सीद्यानी बोलाविले आले तो आपली पत्रे गेली उत्तम जाले आहे* उदासपणाचा अर्थ किमपि नाही व स्वभाव हि नाहीं यक मात्र आपण त्यास ल्याहांवे कीं तुम्हाजवल कोणी चाकरी केली त्यास कार्याकारण बक्षीस आगर किरकोळी देऊन उमेदवार करणें म्हणून परवानगी लेहून पाठवावी त्यांणी हि यकदां लिहिले होते की कोणास कांहीं द्यावे लागेल ( मजकूर गहाळ )

लिहिली होती ( मजकूर गहाळ )

* येथपासून अक्षर स्वदस्तुरचें

लिहिले तरी ल्याह्यावे व यैवजाची व फौजेची तजवीज ध्यानांत असावी ते तरी करीत च आहों आपण गोड लिहितात बोलतात याजवरी करावयास चुकत नाहींत संतोषानें करितात उतर आपण लिहिणे ते ल्याहावे काही गुंता नाहीं रा छ २३ रमजान सिंद्यापासून लौकर त्याणी जावे या अरथे ल्याहावे हे विनंति

लेखांक १४ श्री

शके १६९८ अश्विन व. १२ शुक्रवार

पो छ २५ रमजान

विनंति उपरी सखाराम केशव गु।। याणे सोलापुर प्रांती दंगा केला होता तो कोकताण तोतयाकडे जाऊन ब्राह्मणास बहुत दुख देऊन नागविले त्याचे घरका भात्रावाज माडवगण येथे आहे म्हणोन ठिकाण लागले आहे त्याची जप्ती करून मुले माणसे आणावी याजकरिता राऊत कारकून तयार केला आहे परतु तेथे होलकराची सता आहे कटकट पडेल गुप्तरूपे काम तर जाले पाहिजे यास्तव फार बोभाट न होता होलकराचे पत्र तेथील कमावीसदारास घेऊन पाठवावे म्हणजे कारकून राऊत पाठऊ रा छ २५ रमजान *हे विनंति

लेखांक १५ श्री

पो छ २७ रमजान सवा शके १६९८ अश्विन व।। १४ रविवार

विनंति उपरी आपण पण पाठविले ते पावले राजश्री माहादजी सीदे व भीवराव व नारोपत व विसाजीपंत याची पत्रे आली ती पाठविली पावली सवीस्तर मार कलला आपण बेत लिहिल्याप्रमाणे उतरला फार चांगले जाले सीद्यानी पत्रे पाठवावी म्हणोन लि।। पत्रेत्याप्रमाणें आपण रवाना केली च असतील नारो सिवदेव याचे पत्रात मंदवारी तोतया सह बालाराव याचे हवाला होतील सर्व खातरजमा बालाराव याणी सरखेलीची केली आगरे याजकडे उटाची तर्तूद केली म्हणोन लि।। आहे हा मजकूर सीद्याचे पत्री नाहीं परतु नारो सीवदेव याणी लि।। ते प्रमाणेच आहे ईग्रजाची पत्रे व आगरे यास पत्रे असावी म्हणजे चागले ह्मणउन सीदे याणी लि।। आहे पत्रे माघारी पाठविली आहेत* बालारायाचे पत्र सिद्यास आलें त्यात भाव आहे की वासदेववावा वगैरे गेले त्याणी गैरवाका समजाविला म्हणून लि।। आहे तेव्हां भाव दिसतो कीं तुम्हाकडे येत होता तुमचे रालात आला आणि तेथून सलुखाने नेला आसे त्याणी इंग्रजास समजाविले तेव्हां इंग्रजाने आगरी यास लिहिले परंतु उदेरी जवल आला तेथून यार्णा आणिला हे काहीं इंग्रजास समजले

* येथपासून अक्षर स्वदस्तुरचें

नाही ते प्रस्तुत बालाराव गेल्या नंतरी इंग्रजाचा ग्रहस्त आला त्यासी बोलणे जाले असेल तेव्हां त्याची खातरजमा जाली आसेल त्यास समध च बोलावयास नाहीं असे आसता लबाडी करितो याउपरी इकडून पत्रे गेली आहेत बालाराव हि समजावीत आहेत इंग्रजास हि जाबसाल जाले ते कलले आसतील आसे वाटते वरिचेवरी पत्रे सरखलीस जात आसावी रा। छ २७ रमजान हे विनंति

लेखांक १६ श्री

पो छ २९ रमजानसबा शके १६९८ अश्विन व॥ ३० सोमवार

विनंति उपरी आपण पत्र पाठविले ते पावले राजश्री जयरामपंत याणी पत्रे पाठविली ती पाठविली ती पावली पाहून बहुत संतोष जाहाला वासुदेव बावाकडील कागद धरून पाठविले मोठे काम केले हे कागद ज्याचे त्यास पोचते तरी चार रोज दम गुलाम धरिते ती गोष्ट राहिली बरे जाले नरसीपंताचे पत्री मार लिहिला आहे त्यास बापूजीपंत तोतया व राघोपंत वगैरे मुख्य कोण कोण असतील त्यास बहुत मजबुदीने पुण्यास आणवावे लोक असतील त्यास अटकेत ठेवावे आणि जयरामपत धाजीपत याणी रत्नागिरीस जाऊन बंदोवस्त करून सदाशिव केशव याचे स्वाधीन करावे मोरो बापूजीस फार रोज जाले पुण्यास आणवावे याप्रमाणे जलद पत्रे पाठवावी रसालगड वगैरे किले राहिले असतील ते घ्यावयासी जयरामपत ठेवावे बाजीपती पुढे जावे मुलुकाची रखवाली चांगली करावी फौज थोडकी आहे होईल गुंता नाही मोरो हरि व सदासिवपत व चिमणाजीपत आले बरे जाले लक्ष्मणपतास कलविले पत्रे माघारी पाठविली आहेत वासुदेवबावाचे वगैरे कागद निघेने रा। छ २८ रमजान × × × × वासुदेवबावाचे दोनघटका नंतर सायंकाळ रात्रीं × × × × हे विनंति कानड्याचे पत्रांत माधवरायानी ल्याहावे की दादासाहेबाचे राजकारण गुप्त आहे ते आविधान खाशानेच कलविले विस्तर युक्त ल्या-हावे हे विनंति

लेखांक १७ श्री

पो छ २८ रमजान सवा श. १६९८ आश्विन व॥ ३० सोमवार

विनंति उपरी तोतया धरला हे वर्तमान दादासाहबास कलताच त्याचे चीत व्यग्र होईल पलावयाचा विचार करील रास्ते गेले की नाही वीस वीस कोसाचे मजली करून लौकर जात ते करावे रघुपतराव नारायेण यास लौकर जाण्याविसी लि॥ आहे आणखी लेहून घाटावर येत ते करावे * रास्ते कोणे ठिकाणीं गेले दादा पलतो यांत संशय नाहीं रा छ २८ रमजान हे विनंति

* येथपासून अक्षर स्वदस्तुरचें

लेखांक १८ श्री

रविवार आषाढ शु॥ १४ १६९८

पो छ १५ ज॥ वल

सेवेसी बाबूराव कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापना छ १३ जावलपर्यंत स्वामींचे कृपावलोकनें सेवकाचे वर्तमान यथास्थित असें विशेष स्वामींचे छ ११ जावलच पत्र सेवकास सादर जाहलें तेथे खालील तोतयास अवदुल कादर व बलामार वालें मिलाले याजकरितां किले सातारी यावरीस बारमारवाले अजनवेल गोंवलकोटचे राहणार आहेत याजकरितां संशय येतो तर उतरून हुजुर पाठवावे म्हणोन लि॥ ते कललें ऐशास कोंकणांत तोतयाचा प्रारंभ जाहाला त्यावेलेपासून तिकडील राहणार लोक होते ते दूर करून देसचे लोक पाहून फारकरून ठेविले च आहेत हाली हे वर्तमान ऐकिले आतां दाहावीस असामी तिकडील आहेत ते दूर करितों जमातदार कबिलासुधा निखालसपणें चाकरीवर आहे त्याचा भाऊ तोतयास मिलाला तरी त्याचे बुद्धीस भ्रंश व्हावयाचा नांही सेवक अहर्निसीं बंदोवस्ताने हुशार आहे कदाचित संदेह च ज्यासमई भासेल त्यासमई संशयी माणूस अढलेल ते उतरून द्यावयास कठीण नांही जाजती शंभर माणूस कानडे व देसचे मिलोन ठेविले आहेत सालवाद येथील बेगर्मास श्रावणमासीं दाहा हजार रु॥ पावत असतात त्याप्रों सालम॥रीं तूर्तच दविल्यास उपयोगी आहेत याजकरितां तर्तूद करून पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे कोंकणांत तोतयास आरंभ होऊन च्यार महिने होत आले आजपर्यंत स्वामींही उपेक्षाच केली पांच सहापत्रें माझीं गेली परंतु बंदोबस्त केलाच नांही अद्याप तरी पका भरणा करून आपण त्रिवर्गांतून मुख्य कोन्ही गेल्यासिवाय पका बंदोबस्त व्हावयाचा नांही दरोबस्त घाटांस चौक्या त्याच्या जागां जागां मातवर सरदारांकडे सूत्रें त्याची गेलीं आहेत लोकांचीं चित्तें त्याजकडे भ्रांतिस्तव वेधलीं जो तिकडे जाईल तोच त्यास मिलेल असें दिसतें हजार दोनहजार लोक पाठविल्याने परिणाम नांही त्याजपासी वीसहजारपर्यंत पायचे लोक जमले आहेत निदान दाहा हजारपर्यंत रवाना करावे तेव्हा आवई भारी पडल्यावर त्याजकडे गुराखे जमा जाहाले आहेत ते पळून जातील *आपण ज्या स्थली आहेत येथील पका बंदोबस्त असेलच परंतु शेवकास सूचक अर्थ लिहिला आहे आम्हापासी जमातदार आहे हा बहुत प्रमाणीक आहे लोक कोकणचे होते ते दूर करून देसचे ठेविले मर्द माणूस आहे व सेवकाचीही बंदोबस्ती ठीक आहे आपले कृपाकटाक्षे काही चिंता नाही सेवेसी श्रुत होय हे विज्ञापि

* येथपासून अक्षर स्वदस्तुरचें

लेखांक १९ श्री

सोमवार श्रावण शु॥ ७।१६९८

सेवेसी बाबूराव कृष्ण करद्वय जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ ५ जा॥ खरपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष रामचंद्र नाईक तोतयाने आपणाकडे रवाना केले ते पोहोचले च असतील त्याची निखालसता आपण धरितात परंतु त्यांचा कृत्रिम भाव केवल येसा दिसतो कशावरून तर त्याजकडील चिमणाजीपंत म्हणून कारकून सातारयांत शहरांत आला होता तो आमचा वलखीग्रहस्ताजवल म्हणत होता की बाबूराव आम्हास वश होतील की नाही हे वश जाहाले म्हणजे ठीक आहे मग आमच्या वलख्याने त्यास फजित केला तोंडावर खापली मग (* चिमणाजीपंत) गेला आठां राजाआलिकडील अर्थ आहे मग रामचंद्र नाईकाचा भाव काय असेल तो असो परंतु शेवकाचे मते नाईकांस तूर्त फार संच्यार करू देऊ नये प्रतिबंधात असल्यास उत्तम तोतयापासून काय मसलत खोटे खरेपणाची घेऊन आले ती शेवकास कलावी कारकुनाचें वर्तमान आजच मला कललें त्यावरून स्वामीस लिहिलें आहे रामचंद्र नाईकाचा आशय स्वामीपासीं बोलणेयांत काय आहे तो कलावा राजश्री हरिपंततात्याकडील फौजेचा गवगवा फार आहे तात्यांस उपास करवितात येसी लौकिकी खबर फार दाटा आहे त्यास पैशाची वोढ हि खरी च परंतु आपण उभयता शेषाचा अवतार श्रीमंताचें राज्य म्हणजे वलयांकित प्रथ्वी त्या राज्याचा भार आपले माथां आहे भगवतें शेष धरणीधर करावयाचें कारण हेंच कीं त्या कार्यास तोच योग्य तसें या राज्यास आपण उभयता भगवंते योजना केली आहे येशाविशई संदेश नाहीच फौजेची तोड पाडिलीच असेल दिपाजीराव येरुणकर पुरंधरावरून लोकसुध्धा खाली उतरले म्हणोन आईकतो काही कृत्रिम आढलले असेल तर मुलाजा काय व दूरदेशी पाहून उतरल्यास फारच उत्तम केलें प्रस्तुत तोतया चांपोलणास आहे त्याची आवई लोक बोलतात की तिवर घाटेंवर चढणार चढल्यास आम्हापासून वीस कोश घाट आहे शेवेसी कलावे राजश्री—स्वामी सुखरूप आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति

* मुळांत शोध आहे

लेखांक २० श्री

पो छ २३ रमजानसवा १६९८ आश्विन वा ९ सोमवार

सेवेसी बाबूराव कृष्ण सीर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ २१ रमजानपर्यंत स्वामीचे कृपे करून वर्तमान येथास्थित आहे विशेष तोतया राजमाचींहून पलाला तो बेलापुराहून जहाजांत बसोन हराम-

खोरांसुध्धां पलत होता तो राजश्री राघोजी आंगरे याणी धरून आणिला आणि राजश्री सिंदे यांस लिहिले की लोक पाठवून तोतया घेऊन जावा तीच पत्रें सिंदे यांनीं स्वामीकडे पाठविली म्हणोन आमच्या कारकुने लिहिलें आई-कोन जो संतोश जाहाला तो लिहितां नये स्वामीचे निष्टेपुढें कालिकाल तुःछ तेथें याचा पदार्थ किती च्यार दिवस दुःख प्रज्येस बहुत च ज़ाहालें मो-गलाईपेक्षे चौपट ( * चांडालानी केले ) अडचण जागा प्रजन्यकाल नाइलाज तत्राप बापोजी हरी वगैरे येक दोन गेलेच परंतु सारेच मात्रागमनास प्रवर्तले परंतु ईश्वर दूर नाहीं अतःपर शेवकाची येक रदबदल आगत्याची आहे जे विद्यमानी सांपडले त्यास ब्राह्मणाचा सीरच्छेद करिता नये परंतु आपले रुबरू आणून सीवाजी वगैरेयांस दुहीरी जेरबंद लावून मग होडीत राहातील धु-लप वगैरेयाची तों डोचकीच मारावयाची परंतु हरामखोराची पारपत्यें रु-बरूच करावी दादेभट व वीरेश्वर दीक्षिताचे भाऊ पगतीनें जेवणार ते सर्वांस सागत कीं पवमान म्हणतो ज्यास रुद्र सर्व ब्राम्हकर्म आहे भाऊ खरा असें बालात त्यांस चाप लाऊन तोतयाचे रुबरू उभें करून तोतयापासून म्हणवावे तो न म्हणे तर त्यास चाप लावावे हे जरूर जाहाले पा। अतः-पर कोणी राज्यांत बखेडा करूं न शके स्वामी तो करतीलच परंतु शेवका-च्यानें लिहिल्यावाचून न राहवें म्हणोन विनंति लि॥ आहे येखादा मादबर हरामखोर बंदीस ठेवायाचा जो वरकडांस अवघड असेल तो येकदाचें तेथें पाठवावें बंदोबस्त होतो कीं नाहीं पाहू स्वामीचे प्रतापें कांहीं चिंता नाही सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

* शोध आहे.

---

लेखांक २१ श्री

शके १६९८ आश्विन व॥ १० मंगळवार

पो छ २५ रमजान सवा

सेवेसी बाबुराव कृष्ण करद्वय जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना छ २२ रमजान पर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष तोतया फितुरीसहवर्तमान धरिला म्हणोन सेवकास आज्ञापत्रीं स्वामींनी लि॥ तें वर्तमान कळोन सेवकास संतोष जाहाला तो लिहिता येत नांही श्रीमंत अवतार समर्थ पुण्यप्रतापी तेथे खद्योतजन विघ्नास प्रवर्तल्यास त्याची शक्ति कलत च आहे हरामखोर सापडले त्याचें पारपत्य सांग व्हावें इतका सेवकाचा फार हेतू आहे तो पूर्ण करणार स्वाम आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

लेखांक २२ श्री

रविवार मार्गेशीर्ष शु॥ १२।१६९८

सेवेसी बाबूराव कृष्ण करद्वय जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना छ १० जिल्कादपर्यंत स्वामींचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष स्वामींचें आज्ञापत्र सेवकास सादर जाहालें तेथे आज्ञा कीं तोतया व फितुरी हरामखोर धरून आणिले त्यातून तोतया व दौलतगीर व बापोजीपंताचे नावाचा तोतया यां त्रिवर्गास देहांत पारपत्य केले व फितुरीयाची धीड भोंवडून कैद करून रामचंद्र नाईकासुद्धा निग्रहात ठेविले म्हणोन लि॥तें वर्तमान आईकोन अत्यंत आनंद जाहला हे वर्तमान राजश्री–स्वामींस हि विदित केले त्यांस हि परमसंतोष जाहाला पारिपत्य ज्याप्रें॥ करावें असा हेतू होता त्याप्रों घडलें तेणेंकरून स्वामीचे सतेची महिमा अवतारशक्तीची अवर्णनीय आहे फितुरी निग्रहांत आहेत त्यांचें हि पारपत्य फारच चांगलें जाहालें पाहिजे कैलासवासी नारायेण रावसाहेब यां आलीकडे जी जी कृत्यें स्वामीहि राज्यरक्षणार्थ केली ही मानवी नव्हत दैवी कार्ये होत मानव्यांस हीं यशें कैंची हें लिहिणें उगेंच आर्जवी नव्हे खावंद बालक्रिडित असतां वल्यांकित प्रथ्वीचे राज्य संरक्षण होणें हें मागें हि पुराणांतरी आईकिलें नाही पुढे हि घडणें दुरापास्त अशी कीर्त स्वामीही केली शेवक आनंदें करून उचंबलित जाहाला सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

लेखांक २३ श्री

शके १६९८ मार्गेशीर्ष व॥ ६ मंगळवार

सेवेसी बाबूराव कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापना छ १९ जिल्काद पावेतों स्वामींचे कृपावलोकनें करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामींचे आज्ञापत्र आलें तेथें आज्ञा कीं अमृतराव विश्वनाथ यांसी राजश्रीचे चिरंजीवाचे समाधानास पाठविले आहेत ( *व मातुश्रीबाईसाहेबाचे ) समाधानास पाठविले आहेत निकडीनें येऊन पोंहोंचतील म्हणोन लिहीले उतम आहे गोष्ट फार चागली जाहाली यांस सतोशास कारण जाहाले सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

* मुळांत हा शोध आहे

---

लेखांक २४ श्री

विज्ञापना बापूजी नाईक बारामतीकर याणी आपला कारकून तोतयाकडे तल्याचे मुकामीं पा। होता तो आठ रोज तेथे होता आणि आला होता त्याने बाबूजी न॥ यास सांगितलें की तो भाऊ नव्हे व स्वदेशी ब्राम्हण हि नव्हे कोणी हिंदुस्थानी आहे

जातीने कोण आहे न कले असे कारकुनानें परिछिन सांगितले म्हणून बाबूजी नाईकानी तो कारकून त्याचे ........ वर्षे होता भाऊ खोटा म्हटलें म्हणून दूर करून बारामती बाहेर लावून दिल्हा तो मजवल आला होता सीपाई चाकरीकरितां आला होता वाईस घर आहे गडबड वारली म्हणजे बलाविला आहे परंतु हे मातबर म्हणवितात आणि मात्रागमनास चुकत नाहीत यांचा विश्वास आपण कदाप धरू नये कारकून पाहिजे तर शोध करून पाठवीन शेवेसी वर्तमान कलावें म्हणून लि॥ आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक २५ श्री

शक १६९८

सेवेसी विज्ञापना श्रीमंत सौ मातुश्री पार्वतीबाई काही रुष्ट आहेत म्हणोन ये किलयांत आहे व काही खाली सूत्र हि आहे पार्वतीबाई कडून श्रीमंत मातुश्री गंगाबाईकडे हि काही तोतयाचा खरे पणाचा प्रेश गेला आहे येसे हि ऐकिल्यांत आहे चौकसीस आलस नसावा श्रीमंत राजश्री रावसाहेबां जवल चौकीस पराजप्या कोणी आहे तो रामचंद्र नाईकाचा होता तो आपण काढिला च असेल कोण कसा दगा करील हें समजत नाही येथे हि धणीकडे कोणी भेटावयास धणीची बहीण येते खालीं उतरत्ये वेलेस पालखीस बुरखा असतो उघडून पाहता नये म्हणून येकच कच केला आहे आधी माहाराज द्रिष्टीनें आम । कारकुनानें वाडयांत पाहावे मग पालखी जाऊ द्यावी येसे येथील आहे पूर्वी सिवा राजे दिलीहुन डालीत बसोन निघाले येशा आवई आहेत रावसाहेबांविसी फार चौकसी असावी तो प्रत्यक्ष कृष्णाचा अवतार आहे चिंता नाहीं च परंतु आपले कृतीस कदाप चुको नये तोतयाचे बंदोबस्ताची उपेक्षा जाली त्यामुलें इतका पेच पडिला बिडितला बंदिवान त्याणें सरकाराचे किले मुलुक घेतला होणारास उपाय नाहीं परंतु कर्तव्यास शब्द येतो स्वामीस त्ये गोष्टीचें अशक्य नाही परंतु नखान्चे कामास कुराड लावणे प्राप्त जाली सर्व हरामखोर जाले आहेत कोणी जात वागली नाहीं तत्राप अवतार समर्थ आहे पारपत्यास उसीर च नाहीं येथील अर्थ बंदोबस्तीचा ठीक आहे रावसाहेबांचे चरणप्रतापें निर्विघ्न सेवटास जाईल स्वामीचा मी येसे म्हणविले आहे आणि स्वामकाजीं देह अर्पण केला आहे त्यांत अंतराय न व्हावा हें च मागणें ईश्वरी शेवकाचें आहे या व्यतिरिक्त किंमपि नाही हा देह स्वामकाजी खर्च व्हावा इतकाच अर्थ आहे सर्व सता ईश्वराची आहे काही येवजाची सोई जाहाल्यास करावी साल्लाबाद पावतच आहे परंतु तूर्त आल्यास उत्तम आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति

लेखांक २६ श्री

शक १६९८

शेवेसी बालाजी गोविंद सां। नमस्कार विज्ञापना चिटी पा। ती पावली श्रीमंत राजश्री पाटील बावानी विठलवाडीजवल जाऊन मुकाम करून तोतयाचे पारपत्य करावे म्हणोन आज्ञा त्यास पाटीलबावा प्रातःकाली च दोन घटका दिवस चढता स्वार होऊन गेले आज्ञेप्रो। च वर्तणूक घडेल तोतयाचे पारपत्याविसी व तिकडील बंदोबस्ताविसी कालजी येकरूप न करावी आपलेकडे तोतयाकडील बातमी येईल त्या प्रमाणे वरचेवर सुचवीत जावी सरंजाम दारूगोलीचे साहित्य लागेल ते मात्र करवावे कितेक मजकूर राजश्री नारोशंकर यास सांगितले आहे ते विनंति करतील कांहीं बुनगे दिव्याचे घाटाने व स्वारी थाप्रो। आणि तोफखाना व जामदारखाना प्रहर रात्र आसतां बोरघाटाने लाविला तो हि आज गारपिरा जवल मुकामास शामील होईल आजचा मुकाम नजीके पुणे येथे करविला बुनगे बोर घाटाने गेले त्यास आज सोला कोस पडेल यास्तव मुकाम पुण्याजवल करविला आहे वरकड नारोपंत सांगता श्रुत होईल हे विज्ञाप्ति

लेखांक २७ श्री

आश्विन व॥ १०।१६९८

सेवेसी कृतानेक विज्ञापना ता। आश्विन वद्य १० बुधवार संध्याकाल दोन घटका रात्र मु॥ कुलाबा साहेबाचे कृपेकरून येथास्थित असे विशेष काल नागोठणीहून कुच करून येथे चार घटका रात्री दाखल जाहालो सरखेल यांची भेट जाहली दोन कोस पुडे आले होते भेटी मात्र जाहल्या आज बोलणे— ( व्हा ) वें त्यास वैधृत कुयोग यामुळें बोलणें जाहलें नांही नागोठणीयाहून राजश्री......विटल पाठविले होते त्यासी बोलणें जाहले ते काल रात्री पत्र पाठविले त्यावरून श्रुत जाहले च असेल आम्हीं त्याजकडील कारभारी गोविंद सेटी यासी गाठ पडून खुलासे निघाले इंगरजाकडून भला माणूस कालच सरखेल याजकडे आला तो आद्याप येथेंच आहे फिरंगीयाचे वकिलाचें पत्र ईंगरजास पुण्याहून आणून इकडे जलद पाठवावे व येक पत्र परभारे त्याजकडून रवाना करावे जे तोतिया आंगरे याणी धरिला तो घेऊन पुण्यास येतील तुम्हीं आंगरे यासी कोणेविसीं बरकसी न करणे म्हणोन जलद सदरहू प्रो पत्रें यावीं म्हणजे सरखेल खासा तोतियास घेऊन आपले जवल येतात सरखेल याचे येण्यात गुंता नाही परंतु इंग्रज लबाडीची गोष्ट बोलतात तेव्हां याची जागा यास मोकली टाकून येता येत नाही यास्तव फिरंग्याचे वकिलाचे पत्राची प्रतीक्षा करितात खासगत बंदोबस्त हि पाटीलबावानी करून घ्यावा पाटिल्बावा च आहेत तेव्हा आम्ही बलाचे असे नाही आमची

सरदारी वोढगस्त आहे उभारणी जसी कलेल तसी करावीं शेटींचें आमचें बोलणें आज आवग्र दोन वेला जाहालें * सरखेल यानी राज्यातील आर्थ आजवर खुल जाहाले हा आनर्थ जाहाला हे सर्व दृष्ट श्रुत होते ते सर्व सांगीतलें पाहातां आर्थी खरेंच जाहाले राज-खुलाची प्रबलता......परंतु आपग कमर बांधून राजमाचीहून तोतयावर जरब बसविली तथोन पलाला तेव्हां खुल तसेच राहिले खुलकर्ते यांजला आंशा ती राहिली आपले हि सांगणे आगरे याजला निशेधयुक्त आप्तपण्याने दोन चार वेला सांगविलें आणि लीहून-हि पाठविले या वरून हे हि आपले जागा संकोचित होऊन ( हालावर ) राहून तोतयास महत्प्रयत्नेंकरून हस्तगत केला यामुलें सर्व राज्यातील उभयतां कारभारी व सर्व सर-दारांपैकी आपण त्रिवर्गाचा स्नेह जोडून त्रिवर्ग वेगले करून आबालवृधाचा द्वेश मेलविला दौलत नादार ठिकाण नाहीं आपण आप्त आज प्रसंगीं आहां म्हणोन कोणांचे कांही चालत नांही आपण आपले कामास गेल्यावर आमचा तरणोपाय होत नांही यास्तव यांचा प्रकार पाहाणें तो तुम्ही पाहाल च लिहावे बोलावेसे नाहीं पहाता आधी बोलतात हे खरेच खुलांत सर्व आबालावृध त्रिवर्ग वेगले करून याचा हि शोध यानी बारकाईने घेतला तो हि आम्हा समजाविला आमचे हि ध्यानात आला आस्तु उदैक यांची + + जमा करून येथोन निघायाचा निश्चय होईल तो लिहून पाठवू सारांश इंग्रजाकडील वकिलासी बोलोन पत्रे परभारे पाठवावी......इकडे हि पाठवावीं मुबईकडील मात्र बंदोबस्त करावा जलदी पत्रे पाठवावी या अन्वयें पत्रें आम्हाकडील तीन गेली आहेत जलदी उत्तर पाठवा ते श्रीमंत दादाकडील वर्तमान यांजकडें आलें दीडशे माणसानिशी तारापुराकडे वेढ्यात आहेत पाहावे पुढे कोणीकडें जातात किवा कसे तें कळेल सारखे लिहून पाठवूं सेवेशी श्रुत होय हे विज्ञाप्ति

* येथपासून अक्षर स्वदस्तुरचें

---

लेखांक २८ श्री

पे॥ छ ७ रोवलसीत शके १६९८ वैशा. शु॥ ३

वैशाख रविवार

शेवेसी विज्ञापना त॥ छ २ माहे रबिलावल पावेतों सेवकाचे वर्तमान येथास्थीत असे विशेष छ २४ सफरचे पत्र पाठविले तेथे आज्ञा कीं रत्नागिरीस तोतया बंदी होता तो तालुकदारानीं मोकला केला आणि भाऊसाहेब म्हणोन बंड केलें आहे त्या-वरून सुवर्ण दुर्गचे मामलेदार याणी खुशाली करून किल्याचे तोफांचीं सरबती केली साखरवाटली सुवर्ण दुर्गचे पेठेत काही बहिरागी आले आहेत त्याजकडे मामलेदार जाऊन खलबत करीत असतात म्हणोन लेकांचे सांगणेयात आहे त्यास तुम्ही मामलेदाराचे भय न धरितां सविस्तर वर्तमान खरे असेल ते

कचें लेहून पाठवणे म्हणुन आज्ञा त्याजवरून कचे वर्तमान सेवेसी लिहीले आहे सुवर्णदुर्ग गोवा कनक दुर्ग येथील सारे भांडे यांची सरबती केली अरमार हि बंदरात च होते त्याची सरबती केली स्वारीहून अगोदर च च्यार दिवस बंदरांत आले होते साखर पेटेत व मुरुड आंजर्ले केळसी गिन्हवणें जालगाव येथें साखर पाठवून वांटली व पेठेत गुड्या उभ्या केल्या होत्या तालुक्यांतील किल्याची सरबती केली पेठेत बहीरागी आला होता तो बापू फडका म्हणोन त्याजकडे जात होते त्यास येक सेला व एक पागोटे धोत्रजोडा सोवले पीतांबर याप्रमाणें सनगे दिल्ही हातामध्यें सलाचे कडे लोखंडी होते ते काढून घेऊन सोनेयाचे सांतोलेयाचे करून दिल्हे पुढे त्याची चौकसीकरितां निशा पटला नाही तेव्हा रत्नागिरीस माहागीरीवरी घालून रवाना करितां कडे काढून घेतलें आणी त्यास रवाना केला अठरा दिवस येथें होता उपरांत रवाना केला वरकड रत्नागीरीचा तोतया लोक तिकडून येतात ते म्हणतात कीं भाऊ स्वारा आम्ही आपले नजरेने पाहिला नाही रत्नागीरीस पायाचा जमाव ठेवीतात दोन हजार माणूस बरखंदाज ठेविले आहेत म्हणून वर्तमान आहे स्वामींची येक दोन पत्रे याजवींसी मामलेदारास आल्यापासून तिकडील फारसा राहता नाही स्वामींचे अस्वासन असील्यास मामलेदारांचे भय कशास धरावे सेवेसी श्रुत जालें पाहीजे हे विज्ञापना

लेखांक २९ श्री

विज्ञाप्ति माझी बातमी तिवरे घाटावर असत्ये त्याचें वर्तमान आज च आलें कीं तोतया सुवर्णदुर्गी येकादसीस निघून गेला रायगडचा कोलटकर येऊन भेटला सरबत्ती जाहली जंजिरा सुवर्णदुर्ग वश नव्हता म्हणून खासा गेला त्यामुळें वश जाहाला दौल-तगीर गोसावी पांच हजार फौजेनिसी सालसीकडे पाठिवला बालाजी गणेशांही कांहीं फिरवून गोष्ट सांगितली म्हणोन पारपत्यास फौज गेली बापोजी हरीस बेडी घा-तली रत्नांगिरीवर ठेवला गगोवास येकादों रोजीं घालावी याप्रा वर्तमान तहाकिक आहे कांहीं देशांत हि फौजबंदी होत आहे वासुदेव बावाचीं सूत्रें देशांत तमाम फि-रतात हे बातमी पकी आहे बच्याजीपंत दर च्या + + करून पैका मागत आहेत परशरामाची बातमी आहे स्वामीस त्या बंडाचे पारपत्याचे अशक्य नाहीं परंतु मनस-व्यास व कर्तास लढा असो नये कोल्हापूरचें वर्तमान आज च आलें कीं रिंद्यास उदर होऊन सर्वांगांस सूज फार आली आलीकडे त्याणें ब्राह्मणावर फार कहर केला व श्रीमंत त्यास अनिष्ट इच्छिलें त्याचें फल लौकरच जाहालें मृत्यू होईलसें दिसतें अनुबाई घोरपडीचा पुराणीक कोंकणांतून आला तो तोतयाची मोहर घेऊन आला त्यास खरेपणाचा मोठा अभिमान हाली अनुबाई पुणेंयांत आहे तिजकडे तो

१५

गला अवतार सामर्थ्यापुढें काय होणें परंतु असत्यास सर्व प्रवर्तले आहेतसेंसे कलावें सदासीवपंत कुरण्यानें सरकारचें पत्र व स्वामींचें पत्र मला आणिले व खिजमगार हुजरद मजवर आला यैशास त्या कार्याचा अर्थ असा आहे निबवेणेची बाग या बागा व कोडोलीची तिन्ही बागा महाराजांकडे नेहमीं पंधरा वर्षे आहेत त्या खडून मक्ता करून विष्णू नरहर याजकडे राजश्रीनीं ठेविल्या त्या खंडाचे मक्तयांत कुरणा-जवल थोडीथोडी जागा पाहून कुरण बागेच्या बैलास करून दिल्हें आहे तें कूरण त्या खंडांत आहे आज कुरण वेगलें काढीन म्हटल्यास निघत नाहीं परंतु त्या बागा व कुरणें महाराजांकडे त्यांस सनद दाखवितांच आकांतास प्रवर्तलें सारें राज्य सोडून माझे पाठीस कां लागतां असीं भाशणें केलीं मी हुजुरे यांस सांगितलें तूं जाब घेऊन जाणे तो यैकेना अनर्थास प्रवर्तला मग मनाचिठी आणून देतो यैसे मान्य केलें कुर-णाचा अर्थ यैसा आहे मनाचिटी पा। लोकाविसी आज्ञा त्यास प्रस्तुत येक सिपाई गावास देखील पाठवी XXXX बाड कोण असें असतां आज सनद व हुजूर XXXX जर्दाद ठेवून द्यावयाविसी सनद आली तर ठेऊन देऊं पहिल्यांपैकीं मिलत नाहीं आपलीं पत्रें लोकांस बहुत येतात ते बाधोन ठेवतात कार्य होऊ न होऊ तसा माझा अर्थ मानूं नये स्वामींचे निरोपानें प्राण अर्पण करणार तेथें पत्र म्हणजे मोठाच अनर्थ गैरवाका समजाऊन येकाधा पत्र आणितो त्याची अवज्ञा जाहाली म्हणजे महद दोश मजकडे येतो वाजबीस पत्र आपलें यावें सिरसा गैरवाका पत्र मला सरकारचे व आपलें देऊं नये येथें अन्यथा कदापि व्हावयाचें नाहीं निशा असत्यास पत्रें देत जाऊं नये लोकांतच गणित असल्यास उत्तम परंतु सरकार अवज्ञेचा महद दोश आहे पत्रें तो गैरवाका येतात व सरकारचे हुजुरे हि भलत्याच कामास येणें हें हि ठीक नाहीं मनाचिटी देवावी ताकीदपत्रें आलिकडे दरबारांत फारच होतात येका कामास दहा लोक मुलकांत आणितात कलावें हे विज्ञापना

लेखांक ३०　　　　श्रीरामचंद्र

विनंति उपरी वरंध्या घांटाची बातमी तेथील चौकीदारानी पाठविली तो मज-कूर राजश्री रामचंद्र सिवदेव यास लीहिला आहे हे सांगतील त्यावरून ध्यानास येईल बहुत काय लिहीणे हे विनंति

लेखांक ३१ श्रीरामचंद्र

शके १६९८ अश्विन शु॥ ८ रविवार

राजश्री रामचंद्र सीवदेव स्वामी गोसावी यास विनंति उपरी येथील वर्तमान तरी वरंधा घाटाखाले तोतयाकडील हजार दीड हजार माणूस आले आहे घांटावरी × ( एक ओळ फाटून गहाळ झाली ) × नी माणसें पाठविली जे आम्ही रायरेश्वरच्या डोंगरावरी येऊन रहाणार तरी तुम्ही वाट सोडून देणें इकडील चौकीदारांनी त्यांस सांगितलें जे आमच्या धण्याची आज्ञा जाहाल्यावरी जी आज्ञा होईल त्याप्रमाणें आम्हीं वर्तणूक करूं म्हणून करार करून आले त्यास काय सांगावें पुढें दीड हजार आलें मागान हजार दोन हजार माणूस येत च आहे हिकडून घाटाचा बंदोबस्त करावा तरी किल्याच्या बंदोबस्तास लोक गुंतलें तेव्हां पुढें विचार काय करावा हे वर्तमान उभयतास विचारून उत्तर पाठवावे रा। छ० ६ रमजान ( मजकूर फाटून गहाळ ) बहुत माणूस

पे॥ छ ७ रमजान सु॥ सबा सबैन

आस्विन मास मु॥ सासवड

---

लेखांक ३२ श्री

सोमवार आश्विन व॥ ९।१६९८

सेवेसी निवाजी वीटल व दादाजी जगंनाथ सा। नमस्कार दंडवत विनति येथील वर्तमान ता। छ २१ रमजान मु॥ अलीबाग तिसरा प्रहरपावेतो येथास्थीत असे विशेष येथे येऊन श्रीमंत सरखेल साहेबांची भेट जाली सविस्तर निवेदन केले येथून येण्याची तयारी होऊन काल छ २० रमजानी खासा प्रस्थानी अलीबागेस आलें आज नीघोन पुढे पोईनाडी मुकाम करावा आपणासह श्रीमंत पाटीलसाहेबाची भेट पेणचे मुकामी व्हावी हेच रास्त त्यास रवीवारी मध्यरात्रीस ईग्रेजाकडून पत्र आले की भाऊ आमचे मकानी आले असतां तुम्ही फितावून न्यावे हे ठीक नाही आमची वस्त आमचे हवाला करावी व सरकारतर्फेच्या बातम्याहि लेहून आल्या की मुंबईस आरमाराची तयारी होत आहे कोणीकडे जाणार हे पक्के मनास आणून लेहून पाठवितों त्यावरून त्याचे तयारीचा संशय प्राप्त होऊन रात्रौ आपणास पत्र लिहीलें व दाजीबास हि पाठवीलें ते मार्गी भेटले पत्र मात्र आपणाकडे र॥ करून दाजीबासह माघारें आलों येथील सर्वोत्कर्षे मानस की तोतया आम्ही धरिला तेव्हा सर्व दौलत जबरदस्तीने राखावी हें च जालें पाटीलबावाचा व आपला जीव दोन नाही पाटीलबावाने अंगीकारिली मसलत तीस सामील असावे पुढे जे होणे ते सुखे हों परंतु तोतयास घेऊन तिकडे यावे तर जागा

सुटतें ईंग्रेजा सारीखा रीपू मार्गे दगा होऊ शके म्हणोन जागा न सोडावी आपण व भाईने येथपर्यंत यावें स्थले अवलोकन करावी विचारे करून होइल तें करू सर्व दौलतीस पाटील बावाचें ममतेनरुप तऱ्हा होणार तेथे प्रातात तुडवणी किती होणार आपण मात्र उभयेता ताकीदीनी यावे म्हणजे गुंता नाही आमचे चितमन पाटीलबावा खेरीज दुसरे नाही या अर्थ उभयेताचे येणे येथे होईल परंतु ईंग्रेल कश्मल बालगित येसी बातमी आली तेव्हा त्याचा बंदोबस्त जाला पाहिजे यास्तव हे पत्र पावताच पाटीलसाहेबास लेहून तेथून पुण्यास ल्याहावे नानानी ईंग्रेजाचे वकिलाकडून बंदरचे जनरालाचा बदोबस्त व्हावा त्याजकडून यास उपसर्ग न लागे ऐसे पक्के जाल्यास सरखेल साहेबाचे ही येणे होईल बंदरचा बदोबस्त साडणी कासीदा समागमे आधी पत्रें जाऊन उदयीक उभयतो आपण येथे पोहचावें वकिला कडून नाना बंदरचा बदोबस्त करतील त्यात इतका हि बदोबस्त जाला पाहिजे की तोतया कडील कारभारी तेथे पलोन गेले आहेत ते तुम्हास नानाप्रकारे भर देतील ते एकदर न ऐकता तहप्र॥ चालावे येसे जाले पाहिजे नानाकडून ईंग्रेजास पत्र वकिलाचे मारुफातीने जाईल त्यात मजकूर लेहवावा की तोतया राजश्री सरखेलकडें आला त्याचें भेटीचें प्रयोजन फार बालगिता हे परस्परे ऐकण्यात आले येशास ते तयासी तुम्हासीं समध आहे येसे नाही भेटीचे जरूर बालगावे हे काये उचित तरी ये गोष्टीत सर्वथी पडो नये येसे लेहून अज पाहिजे सरखेलीकडून कलोन लिहिले येसे न होता बंदरी पत्र गेले पाहिजे परस्परे कलले येसे लि॥ गेले म्हणजे कितेक दोश फिटतात या अर्थे सुचनार्थ लिहीले आहे सेवेसी श्रुत होय साराश पुण्याकडील पत्राचा बंदोबस्त होऊन समागमें लोक येणे ते थोडे येत जितक्यात आटपेल तितके आटोपून लोकरे यावे हे विज्ञापना

लेखांक ३३ श्री

पो। छ ३ जिल्हेज तिसा समानीन

भाद्रपद मास रू शुक्रवार पौष शु १।१६९८

शेवेसी माहादाजी बलाल मुकाम जंजिरे रेवदंडा कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ २९ जिल्काद पावेतो वर्तमान येथारथीत आसे विशेष राजश्री भिकाजी नाईक कोलटकर यांचे बंधु वासुदेव माहादेव होनागांवे यास आगरे याचें प्रातात होते तेथून काल छ २८ जिल्कादी जर्जीरे मजकूरचे शहर कोटाबाहेर आगरांत राघो नारायेण पराजपे याचें घरी आले व हे वर्तमान अस्तःमानी किल्यांत येऊन पराजपे याणी सांगितले तेव्हा सरकारची आज्ञा नाही परंतु लवकीकोंतर आइकिल्यामुले दुचांने राजश्री चिमणाजीपंत बिवलकर याचे विचारे मारनिले यास किल्यांत आणन आपल्यां

जवल विरुध न दीसतां ठेविले आहेत पुढें कसे करावयाचें याची आज्ञा येईल त्याप्रमाणे वर्तणूक करू याचे उत्तंर पांठवावयास आज्ञा त्वरीत जाहली पाहीजे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

लेखांक ३४ श्रीगणपति

शके १६९८ अश्विन वद्य ९ बुधवार

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पौष्य परशराम रामचंद्र कृतानेक सां। नमस्कार विनंति उपरी येथील कुशल ता। छ २२ रमजानपर्यंत येथास्थित जाणून स्वकीये कुशल लिहीत असिल पाहिजे यानंतर आपण कृपा करून पत्र पाठविले ते पावले तेथे लिहिले कीं घाटाखालीं जाण्याविशीं बहुत वेल लिहिले परंतु जाणे न जाहाले हल्ली श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधी याजकडून हजार फौज तुम्हाकडे रवाना करावयासी लिहिले आहे फौज आली असेल ते व तुम्ही लौकर घाट उतरावा त्यास आद्यापवर त्याचे स्वार आले नाहींत तो काल छ २१ मिनहूस रा। हरीपंत तात्याची पत्रें भाववडे याचे मुकामीची पत्रे आली कीं तोतया गलबतात बसून रत्नागिरीस जात होता तो राघोजी आगरे यानी धरीला तेणे करून परमसंतोष जाहाला आज प्रातःकाली सरची पत्रे छ १९ मिनहूची आली तेथे आज्ञा की तोतया धरून आणिला तुम्ही घाटाखाली न जाणे विठल विश्राम वगैरे यानी जागा जा ( गा ) लबाडया करून खूल केले आहे त्याचे पारपत्य करणे त्यास तूर्त आष्टया नजिक आम्ही आहो आपली पत्र जसी येतील तदनुर* करू तोतयाचे बंड मोठे जाहाले होते परंतु रा। राघोजी आंगरे याणी श्रीमंतांचे पुण्येकडून येश घेतले सदैव पत्र पाठवून परामृश करावा बहुत काये लिहीणे कृपालोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंति

* येथपासून अक्षर स्वदस्तूरचे.

---

लेखांक ३५ श्री

शके १६९८ अश्विन शु॥ ७ शनिवार

पोाछ ६ रमाजान सवा

दंडवत विनंति उपर चिठी आपणाकडून आली गडाचे राजकारण लागले ते कूच करून गेल्यानें ठीक होणार नाहीं यास्तव मुकाम करावा उंटे हि येतील म्हणोन लि॥ ते ...ललें येसीयासी किल्यावरील बातमी आज दोन वेला आली तोतया कडील माणूस तोतयानी बोलावून घेतलें येके जागा जमावें असा विचार आहे कांही थोडे बहुत

माणूस राहिलें ते हि आज उद्यांत निघून जाणार असा निश्चय आहे आणि परवान इकडील आजकिल्याकडे गेला होता पहिले जेथें ढालाव लोक होते ते काही नवते तेव्हा बातनी ठीक आसी कलली किल्याचे राजकारण काही दुर्घट नाही हजारपांचशे स्वार या जागे राहीले आणी जे आम्हसी बोलतात त्याची गाठ घालून देऊं म्हणजें किल्याचे काम होऊन येईल जड नाही आतां जुंजाचे तोंड तिकडे लागले लोक तोतयाचे जमा एकत्र होतात तेव्हां तीकडील १ बाजू कची पडली न पाहिजे यास्तव कूच उदईक योजिले हे ठीक आहे कूच होते हीं आवई आज जाहल्यास पुन्हा मुकाम करावा हे मनसब्यास ठीक नाही यास्तव जो निश्चय जाहाला आहे त्या प्रमाणें कूंच होईल पुलावर हि मुकाम आगर कूच जसा तिकडील मजकूर पाहूं तसा करावयासी येईल तत्रापि उदईक आपली आमची भेट होईल तेव्हा परस्परें कलल रा छ ५ रमजान *हे विनंति

*अक्षरें स्वदस्तूरचीं.

मोर्तब सुद.

लेखांक ३६ श्री

रविवार भाद्रपद शु. ३।१६९८

श्रीमंत राजश्री नानाफडणीस स्वामीचे शेवेसी विनंति शेवक रामचंद्र बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ १ माहे सावा ( न ) मुकाम गंगापूर स्वामीचे कृपे करून यथास्थीत असे विशेष लक्ष्मण महादेव रानडये कारकून दिमत राजश्री आनंदराव भिकाजी रास्ते हे राजश्री गंगाधरराव भिकाजी रास्ते याच्या बरोबर गंगापूरास येऊन विनंति केली कीं आपण वाडिलापासून रास्ते याची शेवा आज तागायत करीत आलों त्यास कोकणांत तोतया जाला होता त्याणे आम्ही देशात रास्ते याजकडे चाकरी करीतो म्हणोन तसदी देऊंन अडीचशे रुपये घेऊंन दादाशास्त्री यास दिल्हे त्याणी लग्न केले त्याबदल केसो विठ्ठल भिडे आडीवरेकर यास दील्हे पुढें तोतयाचे पारिपत्य जाले नंतर राजश्री गंगाधरपंत भाऊ तालुके विजेदुर्ग याणी केसोपंतापासून सरकारात घेतले आहे तों माझी गरीबीवर कृपा होऊंन माघरे द्यावी त्याजवरून आपणास लिहोन पाठवावयाची आज्ञा जाली की रास्ते यांच्या पदरी मशार निले बहुत दिवस आहेत याजकरितां अडीचशे रुपये तोतयानें घेतले आहेत ते माघारे यावे त्याजवरून शेवेसी विनंति लीहिली असे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

लेखांक ३७ श्री

प्रभुवर्य श्रीमंत राजश्री–रावसाहेब यांसि

प्रती रामशास्त्री आसीर्वाद विनंति गणपतराव कृष्ण कोलटकर यांचे बंधु तोतयाचे पंक्तीस जेवले बहुत वेल त्याचा प्रकार कसा केला वैदिक व वेदशास्त्रसंपन्न यांची मात्र व्यवस्था लिहिली पंडिताची लिहिल्यात आली नाही ते त्याहावे म्हणून पत्रीं आज्ञा त्यास गणपतराव यांचे एक बंधु लक्ष्मणराव तोतया वरोवर आले ते हाली पुण्यांत वेगलेच आहेत वरकड बंधु तोतयाकडून जाऊन×××गडास आहेत त्यांस प्रायश्चित सरकारचे आज्ञेने होये तो पावेतो वेगले असावे कोणाचे घरी भोजनास जाऊ नये कोणा ब्राह्मणास आपले घरी बोलावू नये या प्रो पत्र पाठविले किल्याचे असपास महाड बीडवाडी वगैरे स्थलचे ब्राह्मणानी कोलटकरास प्रायश्चित होये तोपर्यंत त्याचे घरी कोणी भोजन करू नये व त्यांस हि भोजनास बलाऊ नये या आन्वयें सरकाराची पत्रें समस्त ब्राह्मणास पाठविलीं पंडिताची व्यवस्था वेदशास्त्रसंपन्न म्हणून लिहिले आहे ते च होय गोविंद भट नीजसुरे याचें घरीं कटक्या कोकणातून तोतयाकडून आल्यावर भोजनफरालकथा काही च जाले नसतां प्रायश्चित कशावरून नेमिले ते त्याहावे म्हणून लिा त्यास बावाजी अनंत आवटे यानी सांगितले व याद ज्यांचे ज्यांचे घरी कटक्याची भोजने कथाफराल जाल्याची नांव निसीवार लेहून दिल्ही त्यात निजसुरे यांचे नांव आहे यादी प्रो वरकड मान्य जाले गोविंद भट मात्र नाहीं म्हणतात याजकरिता बावाजी अनंतास बलावून पुरसीस करून रामभटाचे याचे बोलणें करविले त्याचा तपसील आलाहिदा यादीप्रो त्या वरून विदित होईल रघुनाथ दीक्षीत मनोहर यानी गतवर्षी कोकणांत लग्न केले त्याचा सासरा केसोबा गोखला आडिवरेयांत राहातो (त्याचे) घर वेगले ठेवण्याविसीं गंगाधर गोविंद यांस सरकारचे पत्र सादर जाले श्रुत होय * हे विनंती

* हे विनंती हीं अक्षरें बालबोधीत असून ती दीर्घ आहे खुद्द रामशास्त्र्याचे हातची आहेत.

श्री

लेखांक ३८

यादि किले रत्नागिरी येथे तोतया अटकेत सरकारातून ठेवला असता रामचद्र नाईक पराजपे याणी राज्यात बखेडा व्हावा ही कुबुध धरून तोतया कैलासवासी भाऊसाहेब म्हणून सर्वांचे बुधीस भ्रंश करून त्यास बाहेर काढून त्याची उभारणी करून कोकणचे किल्याचा वगैरे बदोवस्त करीत राजमाची परयत येऊन पोहोचले किले सिहगड हि हस्तगत केला सरकारातून पारपत्यास रा॥ माहादजी सिंदे रवाना होऊन

तातयाचा मोड होऊन तोतया हस्तगत व्हावा असे जाहाले ते काली पराजपे याणी मुबईस इग्रजासी सुत्र बाधोन किले रत्नागिरी येथे पाच पचवीस लोक व निशाण इग्रजाने पाटवून निशाण लावावे तेथे निशाण लागल्यावर सिहगड व पुरधर येथे हि निशाण इग्रजाचे लावून द्वाही इग्रजाची फिरवावी इग्रजाचे निशाण व लोक येऊन कायमता जाली म्हणजे सरजामानिसी त्याणी यावे बाकी किले परियायेकडून हस्तगत इग्रजाकडे व्हावे ऐशी कारस्तानी इग्रजाकडे केली येविसीची पत्रे

जिवाजीराव हवालदार किले रत्नागिरी यांस पत्रें
महिपतराव कृष्ण व रामचद्र माहादेव याचे नावे
रामचद्र नाईकाचे खाली स्वदस्तुरी बोली व आसीर्वाद

छ १४ रमजानचे पत्र त्यात मार तुम्ही पत्र पा ते पावोन परम सतोष जाला पत्री लि॥ की ऐवज व कडी व कठी पाठविली ते आम्हास पावली नाही बरे असो हाली पत्रे व पेशजी पत्रे लि॥ च आहेत त्याजवरून देतील तथापि न दिल तरी आम्ही करारा प्रो देऊ मुबईहून निशाण येईल ते तुम्ही किल्यावर लावावे मुबईवाल्याचे नाव करावे तुम्ही तथापि चितात संशय आणाल की कार्यमात्र करून आणि दगा देतील ज्यापक्षी येक नावेमधी बसलो आहो मध्यावर गाभडी काढल्यास अवघे च बुडो यास्तव तेथे त्याचे बोलण्याचालण्याचा विचार चितात न आणे तेथे आम्ही बहुत बदोबस्त राखिला तुम्ही तेथे येवढे मात्र करावे हा हि अर्थाचा भरवसा तुमचा बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे आसीर्वाद १

आश्वीन व॥ सप्तमीचे पत्र त्यात मार पेशजी पत्रे पाठविली त्यात ऐवजाचा करार करून पाठविली त्याजपैकी दोन हजार पोहोचले बाकी युक्तिनुसार पावता करू याखेरीज दोन कडी व कठी मोत्यांची तिजाईमणी पाचेचे सुमार दाणे येकशे येकसष्ठ पाठविले ते पावले च असतील तुमचा आमचा करार की त्यावर निशाण मुबईहून घेऊन येतील ते किल्यावर घ्यावे त्याचे नाव करावे इतर गोष्टीचा तुमचा आमचा करार आहे त्याप्रमाणे त्याचे नाव जालियाजवर ठरावाप्रो निभावणी करा हा अर्थाचा भरवसा तुमचा बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे आसीर्वाद

आसीर्वाद म्हणून पत्रे रामचद्र नाईक याचे स्वदस्तुरी आसीर्वादाची पत्रे

छ १४ रमजानचे पत्र की तुम्ही पत्रे पाठविली ते पा दिनचर्येचे वर्तमान कसे काय ते लिहिणे हा कालपरयत बरेच आहे

कितापत्र की पेशजी तुम्हास पत्रे पाठविली ती पावली च असतील हाली र॥ हवालदारास पत्रे लि॥ आहेत त्यास देणे

पत्री लि॥ की हवालदाराचे चित शुध्ध नाही ऐसे दिसते म्हणोन लिहिले त्यास पेशजी पत्रे खातरजमेची लि॥ होती ती तुम्ही त्यास दिल्ही की नाही हे काही च लि॥ नाही आणि लि॥ की चितशुध नाही तेव्हा त्याचा अन्वय काही च न समजला कशावरून आम्ही त्याहावे त्यास म॥रनिलेस पत्र लि॥ आहे तरी तुम्ही वाचून पाहून त्यास द्यावे म्हणजे चितशुध्ध आपेआप होईल आणि सागितल्याप्रो म॥रनिले वर्तणूक करतील साराष मनोदय रक्षून घ्यावा जातीने समजत जाणे बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद १

छ ११ रमजानचे पत्र की तुम्हाकडून पत्रे आली ती पावली लि॥ मजकूर सविस्तर समजला दिनचर्येचे वर्तमान कसे काय ते लिहिणे हा काल परयत येथील मजकूर वराच आहे आम्ही आण शपत क्रिया करीत च आहो चिरजीव सिवाजीपत व र॥ धोडो गोपाल या उभयताची पत्रे राजमाचीहून खाली गेली याजवर आली त्यात लि॥ की मुबईची पत्रे पाठविली ते निशाण घेऊन किल्यावर जातील व आम्ही पत्रे पाठविली त्याचे उत्तर आले की निशाण घेऊन जातो तुम्ही पत्रे मुबईस लि॥ त्याचा अन्वय आम्हास लिहिला की माहागिरी तुम्ही पाठवावी माहागिरीवर पचवीस लोक व निशाण तुर्त किल्यावर पाठवितील मागाहून सरजामानिसी येऊ त्याप्रो त्याचे पत्रे आम्हास आले होते त्याप्रो कार्य शिध करावे; येथे चिर-

१६

आम्ही आण क्रिया शपत करीत च आहो तुम्ही तेथे र॥ हवालदार यास चागला मायेत घेत नाही हे उत्तम नव्हे पेशजीचे लि॥ हवालदार यास द्यावे आणि आपण आपले मायेत च घ्यावा मुबईहून निशाण घेऊन जातील ते तुम्ही घेऊन किल्यावर लावावे-आणि मुबईवाल्याचे नाव करावे येथे आम्ही राऊत वगैरे सामान अतरयामी केले आहे निशाण लागल्याचे वर्तमान कलल्यावर साईत्य तुम्हास पोहोचेल जकार व हकार किल्याचे बदोबस्तास गेले आहेत त्याचे हस्तगत होऊ देऊ नये तेथे रोजगारी ग्रहस्त आहेत तुम्ही जातीने समाचार घेणे बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे आसीर्वाद १

जीव सिव्हपर्वती टाकून बसविला आहे पर्वत घ्यावयास हकार आला आहे तो आम्ही बहुत मायेत घेतला आहे आमचा याचा तपसीलवार पेशजीचे पत्री लि॥ आहे त्याजवरून समजेल येथे त्रिवर्गाखेरीज आमचे मायेत आहेत कलावे येथे सरजाम केला आहे तो पेशजीचे पत्रावरून समजेल वारवार ल्याहावयाचे कारण नाही तुमची सिधता जाली म्हणजे सरजामास कमी नाही बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे आसीर्वाद १

सदरहू तीन पत्र रामचद्र नो याचे स्वदस्तुरचे आसीर्वादाची

कितापत्रे आसीर्वादाची

कितापत्र की तुम्ही पत्र पाठविले ते पावले दिनचर्येचे वर्तमान लि॥ ते समजले तर उतर दिशेस पत्रे अटूपण मार्गे लि॥ ती तुम्हाकडे घेऊन जातील त्याप्रमाणे पर्वतावर निशाण घेऊन द्राही त्याची फिरवावी किलेदाराची बहुत रीतीने समजूत पाडावी आपले समजुतीने च आहे परतु तसे च राखोन समजुतीने राही तो अर्थ करावा आम्ही तो बिलकूल याचे मायेत राहिलो आहो सिव्हपर्वत हस्तगत आहे पकारपर्वत त तेथे चिरजीव आहेत त्याणे बदोबस्त राखिला आहे सकार तो आपले मायेत च आहेत हकार तो बिलकुल मायेत च आहेत जकार व बकार गेले आहेत त्याचे हस्तगत जाले नाही तो नाव करावे म्हणजे आम्ही दोहो पर्वताचा बदोबस्त करू तुम्ही उतर दिशेचे नावाचा जाला म्हणजे आम्ही येथे त्याचे नावाची

कितापत्र पत्रे प॥ ती व हाली काल पाठविली ती पावली च असतील आलिकडे दिनचर्येचे वर्तमान कसेकाय आहे ते समजण्यात आले नाही तरी दिनचर्येचे वर्तमान प्रहराप्रहराचे वर्तमान लि॥ जाणे व इकडील वर्तमान तर अतर मार्गेकडून शोध घेतील तो ठीकसे दिसत नाही रेवाशाचे मुकामी पत्र लि॥ होते की तुम्ही मुबईस जावे ते टाकून कुलाब्यास गेले तेव्हा तो महस्त हस्तगत व्हावयाचा प्रकार जाला उतर दिसेस पत्रे पाठविली ते अकपण मार्गेकरून पाठविली आहेत त्याजवरून निशाण घेऊन न जातील ते लावून त्याचे नाव करावे म्हणजे आपला बचाव होईल सिव्ह नावी डोगर येथे चिरजीव टाकू बसविला आहे हकार हे आपले मायेत घेतला आहेत, जकार व बकार किल्याचे बदोबस्तास व जप्तीस

द्वाही फिरवू कळावे बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद

गेले आहेत तर उतर दिशेच सधान लवकर च पोहोचेल गेले आहेत त्याचे हस्तगत किला होऊ नये उतर दिशेचे ग्रहस्ताचे नाव जाहाले म्हणजे ( त्या ) स समजल्यावर सिव्ह परवती निशाण लावून सकार व मकार लेखक हे आमचे मायेत च आहेत उभयता व सरदार येक मकार मात्र नाही आम्ही तो त्याचे मायेत जाऊन आण क्रिया शपत करीत च आहो निरुपायास्तव बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद

वडिलाचे शेवेसी आपत्ये रामचद्र म्हणून पत्र की पेशजी पत्रे लि॥ त्याचे उतर तपशीलवार आले नाही चिरजीव खुशाल आहेत चिता नाही काल च पत्र आले होते उतर दिसेस मुवईस पत्रे लि। आहेत ते बजीनस आपलेकडे घेऊन जातील ती पत्रे घेऊन निशाण किल्यावर ध्यावे आणि त्याचे नाव करावे येथे बहुत मडली त्रिवर्गाखेरीज करून आपले मायेत च आहेत येक किला तो चिरजीवाचे स्वाधीन आहे तेथे त्याचे नावाचे निशाण लावू पुकार परवती चिरजीव आहेत साध्य च आहे जकार व बकार गेले आहेत त्याचे हस्तगत स्थल न होय ते करावे खर्चावेचाची चिता नाही मसलतीस पैका लागेल तो लावून मसलत मात्र साधावी बहुत दिसगत न लावावी इतर गोष्टीची कालजी नाही बापू आपले स्वाधीन आहेत नवी श्रीष्ट करतील मग कोणे गोष्टीविसी चिता नाही मुवईस पत्रे तुम्ही पाठविली व आम्ही पाठविली आहेत त्याप्रो करावे बहुत काय लिहिणे लोभकीजे हे विनंति १

रघुनाथजी बाबा यास पत्रे मुबईस महिपतराव कृष्ण रामचद्र माहादेव याचे नावे

कितापत्र की पेशजी पत्रे लि॥ त्याप्रो निशाण घेऊन किल्यावर लावून तुम्ही आपले नाव करावे जनरालसाहेवास पत्रे खातरजमेची लि॥ आहेत ती त्यास पोहोचली च असतील त्या प्रो आपण खातरजमा त्याची करून किल्यावर निशाण लावून नाव करावे इतर किले आहेत त्याचे सोईसोईने काम करावे येथील

कितापत्र की पेशजी पत्रे पाठविली आहेत त्या प्रो सर्व साईत्य पैक्यानिसी सिध आहे कार्य मात्र करावे तुमचा पैका खर्च होईल तो व मसलतीस लागेल तो आम्ही खर्चू तुमचे नाव मात्र इतर साइत्य खर्चवेच लागेल तो आम्ही करू चिता नाही पेशजी पत्रे लि॥ ती निशेदाखल आहेत जनराल साहेबास पत्रे लि॥ आहेत त्यात

वर्तमान तर पेशजी पत्रे खातरजमेची लि॥ आहेत त्याप्रो विदित च आहेत सारांस किल्यावर निशाण लावावे दुसरे पत्र आम्हाकडून येऊन पोहोचेल असा अन्वय राहिला नाही हे जाणो (न) साहेबास विनति करून कार्य करावे बहुत काय लिहिणे लोभ करावा हे आसीर्वाद १

विस्तार लि॥ आहे खातरजमा पटवून दिल्ही आहे त्या प्रो विलब न करिता करावे साहेबास विनति वारवार करावी पदरी घेतल्याचे सार्थक करावे बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद १

कितापत्र की पेशजी पत्रे श्रीमत जनराल साहेबास लिहिली आहेत त्या प्रो जजीरेयावर ढाल घेऊन जावे इतर साईत्य पेशजीचे लि॥ प्रो सिध आहे वारवार पत्र ल्याहावे तो आमची वेळ, कसी आहे ही आपल्यास विदित च आहे पदरी घेतल्याचे सार्थक केले पाहिजे बहुत काय लिहिणे हे विनति १

आपा भट यास पत्रे दादाशास्त्री याणी लिहिली ते

कितापत्र की तुम्ही पत्र पा ते पा र॥ चिमणाजीपंत पटवर्धन व चिरजीव बाल हे उभयता वसूल चागला करितात! आम्ही त्याचा पुस्तपन्हा करीत च आहे म्हणोन लि॥ त्यास सर्व गोष्ट मसलतीची काळजी आपल्यास च आहे र॥ नाईकाची पत्रे हमेशा श्रीमतास व आम्हास येतात व आपल्याकडे जातात नायकानी रावताचा बदोबस्त थोडाबहुत केला म्हणून श्रीमतास व आम्हास लि॥ आले आहे आम्ही राजमाचीस जातो राजमाचीचा बदोबस्त करून तलेगावचे मु॥ जावे म्हणजे राऊत येऊन पोहोचतील आमचा घरचा समाचार घेत जावे नाना व हरिपंत व माहादजी सिंदे त्रिवर्ग खेरीज करून नायकानी आपले मायेत घेतले आहेत

कितापत्र की तुम्ही पत्रे पा ती पा लि॥ म॥र कळला इकडील वर्तमान तर राजमाचीहून घाटाखाली रेवसच्या बदरी गेलो आमचे मसलतीचे वर्तमान पत्री लि॥ पुरवत नाही म्हनाडले वर्तमान आम्ही व रा॥ सिवाजीपंत धोंडोपंत त्रिवर्गाही नाईकास लि॥ आहे रेवसचे बंदराचे अगोधर सीनलटेकडीचे मुकामची पत्रे लि॥ होती त्या पत्राचे उत्तर आम्हास आले की मुबईस नाईकानी सधान केले आहे आम्ही घरी लवकर येऊन पोहोचतो नायकाचे पत्राप्रो बदोबस्त राखणे तुमचे आमचे जिवावर आळ आहे परमेश्वर पार पाडणार आहे सारास नाईक असता आम्हास काळजी नाही किला तो लढवावा तर स्वरूप बहुत काय लिहिणे हे विनती

मागाहून होईल वर्तमान ते लि॥ पाठऊ र॥ सिवाजीपंत सुभेदार व धोंडोपंत सुखरूप आहेत मसलैत सिधीस जाईल हे विनती*

शेवेसी बनाजीरावे अनगल सां॥ नमस्कार विज्ञापना लिखितार्थ परिसोन लोभ करावा आज्ञे प्रो चाकरी येकनिष्टपणे करितो शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

*( अक्षरें बाळबोध आहेत, ती दीर्घ. )

शेवेसी बानाजीराव अनगल सां नमस्कार विज्ञापना लि॥ तरी सोनशास्त्री याही लि॥ प्रो करावे आम्ही तो आपले भरवसेयांवर या गोष्टीत पडलो आता सर्व गोष्टीचा अभिमान आपल्यास आहे बहुत काय लिहिणे हे विज्ञापना

---

लेखांक ३९ श्री

पे॥ कार्तिक शु॥ १० मंदवार शके १७१० नकल

बुधवार कार्तिक शु ७।१७१०

विज्ञाप्त आंबाराम भट आलीबागेस असतात सावकारी करीतात हें प्रसिद्ध आहे च त्यांचे आंतील कर्म आइकण्यांत की तोतया आंगरे यानी धरीला ते समई माध्यस्तीस आणभाष यावयासी भटजींच आंगऱ्याकडून पुढे गेले घेऊन आले ते समई कालेगाव पासून पयेवाटेने आणिला बरोबरचे सरंजामाची गलवते कुलाब्या खाली नेलीं त्यांजवरील जिनसाना खाली उतरता भटजींनी तीन पेटया आपले घरी नेल्या यांत काथ होते ते जाते समई जवळ होता त्याची जबानी लिहून घेतली आहे सोन्याच्या कांबी येके पेटीत येक पेटीत मोहरा सात आठ हजार पावेतो येक उघडली च नाही त्यात काय होते ते नकले याप्रमाणे अभीलाश करून सावकारकी फैलाविली हे त्याजपासून काढावयासी वीना सरकारचा नेट पोहोचल्या सिवाय काम होणार नाही र॥ राघोजी आंगरे तोतया घेऊन गेले होते तेव्हा ह्यानी सरकारांतून काय कलमे उगऊन घेतली आहे हें न कले या गोष्टीचा आंगीकार करून तंबी पोहोचवून येथास्थीत होईलसे आसिले तर शोध करून ल्याहावे म्हणजे मुदई पाठऊन देतो किंवा या गोष्टीत पडावयाचेच नसिल्यास तसे च ल्याहावे म्हणजे मुदयाचे नांव लौकीकांत कशास आणावे परंतु मुदयाचे म्हणणे आहे की येकवार श्रीमंताकडे जाऊन पाघुरणे जालीन दाद दिल्ही तरी बरे नाहीतर देशत्याग करणे प्राप्त च आहे एकटे भटजीस च धरून आणिल्याने काम हस्तगत होणार नाही घरास जफ्ती माणसास कैद असे होईल तेव्हां मुदा सापडेल येविसी श्रीमंतास विनंति करून आज्ञा होईल त्याप्रमाणें ल्याहावें सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्त पत्र र॥ कार्तिक सुध्ध ७ सौम्यवार

---

सदाशिवराव भाऊसाहेब पेशव्यांच्या तोतयाचें खूळ हृ पेशव्यांचे कारभारी नाना फडणीस यांजवर आलेल्या अनेक संकटांपैकीं एक होय. ग्रँटडफच्या इतिहासांत या खुळाचा उल्लेख फक्त दहा पांच ओळींत च केला आहे. व सामान्य इतिहास-वाचकांस हें खूळ, त्यांत सामील असलेले लहानमोठे लोक, पेशव्यांच्या शत्रूंनीं या खुळास केलेली मदत, श्रीमंत मातोश्री पार्वतीबाईसाहेब यांच्या मनाची स्थिति आणि हें खूळ लवकरच न मोडतें किंवा उत्पादकांच्या हेतूप्रमाणें तें सिद्धीस गेलें असतें तर, काय काय अनर्थ घडले असते यांची कल्पना फार थोडी असलेली दिसून येते. या प्रकरणासंबंधीं अस्सल इतिहास—कागदपत्र बरेचसे प्रसिद्ध केले असें रा. वासुदेव वामनशास्त्री खरे यांनीं. हे कागदपत्र पटवर्धनांच्या दप्तरांतील व 'ऐतिहासिक लेख-संग्रहां'त प्रसिद्ध झालेले होत. पण वर छापलेले कागदपत्र, खुद्द नाना फडणीसांच्या दप्तरांतील असल्यामुळें त्यांचें महत्व कांहीं वेगळें च आहे असें ते वाचणारास आढळून येईल. सदरील कागदपत्र रा. दत्तात्रेय बळवंत पारसनीस यांजकडून मला मिळाले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

येथें दिलेले कागदपत्र ३९ आहेत. ते बहुतेक सर्व शके १६९८ म्हणजे सन १७७६ या सालच्या पांच सहा महिन्यांतील च आहेत. रत्नागिरीचे मामलेदार रामचंद्र नाईक परांजपे यांनीं तोतयास खरा ठरवून फाल्गुन शु॥ १० शके १६९७ या दिवशीं बेडी तोडून मोकळा केला, व त्यास सर्व सरंजाम श्रीमंत पेशव्यांप्रमाणें करून दिला! तेथपासून तोतयाचें खूळ मोडून तोतयास शिक्षा देऊन रामचंद्र नाईक प्रभृति गुन्हेगार साथीदारांचा राजद्रोही पत्रव्यवहार पकडून त्यांना शिक्षा व संसर्गी लोकांस प्रायश्चित्तें सांगेपर्यंतच्या मजकुराचा समावेश सदर पत्रांत झालेला आहे. बहुतेक पत्रें खुद्द नानाफडणीस यांस लिहिलेलीं असून यांपैकीं पुष्कळांवर नानांच्या हातच्या पैवस्त्या घातलेल्या आहेत. पत्रें कोणीं लिहिलीं याच्या खुलाशाकरितां खालील तपशील दिला आहे.

ले. १ हें नारो बाबाजी फडके याचें पत्र. या विश्वासू गृहस्थास तोतयाच्या खुळाची खरी हकीकत काढण्याकरितां नाना फडणविसांनीं मुद्दाम रत्नागिरीस पाठविलें होतें; व त्यानें या पत्रांत तोतया बंधमुक्त झाल्याची नक्की तिथी दिली आहे. ले. २ तें १२ हीं ११ पत्रें हरीपंत फडके यांचीं आहेत. हीं सर्व खुद्द हरिपंतांच्या हातची च आहेत. हरिपंत हे यावेळीं पुण्यास राहून नानांच्या आज्ञेप्रमाणें पार्वतीबाईवरील देखरेख आणि तोतयावर फौजा पाठविण्याची व्यवस्था पहात होते. पानसे व शिंदे यांच्या मागून ते हि बोरघाटाकडे तोतयाशीं युद्ध करण्यासाठीं जाणार होते; पण त्याचें कारण हि पडलें नाहीं. ले. १३ तें १७ हीं पांच पत्रें सखाराम बापूंचीं आहेत असें त्यांतील अखेरच्या भागांतील अक्षरावरून दिसतें. आंतील मजकूर हि सखारामबापूंनीं लिहावा

असाच आहे. लेखांक ३८ वरून सखाराम बापू आपल्या नेहमीच्या दुटप्पीपणाच्या वृत्तीस अनुसरून या प्रकरणीं हि वागत होते ही हि बाब दिसून येते. ले. १८ ते २५ हीं आठ पत्रें बाबूराव कृष्ण ( आपटे ) या नांवाचा नानांचा एक विश्वासू हस्तक सातान्यास महाराजांच्या दिमतीस अगर देखरेखेस होता त्याचीं आहेत. ले. २४ व २५ पत्रांत ' बाबूराव कृष्ण ' असे शब्द नाहींत. परंतु लिहिण्याच्या शैलीवरून तीं त्याचीं च पत्रें दिसतात. भरंवशाच्या व सलगीच्या मनुष्यानें लिहिल्यासारखीं हीं पत्रें असून त्यांतील अघळपघळ वक्तृत्व हें लिहिणाराच्या स्वभावाचें दर्शक आहे. ले. २६ हें पत्र बालाजी गोविंद यांचें आहे. हा शिंद्याच्या लष्करांतील हुजुरातींतील महत्वाचा मनुष्य दिसतो. ले. २७ हें कुलाब्याहून आलेलें वातमीपत्र आहे. कोणीं लिहिलें याचा नक्की अंदाज होत नाहीं. ले. २८ ते ३१ हीं सुवर्णदुर्ग तित्रेघाट व वर्ध्याघाट येथून तोतयाच्या हालचालीसंबंधीं नाना फडनीसांकडे आलेलीं बातमीपत्रें आहेत. ले. ३२ निंबाजी विठ्ठल व दादाजी जगन्नाथ यांचें पत्र यांत आपले हातीं लागलेला तोतया आंग्रे पेशव्यांचे सरदार शिंदे यांचे हातीं देण्यास तयार असतां इंग्रजांनीं तोतया ही आमची ' वस्त ' अशा सबबीवर प्रतिबंध कसा केला, व तो दूर होण्यास कोणची योजना होणें जरूर होतें, याचा मजकूर आहे. ले. ३३ हे रेवदंडा येथें आलेल्या तोतयाकडील वहिमी लोकांवर नजर कशी ठेविली यासंबंधाचें पत्र आहे. ले. ३४ हें परशुरामभाऊ पटवर्धन यांचें पत्र असून शेवटचा मजकूर त्यांचे हातचा आहे. नानांच्या आज्ञेवरून परशुरामभाऊ हे तोतयाच्या पारिपत्याकरितां निघणार होते. परंतु त्याचे आधींच बंड मोडल्यानें त्यांचा बेत रहित झाला. ले. ३५ हें महादजी शिंदे यांचें पत्र आहे. ले. ३६ हें गंगापुराहून श्री. मातोश्री गोपिकाबाई यांच्या दिमतीस असलेल्या कारकुनाचें पत्र असावें. ले. ३७ हें रामशास्त्रीबोवा, न्यायाधीश, यांचें पत्र प्रायश्चित्तांच्या व्यवस्थेसंबंधी आहे. ले ३८ ही फार महत्वाची यादी आहे असें आंतील मजकुरावरून दिसतें. त्यांत रामचंद्र नाईक परांजपे, मामलेदार रत्नागिरी, याची तोतयाप्रकरणीं राजद्रोहात्मक पत्रें पकडलेलीं दिलेलीं आहेत. त्यांत या प्रकरणीं नायकांची भिस्त कोणाकोणावर होती याचा सहज उलगडा होणार आहे. व ले. ३९ हें पत्र कोणाचें आहे कळत नाहीं. आंतील मजकुराचा संबंध तोतयाच्या खुलाशीं प्रत्यक्ष असा नाहीं. परंतु मजकूर दुसऱ्या एका दृष्टीनें बोधप्रद असा आहे.

श्री

मंडळाच्या जमाखर्चाचा तक्ता वगैरे सर्व माहिती सालअखेरीस सभासदांस सादर केली जाईल. पहिल्या सहामाहींत वाचलेले बहुतेक सर्व निबंध या पुस्तकांत छापले आहेत; ' पेशव्यांची वंशावळ ' हा रा. पां. न. पटवर्धन यांचा निबंध पुढील सहामाहीच्या अहवालांत येईल.

चिटणीस

# मंडळानें प्रसिद्ध केलेले ग्रंथ

१ अहवाल शके १८३२ बद्दल किंमत ३ रु.

२ अहवाल शके १८३३ बद्दल किंमत ५ रु.

३ सुबंत विचार— ले. वि. का. राजवाडे किं. २ रु.

४ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ वा. यांत रघुनाथराव दादासाहेब यांचे दिवाण चिंतो विठ्ठल रायरीकर यांच्या दप्तरांतील कागदपत्रांचा संग्रह केला आहे.

किंमत १॥ रु.

अप्पाबळवंत वाडा
४५६ शनवार पेठ
पुणें शहर

चिटणीस,
भा. इ. सं. मंडळ

हें पुस्तक रा. नटेश अप्पाजी द्रवीड यांनीं आर्यभूषण छापखान्यांत छापिलें व रा. खंडेराव चिंतामण मेहेंदळे चिटणीस भारत-इतिहास-संशोधक मंडळ, पुणें यांनीं प्रसिद्ध केलें.

भा० इ० सं० मंडळ-ग्रंथमाला

पुस्तक ४ थें भाग २ रा

॥ श्री ॥

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळ

षाण्मासिक वृत्त शके १८३४

( आश्विन-फाल्गुन )

खंडेराव चिंतामण मेहेंदळे

संपादक, चिटणीस.

हें पुस्तक पुणें येथें रा. नटेश अप्पाजी द्रविड यांनीं
आर्यभूषण छापखान्यांत छापिलें व रा. खंडेराव
चिंतामण मेहेंदळे यांनीं पुणें येथें
प्रसिद्ध केलें.

किंमत [illegible] रुपये [illegible]

# अनुक्रमणिका


| लेखांक | विषय | लेखक | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| ३३ | कास्कर ... ... ... ... ... | रा. राजवाडे | १२८ |
| ३४ | मंगल–मोंगल ... ... ... ... | ,, | १२९ |
| ३५ | मराठी गद्य ... ... ... ... | ,, | १३१ |
| ३६ | ग: व गि:... ... ... ... ... | ,, | १३२ |
| ३७ | रस = पर्व... ... ... ... ... | ,, | १३३ |
| ३८ | त्रिविक्रम शक्य ( चलक्य ) ... ... ... | ,, | १३४ |
| ३९ | देवगिरीचा रामदेवराव यादव याचें राज्य गेल्याचा काल | ,, | १३५ |
| ४० | पाटोद्याचे देशपांडे ... ... ... ... | ,, | १३६ |
| ४१ | ज्ञानेश्वरी पद्धती ... ... ... ... | ,, | १४५ |
| ४२ | नरहरिदासकृत अभंगरामायण ... ... ... | ,, | १४७ |
| ४३ | कोंडू किंवा कुंडलीशकृत आत्मबोध व आत्मसुख ... | ,, | १४८ |
| ४४ | दत्त कवि ... ... ... ... ... | ,, | १४९ |
| ४५ | वाग्भट अष्टांगसंग्रहसंहिता ... ... ... | ,, | १५० |
| ४६ | पूर्णानंदाचे शिवरामस्वामी ... ... ... | रा. देव | १५४ |
| ४७ | श्रीसमर्थांचे पश्चात् त्यांच्या शिकवणीचा राजकारणांत उपयोग | ,, | १६० |
| ४८ | सुप्रसिद्ध कवीची अप्रसिद्ध कविता ... ... | ,, | १६२ |
| ४९ | संदेहहरण ... ... ... ... ... | ,, | १६३ |
| ५० | आनंदतनयाचा नातू शंकरतनय ... ... | ,, | १६५ |
| ५१ | प्रभुनंदनकृत श्रीसंड्याचें चरित्र... ... ... | ,, | १६६ |
| ५२ | वृद्धवलिंग कवि ... ... ... ... | ,, | १६७ |
| ५३ | चंद्रात्मज कवि ... ... ... ... | ,, | १६८ |
| ५४ | सेन्द्रकांचा ताम्रपट ... ... ... ... | रा. चांदोरकर | १६९ |
| ५५ | नामदेवराय व विष्णुदास नामा ... ... ... | ,, | १७८ |
| ५६ | दीनदत्तपदांकित मुकुंद ... ... ... | ,, | [illegible] |
| ५७ | चां(चो॰)भाकवी ... ... ... ... | रा. पोतदार | ३७६ |

श्री

# वार्षिकवृत्त

अध्यक्ष व सभासदहो,

आजचा हा संमेलनप्रसंग मंडळाचे चरित्रांत मोठा स्पृहणीय आहे. यावेळीं मंडळाचे सभासद व इतर निमंत्रित सद्गृहस्थ--ज्यांना आपले कामाबद्दल सहानुभूति व कळकळ आहे-वेळांत वेळ काढून हा प्रसंग साजरा करीत आहेत. मंडळाला दोन हेतू साधावयाचे आहेत. ते:—( १ ) मंडळानें शके १८३४ मध्यें केलेल्या कामाचा आढावा सभासदांस सादर करावयाचा. व ( २ ) संशोधनाचें काम करीत असतांना जे अनुभव आले त्यांचा फायदा घेऊन संशोधनाचें काम विशेष नेटानें विशिष्ट भागांत करावयाचें. दुसऱ्या बाबतींत आपले अध्यक्ष अधिकारयुक्त वाणीनें खुलासेवार बोलतील.

प्रो. ह. गो. लिमये यांनीं ताराबाई व विजापूरचे आठ बादशहा यांचीं चित्रें मंडळास दाखविलीं होतीं. रा द. वा. पोतदार यांनीं पाटीलबावा यांची ऐन-उमेदींतील तसबीर व सवाई माधवराव पेशवे यांच्या हस्तिदंती चौकोनी गंजीफा, बुद्धिबळें ( खेळण्याचे चौरंगासह ), सचित्र पंचरत्नी गीता वगैरे जिनसा दाखविल्या होत्या. चित्रांचीं व लिपीचीं कामें अत्यंत सुचक होतीं.

शके १८३४ सालांत मंडळाच्या पाक्षिक सभा २७ झाल्या व त्यांत सरासरीनें हजर असलेल्या सभासदांचें प्रमाण ७ पडलें. या सालीं संशोधनाचा भर विशेष रीतीनें वाङ्मय व सारस्वत या दोन बाबतींत दिसून येतो. ऐतिहासिक कागदपत्रें, ताम्रपट व शिलालेख यांचें प्रमाण हि कांहीं कमी पडलें नाहीं.

या सालांत मंडळातर्फे दोन ग्रंथ प्रसिद्ध झाले (१)सुबंतविचार व (२) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ वा (रायरीकर यांचे कागदपत्र). उत्तरोक्त कामांत मंडळाचे सभासद सरदार गंगाधरराव मुजूमदार व आर्यभूषण छापखान्याचे व्यवस्थापक यांनीं द्रव्यद्वारा मदत करून या ग्रंथाचे प्रकाशनास हातभार लावला.

या सालीं मंडळास नजर आलेलीं पुस्तकें:—

(१) The Vedic Fathers of Geology ( २ ) अमरकोशावर क्षीरस्वामीची टीका ( ३ ) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १५ वा ( ४ ) समर्थप्रताप (५) दासविश्रामधाम भाग १ ला (६) मोरोपंत यांचें महाभारत भाग तीन ( ७ ) तिङन्त-विचार प्रती १० (८) काव्येतिहास-संग्रहाचीं पुस्तकें १-११

## जमाखर्चाचा तक्ता

| जमा | | खर्च | |
| --- | --- | --- | --- |
| १०८-२-९ | शिल्लक सालगुदस्त | १००-०-० | सुचिंतविचार छपाई |
| २००-०-० | देणगी (रा. मुजूमदार व मेहेंदळे यांजकडून प्रत्येकीं १००रु.) | १००-०-० | बाराव्या खंडाच्या छपाईस अंशतः मदत |
| २२३-४-० | वर्गणी | २८०-१२-० | शके १८३३ चा अहवाल छपाई |
| ६०-९-० | पुस्तकविक्री | १७२-८-० | शके १८३४ अहवाल (चैत्र-भाद्रपद) छपाई |
| | | १६-५-३ | टपाल खर्च |
| | | ४-०-० | किरकोळ छपाई |
| | | ३-०-० | दप्तर खर्च |
| ५९१-१५-९ | जमा | ६७६-९-३ | खर्च |

जमेपेक्षां खर्चाची रक्कम जास्त झाली आहे. तथापि वर्गणी सभासदांकडून अद्याप वसूल आली नाहीं ती ते या महिन्यांत देतील अशी उमेद आहे.

सालमजकुरीं खालील गृहस्थ मंडळाचे सभासद होते.

१ रा. रा. काशीनाथ नारायण साने बी. ए. ( अध्यक्ष ), पुणें
२ सरदार खंडेराव चिंतामण मेहेंदळे बी. ए. ( चिटणीस ), पुणें
३ रा. रा. हरि नारायण आपटे, पुणें
*४ रा. रा. नारायण बापूजी उडगीकर एम्. ए., पुणें
*५ सरदार मोरेश्वर चिंतामण ओंकार, पुणें
६ रा. रा. कृष्णाजी गोविंद ओक, पुणें
*७ रा. रा. रघुनाथ पांडुरंग करंदीकर, हायकोर्ट वकील, सातारा
८ रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर बी. ए. एल्. एल्. बी., पुणें
९ रा. रा. गणेश सखाराम खरे, ऑनररी एंजिनियर, पुणें
*१० नामदार प्रो. गोपाळ कृष्ण गोखले, सी. आय. ई., पुणें
*११ रा. रा. गोपाळ रावजी गोगटे बी. ए. एल्. एल्. बी., भुसावळ
*१२ रा. रा. हरि गणेश गोडबोले, बी. ए., पुणें
*१३ श्रीमंत नारायणराव गोविंद ऊर्फ बाबासाहेब घोरपडे इचलकरंजीकर, इचलकरंजी

*१४ रा. रा. गोविंद काशीनाथ चांदोरकर बी. ए. एल्. एल्. बी., धुळें
*१५ रा. रा. दत्तात्रेय श्रीराम जोशी, इनामदार, पुणें
१६ रा. रा. शंकर श्रीकृष्ण देव बी. ए. एल्. बी., धुळें
१७ रा. रा. विनायक नीळकंठ नातू, इनामदार, पुणें
१८ रा. रा. अनंत विनायक पटवर्धन बी. ए., पुणें
१९ रा. रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन, पुणें
२० रा. रा. रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर, पुणें
२१ रा. रा. शिवराम महादेव परांजपे एम्. ए., पुणें
*२२ रा. ब. दत्तात्रेय बळवंत पारसनीस, सातारा
*२३ रा. रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए., पुणें
२४ रा. रा. दत्तात्रेय वामन पोतदार बी. ए., पुणें
२५ रा. रा. महादेव मोरेश्वर ( भानू ) फडणीस, इनामदार, पुणें
*२६ रा. रा. भास्कर वामन भट बी. ए. एल्. एल्. बी., धुळें
*२७ रा. रा. हरि रघुनाथ भागवत बी. ए. पुणें
२८ प्रो. चिंतामण गंगाधर भानू बी. ए., पुणें
२९ रा. रा. विनायक लक्ष्मण भावे बी. एस्सी., ठाणें
३० सरदार गंगाधरराव नारायण मुजूमदार, पुणें
*३१ रा. रा. वासुदेव दामोदर मुंडले, इसळामपूर
३२ रा. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे बी. ए , पुणें
*३३ रा. रा. शंकर रामचंद्र राजे, पुणें
३४ प्रो. हरि गोविंद लिमये एम्. ए., पुणें
३५ रा. ब. चिंतामण विनायक वैद्य एम्, ए. एल् एल्. बी., कल्याण
३६ रा. रा. अच्युत सीताराम साठे एम्. ए. बी. एल्., उमरावती

या सालांत १५ नवीन सभासद झाले आहेत. यावरून मंडळानें आंखून घेतलेल्या कामाबद्दल अभिरुचि व सहानुभूति दिवसेंदिवस वाढत आहे असें दिसतें.

मिति चैत्र व. १० शके १८३५
भारत-इतिहास-संशोधक-मंडळ
४५६ शनवार पेठ पुणें शहर

खं० चिं० मेहेंदळे
चिटणीस

* खुणा केलेले गृहस्थ या वर्षी नवीन सभासद झाले आहेत.

# ३३ कारस्कर

( रा. वि. का. राजवाडे )

१ बौधायनधर्मसूत्राच्या प्रथम प्रश्नाच्या प्रथम अध्यायाच्या द्वितीय कंडिकेच्या चौदाव्या सूत्रांत आरट्ट, कारस्कर, पौंड्र, सौवीर, वंग, कलिंग, प्राणून ह्या लोकांचा व देशांचा उल्लेख केला आहे. पैकीं कारस्कर हा शब्द कर्णपर्वाच्या चव्वेचाळीसाव्या अध्यायांत आला आहे. ह्या कारस्कर शब्दाचा, एक रानटी जात, ह्या अर्थी उपयोग दोन्ही ठिकाणीं केला आहे. ह्या लोकांच्या देशांत जो कोणी जाईल व वास्तव्य करील त्याला बौधायनानें प्रायश्चित्त सांगितलेलें आहे. हे कारस्कर लोक दक्षिणेकडचे असावे, असा बूल्हरचा तर्क आहे. ( Sacred Books of the East Vol. 14, बौधायन, भाषांतर, पृष्ठ १४८, टीप ). हा जर तर्क खरा असेल, आणि तो खरा असावा असें माझें हि मत आहे, तर ह्या तर्काचा पाणिनीच्या अष्टाध्यायीच्या सहाव्या अध्यायाच्या प्रथम पादाच्या १५६ व्या सूत्रावर चांगला प्रकाश पडतो. कारस्करो वृक्षः ( ६–१–१५६ ) असे सूत्रशब्द आहेत. पारस्करादि गणांत हि हा कारस्कर शब्द दुसरा आहे. म्हणजे पाणिनीला हा कारस्कर शब्द माहीत होता, हें निर्विवाद आहे. कोणीकोणी कस्कादिगणांत हा शब्द पठतात, परंतु तें बहुमान्य नाहीं. कारस्करो वृक्षः म्हणजे कारस्कर देशांत झालेलें एक झाड. तें कारस्करसंज्ञक होय. तात्पर्य कारस्कर नांवाचा एक देश होता, व तेथील वृक्षांना कारस्कर वृक्ष म्हणत, ह्या दोन गोष्टी पाणिनीला माहीत होत्या. आतां हा देश दक्षिणेकडील म्हणजे विंध्याच्या दक्षिणेकडील असावा, असा तर्क आहे. आणि तो तर्क जर खरा असेल, तर दक्षिणेकडील कारस्कर देश पाणिनीला माहीत होता व तेथून कांहीं मौल्यवान लांकडें उत्तर हिंदुस्थानांत पाणिनीच्या काळीं आणीत, ह्या दोन बाबी सिद्ध होतात.

२ आतां बौधायन सांगतो कीं कारस्कर हें रानटी लोकांचें नांव आहे. तेव्हां हे कारस्कर लोक कोण असावे व त्यांच्या नांवाचा सध्यां कोणता अपभ्रंश झालेला असावा, हें शोधावयाचें आहे. माझ्या मतें, पाणिनीच्या व बौधायनाच्या वेळचे हे कारस्कर लोक म्हणजे सध्यांच्या महाराष्ट्रांतील कातकरी लोक होत.

कारस्कर = कारचकर = काचकर = कातकर

अशा अपभ्रंशपरंपरेनें हा कातकर ऊर्फ कातकरी शब्द मराठींत आला आहे. हे रानटी कातकरी विंध्याच्या दक्षिणेस महाअरण्यांत ऊर्फ महाकान्तारांत त्या काळीं

सध्यांच्या प्रमाणें च रहात व त्यांच्या नांवावरून ते रहात त्या देशाला कारस्कर हें नांव मिळालेलें होतें. कात करणारे जे ते कातकरी ही अज्ञ व्युत्पत्ति अलीकडील खर्डेघाशांची असून ती Bombay Gazetteer मध्यें दिलेली आहे. परंतु, तींत कांहीं तात्पर्य नाहीं. सारांश पाणिनीला महाकान्तारांतील कारस्कर देश, वृक्ष व कदाचित् लोक माहीत होते, हें उघड आहे.

## ३४ मंगल—मोंगल

(रा. वि. का. राजवाडे)

(१) सध्याच्या अफगानिस्तानाच्या उत्तरेस मंगल नांवाचे दंगेखोर लोक रहातात. त्यांच्या उत्पाताच्या हकीकती वर्तमानपत्रांतून अधींमधीं ऐकूं येतात. हे लोक भारताच्या भीष्मपर्वाच्या अकराव्या अध्यायांत वर्णिलेल्या शकलोकांतील मंदग नांवाच्या शूद्रांचे वंशज होत.

मंदग + ल (स्वार्थक) = मंअगल = मंगल

मंगल = मोंगल = मोगल

अशा परंपरेनें मंगल व मोंगल व मोगल हे शब्द निष्पन्न झालेले आहेत. आपणा हिंदुस्थानांतील लोकांना मोंगल लोकांची चांगली ओळख आहे. बाबर, अकबर, औरंगझेब हे मोंगल होते म्हणजे पूर्वींच्या शकशूद्रांचे वंशज आहेत. भीष्माच्या वेळीं ह्या लोकांत चातुर्वर्ण्यधर्म होता. पुराणांच्या वेळीं ह्यांच्यांतून चातुर्वर्ण्यधर्म लुप्त होऊन हे लोक म्लेंछ झाले व मूर्तिपूजक किंवा पंचभूतपूजक बनले. महंमदाचा धर्म शक ६०० च्या सुमारास निघाल्यावर, तो ह्या लोकांनीं स्वीकारिला. बाबराचें आडनांव चखताई.

जघताई = चखताई = चकते

मोगलांच्या राज्याला चकत्यांचें राज्य मराठी बखरींतून म्हटलेलें आहे. हा चकते–चखताई–जघताई शब्द शकस्थानीय किंवा शकजातीय या शब्दाचा अपभ्रंश दिसतो.

(२) हे शककुलोत्पन्न मोंगल लोक फार प्रळय करणारे होते व आहेत. महंमदीधर्म स्वीकारण्यापूर्वीं म्हणजे शक ६०० पूर्वीं हे शकलोक जितके उपद्व्यापी होते तितके च ते तो धर्म स्वीकारल्यानंतर हि होते. म्हणजे महंमदीधर्मानें यांच्या

उत्पात करण्याच्या मूळ स्वभावांत यत्किंचित् हि न्यूनाधिक्य झालेलें नाहीं. महंमदी धर्म असुर पडल्यामुळें, तो धर्म स्वीकारल्यावर ह्यांच्यांत धर्मवेड मात्र जास्त शिरलें. बाकी उत्पातक स्वभाव जशाचा तसाच कायम राहिला. हे लोक मूळचे शकस्थानांतले म्हणजे मध्यआशियांतील विस्तीर्ण प्रदेशांतील रहाणारे होत. भोंवतालच्या कमजास्त सुधारलेल्या राष्ट्रांत कोणत्या हि कारणानें कमकुवतपणा आला म्हणजे, ह्या लोकांची झुंड त्या राष्ट्रांवर टोळधाडीसारखी पडे व तेथील राज्ययंत्र काबीज करी. यूरोपीयन तुर्कस्थान, बाबिलोन, असूरिया, इराण, अफगानिस्तान, हिंदुस्थान, तिबेट व चीन ह्या सर्व देशांना ह्या लोकांपासून आज हजारों वर्षे पीडा होत आली आहे. भारतवर्षाला तर यांची ओळख चांगली च आहे. सगर राजाच्या काळीं हे लोक भारतीय आर्यांच्या अंकित होते. नंतर शातवाहनांच्या पश्चात् व पूर्वी व वेळीं भारतवर्षांत ह्या लोकांनीं तीन चार शतकें धिंगाणा घातला ( शकपूर्व १००–शकनंतर ४००). तो सुमार ६०० वर्षे शमल्यावर पुनः शक १००० पासून शक १६०० पर्यंत तुर्क व मोंगल ह्या रूपांनीं हे शक लोक भारतवर्षांत प्रळय करते झाले. तो प्रळय शक १६०० त मराठ्यांनीं मोडला. शकपूर्व १०० च्या वेळचा हि प्रळय महाराष्ट्रांतील शातवाहनांनीं च मोडला. म्हणजे भारतवर्षाला शकांच्या उत्पातापासून महाराष्ट्रांतील लढवय्या व मुत्सद्दी लोकांनीं गेल्या दोन हजार वर्षांत दोनदां सोडविलें.

( ३ ) भारतवर्षांत मंगल ऊर्फ मोंगल ह्या शकवंशीय लोकांचें साम्राज्य होण्यापूर्वी तुर्कांचा स्पर्श ह्या देशाला चार पांचशें वर्षे ( शक १००० ते शक १५०० ) झाला. हे तुर्क ऊर्फ तुरुक लोक हि शकवंशीय च. संस्कृतांत ह्या लोकांना तुरुष्क म्हणत. तुरुष्क म्हणजे तुरुशक किंवा तुरुषक. तुरु प्रांतांतील किंवा तुरु कुळांतील जे शक ते तुरुशक. तात्पर्य, तुर्क व मोंगल हे शकलोक भारतवर्षाला आज चार हजार वर्षांपासून आतांपर्यंत एकसारखा स्पर्श करीत आहेत. जंबुद्वीप व शकद्वीप एकमेकाला लागून असल्यामुळें, हा स्पर्श पर्वी जसा होत आला तसा च पुढें हि होत राहील, हें उघड आहे.

# ३५ मराठी गद्य

(रा. वि. का. राजवाडे)

माझ्या संग्रहास गद्यांत लिहिलेले मराठी ग्रंथ खालील विषयांवर आहेतः—

१ वैद्यक २ वेदान्त ३ भारतादि इतिहास ४ गणित–ज्योतिष ५ फल–ज्योतिष ६ धर्म–शास्त्र ७ बखरी–इतिहास ८ हिशोब–वरावर्दी ९ भूगोल १० राजकीय व खासगी पत्रें ११ ताम्रपट व शिलालेख १२ यात्राप्रवास

पैकीं मराठींतील गद्य व पद्य लेखांपैकीं सर्वांत प्राचीन म्हटले म्हणजे मराठी गद्य लेख होत. शक शतक ५०० पासून मराठी गद्य लेख सांपडतात. मराठी पद्य शक शतक ११०० पासून सांपडतें. महाराष्ट्र प्रथम बोलूं कशांत लागलें ? तर गद्यांत. आणि हें रास्त च आहे. नित्याचा व्यवहार गद्यांत च झाला पाहिजे. असा सिद्धान्त कित्येक लोक काढतात कीं बालराष्ट्रें प्रथम पद्यांत विचारप्रदर्शन करतात. परंतु तें मराठीसंबंधानें खरें नाहीं. ह्याला कारण असें आहे कीं, मराठी ही भाषा रानटी लोकांची कधीं च नव्हती. मराठी भाषा महाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांचा अपभ्रंश आहे. मराठीच्या पाठीमागें संस्कृताचा पाठिंबा आहे. ह्याचा अर्थ इतका च कीं, संस्कृत भाषा बोलणाऱ्या आर्यांची सर्व संस्कृति मराठी बोलणारे आर्य घेऊन मार्गक्रमण करीत आहेत. पूर्वीचें कांहीं च स्मरण नसून, कित्येक रानटी राष्ट्रें आपली संसारयात्रा क्रमूं लागलीं. तशांतला प्रकार महाराष्ट्राचा नाहीं. महाराष्ट्र रानटी असें कधीं च नव्हतें. संस्कृत बोलणाऱ्या आर्यांची सर्व संस्कृति त्यांच्या जवळ असून, फक्त संस्कृत–महाराष्ट्री–अपभ्रंश ह्यांचा अपभ्रंश जी मराठी ती बोलण्याचा नवीन क्रम महाराष्ट्रांतील बालस्त्रीशूद्रादींनीं पत्करला इतकें च कायतें. त्यामुळें इतर रानटी राष्ट्रांत पद्यप्राधम्याचा जो चमत्कार दिसतो, तो महाराष्ट्रांत दिसत नाहीं. मराठी भाषा पांच सातशें वर्षें क्रमाविली गेल्यावर तींत ज्ञानेश्वरीसारखा प्रगल्भ ग्रंथ ज्ञानेश्वरानें निर्माण केला. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ, कित्येक अज्ञ लोक समजतात त्याप्रमाणें—राष्ट्राच्या बाल्यावस्थेंतील व रानटी स्थितींतील नाहीं. हा ग्रंथ राष्ट्राच्या ऊर्जित स्थितींतील आहे. ज्ञानेश्वराच्या कालीं च हेमाद्रि, बोपदेव वगैरे महापंडित महाराष्ट्रांत विद्यमान होते. ज्ञानेश्वराच्या पूर्वी शंभर दोनशें वर्षें भास्कराचार्य–महागणिती–महाराष्ट्रांत झाले व त्यांच्यासंबंधाचा मराठी शिलालेख त्यांच्या नातवानें खानदेशांत पाटण येथें उभारलेला अद्याप आहे. भास्कराचार्यांची–गणिती या दृष्टीनें–योग्यता टायको, न्यूटन ह्यांच्याहून हि विशेष आहे, हें नव्यानें सांगावयाला नको. तेव्हां, भास्कराचार्य, हेमाद्रि, बोपदेव वगैरे प्रचंड

म्हणूनें ज्ञानेश्वराच्या आधीं नुकतीं च ज्या देशांत होऊन गेलीं त्या देशाला रानटी म्हणणें किंवा बाल्यावस्थेंतील गणणें शुद्ध अजाणपणाचें लक्षण आहे. ज्ञानेश्वर-कालीं राष्ट्र रानटी नव्हतें, बाल्यावस्थेंत नव्हतें, चांगलें प्रौढावस्थेंत होतें. इतकें च कीं हेमाद्रि, बोपदेव संस्कृतांत लिहीत आहेत व ज्ञानेश्वर स्त्रीशूद्रादिकांकरितां मराठींत लिहीत आहेत. ज्ञानेश्वराच्या अगोदर, निवृत्ति, मुकुंदराज, सहदेव भाडळी, अभिलषितार्थ चिंतामणींतील पद्यकार, यांनीं ग्रंथरचना केलेली आहे; व त्या ग्रंथ-रचनेनें कमाविल्या गेलेल्या मराठींत ज्ञानेश्वर लिहीत आहे. ज्ञानेश्वर कांहीं रानटी मराठींत लिहीत नाहीं; चांगल्या अभिजात व उमद्या मराठींत वक्तृत्व करीत आहे. आपले आधार तपासल्या शिवाय कित्येक ग्रॅजुएटांनीं व प्रोफेसरांनीं ज्ञानेश्वरासंबंधानें बाल्यावस्था, रानटीपणा, राष्ट्राचा प्रारंभ, पद्यप्राथम्य वगैरे अप्रस्तुत व अयथार्थ मुद्दे पुढें आणिलेले आहेत, पण त्यांत कांहीं एक मतलब दिसत नाहीं.

## ३६ गः व गिः

(रा. वि. का. राजवाडे)

सेउणदेशच्या यादवांच्या वंशावळींत खालील नांवें येतातः—

१ राज ऊर्फ राजगि

२ वद्दिग ऊर्फ वादुगि

३ वेसुगि

४ मल्लुगि ऊर्फ मल्लुगि

देवगिरीच्या यादवांच्या वंशावळींत खालील नांव येतें:—

१ जैत्रपाल ऊर्फ जैतुगि

राष्ट्रकूटांच्या वंशावळींत खालील नांव येतें:—

१ वद्दिग

हनगळच्या कदंब वंशावळींत खालील नांव येतें:—

१ चट्ट, चट्टय ऊर्फ चट्टुग

ह्या नांवांत ग किंवा गि ह्या प्रत्ययांच्या उगम काय ?

चष्ठ ( देव ) या शब्दाचें प्राकृत रूप चट्ठ ( देव ) असें होतें. चष्ठक याचें प्राकृत चट्टअ व चट्टग असें होतें. चट्टअ चा उच्चार चट्टय असा हि होतो. तेव्हां चट्ट चट्टय व चट्टग या रूपांची व्युत्पत्ति स्पष्ट आहे. ग हा प्रत्यय संस्कृत क या प्रत्ययापासून निघाला आहे. अर्थात्,

राजक = राजग
वादिक = वादिग
मल्लक = मल्लग
जैतृक = जैतुग
वेषक = वेसग

वगैरे रूपें क चा ग होऊन साधतील. वादिग ह्या प्राकृत रूपाचें पुनः संस्कृतीकरण वद्दिग किंवा बद्दिग होईल. हें हि सुगम आहे. परंतु राजगि, मल्लुगि, मल्लगि, वेसुगि, जैतुगि हीं इकारान्त रूपें कशीं साधतील, हा प्रश्न आहे. इ हा अपत्यार्थक प्रत्यय संस्कृतांत आहे.

( १ ) राजकस्य अनंतरापत्यं राजकिः = राजगिः
( २ ) वादिकस्य अनंतरापत्यं वादकिः = वादगिः
( ३ ) मल्लकस्य अनंतरापत्यं मल्लकिः = माळगिः
( ४ ) वेषकस्य अनंतपरापत्यं वेषकिः = वेसगिः
( ५ ) जैतृकस्य अनंतपरापत्यं जैतृकिः = जैतुगिः

राज, वादि, मल्ल, वेष, जैतृ या शब्दांना कुत्सितार्थक किंवा ममत्वदर्शक प्रत्यय लागून राजक, वादिक, मल्लक, वेषक, जैतृक हे तद्धित शब्द होतात. ह्या ककारान्त शब्दांपासून किकारान्त अपत्यार्थक रूपें होतात. व कि चा प्राकृतांत गि होतो. शिवाय ममत्वदर्शक उ प्रत्यय प्राकृतांत लागून, राजुगि, वादुगि, मल्लुगि, वेसुगि हीं रूपें होतात. इतकें सर्व मान्य होण्याजोगें आहे. परंतु, जैत्रपाल ऊर्फ जैतृ ऊर्फ जैतृक म्हणजे कांहीं जैतृकि नव्हे. जैतृकि हा जैतृकाचा मुलगा होतो. मल्लकि हा मल्लकाचा मुलगा होतो. अर्थात्, जैतुगि म्हणजे जैत्रपाल नव्हे व मल्लुगि म्हणजे मल्लक नव्हे. तेव्हां येथें तोड काय काढावी ? येथें असें समाधान करून घ्यावें लागतें कीं, जैतृ, मल्ल अथवा जैतृक, मल्लक हीं नांवें जैतुगि व मल्लुगि यांच्या बापांचीं आहेत.

☞ अर्वाचीन मराठींतील, जैतोजी, मालोजी, राजूजी वगैरे नांवांतील जी प्रत्यय ह्या गि प्रत्ययाहून निराळा.

## ३७ रस=वर्ष

( रा. वि. का. राजवाडे )

कित्येक ताम्रपटांतून व शिलालेखांतून कित्येक नांवांचा शेवट वरस किंवा रस या अक्षरांनीं होतो. हीं दोन रस अक्षरें वर्ष या संस्कृत शब्दापासून अपभ्रष्ट झालेलीं आहेत.

१ नागादित्यवर्ष = नागतीयरस
२ केतुवर्ष = केतरस
३ सोमदेववर्ष = सोविदेववर्ष
४ पांड्यदेववर्ष = पांड्यदेवरस
५ माहेश्वरदेववर्ष = माहेश्वरदेवरस
६ मातृदेववर्ष = मायिदेवरस
७ इंद्रकेशिदेववर्ष = इंद्रकेशिदेवरस
८ कल्पदेववर्ष = कप्पदेवरस*
९ भीमवर्ष = भीमरस
१० अच्युतवर्ष = आचरस
११ ब्रह्मवर्ष = बम्मरस
१२ बुद्धवर्ष = बुद्धवरस
१३ गणपतिदेववर्ष = गणपतिदेवरस
१४ गोविंदवर्ष = गोविंदरस

*राजन् ह्या शब्दापासून ०रस हा शब्द निघालेला नाहीं.

## ३८ त्रिविक्रम शक्य ( चल्क्य )

( रा. वि. का. राजवाडे )

भर्तृहरिकृत नीतिशतकाची एक सटीक पोथी मला नुकती च सांपडली आहे तींत प्रारंभीं खालील हकीकत दिली आहेः--

राज्ञा त्रिविक्रमशक्येन स्वलब्धफलं
कस्मै चिद् ब्राह्मणाय दत्तं ॥ तस्य
फलस्य महिमा ॥ येन भक्षितं स
अमरो भवति मरणं नास्ति ॥ तत्फलं
ब्राह्मणेन मनसि विचार्य बहूनां पालको
राजा भर्तृहरिस्तस्मै दत्तं राज्ञापि स्वपत्नी
अतिप्रियतमा तस्यै दत्तं ॥ तयापि कश्चन
जारस्तस्मै दत्तं ॥ इ. इ. इ.

ही दंतकथा आहे. ही टीकाकाराला माहीत होती. भर्तृहरि व त्रिविक्रमशक्य समकालीन होते, असें ह्या दंतकथेवरून दिसतें. त्रिविक्रम हा शककुलोत्पन्न होता, अशी दंतकथा टीकाकाराला माहीत होती. शकपासून शाक्य व्हावें. परंतु पोथींत शक्य असें रूप आहे. वाक्यपदीयाचा कर्ता जो भर्तृहरि तो हा असल्यास त्रिविक्रमशक्य त्याच्या कालीं होता असें म्हणावें लागतें. वाक्यपदीयकार भर्तृहरि इ. स. ६५१–५२ त वारला (Itsing). वातापीचा पहिला विक्रमादित्य इ. स. ६५५ त होता; म्हणजे भर्तृहरि व विक्रम समकालीन आहेत. ही पोथी ज्यानें उतरली त्यानें शक्य हा शब्द चल्क्य ह्या शब्दाबद्दल चुकीनें लिहिला असण्याचा फार संभव आहे. हा तर्क जर खरा असेल व चल्क्यबद्दल शक्य चुकीनें पडलें गेलें असेल, तर वाक्यपदीयकार भर्तृहरि, विक्रमादित्य चल्क्य व हें नीतिशतक इ. स. ६५५ च्या सुमारास व इ. स ६५१ च्या अगोदर लिहिलें गेलें, असें म्हणतां येईल. चालुक्यांचें अति पुरातन नांव चल्क्य असें ताम्रपटांतून सांपडतें. वाक्यपदीयकार जो भर्तृहरि त्याला राजा हा किताब असावा व तो विक्रम चल्क्याचा एक उमराव किंवा सामंत असावा. तीन राजांवरती जय मिळविणारा जो तो त्रिविक्रम.

## ३९ देवगिरीचा रामदेवराव यादव याचें राज्य गेल्याचा काल

(रा. वि. का. राजवाडे.)

१ काशीस पराडकर यांचे येथें एक बाडवजा वही सांपडली. तींत मराठींत भविष्योत्तरपुराण म्हणजे भविष्यकालांतील राजांची यादी दिलेली आहे. ह्या यादींत पुष्कळ अद्वातद्वा भाकडकथा सांगितल्या आहेत; परंतु त्यांपैकीं एक कथा बरीच ऐतिहासिक आहे. ती कथा मूळ भविष्योत्तरपुराणांतील किंवा इतर वाग्वादी कोणत्या हि पुराणांतील नसून, वही लिहिणाऱ्याला अन्य आधारावरून नमूद करतां आली असावी. ही कथा ऊर्फ हें टिपण देवगिरीच्या रामदेवराय यादव याच्या राज्यभ्रंशासंबंधानें असून, तें येणेंप्रमाणें आहेः--

इतुकीया नंतर तुरकान जाले तै सकु १६
मन्मथ सवत्सरे फाल्गुणमास सुधपक्ष
अष्टमी शनीवार ॥ रामदेरायाचे राज्ये
गेले पाहाले घटिका ४

सकु म्हणजे शक. १६ म्हणजे शक १२१६. गत १२१६ ला जय संवत्सर आहे, मन्मथ नाहीं. गतशक १२१७ ला मन्मथ संवत्सर येतो. वर्तमान शक १२१६ लाँ विजय संवत्सर येतो व त्या वर्षाच्या फाल्गुन शुद्ध अष्टमीला प्रातःकाळीं कांहीं पळें शनिवार असावा असें दिसतें. तात्पर्य वर्तमान १२१६ च्या फाल्गुन शुद्ध अष्टमीस शनिवारीं पहाटे प्रभातीं चार घटिकेस म्हणजे ५ फेब्रुवारी सन १२९४ शनिवारीं रामदेवरावाचें राज्य गेलें. अल्लाउद्दीन खिलजीनें इ. स. १२९३ च्या डिसेंबरांत कन्हामाणिकपुराहून निघून १२९४ च्या जानेवारींत देवगिरीस वेढा दिला व २५ दिवस वेढा देऊन तो राजधानीचा किल्ला १२९४ च्या फेब्रुवारीच्या चार किंवा पांच या तारखेस काबीज करून रामदेवरावाचें राज्य घेतलें.

२ आजपर्यंत मराठ्यांच्या इतिहासासंबंधानें जीं टिपणें व कागदपत्र मला सांपडले त्या सर्वांत हें टिपण अत्यंत प्राचीन होय. हें टिपण बाड लिहिणारानें इतर कोठून तरी उतरून घेतलें असलें पाहिजे. हें इतर कोठून म्हणजे जुनी यादी, बखर वगैरे असावें, हें उघड आहे.

३ बाडकार रामदेवरावाला रामदेराय असें म्हणतो, तें चूक नाहीं, खरें आहे. रामदेवरावाला त्याची प्रजा रामदेराय या नांवानें च संबोधीत असे. ह्याला प्रमाण रामदासांचा दासबोध. त्या ग्रंथांत रामदेराय असा च ह्या राजाच्या नांवाचा उल्लेख आहे. मराठ्यांच्या इतिहासांत रामदेवरावाच्या राज्याच्या जाण्याची ही तिथि व वार अत्यंत जुना होय.

## ४० पाटोद्याचे देशपांडे

### Black Hole

(रा. वि. का. राजवाडे)

१ खालीं दोन हकीकती दिल्या आहेत. त्यांत पाटोद्याचा ब्राह्मण देशपांडे वतनाकरितां मुसलमान झाल्याची हकीकत आहे. ती अभ्यसनीय आहे. बंदीवानांस दौलताबादेस काळ्या कोटांत कोंडून सडावें लागे, ह्या बाबीचा उल्लेख आहे. काळा कोट म्हणजे Black Hole. असें दिसतें कीं, विशेष कडक शिक्षा द्यावयाची झाली म्हणजे प्रत्येक राजाचा किंवा नबाबाचा काळा कोट असे तो दाखवीत. कलकत्त्यास हि तत्प्रांतस्थ नबाबाचा काळा कोट होता व त्याचें च तत्कालीन

इंग्रजांनीं Black Hole हें भाषांतर केलेलें आहे. कलकत्त्याच्या Black Hole चा हा अर्थ आहे. हे शब्द इंग्रजांनीं नवीन निर्माण केलेले नाहींत, केवळ भाषांतर आहेत.

२. पत्रें फार जीर्ण होऊन फाटून गेलीं आहेत.

---

## १

## ( फारसी मजकर )

१ + त जबानी देशमुखानी व नाईकवाडीयानी व मोक
१ दमानि पा। अहमदाबाद उरूफ पाटोदे सु॥ इहिदे
१ + + + + + साहेबी देशपाडेपण + + + + +
१ + + + + + याबदल हुजुरू बोलाविले + + + +
१ + जुरून मदारुलमाहामी हुमल–तुल–मुलकी बजारतपनाहः दि +
१ + ये सादर जाहाला आहे जे देसपाडे ता। पाटोदे याची हकीकत
१ + + आहे हे कुल ई॥ पासून अजी ता। इलाही साहीबालाई जैसी
१ असेल तैसी लेहोन देणे म्हणौनु हुकूम तरी साहेबा सलामत हकी–
१ कत इहातिदा पासून ऐसी आहे मुलपुरूष ता। पाटोदे येथील
१ देसपाडेपण बयाजी नरसिह यासी दोनी औरता

| | |
|---|---|
| पहिली औरत राजाई तिची | दुसरी औरत बालाई तिची |
| संतती एक फर्जंद तिमाजी | संतती |
| बायदेऊ | लेक १ कृष्णाजी    लेकी |
| | बायदेऊ    ७ |

१ बयाजी नरसिह मयत जाहालीयावेरी तिमाजी बायदेऊ
१ + + + + करितां कितेक मुदती जाहाली + + + + + +
१ + ला मुलुक तमाम खराब व वैरान जाहाला बहुत लोक मेले
१ ( दुक ) लामध्यें दौलताबादेस फतेखान फर्जंद मलिक अंबर राजे
१ चालावित असतां सुभेखान पा। मजकूर येऊनु तिमाजी बाय-
१ देऊ देसपाडे पा।गणाचे कामाबदल धरून दौलताबादेस
१ नेला मारो लागले तिमाजी बायदेऊ यास मार करितां ती–
१ माजी बायदेऊ मयत जाहाला गावी माणसे होतीं ते कृष्णाजी बाय-
१ देऊ यास तारा निघे च ना दुकाल थोर काल मोटा मग
१ कृष्णाजी बायदेऊ याची आई बालाई व बहीण अंबाई व सासा

१ + + मौजे चाटोरी पा गुलसनाबाद तेथील कुलकरणी का
१ + + त ते सोयरे होती म्हणौनु कृष्णाजी बायदेऊ तेथे गेला
१ कृष्णाजीने काय मामला केला तो आपणास ठावका नाही ते सु
१ + + + कृष्णाजी बायदेऊ आगरियाकडे काकाजी दंतो मोहबत
१ खानाकडे गेला याकडे काय मामला केला तो आपणास ठा
१ वका नाही त्यावरी मुलुकाची अबादानी + + + + जाहाली + +
१ + + पा मजकुरास देसपाडे कोण्ही न होते देखौन रंगोजी पटवारी
१ + + का चाटोरी पा गुलसनाबाद पैदा जाहाला यास मिरासदार
१ + + पुसों लागले की तूं का आला आहेस त्यास रंगोजीने जबाब
१ दिधला जे निमे देसपाडेगिरी आपणास कृष्णाजी बायदेऊ याणे
१ विकिली आहे मग लोकानी सोनाजी देसमुख यास पुसिले कीं रंगोजी
१ का आला आहे तरी सोनाजी देसमुख बोलिला कीं रंगोजी चाटोरी-
१ कर म्हणतो कीं आपणास कृष्णाजीने निमे देसपाडेपण विकिले आहे
१ कृष्णाजी बायदेऊ हि येईल च असा कृष्णाजीने निमे देसपाडेपण
१ रंगोजीस विकिले हे आपणास ठावके नाही यावरी सैद अबदुलबाई
१ याची जागीर तगैर होऊनु मरहूमी कजीलबाशखान यास सन हजार
१ + + + ३ पा मा जागीर जाहाली तेवरुती कृष्णाजी बायदेऊ अक-
बराबादेहून
१ आला मरहूमी कजीलबाशखान यापासी बादख्वाहः जा
१ हाला त्यावेरी मरहूमीखान माइलेने तमाम पा मजकुरीचे कुलकर्णि-
१ यास बोलाउनु आणौनु कृष्णाजी बायदेऊ तुमचा देसपाडिया + +
१ होये ऐसे पुसतां तमाम रयतानी बोलिले की कृष्णाजी बायया
१ आपला देसपाडिया होय तेवर्ती मगोराम अमीन सुबे दखन
१ तेही मीरहुमीखान माइले पासीं आले होते त्याचे हवाला
१ रंगोजीस व कृष्णाजी बायदेऊ देसपाडे यास केले कीं हरदो
१ जणाची बरहक मुनसफी मनास आणौनु निवाडा करणे
१ मग मगोराम येही मुनसफी मनास आणितां कृष्णाजी बायदेऊ यास
१ पुसिले कीं तुवां पैके देऊनु निमे देसपाडेपणं विकिले आहे हे खरे त्या
१ स कृष्णाजी बायया बोलिला जे आपणापासून कागद लिहिला
१ घेतला आणि एक रुका दिधला नाहीं पावली याची माझे कबज
१ + + ते काढवा मग रंगोजीस पावले पैकीयाचे कबज पुसतां
१ कबज नाही म्हणौनु बोलिला यावरून तहकीक जाहाले कीं रंगो
१ जीने पैके दिधले नाहीत मग रंगोजीस मगोराम अमीन येही

१ कैद करून कृष्णाजी बायदेऊ याचे देसपाडेपण यास दि-
१ धले कृष्णाजी बायदेऊ याणे सन १०६४ पावेतो देसपाडे चालविले
१ सन १०६५ मध्ये कृष्णाजी बायदेऊ फौत जाहाला कृष्णाजी बायदेऊ
१ फौत जाहालियावेरी रंगोजीने अमीलानि पा मजकुर यासी साजीश
१ करून गंगाई कोम तिमाजी बायदेऊ ईस दूर करून
१ आपण देसपाडेगिरी पा मो साजीशीच्या बळे चालवू लागला
१ हे हकीकत देशपाडेगिरीची ऐवजाची आहे रंगोजीने कृष्णाजी
१ बायद्यापासून लेहोन घेतले ते व तमाम कागद साजिशीश
१ + + केले आहेती ते रद आहे ती त्याणे कांही एक रुका कृष्णाजी
१ स दिला नाही हाली विसाजीराम कृष्णाजी बायदेऊ या
१ चा फर्जंद हा अफराद देसपाडेगिरीचा वारिसा होय
१ साहेब आरीफ आहेती ज्याचे हक त्यास पोहचाविले पाहिजे
१ वतन तेन्हडे पादशाही आहे वारीसदार बंदे पादशाही आहेती
१ जे साहेबास मानेल ते केले पाहिजे हे हकीकती ऐवजेची आहे
१ ऐसी वाके इवाजीव होती ते बंदगीस तहकीक अर्ज केला
१ आहे लिहिले दिधले असे रंगोजीपासी कागद आहेती त्यावरी
१ आपले नागर निशान काही नाही व सोनाजी देशमुख सांगत
१ होता कीं रंगोजीचा भाऊ फतेखानाचा दिवाण होता आपण
१ हि फतेखानाचे बदी होतो ते वख्तीं आपला नांगर करून + +
१ + + ला आहे आपण नांगर न करितां तिमाजी बायदेऊ + + +
१ बंदीखानांत मयत जाहाला तैसेच आपणास हि होणार साहेबी त्याचा
१ आपणास उजूर करितां येत न होतो आपणा देखतां काही + + +
१ नाही हे लिहिले तकरीर सही

२

१ + + + + + + + + + याची हकीकत करार वाके +
१ खातिरेसी आणून महजर करून दिधला ऐसाजे तिमाजी व +
१ कृष्णाजी यावरी वख्त पडला याबदल विसोजीराम यास
१ देसपाडेपण विकीले बदल खरिदीखत मजमून ऐसा +
१ + + १५५९ क्षयनाम संवसरे वैशाख शुध पाडवा ते दिवसी
१ विसाजीराम ख्वाहरजादे यास तिमाजी व कृष्णाजी बाय
१ देउ देसपांडिये प्रा अहमदाबाद उा पाटोदे सुा सन समान सन १०३७

१ सरदखत लिहून दिधले ऐसे जे तरफ पाटवदे देसपाडेपण + +
१ मिरासी दरकुरसी आपली आहे आपल्या वडिला वडिला पासोन
१ चालत आला आहे हाली सालमजकुराकारणे परगणीयात +
१ + + सा पडला व राहूजी गोपीनाथ सबनवीस + + +
१ + + हजूर दौलताबादेस जाऊन नफराई पा मजकुरावरी० + +
१ १०००० एक लाख करून आला सुरूखान हवालदार याचे नावाचा (शुका)
१ आणिला की पैके तहसील करून हजूर दौलताबादेस पा
१ सुरूखाने सोनाजी देसमुखास व आपणास कैद + +
१ + + + + + + करून देणे उगवणी करणे पटी करून
१ + + + + + तोवरी सोनाजी देसमुखासँ व आपणास अ + + +
१ + + स यामधे पाईजर्जारीया देऊन ठेविले यावरी सुरूखाने हमीदखानास
१ फर्मावले की परगणीयात तहसील करणे हमीदखान
१ या बराबरी स्वार से एक देऊन देशमुख देसपाडी याचे तरफेने +
१ + + देऊ मुतालिक देऊन तहसील केली पाटवदा साउकार
१ + गावगना तहसील जाली होन पाऊण लाख बाकी राहिली होन
१ पंचवीस हजार ते परगणीयात वसूल न होती यावरी सोनाजी देसमुखास व आपणास
१ रोज बरोज मार करीत घरीं तो विसात काही खावयास—
१ नाही सुरूखाने हजूर लिहिले हुजुरून हुकूम आला की देस-
१ मुख–देसपाडीयांस हजूर घेऊन येणे हजूर गेलियावरी सुटका
१ होणे मुस्कील आहे काल्या कोटामधे सडोन मरावे रोज बरोज हा
१ मार सोसवेना पैकीयाचा इलाज तरी होता दिसेना आपणास
१ आणखी कोण्ही सोडविसा नाही जरूर जालेयावरी
१ तुह्मासी हकिकत सांगितली सदरहू होन पचवीस हजार
१ + + + + + सोनाजी देसमुख होन साडेबारा हजार देई +
१ + + रा हजार होन आपणास देणे लागले आपणास द्यावयास
१ नाही जिवावरी गोस्टी येऊन लागली जरूर जाले मग
१ तुमच्यापासी बोलिलो की तुम्ही आपले बहिणीचे पुत्र आमचे भाचे + +
१ व आपणास तरी पुत्रसंतान नाही तुम्हास वारसा पोहचतो
१ तुम्हास मवसर हि आहे तरी आपणास सदरहू होन देऊन
१ सोडवणे आपले वतन देसपाडेपण तुम्हास देतो यावरी तुम्ही बोलिला की
१ आजी काल पडला आहे वाचावयाची मुस्कील येऊन पडली
१ आहे वतन कोण्हास पाहिजे यावरी आपण तुमची मिनतवारी

१ केली की हे वतन देसपाडेपण तुम्ही घेणे आणि आपणास सोड—
१ वणें मग तुम्ही जरूर जाणोन कबूल केले सदरहू होन हजार १२५००
१ साडेबारा हजार रोख दिधले तुम्हापासी आपला भाऊ कृष्णाजी
१ बायदेव व अंबाई बहीण आपली ऐसी तुम्हापासी पाठविली
१ त्यांचे गुजारतीनें सदरहू होन हजार साडेबारा याजबराबरी
१ आपणास पावले आपले देसपाडेपण तरफ
१ + + + + + + + आपण आपले खुसीने रजावंदीने + +
१ असे सुखे लेकराचे लेकरी अर्जानी करणे तरफ माचा
१ देसपाडेपणाचा हक लवाजीमा जमाबंदीची व रोदेहबादेचे
१ उतपन जे होईल ते तुम्ही खाणे व इनाम खाणे सर तरफ व
१ दिवाणीचा सिरपाव व पाने मान माननुक देसमुखामागे
१ तुम्ही घेणे सर दफतर तुमचे आहे येणेप्रमाणे खरिदीखत
१ तहबंद करून दिधले असे सुखे देसपाडेपणाचा कारबार करणे
१ पुढे हर कोण्ही आपला वेलिसदार आणिक कोण्ही हिला हरकत करील
१ त्यास तालुक नाही तो गन्हेगार हे लिा सही ऐसी सदहू + + +
१ जालीयाबदल देसपाडेपण विकिले यावरी कितीयेका रोजी
१ तिमाजी बायदेव फौत जाले काल मोठा पडला मुलुक कुल वैराण
१ जाला परगणा कुल खराब पडला लोक परागंदा होऊन जागा जागा
१ गेले विसाजीराम हि पोट भरावयास हिंदुस्थानात गेले
१ कितेक दिवस जालियावरी मुलुक वसाहती होऊ
१ लागला मोगलाई जाली देसमुख व मोकदम म्हणो लागले जे
१ देसपाडेपण तिमाजी व कृष्णाजी देवें विसाजी रामयास वि
१ किले आहे तरी तो येथे हजर नाही तो ये तोवरी कृष्णाजी बाबा
१ देव त्याचा मामा चटोरीस कालामधे गेला आहे त्यास घेऊन
१ यावे चंद्रोज कामकाज चालवील म्हणौन देसमुखें कृष्णा
१ जी मजकुरास बोलाऊन आणून कामकाज सोपिले त्यावरी
१ कृष्णाजीने देसमुखापासी व तमाम मोकदमापासी हकिकत
१ जाहीर केली जे आपले सिरी वख्त पडला एक तरी काल पडला दुसरे
१ रगवणे पडली त्याबदल वतन विकिले परागंदा होऊन चटोरीस
१ गेलो तेथील रंगोजी पटवारी यासी आशनाई होनी त्या आसरियानें
१ राहिलो हाल जबून होता व माहाग मोठे रंगोजी काही खर्च + + +
१ देत असता रंगोजीने आपणासी रदबारी लाविली जे तुम्हावरी वख्त
१ + + + + + तुम्ही देसपाडेपण निमे आपणास देणे म्हणौन

१ + + + + जाला आपणे त्यास जाब' दिधला जे आपणास
१ दिवाणाची नागवण पडली त्याबदल विसाजीराम आपले भाचे
१ याजपासोन होन साडेबारा हजार घेऊन देसपाडेपण ता मार्चे
१ दरोबस्त त्यांस दिधले आणि नागवण भरिली ऐसी हकीकत
१ जाली म्हणौन जाहीर केले अमातोनमानी हुकमी
१ लिहिल्या चिट्या आगोन आपण त्यास झाडझाडू टाकित असता
१ त्याणे ते जागा आपणास दर सबब जेर केले व एखादे हाला—
१ मधे पाडावे अगर महारामागाहाती मारून टाकावे ऐसे हुन्नर
१ करो लागला दर घडी दबाऊ लागला त्यावरी आपण वख्ता—
१ वरी नजर दिधली आणिखी कोठे तूर्त जावयास जागा नाही
१ ये हालापासून सुटावे म्हणौन त्याने मागितले तैसे त्यास
१ लिहून दिधले आमात्याणे आपणास एकदम + + +
१ + ऐसी हकिकत जाहीर केली आणि म्हणो लागला जे विसाजी—
१ राम हिंदुस्थानास गेला मागे परगणा दुज बसाहात जाला
१ रंगोजी मजकूर पा मजकुरास येऊन देसमुखाची भेट
१ घेतली आणि जाहीर केले जे कृष्णाजी बायदेवे आपणास लि
१ हून दिधले आहे व गुमास्तगिरी दरोबस्त सोपिली आहे
१ आपणापासून कामकाज घेणे ऐसे जाहीर केले यावरी फडावरी
१ कोण्ही नर्वीसिंदा नव्हता म्हणौन कामकाज चालवित असता
१ चंदेरोद गुदरलीयावरी रयतीसी बदसलूख केला रयती
१ रोन पडली खान कतलबाजखानास जागीर होती तमाम रयती
१ अहमदनगरास जाऊन फिर्याद जाली चवदा हजार रुपये
१ रंगोजीवरी तकरीर साबुत पोहचविली त्याबदल नफ-
१ र मजकुरास बंदखानी घातले त्यावरी तकरिरीबदल देस
१ पाडेपणासी समंध नाहीं ऐसे करून बे-दखल करून रयतीस
१ सोडविले त्यावरी कृष्णाजी बायदेव हि हिंदुस्थानीहून फिरून
१ पा मजकुरास आला विसाजीराम रुस्तुमखानाचे सरकारां
१ त चाकर जाले होते त्यांस यावयास फुरसत जाली नाही याबदल
१ आपण पा मजकुरास आला रंगोजीची हकिकत जाहीर जाली—
१—यावरी देसमुखी व मोकदमी कृष्णाजीचे हवाला देसपाडे-
१ पण केले कामकाज चालवित असता चंद्रोज गुदरलीयावर
१ कृष्णाजी बायदेवाची स्त्री पडली रंगोजी मजकुरे रद-
१ बारी लाविली जे आपली लेकी नवरी आहे ते कबूल करणे

१ + + + देव दरम्यान घातले बजोर गला पडोन बेटी देऊन
१ सोइरीक केली चंद रोज गुदरलीयावरी + + + +
१ तिमाजी बदल घेऊन गेला तेथे जहर घातले नियत धरिली जे
१ हा मेलियावरी वतन दरोबस्त लेकीचे होईल मग आपल्या हा
१ तास येईल हा हुनर केला कृष्णाजी मजकुरे देसमुखापासी
१ + माणुस पाठविले जे पटवारी मजकुरे आपणास जहर घातले
१ आपण आता वाचत नाही तरी तुम्ही आपणास पाटवदी—
१ यास घेऊन जाणे देसमुखे माणसे पाठऊन डोली करून पा—
१ टवदीयास आणिले रुद्राजी वैद्य चांदडवकर त्यास बोला—
१ ऊन आणिले जे याची वेथा दूर करणे हा वांचे ऐसा उपाय
१ करणे रुद्राजी म्हणो लागला जे यास जहर हरताळ घातला आहे
१ हा हरगीस वाचणार नाही त्यावरी कृष्णाजी महिने ६ सा
१ दुखी पडला बेंड पोटातील गळोन पडो लागली मग त्या च
१ आजारें तो मरोन गेला त्यावरी देसमुखें व मोकदमीं विचार केला
१ जे देसपाडेपण त्याचे त्यास सोपावे ऐसा विचार करून वि
१ साजी गोपिनाथ सबनवीस व अंबाई विसाजी रामाची माऊसी
१ त्यांस सांगितले त्यावरी अंबाई हिंदुस्थानास जाऊन
१ विसाजीस सांगितले जे वतनावरी खावंद कोण्ही नाही
१ रंगोजी संचरला आहे तो डहुळा करितो तरी अगती चल-
१ णे त्यावरी विसाजीरामें चाकरी टाकून एक दसखत
१ हुकूम बुरून नबाब शाईस्ताखान व अमानतखान
१ दिवाण याचे नांवे घेऊन पा। मजकुरास आला नवाबा-
१ चा हुकूम अमानतखान दिवाण व महमद अमी अमीन-
१ खान पा। वैजापुरास आले होते त्यांस दिधला तेही तमाम देसमुख व
१ कदम गांवगनाचे बोलाऊन हकिकत तमाम दर कूल इा पासून
१ खातिरेसी आणिली देसमुखी व रयतीने हकिकत जाहीर केली जे वतनासी
१ खावंद विसाजीराम आहे यास वतन विकिले आहे व हा त्याचा भाचा
१ आहे वतनाचा वारसा यास पोहचतो हे आपण जाणतो आपण रजावंद
१ आहो त्यावरून देसपाडेपण विसाजीरामाचे हवाला अमानतखान
१ दिवाणे केले सन पासून अमल चाली लागला त्यावरी सन
१ ४ मधे रंगोजी मजकूर अवरंगाबादेस बाजी सफीखान दिवाण
१ यापासी फिर्याद जाला की आपणापासी सनद इसनाद आहे म्हणोन
१ जाहीर केले व रयतीमधे बाजे कोण्ही तुफानी होते त्यास मिळोन कांही

१ तकरीर केली याबदल दिवाणसाहेबी देसमुखास व तमाम गावगना-
१ चे मोकदमास तलब पाठविली कुल जाऊन हजू जाले दिवाण सा—
१ हेबी इनसाफ केला देसपाडेपणाची हाकिकत कुल मनास आ—
१ णिली रयतीस पुरसीस केली त्यावरी देसमुखी व मोकदमी जाहीर केले
१ जे वतनाचा वारसा विसाजीस पोहचतो हा खावंद आहे रंगोजी मजकु
१ रापासी लिहिले आहे ते बातल आहे कृष्णाजी बायदेवास कालामधे
१ दबाऊन एकले सापडऊन अडऊन कागद करून घेतला आहे अमा
१ एक दाम त्यास दिधला नाही व त्यास मेहमानीबदल गावास नेले आणि
१ जहर घातले त्या च अजारे तो मरोन गेला ऐसी खून खराबी केली आहे
१ ऐसी रंगोजीचे हजूर हकिकत जाहीर केली त्यावरी रंगोजी पटवारी
१ मौजे चाटोरी पा। गुलशनाबाद मुलाजीम जाला त्यास धके देऊन
१ दूर केले आणि वतन विसाजीरामाचे हवाला केले देसपांडेपण
१ करारवाके विसाजीरामाचे जाले तकरीर केली होती ते हकनाहक
१ साबूत केली याबदल विसाजीराम मुसलमान जाला आ-
१ णि दिवाणसाहेबी तकरीर माफ केली सिरपाव व परवाना
१ देऊन बिदा केले त्यावरी अबदुल सलाम उर्फ विसाजीराम
१ परवाना घेऊन पा। मजकूर आले कितीयेक मुदत अबदुल सलामे
१ देसपांडेपणाचा कारबार चालविला त्यावरी नियत धरिली
१ जे आपला पिरीवरुन जाला आता मकेस जावे ऐसी तजवीज
१ केली आणि मलजी व राघोजी दोघे फर्जंद ल्याख जाले त्या-
१ स बोलाऊन फर्मावीले जे आपली नियत मकेस जावया-
१ ची आहे खर्चाचा सरंजाम पाहिजे तरी काहीं आपणास खर्चा-
१ चा सरंजाम करून देणे आणि आपले वतन देसपाडेपण
१ ता। पाटवदे पा। मा। आहे ते दरोबस्त तुम्हास बकसीस
१ करून देतो तुम्ही अर्जानी करणे एक तरी फर्जंद दुसरे त्या-
१ स आहा तिसरे आपणास खर्चास पाहिजे ऐसे फर्माऊन बजीद
१ जाले त्यावरी मलजी व राघोजी येही खर्चाचा सरंजाम करून
१ दिधले त्यावरी अबदुल सलामे बकसीसनामा करून देऊन वतन
१ मलजी राघोजीचे हवाला केले सन १०७७ त्यावरी अबदुल स-
१ लामे त्यापासून रुपये घेऊन खेरखैरात केली मकेस जा-
१ वयाची नियत धरिली होती तो सन १०९५ मधे फौत जाले
१ त्याउपरी त्यामागे अजितागाईत राघोजी देसपांडेपणा-

१ चा कारबार चालवित असे कामाकाजामधे चौकसकार अमदानी
१ सरबराहकार मसलुख फामिदा आहे

## ४१ ज्ञानेश्वरी पद्धती

१ गीतेंतील श्लोकाच्या ज्या पदावर किंवा पदांवर ज्ञानेश्वराची भावार्थदीपिका असेल तीं पदें वेगळीं तांबड्या शाईनें लिहिण्याची पद्धती ज्ञानेश्वरीच्या कित्येक पोथ्यांत आढळते. ही पद्धती एकनाथाच्या कालीं नव्हती. ही प्रथम गोविंद बरवा या नांवाच्या गृहस्थानें शके १६१३ त पाडिली. औरंगाबादेस दत्तोपंत थथे यांच्या वाड्यांत एक ज्ञानेश्वरी सांपडली, तिच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं खालील ओंवी आहेः—

शके सोळा शतें तेरोत्तरें । तैं पद्धती केली ज्ञानेश्वरें ॥
गोविंदबरवामुखान्तरें । जगज्जीवन लेखक ॥

म्हणजे शक १६१३ त ज्ञानेश्वरानें गोविंद बरवा याच्या मुखानें ही पद्धती करविली व जगज्जीवनानें लिहिली. गोविंद बरव्याचें मुख म्हणजे ज्ञानेश्वराचें च दुसरें मुख असें गोविंद बरवा सांगतो, व तें वेदान्तदृष्टीनें खरें हि आहे. बरव्यानें पद्धती कशी केली ती गीतेचा पहिला श्लोक घेऊन त्याचीं पदें देऊन सांगतोः—

### श्लोक पहिला

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।
मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥

### भावार्थदीपिकार्थ पदक्रम

धर्मक्षेत्र इति । मामका इति ॥ समवेता इति । किमिति ॥

भावार्थदीपिकानुरोधानें पहिल्या श्लोकाची पदपद्धती गोविंद बरव्यानें वरप्रमाणें पाडिली. म्हणजे प्रथम धर्मक्षेत्र इति हें प्रतीक देण्याच्या अगोदर

तरी पुत्रस्नेहें मोहित । धृतराष्ट्र असे पुसत ॥
म्हणे संजया सांगे मात ।

हे तीन चरण काळ्या शाईनें लिहून नंतर धर्मक्षेत्र इति हें प्रतीक तांबड्या शाईनें लिहिलें. नंतर त्याच्यापुढें

कुरुक्षेत्रिची ॥ ८५ ॥ जे धर्मालय म्हणिजे ।

इतकी दीपिका काळ्या शाईनें लिहिली. नंतर मामका इति हें प्रतीक तांबड्या शाईनें लिहून,

तेथें पांडव आणिक माझे

हा चरण काळ्या शाईनें लिहिला. नंतर समवेता इति हें प्रतीक तांबड्या शाईनें लिहून,

गेले असती व्याजें । जुंझाचेनी ॥ ८६ ॥

हे दोन चरण काळ्या शाईनें लिहिले. नंतर किमिति हें प्रतीक तांबड्या शाईनें लिहून,

तरि तिही येतुला अवसरीं । काय कीजत असे येरीं येरीं ॥
ते झडकरि कथन करिं । मंज प्रती ॥ ८७ ॥

ही सबंध ओंवी काळ्या शाईनें लिहिलीः–

उघड दिसत आहे च कीं ज्ञानेश्वरीच्या अनुरोधानें पदपद्धती वरळ्यानें रचिली. धर्मक्षेत्रे—समवेताः—मामकाः—किमिति, असा गीतेचा क्रम आहे. पण ज्ञानदेवानें धर्मक्षेत्रे—मामकाः—समवेताः—किमिति, असा क्रम घेऊन व्याख्यान केलें आहे. अर्थात्, त्या अनुरोधानें च पदपद्धती नमूद करणें योग्य होतें व तसें वरळ्यानें केलें हि आहे.

२ वरळ्यानें ही पदपद्धती शक १६११ केली. तिची प्रत १६७९ त भगवंत भैरव धथ्थे यांच्या प्रेरणेनें कोण्या लेखकानें औरंगाबादेस केली. ह्या पोथींतील ज्ञानेश्वरीची भाषा आधुनिक आहे; परंतु परंपरा एकनाथी नाहीं. सर्व पोथींत पांच पन्नास स्थलीं पाठ जुना आहे. उदाहरणार्थ,

तापलेया जगा कारणें ॥ १७८२ ॥

अध्याय १८

इ. इ. इ.

३ गोविंद घरवा हा ऋग्वेदी, यजुर्वेदी, कोंकणस्थ हें कळण्यास मार्ग नाहीं ह्या पोथीवरून एवढें मात्र कळतें कीं भगवंत भैरव थथ्थे शक १६७९ त औरंगाबादेस होते. हे थथ्थे त्या कालीं औरंगाबादेस कोट्याधीश म्हणून नामांकित होते. ह्यांनीं अपार द्रव्य खर्चून पांच चार भैलांवरून बेगमपुऱ्यांत सर्वोत्कृष्ट व विपुल पाणी आणिलें आहे व तें आपल्या वाड्यांत एखाद्या पातशहाच्या हवेलींतल्याप्रमाणें खेळविलें आहे.

# ४२ नरहरिदासकृत अभंगरामायण

( रा. वि. का. राजवाडे )

ह्या रामायणाचीं शेदोनशे पानें मजजवळ आहेत. ग्रंथकर्ता अव्वल इंग्रजींत कोरेगांव व संगममाहुली येथें रहात असे. ह्याची गुरुपरंपरा अशीः —

आदिनारायण सद्गुरु आमचा । शिष्य जाला त्याचा महाविष्णु ॥ १ ॥
तयाचा हो शिष्य तो जाणावा हंस । तेणे ब्रह्मयास उपदेशिलें ॥ २ ॥
ब्रह्मदेवें केला उपदेश वशिष्टा । तेथें धरी निष्ठा येकभावें ॥ ३ ॥
वशिष्ट उपदेशी श्रीरामरायासी । रामे रामदासी उपदेशिले ॥ ४ ॥
उपदेश देउनी दिधला मारूती । स्वयें रघुपती निरवीत ॥ ५ ॥
निरविता जाला रामी रामदास । संसारीं उदास जीवें भावें ॥ ६ ॥
म्हणूनि आमुच्या कुळीं कुळदैवत । राम हनूमंत आत्मरूप ॥ ७ ॥
आत्मरूप जाला रामी रामदास । केला उपदेश दीनोद्धारें ॥ ८ ॥
भाविका भजन गुरुपरंपरा । सदा जप करा राममंत्र ॥ ९ ॥

॥ श्रीसीतारामाय नमः ॥

गुरु रामदासें अनंता उपदेशिलें । अनंतें अनुग्राहिलें मेरुदासास ॥ १० ॥
स्वेत गोविंद हे स्वरूपस्थ सदा । तया भवबाधा न बाधे चि ॥ ११ ॥
नागेश राजाराम रामनामें धाले । गुरुकृपें केलें जीवन्मुक्त ॥ १२ ॥
महादेव साक्षात् रामरूप जाले । तेणें उपदेशिलें हरिदासास ॥ ४३ ॥
श्रीगुरू हरीने नरहरी उपदेशिला । जगीं धन्य जाला त्याचे कृपे ॥ १४ ॥

म्हणजे याची गुरुपरंपरा अशीः—

१ रामदास
|
२ अनंत
|
३ मेरु
|
४ श्वेतगोविंद
|
५ नागेश
|
६ राजाराम
|
७ महादेव
|
८ हरि
|
९ नरहरि

नरहरिदासाचें एक पद मासल्याकरितां येथें देतों.

भावें वंदा हो सद्भक्ति ॥ राघवेंद्र गुरुमूर्ति ॥ १ ॥
अर्चनपूजन करितां ॥ मुक्ति सुलभ सायोज्यता ॥ २ ॥
कृपाकटाक्षें लक्षिती ॥ शरणागता उद्धरिती ॥ ३ ॥
गुरुभक्तीचा महिमा ॥ जाणे श्रीमत् शंकर उमा ॥ ४ ॥
अज्ञानानें अंधजन ॥ त्यांचे नेत्रीं ज्ञानांजन ॥ ५ ॥
घालुन आपणासमान ॥ करिती न लगता क्षण ॥ ६ ॥
नरहरिदास म्हणे भावें ॥ तया लागि शरण जावें ॥ ७ ॥

नरहरिदास हा कोरेगांवच्या वोकिलांपैकीं असावा.

## ४३ कोंडू किंवा कुंडलीशकृत आत्मबोध व आत्मसुख

(रा. वि. का. राजवाडे.)

हा साधु व ग्रंथकर्ता संन्यासी होता व त्यानें आत्मबोध हा ग्रंथ शक १७११ फाल्गुन शुद्ध सप्तमी बुधवारीं लिहिला. ग्रंथावर दासबोधाची छाया पडलेली आहे.

दासबोधांतील बरेच शब्दप्रयोग ह्या ग्रंथांत आहेत. आत्मबोधाचीं एकंदर प्रकरणें १८ आहेत व आत्मसुखाचीं ५ प्रकरणें आहेत. आत्मसुखाच्या सुमारें दोनशे ओव्या आहेत व आत्मबोधाच्या ६१२ ओव्या आहेत. ह्या ओव्या अभंगासारख्या हि म्हणतां येतातः—

आत्मबोधाची समाप्ति अशीः—

सप्तऋषि वसते स्थान । धुंडिरायाचा नंदन ।
कुंडलीश नामाभिधान । देहासि असे ॥ २८ ॥
तेणे केलें हे कवन । परि सर्वकर्ता जनार्दन ।
कौरवसैन्य सुदर्शनें । मारिलें श्रीकृष्णें ॥ २९ ॥
परि निमित्यास कारण । म्हणति मारिलें अर्जुनें ।
शक्ति आकर्शिता नारायण । त्याचे धनुर्बाण त्या नुचले ॥ ३० ॥
सर्व करणें ईश्वराचें । आणि कवित्व चि काय मनुष्याचें ।
मी कर्ता म्हणता वाचे । मौनमुद्रा ॥ ३२ ॥
शके सत्राशे त्रयोदश । विरोधिकृत हे ( वर्ष ) ।
फाल्गुन शुद्ध मास । तीथि संप्तमी ॥ ३४ ॥
शुभदि ( न बुधवार ) । प्राप्त होता प्रथम प्रहर ।
ग्रंथसमाप्ति हे उत्तरें । ( सां ) गितला ॥ ३५ ॥

॥ इति श्रीआत्मबोध ॥

२ आत्मसुखाचा शेवट असाः—

यकवृत्ति करि । सावध होउनि आंतरिं ।
कोंडा यकवृत्ति केला । अहंपणांत मुकला ॥ ३१ ॥
॥ इति श्रीस्वसुखोन्नाम पंचमप्रकर्ण समाप्तः ॥
संपूर्णमस्तु ॥ शुभं भवतु ॥ श्रीरस्तु ॥ छ ॥ छ ॥

## ४४ दत्तकवि

( रा. वि. का. राजवाडे )

ह्या कवीचें एक लहानसें बाड मजजवळ आहे. त्यांत साळोत्रावर कांहीं श्लोक, श्लोकबद्ध चिलयाचरित्र व कांहीं शृंगारिक श्लोक आहेत. कवि कोठें, कधीं झाला, तें कळण्यास मार्ग नाहीं. मासल्याकरितां शृंगारिक श्लोक देतों.


दिनकर उदईचा पश्चिमे लागि आला ।
मधुकर रसभावें पद्मिणी लीन जाला ॥
त्यज्य कर रसनेच्या पंकज्या दूर होये ।
न हि तरि क्षणमात्रें गुंतसी तूं अपायें ॥ १ ॥
गुंडाळिलें किमपि कांपासि व्यर्थ रोठें ।
जाता कसे परगृहीं मनि हर्ष वाटे ॥
इच्छा मनांतिल (असे) परिपूर्ण केली ।
भीतोसि कां न मरतां मति काय जाली ॥ २ ॥
चिंता नसे भ्रमरिणी भ्रमरासि जाणे ।
आनंदयुक्त असणें सदनासि जाणें ॥
नाहीं तया मरण होइल मुक्ति आतां ।
गेल्या निशी दिनकरा उदयासि येतां ॥ ३ ॥
ऐके शशी परमनिर्मळ देहधारी ।
जाला कलंक तुजला कुटिला शरीरीं ॥
तूं जाइं जोवरि असे नृप हा निजेला ।
संपादुनी शयन झांकुनि आननाला ॥ ४ ॥
उठे सखे तूं परिहार नाहीं । पाहीं पलंगीं परि हार नाहीं ॥
तूं भाट होइ द्रुति शीघ्र आतां । आणून देई मज हार आतां ॥ ५ ॥
राया तुतें मी पाहिले जुहारी । शत्रू तुझे एतिल नित्य हारी ॥
मंत्रीसभेमाजि चि बैसलासी । जोहार जो हार जुहारिलासी ॥ ६ ॥
ऐकोनिया वचन तें चतुर प्रधानें । शालेसहीत दिधला शिरपाव त्यानें ॥
दाशीचिये चतुरतेस सिमा नसे हो । दत्त प्रसिद्ध कवि तो वदला असें हो ॥ ७ ॥

## ४५ वाग्भट अष्टांगसंग्रहसंहिता


( रा. वि. का. राजवाडे )

१ औरंगाबादेस धर्स्यांच्या संग्रहास हा ग्रंथ होता. सूत्रस्थानाचे आद्यन्त येणेप्रमाणें:—

आदि



नमः श्रीधन्वंतरये ॥



नमः श्रीगणेशाय ॥

तृष्णादीर्घमसद्विकल्पशिरसं प्रद्वेषचंचत्फणं
कामक्रोधविषं वितर्कदशनं रागप्रचंडेक्षणं ॥
मोहास्यं स्वशरीरकोटरशयं चित्तोरगं दारुणं
प्रज्ञामंत्रबलेन यः शमितवान् शर्वाय तस्मै नमः ॥

रागादिरोगाः सहजाः समूला
येनाशु सर्वे जगतोप्यपास्ताः ।
तमेकवैद्यं शिरसा नमामि
वैद्यागमज्ञांश्च पितामहादीन् ॥

अथात आयुःकामीयमध्यायं व्याख्यामः ॥

अंत

॥ इति अग्निकर्मविधि नामाध्याय श्चत्वारिंशत्तमः ॥

इति वैद्यपतिसिंघगुप्तस्य सूनो वा(र्वा)ग्भटस्य कृतावष्टांगसंग्रहसंहितायां सूत्रस्थानं प्रथमं समाप्तमिति ॥ अनुष्टुभां संख्यया ग्रंथसहस्र ३९०० ॥

पूर्वं निर्जरभेषजार्यगदितं लब्धावरं भेषजं
पथ्यापथ्यविचारणैर्निजतनौ रोगोद्भवं विद्रवं ।

ह्या प्रथमस्थानाचें शेवटलें १८९ वें पृष्ठ गहाळ. सबब, वरील श्लोकाचें उत्तरार्ध गहाळ.

शारीरस्थानाचे आद्यन्त येणेप्रमाणें:—

आदि

 नमो वक्रतुंडाय ॥

अथातः पुत्रकामीयं शारीरं व्याख्यास्यामः ॥
इति ह स्माहुरात्रेयादयो महर्षयः ॥

अंत

॥ इति वैद्यपतिसंघगुप्तस्य सूनो वाग्भटस्य कृतावष्टांगसंग्रहसंहितायां शारीरं द्वितीयं स्थानं ॥ ग्रंथ १२००

संघगुप्ततनयो दयोर्मिभि-
र्वर्मितो निखिलजन्मिजन्मिभिः
वाग्भटस्फुटतरोत्कटोक्तिमष्
टांगभृद्धृदयसंहितामधात् ॥

॥ ५ ॥

॥ सं १४४५ वर्षे फाल्गुन शुदि ४ रवौ श्रीवामनपुरे लिखितं ॥

निदानस्थानाचे आद्यन्त असेः—

आदि

 नमो वक्रतुंडाय ॥

अथातः सर्वरोगनिदानं व्याख्यास्यामः ॥

अंत

॥ इति वैद्यपतिसंघगुप्तस्य सूनोर्वाग्भटस्य कृतावष्टांगसंग्रहसंहितायां निदानस्थानं तृतीयं ॥

सूत्रगात्रसुनिदानचिकित्सा-<br>
स्थानकल्पकलितोत्तरतंत्रं ।<br>
आयुषः श्रुतिमदात्सषडंगां<br>
योऽर्थिने सवतु वाग्भट आमात् ॥<br>
यदंतर्धीमंतः स्फुटमनुभवंतः प्रतिदिनं<br>
रहस्यं व्याधीनां विधिविधृत मायु र्विदधाति ॥

॥ शुभंभवतु ॥

चिकित्सास्थानाचे आद्यन्त असेः—

आदि

 नमो वक्रतुंडाय ॥

अथातो ज्वरचिकित्सितं व्याख्यास्यामः ॥

अंत

॥ वातशोणितचिकित्सितं नामाध्याय श्चतुर्विंशतितमः ॥ ग्रंथ ॥ ८४ ॥

इति वैद्यपतिसंघगुप्तस्य सूनोर्वाग्भटस्य कृतावष्टांगसंग्रहसंहितायां चिकित्सास्थानं चतुर्थं समाप्तं ॥ छ ॥ सं १४४७ श्रावण + + + + ॥

आयुः श्रुतिं वीक्ष्य चतुर्दशाप्य-
विद्याशिरोरत्नमसौ सहस्रैः ।
सदु + + + + + + न तंत्रं
स वाग्भटो नंदतु बोधिसत्वः ॥
आशापुरीपदद्वंद्वध्यानविध्वस्तकिल्मिषः ।
+ + पकारैकरतो महांतिगसुतो हरिः ॥
शुभंभवतु ॥ लेखकपाठकयो श्व मंगळं ॥

कल्पसिद्धांताचे आद्यन्त असेः--

आदि

 नमो वक्रतुंडाय ॥

अथातो वमनकल्पं व्याख्यास्यामः ॥

अंत

॥ इति संघगुप्तसूनोर्वाग्भटकृतावष्टांगसंहितायां भेषजकल्पो नामाध्यायोऽष्टमः ॥ छ ॥ ८९ इति कल्पसिद्धिस्थानं पंचमं समाप्तं ॥ छ ॥ ग्रंथसंख्या ६०५ ॥

उत्तरतंत्राचे आद्यन्त गहाळ झालेले आहेत.

ही पोथी संवत् १४४५ त लिहावयास घेतली व संवत् १४४७ चे श्रावणांत हिचें चिकित्सास्थान लिहिण्याचें संपलें. पुढें थोड्या दिवसांनीं म्हणजे संवत् १४४७ च्या शेवटीं किंवा संवत् १४४८ च्या प्रारंभीं उत्तरतंत्र संपलें असावें. म्हणजे ही पोथी सुमारें दोन वर्षे लिहिली जात होती. संवत् १४४५ म्हणजे शक १३१०. म्हणजे आज ह्या पोथीला लिहून ५२४ वर्षे झालीं. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी शक १२१२ त लिहिली त्यानंतर ९८ वर्षांनीं ही पोथी लिहिलेली आहे. ज्ञानेश्वर-कालीन अक्षरांचें एक वळण ह्या पोथींत आहे. ह्या दृष्टीनें पोथीचें महत्व विशेष मानिलें पाहिजे.

२ सूत्रस्थानाच्या प्रारंभीं जें नमन केलें आहे तें शर्वाला केलें आहे. इतर अर्वाचीन पोथ्यांत शर्वाय बद्दल बुद्धाय असा पाठ असतो. ह्या हि बाबीचें महत्व आहे.

# ४६ पूर्णानंदाचे शिवरामस्वामी

( रा. शंकर श्रीकृष्ण देव )

( १ ) कोणत्या हि प्रकारें अतिशयोक्ति न करितां बोलावयाचें तर माझी समजूत अशी झाली आहे कीं श्रीज्ञानेश्वरमहाराजापासून तों पेशवाईच्या अंतापर्यंत झालेल्या साधुसंतांची जितकी कविता आतांपर्यंत छापली गेली आहे तिच्या दशसहस्रांट कविता अजून अप्रकाशित राहिली आहे! दासोपंतांचा गीतार्णव आणि पदार्णव पाहून हा सारा अर्णव केव्हां तरी प्रकाशित होईल काय म्हणून आपण विवंचना करीत आहोंत तों च शिवरामस्वामींच्या कवितेचा निराळा च समुद्र दृग्गोचर होत आहे. निजामच्या राज्यांत श्रीमाणिकप्रभूंच्या नगरापासून सात कोस वायव्येस कल्याणी म्हणून इतिहासप्रसिद्ध प्राचीन शहर आहे. शिवरामस्वामींचा तेथें मठ आहे व मठांत शिवरामस्वामींचे ग्रन्थ व्यवस्थेनें ठेविलेले आहेत. मठांत असलेले च त्यांचे ग्रन्थ सुमारें शंभर आहेत व याशिवाय त्या भागांत त्यांची आणखी किती तरी कविता उपलब्ध होण्यासारखी आहे. कल्याणीपासून पश्चिमेस पंचवीस कोस असलेल्या येळेगाळी मठांत व दक्षिणेस पंधरा कोस असलेल्या आपचंद मठांत जो ग्रन्थसंग्रह आहे त्यांत शिवरामस्वामींची किती तरी नवीन कविता आहे. तात्पर्य शिवरामस्वामींच्या कवितेचा अजून हि अंत लागला नाहीं.

( २ ) शिवरामस्वामींचे ग्रन्थ कल्याणीस त्यांचे मठांत आहेत ते येथें देतों:—

(१) कथाकामधेनु ( अध्यायं ६४, अठरा हि पुराणांचें यांत सार आहे. ) *(२) अध्यात्मरामायणावर ओवीबद्ध टीका (३) ब्रह्मोत्तरखंड २२ अध्यायांवर पदें, ओव्या, श्लोक, साकी, आर्या, इत्यादि *(४) भागवताच्या एकादशस्कंधावर श्लोकबद्ध टीका (५) रामजन्म (६) कृष्णजन्म (७) परशुरामजन्म (८) वामनजन्म (९) नृसिंहजन्म (१०) प्रल्हादजन्म (११) गणपतिजन्म (१२) षडाननजन्म (१३) ॐकार (१४) गजेन्द्रमोक्ष (१५) कंसवध (१६) एकादशी (१७) गजगौरी (१८) समुद्रमंथन (१९) जरासंधयुद्ध (२०) कालयवन (२१) शिवमोहिनी (२२) गोपाळकालापद्धति ( संस्कृत ) (२३) ललितपद्धति ( संस्कृत ) (२४) कृष्णकौमार्यावस्थेवर पदें (२५) कृष्णपौगंडावस्थेवर पदें (२६) कृष्णकैशोरावस्थेवर पदें (२७) कृष्णतारुण्यावस्थेवर पदें (२८) कृष्णलीला (२९) भक्तिज्ञानवैराग्य यांवर पदें (३०) पंचपदी प्रातःस्मरण (३१) प्रदोष पंचपदी (३२) बहुविध आरत्या (३३) गुरुमहावाक्यपद्धति (३४) गुरुसांप्रदायपद्धति (३५) उपदेशक्रमपद्धति (३६) गुर्वर्चन (३७) नित्यविधिक्रम (३८) शिष्यस्वरूपप्राप्तिलक्षण (३९) गुरुमर्यादा ( संस्कृत )

* (४०) भगवद्गीतेवर चंद्रिका (४१) कपिलगीतेवर श्लोकबद्ध टीका (४२) गर्भ-गीतेवर टीका (४३) उत्तरगीतेवर पद्यें, तीन अध्याय (४४) अष्टावक्रगीतेवर टीका (२०) प्रकरणें (४५) गुरुगीतेवर टीका (४६) लघुगीतेवर टीका (४७) विरह-गुरुगीता (४८) गोपीगीत (४९) वेणुगीत (५०) गुरूचीं अष्टकें (५१) पादुकाष्टक (संस्कृत) (५२) अमृताष्टक (५३) शुकाष्टक (५४) शिवरामाष्टक (५५) शिव-रामदशक (५६) निर्वाणदशक (५७) निर्वाणषष्ठक (५८) शिवरामपंचक (५९) सोपानपंचक (६०) मनीषापंचक (६१) गुरुविंशति (६२) शिवरामविंशति (६३) गुरुप्रशंसा (६४) हस्तामलकावर टीका (६५) रामार्यावर टीका *(६६) अपरो-क्षानुभूतीवर टीका (६७) आत्मबोधावर टीका *(६८) योगवाशिष्ठसारावर टीका (१० प्रकरणें) (६९) शिवापराधक्षमापन्न स्तोत्रावर टीका *(७०) दक्षिणा-मूर्तिस्तोत्रावर टीका (७१) ब्रह्मैक्यवृत्तीवर टीका (७२) वाक्यवृत्तीवर टीका (७३) शिवषडाक्षर स्तोत्रावर टीका (७४) शिवपंचाक्षरस्तोत्रावर टीका *(७५) निःसं-देहदिवाकर (७६) दृक्दृश्यविवेक (७७) पंचीकरण (७८) अष्टोत्तरशतशिवबिल्वपत्री (७९) अष्टोत्तरशत रामतुळशी (८०) भोजनश्लोक (८१) पुन्हां पंचीकरण निराळें (८२) विद्यामृत (८३) कृत्यंकुर (८४) संतलक्षणें (८५) संतमालिका *(८६) प्रबोधसुधाकरावर टीका (पद्यें १२ अध्याय) (८७) देहनिंदा (८८) स्त्रीनिंदा (८९) पुत्रनिंदा (९०) गृहनिंदा (९१) द्रव्यनिंदा (९२) चित्तनिंदा (९३) बाह्यविषयनिंदा (९४) मनोनिग्रह (९५) वैराग्य (९६) आत्मसिद्धि (९७) मायासिद्धि (९८) लिंगदेह (९९) अद्वैत (१००) ब्रह्मैक्यस्वरूप

पैकीं नक्षत्रांकित ग्रन्थांच्या प्रती येक्केहाळी व आपचंद मठांतून मिळालेल्या सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहीं आहेत. यांशिवाय,

(१०१) रामतुळशी (१०२) बोधामृत (१०३) बोधबासष्टी (१०४) अपरो-क्षानुभूतिटीका (१०५) स्फुट अभंग, श्लोक, पद्यें वगैरे—ग्रन्थ कल्याणीस नसलेले वरील दोन मठांत मिळाले आहेत. शिवरामस्वामींच्या ग्रन्थांचा शोध करावा असा हेतु नसतां सहजगत्या त्यांची वरील कविता पाहण्यांत आली. त्या प्रांतीं मुद्दाम शोध च केला तर आणखी हि स्वामींची कविता आढळेल अशी मला खात्री आहे.

( ३ ) यापैकीं फारच थोडी कविता आतांपर्यंत छापली गेली आहे. वरील यादींतील ४० वा ग्रन्थ "गीताचंद्रिका" त्याचा फार थोडा भाग रा. राजवाडे यांस उपलब्ध होऊन तो त्यांनीं मंडळाच्या १८३३ च्या अहवालांत ( पृष्ठें ५५–७७ ) छापला आहे. त्या ठिकाणीं रा. राजवाडे म्हणतात "सबंद टीका सांपडल्यास फारच बहार होईल." ( पृष्ठ ५७ ओळ ३ री ) सुदैवानें ती सबंद

टीका येकेहाळी मठांत सांपडली असून ती छापली गेल्यास खचित च बहार होणार आहे, कारण या चंद्रिकेवरून श्रीज्ञानेश्वरीचा सांप्रदायिक अर्थ कळण्याला पुष्कळ च मदत होणार आहे. शिवरामस्वामींनीं चंद्रिका १६०५ त लिहिली व सभेस मिळालेली प्रत बेदरजवळील हसनाबाद येथील देशमुखानें १६७४ त केलेली आहे.

( ४ ) शिवरामस्वामी श्रीसमर्थकालीन होत. त्यांना प्रत्यक्ष त्यांच्या वडिलांचा च अनुग्रह होता. वडिलांचें नांव नारायण. नारायणांनीं संन्यास घेतल्यावर त्यांना पूर्णानंद म्हणूं लागले. कल्याणीस मठांत पूर्णानंदांचें अठरा अध्यायांचें एक ओंवीबद्ध चरित्र आहे. त्यांत शिवरामांचा जन्मशक १५५४ दिला आहे. कल्याणीचे विद्यमान मठापति माणिकबावा हे फार आस्थेवाईक गृहस्थ आहेत. त्यांनीं परंपरेनें ऐकलेली शिवरामस्वामींची खालील माहिती दिली:—

“ पूर्णानंदांचे वडील तिमण्णा दिक्षित हे माणिकनगराच्या दक्षिणेस आठ कोस असलेल्या महागांवीं रहात असत. हे काश्यपगोत्री अश्वलायन शाखेचे ऋग्वेदी ब्राह्मण होत. पूर्णानंदांनीं काशीरामेश्वराची यात्रा सात वेळां केली होती व त्यांना अपत्यें हि सात च होतीं.

नारायण ऊर्फ पूर्णानंद
×
लक्ष्मी

| तिमण्णा | कृष्णाबाई | अनंत | विवेकम्मा | राम | गोदुबाई | शिवराम |

शिवरामांनीं लहानपणीं विजापुरीं रुक्मण्णापंडितांचे जवळ शास्त्राध्ययन केलें होतें. त्यांचें दहाव्या वर्षी एक लग्न झालें, त्या स्त्रीचें नांव पार्वती होतें. त्यांचें दुसरें लग्न कावेरी धामक स्त्रीशीं चवदाव्या वर्षी झालें. दोन्ही स्त्रिया एका काळीं होत्या कीं काय हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. ”

( ५ ) शिवरामांची एकंदर कविता “ गुरुभक्ति ” या एका सूत्रांत गोंविलेली दिसते. गुरुभक्तीचा त्यांचा बाणा अपूर्व होता. ते म्हणतात:—

गुरूवेगळें नाम घेईन जेव्हां । गुरूवेगळें रूप पाहीन जेव्हां ।
गुरूवेगळे पाय वंदीन जेव्हां । क्षणामाजि मी भस्म होईन तेव्हां ॥ १ ॥
गुरूवीण विश्वास ठेवीन कोठें । गुरूवीण भावीन मी देव मोठे ।
गुरूवेगळें तीर्थ सेवीन जेव्हां । क्षणामाजि मी भस्म होईन तेव्हां ॥ २ ॥

गुरुक्षेत्र टाकूनि काशीसि जाऊं । गुरुतीर्थ सांडूनि गोदेसि न्हाऊं ।
गुरुवीण लोटांगणीं जाय जेव्हां । क्षणामाजि मी भस्म होईन तेव्हां ॥ ७ ॥

इत्यादि.

(६) वर दिलेल्या यादींतील १०२ वें "बोधामृत" प्रकरण श्लोकबद्ध असून त्याचे अवघे ५३ श्लोक आहेत. त्यांत शिवरामस्वामी म्हणतातः—

हिरोनिया माइक हा पसारा । दिल्हा निजानंदरसीं च थारा ।
वारा न लागे मज या भवाचा । यालागिं मी दास तया गुरूचा ॥ ४४ ॥
त्या सद्गुरूवीण कसें असावें । त्यावेगळा जीव कसा धरावे ।
दावा मला तो गुरुराज योगी । पाजा तयाचें पदतीर्थ वेगीं ॥ ४८ ॥
तत्पादतीर्थीं मज आजि न्हाणा । भेटेल कें तो गुरु रामराणा ।
पाहीन त्याचा मुखचंद्र डोळा । भोगीन तें मी सुख वेळवेळा ॥ ४९ ॥
गुरू ईश्वरु भेद मातें दिसेना । गुरु ब्रह्म हे भावना सत्य जाणा ।
जरी अन्यथा बोल बोलेन जेव्हां । क्षणामाजि मी भस्म होईन तेव्हां ॥५०॥

उत्कट गुरुभक्तीचे हे श्लोक वाचण्याचा कोणाला तरी कधीं कंटाळा आला आहे काय ?

(७) "बोधबासष्टी" म्हणून बासष्ट श्लोकांचें त्यांचें एक मनोहर प्रकरण आहे, त्याच्या आरंभीं त्यांनीं केलेलें नमन पहाः—

नमितां गुरुचे चरणा रे । तेणें केली करुणा रे ।
मग मरण चि आलें मरणा रे । जाली भवउद्धरणा रे ॥ १ ॥
सहज कुळीं अवतरला रे । सहजानंद भरला रे ।
सहजसुखें भव हरला रे । सहजीं सहज स्फुरला रे ॥ २ ॥
पूर्णपणें भव शमवी वो । पूर्ण पदीं मज रमवी वो ।
पूर्ण सुखें जन घुमवी वो । पूर्णानंद म्हणवी वो ॥ ३ ॥
उदेइला गुरुतरणी रे । स्वानंदाची किरणी रे ।
जाली रजतमहरणी रे । भरली निजसुखें भरणी रे ॥ ४ ॥
निज कल्याणीं असतो गे । घन कल्याण चि देतो गे ।
अकल्याण संहरितो गे । कल्याण चि जग करितो गे ॥ ५ ॥
लक्ष्मीपतीचें पद पाहूं । सुमनें तेथ सुमन वाहूं ।
जाउनियां उन्मनि राहूं । सहज शिवराम चि होऊं ॥ ६ ॥

(८) येकादशस्कंदावरील टीकेंत शिवरामस्वामी म्हणतातः—

श्रीयेकनाथ दिवटा त्रिजगीं उदेला ॥ ३९ ॥

येकादशाचा निज दाउनी दिवा । नेला स्वधामासि त्रिलोक आघवा ।
तो मातिच्या वाक्य अगत्य मानुनी । श्लोकोक्ति बोले शिवराम होउनी ॥४०॥

मायेचा जो पाइतां आजि आंजा । तो हा येका जाहला बाप माझा ।
आंगें येथें पालटी नांवरूपा । श्लोकीं श्लोकें दाखवी अर्थदीपा ॥ ४१ ॥
कोणी म्हणे तो शिवराम टोणपा । पाहा अनुष्ठान बसेचिना जपा ।
उगें चि नुस्तें मिळऊनि पोरटीं । नाचे उडे गाय करीत चाउटी ॥ ४५ ॥
कितेक येऊनि समीप वंदिती । भला जिवन्मुक्त म्हणोनि वानिती ।
निंदूनियां जाचिति वंदिती स्तुती । दोघे मला सद्गुरुरूप निश्चिती ॥ ४६ ॥
क्षय करुनि विकल्पा भद्रपीठा विलक्षा । त्यजुनि सकल धंदा लागतां कृष्णपक्षीं ।
अति अमल दिनीं हो पूर्ण *येकादशीचें । निरुपण मग जालें जाण येकादशाचें॥५२॥
कल्याणधामीं शिवराम योगी । हे संपवी भागवत प्रसंगीं ।
वक्त्या जनाला श्रवणार्थ याला । कल्याण हो सर्व हि भाविकाला ॥ ५३ ॥
पूर्णानंदगुरुप्रताप चि दुजें साहेचिना बोलणें ।
मूकाला श्रुतिगम्य बोलवितसे अंधासि दिव्यांजनें ।
दावी आत्मनिधान ते प्रतितिसी आलें मला माविका ।
बोले श्री शिवराम होउनि स्वयें येकादशाची टिका ॥ ५४ ॥

हे उतारे देण्याचा माझा हेतु असा आहे कीं स्वामींच्या कवितेची आपणांस कल्पना व्हावी व अशी सुंदर कविता महाराष्ट्रानें अजून हि अप्रकाशित राहू द्यावी याचें आपणांस आश्चर्य वाटावें !

( ९ ) श्रीरामोपासकांना अध्यात्मरामायणाचें महत्त्व विशेष आहे. अशांना शिवरामस्वामींचें ओंवीबद्ध अध्यात्मरामायण फार आवडेल यांबद्दल मला शंका नाहीं व शिवरामस्वामींचा दुसरा कोणता नाहीं तरी एवढा ग्रन्थ आपल्या हातून छापला जावा असा सत्कार्योत्तेजक सभेचा हेतु आहे.

जेवी पित्याची अंकवर्ती । अर्भक ग्रास घेऊनि हातीं ।
ते तव बापाच्या मुखाप्रती । जनक प्रीति मुख पसरी ॥ $\frac{१}{३३}$ ॥
तेणें त्यासी काय तृप्ति होये । ना प्रेमाची जाती ऐसी च आहे ।
तेवीं मी बाळक तुमचे आहे । ऐकवूं पाहे रामकथा ॥ ३४ ॥

( १० ) अध्यात्मरामायणाचे मूळ संस्कृत श्लोक सुमारें ४००० आहेत व शिवरामस्वामीकृत ओंवीसंख्या ५५०० आहे. ग्रन्थाचा शेवट करतांना शिवरामस्वामी म्हणतात:--

संत नामावळी बहुत । त्यांत ही चित्तासी जे आवडत ।
ते ज्ञानदेव नामदेव येकनाथ । रंगीं रंगनाथ निजानंदीं ॥ $\frac{७}{११०}$ ॥

---

* भाद्रपद वद्य ११ क्षय नाम संवत्सर म्हणजे शक १६०४.

याम्तव ज्ञानेश्वर समर्थ । स्वयें चि होऊनि कोनेरीनाथ ।
श्रीरामायण अस्तव्यस्त । रूपा येथें आणिलें ॥ १११ ॥
शके १६०७ सोळाशहे सातोत्तर । तें टीका केली शिवरामेश्वर ।
कोनेरी बावा सादरें । जाला विचारलेखकु ॥ ११२ ॥

( ११ ) महाराष्ट्रवाङ्मयाची सेवा करण्याची कोणास इच्छा असल्यास एका जन्माला पुरेल इतकें काम कल्याणीस शिवरामस्वामींच्या मठांत व आसपास आहे.

( १२ ) शिवरामस्वामींची परंपराः—

[१] ईश [२] दत्तात्रय [३] सदानंद (शक १३३०) [४] रामानंद (श. १३५०) [५] अमलानंद (श. १३७०) [६] गंभीरानंद (श. १४००) [७] ब्रह्मानंद (श. १४३०) [८] सहजानंद (श. १४६०) [९] पूर्णानंद (शक १४९०) [१०] ब्रह्मानंद (श. १५३०) [११] नारायण ऊर्फ पूर्णानंद (शक १५७०) [१२] शिवरामस्वामी (श. ?) [१३] राजमणीस्वामी (श. १६१८) [१४] वैकुंठस्वामी (श. १६४०) [१५] अच्युतबावा (श. १६९३) [१६] गुंडोबावा (श. ? ) [१७] विठ्ठलबावा (श. १८१६) [१८] माणिकबावा (विद्यमान)

( १३ ) सदानंदांची पुण्यतिथि वैशाख शु. ५, नारायण ऊर्फ पूर्णानंद यांची पुण्यतिथि आषाढ शु. १५ व शिवरामस्वामींची वैशाख शु. ३. सदानंदांची समाधि कल्याणीस च गांवाबाहेर आहे. मंदीर भव्य व पुरातन आहे. स्थान रम्य आहे. ईशसंकेतानें गेल्या वैशाख शु. ५ स सदानंदांचा प्रसाद सेवन करण्यास लाभला. शिवरामस्वामींचा मठ गांवांत आहे त्यांची समाधि भीमातटाकीं माव्हाळ (?) क्षेत्रासमीप आहे, असें म्हणतात. सदानंदांची समाधि खालीं भुयारांत आहे. सदानंदांच्या मठाशेजारीं एक फार प्राचीन प्रचंड विहीर आहे. निरनिराळ्या काळच्या संस्कृति त्या विहिरींत पहावयास मिळतात. विहीर सबंध दगडाची च आहे व ठिकठिकाणीं दगडाच्या मूर्ति प्रमाणशीर बसविल्या आहेत, त्यांत बुद्धाची मूर्ति आहे, ती फार च सुबक व मनोहर आहे, नाग आहेत, नंदीवर शंकर-पार्वती आहेत, गणपति आहे, वगैरे. अर्थात् या सर्व मूर्ति इतर दुसरीकडच्या जुन्या ठिकाणच्या असाव्यात.

( १४ ) कल्याणीहून माणिकनगरास जातांना वाटेंत कल्याणीपासून सुमारें एक कोसावर नारायणपूर म्हणून एक गांव लागतें, तेथें शंकराचें एक जुनें देवाळय

आहे, तें सर्वस्वीं चित्रमय च आहे. दगडाच्या मूर्तिच मूर्ति असून सर्व अत्यंत सुबक आहेत. असें कौशल्य आतां कोठें हि पहावयास मिळणार नाहीं.

( १५ ) तात्पर्य, एकाद्या संशोधकानें त्या प्रांतीं आपलें आयुष्य खर्च केलें पाहिजे, असा तो प्रांत सर्वांगांनीं निरीक्षण करण्यासारखा आहे.

## ४७ श्रीसमर्थांच्या पश्चात् त्यांच्या शिकवणीचा राजकारणांत उपयोग

( रा. शंकर श्रीकृष्ण देव )

हा विषय फार व्यापक आहे. मी आज आपल्यापुढें त्याचें नुसतें दिग्दर्शन करूं इच्छितों; आणि खरें म्हटलें म्हणजे या विषयाचें साद्यन्त विवेचन करण्याची अजून वेळ हि आली नाहीं. अजून आपणास श्रीसमर्थांच्या शिकवणीचा च पुरता अंदाज झालेला नाहीं ! मग त्या शिकवणीची त्यांच्या पश्चात् कोठपर्यंत महाराष्ट्रास आठवण होती हा प्रश्न दूर च राहिला.

इशारतीचें बोलतां नये । बोलायाचें लिहूं नये ॥

अशी त्यांची शिकवण असल्यामुळें अशा न लिहितां श्रीसमर्थांनीं सांगितलेल्या युक्तीच्या गोष्टी आज आपणांस कळण्याला बहुधा मार्ग नाहीं ! त्यांचे प्रकाशित आणि अप्रकाशित ग्रन्थ त्यांच्या शिकवणीची साक्ष देत च आहेत. शिवाय श्रीसांप्रदायांतील बराचसा पत्रव्यवहार उपलब्ध झाला आहे, त्यावरून हि आपणांस पुष्कळ बोध होणार आहे. हा सारा पत्रव्यवहार श्रीरामदासी ग्रन्थमालेंतील नवव्या भागांत प्रकाशित होणार आहे व तो भाग छापण्याचें काम हल्लीं सुरू *आहे.

श्रीसमर्थांच्या शिकवणीची महाराष्ट्रांतील राजकारण करणाऱ्या पुरुषांना कोठपर्यंत आठवण होती असा प्रश्न करून त्याच्या उत्तराचें आज येथें नुसतें दिग्दर्शन करितों.

( १ ) श्रीसमर्थांचा समाधिशक आपल्या नेहमीं स्मरणांत असावा. शिवाजी महाराज १६०२ त व श्रीसमर्थ १६०३ त महाराष्ट्राला सगुणरूपानें सोडून गेले. नंतर असें आढळून येतें कीं, रामचंद्र नीळकंठ अमात्य ह्यांच्या हृत्पटलावर श्रीसमर्थांची

* मालेंतलि सहा भाग प्रसिद्ध च आहेत. सातवा भाग "श्रीदासविश्रामधाम" प्रथम खंड व आठवा भाग "श्रीसमर्थप्रताप" असे दोन्ही भाग नुकते च प्रसिद्ध झाले आहेत व पत्रव्यवहाराचा नववा भाग सुमारें सात आठ महिन्यांनीं बाहेर पडेल.

शिकवण कायमची कोरलेली असल्यामुळें ते पुढिलांना तिची आठवण वारंवार करून देत असत.

" येविषीं पूर्वी हि राजेश्री कैलासवासी स्वामीस श्रीचें वचन आहे कीं श्री देवाचा चढता वाढता मोहछव चालवाल तैसें च चढते वाढते राज्याभिवृद्धीतें पावेल. हें श्रीचें कृपापूर्वक आसिररूप वाक्य आहे म्हणून + + + "

" हें धर्मराज्य श्रीचे कृपे करून वृद्धीतें पावलें + + + "

" श्रीसत्पुरुषांचें देवस्थान बहुत थोर आणि हें महाराष्ट्रराज्य म्हणिजे देवाब्राह्मणाचें आहे + + + "

इत्यादि अनेक उल्लेख रामचंद्र नीळकंठांच्या पत्रांतून सांपडतात श्रीसमर्थांच्या पश्चात् रामचंद्र नीळकंठ सुमारें ३५ वर्षे होते व तोंपर्यंत इतरांबरोबर त्यांनीं श्रीसमर्थांच्या शिकवणीचा महाराष्ट्रास विसर पडूं दिला नाहीं हें निर्विवाद आहे.

( २ ) " डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें " श्रीशाहुमहाराजांच्या रोजनिशीचा गोषवारा छापला आहे. त्यांतील लेखांक ३७९ पहावा. फोंड सांवत भोसले सरदेसाई प्रांत कुडाले यांनीं गोपाळ रामराव याचा कबिला अटकावून ठेवला होता त्यावरून फोंड सांवत यांस सरकारांतून ताकीद पाठविण्यांत आली कीं,

" ब्राह्मणाचा कबिला अटकेंत ठेवावा हा महाराष्ट्रधर्म नव्हे "

हें पत्र शक १६५७ चे सुमाराचें आहे व तोंपर्यंत श्रीसमर्थांनीं शिकविलेल्या महाराष्ट्रधर्माची ओळख बुजली नव्हती.

( ३ ) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड सहावा, लेखांक ४३६ मंडळापुढें अवश्य वाचण्यांत यावा. माधवराव अनंत वेदांती यांनीं हें लांबलचक पत्र शक १७०४ त श्रीमंत पंत प्रधान यांस लिहिलें आहे. त्या वेळीं श्रीमंत माधवराव नारायण यांचें वय अवघें आठ वर्षांचें होतें. अशा अल्पवयांत वेदांतींनीं श्रीमंतांच्या कानावर श्रीसमर्थांची शिकवण घातली ! लेखांक ४३६ वर खरोखर टीप असावयास पाहिजे होती. हें सारें पत्र, विशेषतः त्याचा उत्तरार्ध श्रीमत् दासबोधाला धरून आहे, इतकें च नव्हे, तर शब्दशः दासबोधावरून घेतलेला आहे. ही गोष्ट पत्राचा उत्तरार्ध वाचून तो, उदाहरणार्थ दासबोधाच्या अकराव्या दशकाच्या पांचव्या समासाशीं ताडून पाहिला म्हणजे सहज दिसून येणार आहे.

तात्पर्य, शक १७०४ पर्यंत शनवारच्या वाड्यांत श्रीसमर्थांचा उपदेश ऐकावयास मिळत असे.

# ४८ सुप्रसिद्ध कवींची अप्रसिद्ध कविता

( रा. शंकर श्रीकृष्ण देव )

श्रीज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व श्रीसमर्थ यांच्यापेक्षां जास्त प्रसिद्ध व लोकमान्य कवि आणि संत आणखी कोणी असतील असें वाटत नाहीं। असें असून या पांच हि नामांकित सत्पुरुषांची कांहीं कविता अजून अप्रकाशित रहावी हें खरोखर आश्चर्य नव्हे काय? महाराष्ट्रांतील विद्वानांना अलीकडे साधु-संतांचें फार वेड लागत चाललें आहे असें म्हणतात; पण हें खरें वाटत नाहीं. हें खरें असतें तर प्रत्येक सत्पुरुषाच्या वांट्याला निदान एक एक तरी वेडा यावयास नको होता काय? आणि त्या वेड्यांनीं महाराष्ट्रांतील प्रत्येक मठ आणि प्रत्येक जुनें घराणें धुंडाळून या व इतर सर्व सत्पुरुषांची सर्व कविता आतांपर्यंत हस्तगत करून घ्यावयास नको होती काय? याचा मंडळानें अवश्य विचार करावा; असो.

आपचंदमठांतील बाड अनुक्रमांक १५ यांत तुकाराममहाराजांचें एक पद व श्रीएकनाथांचा एक अभंग अशीं नवीन आढळलीं तीं येथें देतोंः—

## तुकारामांचें पद

सांड रांडे टाक रुका नको करू बोल । गुरुविण मार्ग नाहीं नुसती गलबल ॥ ध्रु॥ घालुनि टोपी लेउनि माळा म्हणती आम्ही संत । परनारींसी देखुनी डोळां चंचल होये चित्त ॥ १ ॥ वाचुनि पढुनि शहाणे जाले म्हणती आम्ही साधु । दया धर्म चित्तीं नाहीं जाणावे ते भोंदु ॥ २ ॥ संत म्हणती निंदा केली निंदा नोहे भाई । तुका म्हणे अनन्य भाव संता शरण पाई ॥ ३ ॥

## एकनाथांचा अभंग

ऐसें नोहे निर्मळ । शुद्ध करी अंतःकरण ॥ ध्रु० ॥
स्नान संध्या द्वाद के । फासे घालुनि कापिसि गळे ॥ १ ॥
पाय घालुनि आडवा । काय जपसी रे गाढवा ॥ २ ॥
बक लाउनि से टाळी । धांउनि मत्छासी गिळी ॥ ३ ॥
डोई बोडुनि केली खोडी । काया विटंबी बापुडी ॥ ४ ॥
वेश्या त्या आणिखी दासी । तीसी तोषें भोग देसी ॥ ५ ॥
एका म्हणे जनार्दन । भक्तीविण सर्व सीण ॥ ६ ॥

अशी गोड कविता अप्रकाशित कशी राहूं द्यावी?

# ४९ संदेहहरण

(रा. शंकर श्रीकृष्ण देव)

राघवरंक संत वासंत । ब्राह्मण शेष सेविती अनंत ।
संदेहवारण करिती ग्रन्थ । पंगति घालिती सत्संगति ॥

असा हा श्रीसमर्थप्रतापांत गिरिधरांनीं उल्लेखिलेला संदेहहरण ग्रन्थ होय. तो, शंकरपार्वतीसंवादरूप असून निःसंशय प्रासादिक आहे. ग्रन्थ ओवीबद्ध असून त्याचे अठरा अध्याय आहेत. ग्रन्थसंख्या ४०४० आहे. अध्यात्मविद्या हा त्याचा विषय आहे. आपल्या मराठी वाङ्मयासंबंधानें कित्येक वेळां आपलें दुश्चित्त मन असा प्रश्न करीत असतें कीं, ह्या साऱ्या वाङ्मयाचा विषय जर एक च असतो, तर हें सारें जुनें वाङ्मय छापलें च पाहिजे असा अट्टाहास कां असावा? ज्ञानेश्वरी दासबोध यासारखे दोन चार ग्रन्थ नमुन्यादाखल छापले म्हणजे पुरे! आपल्या पूर्वजांची कृति म्हणून, वाटल्यास, बाकीच्या हजारों ग्रन्थांचा कोठें तरी, फार तर संग्रह करावा, पण तत्प्रीत्यर्थ शाई, कागद आणि लोकांचा पैसा विनाकारण खर्च कां करावा? आपल्या वाङ्मयाचा विषय एक च असतो हें सर्वथैव खरें नाहीं अशी साक्ष रा. राजवाडे यांस उपलब्ध असलेला ग्रन्थसंग्रह देईल; तथापि आपल्या वाङ्मयासंबंधानें हा जो आक्षेप घेण्यांत येतो त्यांत पुष्कळ अंशीं सत्य आहे. पण यांत दोष कोणता आहे? आत्मज्ञानासारखी दुसरी महत्त्वाची गोष्ट नाहीं, हें जर खरें असेल तर आपलें सारें वाङ्मय आत्मज्ञानपर आहे हें दूषण समजावयाचें कां भूषण? आपल्या वाङ्मयावर आपण जेव्हां हा आक्षेप आणतों तेव्हां आपणांस ह्या गोष्टीचा विसर पडला असतो कीं,

सकळ विद्येमध्यें सार । अध्यात्मविद्येचा विचार ॥

हें तत्त्व ज्याला पटेल त्याचा हा आक्षेप उडेल. आपल्या पूर्वजांच्या मनाला असला आक्षेप शिवला देखील नाहीं! कारण आत्मज्ञानाचें महत्त्व ते जाणून होते. आज आपल्या मनाला वडिलांच्या आत्मज्ञानापेक्षां पुढिलांच्या बहुधा—ज्ञानाचें महत्त्व जास्त वाटतें आणि म्हणून हा आक्षेप आपल्या मनांत येतो.

तात्पर्य, संदेहहरणग्रन्थ अध्यात्मपर असला तरी त्याचा कंटाळा यावा असा तो खचित नव्हे.

संदेहहरणाची वोवी । संसारकोडियातें उगवी ।
अनादि गुरुत्वें भेटवी । पराभवी भवभया ॥ १८/१५ ॥

इत्यादि प्रकारें त्याची योग्यता ग्रन्थकारांनीं वर्णिली आहे. अशा ह्या ग्रन्थाचा कर्ता कोण, त्यांना अनग्रह कोणाचा, त्यांची गुरुपरंपरा कशी, हा ग्रन्थ कोठें आणि केव्हां निर्माण झाला व तो कोणी आणि कां वाचावा वा श्रवण करावा, या प्रश्नांचीं उत्तरें ज्यांत आलीं आहेत त्या ओंव्या येथें सादर करितों.

( १ ) ग्रन्थाचा कर्ता—

वशिष्ठकुळगोत्रीचा । राघवरंक राजकुळीचा ।
नीच सेवक साधुसंतांचा । निजभक्तांचा चरणरजु ॥ १३७ ॥

( २ ) अनुग्रह कोणाचा—

वर्णा नातळे ऐसा सोवळा । प्रसिद्ध नामरूपा हि निराळा ।
साक्ष ब्रह्म चि ब्रह्मपुतळा । कावेरीतीरीं भेटला ॥ १४२ ॥
विदेहसुखाची लहरी । मजलागीं जाहाला देहधारी ।
ब्राह्मणवेषें वनांतरीं । भेटली साजिरी दिव्यमूर्ति ॥ १४३ ॥
वटवृक्षाचिये तळीं । छाया वसविली राउळीं ।
सन्मुख बैसऊनि मजजवळी । कृपाकल्लोळीं पाहिले ॥ १४४ ॥

\+ \+ \+ \+ \+

तरी तूं कोण गा आहेसी । नामरूप सांगावें स्मरावयासी ।
मग त्रिमलनाथ ऐसीं । नामाक्षरें सांगितलीं ॥ १४७ ॥

( ३ ) गुरुपरंपरा—

ते त्रि. परंपरा त्रियुक्त । स्वामी आमचा त्रिमलनाथ ।
तया स्वामी समर्थ । गिरिनाथ भवानी ॥ १६५ ॥
तया स्वामी विख्यात । तारक श्रीगिरिलाल समर्थ ।
तया संत नामांकित । गुरुनाथ ऐसे ॥ १६६ ॥
तया रंगराम गुरु । साक्ष विश्वाचे तारु ।
आतां असो सर्व हि गुरु । कल्पतरु परंपरा ॥ १६७ ॥

( ४ ) ग्रन्थ कोठें व केव्हां केला—

नागेश नाम ईश्वर । आणि पवित्र भीमातीर ।
क्षेत्रनाम बीदर । गांव ऐसें ॥ १७० ॥
तेथें हा ग्रन्थ उद्गार । प्रथम उमटलासे प्रेमांकुर ।
मोक्षबाळसें सकुमार । संतीं निरंतर रुवाळिले ॥ १७१ ॥

शके सोळाशे अकरावरी । प्रबोध नाम संवत्सरीं ।
आश्विन शुद्ध गुरुवारीं । विजया दशमी सुदिनीं ॥ १७३

( ५ ) तो कोणी व कां वाचावा—

तो हा डोळे आहेती तेणें पाहावा । श्रवण आहेती तींहीं ऐकावा ।
वोझे फेडील ठेवावा । संग्रहीं हा ॥ १७४

मला हा ग्रन्थ जोगाईच्या अंब्यास श्रीराममठांत मिळाला. अस्सल ग्रन्थ केज येथें आहे. हा ग्रन्थ छापण्याचा सत्कार्योत्तेजक सभेचा हेतु आहे.

## ५० आनंदतनयांचा नातु शंकरतनय

( रा. शंकर श्रीकृष्ण देव ).

आनंदतनयांच्या कवितेचा एक भाग निर्णयसागर छापखान्यानें आपल्या काव्यसंग्रहांत छापलेला प्रसिद्ध आहे. त्याच्या दुसऱ्या आवृत्तीचे आरंभीं आनंदतनयांचें थोडक्यांत जीवनवृत्त दिलें आहे. तसें च रा. राजवाडे यांनीं ग्रन्थमाला मासिकांत लिहिलेल्या लेखांचा जो संग्रह प्रकाशित आहे त्यांत हि आनंदतनयांचं थोडीशी माहिती आली आहे. या माहितींत आज आणखी थोडी भर टाकावयाची आहे.

आपचंदमठांतील बाड अनुक्रमांक १५ चीं पहिलीं कांहीं पानें गहाळ आहेत, त्यामुळें कोणतें प्रकरण चालत आलें होतें तें सांगतां येत नाहीं; पण त्या प्रकरणाचा अठरावा श्लोक असाः—

वस्त्रसुमनें देवोनि भाव त्याचा । पूर्ण केला नृपनाथ जो रसाचा ।
तिहीं धरिला ही पंथ मंदिराचा । म्हणे भावें तो तनय शंकराचा ॥ १८ ॥

आणि त्याच्या खालीं बाड लिहिणारानें टीप दिली आहेः

" हें कवन आनंदतनय याचे नातु यांचे "

यावरून असें म्हणतां येतें कीं आनंदतनयांना शंकर नांवाचे चिरंजीव असून शंकरांच्या तनयानें हि आपल्या आजोबांच्या वळणावर कवित्व केलेलें होतें. आपचंदमठांतील आनंदतनयांची बरीच अप्रकाशित कविता आढळते. अठराव्या बाडांत शंकरतनयांचें एक पद आहे तें येथें देतोः—

त्यामाजि मोक्ष नाहीं नाहीं रे ॥ नाहिं नाहिं जन दाहि दिशी मन । ठाइं नखुनि तनु दाहित केल्या ॥ ध्रु० ॥ नाटकादि अति दाट पकडुनि श्रुति । वाट सहित स्मृति धाटित गेल्या ॥ १ ॥ नाक धरुनि दिठि झांकुनियां जप । राख करी तनु राख लाविल्या ॥ २ ॥ बुडुनि नित्य जळि पढत मंत्र मुखि । उडत उडत महि पडत चि गेल्या ॥ ३ ॥ लक्ष बेल नव लक्ष कमळद्ळ । लक्ष समर्पुनि लक्ष वाहिल्या ॥ ४ ॥ देश तजुन शिरि केश वाढउन । वेष धरुनि तनु भेष चि केल्या ॥ ५ ॥ यज्ञहोमविधिमग्न असुन सर्व । सर्व म्हणुन जगि नग्न चि फिरल्या ॥ ६ ॥ पवनबंध अनुभवुन सरस पद । नव नव जोडुन कवन हि केल्या ॥ ७ ॥ रंग वसन शिरि धिंग धरुन करि । लिंग बांधुनि हि जंगम जाल्या ॥ ८ ॥ शंकरपदि मृदु रतुन शंकरसुत सुजनांकित बोले ॥ ९ ॥ त्यामाजि मोक्ष नाहीं रे ॥

## ५१ प्रभुनंदनकृत श्रीखंड्याचें चरित्र

( रा. शं. श्री. देव )

ह्या कवीचें नांव आजपर्यंत ऐकण्यांत नव्हतें व आज हि कवीविषयीं कांहीं विशेष माहिती मिळाली आहे असें नव्हे. आपचंदमठांतील बाड अनुक्रमांक ६ यांत या कवीनें " श्रीखंड्याचें चरित्र येकनाथाचे घरीं पैठणीं जाहलें " तें वार्णिलेलें दिलें आहे. चरित्र श्लोकबद्ध असून त्याचे १०१ श्लोक आहेत. कवि कोठील, कोण, इत्यादि माहिती प्रकरणावरून होत नाहीं, तिचा शोध संशोधकांनीं केला पाहिजे.

प्रकरणाच्या शेवटच्या श्लोकांत शक दिला आहे, त्यावरून हे कवि शके १६६३ त होते एवढा च बोध होतो. प्रकरणाचे शेवटचे दोन श्लोक येथें देतों:—

श्रीपुंडरीके करुणांबुधा रे । प्रभूशिरीं हस्तक ठेविला रे ।
तत्पुत्र वागेश्वरिच्या विलासें । श्रीमद्रमाकांत चि बोलिलासे ॥ १०० ॥
श्रीशालिवाहन शके शिखिशास्त्रसोळा । तो दुर्मती शिशिर अंति वसंतमेळा ।
माघेंदुवासर तिथी शुभ पूर्णिमा हो । येकोत्तरे शत हरीपदिं श्लोक वाहो ॥१०१॥

॥ इति प्रभुनंदनविरचिते श्रीखंड्याकृष्णाचें आख्यान समाप्त ॥

शिखि म्हणजे तीन व शास्त्र म्हणजे सहा शके १६६३ दुर्मति नाम संवत्सरे माघ शुद्ध १५ सोमवार, त्या दिवशीं कवीनें हे १०१ श्लोक संपूर्ण केले.

# ५२ उद्धवलिंग कवि

( रा. शं. श्री. देव )

ह्या हि कवीचें नांव आपचंदमठ बाड ६ त च आलें आहे. हें हि नांव पूर्वी ऐकून ठाऊक नव्हतें. कवि कोठील, कोण व केव्हां होऊन गेले याचा शोध केला पाहिजे. त्यांनीं केलेल्या दोन आरत्या सदरहु बाडांत दिलेल्या आहेत, त्या येथें सादर करितों.

॥ आरति हरिहर ॥

जय देव जय देव जय जय सर्वेशा । श्रीपति पार्वतिरमणा मुरहरपुरनाशा ॥ ध्रु० ॥
पीतांबरधर विष्णु चर्मांबर ईशा । गिरिधर जळधर वर कर संव्हर जगदीशा ।
शामतनू सुंदर वर कर्पुर विश्वेशा । गरुडध्वज जो पशुपति सुखनिधि परमेशा ॥ १ ॥
आंगीं चंदन चर्ची जो भस्मालेपा । मधुदैत्या मारियले मदनानिक्षेपा ।
मधुसूदन मदनारी हरशिव भवतापा । हरिहर नामें दोन्ही न कळे जी स्वरुपा ॥ २ ॥
गोविंदा वनमाळी शिवचंद्रसुमौळी । शंख सुदर्शन आणिक डमरू त्रीशूळी ।
कशव माधव विष्णु ईश्वर तूं सकळीं । उद्धवलिंग राहे तुमचे पदकमळीं ॥ ३ ॥

॥ आरति भगवद्गीतेची ॥

जयदेव जयदेव जय जी भगवंता । अर्जुना उपदेशे श्रीभग(व)द्गीता ॥ ध्रु० ॥
युत्ध न करी म्हणउनि मोह उपजला । कश्मळ बुत्धी टाकवि सांगसि सांख्याला ।
क्षेत्र धर्म कर्म निश्चय होण्याला । ज्ञान जाहल्या कर्में न बाधती त्याला ॥ १ ॥
कर्मसंन्यासे मुख्य प्रतिपादी । हळु हळु साधन करावा आधीं ।
अष्टधा ही प्रकृती मायासमंधी । ॐ मित्येकाक्षर हें ऐसें दृढ बुत्धी ॥ २ ॥
राजविद्या परम भक्ताभिमानी । विभूतीचा विस्तार अंशे जग मानी ।
विश्वी विश्वरूप ब्रह्मांड वदनीं । दृढतर भक्ती व्हावी भक्तालागोनी ॥ ३ ॥
क्षेत्रीं क्षेत्रज्ञ यांचा विचार । करी त्रिगुणविभाग मुक्त तो नर ।
भववृक्षे छेदावे असंगे थोर । दैवासुरसंपत्ती निवडी निर्धार ॥ ४ ॥
त्रिविधा भक्तीभाव यज्ञ तप दान । मोक्षसंन्यासादिक त्याग हि अनुदीन ।
अष्टादश अध्याई श्रीगीता गहन । उद्धवलिंगा हृदईं श्रीकृष्णध्यान ॥ ५ ॥

या आरत्यांवरून कवि बऱ्यापैकीं दिसतो.

# ५३ चंद्रात्मज कवि

( रा. शं. श्री. देव )

हा कवि अजून अप्रकाशित च आहे. त्यांचीं दोन प्रकरणें आपचंदमठांत मिळालीं:-( १ ) उद्योगपर्व आणि ( २ ) गोकर्ण-माहात्म्य.

( १ ) उद्योगपर्वाचा आदिअंत आहे; परंतु मधला कांहीं भाग गेलेला आहे. पर्वांचे एकंदर बारा अध्याय असून ग्रन्थ ओवीबद्ध आहे. ओवीसंख्या सुमारें दीड दोन हजार असावी.

पहिल्या अध्यायांत नमन आहे त्याचा क्रम असा—( १ ) सद्गुरु श्रीव्यंकटेश, ( २ ) गणेश, ( ३ ) शारदा, ( ४ ) कुलदैवत शंकर, ( ५ ) व्यास, (६) निवृत्ती, ( ७ ) ज्ञानियांचा राव ज्ञानदेव, ( ८ ) सोपान, ( ९ ) मुकुंदमुनि, ( १० ) येकनाथ, ( ११ ) मुक्तेश्वर कवि आणि ( १२ ) श्रोते.

शेवटच्या अध्यायांत गुरुपरंपरा दिली आहे ती अशीः—

१ दत्तात्रय, २ अद्वैतानंद, ३ परमात्मानंद, ४ योगेश्वरानंद, ५ हंसानंद, ६ अमृतानंद, ७ ब्रह्मानंद, ८ विमलानंद, ९ चिदानंद, १० प्रसन्नानंद, ११ रामानंद, १२ व्यंकटनाथ, १३ चंद्रात्मजरुद्र.

कवीचें गोत्र वाशिष्ठ, वेद ऋग्वेद, शाखा अश्वलायन. ग्रन्थसमाप्तिकालासंबंधानें उल्लेख आहे तो असाः—

> होतां संपूर्ण आश्विन मास । जाहाला कार्तिकाचा प्रवेश ।
> शुद्ध प्रतिपदा प्रकाश । दीपवाळी शुभ दिनीं ॥ १३५ ॥
> इंदुवासर सुफळ पर्व । तद्दिनीं संपलें उद्योग पर्व ॥ १३६ ॥

यांत शकाचें नांव असतें तरी शक ठरवितां आला असता. मुक्तेश्वरांना नमन आहे त्यावरून कवि शक १६५० चे सुमारास होऊन गेले असावेत असा माझा अदमास आहे. मला जी उद्योगपर्वाची पोथी मिळाली आहे तिचा लेखनशक दिला आहे तो असाः—

शके १६८७ पार्थिवनाम संवत्सरे कार्तिक शुद्ध १० दशमी.

( २ ) कवीचें दुसरें प्रकरण गोकर्णमाहात्म्य. या प्रकरणाचे श्लोक २७, सवाया ६, चामर २, दोटक ५, आर्या १२, वोवी ४, पदें ८ मिळून ६४ ग्रन्थ-

२२

संख्या आहे. या प्रकरणांत कवीविषयीं जास्त माहिती नाहीं. प्रकरणाचा शेवटचा श्लोक असाः—

> हे प्रश्नोत्तरखंडिची शिवकथा जे सांगती ऐकती ।
> त्यातें श्रीशिव तुष्टुनी निजपदीं ठेऊनि दे सद्गती ।
> स्वामी सद्गुरु वेंकटेशस्वरुपीं चंद्रात्मजा सन्मती ।
> देवोनी वदवी कथा भवव्यथा जेणें फिटे संसृती ॥

याहून या कवीचा जास्त शोध लावला पाहिजे.

## ५४ सेंद्रकांचा ताम्रपट

( रा. गो. का. चांदोरकर )

### पत्रा १ ला

१ ॐ स्वस्ति जयपुरद्वारितो मेरुमहीधरशिखरस्थिररुचिरसमुन्नते विकसितयशसि महति सेन्द्रकराज्यम—

२ न्वये नेकचातुर्दन्तगजघटाटोपसमरसंघट्टलब्धविजयी[१] विजिताशेषरिपुगणः स्वभुजबलविक्रमा—

३ क्रान्तमहीमण्डलः प्रणताशेषसामन्तशिरोमकुटानिघृष्टपदपंकजो नयविनयदम-दयादानदाक्षिण्यश्री—

४ संपदुपेतः शरदमलशशांकमण्डलामलयशसः श्री वल्लभ भानुशक्ति-स्तस्य पुत्र-स्तत्पादानुध्यातः स्व भुजम—

५ णिमयूखचक्रपालप्रकाशिताशेषदिक्चक्रश्चक्रवर्तिलक्षणोपेतो विपुलघनपृथुय-शसः कुसुमनिकरो—

---

१ " विजयो " असें पाहिजे. २ " मुकुट " असें पाहिजे.

६ यशोभितसकलवसुधातलः समुद्र इव क्षितिरिथतिराजकमूभृत्पालनपरः परम गांभीरो देवद्विजातिस्वजनर्बा--

७ धवोपभुज्यमानविभवो भवसूनुरिवाप्रतिहतशक्तिः श्रीमदादित्यशक्ति स्तस्य पुत्र स्तत्पादानुध्यातो व्यपगतस--

८ जलजलधरव्योमतलगतशरदिन्दुकिरणधवलतरयशोवितानलंघितांभोधिपरःपरः सेन्द्रककुलगगनचंद्र--

९ मा समधिगतपञ्चमहाशब्दः सत्याश्रयपृथिवीवल्लभ श्री निकुंभलशक्ति स्तस्य पुत्रस्तत्पादानुध्यातो विगतघन--

१० पटलेन्दुमण्डलामलकुलतिलकङ्कृतयुगनरपत्यतिशायितसच्चरितः शरणागतार्ति-हरः प्रसभाभिरुष्टान्य--

११ राजश्रीः समधिगतपञ्चमहाशब्दः सत्याश्रय पृथिवीवल्लभ विक्रमादित्य निकुंभ श्री जयशक्ति

१२ सर्व्वानेव राजसामन्तभोगिकविषयपतिराष्ट्रग्रामकूटायुक्तकमहत्तराधिकारिका दि[१] समनुबोध--

## पत्रा २ रें

१ त्यस्तु वः संविदितं मया परलोकापेक्षत्वमङ्गीकृत्य महत्फलश्रुं [श्र] द्धतः कुन्दलिकामलविषयान्त--

२ र्गतसेणाणकलष ग्रामः सोद्रंगः सपरिकरः सर्व्वदान[२] दित्यविष्टि प्रतिभेदिका परिहिण्णाभ्यन्तरसिद्धं[३]--

---

१ "दिकान्" असें पाहिजे. | २ अक्षर पटिका लागत नाहीं. ३ अक्षर पटिका लागत नाहीं.

३ कः भूमिच्छिद्रन्यायेनाचाटभटप्रवेश्यः आचन्द्रार्क्कार्णवक्षितिस्थितिसमकालीनः पुत्रपौत्रान्वयक्रमोप—

४ भोग्यः कल्लिवनवास्तव्य काश्यपस गोत्र तैत्तिरीक हिरण्यकेशि ब्राह्मण रेवस्वामि सुतो चोप्पस्वामिने बलिचरुवैश्वदे—

५ वाग्निहोत्रपंचमहायज्ञादि कृत्योत्सर्पणार्थं मातापित्रोरात्मनश्च पुण्ययशोभि- वृद्धये ब्राह्मणमहाजनसमेताय

६ फाल्गुणे बहुल दशम्यां पुण्यतिथौ भगवति सवितरि मीनराशिं संक्रान्ते उदकातिसर्गेण प्रतिपादितो स्मद्वंश्यैर—

७ न्यैर्व्वागामिभूपतिभिर्न्नलंवेणुकदलीसारंसंसारजलबुद्बुदोपमं च जीवितमव धार्य्य शिरीषकुसुमसदृशापायं च

८ यौवनं गिरनैदिसलिलगत्वराणि चैश्वर्याण्याकल्याँस्मद्वायोनुमंतव्यः पाल- यितव्य श्चेत्युक्तं च भगवता वेदव्यासेन

९ व्यासेन षष्टिवर्षसहस्राणि स्वर्गे मोदँति भूमिदः आच्छेत्ताचानुमंता च तान्येव नरके वसेत् विंध्याटवीष्वतोया—

१० सु शुष्ककोटरवासिनः कृष्णाहयो हि जायन्ते भूमिदायं हरान्ति ये बहुभि- र्वसुधा भुक्ता राजभिः सगरादिभिः यस्य य—

११ स्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा फलं पूर्वदत्तां द्विजातिभ्यो यत्नाद्रक्ष युधि- ष्ठिर मही महिमतां श्रेष्ठ दानाच्छ्रेयोनुपा—

१२ लनं संवत्सर शतषट्के व्युत्तरके फाल्गुण बहुलः दशम्यां लिखितं चैतत् संधिविग्रहिकरापेनेति[६]

---

१ "न" असें पाहिजे. २ "शीं" असें पाहिजे. ३ "गिरि" असें पाहिजे. ४ "फलम्या" असें पाहिजे. ५ "मोदते" असें पाहिजे. ६ अक्षरें लागत नाहींत.

हा ताम्रपट पूर्वी ' प्रभात ' नांवाच्या मासिकांत मीं छापविला होता. याच्या स्वरूपाबद्दल त्यावेळीं मीं विवेचन केलें च होतें.

एकदां प्रसिद्ध केल्यानंतर पुन्हा तो च प्रयत्न आतां करण्याचें कारण इतकें च कीं पुनर्विचारानें यांतील अंतर्गत पुराव्यानें जीं कित्येक प्रमेयें सुचलीं तीं तज्ज्ञांपुढें ठेवावीं व अवांतर पुराव्यांनीं आणि उपलब्ध माहितीनें त्यांच्या सत्यासत्यतेचा निवाडा व्हावा. येथें जे विचार मी नमूद करीत आहें ते अर्थात् च सिद्धांतदशेला आलेले नाहींत हें सहज लक्षांत आलें असेलच. तथापि तर्क म्हणून तरी ते प्रचलित होणें अवश्य आहेत. आधीं च आपला पूर्वेतिहास भूमिगत निधीप्रमाणें दुष्प्राप तशांत या सेन्द्रक घराण्याची माहिती स्वतंत्र अशा त्यांच्या च साधनांनीं अनुपलब्ध, तेव्हां आतांपर्यंत या घराण्यासंबंधीं जीं काय विधानें इतिहासांत आहेत तीं च मुळीं प्रमेयरूप असलीं पाहिजेत व तीं प्रमेयें खरीं वा खोटीं हें ठरविणें जसजशी जास्त माहिती हातीं येईल तसतसें अधिकाधिक शक्य होईल. या दृष्टीनें येथें दिलेलीं हे केवळ तर्क अथवा हीं केवळ अनुमानें च आहेत असें म्हणतां येणार नाहीं. कारण, आतांपर्यंत उपलब्ध असलेल्या माहितींत व या हल्लींच्या ताम्रपत्रांतील इतिहासांत हा एक मोठा फरक आहे कीं पूर्वींची सर्व आनुषंगिक अशी होती. त्यामुळें तशा माहितीवर रचलेला इतिहास, इतिहास या पदवीस अयोग्य असा गणला पाहिजे.

हल्लींची माहिती ही प्रासंगिक नाहीं. यावरून च या ताम्रपटाचें महत्व व त्यावरून काढलेल्या–उपलब्ध माहितीच्या सापेक्षत्वानें–तर्काचें यथार्थत्व वाचकांचे लक्षांत येईल.

इतकें च प्रास्ताविक लिहून माझे विचार मी नमूद करतों.

आतांपर्यंत ' सेन्द्रकां ' बद्दल इतिहासज्ञांनीं जो कयास केला आहे तो असा कीं हे राजे चालुक्यांचे मांडलिक असावेत. असें विधान करण्याचें कारण असें कीं एक कदम्बशिलालेख सेरीजकरून, इतर फक्त चालुक्यांच्या च दानपत्रांत अथवा शिलालेखांत यांचा उल्लेख आलेला आहे; व तो हि वर दिल्याप्रमाणें आनुषंगिक असल्यानें या राजघराण्यांतील पुरुषांच्या केवळ नांवासेरीज जास्त असें कांहीं च कळलें नाहीं. हल्लींच्या ताम्रपत्रांत हि केवळ नामनिर्देश च आहे. अवांतर माहिती नाहीं च म्हटलें तरी चालेल, परंतु या दोन ठिकाणच्या अथवा प्रकारच्या–नामनिर्दशनांत फरक आहे. प्रशस्तींत कविलाघव व अतिशयोक्ति किती हि असली तरी तींत वस्तुस्थितीचा निर्देश हा असला च पाहिजे. ' मूळ ' हें सत्य च असलें पाहिजे. शाखोपशाखा या कविनिर्मित असूं शकतील. तसें च हल्लींच्या ताम्रपटाचें आहे.

पहिल्या पन्याचे चवथें ओळींत पहिल्या सेन्द्रक राजाचें नांव—श्रीभानुशक्ति—आलेलें आहे. याचें वर्णन देतांना तिसरे ओळींत लेखकानें जें एक विशेषण घातलें आहे त्यावरून श्री भानुशक्ति हा माण्डलिक होता कीं स्वतंत्र होता याची उत्तम कल्पना होते. 'प्रणताशेषसामन्तशिरोमुकुटनिघृष्टपदपंकजः' असें विशेषण ज्या राजाचें, त्याचे साम्राट्पणाबद्दल व्यर्थ शंका घेणें अयुक्त होईल. या राजानंतर त्याच्या मुलाचें, नातवाचें व हा ताम्रपट दान देणाऱ्या त्याच्या पणतवाचें हि वर्णन या च पद्धतीचें आहे. जे सामन्त अथवा महासामन्त आहेत त्यांचा तसा उल्लेख प्रशस्तींत स्पष्टतेनें असतो. येथें तसा उल्लेख नाहीं इतकें च नाहीं तर उलट इतरत्र 'पृथिवीवल्लभ' असें हि विशेषण यांचेपैकीं कित्येकांस, तर नुसतें ' वल्लभ ' असें इतरांस म्हटलेलें आहे.

' वल्लभ ' व ' पृथिवीवल्लभ ' हीं समानार्थक विशेषणें आहेत असें कित्येकांचें मत आहे.

तेव्हां श्रीभानुदित्यापासून श्रीजयशक्तिपावेतों हे सेन्द्रक माण्डलिक नसून साम्राट् होते हें उघड दिसतें. आतां चालुक्यांच्या ताम्रपत्रांत अथवा शिलालेखांत दुसऱ्या पुलकेशीचे ( चालुक्य ) वेळीं अथवा १ ले विक्रमादित्याचे वेळीं ज्या सेन्द्रकांचा उल्लेख केलेला आहे ते त्यांच्या नांवावरून च दिसत आहे कीं याहून भिन्न होते.

या विधानाचें थोडें विस्तारपूर्वक विवेचन केलें पाहिजे, कारण या विवेचनांत च आणखी कांहीं गोष्टींचा प्रासंगिक रीतीनें खुलासा होईल.

चालुक्य वंशाचा इतिहास जयसिंहापासून उपलब्ध होतो.

अयोध्येहून प्रथम हे चालुक्य निघाले ते मध्यदेशांत ( खरोखर दक्षिणेंत ) आले, तेथें राष्ट्रकूटांचा पराभव करून स्वतंत्र अथवा माण्डलिक म्हणून राहिले. ते फक्त दोन च पिढ्या. तिसऱ्या पिढीचा पहिला पुलकेशिन् हा फिरून आपल्या पित्रार्जित प्रदेशांतून निघून थेट दक्षिणेंत जाऊन तेथील महा बलिष्ठ असें जें पल्लवराष्ट्र त्याचा पराभव करून त्याचें मरभराटीचें ' वातापी ' नांवाचें शहर काबीज करून तेथें चालुक्यांची नूतन गादी स्थापिली.

आतां हा पुलकेशिन् आपली वडिलार्जित गादी च नव्हे तर तो देशभाग हि सोडून दक्षिणेंत कां गेला हें इतिहासांत एक कोडें आहे. यासंबंधीं डॉ. फ्लीट् यांचा असा तर्क आहे कीं, कदाचित् तत्कालीन गुजराथचा अथवा वल्लभी राजा यांपैकीं कोणी या चालुक्यावर स्वारी करून तींत त्याची धुळधाण उडविली असावी व म्हणून च कांहीं थोडे अनुयायांनिशीं पुलकेशिन्नें तेथून दक्षिणेंत पलायन केलें असावें.

परंतु चालुक्यांची ही तद्देशीयांसी शत्रुत्वाची कल्पना मला रुचत नाहीं. आधीं च मूठभर अनुयायी, त्यांत अपयशानें ज्यांचा तेजोभंग झाला आहे असे, अशांचे साह्यानें पाठीवर शत्रू ठेवून दक्षिणेंतील अत्यन्त बलिष्ठ अशा पल्लवाशीं सामना करणें, त्यांचें एक भरभराटीचें शहर हस्तगत करून घेऊन तेथें निर्धास्त गादी स्थापणें ही कल्पना-परंपरा अकल्पनीय आहे. मागें पाठीवर शत्रू असून हि सन्मुख दुसऱ्या शत्रूशीं दोन हात करून प्रसंगीं यश संपादन करणें कदाचित् एखाद्या वीरशिरोमणीस शक्य आहे परंतु संपादिलेलें यश व त्या यशाचें फल चिरस्थाई करणें-विशेषतः दोन्ही शत्रू बलाढ्य असतांना-व पल्लव या नंतर हि बलाढ्य होते च असा इतिहासांत दाखला सांपडतो-हें काम मूठभर अनुयायांनिशीं कष्टसाध्य तर नाहीं च परंतु आमचे मतानें सर्वथैव असाध्य आहे.

तेव्हां उभयतः शत्रुत्वाची केलेली कल्पना, असंभवनीय आहे. परंतु पुलकेशिन् दक्षिणेंत गेला हें तर निर्विवाद आहे; व पल्लवांचे आणि त्याचे दोन हात होऊन त्यांचें वातापी शहर त्यानें हिसकविलें हें हि निर्विवाद आहे, तेव्हां शंका व अशक्यता काय ती फक्त पाठीवर ठेविलेल्या शत्रूबद्दलची च आहे. तो शत्रू नसतां बलाढ्य असा मित्र असेल असें मानलें म्हणजे असंभवत्वाचा दोष जाऊन संभवाच्या आटोक्यांत वरील गोष्टी येण्यास हरकत नाहीं. म्हणजे डॉ० फ्लीट् म्हणतात त्याप्रमाणें पुलकेशिन् हा जो आपले पित्रार्जित स्थलाहून खालीं दक्षिणेंत गेला तो कोणी शत्रुत्वानें हांकून दिल्याकारणानें गेला म्हणून नव्हे तर मित्रत्वानें साहाय्य देऊन त्यास दिग्विजयार्थ म्हणा अथवा नवीन देशविभागांचा लाभ व्हावा म्हणून रवाना केलें असलें पाहिजे हें उघड आहे. तसें च पल्लवासारख्या विस्तृत व महाबलाढ्य राष्ट्राशीं तोंड देऊन त्यास दातीं तृण धरावयास लावण्याइतकें संभारसमृद्धि पुरविणारें हें साहाय्यक राष्ट्र हि बलवत्तर च असलें पाहिजे.

तें राष्ट्र सेन्द्रकांचें च असलें पाहिजे असा माझा तर्क आहे. या पहिल्या पुलकेशिन्चा समकालीन श्री भानुशक्ति चालुक्य असावा, कारण, या दोन घराण्यांची परंपरा सध्याच्या ताम्रपत्रावरून व इतरत्र जी आढळते ती अशी:—

| | चालुक्य | सेन्द्रक |
|---|---|---|
| | पुलकेशिन् १ ला | श्रीभानुशक्ति |
| ४८९-५१३ | कीर्तिवर्मन् | श्रीआदित्यशक्ति |
| ५३२-५६१ | पुलकेशिन् २ रा | श्रीभल्लशक्ति ५७७ |
| ५६१-६०२ | विक्रमादित्य | श्रीजयशक्ति ६०२ |

हे पुरुष केवळ समकालीन च असतील असें आमचें म्हणणें मुळीं च नाहीं, परंतु निश्चित अशा एखाद्या ऐतिहासिक पुराव्याचे अभावीं आहे त्या च गोष्टीचा या ताम्रपत्राच्या साहाय्यानें कितीसा खुलासा होतो तें पहाणें आहे. तेव्हां चालुक्यास

साहाय्य देणारे सेन्द्रक च असावेत या माझे तर्कास जीं काय कारणें आहेत तीं थोडक्यांत देतों:—

( १ ) चालुक्य आपल्या नांवाच्या मागें 'वल्लभ, सत्याश्रय' अशीं बिरुदें लावीत असत; व तीं बिरुदें लावण्याचा उपक्रम प्रथम पहिल्या पुलकेशिन् पासून च झालेला आहे. हीं च बिरुदें सेन्द्रक हि आपण धारण करित असत व तीं श्रीभानुशक्तीपासून धारण करित असत हें या ताम्रपत्रावरून उघड होत आहे. ही बिरुदसमानता, समानकालीं दोन राजांत कां असावी ? यांपैकीं सेन्द्रक भानुशक्ति तर साम्राट् होता. तेव्हां माझ्या मतानें या प्रश्नास उत्तर असें आहे कीं पुलकेशिन् यास साहाय्य देऊन श्रीभानुशक्तीनें विजयार्थ रवाना केल्यानंतर, त्यानें तिकडे दक्षिणेंत नवीन गादीची स्थापना केली व या साहाय्याचे स्मरणार्थ 'वल्लभ' हें उपपद धारण केलें असावें. आजमित्तीस हि महाराष्ट्रांत अशीं कांहीं घराणीं आहेत कीं ज्यांनीं आपल्या आश्रयदात्यांचीं उपनांवें केवळ उपकारस्मरणार्थ धारण केलेलीं आहेत.

( २ ) तर मग 'वल्लभ' हें च सेन्द्रकांचें घराणें होतें कीं काय असा कोणी प्रश्न करितील, तर त्यांस माझें उत्तर असें आहे कीं सेन्द्रक हे च 'वल्लभीं' त राज्य करणारे असावेत असें डॉ. फ्लीट् यांनीं पुलकेशिनूचे वेळीं गुजराथ व वल्लभ हीं दोन च बलिष्ठ राज्यें होतीं असें स्पष्ट नमूद केलें आहे, व 'वल्लभ' कोण यासंबंधीं अद्याप स्पष्ट उल्लेख कोठें आढळण्यांत नाहीं. कदाचित् असें हि असूं शकेल कीं सेन्द्रक व चालुक्य यांनीं मिळून वल्लभांचा नायनाट करून तें बिरुद धारण केलें असेल। परंतु हा तर्क सयुक्तिक नाहीं कारण मग पुलकेशिन् यास दक्षिणेंत जाण्याची अवश्यकता कां पडावी ! ! !

( ३ ) सेन्द्रकांचा व चालुक्यांचा अत्यन्त निकट संबंध होता अशाबद्दल ताम्रपत्रांत व शिलालेखांत स्पष्ट उल्लेख सांपडतो. सेन्द्रक कन्या चालुक्य कुमारास दिलेली होती.

( ४ ) दक्षिणेंत ज्या वेळीं पहिला पुलकेशिन् गेला त्या वेळीं त्याचे बरोबर जे कोणी गेले त्यांत सेन्द्रक कोणी तरी होते कारण पुढें २ रे पुलकेशिन् चे वेळीं व त्याचा पुत्र जो विक्रमादित्य याचे वेळीं दक्षिणेंतील सेन्द्रकांचीं जीं नांवें दिलीं आहेत तीं वर दिलेल्या सेन्द्रकांच्या नांवांहून भिन्न आहेत.

२ रे पुलकेशिनूचे वेळीं म्हणजे ज्या वेळीं श्रीभल्लशक्ति व श्रीजयशक्ति हयात होते, त्या वेळीं दक्षिणेंतील सेन्द्रकांची वंशावळी जी दिलेली आहे ती अशी:— विजयशक्ति पुत्र कुंडशक्ति पुत्र दुर्गशक्ति. तसें च २ रे पुलकेशिनूचा पुत्र जो-

विक्रमादित्य त्याचे वेळीं म्हणजे श्रीजयशक्ति सेन्द्रकाचे वेळीं दक्षिणेकडील सेन्द्र-काचा ' देवशक्ति ' या नांवानें उल्लेख केलेला आहे. तेव्हां हें दक्षिणेंतील सेन्द्रक घराणें हल्लींच्या ताम्रपटाच्या सेन्द्रक घराण्याहून भिन्न होतें हें उघड होत आहे व तें पुलकेशिन् बरोबर तिकडे गेलें असावें हें विशेष संभवनीय वाटतें.

( ५ ) हल्लींचा ताम्रपट हा शालिवाहन शकांतील आहे. गुजराथेंत या वेळीं गुप्तशक व दक्षिणेंत चेदिशक सुरू होता. म्हणजे नर्मदेच्या दक्षिणेस फार तर तापीचे दक्षिणेस व तुंगभद्रा इच्या उत्तरेस शालिवाहन शक होता. तेव्हां सेन्द्रकांचें राज्य साम्राट् या नात्यानें या दोन नद्यांमधील प्रदेशांत कोठें तरी होतें. या वेळीं राष्ट्रकूट बलवत्तर झालेले नव्हते. ते दन्तिदुर्गाचे वेळीं झाले.

( ६ ) हे सेन्द्रक म्हणजे हल्लींचे शेंद्रे होत. व त्यांचीं इनामी गांवें या कालांत या च दोन नद्यांमधील प्रदेशांत आहेत. यांचे खुद्द 'शेंद्रे' म्हणून जें राहण्याचें गांव आहे तें हि याच भागांत आहे.

( ७ ) हल्लींच्या ताम्रपत्रांत नाशिक जिल्ह्यांतील कळवण गांवच्या ब्राह्मणांस दान दिलेलें आहे. तेव्हां या पोषक पुराव्यावरून सेन्द्रक हे भानुशक्तीचे वेळीं साम्राट् तर होते च परंतु राष्ट्रकूटांस जिंकून जयसिंह यानें ज्या देशभागांत पद-न्यास केला व जेथून पुढें पुलकेशिन् हा दक्षिणेंत गेला त्या देशभागाचे आसमं-तात् ते राज्य करीत होते. राष्ट्रकूट हे नर्मदा दक्षिण तीर होते हें सर्वश्रुत च आहे. आणि म्हणून पुलकेशिन् यास पल्लवांच्या विरुद्ध मदत करणार सेन्द्रक च त्यास असावेत असा तर्क करणें अस्थानीं होणार नाहीं. तसेंच एक तर चालुक्य व सेन्द्रक यांनीं मिळून ' वलभी ' च्या राज्याचा नायनाट केला असावा ( पण हा तर्क योग्य नाहीं हें वर दाखविलेंच आहे ) अथवा वल्लभ व सेन्द्रक हे एक च असावेत; असो.

याच ताम्रपत्राचे प्रथमचे ओळींत ' जयपुरोद्वारितो ' अथवा ' जयपुरोद्धा-रितो ' असें एक पद आहे. ' जयपुरोद्वारितो ' असें पद अशुद्ध आहे तें ' जय-पुरोद्वारतो ' असें पाहिजे व त्याचा अर्थ ' जयपूरच्या द्वारापासून ' असा होतो. तेव्हां जयपूरच्या द्वारापासून अथवा जयपूर येथें मुक्काम असतां असा त्या पदाचा समुच्चयअर्थ होईल.

' जयपुरोद्धारितो ' असें पद धरलें तर ' जयपूरचा उद्धार करणारा ' असें त्या पदाचें एक विशेषण तयार होईल.

पहिला अर्थ घेतला तर तो ताम्रपत्र दान देणारा जो श्रीजयशक्ति त्यानें हें दानपत्र कोठें असतांना दिलें आहे असें दिसून येतें.

दुसरा अर्थ घेतला तर ४ थे ओळींत जें श्रीभानुशक्ति हें नाम आहे त्याचें हें विशेषण आहे. व त्याचा अर्थ जयपूरचा उद्धार करणारा असा होईल. हा अर्थ जर यथार्थ असेल तर विशेष महत्वाचा आहे. कारण श्रीभानुशक्ति हा कदम्ब हरिवर्मा याचा समकालीन होता.

या कदम्बाची राजधानी विजयपूर, जयन्तिपूर, अथवा वैजयन्ति या नांवाची होती.

वैजयन्ति, जयन्तिपूर हेंच ' जयपूर ' तर नाहीं ! व जयपुरोद्धारितः ' हें जें श्रीभानुशक्तीस विशेषण लाविलें आहे त्यावरून कदम्बांचे व सेंद्रकांचे रण माजलें होतें असें तर सुचविलेलें नाहीं ! कदम्ब या च सुमारास आपलें पहिलें स्थान सोडून दक्षिणेंत गेलेले होते.

आतां आणखी एका पदाचा विचार करून हें विस्तृत विवेचन पुरें करूं.

' वल्लभ ' हें उपपद चालुक्य व सेन्द्रक समानकालीं धारण करित असत. हीं दोन्हीं घराणीं अथवा यापैकीं एक घराणें तरी अर्वाचीन भागानगराजवळील 'वळें' अथवा प्राचीन ' वल्लभीपुर ' येथें राज्य करीत होतें असें इतिहास सांगत नाहीं. तथापि इतिहासज्ञांनीं हें उपपद अन्वर्थक नव्हतें अशी आपले मनाची समजूत करून घेतली आहे. माझें मतानें हें उपपद निरर्थक नाहीं. यांत कांहीं ऐतिहासिक प्रसंग गुप्त आहे परंतु निश्चिततेनें त्याकडे आज बोट दाखवितां येत नाहीं.

असेंच आणखी एक सूचक उपपद या ताम्रपत्रांत आहे. त्याबद्दल थोडासा विचार करूं.

श्रीभानुशक्ति हा नुसता ' वल्लभ ' होता. त्याचा नातु श्रीमल्लशक्ति यास 'सत्याश्रय ' ' पृथिवीवल्लभ ' व ' निकुंभ ' अशीं तीन उपपदें होतीं. ' निकुंभ ' हें एक महासामन्तांचें घराणें होतें असें १२ वे शतकांतील पाटणच्या शिलालेखावरून व इतरत्र दिसतें. तेव्हां सेन्द्रकांस ' निकुंभ ' हें उपपद धारण करण्याची कां बुद्धि झाली हें कळत नाहीं. असो. या मल्लशक्तीचा पुत्र व हल्लींचा ताम्रपत्र कोरविणारा जो ' श्रीजयशक्ति ' त्यानें या वरील उपपदांस आणखी एक नवीन जोडलेलें आहे. तें ' विक्रमादित्य ' हें होय. ' निकुंभ ' हें एका घराण्याचें नांव असल्यानें सामान्यनामांत याची गणना होईल परंतु ' विक्रमादित्य ' हें तर विशेषनाम आहे. हें 'उपपद' म्हणून अथवा ' बिरुद ' म्हणून श्री जयशक्ति सेन्द्रकानें कां धारण करावें हें खरोखर अत्यन्त आश्चर्यकारक आहे. तशांत या च वेळीं चालुक्यांचा ' विक्रमादित्य ' हा गादीवर होता; व ज्या शकांतील हा ताम्रपट आहे त्या च शकांत या विक्रमादित्याचें काय झालें याबद्दल कांहीं एक माहिती न देतां तो इतिहासांतून एकाएकीं नाहींसा होतो. शक ६०२ मधोळ ताम्रपत्रांत सेन्द्रकसा म्रा

स्वतःस ' विक्रमादित्य ' हें बिरुद लावतो व त्याच साली चालुक्य ' विक्रमादित्य एकाएकीं नाहींसा होऊन तो कां तसा नाहींसा झाला याबद्दल इतिहास हि मुग्ध राहतो हें काकतालीयत्व विचारणीय आहे असें माझें मत आहे.

## ५५ नामदेवराय व विष्णुदासनामा

( रा. गो. का. चांदोरकर )

शके १८३३ चे अहवालांत प्रसिद्ध इतिहास-संशोधक विश्वनाथपंत राजवाडे यांनीं नामदेवराय व विष्णुदासनामा या दोन व्यक्ति होत्या असें विष्णुदासनामा-कृत शुकाख्यानाचे शेवटीं दिलेल्या ओव्यावरून शाबीत केलें आहे (पृष्ठ १२२). त्यांनीं दिलेल्या पुराव्यावरून शक १५१७ त हें शुकाख्यान विष्णुदासांनीं संपविलें आहे असें स्पष्ट होतें.

या च मताचे पुष्ट्यर्थ मजजवळ आणखी एक सबळ पुरावा आहे. तो असाः—

विष्णुदासनामा यांनीं कपोताख्यान केलें आहे. त्याच्या एकंदर १५३ ओव्या आहेत. हें आख्यान ज्या बाडांत लिहिलें आहे तें बाड शके १६७५ मध्यें लिहिलेलें जुनें असें आहे. त्या आख्यानाचे आरंभीं नमन करितांना विष्णुदासनामानें आपुल्या गुरूस नमन केलें आहे. ती ओवी अशीः—

मग नमिला श्रीगुरु । जो रामभारथी दिगंबरु ।
तेणें मस्तकीं ठेविला करु । मतिविस्तारु तेणें जाला ॥ ३ ॥

या ओवींत विष्णुदासनामा यांनीं आपल्या गुरूचें जें नांव दिलें आहे त्यावरून तर अगदीं स्पष्ट च होत आहे कीं नामदेवराय व विष्णुदास या दोन भिन्न व्यक्ती होत्या. नामदेवरायांचे गुरु श्रीज्ञानेश्वरशिष्य विसोबा खेचर हे होते हें प्रसिद्ध आहे व रामभारथींचें नांव त्यांच्या चरित्रांत कोठें हि येत नाहीं. तेव्हां गुरूंच्या भिन्न-त्यावरून या दोन व्यक्तींचें भिन्नत्व सिद्ध होण्यास कोणता हि प्रत्यवाय नाहीं.

हें बाड शक १६७५ मध्यें लिहिलें आहे म्हणून वर सांगितलें च आहे. लिहिणारानें तें अत्यन्त शुद्ध-शब्द दृष्टीनें व शब्दांच्या रूपांच्या दृष्टीनें-लिहिलेलें आहे. भाषा नाथकालीन आहे, लेखककालीन नाहीं सबब त्या आख्यानांतील थोड्याशा ओव्यांचे मासले देतों.

नारद इन्द्रसभेंत गेले असतां इन्द्र त्यांस म्हणतोः—

> कवणीये कडे बीजे केलें । बहुता दिवसा सांभाळीलें ।
> येरें आदरें सांगितलें । अपूर्व वर्तलें मृत्यलोकीं ॥ ११ ॥
> ऐसे नारदु विचारू सांगितला । तव इन्द्रावो संतोसला ।
> येइ ससाणा पै जाला । आपण जाला कपोत ॥ १७ ॥

शिबि ( येथें त्यास शिभ्र म्हटलेलें आहे ) राजास 'कपोताचें रक्षण करा कारण तो शरणागत आहे' म्हणून त्याचे प्रधानांनीं उपदेश केला असतां ससाणा रायास उद्देशून म्हणतोः—

> हा पापाचा उपदेशु । माझा राषतो ( राखतो ) ग्रासु ।
> वनविचारिनी प्रवासु । पोटालागी वोळगतुसे ॥ २४ ॥

ससाण्याचें भाषण भाषण ऐकून

> आइकोनि बोलाची टेव । रायासी वाटलें अपूर्व ।
> सांगे प्रधानाचें नांव । म्हणति याचें नांव सुबुद्धि ॥ २६ ॥

प्रधानाचें नांव सुबुद्धि परंतु उपदेश या तऱ्हेचा कुबुद्धीचा हें दाखविण्याकरितां ससाणारूपी अग्नि म्हणतोः—

> ईश्वरूनांवें मोळी आणी । कुबेरनांव वाहे पाणी ।
> विध्वा नावो सुवासिनी (?) । हे भांडवनी नांवाची ॥ २८ ॥
> ढेंकुण नांव वाणीया । तो विचित्र केणिया ।
> तो दुष (ख) वी सकळ प्राणिया । केवि ग्राहीक होईल ॥ २९ ॥
> राया केव्हडा कष्टी आहारु मेळविला । तो तुवा पाठीसी घातला ।
> राव रंकावरि कोपला । तेणें कोणासी सांगावें ॥ ३८ ॥
> राया विहिरी मोडिजेति । आणि देऊळे बांधिजेति ।
> त्या त्या धर्माच्या प्रवृत्ति । कोठे सरति सांगाया ॥ ४५ ॥

ह्या व इतर भाषणांनीं सुबुद्धि प्रधानाचा ससाण्यानें धिःकार केल्यावर राजास मोठें संकट पडलें व त्यानें 'धर्म' नांवाच्या आपल्या पुत्रास विचार पुसला. त्यानें हि हरिश्चंद्र, श्रियाळ, रुक्मांगद, यांचे दाखल देऊन, ससाण्याचे तोंडीं कपोत जाऊं देऊं नये म्हणून आपलें मत सांगितलें. तेव्हां ससाण्यानें रायास म्हटलें कीं कपोताचा प्राण वांचविण्यांत माझा प्राण तूं घेत आहेस इकडे तुझें लक्ष कसें जात नाहीं? अरे बाबा ! भुकेपुढें सर्व तुच्छ आहे. अन्न हें परब्रह्म आहे तें असेल तर च सर्व सुचतें. माझी स्थिति तरः—

अगा राया तुझी आण । गेलों गेलों अन्नेवीण ।
आतां वाचवी माझा प्राण । वेंचळ झालों मी ॥ ७१ ॥

असें म्हणत म्हणत अन्नास्तव प्राण जातो असें दाखविण्याकरितां ससाण्यानें आपले डोळे मिटले. तें पाहून राजाप्रधानादि सर्व घाबरले कीं हा गतप्राण झाला म्हणून. तेव्हां शेवटीं राजपत्नीनें उपदेश केला कीं:—

राया याचे यासी देतां । म्हणती तुम्हां कायेसी चिंता ।
नाथिला दग्ध तुमचिया चित्ता । जी कपोता सोडावा ॥ ८५ ॥
सुखा सुखा राज्ये करिता । यज्ञ सिद्धि पाविता ।
देव तृप्त करिता । हे दिवसी उठली ॥ ८६ ॥

याप्रमाणें आपल्यास देण्याचा विचार चालला आहे असें पाहून कपोत राजास म्हणाला:—

थोर उपजला भेवो । मग ठाकिला तुझा ठावो ।
शरणागता जरि येईल देवो । तरी देईं राया ॥ ९८ ॥
तरि इतुकेया बोलासी । उत्तर कां नेदेसी ।
काये असे तुझे मानसी । ते मज सांगावे ॥ १९० ॥

इत्यादि बोलल्यावर कपोत स्वतःच प्राण देण्यास तयार झाला. कारण कीं राजानें आपल्यास देऊन स्वतःची सत्व-हानी करून घेऊं नये.

तेव्हां

येसे कपोत बोलिला । तव सत्यवतीया रावो विनवीला ।
जी येक असे आठवला । जरि तुम्हा मानेल ॥ १०३ ॥

तो विचार असा कीं ससाण्यास मांस देऊन कपोताचा हि प्राण वांचवावा. तें सर्वांस मानवून त्याप्रमाणें मांस ( पशुमांस ) आणविलें असतां मला नरमांस पाहिजे म्हणून ससाण्यानें सांगितलें तेव्हां

तव प्रधान विनवीलें । जी काळी तस्कर असे मारिले ।
ते मांस आणावे वहिले । (राजा म्हणतो) भले आठवलेंस ये वेळे ॥ ११० ॥

तें मृतमांस ससाण्यानें नाकारून बत्तीस लक्षणी पुरुषाचें मांस पाहिजे म्हणून त्यानें आग्रह धरल्यावर राजानें तुळा उभारून स्वतःचे मांस कापून तें तींत टाकूं लागला तेव्हां प्रत्येक खेपेस कपोत किंचित् जड होऊं लागला व रायाचें मांस अधिकाधिक खपूं लागलें तेव्हां

ते वेळीं लोकां गजबजु जाला । पहा हो कपोता कैसा वाढिनला ।
जव जव पडे मास गोळा । तव तो वाढता न राहे ॥ १२५ ॥
जें जें ठायीं मास असें आथिले । तें समस्त हि कापिलें ।
मासमात्र वेचिले । मग उरलें अस्थि आणि चर्म ॥ १२७ ॥
मग शरीर विकळ गेलें । शस्त्र हातींचें पडलें ।
कपोते थोर जड जालें । मांस तुकीं न पुरें ॥ १२८ ॥
मग म्हणती रावो गेला रे गेला । थोर हाहाकारु जाला ।
लोक दुःखे आरबळला । शरण गेला कपोतियासी ॥ १२९ ॥

शेवटीं निर्वाण होऊन रायानें मांसासाठीं उदरीं सुरी खुपसावी तों श्रीनारायण आविर्भूत होऊन त्यांनीं त्याचा उद्यत हात धरिला व त्यासह सर्वांस दर्शन दिलें व राजाचे इच्छेनुरूप कांतीपुरीच्या सर्व लोकांस विमानांत घालून त्यास देव-लोकीं नेलें.

येसें सकळी परिवार । पावले वैकुंठ भुवन नगर ।
रावो केला तेथीचा राजधर । सिंहासनीं आरूढला ॥ ५० ॥
विष्णुदासाचा दातारु । पावला भक्तालागीं सारंगधरू ।
प्रसन्नरूपी सदा हरिहरू । नामस्मरणें पावतुसे ॥ १५३ ॥

अवतरण जरा विस्तृत झालें खरें परंतु तें मुद्दाम तसें दिलें आहे. यांतील शब्द, प्रयोग व विभक्ति पहाण्याजोगीं आहेत. श्रीज्ञानेश्वरीचे जे पाठक असतील त्यांस श्रीनाथांच्या ( भाषादृष्टीनें अर्वाचीन करून छापिलेल्या ) एकादश स्कंदांत जशी सदृशरूपकांची, समान उपमांची रेलचेल भासते तद्वत् येथें हि इतक्या लहान प्रकरणांत त्यांची शब्द व प्रयोगदृष्टीनें झांक मारते.

बीजे करणें, वोळगणें, टेव, केणिया, सरणें, बेंचळ जाणें, नाथिणें, विवसी, गजबजु होणें, आथिणें, विकळ जाणें, ठावो ठाकणें, हे शब्द वाचून श्रीज्ञानेश्वरीची आठवण होते. तेथें ' गजबज ' हा शब्द स्त्रीलिंगी आहे येथें त्याचा पुल्लिंगी उपयोग केलेला आहे. ( ' मनीं गजबज जाली ' अध्याय १ ).

'आरबळणें' हा शब्द श्रीज्ञानेश्वरींत नाहीं अशी माझी समजूत आहे.

तसें च येथें आलेलीं विभक्तीचीं रूपें हि विचारणीय आहेत.

मोडिजेति, विज्ञापिला, वाढिन्नला, हे प्रयोग अधुनिक नाहींत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे एकंदर ठेवण श्रीज्ञानेश्वर्युत्तरकालीन ( चोंभाकृत उपाहरणाहून अर्वाचीन ) व श्रीतुकारामपूर्वकालीन ( या कालाचा दर्शक ग्रंथ हल्लीं श्रीसमर्थ-कृत श्रीदासबोध अस्सल आहे च ) अशी आहे.

दुसरा एक विशेष आहे तो असा की, श्रीज्ञानेश्वरांची ३॥ चरणांची ओवी व नाथांची ४॥ चरणांची ओवी या दोहोंचें हि मिश्रण यांत आहे. परंतु नाथांच्या ओवीप्रमाणें नियताक्षरा व सुबद्ध अशी ही ओवी नसून क्वचित् चोंभाप्रमाणें अथवा आधुनिक वामनाप्रमाणें अनियताक्षरा व म्हणून विस्कळित अशी या विष्णुदासाची ओवी आहे.

## ५६ दीन-दत्तपदांकित मुकुंद

( रा. गो. का. चांदोरकर )

मराठी वाङ्मयांत केवळ ब्रह्मज्ञानाचा च ऊहापोह केलेला आहे अशी जी आजपावेतों कित्येकांची वृथा कल्पना होती तिचा आधुनिक संशोधनानें बराच निरास झाला आहे व होत आहे. त्या वाङ्मयावरील एकदेशीयत्वाचा आरोप व्यर्थ होता असें आतां वदूं लागलें आहे. गणित, गणितांग ज्योतिष, वैद्यक, विनोद, व्यवहार, वास्तु व शिल्पकला राजनीति व मंत्रतंत्र, यावरील शास्त्रीय आणि अनुभवी असे पुष्कळ ग्रंथ आजपर्यंत उपलब्ध झाले आहेत; पुराणरूपी पुरातन इतिहास व ब्रह्मविद्या-योगासह-यांचा तर अपार समुद्र च आहे; परंतु इतिहासाचें च एक प्रधान अंग, जें आत्मचरित्र व प्रवासवर्णन त्यावरील ग्रंथांची आजपावेतों उणीव भासत होती. निरंजन माधवाचें त्रोटक आत्मचरित्र, प्रत्येक संत कवींची गुरुपरंपरा, व विष्णुदासनामा अगर नामदेवराय यांची तीर्थावळी यावांचून इतरत्र आत्मचरित्र अथवा प्रवासवर्णन उपलब्ध असलेलें माझे पहाण्यांत अथवा ऐकण्यांत नाहीं. संतचरित्रें, संतमाला, असे परचरित्रपर साहित्य पुष्कळच आहे, परंतु या साहित्याचा आत्मचरित्रापेक्षां आधुनिक व्यवहारदृष्ट्या दर्जा कमी. तसें आत्मचरित्र नुकतें च उपलब्ध झालेलें, या लेखद्वारा आपलेपुढें आज ठेवीत आहे; व माझी अशी पूर्ण खात्री आहे कीं, जसें जसें संशोधनाचें काम नेटानें व आस्थेनें चालेल तशीं तशीं या मराठी वाङ्मय महोदधींतून या प्रकारचीं व इतर अमूल्य रत्नें लवकर च हातीं येतील.

मुकुंद हे समर्थांच्या हयातींत जन्मास आलेले व समर्थानंतर सुमार ३० वर्षे तरी निदान हयात असलेले म्हणजे मराठी राज्य-स्वराज्य-ही घडून आलेली गोष्ट घडल्यानंतरचे अथवा अगदीं असेर असेरच्या कालांतील अनुतम संत-कवि

आहेत. बऱ्याच प्रौढ वयांत यांस अनुताप होऊन कांहीं दिवस शारीरतप केल्या-नंतर यांस गुरूपदेश झालेला आहे. ६।७ वर्षांच्या अवधींत इतर उपाधींनीं उत्क्षिप्त मन असतां हि यांनीं केलेल्या ग्रंथांवरून यांची कवित्वशक्ति बरीच जागृत होती, असें दिसतें. तसें च 'भट्टकेदार' विरचित 'वृत्तरत्नाकरा' वरील टीकारूप 'छंदोरत्नाकर' या यांच्या ग्रंथावरून यांची वृत्तांची माहिती स्पष्ट च होते. परंतु याबद्दल विवेचन पुढें करीन.

कवि या दृष्टीनें हे 'काशी कवि' किंवा 'विठ्ठल कवि' यांच्या तोडीचे आहेत. शक १५०० तील 'नाथ' 'त्र्यंबकराय' व थोडेसे 'मुक्तेश्वर' यांची पंडिती ग्रंथ-रचना, कीं जिच्यावरून ते संस्कृतांत निष्णात असून केवळ लोकोपकारार्थ व भाषाभिवृद्ध्यर्थ च त्यांची प्राकृत ग्रंथरचना झालेली आहे हें उघड दिसते, ती १६०० त दिसेनाशी झाली. हा शक १५०० व शक १६०० यांतील रचना विशेष मुकुंदांच्या कवितेंत हि स्पष्ट दिसतो. तसें च सहज साधू व अनुतप्त साधू असे जे दोन वर्ग आमच्या संतांचे आहेत त्यांपैकीं हे दुसऱ्या वर्गांतील असल्यानें यांच्या आत्मचरित्रांत प्रवृत्तिप्राचुर्य आहे, परंतु कार्यकर्तृत्व हि त्यांत तितक्या च स्पष्टतेनें दृग्गोचर होतें. या आत्मचरित्रावरून तत्कालीन देशस्थिति, लोकस्थिति व देशाधिकारी यांचा बोध होत असल्यानें हें चरित्र मोठें महत्वाचें आहे. तें मी माझ्या ओबडधोबड शब्दांनीं देण्यापेक्षां त्यांच्या च तोंडून वदविलेलें बरें असें वाटून तसा प्रयत्न करीत आहें.

श्रीगणेशाय नमः । सद्गुरूभ्योनमः । स्वकर्माचरणयोगे सद्गुरू व संत धावा व तीर्थावली जे घडली शुभाशुभैक ते लिहिले ॥

ही तीर्थावली–आत्मचरित्रयुक्त–मुकुंदांनीं पूर्वीं च जशी यात्रा घडली तशी च लिहून ठेविली होतीसें दिसतें, परंतु

कितिक दिनीं पडोनि राहिलिं तीं च पत्रे । न धरत पडती ते सांडिले त्यांत सूत्रें ।

× विसरुनि तीर्थें स्थानकें देवनामे । म्हणउनि पट केला लीहिले ते चि नेमें ॥

इतकें करून हि पहिल्या पत्रांप्रमाणें च त्या पटाची हि अवस्था होऊं लागली तेव्हां गुर्वाज्ञेनें त्यांनीं हा ग्रंथ–आरंभ केला.

प्रथम सद्गुरु व मातापिता यांस नमन करून मुकुंद आत्मचरित्रास आरंभ करतात.

नमीयाड देशांत सांडोवनाशी । असे जन्म माझा तया पौरदेशी ॥

ज्या ठिकाणीं आपला जन्म झाला ती भूमि सर्वांसच अत्यन्त प्रिय असते.

या मनोविकारास अनुसरून मुकुंद आपल्या जन्मग्रामीं तीर्थ किती व कोणतीं आहेत त्यांचा मोठ्या प्रेमानें उल्लेख करतात.

× × दैवत बाणगंगा । त्या सूर्यकुंडे करी दोषभंगा ॥
तदा संगमू तो नदी भीमकुंडी । वसे देव भीमेश्वरू पापखंडी ॥
तदा स्नान कल्लोल कुंडांत कीजे । तसे पद्मकुंडीं नुरे पापबीजे ॥
तलाव सूर्यांबु पवित्र तेथे । वापी असे उत्तर दक्षिणेते ॥
तैसी भवानी भज तूळजेसी । स्थलोस्थलीं दैवत ये पुरीसी ॥

तत्कालीन हीं तीर्थें व दैवतें होतीं इतका च उल्लेख करून कवि राहिले नाहींत तर आधुनिक पुराणवस्तुसंशोधकांची छटा हि मुकुंदांत होती असें पुढील श्लोकावरून दिसतें.

सर्भोवतें त्या नगरप्रदेशीं । हें खोदितां देव निघे स्थलेसीं ।
त्या हेतु हें जीर्ण पुरांत माने । तेथें मला जन्म असे प्रमाणे ॥

अशा पुरातन ग्रामीं आपला जन्म झाला याबद्दल कवि प्रमाणें च कोणास धन्यता वाटणार नाहीं ! ! !

× × × जन्मलों विप्रवंशी । यजुर्वेद वाजस्नि हि ज्ञानभ्रंशी ॥
असे गोत्र भारद्वजी पर्वरीं त्रीं । पिता नाम नारायणू कर्मसूत्री ॥

माता साखर नाम . . । जालें मौंजिककर्म पंचवरुषे जाल्यावरि नेमकीं। गायत्री उपदेश शंकरभटें श्रीतातवाक्ये करी । जालें सप्तम वर्ष पूर्ण भरतां लग्नोद्यो स्त्री वरी ॥

पांचवे वर्षी मौंजीबंधन व सातवे वर्षी लग्न हें ऐकून आधुनिक समाजशास्त्रवेत्ते व सुधारक यांचें कपाळ ठंठणेल. परंतु पूर्वींचे सर्व विवाह असे च झालेले आहेत. हल्लींच्या देशस्थितीस अनुकूल हे विवाह नसतील हें खरें; परंतु हिंदुसमाजाचा आद्य पाया जर एकत्र कुटुंब असेल व त्यास जर असले विवाह अवश्य व पोषक असतील, तर देशाची परिस्थिति अनुकूल करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होत नाहीं कां ? व तो च खरा मार्ग नाहीं कां ! पण असो.

विवाहानंतर मुकुंदाचे वडील निवर्तले. घरची गरिबी:—

तेव्हां तें स्थल सोडुनी सजननी देशांतरा चालिले ।
गेलों बागुलदेश पूर्वजसर्वे जैतापुरा माजि हे ।
बापुदेव पितामहो × × × ।

जन्मभूमि सोडून बागलाणांतील जैतापूर नांवाच्या गांवीं पितामह (मातामह ?)

२४

बापूदेव म्हणून होते त्यांचेकडे गेले. हें जैतापूर हल्लीं पश्चिमखानदेशांतील साक्री तालुक्यांत–खानदेश व नाशिक यांच्या सीमेवर–आहे. अशा विपन्नावस्थेंत आपली स्थिति कशी झाली त्याचें वर्णन मुकुंदांनीं केलें आहे.

एकाकी पडलों प्रपंचविषयीं देखोनि भांबावलों ।

संसारांतील आधिव्याधींनीं भांबावलेला मनुष्य मानवी उपाय तर करतो च परंतु त्या उपायांच्या उपयुक्ततेबद्दल दृढ श्रद्धा नसल्यानें–तशी नसणें साहजिक आहे–मग दैवी उपायाकडे वळतो. मुकुंद एव्हां जैतापुरीं व त्याचे आसमंतात् असणारीं दैवतें धुंडूं लागले.

कुलस्वामिणी एकवीरा, गांगेश्वर, पार्वती ( पांझरा–धुळ्याची ) तटाकीं असलेलें गोमुख, मोक्ष गंगेतटीं बाबेश्वरू, मांगेश्वर व तुंगेश्वर ( मुल्हेर नजीकचे मांग्या तुंग्याचे डोंगर ), तीळभांडेश्वर, कपाटेश्वरीं हगेंडा देवी, व डेडरा देवी, यांचीं त्यांनीं दर्शनें घेतलीं. परंतु दर्शनानें पाप जाईल पण दारिद्र्य कसें जावें ? स्थिति तर अशी कीं:—

पुढें आश्रय कोण केवि असणें हा काळ दुर्घष्ट कीं ।
कोण्ही स्वात्मिक बुद्धिदायक नसे विद्या न ये नेटकी ।

तेव्हां

त्रासे येऊनि बोरनार नगरीं धागेश्वरा संनिधीं ।
पद्माले गिरिजातटाक नृपचीं सेवेसि केली सुधी ॥

गिरणा नदीचे कांठीं असलेल्या गांवांचा नृप ( ? ) जो पद्मालयीं रहात असे त्याच्या पदरीं सेवाधर्म स्वीकारून राहण्याचा निश्चय करून तो लागला च अमलांत आणला. हें पद्मालय हल्लीं पूर्व खानदेशांत एरंडोल तालुक्यांत आहे; व तें गणपतीचें प्रसिद्ध क्षेत्र आहे.

सुमारें दहा वर्षें ही राजसेवा करून

ऐसीं त्रिंशत वर्ष देह धरुनि प्रापंचिके वेचिलीं ।

या आपल्या वयाच्या तीस वर्षांत मुकुंदांनीं सामान्य गृहस्थाश्रमी पुरुषाप्रमाणें विहारादि क्रिया केल्याचें चरित्रांत कथन केलें आहे. या चारित्र्याचा पूर्वकर्मानुरोधानें कवीस कंटाळा आला व मुमुक्षुता उत्पन्न झाली. मन या स्थितीस आल्यानंतर १८ वे वर्षी आजोबानें

सदा सर्वदा राम मुखीं असो दें । मना पापसंकल्प जीवीं नसो दें ॥

या केलेल्या उपदेशाची तेव्हां त्यांस आठवण झाली, साहजिक च आहे. वसंता-

वांचून वृक्ष पल्लवित होत नाहींत. या च सुमारास त्यांची राजसेवा सुटली. यावरून कवीचा आतां ईशभजनीं काल जात होतासें दिसतें. अशीं सातापेक्षां अधिक वर्षें बोरनारीं क्रमिल्यानंतर बंधूच्या विवाहार्थ त्यांचें फिरून स्वदेशीं प्रयाण झालें. तेथून परत आल्यावर कवीस काव्यस्फूर्ति होऊं लागली. या स्थितीचें वर्णन मुकुंदांनीं मराठी, गुर्जर, अभीर, अंतर्वेदी व मिश्र अशा पांच भाषेंतील कवनानें केलें आहे.

संस्कार पूर्वील मलिन होता । तो दत्तराजे स्मरवोनि चित्ता ।
केला अती सोज्वल बीजदानें । शब्दांमृतें शब्दविलें प्रमाणें ॥

बोले मती परि मर्मी अति शंकयानें । संव्याप्त गुप्त करि काव्य कलो न देणे ।
संदेह तो निवटि सद्गुरु दत्तराजा । दत्तांकितेति वदवी निजनाम वोजा ॥

या च संधीस मुकुंद हे मुल्हेरीस होते; प्रकृति ज्वरानें दिक्क होती. एके दिवशीं–तो दिवस भावसंवत्सरे ( १६०८ ) आश्विन महिन्याच्या वद्य ६ स शनिवार दोन प्रहर व गुरुसींहेचा अर्धवट झोंपेंत व कांहीं जागृतींत अशा संधींत सद्गुरूंनीं आपल्यास दर्शन दिलें व कवित्व करण्याची आज्ञा दिली असा उल्लेख मुकुंदांनीं केलेला आहे. त्या च वेळीं आपण एक पद्य केलें म्हणून मुकुंद म्हणतात. तें पद्य हि सुदैवानें उपलब्ध झालें आहे. तें येथें देणें अवश्य आहे. तें हें:—

श्रीगुरुस्वप्नानुभव जाला तत्समइ पद ॥ १ ॥

॥ नाटक कृष्णाबाई चालेन गीयते ॥

वंदुनि सद्गुरुपाया स्तउनि गौरिसुत मोरया हो ।
ज्या ध्यानें संशया त्यजुनि पावे निज आलया हो ।
वदतों अनुभव जया मिथ्या नव्हे सद्गुरु दावा हो ।
नगर मयोराद्रि या जाला चमत्कार सांगाया हो ॥ १ ॥
अगम्य गुरुची लीला । भक्ता रक्षक संकटवेला हो ।
अनुभवि जाणति कला । येरा नेणवे खुण जिव्हाळा हो ॥ धृ० ॥
भावा संवत्सरी । अश्विन्वद्य षष्ठि शनिवारी हो ।
दो प्रहरावरि च्यारी घटिका दिवसाची कूसरी हो ।
शरीरव्यापक ज्वरीं । चिंता सर्पिणी या जिव्हारीं हो ।
झोंवुनि भ्रांति करी । जाणुनि गुरुवर निज अंतरी हो ॥ २ ॥
घटिका एकांतरि । जागृति निद्रा नातिसरी हो ।
त्या संधी भीतरी । मुद्रांकित तनु पुस्तक करी हो ।

स्वरूप हीरासरी । गुरुवर आले त्या अवसरीं हो ।
चिंता नाशुनि पुरी । मुकुंद जागविला निजधरीं हो ॥ ३ ॥

हा स्वप्नानुभव झाला तेव्हां मुकुंद कवित्व करूं लागले.

गुरूचें प्रत्यक्ष दर्शन व प्रसाद

शके भूमि शास्त्राक्ष वन्हि प्रसादे । गुरुनाथ संदेह फेडोनी छंदे ।
स्वता ज्ञापिले पौषशुद्धा दशीते । शनीवार··· ॥

(म्हणजे) शके १६२३ पौष शुा १० शनिवारीं झाला. अशा तऱ्हेनें गुरूपदेश झाल्यावर आजपर्यंतचा आयुष्यक्रम कंटाळवाणा वाटून व उपाधी कांहीं-तरी मार्गे टाकावी म्हणून मुकुंद यात्रेस निघाले.

ॐकारेश्वर नर्मदा प्रथम ते सन्निध सां पांच दा ।
जाले पूर्वजसंग आत्मगमने आणिक ऐका पदा ।
श्री तापीपुर येउनि निजसुखें राहोनि पुढे क्रमे ।
केलें मज्जन मोहना अणि तदा तें पूरणासंगमे ।

रामेश्वरुमिळुनियां गिरिजा नदीसी । श्रीराम यंज्ञ करुनि स्थल नाम येसी ।
रामेश्वरूहुनि पुढे च अनूपदेवो । गोमूख ऊष्ण जल भूतुनि ये प्रवाहो ॥

पूर्व खानदेशांत चोपडे तालुक्यांत उष्ण पाण्याचा व थंड पाण्याचा असे दोन झरे अद्याप आहेत त्यांस अनुक्रमें उनप्देव व सुनप्देव म्हणतात.

गिरीजा ( गिरणा ) तटाकाहून मुकुंद मग पार्वती ( पांझरा ) तटाकीं आले व तेथील तीर्थें त्यांनीं वंदन केलीं.

प्रथम संगमेश्वर, ( गिरिजा व पार्वती संगम ' अढावद ' ग्रामीं आहे ) नंतर पद्मालय, तेथून गिरिजा बहुला संगमीं बहुलेश्वर, मग बहुला उगमीं मुर्डेश्वर, जवळच डोंगरीं असलेली योगेश्वरी, जळगांव तालुक्यांतील ' असोदे ' आड, अंभेवट, फुलंबरीचा मठ व घुष्मेश्वर यांचें दर्शन घेऊन मुकुंद नंतर गोदावरी तटीं गेले. तेथें श्रीत्रिंबकराजांचें दर्शन घेऊन त्यांनीं विधियुक्त श्राद्धें केलीं. नंतर तुकाईचें दर्शन घेऊन भीमास्नान केलें व ते नंतर कृष्णातटाकीं आले. तेथें सूर्यपर्व पडलें. पुढें सिंहस्त आल्यानें ते पुनः गोदातटीं आले; आणि तेथून परत तापीपुरास आले. परंतु तीर्थयात्रेची त्यांची तळमळ तशी च जागृत होती. उत्तरतीर्थें कशीं होतील ? गांठीं तर द्रव्य नाहीं आणि यात्रा तर करावयाची अशी उत्कंठा च मुकुंदास लागली.

केव्हां तो ( उत्तरतीर्थ ) हि करावा अनुदिनिं मनसि चिंतया हे चि देवा ॥

करावें गयाश्राद्ध हा हेतु पोटीं । नसे अर्थ गांठीं घडे केवि गोठी ।

कोणती हि भावना उत्कट झाली कीं सिद्ध होण्यास आपोआप प्रसंग जुळून येतात. मुकुंदांची ही इच्छा तृप्त होण्यास अवसर मिळाला तो मोठा चमत्कारिक च होता.

असें चिंतिता तो अकस्मात दैवे । अविंधेश औरंगशाहे स्वभावें ॥

वडीलात्मजू मौजमः शाह नामे । बहूदीस कारागृहीं तो निकामे ।

तया सोडुनी राजधानीस प्रेरी ।

मोअज्जीम हा बंधमुक्त झाल्यावर त्याची रवानगी दिल्लीस झालेली तेव्हां पैसा खर्च न करतां उत्तरयात्रा करण्यास ही संधि उत्तम जाणून मुकुंदांनीं

तया राजद्वारांत सेवा शरीरी ।

पत्करिली. परंतु परत्र जाणें तर गांठीं कांहीं तरी असावें व जवळ कपर्दिक हि नाहीं तेव्हां

केलें पुरीं बाइसि कर्ज आम्हीं । बारा तुले ......

बारा तुले एका बाईजवळून कर्ज काढलें ! ! !

मुकुंदाच्या बरोबर जी मंडळी निघाली तीः—

त्र्यंबकराज कनिष्ठबंधु तनुसी आला स्वयें आइका ।
दूजा शांडिल गोत्र विप्रकुळिं तो ये रामकृष्णु निका ।

या रामकृष्णाची आई अन्नपूर्णा व पिता मुरार यांचा हि उल्लेख मुकुंदाने केलेला आहे. असो.

अशा रितीनें उत्तरेस निघाल्यावर जीं तीर्थे त्यांस दिसलीं त्यांचें वर्णन मुकुंद पुढें करतात.

चर्मण्वती ओलांडून उत्तरेस प्रयाण करित असतां क्षिप्रेंत स्नान केलें, तेथून यमुनातटीं गेले, तेथून

तसी रेणुकास्थान गौघाटमध्यें । महा ऊखरा मुख्य जमदग्नि संधे ।
तसें तीर भागीरथी स्थान सोरो । जयीं कूप भागीरथाचा विचारो ॥

त्या कूपास वाराहक्षेत्र म्हणतात. या च कूपांत भगीरथानें आपला देह टाकलेला आहे. त्या कूपाचें दर्शन घेऊन कालियस्थान जें दिल्ली तेथें गेले.

तेथून प्रहस्त क्षेत्रें नमिलीं. नंतर कुरुक्षेत्रीं आले. तेथें सोबत आलेला रामकृष्ण आजारी पडला म्हणून त्यांस मुक्काम करावा लागला. तो बरा होऊन दक्षिणेंत रवाना झाल्यावर मुकुंद पुढें निघाले. ते शतद्रुकांठीं गेले. तेथून विपाशा, तेथून

पुढें पोर लाहोर ऐरावतीचे । तटाकीं वसे थोर विख्यात साचे ॥

तेथें ऐरावतीचें स्नान करून पुढें निघाले तें

बरें पौर मुल्तान पाहोनि धालों ॥

तेथून पुढें सप्त नद्या–शतद्रू, विपाशा, ऐरावती, चंद्रभागा, वितस्ता, सिंधू, व ...पयोष्णीचीं स्नानें सारून मुकुंद फिरून मुलतानीं आले.

मूलस्थान प्रसिद्ध नाम नगरी जैसी अयोध्यापुरी ।
जेथें जन्मधरी नृसिंह बरवा प्रल्हाद राखे हरी ।
तर्णिकुंड हि रामतीर्थ लहरी हें चंद्रभागा निरीं ।
केलें संगममज्जने निजकरी संतोषलों अंतरी ॥

ज्या ठिकाणीं नृसिंह अवतार झाला तें हें मूलस्थान अथवा मुलतान. आर्य ऋषि हिंदुस्थानांत प्रथम जे आले ते प्रथम याच ठिकाणीं तर नाहीं आले ! व पितापुत्रांत भेद उत्पन्न करून उग्रतेनें दानवाचा वध झाला तो येथें च तर नाहीं! विचारवंतास या स्थानाबद्दलची ही माहिती अत्यन्त ऐतिहासिक महत्वाची आहे.

त्या मूलस्थानचें मुकुंद वर्णन देतातः—

ठाइ ठाइ धर्मशालया सकूप शोभती ।
लोकभावभक्तियुक्त संपदा च भोगिति ।
अपूर्व पौरसौख्य सर्व पाहिलें परि असे ।
स्त्रिया अलज्ज दूषणासि बोलिजे असे ॥

हें दूषण अद्याप हि मूलस्थानच्या कपाळीं चिकटलेलें आहे म्हणतात. खरें काय !

येथून मुकुंदांचा कनिष्ट बंधू रामकृष्ण परत स्वदेशीं गेला व कवि पुढें चालले. रामकृष्णाबरोबर बाईचे घेतलेले तूल परत पाठविले होते व ऋणमुक्त झाल्याबद्दल रामकृष्णाचें पत्र हि पण आलें.

"अधिक ज्येष्ठ कृष्णपक्ष पंचमी भृगुदिनीं । सर्वधारीनाम अब्दीं" म्हणजे शक १६२१।२२ त

मूलस्थान सोडलें. बरोबर भवाळदास म्हणून यापुढें होता. तसा च स्वगुरूच्या ज्ञातीचा सावळो म्हणून हि एक होता.

मूलतानहून लाहोरला आले. तेथून

रायपूर बहराम पौर हे । म्लेंछ राज्य सिम या प्रमाण हे ।
नूरपूर रमणी यथानकी । पावलों सिम नृपाल पारकी ।।

नूरजहान प्रसिद्ध बीबी तिचे नांवास्तव वसविलेलें नूरपूर तर नव्हे ! तेथून पुढें

राजदुर्ग दुर्गमे अगम्य अन्य आलयां ।
तयासि यत्न योजुनी विलोकिलें सुरालयां ।
रामकृष्ण दार सार चित्र भिंति देखिली ।
भागवत्प्रमाण चित्ररूपसर्व रेखिली ।।

हा राजदुर्ग व त्यांतील तीं सुंदर चित्रें येणाराजाणारास दाखविण्यास आतासारखे पूर्वीं हि दाखवडे नेमिलेले असत. त्यांचेपैकीं च एक मोहनदास नांवाचा होता. त्यानें मुकुंदांस हा राजदुर्ग–अथवा राजकिल्ला–दाखविला.

तेथून पुढें

ज्वालामुखी प्रति पुढें गमनासि केलें । ज्वालाभिधान कपिलेश्वर स्थान आलें ॥

तेथें द्रोणराय नांवाच्या राजानें नवीन च एक शिवालय व एक तडाग बांधलें होतें. त्या स्थळीं कर्काचा रवि पडल्यानें तेथें स्नान करून

जालों स्वार पुढें हरीपुर नृपः ग्रामांत पावों भलें ।

अलंकारिक भाषा नसल्यास ही यात्रा घोड्यावर झालीसें दिसतें.

तेथून बगलामुखीस नमून वनखंडीचें दर्शन घेतलें, सप्तकोशीचें ध्यान अवलोकन करून नंतर ज्वालामुखी देवी जी मुख्य माया व महापीठ जें जालांधर त्यांचें दर्शन घेतलें. ही यात्रा एकंदर या ठिकाणीं १२ (द्वादश) योजनाची आहे. येथें ज्वाला प्रत्यक्ष दिसते. तेथें कुंडांत स्नान सारून गोंधळ घातला.

नंतर

नंदीकेश्वर पीठ अंग करुनि प्रादक्षिणा वंदना ।
केलें दर्शन बाणगंगसरिता स्नानें निवालों जना ।
मार्गी त्र्यंबकनाथ ईश्वर तथा भर्तृहराच्या स्थला ।
केलें पूजन सव्य घालुनी ॥

पुढें चालले

वेणुगंगा, अंगपीठ, वैजनाथ, क्षीरगंगा इत्यादि तीर्थांस वंदन करून

महाकाल देवाधिदेवो महेशू । स्मशानीं वसे स्थान विकालवेशू ।
मणीकर्ण सीताविधि कुंड तेथे । असे भीमकुंडीस हि स्नान तेथें ॥

त्या ठिकाणीं विधिकर्म आटोपून तेथून पुढें प्रयाण केलें. मार्गात वेदप्रमाण जें कोलांतपीठ दुर्वासाश्रम हें पाहिलें.

येथें

मणीकर्ण आकर्ण पापे निवारी । जीवा ब्रह्मरंध्रासी नेवोनी तारी ।
निघे शीत ऊष्णोदकें उर्ध्वधारा । महि तो निशब्दोद्भवे दोनि सैन्या ॥

या पाण्यांतून ऊन वाफा निघतात व पाणी इतकें उष्ण आहे कीं, त्यांत अन्न शिजतें.

नदी पार्वती क्षीरगंगा तटाकी । × स्थान हीमालयाचे निजांकी ।

येथें या चरित्राचीं १० पानें नाहींशीं झालीं आहेत. आतांपर्यंत जें चरित्र व तीर्थयात्रेचें वर्णन दिलें आहे तें सान्या ६ पानांतील आहे. यावरून या १० पानांत किती महत्वाचा मजकूर नाश पावला असेल याची वाचकांस सहज कल्पना होईल. हा झालेला नाश फिरून भरून येईल कीं नाहीं याची शंका आहे, कारण माझेजवळचा ग्रंथ हा अस्सल म्हणजे खुद्द मुकुंद यांनीं लिहिलेला व कांहीं त्यांच्या चिरंजीवानें लिहिलेला आहे. तेव्हां मुकुंदांच्या घराण्यांतील हा एक च ग्रंथ असला पाहिजे. शिष्यपरंपरेंत आणखी एखादा असल्यास नकळे.

यात्रा सारून मुकुंद परत फिरले असावे असें पुढें जो आरंभ आहे त्यावरून दिसतें. परत येत असतां एका खिस्तीचा व्यापार करणाऱ्या गृहस्थानें मुकुंदाच्या गांवीं त्यांच्या कुटुंबांतील माणसास फार त्रास दिला असावासें दिसतें. तसें पत्र आल्यावरून त्यास मुकुंदांनीं त्रासून उत्तर दिलें आहे. त्याचा थोडासा मासला दाखवितों.

उद्यममे नीच अर घरके टके लगाय नीचनके संग सदा नीच हि ये बोलिये । नीच हि बिच्यार बढयो कुलाचार खोटा डारें नीचको प्रसंग सभा नीच हि कहाइये । नीचनकी रीत भांत पेहरे सुबरध खांत नीच अन्न प्रीथ साथ नीच बुद्धि पाइये । ऐसे नीचसंसर्गि खिस्तिया अघोरकर्मि उनके सरदार कहो कोन मे सराहिये ॥

मोलखा समान हो न खिस्तिपणो मामसो न बापकी न माइकी

कोटि तो जमाई है रासनके टका खेंच । गहनागृह अश्वचेच ।
अडोसी पडोसी अैच । कीरत बडाई है ॥

मागचा संदर्भ सर्व सुटल्या कारणानें येथून पुन्हां नवीन च सुरू करणें बरें.

अवंतीस मुकुंद असतां त्यांनीं १० श्लोकांनीं अवंतीनाथांची स्तुति केली. रामाश्रमी यानें मागितल्यावरून त्यास एक करुणाशतक करून दिलें. पुढें दयाराम ब्रह्मचारी म्हणून होते त्यांनीं मुकुंदास बोलावणें पाठवून असें बोलले:—

बहुत दिन न आयो कोन अन्याय मेरो । हम मन नहि जाने माधवाश्रम्म केरो ।
क्षमकर नित आयो ये नमस्कार कीयो । मम मन तब तोषे बंदना स्तोत्र गायो ॥

दयारामांनीं अशी स्तुति केल्यानंतर मुकुंदांनीं तीन श्लोकांनीं उलट त्यांची स्तुति केली तेव्हां दयाराम

म्हणे एकदा सेट आणौनि येथें । करूं भेटि तुम्हांसि मेईल हाते ॥

पुढें द्वारपालानें थोडी घासाघीस करून एकदांची शेटजीची भेट करविली शेटजींनीं मुकुंदांस आपले घरीं नेलें, परंतु तेथें

गृहास आणुनी अनादरू अनंत

तथापि 'आदरे सोसिला' आणि 'अनाथरूवें' वीस दिवस राहिले. ही सर्व हकीकत ब्रह्मचारी यांस कळविली तेव्हां त्यांनीं परत बोलविलें. इकडे शेट हि सेवावृत्तीमुळें परगांवीं गेले तेव्हां मुकुंद पुन्हां निष्कांचन होऊन परिभ्रमण करूं लागले.

पोटार्थ भिक्षाकृति मांडलीसे । स्तौति जनाची वदलों प्रभूसे ।

इतकें च नाहीं तर

रायरंक करुणी च बोलिलों । दोष तो अतिशयें च लाधलों ।
लोभयुक्त वदलों म्हणोनियां । दोष होय गुरुनाथ पाल या ॥

पुढें रत्नाकरभट म्हणून कोणी एक राजोपाध्ये होते त्यांची भेट घेऊन त्यांचे स्तुतिपर एक श्लोक करून त्यांत मुकुंदांनीं सुचविलें कीं आम्हांस खर्चण्यास कांहीं नाहीं. तेव्हां रत्नाकर यांनीं संतुष्ट होऊन त्यांस उत्तर दिलें कीं राजप्रशस्तिपर कांहीं श्लोक करा म्हणजे तुमचें कार्य होईल. त्याप्रमाणें 'जयसिंह' नामक नृपतीची कवीनें स्तुति केली ती:—

महि व्यापिली म्लेछ राज्यानुसारे । जया रोधिले वेदधर्माक भारे ।
तया हेतु हा इन्द्र जन्मोनि देही । हरी भार छंदे भुजंगाख्य पाहि ।

व्याप रह्यो जवनेश महीतल वैदिकधर्म रहे जब जाने ।
भ्रष्ट भये स्थल दैवत भंग अरिष्ट अभंग रचे नहि माने ।
धर्म जपादिक कर्म रहे महिदेव पुकार सुनि प्रभु काने ।
भू अमरावतिमे अमरेश तुं जन्मलियो जयसिंह कहाने ॥

अशीं आणखी तीन चार कवित्तें व श्लोक यांनीं स्तुति केल्यावर श्रीजयसिंहानें १० तूल मुकुंदास दिले व रत्नाकरानें ४ दिले. हे १४ तूल बरोबर घेऊन मुकुंद पुन्हां मार्ग क्रमूं लागले. ते बुंदेलखंडीं आले. तेथें दुर्जनसिंह राजा होता, त्याचा बलिभद्र नांवाचा उपाध्याय व किशोरदास म्हणून दिवाण होता. तेथून पुढें रामपूरकर राजा रतनसीं व त्याचा गुरु प्रयागभट यांचें दर्शन घेतलें.

आये है बऱ्हाणपूर छोडके कुटुंब दूर दगा किन्ह साहुकूर आनके फसाय है । दुष्टसंग डार दिन्ह एकले भये प्रवीन वस्त्रपात्र बेच किन्ह खर्च खाय जीय है । गांठ कछु रह्यो नहि स्वारि न सक्त पाथकाहू संग जान नाहि भीक कें न मागि है । महाराज जान आज छांडके समस्त लाज पाइये कुटुंब सोहि साज देत है ॥

अशी आपली हकीकत प्रयागभटास सांगितल्यावर तो संतुष्ट झाला आणि दुसरे दिवशीं त्यानें राजाची भेट करून दिली. राजास इतरत्र जाण्याची घाई असल्यानें त्यानें दोन तुला मुकुंदास दिल्या. तेथें असतां पूर्वीं शहाजादा समवेत फिरत असतां ज्याची ओळख झालेली होती, तो निळोपंत येथें मुकुंदास भेटला. त्यास बरोबर घेऊन ते ' मंदोचला ' ला गेले. तेथील अधिकारी कोणी नंदलाल या नांवाचे होते. ते खासगीकडील अधिकारी असावे असें दिसतें. त्यांची बरीच स्तुति केल्यावर ते खुष होऊन काय दक्षणा पाहिजे म्हणून विचारूं लागले तेव्हां

और बिदाइ न चाहत हो कछु चाहत प्रीत बढे नित चिन्ही । सोहि लिखो कर-पंकज खास कबीसर आस पुरावन जूनि ॥

इतकें मागणें मागितलें. तेव्हां ती शिफारस मिळाली ती घेऊन मुकुंद मांडवगडास आले.

घेउनि सिपारसा सुमंडपाचलाहुनि । रामकुंड सूर्यकुंड रुपतीर्थ वंदुनि ।
इमारता अनेक नेक भोजमुंजरायच्या । पाहिले अनंत ते तलाव गांव गांवच्या ॥

यावरून भोजमुंजाच्या इमारती त्या वेळीं मांडवगडीं उभ्या असोन अलीकडील विद्वानांस च पुराणवस्तुदर्शनाची हांव आहे असें नसून ती परंपरागत आहे असें सिद्ध होतें. संतांच्या चारित्र्यानें पवित्रपणा ज्यांस आला आहे अशीं स्थळें पहाणें निराळें व प्रापंचिकांतील थोर विभूतींच्या चरित्रांचें स्मरण देणारीं स्थळें पहाणें निराळें. असो.

तेथून ॐकारेश्वरीं मुकुंदानें प्रयाण केलें असें दिसतें. तेथें श्रीॐकारेश्वराचें एक नमनाष्टक करून–निरनिराळ्या भार्षेत तें श्रीशिवास अर्पण केलें.

महिमा महा क्षेत्र छे मानधाता । जहा नर्मदा कोटितीर्थे विधूता ।
वहां स्नानकीये हरेपापरासी । नमस्कार ॐकार सायोज्यासी ।।

या अष्टकांत ते क्षेत्राचें थोडक्यांत वर्णन दिलें आहे. त्याचें थोडक्यांत निद्-र्शन करणें अप्रासंगिक होणार नाहीं.

उशःकालांत तेथें विष्णुगंगा वाहते, जवळ च कावेरीसंगम आहे; शूलभेदी महा-कुंड हि आहे; त्या कुंडाचे सन्निध महागणपति व श्रीहनुमान् हीं दैवतें आहेत. शेजारीं अगरेश्वर असून कपिलाचु तीर्थ आहे. सिद्धेश्वरास प्रथम ध्वजारंभ होतो; तो अमरेश्वरास नेतात; येथें आढ्यों ( ! ) तीर्थ आहे; तसें च गौरीशसोम नांवाचें लिंग आहे. एक कालघू ( काळा घोटलेला ) दीर्घ पाषाण तेथें असून स्वयंभाकृति गणेशलिंग हि आहे.

असो, क्षेत्र दत्तांकिते सांपडीनें । हुवा पूर्णतानंद देखी गिरानें ।
कह्यो स्तोत्र यः मंडपाचलू पुरीमे । समर्प्यो गुरु सच्चिदानंद नामे ।।

येथून प्रयाण केल्यानंतर पुढच्या प्रवासांत हि नंदलालजीच्या शिफारसपत्राचा उपयोग झालासा दिसतो.

ॐकारेश्वराहून माहिष्मती तीर्थावर आले,

राजराजेश्वर मुख्य मध्ये असे । सव्य माहेष्मती ते नदी वोघसे ।
तिचीया संगमे सूर्यकुंडे तथा । तीर्थ दशलक्ष कालाग्नि शंलिंग्यथा ।
लिंग माहेश्वरे रावणे स्थापियेले ।
गंधर्वी संगम स्नान योजियेले ।
वामभागीं अशोकाख्य वनतीर्थ आहे ।
शोक गेला ऋषी तीर्थ केले च हे ।

जवळ च सहस्रार्जुनानें सहस्रबाहूंनीं नर्मदा रोखिली तें स्थान आहे. सहस्र-बाहूंनीं नर्मदा रोखिली म्हणजे सहस्र पाट काढून नर्मदा नदीचें आकलन केलें असा तर या आख्यायिकेचा अर्थ नाहीं. भगीरथानें गंगा आणली हें जसें तसें च सहस्रार्जुनानें नर्मदा रोखिली. असो.

तीर्थोपाध्यायांच्या नेहमींच्या परिपाठाप्रमाणें या तीर्थीं उपाध्येबुवांनीं मुकुंदा-जवळून लेख घेतला व मुकुंदांनीं ही गोष्ट हि नमूद करून ठेविली.

श्री माहेष्मति तीर्थ वासकर जे भूदेव मा पूजियो ।
आत्माराम दुबे पुरोहित पुरींमा है इगारो कियो ।

म्हारे नाम मुकुंद विप्र कुल माता पिपुरी मावसा ।
श्री नारायणदेव तात हमके बागूल देशीक स्हां ॥
चैत्र शुद्ध चौथ मंदवार विजयाब्द छे ।
नेत्र शास्त्र अश्व भूमि विक्रमी शशांक छे ।
ते दिने लिखी दियो हमारे वंशकोहु से ।
ते समस्त पूजिज्यो हमारे योल सौरसे ॥

शक १६२६ तील ही गोष्ट.

पूर्वापार जी पद्धत लेखनाची आहे ती आजपर्यंत कायम आहे. अशा तऱ्हेचे पुराणप्रिय आम्हीं आहोंत म्हणून समाजदृष्ट्या, धर्मदृष्ट्या व वाङ्मयदृष्ट्या आमचा किती तरी फायदा झालेला आहे. याबद्दल थोडा विचार केला तरी हें माझें म्हणणें सत्य आहे अशी प्रतीति येईल. असो.

उपपुरी नमुनी मग चालिलों । वडहवाह पुरी प्रति पावलों ।
मिळुनि सूरजमल्ल नृपोत्तमा । लिज शिपारस देउनि उत्तमा ॥

तेथें च मुक्काम कांहीं दिवस पडला. नर्मदा तटीं विरज क्षेत्र आहे त्याचें वंदन केलें. जवळ च शिवरामसा नांवाचे कोणी तपस्वी होते. त्यांच्या स्थानीं गेले. एकमेकांच्या गुह्य गोष्टी होऊन दोघे हि सुखावले. तेथें संकटी चतुर्थी पडली तेव्हां श्रीगणेशपूजन करून प्रसादार्थ लाडू केले व ते शिवराम तपस्व्यासह भक्षण केले. तेथून कावेरी संगमीं आले; तेथें स्नानास बुडी मारतांच ६ बाण हातीं आले; ते शिवरामास दाखविले; ते निर्व्यंग पाहून तपस्व्यास मोठें कौतुक वाटलें. दुसरे दिवशीं तेथून निघतांना शिवराम म्हणाले कीं पुन्हां कांहीं गुह्यार्थाकरितां येथें परत या तेव्हां

तया ' हो ' म्हणौनि पुढें चालियेलों ।

तेथून बड्ढ्हाय ( बडवाय ) पुरीं आले. येथें ' महाबोध ' भोगावतीचें जन्म झालें आहे. माहेश्वरनामें लिंग आहे; हें राजधानीचें ठिकाण होतेंसें दिसतें. कारण येथें आल्यावर तें ' नंदलाल ' चें शिफारसपत्र राजाकडे कोणी पाठवीना, म्हणून मुकुंदानीं स्वतः एक प्रशस्ती लिहिली व ती मंत्रीकडे पाठविली. परंतु

लिहीलें असें मंत्रिया जना । वाचुनी नृपा दाखवीत ना ।

तेव्हां साहजिक च क्रोध आला, आणि मग असहाय परंतु ब्राह्मण यांचें जें शस्त्र तें हातीं घेतलें. नागेशा ( मंत्री ? ) चे दारीं धरणें घेतलें व सांगून पाठविलें कीं माझें पत्र वाचून दाखविल्यावांचून अन्न घेणार नाहीं. इतकें झाल्यानंतर

राजाचे कानावर गोष्ट गेली व त्यानें पांच तूल पाठविले परंतु मुकुंदांनीं ते परत केले व सांगून पाठविलें कीं मला जबाब पाहिजे. त्यावांचून दक्षिणा घेणार नाहीं. इतक्या निकरावर गोष्ट आल्यावर राजानें स्वतः निरोप पाठविला व कळविलें कीं तूल ठेऊन घ्या; जाब मागाहून पाठवितों म्हणून शपथ केली. त्याप्रमाणें जाब आला पण या सर्व घालमेलीस पांच दिवस गेले व तितका काळ मुकुंदांस लंघन घडलें. अक्षततृतीयेचे दिवशीं हें लंघन मोडलें म्हणजे त्या दिवशीं भोजन झालें.

शिवराम तपस्व्यास कबूल केल्याप्रमाणें परत ॐकारेश्वरीं जावयाचें तितक्यांत त्याचे मरणाची वार्ता आली म्हणून तिकडे जाणें मनास येईना म्हणून बडवहीहून

वैशाख शुद्ध तिथि पंचमिया निघालों ।

आणि फार श्रम झाले, सोबत असलेला गोपाळदास हि फार थकला म्हणून इतरत्र न जातां थेट परत तापीपुरास परत आले. झालें. यात्रावर्णन संपलें. आपले गांवाहून उज्जनीस जाऊन तेथें एका वाणीशेटीचे घरीं पांच महिने राहिल्यानें संस्कारानें भ्रष्ट तनू होऊन पुढें दोन महिने प्रायश्चित्त म्हणून अन्न वर्ज केलें होतें याबद्दलचा उल्लेख करून सद्गुरूचे स्तुतिपर कांहीं श्लोक व मनास बोध म्हणून कांहीं श्लोक यापुढच्या ग्रंथांत आहेत.

असा हा चरित्रपर ग्रंथ आहे. यांतील मागें उल्लेख केलेल्या दहा पानांचा नाश झाला नसता तर फार मौज झाली असती. परंतु जें झालें तें भरून कधीं येईल याची च विंवचना करीत संशोधनाचें काम सुरू ठेवणें बरें होईल. हा ग्रंथ मुल्हेरकडे मला मिळाला व मुकुंदांचा यात्रेनंतरचा बहुतेक काळ बागलाणांत च गेला असल्यानें तिकडे या चरित्राची आणखी एखादी प्रत असल्यास मिळण्याचा संभव आहे. असो.

चरित्र कितपत बोधप्रद आहे, त्यावरून कोणतीं प्रमेयें काढितां येतील वगैरे प्रश्न वाचकांवर सोंपवितों. याचेपुढील लेखांत मुकुंदांच्या ग्रंथांचा विचार करीन व त्या वेळीं निरनिराळ्या शकावर हि माझें काय मत आहे तें स्पष्ट करीन.

## ५८ मुकुंदांची कविता

( रा. गो. का. चांदोरकर. )

लेखांक ५७ मध्यें दीन अथवा दत्तपदांकित मुकुंद–यांचें आत्मचरित्र दिलें. त्यावरून सोळावे शतकाचे उत्तरार्ध व सतरावे शतकाचा पूर्वार्ध यांत हे होऊन गेले हें उघड

होत आहे. शक १६३० नंतर यांचा कोणता हि ग्रंथ अथवा एखादें प्रकरण मजजवळ नाहीं व मजजवळ असलेल्या यांच्या कवितेचा संग्रह पहातां आणखी इतरत्र असणें संभवनीय नसल्यानें शक १६३० चे नंतर लवकर च मुकुंदांनीं देह ठेविला असावासें दिसतें. असो.

आतां त्यांच्या कवितेचा विचार केला आहे. प्रथम एक दोन प्रकरणांचें थोडेसें विस्तृत विवरण केलें आहे. कारण त्यायोगें यांच्या कवितेची ओळख वाचकांस व्हावी; व नंतर इतर प्रकरणांचा नुसता नामनिर्देश शकासह-शक्य तेथें-केलेला आहे.

## (१) श्रीदत्तजन्म

कथा आइका रेणुकाचे पुराणीं । पवित्रांग सैह्याद्रि खडांत जाणी ।
वदों ते चि मार्‍हाष्ट्र भाषांत छंदे । भुजंगाख्य हो अन्य छंदे विनोदे ॥१॥

ज्यांच्या भांडण लावून देण्याच्या स्वभावानें आजपर्यंत जगाचें कल्याण च झालें आहे अशीं साक्ष पुराणें देतात त्या कलिप्रिय नारदांनीं लक्ष्मी, सावित्री, व पार्वती यांचा अभिमान जावा म्हणून अधिक्षेप केला असतां त्यांच्या कोपशमनार्थ रेणुकेचें सत्वहरण करण्यास वेणुगंगेतीरीं माहुरीं विष्णुप्रमुख देवांची तिकडे गेली; व तेथें भिक्षा मागितली ती ही कीं हाडावांचून दूध घेऊन त्यांत भात शिजवून तो दूधभात नग्न होऊन वाढावा. सतीस कोडें पडलें; परंतु आर्यांच्य स्त्रिया—तत्कालीन पुरुष तसे म्हणून स्त्रिया हि त्यांस साजतीलशा; या कालांत स्वतः दैन्य व तेजोभंग भोगणारे पुरुष मूढधी होऊन स्त्रियांची उन्नति करूं पहात आहेत!! प्रधान अंग अर्धांग वायूनें गेलेलें त्या शरीराचा अर्धाभाग पुष्ट करण्याचा (?) प्रयत्न कितपत सफल होणार ! पुरुषांची दानत वाढली असतां स्त्रियांची वाढण्यास निराळा प्रयत्न नको. हा च नियम उलटपक्षीं मात्र लागू नाहीं. असो—सत्वशील च. वेणुगंगेवरून स्नान करून यावें तों पावेतों पाकसिद्धि होते अशी विनंति करून अतिथींची रवानगी केली. रेणुकामातेनें ओळखिलें कीं हे देव सत्व पाहण्यास आले आहेत.

तदा बैसली ध्यानमुद्रेंत सत्वें । तजी सर्वदेहाभिमाना महत्वें ।

ध्यानमुद्रेंत मग्न होणाऱ्या मातेच्या च पोटीं योगमार्गाचे प्रवर्तक आदिनाथ रूपी श्रीदत्त जन्मास यावे यांत नवल तें काय ? अशा समाधि स्थितींत असतां रेणुकेस हाडावांचून दूध मिळालें. भ्रुकुटीमध्याचे समीप ' कामधेनु ' आहे हें योगशास्त्रज्ञांस सांगणें नको च.

महामार्ग दुर्घट भेदोनि चक्रें । अती संकटें वींकटारोप वक्त्रें ।
चढे सद्गुरूच्या क्रमे ज्योति हातीं । तमांधा निवारीत गेली नियंती ॥

उडे मूल पासोनि गोल्हांट पावे । सहस्त्रोदयो तेज मध्ये समावे ।
तया द्वादशेंदू प्रती शोधुनीयां । विनाहाड तें दोहिलें दुग्ध माया ॥

ही आमची योगांतील गति कोठें गेली ! काय राहिलें अथवा राखिलें तर योगाबद्दल च खेद मानावा ! परंपरा सुटली व सर्व च अंधकार झाला. असो.

याप्रमाणें ' सतरावी ' दुहून दूध आणून भक्तिरूप तांदूळ घालून क्षीर निर्माण केली; व मनांत फार संतोषली. विचार हा कीं, या तीन देवांस तृप्त करणें म्हणजे सर्व त्रैलोक्य तृप्त करणें आहे.

समाधिस्थितींत ' सती ' असतां देव स्नान करून परत आले.

ज्याचें राजसकर्म रक्ततनुने रक्तासनस्छ स्वयें ।
घे रक्तांबर कास चंदन टिला तो रक्तपुष्पान्वयें ।
पाणीं दंडक मंडलाक्ष मणिची माला रची श्रृष्टी जो ।
तो शोधीत सती कर्मनेत्र न दिसे विस्मीतसा व्यग्र जो ।
ज्या सत्वान्वितदेह पालन करी कृष्णासन स्छैर्यता ।
घे पीतांबरकास कौस्तुभ गळां ते वैजयंती धृता ।
भालीं कृष्ण टिला विराजित करीं चक्राक्षरीमाला धरी ।
त्या दृष्टीं न दिसे विलोकित ( जरी ) असे गेहांतरी श्रीहरी ॥
जो श्वेताकृति देह श्वेत वसनें श्वेतासनीं तामसें ।
भालीं श्वेत टिला विराजित शिरीं तीं श्वेतपुष्पें कसें ।
हातीं घे त्रिशुलाक्ष माल वरदा देता सरे ना स्वयें ।
अंतीं नाश करील शोधित सती लाधेचिना निश्चयें ॥

नुसत्या चर्मचक्षूंनीं सती तर दिसत नाहीं मग आदिनाथ श्रीशंकर यांनीं सुषुप्ती सोडून जागृत व स्वप्न एकीकडे करून तूर्यैत अवलोकन केलें तेव्हां त्या च ठिकाणीं ती बसलेली आहे असें त्यांस आढळून आलें.

नंतर त्या तिन्ही देवास रेणुकेनें आसनस्थ करून त्यांचा ' अतिथि देवो भव ' या आज्ञेप्रमाणें देव या दृष्टीनें पूजन केलें व

अनुहत ससूर्के मंत्र आवाहिले ते । त्रयतनु सम ठाई आसनीं बैसवी ते ।
क्रम तदुपरि केला अर्घ्यपाद्यादि भावे । द्रवत सुरसगंगा स्नान तीघांसि भावे ॥

याप्रमाणें पूजा करून सतीनें आपल्या प्रेममय हस्तानें त्यांच्या भाळीं ' सोहं ' टिळा लावल्याबरोबर तिन्ही देवांची अवस्था अशी झाली:—

पंचमुख दश पाणि जाउनि हस्त दोन चि राहिले ।
तेंवि विधिचतुरास्य जाउनि एक मस्तक पाणि दो ॥

दैत्य मद्र छलने निपातित तो भुजद्वय हारवी ।
दोन कर षण्मासची वपु होय तो गतवैभवी ॥

बाळ झाल्यावर मातेस नग्न होणें काय अवघड ! व कोणता संकोच ! परंतु विवस्त्र होऊन भोजन मागण्यास तरी कोण उरलें होतें. कर्मभूमीस येऊन देव हि छल पावतात तेव्हां धन्य ते सत्पुरुष कीं, जे अशा या कर्मभूमीस येऊन दिग्विजय करून जातात. असो.

पुढें नारदऋषींनीं ही रूपांतराची हकीकत तीन लोकीं जाऊन सांगितली. तेव्हां देवपत्न्या माहुरीं आल्या व त्यांनीं रेणुकेस प्रसन्न केल्यावर तिनें आपल्या अमृत-करानें त्या बालकांस स्पर्श करतां च त्यांस त्यांचें पूर्वरूप प्राप्त झालें. स्वर्गीं आनंद झाला:—

स्वर्गीं दाट विमान देव अवघे या कौतुका लक्षुनी ।
केला दुंदुभिनाद पुष्प वरुषे तो इन्द्र संतोषुनी ।
ब्रह्मानंद ऋषीगृहांत पढति वेदध्वनी मंगले ।
आशिर्वाद यथेप्सिते सति तया देते सअत्रीबले ॥

काव्यदृष्टीनें हें मध्यम दर्जाचें आहे. नुसति गोष्ट पद्यांत गोंविली आहे. तेव्हां विशेष उहापोह करण्याचें कारण नाहीं. एकंदर १६६ श्लोक आहेत. तापीपुरीं पार्थिव संवत्सरीं आषाढ मासीं ही रचना झाली आहे शके १६२८।२९.

श्री

## (२) सवाया एकाक्षरी

हें एक चमत्कृतियुक्त काव्य आहे. सर्व ' भ ' गण व्याप्त असून वृत्त अर्थात् ' चामर ' आहे. स्वर व व्यंजन यांतील प्रत्येक अक्षर घेऊन चान्ही चरणांत त्याची वारंवार पुनरुक्ति होईल अशा तऱ्हेची शब्दयोजना केलेली आहे. प्रथमचीं कांहीं पद्यें श्रीगणेश, सरस्वति व श्रीसद्गुरू यांच्या नमनपूर्वक असून पुढील गरुड, हनुमान यांच्या परस्पर दैवताची महति वर्णनपर आहेत. एकानें दुसऱ्याच्या दैव-ताचा अभिक्षेप करावयाचा व दुसऱ्यानें पहिल्यास उत्तर देऊन तुझें दैवत तरी काय आहे म्हणून त्याची निंदा करावयाची. ही निंदा अर्थात् स्तुति च आहे हें उघड आहे. वृत्त ' चामर ' तर खरें च परंतु भाषा मात्र भिन्न भिन्न पद्यांची भिन्न भिन्न आहे व कित्येक ठिकाणीं एका च पद्याचे चार चरण भिन्न भिन्न भाषेंत आहेत. चमत्कृति साधण्याचा ज्या काव्यांत प्रयत्न आहे तेथें काव्यदृष्टीनें दोषांची विपुलता बहुधा असावयाची च. अर्थचमत्कृतीस हा नियम बहुधा लागत नाहीं. परंतु शब्दांचें चित्रकाव्य जेथें असतें तेथें दोषांचा च भरणा विशेष. त्यांत कवि

जर साधारणतः मध्यम दर्जाचा असेल तर मग बोलावयास च नको. या नियमानुरोधानें या काव्यांत दोष आहेत परंतु तितके नाहींत.

व्रिज, नेमाडी, अभीर, बागलाणी, खानदेशी, रणावट, गुर्जरी, महाराष्ट्री, मारवाडी या भार्षेत हि हे श्लोक आहेत.

प्रत्येक भार्षेतील एक एक मासला दिला तरी आठ पद्यें द्यावीं लागतील. तितका अवसर नाहीं सबब एक दोन मासले माझे दृष्टीनें योग्य असे देतों:—

महाराष्ट्रीः—

मन्मथतात मुरारि मुकुंद तरी भवरोग मनोहरनामें ।
मोहन तो मधुसूदन तो मुरलीधर माधव मानसकामें ।
मंडन तो अरिखंडन तो मज नाथ महोत्सवकारक नामे ।
गाय हनूमत मानुनियां मन तूं तरिसील भवार्णव यामें ॥

खानदेशीः—

थोक मिळी थयथाधिकथा थकिता करि गौळणि खाय थरीतो ।
थीर विभागिनी दे गडि तें वटखाल खुणाविनि औ च हरी तो ।
थोंगड थोंगड कालिशिरें चरणें चुरि औ महिमान धरीतो ।
थोडि मति थुक ऊडविसी अति थोंट तुतें म्हणती हनुमां तो ॥

पंजाबीः—

नायक राम मनोहरणो असि जाण सुभक्त हुये हन गावे ।
नारदवेद पुरान पढे जिस नो भव नाचत राग जमावे ।
नाजुक तो तुसि की समजो महाराज बराबर ग्वाल बतावे ।
नाम तरे भवदुःख सभे सुख दे उसनो अख देह न गावे ॥

एकंदर ३७ श्लोक आहेत; काव्यदृष्टीनें जरी यांची विशेषशी किंमत नाहीं तरी काव्याचा मुख्य गुण जो सबोध आनंद देणें तो यांत येथून तेथून 'हरिगुण गान' ओतप्रोत भरल्यानें हें काव्य अत्यंत आल्हादजनक आहे. क्लिष्ट शब्दयोजनेनें क्वचित् रसभंग होतो परंतु श्रीराम, श्रीकृष्ण यांच्या सहस्रनामांपैकीं एखादें अगर अगाध लीलेपैकीं एखाद्या लीलेचें वर्णन आल्यानें ती क्लिष्टता प्रत्येक हिंदुहृदय उचंबळूच लागलींच रहात नाहीं. काव्याची यापेक्षां अधिक ती महति कोणती असावयाची ? मला तर वाटतें नुसतें 'श्रीकृष्ण कृष्ण जयकृष्ण कृष्ण' 'किंवा हरे राम हरे राम राम राम हरे हरे' हीं च अत्यन्त सरस अशीं काव्यें आहेत. सहृदयता व काव्य हीं परस्परावलंबी आहेत. असो.

शेवटच्या श्लोकांत कवीनें या काव्याचा जो समारोप केला आहे तो तर फारच गोड आहे. मी माझ्याकडून फार थोडे उतारे देऊं इच्छितों परंतु असलीं हरिगुणयुक्त गोड पद्यें मीं एकट्यानें च अनुभवावीं व माझ्या बंधूंनीं अतृप्त रहावें हा अप्पलपोटेपणा कोठील ?

> या उभयां अवतारचरित्र पवित्र करी जगवर्णन वाणी ।
> आइकती तरती भव दुस्तर साक्ष पुराण शृतिमत वाणी ।
> वायुसुतें गरुडें निजभाक्ति सुवाद निनाद परस्पर गाणी ।
> वर्णित तो गुरुदत्तपदांकित ब्रह्मसमर्पण कारण जाणी ॥

प्रतिपाद्य विषय व हेतु हीं दोन्ही उच्चतम असल्याकारणानें हें काव्य सरस आहे असें मला वाटतें व प्रत्येक वाचकास हि तें तसें च वाटेल यांत संशय नाहीं.

हें काव्य कोठें व कधीं झालें याबद्दल उल्लेख नाहीं तथापि शक १६१५ ते ३० चे दरम्यान झालें असलें पाहिजे हें उघड आहे.

श्री

## ॥ सद्गुरुस्तवन ॥

हें लहानसें काव्य ६६ पद्यांचें आहे. यांत निरनिराळीं वृत्तें असून बरें च गोड आहे.

यांत प्रथम नेहमींचे पद्धतीस अनुसरून सद्गुरुब्रह्मैक्य दाखवून नंतर गुरुदैवत हें सगुण असें कल्पून रूपकात्मक पूजा केली आहे. यांतील कांहीं कांहीं श्लोक फार गोड आहेत. त्यांचे एक दोन मासले देतों ते चाखून वाचक संतुष्ट होतील असें मला वाटतें.

> आहे ऐसें म्हणावें तरि क्षम बरवें पूसिलें कोण दावें ।
> नाहिं ऐसें म्हणावें तरि जग अघवें व्याप्त एकेचि दावें ।
> भूमिराकाशवावे जल नलपुरवे काष्ठपाषाणभावें ।
> रीतें नाहीं स्वभावें अणु हि न वदवे वत्कृपावीण गोवे ॥

> गुरु मंगलला निजमंगल हा । गुरु बीजक मत्र मनोहर हा ।
> गुरु सच्चिद्-मूर्ति-विलासक हा । नमितों दीन येऊनि भाव महा ।

असे उतारे द्यावयास लागलों तर हा निबंध मर्यादेबाहेर जाईल. हा ग्रंथ नेमाड जिल्ह्यांत खर्गोण म्हणून गांव आहे-खर्गोण बत्तिसी नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे त्यावरून हें अत्यन्त पुरातन शहर आहे असें सिद्ध आहे-( परंतु या आर्यावर्तांत पुरातन नाहीं आणि त्यायोगें पवित्र नाहीं असें कोणतें स्थल आहे)-तेथें वैशाख १२ वृष सवत्सरीं ( १६२४-२५ ) झालेला आहे.

श्री

# ब्रह्मलिखित सुंदरकांड

१२ वे प्रसंगाचे शेवटीं कवि स्वतः म्हणताहेतः—

श्रीमत्सुंदरकांड पावनकथा सपूर्ण हन्माख्य हें ।
जालें श्रीनृप शालिवाहन शके भूशास्त्रयुग्माग्नि हें ।
ज्येष्ट द्वादशि शुक्लपक्ष सुदिनीं तापीपुरीं संपले ।
पद्यें एक सहस्र दोनि शत हे चौदावरि वर्णिलें ।

यावरून हें सुंदरकांड अथवा श्रीहनूमत्प्रतापवर्णन शके १६२३ मध्यें ज्येष्ठ शु॥ १२ ला कवीच्या स्वगृहीं तापीपुरास संपलें. या ग्रंथाचा एकंदर विस्तार १२१४ इतका असून याचीं निरनिराळीं वृत्तें बारा प्रसंगांत गोंविलीं आहेत.

याच कांडाचे श्रीवाल्मिकऋषींनीं ६८ सर्ग केले असून त्याचा गोषवारा दीनमुकुंदांनीं एकंदर १२ प्रसंगांत आणला आहे. एकंदर वर्णन साधारणतः बरें आहे. नवीन कल्पना अथवा उपमारूपकादि चमत्कृति नाहीं. गद्यांत कथा वर्णन न करितां पद्यांत केली आहे. तथापि श्रीआद्यकवीच्या कांहीं कांहीं कल्पनांचें प्राकृतांत अवतरण केलें असल्यानें तो तो प्रसंग आल्हादजनक झालेला आहे.

थोडशीं उदाहरणें देतों:—

'रामसायकापासून सुटलेला बाण जसा लक्ष्य वेधल्यावाचून परत यावयाचा नाहीं तद्वत् मी हि रामकार्यार्थ निघालों तों थेट लंकेस जाईन ' इत्यादि प्रतिज्ञा करून बलिश्रेष्ठ बालब्रह्मचारी मारुतिराय यांनीं पर्वतशिखरावरून उड्डाण केलें. ( या समयीं श्रीआदिकवींनीं जो स्वभावोक्ति अलंकार केला आहे तो वाचण्यासारखा आहे ) त्या उड्डाणाचा आवेश इतका दांडगा होता कीं

ऊरुवेगोद्धता वृक्षा मुहूर्तं कपिमन्वयुः ।
प्रस्थितं दीर्घमध्वानं स्वबन्धुमिव बान्धवाः ॥ ४७ ॥

किती गोड वर्णन हें आहे व किती समर्पक आहे. हे १५ अनुष्टुप् वाचतांना अत्यंत आल्हाद होतो. हे च काय या काव्यांत सर्वत्र आल्हाद च भरला आहे.

या च वेळचें मुकुंदाचें वर्णन पहाः—

मारुतीच्या उड्डाणाची हकीकत सोबत गेलेले वानर सांगताहेत.

बलाद्भुत वेधोनियां पर्वतासी । उडे तों कडे तूटले हो धरेसी ॥ १४ ॥
गिरीशीखरें अंबरीं देहवातें । भ्रमों लागलीं ॥ इत्यादि

आणखी थोडेसें वर्णन

उड्डाणअंगवातनें तुटे गिरी कडाकडी ।
पडे समुद्र आंत तोय ऊर्ध घेत मेहुडी ।
उडाण घरघराटने घने घनेशदात खीळले ।
दिग्गजा थरार कांप कालअंग तापले ॥
उडाणकाळचा कल्लोल नीरधीजले पहा ।
नभांत ऊर्ध आदळे धूमंडलांत तुंबहा ।
प्रजन्यकाल सत्य लोक दाटला धुवारणें ।
महेशकंठ झोंबली उमा उडाण धाकणें ॥

असो.

भावार्थरामायणाचे धर्तीवर परंतु विशेष सगुणपर अशी या कांडाची रचना आहे. श्री वाल्मीकिऋषींनीं जसें स्वतः वर्णन ( भविष्य कथन ) केलें आहे तसें या कांडाचें नसून प्रथमचे १।२।३ सर्ग वर्णनपर असून चौथे सर्गापासूनचें वर्णन लंकेंत घडलेल्या हकीकतीचे ब्रह्मदेवांनीं श्रीरामास लिहिलेल्या पत्राचें वानरचमूंतील वाचन आहे. आत्मस्तुतीचा दोष येऊं नये व मारुती तर लंकेंत एकटेच गेले तेव्हां तेथील वर्तमान कळावें कसें व तें वर्णन करावें कसें ही अडचण मनांत घेऊन कवीनें कल्पना केली कीं मारुती लंकेहून निघण्याचे वेळीं रावणसभेंत असलेल्या ब्रह्मदेवानें श्रीरामास पत्रद्वारें ती हकीकत साद्यंत कळविली आहे. कल्पना बरी आहे.

अशा तऱ्हेनें प्रत्येक ग्रंथाचें विवरण करूं लागलों तर या निबंधाची मर्यादा उल्लंघन होईल सबब आतां ग्रंथांच फक्त नामनिदर्शन करतों.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दूतिप्रेषण ... ... ... | १०१ | श्लोक. | व्यय | १६२९।३० |
| दानलीला ... ... ... | ३९ | ,, | १६२८ | अष्टाक्षपट्भूमिका |
| यशोदागोळणीसंवाद... ... | ३४ | कवित्तें. | व्यय | १६२९।३० |
| गुरुस्तुति ... ... ... | १०० | श्लोक | | |
| सुदामचरित्र ... ... ... | ... | ,, | सर्वजित् | १६३०।३१ |
| अंकुशपुराण ... ... ... | १६१५ | ,, | श्रीमुख | १६१६।१६१७ |
| श्रीशंकराचार्य स्तौति ... | ८ | ,, | सुभानु | १६२६।१६२७ |
| श्रीमध्वाचार्य ,, | | | सुभानु | |
| षोडशनामान्वित दत्तस्तोत्र ... | १७ | ,, | | |
| मातास्तोत्र ... ... ... | २ | ,, | | |

| | | | |
|---|---|---|---|
| पितास्तोत्र ... ... ... | ३ | श्लोक | |
| अग्रजस्तोत्र ... ... ... | १ | ,, | |
| कनिष्ठबन्धुस्तोत्र ... ... | १ | ,, | |
| पुत्र ... ... ... ... | १ | ,, | |
| स्त्री ... ... ... ... | २ | ,, | |
| सद्गुरुस्तोत्र ... ... ... | १ | ,, | |
| श्रीसद्गुरुस्तोत्र ... ... | १५ | ओवी | |
| श्रीसद्गुरुवियोग ... ... | १८ | ,, - | चित्रभानु १६२५।२६ |
| मित्र... ... ... ... | २ | श्लोक | |
| तापस्तिोत्र ... ... ... | ७ | ,, | |
| रामाजी गो ... ... | | | |
| लवाकुशाख्यान ... ... | ७ | प्रसंग | श्रीमुख १६१६।१७ |
| छंदःप्रकाश ... ... ... | साग्र ग्रंथ | उत्तम | चित्रभानु १६२५।२६ |

मुकुंदांनीं ' बागलाणांतील साधू ' म्हणून एक प्रकरण लिहिलें आहे. तें यांत आलेलें नाहीं. त्याचा उल्लेख स्वतंत्र निबंधानें करीन.

आतां ' आत्मचरित्रा 'चा थोडासा शेष कवीनें अखेर दिलेला आहे तो त्यांच्या कवित्वस्फूर्तीबद्दल आहे तो अखेर असल्यानें मी हि तो शेवटींच देतों.

प्रथम दुंदुभि अब्दक माजि ह्रो । मन करी हरिवर्णन संग्रहो ।

यावरून प्रथम जी स्फूर्ति झाली ती शक १६०५।१६०६ मध्यें झाली. या वेळीं कवीनें आत्मचरित्रांत लिहिल्यान्वयें वयास ३० तीस वर्षें होऊन सेवाशृंखला तुटून कांहीं वर्षें लोटलीं होतीं. तेव्हां कवीचा जन्मशक सुमार १५७५ चा ठोकळ मानानें येतो.

मुल्हेर ग्रामीं गुरूचा संदेश ( कवित्वाबद्दल ) शक १६१७।१८ भाव संवत्सर.

आग्र्यांत हि कवीस पुन्हां गुरूनें आज्ञा केली ती हि कवित्वाबद्दलच.

तरी विश्वास येईना म्हणून देवापुढें चिठ्ठ्या टाकिल्या व आज्ञा मागितली १६२१।१६२२ बहुधान्य.

शेवटीं शक १६२३ मध्यें गुरूंनीं संदेह स्वतः फेडिला.

असो. या कवीचा ग्रंथभर मोठा आहे परंतु एकदोन काव्यें खेरीजकरून साधारणतः सर्व कविता कवित्व या दृष्टीनें सतरावे शतकाचे उत्तरार्धांतील इतर ग्रंथाप्रमाणें आहे. निर्गुणवर्णन अथवा वेदान्त या व अशा गहन विषयावर शिवराम,

रंगनाथ यांच्या प्रमाणें—कष्टतर विषय पण वर्णन सरस आहे असें या मुकुंदाचें एक हि काव्य नाहीं. पौराणिकी कथा पद्यांत गोविलेल्या आहेत. इतकेंच. यांची वाणी अधिकारयुक्त वाटत नाहीं. अधिकारयुक्त वाणीचा पुरुष आत्म-साक्षात्कारी असला च पाहिजे.

# ५९ चतुर साबाजी

## साबाजी अनंत याची थोडी माहिती

( रा. गो. का. चांदोरकर )

रा. रघुनाथ भास्कर गोडबोले यांनीं शक १८०२ मध्यें प्रसिद्ध केलेल्या 'अर्वाचीन ऐतिहासिक कोश' पान १३८ वर चतुर साबाजीबद्दल जी माहिती दिली आहे ती अशी कीं हा मनुष्य अकबराचे वेळीं हयात असून यास त्यानें आपलें भारत लिहिण्याचा हुकूम केला व तो त्यानें अस्सल भारतांतील द्रौपदीप्रमाणें या भारतांत कोणत्या पांच भ्रतारांची द्रौपदी घालावयाची या अडवणुकीच्या प्रश्नानें टाळला. ही माहिती देऊन ग्रंथकर्त्यानें इला आधार म्हणून पुढें (वृद्धमाहिती) असें दिलें आहे.

परंतु रा. सरदेसाई यांच्या मुसलमानी रियासतींत याबद्दल कोठें हि उल्लेख नाहीं.

पुढें दिलेल्या हकीकतीवरून साबाजी अनंत हे 'ब्राह्मणी' घराण्याचे वेळीं होते असें दिसतें.

परंतु रा. मोडकांच्या 'ब्राह्मणी राज्याचा इतिहास' या ग्रंथांत याबद्दल कोठें आढळ होत नाहीं.

'मोल्स्वर्थ'च्या मराठी कोशांत 'चतुर साबाजी' हा शब्द सांपडतो. पण हल्लीं त्याचा उपयोग औपरोधिक करतात असें त्यांचें म्हणणें आहे.

### खुद्द बखरीची पीठिका व तिचें स्वरूप

औंध संस्थानांतील अटपाडी गांवीं एका देशपांड्यांचे घरीं एका पोत्यांत कांहीं

गळाठा भरला होता त्यांत ही एक व आणखी दुसरी विजयनगरच्या विध्वंसाबद्दलची, अशा दोन बखरी मिळाल्या.

ही बखर मोडींत असून ती ज्या कागदावर लिहिली आहे तो या कागदापेक्षां किंचित् अरुंद आहे व सुमार सहा इंच व्यासाचें तें एक भेंडोळें च आहे. अक्षर जुन्या पद्धतीचें असल्यानें 'दा', 'बा', 'हा', 'वख्त', 'लु', वगैरे शब्द व अक्षरें संदर्भानें च वाचावीं लागतात. भाषा प्रत्यक्ष दिसत च आहे.

बखरींतील मजकुराबद्दल दोन शब्द लिहिणें योग्य होईल.

अल्लाउद्दिन हसन गंगु ब्राह्मणी यास नासीर यानें आपण होऊन तख्तावर बसविलें असें इतिहासांत नमूद आहे. परंतु बखरींत तसा उल्लेख नाहीं. त्यास हत्तीनें माळ घालून मस्तकावर उचलून धरिलें असें येथें दिलें आहे.

पुढच्या मजकुरांत बऱ्याच ब्राह्मणी राजांच्या इतिहासउपलब्ध कारकीर्दींचा एकत्र समावेश केलेला दिसतो. कसें तें पहाः—

हसन हा छत्रचामर आपलेवर धरवीत असे. परंतु 'फिरोजाबाद' हें शहर फेरोजशहा यानें वसविलें व 'अमदाबाद-बेदर' हें त्याचा भाऊ अहंमदशहा, जो त्याचे मागून तख्तावर आला, त्यानें उत्तम पाण्याचा झरा पाहून वसविल्याचा इतिहासांत उल्लेख आहे. मुसलमानी साधु आणविण्याची ब्राह्मणी सुलतानांपैकीं बऱ्याच सुलतानांस आवड होती, विशेषतः बेदर वसविणाऱ्या अहंमदशहानें इराणांतील कर्मान या पवित्र स्थानाहून शहा निमत (नियामत) उल्ला या प्रख्यात साधूचा नातु व मुलगा यांस आणवून त्यांस सरदारी दिल्याचें इतिहासांत नमूद आहे. यांपैकीं कोणत्या साधूस उद्देशून हलीच्या बखरींत उल्लेख केलेला आहे हें कळत नाहीं. तथापि जेवढ्या म्हणून आख्यायिका या बखरींत दिल्या आहेत त्या सर्वांस उपलब्ध इतिहासांत पडताळा मिळतो हें खास.

येथें ज्या साबाजीपंताचा उल्लेख केलेला आहे त्याच्या चरित्राशीं बरेंच साम्य महमद गवान या प्रख्यात प्रधानाचे चरित्राचें आहे. दोघांचा हि अंत बादशहाच्या अविचारानें बहुतेक सारखा च झालेला आहे. दोघांनीं हि सारखे च शाप दिलेले आहेत व त्याचा परिणाम दोघांच्या हि म्हणण्याप्रमाणें सारखा च झालेला आहे.

## बखरः—

एक जागा जहाले तिथी वार नक्षेत्र दर × × × × मुहूर्त पाहून आपले पागेचे हातीं आणून नाहूं घालून दसत × × × × × करावी छावा सिंधारून गंधाक्षद धूप दिप करून त्याचे सोंडेवरी एक फुलाची माल × × × × पेठे·

मधी फिरविला कोण्हाच्या गळां माळ घाली त्यास पाछाहि देणें × × × मनास आणून थोर थोर वजीर × × × तम नगरातून माणूस जितके होते तितके वस्त्र भूषणें घालून तमासा पहावयास आली व गांवे गांवचे बाजे नगरचें पाहूं आले व पेठेपेठेचे सौदागर व वजीर जाथे शिलेदार व सरदार व नामोषाचें पटाईत व दांडाईत व अति सुलक्षणिक सामोद्रिकलक्षणाचे असे लोक कुशल पेरावा करून एकापुढें एक उभे राहून बाजे नगारे व खाळी नगारे वाजंत्री चार हजार व कर्णे मेळ चारशें व बाकी मेळ दोन हजार व दिंडीरमेळ दोनशें व कलवाततांफे दहा हजार व भाट × × × × व नटनाटक ऐसे आनंद गजरेसी चार पेठेंतून मिरवूं लागले लोकाचे मनची वासना कीं कोण्हावर तुष्टमान देव होई कोणाचे गळां फुलाची माल परमेश्वर घालील हें न कळे त्यामध्यें एकेकडे निराळे आहमदशहा उभा राहिला होता ऐसे आस तितकिआ लोकांतून निवडून आहमदशहाचे गळां फुलाची माल घातली सोंडेन उचलून वरते बैसविला मग तमाम लोकांनीं आश्चर्य करून मग दुंधुभी व वाजंत्री नाना वाद्याची एक घाई जहाली कीं देवलोकीं ऐसा आनंद नाहीं व इंद्रलोकीं ऐसा आनंद नाहीं नाद करून लोक थकित जहाले हे खबर पातशहास जाहीर जहाले यावरी सुलतान आहमदशहाचे गळा माल घातली मग राजीयाते बहुत कुशी बेसावयासी आरंभ करावयास धरिला मग सुलतान आहमदशहा गंगरस पंताच्या घरास पायीं चालत जाऊन त्यास नमस्कार घालून व त्याचे बायलेस नमस्कार घालून त्याचे तर्फेचे लोक इत्यादिक लोक बाजे लोक लहान थोर बरवे सीच इष्टमित्र जे कोणी होते त्यास हि नमस्कार घालून मग राजेश्री गंगरसपंताचे डोईवर छत्र धरविले पाहिजे म्हणून सुलतान आहमदशहा बोलिले त्यावरि गंगरसपंत बोलो लागला जे हे पातशाहा माझी च आहे मजवरी छत्र धरविली यास तमाम लोक फिसाद करतील व गवगवा फार होईल तुझे परमेश्वर तुज पातशाहि दिल्ही कांहीं चिंता नाहीं सुसरूप राज्य करणें म्हणून पोटेसी धरून हातधरणी चालत बाहेर बितक चालून गेले अवघे मिळून तक्तावर बैसविले छेत्र धरविले आनंद गजर केला × × × × केली धर्म हि केला वर्खे शीरपाव देनगी केली भले लोक पातशाहाजादे व हुजुरादिचेजे होते त्यास कपडे दिल्हे त्यावर आपलें नांव हासन गंगू बाभणी पातशाहि म्हणून नांव ठेवून घेतले किताबतिमधीही तमाम विलायेतीमधें लिहिणें म्हणून फरमाविले परवाणीयामध्येंहीं ऐसे च लिहिले पाहि जे × × × × नांव पहिले हासन म्हणून होते मग आहमदशहा म्हणवून पातशाहाजीनें नांव ठेविले ऐसेयासी आतां माझे बापाचें नांव गंगरसपंत आतां हासनगंगू बाहमणी पातशाही ऐसा किताब जहाला हें च नांव जागाजागा विलायेतीमधें व परवाणीमधे चालविणें मग पातषाही बेषक करूं लागला यावरी कोण्हे एके दिवशीं तमाम लोकांस तश्रीफा देऊन नवाजीस केले

व प्रजालोक यांस खुसीनें पालीग्रहण करूं लागला बरवी वर्तणूक करूं लागला ऐसे असता कोण्हे ऐके दिवशीं आपले तमाम हुकमती लोक बोलावून यांस पुसतो कीं पूर्व दिसेस किती विलायेती आहे आणि काये काये देवस्थान आहे ऐसे पहावयाची वासना आहे म्हणून स्वारी फरमाविली तमाम वजीरी दुनादीव नव सिलेदार व सरदार व वजीर व मोरीर व कारकून व जोरीक अहीर बानायीत व पटाईत मुंदेन पठाण लोक यास आपला हुजराती नेकी थालेदार ताकीद करून पाठविलें तेथ वक्ती लस्कर ताबडतोबीन तयार करून आपले थोडे हारदारी मुस्तेदर करून बाहीर निघाला तमाम लोक बाहीर जुम्मामसीदीपासी जैमा करून सिकारी खेळत खेळत भिवरे नजीक येऊन उतरले तेथें येऊन एक कोट बांधला त्या कोठाचें नांवे फिरोजाबाद म्हणून नांवे ठेविले त्या बाजद नजीक एक कोठ बांधिला त्या कोठाचें नांव कलबुर्गे म्हणून बोलताती आपले आपले महेजबामधें शहारबसनाचे म्हणून नांव ठेविलें व तेथून सिकार खेळत खेळत व निराचे कांठीं येऊन राहिले मग तेथें हि कोट बांधिला त्या कोठाचें नांवे ठिविलें कीं सिकारखाना म्हणून ठेविले मग तेथेंच मुकाम जाहले वर आणीक एके दिवसीं बेदरास स्वारी फर्माविली तेथें सिकारीबद्दल जातां जातां कुतरा एक चावर तेथें एक ससा पैदा जाला त्याने कुतरीयाचा दुमाला घेऊन कुतरा मारिला पातशहाचे नजरसी पडला यावर पातशहा बहुत हैरान जाहले दंग आपले जागा होऊन जवलिया लोकांस बोलो लागला जे हे तमासा अजब आहे कुतरीया दुमाला घेऊन ससीयानें कुतरा ( मारिला ) हे कोठें हि तमासा देखला नाही ये जागीयेचा गूण काय आहे मग जवलिया लोकांस अर्ज करूं लागला कीं हें भोये मरदानगीची आहे येसवंत हि आहे या जागीया एक कोट बांधावा ऐसे बोलतां तेथें डोंगर होता त्या जागा डोंगरातून शोध करून ससा कोठ रहातो ते पाहाऊन ते वेळेसी ससीयानें कुतरा मारिला तो जागा पाहोवून कोट बाधावयाची तजवीज केलीयावरी पुढे तमाम लस्कर पेसाहून हायरान होऊन पाणीयासाठी जेर जहाले तितकियावरि तेथें एक धनगर बकरिया चारीत होता त्यास लस्करचे लोक पुसो लागले पातशहा पाणीयामुळे × × × सा जहाला आहे पाणी कोठ आहे बहुत जेर जहाला म्हणवून बाजद होऊन पुसो लागले जे पाणी येथे मिळेल कीं न मिळे हें सांगणे—ऐसें पुसो लागले जे मग तो धनगर बोलिला जे एक कुंड आहे त्या कुंडातुन जितुके पाणी पाहिजे तितुके आणीन देणें मग तेथून पाणी आणून पातशाहाजीस पाजिले मग त्या कुंडातून घोडा व हाती व राऊत पायीकपरवार येऊन कुंड भरिले जैसेच तैसे उरले हे पातशहानें देखून बहुत आश्चर्य करून राहिले त्यांस नाव दिल्हे मग त्या धनगरास जवळ बोलावून पाने व कपडे देऊन खुशहाल करून पुसो लागले जे तुझें नांव काय आहे तूं या जागीं

२७

हात काये निमित्य राहिलास मग तो धनगर बोलिला जे माझें नांव हेमगवड हे जागा पहिले वीरसंगीया म्हणोन राज्ये करीत होता आणि परमेश्वराचा भाक्त होता आणि त्याचेंआंगीं करामत हि बहूत होती आणि धर्मपरायण गोब्राह्मण प्रतिपालक आणि हरीकथापरायणश्रवण आणि नीत्य पुराणपठण आणि सदाशिवाचें भजन ऐस ते वेळेस जहाले आतां दुसरा मुदासूद भालगीस भाल्हेराव म्हणून राज्य करीत होते आणि भास्करराव होता आणि चिंचोलीस सिदगिरी भाल्हेराव होता व कल्याणीस बेलराव होता व बीजनगरी बीजराव होता व चाळकापुरी चाळकराव होता ऐसे श्रीभक्त राज्यें करीत होते ते अवघे संपोन गेले मी एक धनगर बकरीया चारीत बैसलो आहे × × × × तुम्ही पातशाहा आहां-जे काय होते ते हकीकत साहेबाचे चरणी जाहीर केलें हे कथानक थोर आहे मी काय सांगू ऐसे बोलता पातशहाजीने बहुत खुसी होऊन त्यास कपडे देऊन पुसो लागला जे हे भोये बहूत मरदानी आहे आम्ही कोट बांधो म्हणतो तर तुझे मनास कैसे येते सागणें-मग धनगर बोलिला जे मी तुझी रयत जातीचा धनगर मज काय पुसतोस मग ते स्थानी डोंगरामध्ये राहून ते जागा कोट बांधून मग त्या त्या कोटाचे नांव हिंदू लोक बेदर म्हणून ठेविले मुसलमान शहर अहमदाबाद ऐसे बोलो लागले त्या बाजत तेथें मोकाम राहिले पातशाही करूं लागला आपलें नांव हासन गंगू बामनी पातशाहा तैसे आपले किताबतीमधे लेहून घेतलें कोट बांधिल्यावर मग दोनी तीनी थट्टराजे केले मग त्यास एक पुत्र जाहला तो पातशहाखुदायेभिस्त पावला मग त्याचा कुमठ बांधिला मग तेथे हि करामती बहुवजेनें चालविल्या मग मुसलमान अहमद सुलतान शहा ऐसे नांव ठेविले मग तो हि पादशाही करूं लागला मग उत्तरेकडून एक फकीर मरवतभशहा म्हणून खाणज्या आला त्यानें येते वेळेस मायेची रजा घेतां ते बोलो लागली जे तुला काय उणे जहाले तिकडे जाऊन दोन्ही हाती खासी ऐसे बोलता मग तो मायेची बगररजेनें पातशहाची भेट घेतली मग पातशहानें त्यास आपलेपासी ठेविले मग पातशहानें आपला हुकूमत दिधिलियानें आपले मनी बोलू लागला जे मायेनें तिकडे जाऊन दोन्ही हाती काय खासील ऐसे हिणावले म्हणून आंबोयाची जहाडे ( झाडे ) लाविली तेव्हां दक्षिण विलायेतीमध्ये प्रकट जहाले पहिले हे विलायेतींत आंबे नव्हते मग त्यानें कोटाबाहेर एक मजलस बांधायास यत्न लागला जे × × × × वयदा करून ते जागा वाहूं लागला जे ऐसी यास ते जागा पहिले बुनीयादी लोहारघर होते तो दुकान घालून आपला उदीम करीत होता मग मजालस बैसावयास तो जागा पाहून चौकसूद पाहून बुनियादी शोधिता लोहाराचें घर उठो लागले मग मत्कुमखानजादा बोलो लागला जे हा जागा काय काय केलीयास सोडणार नाही मग मत्कुमखानजादा पात-

शाहीस बोलो लागला मग पातशाहीनें त्यास बोलावून बहुत रितीने खातरजिशा करून बोलिला जे तुज जागा पाहिजे तर जागा देईन पैका पाहिजे तर पैका देईन व गांवमोकासा पाहिजे तर गांवमोकासा देईन ऐसीया कांहीं केल्या तो लोहार ऐकीनासा जहाला मग लोहार बोलो लागला जें तू मजवरी जुलूम केलीया तुझें नगर सोडोन बाहेर जाईन परंतु जागा देणार नाही जुलूम करून घेत असाल तर माझें कांहीं चालणार नाही ऐसे बोलता पादशहा बोलिला जे जुलूम जाचती आम्ही कोणावर करणार नाही मग तो जागा सोडोन मजालसी बांधिली परंतु तो जागा तैसा च राहिला मग लोहाराची पिढी दर पिढी अद्याप तेथेच नांदत आहे तो पादशहा धर्मराज करीत होता त्या बाजत पिढी दर पिढी परयंत पादशाही तेथें केली त्या बाजद सुलतान करीमुल्ला यांचें छत्र पुढे चालले मग त्याचे वेळेसी साबाजी अनंत सेकदार करीत होता तो चवसष्ठी कलाविद्याप्रविण परनारी सोदर म्हणवून त्याचे धीर गंभीर उदार गोब्राह्मणप्रतिपालक निराधिरीयासी आधार म्हणवून जाहीर जहाले त्याचे वेळेसी घोडाराउत गणती जहाली होती कीं नर्मदे-पासून दक्षिण विलायती व कृष्णा धरून व श्वेतचंद्रामेश्वरापासून व कर्नाट अच्युत राये व कृष्णराये राज्य करीत असता मग पूर्व दिसेस उडीया जगन्नाथ म्हणवून राज्य करीत होता त्याचें नाव नरपति ओढिया जगन्नाथ मग सुलतान अहमदशहा राज्य करीत होता मग त्यावरी सुलतान करीमुल्ला दवलताबादेहून पैदा जहाला ते च वेळेसी साबाजी आनंत होता त्याची कीर्ति दूरवरी विस्तारिली म्हणून ते गोष्टी ऐकून त्याचे विद्येची परीक्षा घ्यावयासाठी शहर बेदरची कलवा-तीन तेही विद्याबंद होती त्या कलवातीने आपले जमावानींसी बेदरापासी कमठा-णावरील येवून उतरली तिजपासी घोडाराऊत चार हजार पावलोक पांचशे हती सुमारे वीस उंट सुमारे शंभर व नगारे दहा भांडेदार घेऊन आली ते गोष्टी सांगता अजब तमासा ऐसीयास ते कलवातीन आपले पालखीत बैसोन खरा जंगले देखोन उतरले आणि आपली विद्या जे काय होती ते रागज्ञान करून × × × × गंधर्व गायन करू लागले मग जितकी हरणे होती तितकीं हरणे जवळ येवून उभी राहिली मग त्यांतून एक हरणाचे गळां नवरत्नाचा हार आपले गळां-तून काढून त्याच्या गळा घातला मग आपले पालखींत बैसून आपले बिन्हाडास येवून उतरले मग दुसरे रोजीं पातशहाचे सदरास येवून उभी राहिले फिरोद केली कीं तुझे भर दरबारामधे मजवरी चोर पडले माझे गळाचा नवरत्नाचा हार हे माना काय आहे हा दरबारामधे मुनेसबी नाहीं हे गोष्टी ऐकून पातशहा हैरान जहाला ते वक्ती राजेश्री साबाजी अनंतास बोलावून आणून पुसो लागला जे चोरांनीं कलावातीणीवरील घाला घालून गळयाचा नवरत्नाचा हार घेवून गेले म्हणून फिर्याद करीती हे काय माना ते मना आणून तलास करून देवणें मग राजेश्री

साबाजी आनंत आपले घरासी जावोन आपले आत्मज्ञानामधें विचार करून पाहता रांडेन तकसुची करून आली आहे हार हरणाचा गळा घालून फिर्याद आली आहे आपण एके दिवशी रागज्ञानेकरून हरण आपणापाशी आणोन तैसी च हरणें पादशहापासी नेवून उभी करविली मग पातशहान त्या कलवातणीस हुजूर बोलावून आणवून ते हरणे दाखविली पुसो लागला कीं हें मायना आहे तूं च चोर आहेस आणि हरणाचे गळां हार घालून आणि आपणावरी घाला पडला म्हणून फिर्याद जहाली मग कलवातीन पातशहासी मुजरा केला मग बोलली कीं स्या साबाजी आनंताची कीर्त बहूत दूरवर ऐकिली ऐकोन आली कीं चवसष्ट कला-पूर्ण गुणी गंभीर उदार स्यातुर ह्याची परीक्षा पहावयास आले आणि तुम्ही पात-शहा या गोष्टीची समक्ष्या पुरविली पाहिजे नाहीतरी तैसी च तुमची कीर्त अपयश घेऊन जाईल हें राजीयाची सत्व जाते आतां दुसरा मतलब आहे कीं साबाजी आनं-तासी भोग करावा असा अर्ज करून आपली विद्या संपूर्ण जे काय होती ते दाखवून पातशहास खुसी करून पातशहान सदर बकसीस करूं लागला व घोडे सीरपाऊं ऊंच कपडे चादरा नाना जिनसाची वस्त्र भूशने इनाम गाव मोकासे देत होता परंतु न घेतां बोलों लागली कांहीं मजला लागत नाहीं साबाजी अनंतास मज एक रात्रीं दिल्हा म्हणजे सर्व हि पावले यैसे यैकोन पातशाहा हैरान होऊन बोलुं लागला जे हे गोस्टी तो बहुत अजब आहे माझेन हे काम होत नाही साबाजी अनंत तो परनारी सोदर आहे यैसीयास तुझे तू च त्यास पुसने हे बोलणे यैकोन साबाजी अनंत उभा राहून पातशहाजीस अर्ज करुं लागला जे हे गोस्टीचे तिचे समाधान पुरवितो काही चिंता नाही म्हणून कलवातिणीस जाब दिल्हा जे आज सायंकाली आमचे घरासी येणे यावरि आपण घरासी जाऊन तजवीज करून सिडीचा पाये काढून ठेविला की वरी चढता पाव दूर पडिला सारिख विद्या केली आणि आपण उपर माडीवर जाऊन पलंग घालून वाट पहात बैसला घरचे लोकास ताकीद केली जे कलवात आलियावरि हे स्थळ दाखविणें यैसीयासी ते कलवातीण रात्रीप्रहरी एक जाहाल्यावरि परिमल द्रव्ये व पान गंगेरी व सुपारी कापुरी कातकेवडा वस्त्रे उंच पेराव करून साबाजी अनंताच्या घराप्रति जाण्यास तयार जाहाली सांगाते आले दूति दोनी चारी घेऊन आली मग साबाजी अनं-ताच्या घरासी लोकास पुसों लागली जे पंत कोण्या जागीयांत आहेत ते स्थल सांगणें हे गोस्टी पंतीं यैकोन तीस उत्तर दिल्हे की हे जाग्यांत बसलों आहों उपर माडीवरि येणे मी सिडी लाविली आहे ते चढोन येणे यैसीयास ते कलवातीण सिडि चढो लागली तीन पायेरिया चढली पुढें चढावयास पाव न पुरे कैसी वरि येऊं म्हणउन शोत ( ध ) करिता मग साबाजी अनंत हासोन आपण खासा येऊन हात इकडे देणें म्हणऊन तिचा

हात धरून तिची मदनाची सिरकला दाविली मग तिचा मदन पलोन लुगडियांत सलोन वीर्ये गेले वासना भोगाची राहिली मलूल होऊन शरमिंदि जाहाली ते लज्या सांगतां येत नाहीं मग काही आपले बोलणे चालणे कला कुशलता व कथा वार्ता करून रात्र क्रमिली मग नमस्कार करून तू माझा बाप मी तुझी लेक म्हणून निरोप घेऊन रात्री दोन तास असता आपले घराप्रति गेली मग प्रातःकाळीं पातशाहापासीं सलाम करून सांगों लागली जे साबाजी अनंत परनारी सोदर हे खरे च आहे चौसष्ट कला–परिपूर्ण ज्ञाता हे खरे आहे × × त्रिभुवनामधे नाही हे कोठे हि होणार नाही यैसी वाखाणू लागली यावरं मग दुसरे रोजी पातशहाचा निरोप घेऊन आपले नगरासी माघार फिरली यैसा मतलब जाहाला येस्तर आतां दुसरें पुढे काय अरिष्ट होईल ते पाहाणे

जे हे बोलणे जाहाले ते पातशाहाचे राणीवसात जाहीर जाहाले जे साबाजी अनंत दिव्य पुरुष अति सुलक्षणिक विद्यापूर्ण गुणगंभीर उदार चतुर त्याचे भेटीस कलवातीण त्यास भोगावयास आली होती म्हणऊन कळले त्यावरी पातशहाची बाईल मनामधे विकार धरून कुबुद्धि धरून ते आता पुढे शाहाणपण धरून कोण्हे येके दिवसी मेल्न करून आपले घरापासून साबाजीपंताच्या घरापावेतो साबाजी अनंताच्या निजल्या घरच्या पलंगा पावेतों खाणून सुरुंग केला हे चरित्र स्त्रीचे चरित्र कलेना जे देवा अगोचरि त्यापून अधिक केलें ते तुम्ही पाहणे येक पाहून येक दिवस बरवा मुहूर्त वेळ मरवांपाहून ते दिवसी रात्री मधानी आपले महालांतून उठोन साबाजी पंताच्या पलंगापासी येकायेकी जाऊन उभी राहिली मग पंताचे पायावरि डोई ठेऊन पंतासी उठविती जाहाली मग पंत घाबिरे होऊन उठून ×× की पातशाहाची राणी आहे हे कयसी ( कैसी ) आली हे काये आश्चिर्य आहे म्हणऊन आपले जागा घाबिरा होऊन दंग जाहाला आपले टायी तजवीज करू लागला जे की आपले अस्ती आज येथून आमची हयात खुंटली यैसे भविश्य केले मग पातशहाची राणीस बोलला जे तू माझी माता मी तुझा बेटा आहे हे गोस्टी बरवी नव्हे × मध्ये घर बुडवायासी काये निमित्ते आलीस बर आता जे वाटेने जैसी आलीस तैसी जाणे म्हणऊन निरोप दिल्हा ते बायको आपले माहालासी जाते जाहाली मग राजेश्री पंत बहुत दिलगीर होऊन निजल्यावरि मग पातशहाची राणी कपाळावरि झुंठ घालून निजली दुसरे रोजी पातशहा तिचे महालासी आलेयावरि पाहता राणी निजली आहे यैसियास पुसता बोलली तुझ दादुलपणे × × तूं सिरावरि असता मजवरि हे × × × तुझा कारकून साबाजी अनंत याने सुरुंग करून माझे महालासी येऊन मज झोंबला आहे हे लटके म्हणाल तर सुरंग दाखविला मग पातशहा बहुत हैराण होऊन क्रोधसंतप्त जाहला मग पातशहानें ते च वक्ती साबाजी पंतास बोलाऊन आणून पुसन येतां येकायेकी

हातीच्या पायाखाले घालून मारिले येसा आहवाल जाहला मग साबाजीपंती मरते वेळी श्राप दिल्हा की तुझे भाग्य सर्व हि जाईल असा बोलिला मग प्राण सोडिला रांडेचे बोले मारिलें मग त्याचे बारा तेरा दिवस जाहले क्रिया कर्म जाहले मग परस्परे खबर औकिली कीं नाहक बायकोन तुफान घेतले साबाजी अनंताचा गुन्हा काही नाहीं मग बायकोस मारिले मग पातशाहास ब्राह्मणहत्या लागली त्या दोषे करून पातशहा दिवाना जाहला त्याची गोहि कोणी हि मानीना सारिखे जाहाली मग थोर थोर वजीर च्यार चहुकडे विघडोन गेले भो (का) सी लोक होते ते हि निघोन गेले व कारकून हि निघून गेले धामधुम हि राजकारणे मांडिले जवळ सलगी नाती नाहिसी जाहाली शहर बेदरी मलिक अंबरी सरफदारी करीत होता तो च पातशाही करू लागला येसी आहाकिनी जाहाली ते च वक्ती पातशाहास जेर वक्त आलियावरि मग आपले छेत्र (हरीबास?) देऊन आपण खुदाये भिस्त पावला इंदलशाहा पन्नालजी होता व निजामशहाचे हवाला सिकारी कुर (?) होती व मलिक अंबरियाचे हवाला खिजमत होती ते च पातशाहास × × × वरी पारखे जाहाले आपले जागा पातशाही करूं लागले तधीपासून सुलतानाची पातशाही बुडोन गेली असे आमल जाहाले ते टाउक होय ते हकीकत जाहीर जालिया वजद बरहुकूम मालूम नाहीं आऊर हकीकत कमजास्त असलिया चार वजीर चहुकडे नामजाद केले होते ते च ते च विज्यापुराकडे विदुलशाहा होता व दौलताबादेस निजामशाहा होता येसे वजीर तिकडील तिकडे च राहिले ते च जागा पारखे करून विलायेति बाधुन बलकाविली आपण च खावंद जाहाले बरिदाची पातशाही तधीपासून जाहाली व मलिक बेदरी त्यास पातशहानें आपला जीव दिल्हा तो शहर बेदरी पातशाही करूं लागला येसा अहावाल जाहला तो बंदगीस रोशन होय हे अर्ज साहेबाचे मामापासी जाहीर केला छ ४ माहे जमादिलावल किलक नाम संवत्छरे मार्गेश्वर मासे सुध चवथी आदितवारी समाप्त लिहिते माहादाजी जयेवंत राऊ देसपांडे प्रा अटपाडी याचे असे हे खबर

## ६० दोन यादी

(रा. गो. का. चांदोरकर)

'श्री समर्थ व छत्रपति शिवाजी महाराज' यांचे संबंधीं शिवकालीन अस्सल अशीं कित्येक पत्रें ईशकृपेनें मला मिळालीं; त्यांत च कांहीं अवांतर जुनी पत्रें, या

वगैरे होत्या—त्यांतील या दोन यादी आहेत. हा संग्रह अत्यन्त महत्वाचा आहे व यथाकाली महाराष्ट्रास त्याचा लाभ होईल च.

या यादी रावबाजी ( २ रे ) यांच्या हयातींत लिहिलेल्या आहेत हें उघड आहे. यांचें महत्व इतकें च कीं, ज्या कांहीं गोष्टी अमुक शकांत घडून आल्या अशाबद्दल तज्ज्ञांचें मत ठाम झालें आहे त्या च गोष्टी त्या च शकांत घडलेल्या नसून त्यांत किंचित् फरक आहे असें या यादींत दिलेल्या शकांवरून दिसून येईल. बाजीरावसाहेबांच्या कारकीर्दींत लिहिले गेलेल्या यादींत दिलेले शक विचारार्ह नाहींत असें कोण म्हणेल ? उदाहरणार्थः—

पेशव्यांचे शकावलीचे ३७ वे पानावर श्रीमंत बाळाजी विश्वनाथांचा निधन-काल शक १६४२ शार्वरी संवत्सर चैत्र शुा ६ शनिवार दिलेला आहे. या यादींत तो निराळा च दिलेला आहे.

प्रतिनिधिपदाची ' घालमेल ' म्हणून म्हटलें आहे तें यथार्थ आहे निशकावली-वरून ' श्रीपतराव व श्रीनिवासराव ' ( पान ३५ ) यासंबंधीं जो उल्लेख आहे त्यांत व हल्लींचे यादींत कांहीं तरी घालमेल आहे खास. असो.

## अ

### राजेश्री पंत प्रधान व पंत प्रतिनिधि पदाची घालमेल
### पूर्वीं पासून ई॥ ता॥ विभवनाम सवत्सरी
### शके १७३० पे॥

### यादी

सिवाजी महाराज याणीं राज्य आ-क्रमण करण्यात प्रथम सामराजपंत राझे यांस पेशवाई पद दिल्हे शके

नंतर मोरो त्रिमल पुरंदरी राहणार कीला घेतला माहाराजा कडे आले कर्ते जाणून मोरोपंतास पेशवाई दिल्ही शके १५८४ चैत्र वा। १० ईा ता। शके १५९६ राज्याभिषेक जाला पुर्वी पद त्याणी केले राज्याभिषेकासमई त्यांस च प्रधानपद दिल्हे त्या दिवसापासून मोरो-पंत प्रधान वहिवाट जाली होती

प्रतिनिधीपद शिवाजी माहाराज व संभाजी राजयाचे कारकीर्दीस नव्हतें राजाराम साहेब चंदीस गेले तेथे प्रल्हाद निराजी मोठे पराक्रमी होते त्याजवरी कृपा राजश्रींचीं होती राज्याचे उपयोगी पडले जाणून आपली प्रत्यन्मा (प्रतिमा ?) म्हणोन प्रतिनिधिपद नवे च करून चंदीस राज्याभिषेक शके १९ अंगिरा संवत्सरी सांगितले तेथें पद केले × × शके १६१४

चंदीहून राजाराम साहेब देशी आले

शीवाजी महाराज वारल्यावरि राजाराम साहेब याचे राजकारण जाले संभाजी माहाराज पनाळ्याहून रायगडास आले तेव्हां कैद करून बेडि घातली घर लुटले मोरोपंताचे पद बहिरोपंत उधो योगदेव याजला सांगितले सिका त्याचा चालला संभाजी राजे यास राज्याभिषेक जाला तेव्हां बेडी तोडली मोरोपंत घरीच होते

नंतर शके १६०३ दुर्मति नाम संवत्सरी वारले याजवरा नीलकंठ मोरेश्वर यास पेशवाई प्रधानपद दिल्हे

नीलकंठ मोरेश्वर यांणी संभाजी राजे याची कारकीर्द शके १६१० विभवनाम संवत्सरपर्यंत प्रधानपदाची वहिवाट केली

राजाराम सा॥ याजसमागमे चंदीस गेले त्यापासून सीवाजी राजे आईसा॥ याची कारकीर्द शके १६३० पर्यंत केली शके १६३१ नीलोपंत वारले पोटी पुत्र नाहीं तेव्हा बहिरो मोरेश्वर भाऊ यास प्रधानपद दिल्हे

बहिरोपंत याणी शाहुमहाराज याची कारकीर्दपर्यंत प्रधानपद केले पुढे नाकर्ते जाणोन बालाजी विश्वनाथ १६३५ यास विजयनाम संवत्सरे आशाढ शुा ५ कारकीर्द शाहुमहाराज प्रधानपद केले

बाळाजी विश्वनाथ याचा काल शके १६४१ विकारी नाम संवत्सरे जाला आबाजीपंत पुरंधरे यास दिवाणगिरी दिल्ही होती तेच कारभारी

बाजीराव बल्लाल प्रधान जाले हा प्रल्हाद निराजी वारले तेव्हां रघुनाथ हणमंत यास प्रतिनिधी पद सांगितलें त्यांणी साहा महिने केले

मजमुपद पूर्वीपासोन हणमंते याचे राज्याभिषेक समई निलो सोनदेव (याचे पुत्र रामचंद्र ) यास शिवाजी माहाराजानी सांगितली होती हणमंते चंदी प्रांती राज्य संरक्षणार्थ होते शीवाजी राजे यांचे कारकीर्दीत देशी येऊन आड घातली तेव्हां रामचंद्रपंताकडून मजमुकाढून हणमंत यास सांगितली चंदीस गेले तेव्हां निलोपंत त्याचे पुत्र रामचंद्रपंत त्यांची हि भीड तेव्हां प्रतिनिधी पद ( तिमाजीपं ) तास सांगितले राजाराम साहेब आखेर कारकीर्द पर्यंत त्यांणी च प्रतिनिधिपद केले मुजमु रामचंद्रपंत यास सांगितली

राजाराम साहेब वारल्यावरि त्याची स्त्री आईसाहेब शिवाजी राजे त्याचे पुत्र त्यास घेऊन राज्य करु लागली रामचंद्रपंत कुल कुला कारभारी परशराम त्रिंबक मुजमूकडील लिहिणार | त्यामुळें आगत्य × × × × × × केला × × × कारकीर्दीस उपयोगी पडिले जाणोन × × × ब वारल्यावरि हणमंते याजकडील प्रतिनिधि × × × × × × शक ( २० ) वृष संवत्सरी परशराम त्रिंबक यास प्रतिनिधी दिल्ही आईसाहेबाची कारकीर्दीस केली

शाहूराजे देशी आले राज्य सर्व आई-

ता। १६६२ रौद्रनाम जेष्ट वा। १३ नर्मदा तीरी वारले

( बालाजी बाजी ) राव × ×× री यास सातारियास आले शके मजकुरी श्रावण मासी प्रधानपद सांगितले कारकीर्द शाहुमहाराज १६७७ शुक्ल पर्यंत ——————मु॥ माहादाजी आंबाजी

बालाजी बाजीराव याणी इा शाहूराजे ता। राजाराम सा॥ याची कारकीर्द शके १६८२ विक्रमनाम जेष्ठ शु॥ ६ वारले पुण्यास कारकीर्द राजाराम साहेब

शके १६८२ विक्रमनाम संवत्सरे आशाढ शु॥ ६ सातारियास येऊन माधवराव बल्लाल याणी राजाराम साहेब याजवलून प्रधानपदाचीं वस्त्रे घेतलीं दिवाणगिरी नीलकंठ महादेव यास दिल्ही

माधवराव प्रधान याचा काल शके १६९४ कार्तिक वद्य ८ बुधवारी थेऊरचे मु॥ जाला स्त्रीनी सहगमन केले संतति नाही नकल जाले नंदननाम संवत्सर

शके १६९४ मार्गसीर्ष ——— वस्त्रे नारायणराव सातारियास येऊन वस्त्रे घेतली कारकीर्द राजाराम साहेब × × × × ×

नारायणराव यास गारदी यानी दगा करून मारले शके १६९५ विजयनाम भाद्रपद शु॥ ७ बुधवार ( येथें जरा खाडाखोड आहे ) पुण्याचे वाड्यांत मारिले पोटी संतान नाही स्त्री गरोदर होती

शके १६९५ विजयनाम संवत्सरे नारायणराव वारल्यावरी रघुनाथ बाजीराव यास प्रधानपदाची वस्त्रे जाली साहेबी आक्रमीले यास देऊं नये इत्यादि बोलत आणि महाराज दैववान् रंगण्यास आले तमाम सरदार व सरकारकून येऊन भेटले परशरामपंत आईसाहेब यांचे वाढविले ते तेच लक्ष धरून चालू ला ( ? ) गेले जाणोन प्रतिनिधीपद गदाधर प्रल्हाद यास सांगितले शके—

नंतर परशरामपंत माहाराजाकडे येऊन माहाराजाची कृपा संपादून गदाधर प्रल्हाद याजकडील प्रतिनिधि काढून परशरामपंत पुन्हा यास सांगितली करू लागले शके—

परशरामपंत मरत तोपर्यंत त्याणी च केली

परशरामपंत मेल्यावरि त्याचे पुत्र श्रीपतराव यास पद सांगितले श्रीपतराव वारले त्यास पुत्र नाहींत तेव्हां त्याचे धाकटे बंधु जगजीवन परशराम होते त्यास प्रतिनिधि सांगितली शके

शाहुराजे यांचे समाप्तीपर्यंत त्याणी च केली शाहूराजे वारल्यावरि राजाराम साहेब दत्तक राज्यावरि बसविल्यावरि परशराम त्रिंबक याचे नातू त्याचे पुत्र विश ×.×× होता त्यास आणून राजाराम साहेब यास राज्याभिषेक केला ते समई श्रीनिवास गंगाधर यास सांगितली श्रीपतराव यास पुत्र नाही त्याणी त्यासमई वडिल भाऊ कृष्णाजी पंत याचा पुत्र घ्यावा म्हणोन गंगाधर

शके १६९५ आश्वीन ————— रघुनाथराव प्रधान कारकीर्द राजाराम साहेब स्वारी बेदरची केली

नारायणराव याची स्त्री सखाराम-पंती व बालाजी जनार्दन यांणी किले पुरंदरी ठेविली शके १६९६ अधिक वैशाख शुा ७ चा जन्म जाला माधवराव नाव ठेविले माधवराव निलकंठ पाठऊन वस्त्रे प्रधानपदाची नेली बारा दिवस जाल्यावर घेतली कारकीर्द राजाराम साहेब अधिक वैशाख वा ४ स वस्त्रे माधवराव नारायण प्रधानपद प्राप्त जाले जयनाम संवत्सरे

माधवराव नारायण शके १७१७ राक्षसनाम संवत्सरे आश्विन शुा १५ माडीवरून उडी टाकून वारले कारकीर्द शाहू राजे

बालाजी जनार्दन फडणीस यांणी माधवराव याचे नावे काम चालविले ता ता फाल्गुन शुा ३० पावेतो

बाजीराव रघुनाथ सिंदे यांणी आणिल्यावरून वाईस निघोन आले नंतर सातारी राहून परशराम रामचंद्र ×××× विला १७१७

शके १७१८ नल वैशाख बाजीराव व चिमाजी अप्पा यास किले शिवनेरीहून आणिले वैशाख ( फाटलें आहे ) बाजीराव यास दौलतराव सिंदे याचे लस्करांत ठेऊन घेतले चिमाजी अप्पास परशराम रामचंद्र याणी पुण्यास ठेऊन पंत यास आणिले होते यास्तव प्रतिनिधि श्रीनिवास गंगाधर यास सांगितली

श्रीनिवास गंगाधर याचे ××× चे विरुद्ध × × म्हणोन ×× श्रीनिवासपंताकडील पद काढून कारकीर्द राजाराम साहेब याणी शके ——— कृष्णाजीपंताचे कनिष्ठ पुत्र त्रिंबकपंत याचे पुत्र भगवंत पंत यास प्रतिनिधी सांगितली त्याणी केली वर्षे

पुन्हा प्रतिनिधिपद श्रीनिवास गंगाधर यासच करार कारकीर्द राजाराम साहेबी सांगितले ते राजाराम साहेब ××× त्याणींच केले ×× ×× राजगडावरी असता रघुनाथ बाजीराव सातारियास येऊन नारो शंकर राजे बाहाद्दर पंत प्रधान याचे वाढविले त्याचे पदरचे त्यास सांगितली शके—

येक वर्ष केली नंतर श्रीनिवास गंगाधरास सांगितली

राजारामसाहेब वारल्यावरि त्याचे पूर्वीच साहा महिने श्रीनिवासपंत वारले त्यांचे पुत्र परशरामपंत यास प्रतिनिधिपद सांगितले शके—

राजारामसाहेब यास पुत्र नाही तेव्हां दत्तक पुत्र घेऊन राज्यास शाहु-राजे यास राज्याभिषेक केला त्याचे कारकीर्द परशराम श्रीनिवास यांसच सांगितली शके——

माधवराव नारायण याचे स्त्रीस दत्तक मांडीवर बसऊन दत्तप्रदान केले चिमणाजी माधव असे वैशाख वा ३ वस्त्रे वाड्यांत घेतली नानाफडनसि माहाडास निघोन गेले

आश्विन वा १२ चीमाजी आप्पास घेऊन परशराम रामचंद्र जुनरास घेऊन गेले मार्गशीर्ष शुा १५ पो सिका चिमाजी अप्पाचा चालला १७१८

बाजीराव रघुनाथ यास वस्त्रे आणवून चिमाजी आप्पास व परशरामभाऊस धरून आणिले मार्गशीर्षमासी शके १७१८ आचासेळू कर व परशरामपंत परलीकर निा पेठे यास पाठऊन वस्त्रे आणिली श्रीमंत राजश्री शाहू महाराज यांणी रूपायुक्त होऊन दिल्हीती मार्गशीर्ष शुा ५ हडपसर नजीक लस्कर होते तेथें तेरा घटका रात्रीस समारंभ करून घेतली बाजीराव रघुनाथ प्रधान

शके १७२४ दुंदुभी नाम संवत्सरे कार्तिकमासी यशवंतराव होलकर यांणी पुण्यास गर्दी करून बाजीराव दहशतीनें माहाडास इग्रेज प्रगणे ! कडे गेले वसई इत्यादि त्या संधीत अमृतराव रघुनाथ याचे पुत्र यांस वस्त्रे देऊन दत्तक देण्याचा निश्चय करून चिंचकराव पेठे यास पा सातारियाहून विनायक माधवराव म्हणून आणविली वस्त्रे दिल्हीं माहीत येशवंतराव यांनीं आपणाजवळ मधी घरकलह वाढला सबब पंतप्रधानं यांणी नेऊन पुण्यास ठेविलें नवे × × राजे झाले शके १७३० प्रतिनिधीपदाची घालमेल जाली नाहीं पुण्यास पंतप्रधान यांचे कैदेंत आहेत

ठेविली आमृतराव काशीस गेलेत तेथें-च आहेत.

वसईहून बाजीराव इंग्रेजास घेऊन पुण्यास आले शके १७२५ रुधिरोद्गारी संवत्सर ते च (!) राज्य करीत आ-हेत कारकीर्द शाहू राजे शके १७३० विभवनाम संवत्सरे वैशाख वा ७ स राज्याभिषेक प्रतापजी राजे यांस जाला बाजीराई आवडीनें नांव शाहूराजे ठेविले

त्रिंबकजी डेंगले याणी विधि केला वस्त्रें प्रधानपदाची बाजीरायानी वाईस घेतली बाजीराव रघुनाथ प्रधान प्रस्तुत आहेत

## वं

(मोडी) करवीराकडील वौषावली

## यादी

श्रीमन्महाराज राजाराम महाराज छेत्रपति याचे पुत्र श्रीमन्महाराज शीवाजी महाराज छेत्रपति श्रीमन्महाराज ताराबाई आईसाहेब याचे चेरंजीव शके १६२३ वृशा नाम सवत्सरे सुहुर सन इसने मया व अलफ राजशक २८ त्या साली सिव्हा-सनारूढ जाहाले राजे केले साल ११ शके १६३३ खर नाम सवत्सरे सुा ईसने अशर मया व अलफ पर्यंत राजे केले

श्रीमन्महाराज संभाजी महाराज छेत्रपति सींव्हासनारूढ जाहाले शके १६३४ नदन नाम सवत्सरे सुा सलास आशर मया व आलफ पुत्र राजाराम महाराज छेत्रपति याचे श्रीमन्महाराज राजसबाई साहेब याचे चेरजीव सभाजी महाराज छत्रपति याही राज्ये केले साल ४८ राजशक ३९ प्रारंभ.

श्रीमन्महाराज सभाजी महाराज छेत्रपति याच्या जनानखानेचे वाडियाची मावानिसी

१ सोभाग्यवति उमाबाईसाहेब वाडा २
२ सो। जिजाबाईसाहेब वाडा ३ तोरगळीं सिंदे यांची कन्या
३ सो। दुर्गाबाईसाहेब वाडा ६
४ सो। आनंदीबाईसाहेब वाडा १
५ सो। सुंदराबाईसाहेब वाडा ४
६ सो। कुवारआईसाहेब वाडा ५
७ सो। कुसाबाईसाहेब वाडा ७

शके १६८२ विक्रम नाम सवत्सरे सुा इहिद्दे सितेन मया व अलफ साली सभाजी महाराज छेत्रपति याही कैलासवास केला मार्गशीर्ष शुध्ध १२ द्वादसीचे दिवसी राजसेक ८७ विक्रमनाम सवत्सरे

श्रीमन्महाराज राजश्री शीव छेत्रपति सीव्हासनारूढ जाहाले आश्वीन शुध्ध विजेया दशमी राज ( रोज ) इदुवासर आकरावे तासी वास्तव्य कीले पनाळा छ ९ माहे रबिलावल सुा सलास सितेन मया व अलफ शके १६८४ चित्रभानु नाम सवत्सरे राजशक ८९ आगोधर शुा ५ पचेमीस दत्तविधान होऊन ज्यातकर्म नामकर्ण केले राजश्री शाहाजी भोसले खानवटकर याचे पुत्र श्रीमन्महाराज मातोश्री जिजाआईसाहेब याही वट्यात घेतले.

श्रीन्महाराज राजश्री शीवछेत्रपतिमहाराज याचे जनानखानेचे वाडियाची नावनिसी बिा

१ सो। सईबाईसाहेब तुळजोजिराव घाडगे सज्याराव कागलकर याची कन्या

२ सो। चिमाबाईसाहेब राजेश्री सिंदे चावरकर याची कन्या

३ अर्कवृक्ष

४ सो। सकवारबाईसाहेब लक्षुमणराव सिंदे सेनाखासकील तोरगलकर याची कन्या

५ सो। उमाबाईसाहेब मुकुंदराव पवार देसाई जांबोटकर याची कन्या

६ सो। सुंदराबाईसाहेब रत्नोजीराव खानवलकर याची कन्या त्याचे पोटी कन्या व चिरजीव श्रीमन्महाराज राजश्री राजे समाजी महाराज छेत्रपति

१ सो। आउबाईसाहेब घाटगे राजेश्री यशवंतराउ घाटगे सर्जेराव कागलकर यासी दिल्ही आसेत

१ चिरजीव बाळाबाई निंबाळकर सुलतानं रावजी निंबाळकर सर्डेकर यास दिल्ही होती परतु राव मशारनिल्हे याचा काल जाहाला

१ सौ बाज्याबाई घाटगे बाजी राजेश्री नारायणराव घाटगे बाजी नागपूरकर यास दिल्ही आहेत

१ सौ येसूबाई निंबाळकर राजेश्री सिदोजीराव नाईक निंबाळकर निपाणकर यास दिल्ही होती त्याचा काल जाहाला

१ सौ चिमाबाई पाटणकर राजश्री नागोजीराव यास दिल्ही आसेत

१ श्रीमन्महाराज राजश्री राजे संभाजी माहाराज छेत्रपति पुत्ररत्न याचा जेन्म शके १७२२ रौद्रनाम सवत्सरे वास्तव्य करवीर फाल्गुण वद्य ८ आष्टमी मंदवासरे संध्याकालचे प्रहर दिवसास जन्म जाहाला सुा इसन्ने मया तेन व अलफ राजशक १२७

१ सौ आकूबाईसिंदे राजश्री शंकरराव सिंदे सेनाखासकील तोरगलकर याचे चेरजीवास दिल्ही आसेत

७ सौ आहिल्याबाईसाहेब राणोजी राव घाटगे सर्जेराव कागलकर याची कन्या

८ सौ आनंदीबाईसाहेब जानराव पाटणकर याची कन्या

९ सौ मैनाबाईसाहेब लक्षुमणराव सिंदे सेनाखासकील तोरगल याची कन्या

१० सौ गंगाबाईसाहेब अथणीकर देसाई पवार याची कन्या

११ सौ दयाबाईसाहेब सयाजी घाटगे मुरगुडकर याची कन्या

१२ सौ सकवारबाईसाहेब खंडेराव सिंदे केऊलकर याची कन्या

१३ सौ आनंदीबाईसाहेब धोंडजीराव पाटणकर याची कन्या

१४ सौ कमळजाबाईसाहेब शिवाजी नाईक निंबाळकर वैरागकर याची कन्या त्याचे पोटी पुत्ररत्न श्रीमन्महाराज राजश्री शहाजी महाराज छेत्रपति याचा जन्म छ १ माहे शौवाल सुा समस मया तैन व आलफ पौष्य शुा ३ त्रितीया गुरुवासर सूर्योदय प्रातःकाली जेन्म जाहाला शके १७२५ रुक्ताक्षी नाम सवत्सरे वास्तव्य करवीर राजशक १३१

श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छेत्रपति याच्या जनानखान्याचे वाडियाची नावनिसी

१ सौ सईबाईसाहेब राजेश्री त्रिंबकराव खानवलकर याची कन्या लग्न जालियावर काल जाहला असे

१ सौ जिजाबाई सौ धारराव निंबालकर गजेंद्रगडकर याची कन्या सौ जिजाबाई साहेब

१ अर्कवृक्ष

४ सौ सईबाईसाहेब राजेश्री नारायणराव शिरके याची कन्या सौ सईबाई सौ

५ ———————————

श्रीमन्महाराज राजश्री शाहाजी महाराज छेत्रपति याचे जनानखानचे वाडियाची नावनिसी

१ सौ आंबिकाबाईसाहेब राजश्री आप्पाजीराव नाईक निंबाळकर वाठारकर याची कन्या

२ ———————————

## दुसरी बाजू

श्रीमन्महाराज शीव छेत्रपति याही कैलासवास केला चैत्र वद्य ८ अष्टमी रोज भृगुवासर सायकालचे तीन घटका दिवसास शके १७३४ आंगिरा नाम संवत्सरे सुा सलास आशर मया तैन व आलफ छ २१ माहे रबिलाखर राजशक १३९ राजे केले साले ५१ वय साले ५९ श्रीमन्महाराज याही करवीरी कैलासवास केला

संभाजी राजे करवीरकर याचा काल शके १७४३ आषाढ वद्य ३ सोमवार शाहाजी बाजी मोहिते तलबीडकर याचा मरलीगाव समधे सरकारात जप्ती केली सबब दगा करून बाजी याचे लेकानी ६० पाने पिस्तुल चालविले त्या योगे करून काल जाहाला त्या काली ठार जाले भुजंगराव भोसले व शाहाजी भोसले येक नाइकवाडी रजपुताचा जमादार परदेसी या प्रो वाड्यातील आंबाबाईचे पुढील सोप्यांत खटला होऊन मृत्य पावले सुा इसने अशरीन मया तेन व अलफ राज्य केले वर्षे १० वय वर्षे २१

# ६१ मोरोपंतांची भगवद्गीता

( रा. शिवराम महादेव परांजपे )

ज्ञानेश्वर, वामन, दासोपंत वगैरे इतर मराठी कवींप्रमाणें मोरोपंतांनीं हि श्रीमद्भगवद्गीतेचें मराठीमध्यें रूपांतर केलेलें आहे. तें आर्यावृत्तांत असून त्या आर्या महाराष्ट्रवाङ्मयामध्यें सुप्रसिद्ध आहेत. मोरोपंतांच्या काव्यरचनेचें सूक्ष्मदृष्ट्या निरीक्षण करीत असतां या भगवद्गीतेवरील आर्या मोरोपंतांनीं केव्हां रचिल्या असाव्या, असा एक प्रश्न उत्पन्न होतो. मूळ संस्कृतमधील श्रीमद्भगवद्गीता ही ज्या महाभारतांतर्गत भीष्मपर्वामध्यें आलेली आहे, त्या समग्र महाभारतावर मोरोपंतांनीं आर्या रचिलेल्या आहेत. तेव्हां त्या महाभारतावरील आर्या पर्वानुक्रमानें लिहितां लिहितां जेव्हां भीष्मपर्वांतील युद्धाच्या प्रारंभाचा प्रसंग प्राप्त झाला, तेव्हां त्या च प्रसंगीं भगवद्गीतेच्या संस्कृत श्लोकांवरून मोरोपंतांनीं आपल्या प्राकृत आर्या लिहिल्या असल्या पाहिजेत, असा स्वाभाविकपणें कोणाचा हि ग्रह होतो परंतु जो अशा आशेनें मोरोपंतांच्या आर्याभारतांतील भीष्मपर्व धुंडाळण्याला जातो, त्याची ती आशा तेथें तृप्त होत नाहीं. भगवद्गीतेच्या प्रसंगासंबंधानें मोरोपंतांच्या आर्याभारतामध्यें फक्त एक च काय ती आर्या सांपडते. ती अशी:—

युद्धारंभीं भीष्मद्रोणप्रमुखाखिलाप्तवधभीता ।
शक्रसुता त्रिजगद्गुरु कृष्णें उपदेशिली स्वयें गीता ॥

यावरून आर्याभारताच्या रचनेच्या प्रसंगामध्यें मोरोपंतांनीं भगवद्गीतेचे श्लोक गाळले, हें उघड होतें.

व्यासकृत महाभारत लक्ष ग्रंथ प्रसिद्ध हा भारी ।
आर्यावृत्तें रचितों स्वल्पांतचि आणितों कथा सारी ॥

या आदिपर्वांतील उपोद्घातात्मक आर्येंत सांगितल्याप्रमाणें महाभारताची विस्तीर्ण कथा प्राकृतांत थोडक्यांत आणावयाची, हें मोरोपंतांचें एक धोरण होतें; व त्या धोरणानें त्यांनीं मूळ महाभारतांतील विषयांचा संक्षेप केला आहे. त्यांपैकीं च हें एक स्थळ असलें पाहिजे, असें दिसतें.

परंतु महाभारतांतील इतर कोणते हि विषय मोरोपंतांनीं गाळले असले, तरी भगवद्गीता हा विषय कांहीं अशा रीतीनें गाळण्यासारखा नाहीं, इतकें त्याचें महत्व आहे. असें असून हि भगवद्गीता पंतांच्या आर्याभारतामध्यें अजीबात कां दिसत नाहीं व त्याचीं कारणें काय आहेत, याच्याबद्दलचा विचार आपण पुढें करूं.

असो. येथपर्यंतच्या विवेचनावरून आर्याभारतांतील भीष्मपर्व मोरोपंतांनीं लिहिलें, तेव्हां गीतेवरील आर्या त्यांनीं लिहिल्या नाहींत, असें म्हणणें प्राप्त होतें. तर मग त्या भीष्मपर्वाच्या आधीं लिहिल्या असल्या पाहिजेत, किंवा नंतर तरी लिहिल्या असल्या पाहिजेत. परंतु त्या बहुधा नंतर लिहिलेल्या नसाव्या, असें पुढील गोष्टीवरून दिसतें.

मोरोपंतांनीं विठोबादादा चातुर्मास्ये यांना लिहिलेलें एक पत्र येणेंप्रमाणें आहेः

" श्रीमद्भगवद्भक्तशिरोमणी राजश्री विठोबादादा तथा बाळकृष्णबावा स्वामीचे सेवेसि

विद्यार्थी मयूर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल श्रावण वद्य १० यथास्थित जाणोन स्वकीय लिहित असावें आपण लीलाधरबावांबरोबर पाठविलें पत्र पुस्तक पावलें आपणांस दशमपूर्वार्ध गीतार्या पाठविल्या आहेत भक्तिचंद्रिका पुस्तक श्रीमत्सकलवेदशास्त्रसंपन्न रा. बाबा उपाध्याय यांस पावतें करावें श्रीद्रोणपर्व जयद्रथवधान्त जालें रात्रियुद्धाचा आरंभ आहे आपल्या पुण्याशीर्वादें सिद्धीस गेल्यावर आधीं आपणाकडे च पाठवीन श्रीमुक्तामाला तेथें बावांजवळ असेल केवळ गीर्वाण भाषा च आहे बहुत काय लिहूं कृपा करावी हे विनंति "

या पत्रामधील 'दशमपूर्वार्ध गीतार्या पाठविल्या आहेत' या वाक्यांतील गीतार्या म्हणजे भगवद्गीतेवरील आर्या च जर असतील, ( आणि त्या भगवद्गीतेवरील च आर्या असल्या पाहिजेत. कारण जरी आज गीतेची पंतलिखित प्रत उपलब्ध नाहीं व चातुर्मास्यांच्या दप्तरांत हि गीतार्यांची प्रत मिळत नाहीं, तरी कोल्हापूरचे दाजीबा पुजारी यांची जी एक प्रत उपलब्ध आहे त्या प्रतींत पहिले मळपृष्ठावर " अथ श्रीभगवद्गीतार्याप्रारंभो विजयतेतराम् " असें असून शेवटीं " इतिश्रीगीतार्या संपूर्णा " असें आहे. तेव्हां गीतार्या म्हणजे गीतेवरील आर्या च असल्या पाहिजेत, असें या पोथीवरून हि दिसतें ) तर हें पत्र लिहिण्याच्या पूर्वीं गीतेवरील आर्या रचून झालेल्या असल्या पाहिजेत हें खास. परंतु या पत्राला संपूर्ण मिति नाहीं; फक्त ' श्रावण वद्य दशमी ' एवढा च उल्लेख आहे परंतु असें जरी आहे. तरी या पत्राची मिति ठरविण्याला कांहीं मार्ग आहे. तो असाः—ज्या एका पत्राची संपूर्ण मिति शके १७०३ आषाढ वद्य ९ रविवासर ही च असली पाहिजे असें निश्चयात्मक रीतीनें ठरूं शकतें, त्या पत्रामध्यें द्रोणपर्व सगळें समाप्त झाल्याचा व त्याच्या पुढील हि शांतिपर्वापर्यंतचीं पर्वें रचून झाल्याचा उल्लेख आहे. तेव्हां शके १७०३ च्या आषाढ वद्यांत जर द्रोणपर्व पुरें होऊन शांतिपर्वापर्यंत मजल गेली असेल, तर द्रोणपर्व जयद्रथवधापर्यंत अर्धवट रचून झाल्याचा उल्लेख ज्या

२९

श्रावण वद्य दशमीच्या पत्रामध्यें आहे, तें–म्हणजे वर दिलेलें पत्र–अंदाजानें शके १७००।१७०१ च्या श्रावण वद्यांतील असलें पाहिजे. म्हणजे शके १७००।१ श्रावण वद्य दशमीच्या आधीं केव्हां तरी गीतेवरील आर्या मोरोपंतांनीं रचिल्या असाव्या, इतकें निश्चित होतें. ही एका बाजूची कालमर्यादा ठरली. याच्या पलीकडे गीतेच्या आर्यांचा काल जाऊं शकत नाहीं. आतां या मर्यादेच्या अलीकडे तो काल कोठें असूं शकेल, याचा आपण विचार करूं.

द्रोणपर्वाच्या रचनेच्या आधीं गीतेवरील आर्या रचण्याचा स्वाभाविक प्रसंग म्हटला म्हणजे भीष्मपर्वाचा होय. तेव्हां त्या भीष्मपर्वाच्या ओघांत या गीतेवरील आर्या लिहिण्याची कल्पना मोरोपंतांच्या मनांत आली, किंवा त्याच्या आधीं च ती कल्पना मनांत येऊन तिला हल्लींच्या आर्यांचें मूर्तस्वरूप आलेलें होतें, हा प्रश्न आतां उपस्थित होतो. परंतु मोरोपंतांच्या आर्याभारतामध्यें या गीतेवरील आर्या सामील केलेल्या आढळत नाहींत, हें पूर्वीं सांगितलें च आहे. तरी पण, अशी एक शंका रहाते च कीं, जरी गीतेवरील आर्या भीष्मपर्वांत सामील केलेल्या नसल्या, तरी त्या रचून त्यांचा एक स्वतंत्र ग्रंथ बनविण्याची कल्पना त्या वेळीं मोरोपंतांच्या मनांत उद्भवण्याला कांहीं अडचण नाहीं; इतकें च नव्हे, तर तशी ती त्या वेळीं उद्भवणें हें उलट स्वाभाविक हि आहे. परंतु ही गोष्ट संभवनीय दिसत नाहीं. कारण, एखाद्या विशिष्ट प्रवाहामध्यें ज्या कल्पना उत्पन्न होतात, त्यांच्यामध्यें बहुधा परस्पर सादृश्य बरेंच असतें. सगळें आर्याभारत हें यमकबद्ध आहे. त्या यमकबद्ध काव्याच्या ओघामध्यें गीतेच्या आर्यांची कल्पना उद्भवली असती, तर त्या गीतार्या हि सयमकच व्हावयाला पाहिजे होत्या. परंतु त्या तर निर्यमक आहेत. असला सयमक आणि निर्यमक आर्यांचा संकर एका कल्पनेच्या अमलामध्यें सहसा संभवणें शक्य नाहीं. म्हणून भीष्मपर्वांतील प्रसंग येण्याच्या आधींच भगवद्गीतेवरील आर्या रचल्या गेल्या असल्या पाहिजेत, असें दिसतें.

असें मानण्याला आणखी हि कित्येक कारणें दाखवितां येण्यासारखीं आहेत. आर्याभारताच्या रचनेच्या ओघांत मोरोपंतांच्या अंतःकरणांमधील गुरुस्थानाचें अग्रपीठ श्रीमद्द्वैपायन व्यास यांनीं आक्रमिलेलें आणि अलंकृत केलेलें होतें, कारण तशा प्रकारचे उल्लेख आर्याभारताच्या आदिमध्यावसानीं बऱ्याच ठिकाणीं आढळतात. परंतु तो प्रकार भगवद्गीतेवरील आर्यांत किंवा त्यांच्या आधींच्या विषयप्रवेशाच्या आर्यांत मुळीं च दिसून येत नाहीं. उलट या विषयप्रवेशाच्या आर्यांमध्यें व्यासाचा जो काय तो एकदां च उल्लेख आलेला आहे, त्यांत व्यासाला बरेंच गौणत्व दिलेलें असून संजयानें भीष्मपर्वांत गीता सांगितलेली आहे, असें वर्णन आढळतें. त्या आर्या येणेंप्रमाणें—

वृत्त कुरुक्षेत्रींचें धृतराष्ट्रातें कळावया व्यासें ।
आज्ञा केली संजय शिष्या, वर देउनि स्वहृव्यासें ॥
त्याणें चि भीष्मपर्वी हें गीताशास्त्र त्या नृपा कथिलें ।
ज्या अमृतार्थ उपनिषत्पयोधिला कृष्णमंदरें मथिलें ॥

भगवद्गीतेवरील आर्या रचतांना पंतांच्या मनोमंदिरांतील गुरुस्थानीं व्यासाच्या ऐवजीं श्रीज्ञानदेव व वामन यांची योजना झालेली होती, हें विषयप्रवेशांतील पुढील आर्यांवरून दिसून येईल.

श्रीमद्भगवद्गीताव्याख्यानीं हृदयहारि वचनांहीं ।
श्रीज्ञानदेव वामन पटु ऐसा अन्य मानव च नाहीं ॥ २ ॥

श्रीज्ञानदेव साक्षात् भगवान् वैकुंठनाथ अवतरला ।
एतत्कृतगीतार्थव्याख्यानें फार लोक भव तरला ॥ ३ ॥

श्रीमद्वामनरचिता गीताटीकोत्तमा समश्लोकीं ।
आर्याटीका तेचि छंद निराळें विचित्र हें लोकीं ॥ १७ ॥

या विषयप्रवेशांत व्यासाचा अग्रत्वानें उल्लेख नसून पूज्यतेचें प्रमुखस्थान ज्ञानदेव आणि वामन आणि त्यांच्या गीतेवरील टीकाग्रंथांना दिलेलें आहे. यावरून ज्या ओघामध्यें व्यासांचें पंतांच्या मनावर प्राबल्य होतें, त्या ओघामध्यें म्हणजे भारतरचनेच्या प्रसंगामध्यें ही आर्याटीका मोरोपंतांनीं लिहिली असेल असें दिसत नाहीं. भारतरचनेची कल्पना हि कदाचित् मनांत आली नसेल, अशा एका कोणत्या तरी पूर्वकाळीं गीतेवर टीका करण्याची कल्पना पंतांच्या मनांत आली असावी. त्या वेळीं टीका प्राकृत भाषेंत करावयाची असल्यामुळें साहजिकपणें च प्राकृतांत पूर्वी असलेल्या ज्ञानेश्वरांच्या आणि वामनाच्या प्रसिद्ध टीकांकडे मोरोपंतांचें लक्ष गेलेलें असावें; आणि त्यांपैकीं ही वामनाची समश्लोकी टीका बेताची आणि सोइस्कर वाटल्यावरून तिचा च त्यांनीं मार्गदर्शक म्हणून अंगीकार केला असावा. अशी कल्पनेची पूर्वपीठिका कल्पिली असतां सर्व गोष्टींची उपपत्ति बरोबर लागते. तसें च मोरोपंतांनीं या गीतेवरील आर्या निर्यमक कां रचिल्या, हा जो एक प्रश्न आहे, त्याचा हि या कल्पनेनें उलगडा होतो. आर्येच्या शेवटीं यमक घालावयाचें, हा सामान्य नियम होय. परंतु या गीतेवरील आर्या करतांना, कोणत्या हि कारणानें कां होईना, मोरोपंतांनीं वामनाची समश्लोकी टीका अनुसरणीय म्हणून आपल्या दृष्टीपुढें मांडली होती; व मूळ संस्कृत भगवद्गीतेचे जितके श्लोक, तितके च ( श्लोकाला श्लोक या रीतीनें ) वामनाच्या समश्लोकी टीकेचे ज्याप्रमाणें नियमित श्लोक झालेले होते त्याप्रमाणें च

परि रामचरणपद्मप्रसाद झाला म्हणोनिया आर्या ।
गीताटीका करितों त्याही गीतींच सप्तशत आर्या ॥

या विषयप्रवेशांतील आर्येमध्यें आपल्या गीताटीकेच्या सातशें च आर्या लिहावयाच्या, अशी मोरोपंतांनीं आरंभींच प्रतिज्ञा केली होती. तेव्हां अशा स्थितीमध्यें यमकसहित आर्या करणें शक्यच नव्हतें. चांगलें यमक जुळवावयाचें म्हणजे त्यासाठीं आर्येच्या दोन चरणांपैकीं बहुधा एक चरण मुख्य कथाभाग सोडून अवांतर कांहीं वर्णनामध्यें फुकट दवडावा लागतो, ही वस्तुस्थिति कोणाच्या हि लक्षांत येण्यासारखी आहे तेव्हां वामनाच्या समश्लोकी टीकेला अनुसरतांना पंत जर यमकें साधण्याच्या नादाला लागते, तर त्या टीकेमध्यें समश्लोकत्व हा धर्म उरला नसता; आणि आर्यांची संख्या जी सातशें च व्हावयाला पाहिजे होती, ती सातशेंहून पुष्कळ अधिक झाली असती. सारांश, समश्लोकत्वाची लहर या वेळीं पंतांच्या मनामध्यें प्रबल झालेली होती; आणि ती परिपूर्ण करण्यासाठीं यमकें क्षणभर बाजूला ठेवावीं लागलीं, तर त्याला हि पंत त्या वेळीं तयार झालेले होते. ही समश्लोकत्वाची प्रवृत्ति आर्याभारताच्या रचनेच्या वेळीं मोरोपंतांच्या मनामध्यें कोठें हि नव्हती. तेथें याच्या उलट प्रवृत्ति होती. श्लोकांची काय कथा, पंत महाभारताचे अध्यायचे अध्याय आणि प्रकरणेंच्या प्रकरणें अचानक रीतीनें त्या वेळीं गाळीत असत. अशी संक्षेपाची प्रवृत्ति आणि समश्लोकत्वाची प्रवृत्ति, अशा या दोन हि परस्परविरुद्ध प्रवृत्ति एकसमयावच्छेदें करून एका च मनांत असणें, सहसा संभवनीय नसल्याकारणानें हि गीतेवरील ही आर्याटीका भारताच्या आधीं पंतांनीं लिहिली असावी असें दिसतें.

आणखी हि एका कारणासाठीं गीतेवरील आर्या बऱ्याच आधीं लिहिल्या असल्या पाहिजेत. मोरोपंतांचें कुशलवोपाख्यान या नांवाचें एक काव्य आहे. त्यांतील अंतःप्रवाहावरून तें मोरोपंतांनीं आपल्या बहुतेक सर्व काव्यांच्या बऱ्याच आधीं लिहिलें असावें, असा पुष्कळांचा तर्क आहे. जैमिनिकृतअश्वमेधावरून तें रचिलेलें असून त्याचे एकंदर तेरा अध्याय आहेत. यांपैकीं प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं एक च प्रकारची एक विशिष्ट आर्या फिरून फिरून आढळते. फक्त तिच्यामध्यें अध्यायाच्या अनुक्रमाच्या आंकड्यांचा मात्र काय तो फरक केलेला असतो. उदाहरणार्थ,

जैमिनिकृत भारतगत हयमेधीं कुशलवाख्यानीं ।
हा पहिला अध्याय श्रवण करावा रसज्ञ मुख्यांनीं ॥

व पुढें ‘ हा दुसरा अध्याय ’ ‘ अध्याय पांचवा हा ’ ‘ हा सावा अध्याय ’

'तेरावा अध्याय' अशा प्रकारचे आंकडे मात्र बदललेले आहेत; आणि ही च पद्धति गीताटीकेच्या अठरा हि अध्यायांच्या शेवटीं स्वीकारलेली दिसते. उदाहरणार्थ–

श्रीभगवद्गीतेची आर्याटीका मयूररचिता हे ।
पहिल्या अध्यायाची लाहे सुख आर्य जो बरें पाहे ॥

व पुढें 'दुसऱ्या अध्यायाची', 'तिसऱ्या अध्यायाची' 'संपूर्ण पांचव्याची' अशा रीतीनें अठराव्या अध्यायापर्यंत अध्यायाचा आंकडा बदलून एक च आर्या उपयोगांत आणण्याचा मोरोपंतांनीं आपला क्रम सारखा चालू ठेविला आहे. तेव्हां कुशलवोपाख्यान आणि गीताटीका यांच्यामध्यें जें हें वर दाखविलेलें एक प्रकारचें सादृश्य दिसून येतें, तें हि त्यांच्या परस्परसमकालीनत्वाचें च एक द्योतक आहे. आणि त्यावरून अशी एक च आर्या आंकडे तेवढे बदलून प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं घालण्याची तऱ्हा ज्या कुशलवोपाख्यानाच्या वेळीं मोरोपंतांना पसंत पडली होती, त्या च वेळच्या सुमारास ही गीताटीका लिहिली असल्यामुळें त्या च पद्धतीचा पंतांनीं या गीताटीकेमध्यें हि उपयोग केला असावा, आणि म्हणून या कारणासाठीं हि गीताटीकेच्या आर्या या भारती आर्यांच्या आधीं रचलेल्या असाव्या असें दिसतें.

वर दिलेल्या प्रमाणांशिवाय आणखी एक प्रमाण वरील संशयित गोष्टीच्या निश्चयाच्या कामीं उपयोगी पडण्यासारखें आढळतें. तें असें:—गीतार्यांचा ज्यांत उल्लेख आलेला आहे, असें मोरोपंताचें एक पत्र वर दिलेलें आहे त्या पत्रांत गीतार्यांच्या आधीं दशमपूर्वार्ध हें हि काव्य पाठविलें असल्याचा उल्लेख आहे. पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे ज्याचे विभाग प्रसिद्ध आहेत, तो दशम म्हणजे मोरोपंतांचा बृहद्दशम ऊर्फ कृष्णविजय होय. या कृष्णविजयाचा उल्लेख पंतांच्या 'नामरसायन' नामक काव्यामध्यें येणेंप्रमाणें आहे:—

श्रीमद्भागवत श्रीदशमस्कंधांत दिव्य कृष्णकथा ।
त्या नूतन लिहिल्या मीं वाचूं ऐका रुचेल कर्णपथा ॥

या च 'नामरसायना' मध्यें प्रल्हादविजय, कुशलवचरित, मंत्ररामायण, संशयरत्नावली, साधुसत्कार, आर्या केकावली, नामसुधाचषक, रामनामार्या व (संस्कृत) आर्यामुक्तामाला हे हि ग्रंथ आपण केले असल्याचा मोरोपंतांनीं निर्देश केला आहे. व हें सर्व

दाखविलें निज कवन श्रीमदनंताख्य साधुस हि म्यां तें ।

असें हि त्यांत च म्हटलें आहे. अनंत पाध्ये हे शके १६९६ मध्यें वारलेले आहेत. त्याच्या पूर्वीचें ' नामरसायन ' हें काव्य असलें पाहिजे. तसेंच महाभारताचा ' नामरसायना ' तील वरील यादीमध्यें उल्लेख नसल्यामुळें भारतरचनेच्या पूर्वीचें ' नामरसायन ' काव्य असलें पाहिजे, असें हि सर्वत्र मानण्यांत येतें. तेव्हां महाभारताच्या आधीं नामरसायन, नामरसायनाच्या आधीं कृष्णविजय ऊर्फ बृहद्दशम आणि त्याच्या पूर्वार्धाशीं समकालीन गीतार्या, असें प्राप्त होतें. तेव्हां यावरून गीतेवरील टीका आर्याभारताच्या पूर्वी बरेच दिवस लिहिली गेलेली असावी, ही गोष्ट अगदीं स्पष्ट होते.

आतां कोणी अशी शंका काढील कीं, नामरसायनाच्या पूर्वीच्या कृष्णविजयाशीं जर गीतार्या समकालीन होत्या, तर मग त्यांचा ' नामरसायना ' मध्यें उल्लेख कां आलेला नाहीं ? नामरसायनामध्यें आर्याभारताचा उल्लेख नाहीं, म्हणून तें जर नामरसायनाच्या नंतरचें ठरतें, तर गीतार्या हि त्यानंतरच्या म्हणून कां ठरूं नयेत ? परंतु ही तुलना बरोबर नाहीं. आर्याभारत हा इतका मोठा आणि महत्वाचा ग्रंथ आहे कीं त्याचा उल्लेख वरील यादींत अवश्य यावयाला पाहिजे होता. परंतु गीतेची गोष्ट तशी नाहीं. मूळ गीता ही जरी वेदांताच्या दृष्टीनें चांगली असली, तरी मोरोपंतांची आर्याटीका ही काव्यदृष्ट्या कांहीं फारशी महत्वाची आहे, असें नाहीं. अशा कोणत्या तरी कारणासाठीं आर्याटीकेचें नांव वरील यादींत आलेलें नसेल; आणि नामरसायन रचलें जाईपर्यंत तयार झालेल्या सर्व काव्यांचीं नांवें त्यांत घातलेलीं आहेत, असें तरी कोणीं सांगितलें आहे ? ज्यांचीं नांवें त्यांत आलीं आहेत, तेवढीं काव्यें मात्र त्याच्यापूर्वीं झालेलीं असलीं पाहिजेत एवढें च अनुमान त्यापासून काढावयाचें आहे.

अनंत पाध्ये यांच्याबद्दलचा मोरोपंतांच्या कांहीं आर्यांमध्यें दोन तीन वेळां जो उल्लेख आलेला आहे, त्यांत एक प्रकारचा विशेष आढळून येतो. तो पुढील आर्यांवरून कोणाच्याही सहज लक्षांत येईल.

नमिला सद्भक्तिमय श्रीमदनंताख्य जो उपाध्याय ।
मूर्त श्रीगीतेच्या अकराव्याचाचि तो उपाध्याय ॥

सन्मणिमाला १०७

श्रीगीतेच्या एकादशसंख्यांचा जसा उपाध्याय ।
केवळ भक्तिरसमय श्रीमदनंताख्य जो उपाध्याय ॥

स्वर्गारोहण ३९

श्रीमदनंतांचें आडनांव जें उपाध्याय ( पाध्ये ) त्याच्याशीं यमक जुळविण्याकरितां वरील दोन्ही आर्यांतून एका च प्रकारचा प्रयत्न करण्यांत आलेला आहे. या विशिष्ट यमकाचा गीतेशीं फार निकट संबंध येतो. तेव्हां या यमकयोजनेच्या पूर्वी गीतेच्या अकराव्या अध्यायाच्या जवळच्या बाराव्या अध्यायाचें भक्तिरसमयत्व मोरोपंतांच्या मनामध्यें जागृत झालेलें असलें पाहिजे असें दिसतें, आणि तें वरील प्रमाणांवरून हि सुसंगत च दिसतें.

रा. बाळकृष्ण मल्हार हंस यांनीं मोरोपंतावरील आपल्या निबंधामध्यें भगवद्गीतेसंबंधानें कांहीं निराळी च हकीकत दिली आहे. ती अशीः–' गीतेच्या भाषांतराचे पहिले सहा अध्याय मात्र पंतांनीं लिहिले; बाकीचे बारा अध्याय त्यांचा पुतण्या आपा पराडकर म्हणून ब्रह्मावर्तीं रहात होता त्यानें केले, असें म्हणतात. ' परंतु ही हकीकत बरोबर दिसत नाहीं. गीतेच्या भाषांतराच्या सहाव्या अध्यायाची समाप्ति, किंवा सातव्या अध्यायाचा प्रारंभ, किंवा अठराव्या अध्यायाची समाप्ति,' अशांपैकीं कोणत्या हि ठिकाणीं असा उल्लेख दिसत नाहीं; किंवा सहाव्या अध्यायापर्यंतच्या आर्या आणि त्याच्या पुढील आर्या यांच्या तुलनेमध्यें त्यांच्या भिन्नकर्तृकत्वाचें कांहीं अंतर्गत प्रमाण हि आढळून येत नाहीं. उलट,

> श्रीभगवद्गीतेची आर्याटीका मयूररचिता हे ।
> साव्या अध्यायाची लाहे सुख आर्य जो बरें पाहे ॥

अशा प्रकारच्या आर्या जशा पूर्वींच्या सहा अध्यायांत आहेत, तशा च प्रकारच्या आर्या पुढील हि बारा अध्यायांमध्यें असून त्यांपैकीं प्रत्येक आर्येमध्यें 'मयूररचिता ' हें पद कायम आहे. आप्पा पराडकर यानें पुढील आर्या केलेल्या असत्या, तर त्यानें स्वरचित गजगौरीव्रतांतल्याप्रमाणें यांत हि आपलें नांव घातलें असतें; निदान 'मयूररचिता' असें खोटें विधान तरी त्यानें केलें नसतें. शिवाय पंतांच्या वर दिलेल्या पत्रामध्यें ' गीतार्या ' चा जो उल्लेख आहे, त्यावरून तर त्या मयूररचित च असल्या पाहिजेत, याबद्दल शंका उरत नाहीं.

रा. पांगारकर यांनीं मोरोपंतांच्या चरित्रांत गीतेसंबंधानें अशी एक आख्यायिका दिली आहे कीं, "पंत काशीयात्रेस गेले तेव्हां तेथें मुक्काम असे तोंपर्यंत ते प्रत्यहीं गीतेचें आर्यांमध्यें भाषांतर करून तें ब्राह्मणास देत व याप्रमाणें त्यांनीं गीतेचीं १०८ भाषांतरें केलीं. " परंतु या आख्यायिकेवर ते हि विश्वास ठेवीत नाहींत, व या १०८ भाषांतरांच्या आख्यायिकेच्या उद्भवाला १०८ रामायणांच्या संख्यासादृश्याशिवाय दुसरें कांहीं प्रमाण नाहीं, असें हि ते लिहितात. कदाचित् या एका च गीताटीकेची किंवा मूळ गीतेची रोज एक एक प्रत करून १०८ दिवस १०८

ब्राह्मणांना पंतांनीं दिल्या असतील, आणि त्यावरून हि वरील आख्यायिका उत्पन्न झाली असेल. सबब त्या बाबतींत विशेष चर्चेची जरूरी उरलेली नाहीं. आतां गीतार्थांच्या रचनाकालासंबंधानें रा. पांगारकर यांनीं जरी कोठें कांहीं स्पष्ट विधान केलेलें नाहीं, तरी चरित्राच्या उत्तरार्धामध्यें त्यांनीं एकापुढें एक जीं काव्यें परीक्षणासाठीं घेतलीं आहेत, तीं बहुधा कालक्रमाच्या अनुरोधानें च घेतलीं आहेत. आणि अशा दृष्टीनें पाहतां गीतार्थांच्या रचनेचा काल पंतांच्या काशीयात्रेच्या प्रसंगामधला, म्हणजे शके १७१०-११ च्या सुमाराचा असावा, असा गर्भितार्थ ध्वनित होतो. आणि असें असेल तर मात्र हा काल बरोबर नाहीं, हें वर दिलेल्या प्रमाणांवरून कोणाच्या हि सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

## ६२ जनाबाईचा थालीपाक

सर्व अभंगांत जनाबाईचे अभंग फार सुंदर आणि प्रेमळ असतात. आणि थालीपाकाचे अभंग हे हि तशा च प्रकारचे आहेत. आवटे यांच्या आवृत्तीमध्यें थालीपाक या मथळ्याखालीं ( पान ७५६-७५९ ) एकंदर तेरा अभंग दिलेले आहेत. पांडव वनवासांत गेले असतां दुर्वासऋषि तेथें आले; त्या वेळीं द्रौपदीनें जो धांवा केला तो ऐकून श्रीकृष्ण द्वारकेंतून उपाशीं च आले. आणि सूर्यानें दिलेल्या स्थालीमधील एक भाजीचें पान सेवन करून तृप्त झाले व नंतर मग त्यांनीं सर्व ऋषींना अन्नें पुरविलीं; ही भक्तिरसपरिपूर्ण कथा या तेरा अभंगांमध्यें जनाबाईनें वर्णिलेली आहे. या थालीपाकाच्या प्रकरणामध्यें विवेचकदृष्ट्या एक दोन गोष्टी महत्वाच्या आढळून येतात त्या येणेंप्रमाणें:—

रत्नाचे मंचकीं पहुडे चक्रपाणी । चोळीत रुक्मिणी चरणांबुज ॥ १ ॥
कानीं पडियेले द्रौपदीचे बोल । उठे घननीळ तांतडीनें ॥ २ ॥
रुक्मिणी म्हणे ऐक एक गोष्ट । पडलें संकटीं तान्हें माझें ॥ ३ ॥
टाकिला गरुड अनवाणी पाय । जनी म्हणे माय धांविन्नली ॥४॥ (३२५)

जनाबाईच्या थालीपाकामध्यें या वर दिलेल्या चार चरणी अभंगाशिवाय बाकीचे जे अभंग आहेत, ते सर्व " थालीपाक ऐकतां । हरि वारी जन्मव्यथा ॥ " याप्रमाणें दोन चरणी आहेत व हा च कायतो फक्त चार चरणी आहे. शिवाय या अभंगामध्यें द्रौपदीनें धांवा केला त्यापैकीं कृष्ण रत्नमंचकावर निजले होते, असें

वर्णन आहे, परंतु याच्या मागच्या व पुढच्या इतर अभंगांतून देव त्या वेळीं द्वारकेंत जेवावयाला बसत होते असें वर्णन आहे.

द्रौपदीनें धांवा केला । देव जेवितां उठिला ॥ ३२२–४
ताट विस्तारी रुक्मिणी । देव बैसले भोजनीं ॥
धांवा ऐकतां श्रवणीं । ताट लोटी चक्रपाणी ॥ ३२४ ॥

पुढें द्रौपदीजवळ आल्यानंतर हि भगवान् म्हणतातः—

ताटीं विस्तारिला मेवा । तुझा ऐकुनीया धांवा ॥
न जेवितां आलों येथें । बहु झालों क्षुधाक्रांत ॥ ३२६–८–९

या उताऱ्यावरून श्रीकृष्ण जेवावयाला च बसत असतां द्रौपदीचा धांवा ऐकून तावडतोब उठून आले, हें उघड होतें. व कांहीं तरी खावयाला मागण्याच्या वगैरे पुढील गोष्टीच्या अनुसंधानानें पाहिलें असतां देव पूर्वीं उपाशीपोटी च यावयाला पाहिजे आहे. ते रत्नमंचकावर निजले असतां तेथून उठून येणें हें पुढील कथाप्रसंगाला अनुचित आणि विसंगत असें आहे. तेव्हां ही रत्नमंचकावरून उठून येण्याची पूर्वापरविरोधी आणि विसंगत कल्पना व ही कल्पना ज्या अभंगांत घातलेली आहे त्या अभंगाची निराळी चाल, या दोन कारणामुळें हा अभंग फार संशयास्पद ठरतो.

आतां या थालीपाकाच्या अभंगांसंबंधानें आणखी एक विलक्षण गोष्ट आढळून येते, ती येणेंप्रमाणें:–आवटे यांच्या आवृत्तीमध्यें जनाबाईच्या गाथ्यांत 'भक्तवत्सलता' या मथळ्याखालीं ११९।१२० या क्रमांकाचे दोन अभंग पुढें दिल्याप्रमाणें आढळतात.

११९ मांडियेला डाव । कौरवांनीं दुष्टभाव ॥ १ ॥
टाकियेला फांसा । पांडव गेले वनवासा ॥ २ ॥
वना गेले पांडव बळी । दिनकरें दिधली थाळी ॥ ३ ॥
पांडवांची कृष्णाबाई । जनी म्हणे माझी आई ॥ ४ ॥
१२० ऐशा परी पांडवांतें । रक्षियेलें दीनानाथें ॥ १ ॥
शंखचक्र आयुधें करीं । छाया पितांबर करीं ॥ २ ॥
हस्त ठेऊनिया माथां । सुखी असा निर्भय चित्तां ॥ ३ ॥
आज्ञा घेऊनि सर्वांची । देव गेले द्वारकेसी ॥ ४ ॥
सरला थालीपाक आतां । पुढें सावधान श्रोतां ॥ ५ ॥
कथा पुढील गहन । घोषयात्रा निरूपण ॥ ६ ॥
येथुनि अध्याय कळस । जनी म्हणे झाला रस ॥ ७ ॥

३०

हे दोन अभंग वाचल्याबरोबर कोणाच्या हि लक्षांत येईल कीं, हे दोन्ही अभंग थालीपाकापैकीं असून त्यांतील पहिला थालीपाकाच्या प्रारंभींचा आणि दुसरा थालीपाकाच्या अखेरीचा असला पाहिजे. ही गोष्ट या दोन अभंगांतील अर्थावरून आणि संदर्भावरून अगदीं उघड होत आहे. व या दोन अभंगांची चाल हि थालीपाकांतील इतर सर्व दोन चरणी अभंगांच्या चालीसारखी च आहे. या सर्व कारणांवरून हे दोन अभंग जरी थालीपाकाच्या आदिअंतींचे स्पष्टपणें आहेत, तरी आवटे यांच्या आवृत्तीमध्यें ते थालीपाकाच्या प्रकरणामध्यें घातलेले नसून भक्तवत्सलतेच्या मथळ्याखालीं भलतीकडे च कोठें तरी दिलेले आहेत. शिवाय त्या 'भक्तवत्सलते'च्या प्रकरणांत जेथें ते आहेत, तेथें त्यांचा मागच्यापुढच्या अभंगांशीं कांहीं एक संबंध नाहीं. सबब तेथून ते काढून थालीपाकांतील त्यांच्या योग्य स्थळीं त्यांना घालणें अत्यंत जरूरीचें आहे.

आणि तसे ते अभंग योग्य स्थळीं घातले, म्हणजे त्यांच्यापैकीं जो दुसरा अभंग आहे, त्यावरून आणखी अशी हि एक गोष्ट सूचित होते कीं, जनाबाईनें फक्त थालीपाकावर च अभंग लिहिलेले नसून त्याच्या पुढील घोषयात्रेच्या कथेवर हि तिनें कांहीं तरी काव्य केलेलें असलें पाहिजे. तें आज जरी जनाबाईच्या गाथ्यांत कोठें उपलब्ध नाहीं, तरी तें तिनें रचिलेलें असलें पाहिजे, हें वरील उल्लेखावरून अगदीं स्पष्ट दिसत आहे.

## ६३ मिराबाईचें आख्यान

( रा. शिवराम महादेव परांजपे )

श्रीनामदेवमहाराजांच्या अभंगांच्या गाथ्यामध्यें संतचरित्रांच्या प्रकरणांत मिराबाईचें एक आख्यान आहे. त्याचें वृत्त अभंगाचें असून एकंदर चरण ६५ आहेत. हें मिराबाईचें चरित्र ज्ञानदेवाशीं समकालीन जो नामदेव त्यानें लिहिलेलें असेल असें दिसत नाहीं. यांतील अंतःप्रमाणें याच्या अगदीं उलट आहेत. तीं अशीं:—

एकनाथाघरीं वहातसे पाणी । कैसा चक्रपाणी बोध्य झाला ॥

( आवटे आवृत्ति पान ६१३ अ. २१८९-३५ )

यांत एकनाथाचा उल्लेख आलेला आहे. परंतु एकनाथ हा नामदेवाच्या पाठीमागून सुमारें दोनशें वर्षांनीं झालेला असल्याकारणानें जर हें मिराबाईचें चरित्र

नामदेवानें च लिहिलेलें असतें, तर त्याला आपल्या मागाहून दोनशें वर्षांनीं जन्मास येणाऱ्या एकनाथाचा उल्लेख या प्रकरणांत कधीं हि करतां आला नसता. यावरून हें चरित्र नामदेवानें लिहिलेलें नसावें, हें उघड होतें.

आतां जर ज्ञानेश्वरसमकालीन नामदेवानें हें चरित्र लिहिलेलें नाहीं, तर मग तें कोणीं लिहिलेलें असलें पाहिजे, असा प्रश्न साहजिकपणें च उत्पन्न होतो. त्या प्रश्नाच्या समाधानाकरितां आपण या चरित्राच्या शेवटच्या चरणाकडे वळूं. तो चरण येणेंप्रमाणें आहे:—

संतांचा तो दास बोले शिंपी नामा । त्यानें दिला प्रेमा सदा मज ॥ ६५ ॥

विष्णुदासनामा या नांवाचा एक कवि ज्ञानेश्वरसमकालीन नामदेवाच्या मागाहून झाला असून त्याचे कांहीं अभंग पहिल्या नामदेवाच्या अभंगामध्यें मिसळलेले आहेत अशी एक कल्पना आहे.* त्या कल्पनेप्रमाणें कदाचित् हें चरित्र त्या विष्णुदासनाम्यानें लिहिलें असेल, आणि तसें असेल, तर मात्र त्या विष्णुदास नाम्यासंबंधानें या चरणापासून आणखी अशी हि एक माहिती मिळते कीं, तो हि पहिल्या नामदेवाप्रमाणें च जातीचा शिंपी असला पाहिजे.

वरच्याप्रमाणें च एकनाथाचा उल्लेख ज्यांत आलेला आहे असा आणखी एक अभंग नामदेवाच्या गाथ्यांत श्रीविठ्ठलस्तुतीच्या प्रकरणांत आढळतो. तो येणेंप्रमाणें:—

धनाजाट घरीं नित्य उभा हरी । एकनाथा घरीं धोतरें धूत ॥
कबीराची पांजणी करी चक्रपाणी । जनीसवें शेणी वेंचूं लागे ॥
बोधल्याचें शेत पेरी श्रीअनंत । नामयासांगातें केशवहरी ॥
गोऱ्या कुंभाराची मडकीं घडी अंगें । चोखामेळ्यासंगें ढोरें ओढी ॥
रोहिदासाचें कुंड धुतो श्रीगोपाळ । सावत्याचा मळा खुरपूं लागे ॥
नामा म्हणे देव भक्तांचा वल्लभ । मागें पुढें उभा पांडुरंग ॥

## ६४ श्रीनामदेवकृत
## १ ज्ञानेश्वरांची समाधि, २ सोपानदेवाची समाधि व ३ नामदेवाची आळ

( रा. शिवराम महादेव परांजपे )

नामदेवाच्या छापील गाथ्यामधून वर दिलेल्या नांवाचीं तीन प्रकरणें आढळतात परंतु त्यांच्यासंबंधानें एक विशेष विलक्षण गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते, ती अशी कीं,

* अहवाल शके १८३३ पृष्ठ १२२ व शके १८३४ पृष्ठ १७८ पहा.

या तिहींपैकीं प्रत्येक प्रकरण दोन निरनिराळ्या स्वरूपांमध्यें वाचकांपुढें येतें; एकदां ओंवीच्या स्वरूपामध्यें आणि एकदां अभंगाच्या स्वरूपामध्यें. दोन्ही स्वरूपांतील कथाभाग बहुतेक एक च, परंतु वृत्त मात्र निराळें—म्हणजे एकाचें ओंवीवृत्त आणि दुसऱ्याचें अभंगवृत्त,—अशी स्थिति आहे. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरमहाराजांची समाधि हा विषय घेतला, तर या विषयावर कांहीं ओंव्या आहेत; आणि तो च कथाभाग फिरून एकदां अभंगामध्यें वर्णिलेला आहे, व अशी च स्थिति सोपानदेवांची समाधि आणि नामदेवाची आळ यांबद्दल हि झालेली आहे. या तिन्ही प्रकरणांवरील ओंव्या आणि अभंग हे दोन्ही हि नामदेवानें च केलेले आहेत, असें त्यांतील "नामा म्हणे" इत्यादि वचनांवरून मानण्यांत येत आहे. परंतु ही गोष्ट थोडी संशय उत्पन्न करणारी आहे. एक च कवि एक च गोष्ट एका वृत्तांत एकदां सांगून झाल्यावर फिरून ती च गोष्ट दुसऱ्या वृत्तामध्यें वर्णन करण्याला प्रवृत्त झाला असल्याचीं उदाहरणें क्वचित् च सांपडतील. एक गोष्ट एकदां सांगितल्यावर फिरून ती दुसऱ्यांदां कांहीं विशेष कारणावांचून कोण कशाला सांगेल? परंतु हल्लींच्या छापील गाथ्यांतून तर असला अस्वाभाविकपणा नामदेवावर लादण्यांत आलेला आहे. आवटे यांच्या आवृत्तीमध्यें "श्रीज्ञानेश्वरसमाधिमहिमा" या मथळ्याखालीं पान १९३ क्रमांक ७०० पासून पान २२९ क्रमांक ७५९ पर्यंत ज्ञानेश्वरांच्या समाधिसंबंधाच्या ओंव्या दिलेल्या आहेत; व "श्रीज्ञानदेव (अनुक्रमणिकेंत श्रीज्ञानेश्वर) महाराजांची समाधि" या मथळ्याखालीं पान २२९ क्रमांक ७६० पासून पान २४३ क्रमांक ८३० पर्यंत त्या च ज्ञानेश्वरांच्या समाधिसंबंधाचे अभंग दिलेले आहेत. पुढें ओंवीवृत्त आणि अभंग यांच्यांतील भिन्नतेकडे दुर्लक्ष करून "श्रीसोपानदेव महाराजांची समाधि" या एका च मथळ्याखालीं पान २४३ क्रमांक ८३१ पासून पान २४७ क्रमांक ८४२ पर्यंत सोपानदेवाच्या समाधीबद्दलच्या ओंव्या आणि पान २४७ क्रमांक ८४३ पासून पान २५४ क्रमांक ८६९ पर्यंत सोपानदेवाच्या समाधीचे अभंग देण्यांत आलेले आहेत. आतां तिसरें राहिलेलें प्रकरण जें "नामदेवाची आळ" त्याची अशी स्थिति झाली आहे कीं, या आळीचे अभंग मात्र पान २७१ क्रमांक ९४३ पासून पान २७४ क्रमांक ९६३ पर्यंत देण्यांत आलेले आहेत. परंतु वरच्या दोन प्रकरणांप्रमाणें या प्रकरणाच्या हि ओंव्या आहेत, या गोष्टीकडे कोणाचें हि लक्ष गेलेलें नाहीं; आणि त्यामुळें त्या कोठें तरी दडपल्या गेल्या आहेत. या ओंव्या हल्लीं "श्रीज्ञानेश्वरसमाधिमहिमा" या प्रकरणामध्यें पडून राहिलेल्या आहेत. पान २०१ क्रमांक ७१७ पासून पान २०३ क्रमांक ७२१ पर्यंतच्या ओंव्यांतील विषय आणि "नामदेवाच्या आळी"च्या अभंगांतील विषय अगदीं तंतोतंत एक आहेत, हें कोणाच्या हि लक्षांत येण्यासारखें आहे.

असो. येथपर्यंत या तीन प्रकरणांवरील ओंव्या आणि अभंग यांचें स्वरूप आणि त्यांचें ठिकाण यांच्याबद्दलचा खुलासा करण्यांत आला. आतां एका च विषयावरील या ओंव्या आणि हे अभंग कदाचित् नामदेवानें हि लिहिलेले असतील, परंतु ज्यांना ही कल्पना संभवनीय आणि स्वाभाविक वाटत नाहीं; त्यांच्या दृष्टीनें काय निर्णय ठरणार? यांतील ओंव्या तरी एक नामदेवाच्या असाव्या किंवा अभंग तरी नामदेवाचे असावेत, असें कोणाला हि वाटणें अगदीं साहजिक आहे.

या उत्पन्न झालेल्या शंकेचें निरसन करण्याला आज कांहीं स्पष्ट साधन उपलब्ध नाहीं. फक्त एक गोष्ट कदाचित् या प्रश्नाच्या निर्णयाला उपकारक होईल, असें वाटल्यावरून त्या गोष्टीचा येथें थोडासा ऊहापोह करण्यांत येत आहे. नामदेवाचा जन्म शके ११९२ मध्यें झालेला आहे. आणि ज्ञानेश्वरमहाराज, सोपानदेव, मुक्ताबाई व निवृत्तिनाथ यांनीं शके १२१८।१२१९ मध्यें समाधि घेतल्या, असें त्यांच्या चरित्रकारांनीं लिहिलेलें आहे. तेव्हां या ज्ञानेश्वरमहाराज वगैरेंच्या समाधिकाळाचे वेळीं नामदेवाचें वय सुमारें २६ वर्षांचें असलें पाहिजे, हें उघड होतें. या नामदेवाला नारा, विठा, गोंदा, महादा असे चार मुलगे होते. या चार मुलांच्यासंबंधानें रा. नारायण कृष्ण गद्रे यांनीं " महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग " पान २१ मध्यें असें म्हटलें आहे कीं, (श्रीज्ञानेश्वरमहाराज वगैरे मंडळींच्या) समाधीच्या वेळीं नामदेवाचें वय २६ वर्षांचें होतें, म्हणून सांगितलें च आहे, तेव्हां त्या सुमारास त्यांचा शेवटचा मुलगा चार पांच वर्षांचा व पहिला नऊ दहा वर्षांचा व कदाचित् लग्न झालेला हि असूं शकेल. नामदेवाच्या २६ व्या वर्षी त्याचा थोरला मुलगा दहा वर्षांचा असण्याला तो नामदेवाला सोळाव्या वर्षी झाला असला पाहिजे, अशी कल्पना करावी लागते. परंतु ही कल्पना जरी शक्य आणि क्षम्य असली, तरी शेवटचा मुलगा त्या वेळीं पांच वर्षांचा असण्याला बहुतेक प्रत्येक वर्षी नामदेवाला एक एक मुलगा होत गेला, असें मानावें लागतें. सारांश, या दोन्ही कल्पनांमध्यें गौरवाचा दोष फार आहे. म्हणून त्या ग्राह्य वाटण्यासारख्या नाहींत आणि दुसऱ्या हि एका बाजूनें पाहिलें असतां नामदेवाच्या २६ व्या वर्षीपर्यंत–म्हणजे ज्ञानेश्वरादिकांच्या समाधिकाळापर्यंत–नामदेवाचे चार हि मुलगे जन्माला आलेले च असतील, असें खात्रीनें म्हणतां येत नाहीं. पुढें दिलेल्या कांहीं प्रमाणांवरून असें दिसून येईल कीं, या समाधीच्या वेळीं नामदेवाला नारा आणि विठा हे दोन च पुत्र झालेले असावेत आणि यांच्याशिवाय आणखी कांहीं अपत्यें झालीं च असल्यास तीं त्या वेळीं अगदीं लहान असलीं पाहिजेत.

कारण, " श्रीज्ञानेश्वरसमाधिमहिमा " या मथळ्याखालील ओंवीबद्ध प्रकरणांत पान १९६ क्रमांक ७०५ यांत

तंव पुढारा झाला नारा । तो नामयाचा पुत्र सैरा ॥
तो पुसतसे विचारा । नामयासी ॥ ५ ॥
ये संतसभेमाजि । राऊळ बैसले असे सहजीं ॥
यातें पुसे जो कां जी । कोण क्षेत्र म्हणूनी ॥ ६ ॥

अशा ओंव्या आहेत. यांत फक्त नारा या एका च मुलाचें नांव आलेलें आहे व या च ओवीबद्ध प्रकरणांत पान २०१ क्रमांक ७१५ मधील

नारा विठा पुढें चाले । ऐसे इंद्रायणी गेले ॥
सौंदडी वृक्षातळीं बैसले । सहपरिवारें सकळ हि भक्त ॥ ८ ॥

या ओंवीमध्यें नारा आणि विठा या दोन च मुलांचीं नांवें आलेलीं आहेत. यावरून ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीच्या वेळीं नामदेवाचे नारा आणि विठा हे दोन च पुत्र मोठ्या वयामध्यें आलेले असावेत असें दिसतें.

आतां ज्ञानेश्वरांची समाधि, सोपानदेवाची समाधि वगैरे समाधींच्यासंबंधांचीं जीं अभंगबद्ध प्रकरणें आहेत, त्यांच्याकडे पाहिलें असतां त्यांमध्यें ज्ञानदेव, सोपानदेव, चांगदेव व निवृत्तिनाथ यांच्यां समाधींच्या वर्णनात्मक अभंगांमध्यें नारा, विठा, गोंदा आणि महादा या चार हि मुलांचीं नांवें येतात.

( अ ) ज्ञानेश्वरांच्या समाधीच्या अभंगांत पान २३१ क्रमांक २७२ मध्यें

( १ ) नारा विठा गोंदा महादा विरक्त । परसा भागवत उभे तेथें ॥ ४ ॥

पान २३७ क्रमांक ८०३ मध्यें

( २ ) नारा विठा गोंदा महादा पाठविला । झाडविली जागा समाधीची ॥ १ ॥

व पान २४१ क्रमांक ८२३ मध्यें

( ३ ) नारा विठा गोंदा भेटला महादा । उभे जागोजागा राहिलेती ॥

येणेंप्रमाणें तीन उल्लेख आहेत.

( ब ) सोपानदेवाच्या समाधीच्या अभंगांत पान २५० क्रमांक ८५४ मध्यें

( १ ) नारा विठा महादा पाठविला गोंदा । झाडावया जागा समाधींच्या ॥ २ ॥

पान २५० क्रमांक ८५७ मध्यें

( २ ) नारा विठा गोंदा बोलाविला महादा । नामा म्हणे पूजा अवघे जणा ॥६॥

याप्रमाणें उल्लेख असून त्याच्या च पुढील क्रमांक ८५८ मध्यें

( ३ ) अवघ्यांनीं घेतला सोपान वटेश्वर । गोंदा महादा साचार विडे देती ॥२॥

यांत गोंदा आणि महादा हे जे सर्वांत धाकटे मुलगे ते समाधीच्या वेळच्या जेवणाच्या नंतर विडे वाटीत असल्याचें वर्णन आहे.

( क ) पुढें चांगदेवाच्या समाधीच्या अभंगांत पान २५६ क्रमांक ८८१ मध्यें हि

( १ ) नामयाचे पुत्र नारा विठा गोंदा । जागा झाडी महादा समाधीची ॥

असा उल्लेख असून पान २५८ क्रमांक ८८५ मध्यें

( २ ) जेऊनिया संत बैसले निवाडे । गोंदा महादा विडे वांटिताती ॥ ५ ॥

या चरणांत सोपानदेवाच्या समाधीच्या वेळेप्रमाणें गोंदा आणि महादा हे विडे वांटीत असल्याचें वर्णन आहे.

( ड ) आणि शेवटच्या निवृत्तिनाथमहाराजांच्या समाधीच्या प्रकरणामध्यें हि पान २६७ क्रमांक ९२७ यांत

( १ ) नारा विठा गोंदा पाठविला महादा । झाडावया शेजा पुढें झाले ॥ २ ॥

व पान २६९ क्रमांक ९३४ यांत

( २ ) नारा महादा गोंदा विठा झाला विकळ । झाकियेली शीळ समाधीची ॥१॥
गंधर्व आणि देव चिंतावले भारी । दीर्घध्वनी करी नारा विठा ॥ २ ॥
गोंदा आणि महादा सांडिती शरीर । विसोबा खेचर फार कष्टी ॥ ३ ॥

येणेंप्रमाणें उल्लेख झालेले आहेत.

या वर दिलेल्या अभंगबद्ध प्रकरणांमधून आलेल्या उल्लेखांवरून या समाधींच्या वेळीं नामदेवाचे चार हि मुलगे हजर होते असें दिसतें. परंतु हे चारी मुलांचे आलेले उल्लेख विश्वासार्ह दिसत नाहींत. त्यांच्याबद्दलचीं दिलेलीं वर्णनें आणि त्यांनीं केलेलीं कामें हीं ५।६ वर्षांच्या गोंदा, महादा यांच्यासारख्या लहान मुलांच्या ठिकाणीं संभवनीय दिसत नाहींत. समाधि घेण्याकरितां तयार केलेलीं भुयारें हीं स्वाभाविकपणें च लहान असल्यामुळें तीं झाडण्याकरितां कोणा तरी लहान मुलांची च योजना व्हावी, हें जरी उचित असलें, आणि गोंदा, महादा यांच्यासारखीं ५।६ वर्षांचीं लहान मुलें हौसेनें [विडे वांटीत असणें] हें हि जरी क्षम्य असलें, तरी असल्या लहान मुलांना विरक्त म्हणणें, ते दुःखानें शरीर सांडीत आहेत असें वर्णन करणें, व देव, गंधर्व, परिसा भागवत, किंवा विसोबा

खेचर यांच्या योग्यतेच्या पंक्तीमध्यें त्यांना बसाविणें, या गोष्टी फारशा सुसंगत आणि प्रशंसनीय दिसत नाहींत. म्हणून या वर्णनाबद्दल आणि त्यांतील उल्लेखां-बद्दल साहजिकपणें च संशय उत्पन्न होतो.

असो. आतांपर्यंत वर ज्या प्रकरणांतून उतारे दिलेले आहेत त्या प्रकरणांचे ओंवीबद्ध आणि अभंगबद्ध असे दोन निरनिराळे वर्ग आहेत, हें पूर्वीं सांगितलें च आहे. आणि या दोन वर्गांमध्यें जो विशेष चमत्कार, दिसून येतो तो हा कीं, समाधीच्या वेळीं नामदेवाचे चार हि मुलगे हजर असल्याचा उल्लेख फक्त अभंग-बद्ध प्रकरणांमधून च येतो. ओंवीबद्ध प्रकरणांत बाकीच्या बहुतेक गोष्टी अभंगांत-ल्याप्रमाणें जमत असतां गोंदा आणि महादा यांचा उल्लेख यांत येत नसून केवळ नारा आणि विठा या पहिल्या दोन मुलांचीं च काय तीं नांवें त्यांतून आढळतात. आतां जरी अनुपलब्धि म्हणजे अभाव नव्हे, तरी हि या गोष्टींच्या तुलनेवरून असें एक अनुमान सूचित होतें कीं, जेव्हां हीं ओंवीबद्ध प्रकरणें लिहिलीं गेलीं, तेव्हां–म्हणजे ज्ञानेश्वरादिकांच्या समाधीच्या सुमारास–नामदेवाला नारा आणि विठा हे दोन च पुत्र झालेले असावेत. सारांश, ज्यांत चार मुलांचा उल्लेख आहे अशा अभंगबद्ध प्रकरणांपेक्षां ज्यांत फक्त पहिल्या दोन च मुलांचा उल्लेख आहे अशीं ओंवीबद्ध प्रकरणें अधिक आधींचीं असावींत, असें प्राप्त होतें.

निवृत्तिनाथमहाराजांनीं शके १२१९ च्या ज्येष्ठ वद्य १२ ला समाधि घेतली, हे सुप्रसिद्ध आहे. त्या निवृत्तिनाथमहाराजांच्या अभंगांमध्यें दोनतीन ठिकाणीं नामदेवाच्या कुटुंबांतील माणसांचीं नांवें सहजगत्या सांगण्याचा प्रसंग आला असतां हि त्या वेळीं नारा आणि विठा या दोन मुलांचीं च नांवें त्यांचेकडून सांगण्यांत आलेलीं आहेत. जर निवृत्तिनाथांच्या हयातींत गोंदा आणि महादा हे चार पांच वर्षांचे झालेले असते, तर त्यांचीं तेवढीं नांवें वगळून ठेवण्याचा पक्षपात करण्याचें निवृत्तिनाथांना कांहीं कारण नव्हतें.

नामया विठया नारया लाधले । गोणाई फावले अखंडीत ॥ ४ ॥

(पान ३८ क्रमांक २३९)

थांगया लाधलें नामया दीधलें । विठया पावलें हरिरूपा ॥ १ ॥

(पान ३८ क्रमांक २४४)

नरहरि विठा नारा ते गोणाई । प्रेमभरीत डोहीं वोसंडती ॥ ३ ॥

(पान ४७ क्रमांक २९९)

आवटे यांच्या ज्ञानेश्वराच्या गाथ्यांतील निवृत्तिनाथमहाराजांच्या अभंगांतील या वर दिलेल्या उल्लेखांवरून हें उघड होतें कीं, निवृत्तिनाथांच्या वेळीं नारा आणि

विठा ( अगर विठा आणि नारा ) हे नामदेवाचे दोन च पुत्र होते. त्या वेळीं म्हणजे नामदेवाच्या २६ व्या वर्षाचे सुमारास–म्हणजे ज्ञानदेवादिकांच्या समाधींच्या प्रसंगीं–नामदेवाला गोंदा आणि महादा हे मुलगे झालेले नसून अगर निदान ते फार अल्पवयी असून फक्त नारा आणि विठा हे च कायते साधारणपणें मोठे झालेले होते, असें निवृत्तिनाथांच्या हि या साक्षीवरून दिसून येतें.

आणि वर सांगितलेल्या ओंवीबद्ध प्रकरणांमध्यें हि असा च प्रकार आढळून येतो. निवृत्तिनाथांच्या अभंगांतल्याप्रमाणें या ओंव्यांमध्यें हि नारा आणि विठा यांचा च फक्त काय तो उल्लेख आहे. यावरून हि चार मुलांचा ज्यांत उल्लेख आहे त्या अभंगबद्ध प्रकरणांपेक्षां हीं ओंवीबद्ध प्रकरणें जास्त जुनीं असलीं पाहिजेत.

म्हणजे यावरून असें एक अनुमान निघेल कीं, हीं ओंवीबद्ध प्रकरणें पहिल्यानें लिहिलेलीं असावींत; आणि एकदां लिहिलेल्या गोष्टीवर फिरून निराळ्या वृत्तामध्यें काव्य करण्याला सहसा कोणी प्रवृत्त होणें शक्य नाहीं असें असेल तर कदाचित् हीं अभंगबद्ध प्रकरणें मागाहून दुसऱ्या कोणीं लिहिलीं असतील.

या समाधींच्या प्रकरणांत ओंव्यांना एक प्रकारचें विशेष महत्त्व आहे, असें हि आढळून येतें. ज्ञानेश्वरमहाराजांच्या व सोपानदेवाच्या समाधीच्या ओंव्या उपलब्ध आहेत, हें वर सांगितलें च आहे. त्यांच्या अनुरोधानें पहातां चांगदेव, मुक्ताबाई आणि निवृत्तिनाथ यांच्या समाधींच्या हि ओंव्या कोठें तरी असल्या पाहिजेत हें फार संभवनीय दिसतें. सोपान, चांगदेव, आणि निवृत्ति यांच्या समाधींसंबंधाचीं जरी अभंगबद्ध प्रकरणें आहेत, तरी हि त्यांत "सोपानदेवाचें नमन" "चांगदेवाचें नमन" "निवृत्तीचें नमन" या सदराखालीं कित्येक ओंव्या च बाकीच्या अभंगामध्यें दिलेल्या आहेत. वास्तविक या ओंव्या देण्याचें कांहीं कारण नव्हतें. जो कवि अभंगबद्ध काव्यरचना करण्याला बसला, त्याला या नमनांचे हि अभंग रचतां आले नसते, असें नाहीं. असें असून हि त्या त्या ठिकाणीं नमनाच्या ओंव्या च घातलेल्या आहेत, तेव्हां या अभंगरचनेच्या पूर्वीं जी कदाचित् ओंवीबद्ध प्रकरणांची रचना झालेली असावी, तिच्याबद्दल आदर असल्यामुळें त्यांतील नमनाचें हें अनुकरण असावें, असें दिसतें. ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीवरील ओंवीबद्ध प्रकरणामध्यें पान २१५ क्रमांक ७४३ यांत ११० ओंव्यांचें जें एक अत्युत्कृष्ट नमन आहे, तें पाहिलें असतां वरील कल्पनेची सार्थकता लक्षांत येण्यासारखी आहे.

ज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधिसंबंधाचें जें हें ओंवीबद्ध प्रकरण आहे, त्यांत सर्व ओंव्या च असल्या पाहिजेत हें उघड आहे; व त्याप्रमाणें त्या आहेत हि. फक्त या

ओंवीबद्ध प्रकरणांत आवटे यांच्या आवृत्तींत पान २०४ क्रमांक ७२३ यांत एक अभंग पडलेला आहे. परंतु तो निःसंशयपणें येथें चुकून पडलेला आहे, ज्ञानेश्वरांच्या समाधीसंबंधाचें जें अभंगबद्ध प्रकरण पान ७२९ क्रमांक ७६० पासून सुरू करण्यांत आलें आहे, त्या प्रकरणांतील च उघडउघड हा अभंग आहे, व त्या प्रकरणांत च तो अभंग नेऊन घातला पाहिजे. अशा रीतीनें हा अभंग तेथून काढला, म्हणजे बाकी सर्व ओंव्या राहतात. व मग हें शुद्ध ओंवीबद्ध प्रकरण ज्ञानेश्वरांच्या समाधीसंबंधाचें राहतें व सोपानदेवाच्या समाधीसंबंधाचें ओंवीबद्ध प्रकरण उपलब्ध आहे च. त्याप्रमाणें बाकीच्या समाधींचीं हि ओंवीबद्ध प्रकरणें कोठें तरी असलीं पाहिजेत, असें दिसतें.

## ६५ व्युत्पत्ति

( रा. शिवराम महादेव परांजपे )

### १ कोरान्न

कोरान्न = कोरें अन्न = कोरडें अन्न = भात शिजविण्याकरितां पाण्यानें धुऊन ओलें न केलेलें अन्न.

कोरान्न म्हणजे कोरें अन्न, अशी च या शब्दाची व्युत्पत्ति असावी, असें एकदम मनांत येतें. परंतु ती तशीच असेल, असा निश्चय होत नाहीं. तसा निश्चय होण्याला पुढील अभंग हें एक चांगलें साधन आहे. हा अभंग नामदेवाच्या गाथ्यांतील जनाबाईनें केलेल्या हरिश्चंद्र आख्यानांतील असून डोंबाच्या घरीं हरिश्चंद्र राहिला असतांना हरिश्चंद्राच्या जेवणाची कशी व्यवस्था करावयाची याविषयींचा आहे.

अनामिक त्यासि पुसे । तुमचें भोजनाचें कैसें ॥<br>
करसंपुष्ट जोडोनि । राव विनवी मधुरवचनीं ॥<br>
जेणें निघे तुमचें काम । राखा माझाही स्वधर्म ॥<br>
नृपा दिलें कोरें अन्न । सुखें करावें भोजन ॥<br>
धान्य घेऊनिया करी । राव आला गंगातीरीं ॥<br>
स्नानसंध्या नेम सारी । राजा स्वयंपाक करी ॥

आवटे आवृत्ति. पान ७५४ अभंग ३१६.

## २ पोहणें

नामदेवाच्या एका हिंदी अभंगामध्यें ' चले प्रोहण उतरोपार ' (आवटे आवृत्ति पान ६८२ अभंग २३४२ ) असा एक चरण आलेला आहे. त्याचा अर्थ ' नौका निघाली, नदीपार उतरून जा, ' असा आहे. संस्कृतामध्यें प्रवहण ( जें प्रकर्षेकरून वाहून नेतें तें ) याचा ' नौका, ' ' गलबत, ' असा अर्थ आहे. त्या प्रवहण शब्दापासून च वरील अभंगांतील प्रोहण हा शब्द प्राकृतामध्यें आला असला पाहिजे, हें उघड आहे. तेव्हां प्र+वह् यापासून ज्याप्रमाणें प्रोहण हा शब्द झाला आहे, त्याचप्रमाणें प्राकृतांतील नियमानुसार ' र ' चा हि आणखी लोप होऊन पोहणें हा हि मराठींतील शब्द प्र+वह् यापासून च निघून ' पुढें वहात जाणें ' या-अर्थी मराठी भाषेंत प्रचारांत आला असला पाहिजे.

( अ ) या वर दिलेल्या ' प्रोहण ' शब्दाशिवाय नामदेवाच्या अभंगांमध्यें ' पोहा ' असा हि एक शब्द पुष्कळ वेळां येतो.

पंढरीचा पोहा निघाला बाहेर । गरुडावरी स्वार देव झाले ॥

( ज्ञानदेवाच्या समाधीचे अभंग )

चक्रतीर्थी पोहा म्हणती आला थोर । वैष्णवांचे भार उतरले ॥

( मुक्ताबाईच्या समाधीचे अभंग )

पंढरीचा पोहा निघाला बाहेरी । कीर्तन गजरीं पुढें होत ॥

( निवृत्तीच्या समाधीचे अभंग )

या सर्व ठिकाणचा ( पोहा ) हा शब्द प्रवाह या शब्दापासून च निघालेला असून त्याचा अर्थ हि प्रवाह, ओघ असा च दिसतो. पंढरींतील लोकांचा प्रवाह म्ह० समुदाय बाहेर पडला, असा वरील चरणांतून अर्थ अभिप्रेत आहे.

( ब ) पाणपोय या शब्दांत ' पोय ' हा जो उत्तरार्ध आहे, तो हि ' पोहा ' या शब्दाचा च अवशेष ( पोहा, पोइ, पोय ) असावा असें दिसतें. आणि म्हणून च पाणपोय या शब्दाचा अर्थ पाण्याची पोय, पाण्याचा प्रवाह असा निष्पन्न होतो.

( क ) ह्या] वह् धातूच्या वंशविस्ताराच्या ओघामध्यें मराठी भाषेंतील ' मचवा ' हा हि एक शब्द विचारांत घेण्यासारखा आहे. मचवा हें गलबताच्या च एका विशेष जातीचें नांव आहे. आणि गलबतें हीं नेहमीं पाण्यांत संचार

करणारी असल्यामुळें पाण्यांत संचार करणारे जे मासे वगैरे जलचर प्राणी आहेत, त्यांच्यासारख्या आकृतीचीं, अगर त्यांचीं चित्रें काढलेलीं, अगर त्यांचीं नांवें ठेविलेलीं गलबतें प्रचारांत असणें, अगदीं स्वाभाविक आहे. या गलबतांना संस्कृतमध्यें जसा प्रवहण हा शब्द आहे, तसा च वहन किंवा वाहन हा हि शब्द आहे. तेव्हां माशासारख्या आकृतीचें वगैरे जें वाहन तें मत्स्यवाहन. या मूळ मत्स्यवाहन शब्दाचे मच्छवाहन वगैरे अपभ्रंश होत होत मचवा हा शब्द मराठींत आला असला पाहिजे, असें दिसतें.

## ३ विरवल्या

विरवल्या हा एक हल्लीं बायकांच्या पायांत घालण्याचा दागिना आहे. त्या दागिन्याचा वाचक जो विरवल्या हा शब्द तो संस्कृतमधील ब्रीदावली या शब्दापासून झाला असावा. कोणे एके प्रसंगीं श्रीकृष्णाला पहाण्याकरितां जाण्याची स्त्रियांची जी गडबड झाली, त्याविषयींचें वर्णन सेनान्हावी यानें एका पदामध्यें केलें आहे. त्यांत पुढील चरण आढळतातः—

> एकीं त्या ताटक घातलें पायीं । विरुद्या जोडवीं कंठाचे ठायीं ॥
> घेऊनि पोल्हार खोविलें डोई । वाळ्या वाक्या बांधिल्या कानाचे ठायीं ॥
>
> आवटे आवृत्ति. पान १८० अभंग १६३

यांत विरुद्या हा जो शब्द आला आहे, तो ब्रीद याचा च अपभ्रंश होय, हें स्पष्ट आहे. विरुद्या आणि जोडवीं जीं पायांत घालावयाचीं, तीं कृष्णदर्शनासाठीं उत्सुक झालेल्या स्त्रियांनीं कंठांत घातलीं, असें येथें वर्णन आहे. त्यावरून विरुद्या अगर ब्रीद हा पायांत घालण्याचा च एक दागिना असला पाहिजे. तसें च भानुदासांच्या एका अभंगामध्यें

> दीनबंधु ब्रीद भलें । जरी त्वां चरणीं बांधिलें ॥
>
> ( एकनाथांची गाथा, आवटे आवृत्ति पान १४ अभंग ६६ )

असा एक चरण आहे. त्यावरून हि ब्रीद अगर विरुद्या हा जिन्नस पायामध्यें च पूर्वीं असे, असें दिसतें. व हल्लीच्या विरवल्या हा हि पायांत घालावयाचा च एक दागिना आहे. तेव्हां वर्णसादृश्य आणि अर्थसादृश्य या दोहोंच्या हि प्रमाणांवरून ब्रीदावलीपासून च ( ब्रीदावली = बिरुदावली = विरुद्यावली = विरुआवली = विरवली अशा रीतीनें ) विरवल्या हा शब्द उत्पन्न झाला असला पाहिजे, असें प्राप्त होतें.

### ४ आवंढ्या

' आवंढ्या नागनाथ ' यांत आवंढ्या हा जो शब्द येतो, त्याचा अर्थ काय असावा, हें सहजपणें लक्षांत येत नाहीं. परंतु नरहरि सोनाराचा एक अभंग आहे, त्यांत त्यानें बारा ज्योतिर्लिंगांचें वर्णन केलें आहे. त्यांतील एक चरण येणें-प्रमाणें आहे—

नागनाथ अमृतोदकीं । विश्वजन केले सुखी ॥
परळी वैजनाथ सुखी । सुकृत सार्चे जन्माचें ॥

( आवटे आवृत्ति. पान १५५ अभंग ३४ )

यावरून ' अमृतोदक ' हे नागनाथ या ज्योतिर्लिंगाच्या वसतिस्थानाचें नांव असलें पाहिजे, हें उघड होतें. तेव्हां जो अमृतोदकीं वास्तव्य करणारा, म्हणजे अमृतोदकीय, तो च अमुअउडईअ = अउंडीय = अवंडीय = आवंड्या = आवंढ्या असावा, असें दिसतें.

## ६६ जगनाड्यांच्या वह्या व त्यांतील महत्वाची कविता

( ले. दत्तो वामन पोतदार, पुणें )

१. मुक्काम तळेगांव दाभाडे येथें संताजी जगनाड्याच्या घराण्यांत महत्वाच्या चार वह्या आहेत. पैकीं एक खुद्द संताजीच्या च हातची आहे. ( विश्ववृत्त वर्ष २ अंक ९ व केसरी ) या वहींत थोडासा अन्यलिखित मजकूर आढळला त्याचें टांचण खालीं देतों.

वहींत संताजींच्या हातचें जेवढें म्हणून लिखाण आहे त्यावर दर नूतन कवनाच्या प्रारंभीं " वीठल " अशीं अक्षरें असून शिवाय \|/ अशी एक खूण डोक्यावर केलेली हटकून आढळते. अर्थात् हीं दोन्हीं जेथें नाहींत व अक्षर शाई वगैरे सर्व च भिन्न आहे तें सर्व निर्भ्रांत अन्यलिखित. असो, टांचण येणेंप्रमाणें:—

१ पृ. १२ चा पृष्ठभाग
२ पृ. १३।१४
३ पृ. १८८ वरील तुळसीस्तोत्र

४ पृ. १८९ सर्व हिंदी पद

५ पृ. १९५ शेवटच्या चार ओळी

६ पृ. २५३ शेवटचें पद्य

७ पृ. २५४ सवंद

८ पृ. २५५ आरंभीच्या कविता–"सौरा चांगाचा व पीसो बहिराचा

९ पृ. २६० ४५ व्या ओंवीपासून सभापर्व अखेर

२. तुकारामाच्या अभंगांशिवाय या च वहींत कान्हो पाठक, नामदेव, एकनाथ, ज्ञानेश्वर, विसोबा खेचर, बहिरा पिसा, चांगदेव इत्यादि अनेक ज्ञाताज्ञात साधु-कवींची कविता मधून मधून उतरली आहे. त्यांतील महत्वाची जितकी फुरसती-प्रमाणें मला उतरून आणतां आली तितकी सोबत दिली आहे. त्यांपैकीं बहुतेक सर्व च नवीन आहे. बहिरा पिसा, कान्हो पाठक यांची कविता–बहिरा जातवेदाचें भागवत सोडिलें तर–तर आज च पहिल्यानें प्रसिद्ध होत आहे. धोंगडा, शिव-दास कुंडेशाचा, पणाभी विश्वनाथ वगैरे कवी तर अश्रुतपूर्व च आहेत. असो! संताजीच्या वहीचें महत्त्व अपूर्व च आहे खरें!

## वही २ री

१. हीं २३६ पृष्ठांची वही संताजीचा पुत्र बाळोजी याचे हातची आहे. यांत संताजीच्या वहीचा उतारा च पुष्कळ असून, नामदेवकृत 'स्वर्गारोहन' (पृ. २०७–२१६) वगैरे कविता आहे. पृ. १९२–२०७ पर्यंत प्रऱ्हादचरित्र असून अखेर पृ.२०७ वर बाळोजीची सही आहे. (सके १६५५) पृ. १४१ 'सीवरात्री' संपूर्ण झाल्यावर हि बाळोजीच्या हस्ताक्षराचा उल्लेख आहे. पुनः पृ. १८१ कबीरआख्यान-अखेर तो च प्रकार आढळतो. (सके १६५५) 'परमादी संवत्सरे आस्वीन सुद प्रतीपदा वार गुरवार समाप्त'–असा उल्लेख तेथें आहे.

२. पृ. २१६ वर तुकारामाच्या निधनाची मिती येणेंप्रमाणें आहेः—

"श्रीनृप सालीवाहाण सके १५७२॥ वक्रिती नाम संवतसरे फाळगुण वदी २ द्वीतीया वार सोमवार ते दीवशीं तुकोबा गोसांवी वैकुंठास गेले स्वदेहीनसी गेले–णमस्तुः छ॥"

३. पृ. २२६–२२७ वर कोण्या भागूचे अभंग आहेत.

४. पृ. १८८–१९२ वर "ओव्या नीवृतीच्या" दिल्या आहेत. आरंभ असाः—
"श्रीगणेशायनमाः श्री सरस्वतीये नमाः श्रीगुरुभ्यों नमाः नाथाये नमाः देवादी-

देव हंस : हंसासी दीधला उपदेश : हंस परमहंस : दोन्ही समरस : जाले जेथे ॥ १ ॥ " असून, शेवट येणेंप्रमाणें आहे:—

" यावरी गुरुने सीस्य आलंगीला : सीस्ये अनंदें बोधला : तें ज्ञान अनुवादला नीवृती अवधुत : ॥ ८३ ॥ शद्गुरुअनंदप्रसादें : वाचा प्रकासें अनंदें : तें सुष अनुवादे : परांपरा : ॥ ८४ ॥ अमुल्ल अनुउपम्यें जें : ईती प्रेमप्रकास ग्रथ संपुर्न जाला : बोलें नीवृतीलीग अवधुत : येथार्थेसी : ॥ ८५ ॥ छ ॥

☞ हा आनंदशिष्य निवृत्तिलिंग कोण ?

## तिसरी वही

१. ही हि वही बाळोजीची च. कारण शेवटच्या मलपृष्ठाच्या पाठीवर

"॥ बाळोजि तेलि जगनाडे कसबे चाकन याचि वहि आस ॥"

असा लेख आहे. अक्षर सर्वत्र एक वळणाचें, टप्पोरें व सुंदर आहे. पृ. ९९ वर एक "भगतनामावळी" आहे, पृ. १५२ वर एक महत्वाचें संतस्मरण आहे त्यांतील अंतिमोल्लेखावरून च बहिरा जातवेद हा च बहिरा पिसा असा सिद्धांत मला बसवितां आला. ( भा. इ. मं. अहवाल १८३४/१ पृ. ७० पहा )

## चौथी वही

१. एकाच्या च हातची दिसत नाहीं. बारकाईनें पाहतां मला त्यांत दोन लेखकांच्या सह्या आढळल्या. पृ. ६७ वर

[ नामदेवाचे ] " अभंग ६९ ॥ येक्रोनाहातरीं : ॥ ईति श्री सिधसंवाद : ग्रंथ समाधी संपुर्णमस्तु : ईदं पुस्तकं संरक्षीते : संताजी तेलि जगनाडे : कसबे चाकण : ॥ श्रीसके १६५६ आनंद नाम स्वछरे भाद्रपद मासे : वद्ये प्रतीपद ॥ १ ॥ (ही मिती बरोबर आढळली ) वार मंगळवार ते दीनि ग्रंथ समाप्त संपुर्णमस्तु हस्त आक्षेर रघुनाथ गोसांवि आदीनाथि : शुभभंवतु : ॥ छ ॥ असा लेख आहे.

२. यानंतर या च पुढें पृ. १०० वर " ज्ञानदेवी ब्राम्हण धरणे बैसला होता. दीवस ४२ बेताळीस : या कारणें तुकाया गोसांवी याणी अभंग केल्ले येकतीस : ॥ ३१ ॥ हें लीही सही : संताजी तेली सोनवनी हस्त अक्षेर : भागोजी जगनाडे : कसबे चाकन : श्रीराम जय राम " असा लेख आहे. बाळोजीची वही ( वही दुसरी ) पृ. २२६–२२७ वरील जे भागूचे अभंग ते यावरील भागोजी जगनाड्याचे असतील काय ? परंतु त्यांतील एका ' मी रे अपराधी मोटी ' या अभंगावरून भागू ही व्यक्ति स्त्री आहेसें दिसतें.

३. वरील उल्लेखांतील " संताजी तेली सोनवनी " हे शब्द महत्वाचे आहेत. संताजीचें मूळ आडनांव सोनवणे होतें म्हणतात व त्याचा च हा उल्लेख असावा. परंतु जगनाडे व सोनवणे हीं दोन आडनांवें कशीं पडलीं तें उमगत नाहीं. अस्तु. याशिवाय या वहींत निवृत्तीचा " प्रेमप्रकास " ज्ञानेश्वराचे सप्तसमासात्मक ' पंचीकर्ण ' वगैरे बरें च कवन लिहिलेलें आहे.

४. या सर्व वह्यांपैकीं संताजीची अशी एक च व तिचें च महत्व शोधकांना, भाविकांना, सर्वांना च विशेष होय.

५. संताजीची समाधि तळेगावांजवळ च सुदुंबे गांवीं आहे. तुकाराम व संताजी यांचा एकमेकांना मूठमाती देण्याचा संकेत ठरला होता इत्यादि हकीकत जगनाड्याचे घरीं मला कळली. आपल्या ' केसरीं'तील लेखांत रा. पांगारकर यांनीं ही हकीकत दिली असून या प्रसंगासंबधींचा खालील अभंग हि पण दिला आहे. ( मुमुक्षु चैत्र शु. ११।१८३५ पहा )

चारितां गोधन । माझें गुंतलें वचन ॥
आम्हां जालें येणें । येका तेलियाकारणें ॥
तीन मुठी मृत्तिका देख । तेव्हां लोपविलें मुख ॥
आले म्हणे तुका । संत नेला विष्णुलोका ॥

संताजी, गंगारामबुवा, शिवजी कासार, अंबाजी लोहगांवकर वगैरे तुकाराम-भक्तांच्या हकीकतीवर चांगला शोध करून पुष्कळ नवीन प्रकाश पाडणें अगत्याचें आहे. पुण्यास ' तुकाराममंडळी ' आहे तिच्या कार्यक्षेत्रांत हें येत नाहीं काय !

## पहिली म्हणजे संताजीची वही

॥ : वीटळ : ॥ V

( पृ. २०४।२०५ ) : ॥ धृवकः ॥

जरी तुज देवाची चाड : तरी न करीं बडबड बहुत बोळता वाड : पडसि पतनी : ॥ १ ॥ जरी तुज देवाची बाधा : तरी न करीं वेवादा : ॥

वाद् करीतां नींदा : पडती दोश : ॥ २ ॥ जरी तुज देवाचा छंद : ॥ तरी सांडीं काम क्रोध : तेणे परमानंद: होउनी ठासी : ॥ ३ ॥ जरी तुज देव ची होवा : ॥ तरी मौन धरीं पां जीव्हा : तेणें तुं अनुभवा : पावसीळ : ॥ ४ ॥ जरी तुज देवाचा सांगात : होवा अखंडीत : तरी बैस पां नींवात : साधुसंगी : ॥ ५ ॥ जरी तुज देवाचा वीस्वास : तरी हृदैंई धरीं नागेश : म्हणे **कान्हो पाटक** अरे जना : ॥ ६ ॥ छ ॥ छ ॥

वीठळ \|/

धृवक

आपळा भक्त भीश्म पडीयेळा रणीं: त्यासी गोवींदें नीर्वाणी : ॥ भेटी दीधळी : ॥ १ ॥ कर्णु वीदारीळा अर्जुनाचा बाणी : त्यासी गोवींदें नीर्वाणी : भेटी दीधळी: ॥ २ ॥ हरीश्चंद्र वाहे डोंबा घरीं पाणी : त्यासी गोवींदें नीर्वाणी : भेटी दीधळी : ॥ ३ ॥ राजा परक्षीती बैसळा मरणाचा आसनी : त्यासी गोवींदें : नीर्वाणी/: भेटी दीधळी : ॥ ४ ॥ **जनमैत्रनागा** म्हणे गोवींद धरा मनीं : तेणें त्रिभुवनी : सरता होसी : ॥ ५ ॥ छ ॥ छ ॥

\|/ वीठळ

धृवक

सभे न ळगते ळावी : उगवळें गोवां : राउळीं सोवी : तो चांडाळ : ॥ १ ॥ येकवाट जेवीं घांस जो मोर्वा : असेव्य सेवी : तो चांडाळ : ॥ २ ॥ वाहावतां मांहापुरीं : मोकळी दुरीच्या दुरी : ॥ शब्दें संचरे परनारी : तो चांडाळ : ॥ ३ ॥ शरण आळीया वैरी : अनुसरळीयां मारी : ॥ मैत्रीं वैर चाळी : तो चांडाळ : ॥ ४ ॥ **नामा** म्हणे केशव येसीयां नुधरी : असती जन्मवरी : भुमीं भार : ॥५॥ ॥ छ ॥

\|/ वीठळ

धृवक

आपुळें म्हणवीसी : यातीभेदु तो काये करीसी : अजमीळ गणीकेसी : उधरीळें : ॥ १ ॥ अंतरीचें जाणसी : वाचा ते काये करीसी : पाशांणपशुसी : उध-

ळिळें : ॥ २ ॥ भक्तांचा वेडा : न म्हणे साना थोर : उपमन्य धृव : उधरीळे : ॥ ३ ॥ नीकोनी नीरोपमा नेणे अपार : नीस्टूर असूर : उधरीळे : ॥ ४ ॥ पतीत पातका भोगी योगी : यांस समदृस्टी : नामे सकळ श्रुस्टी : उधरीळी : ॥ ५ ॥ चांगा म्हणे ते नाम : आपण ध्यान करणें : आपण वटेस्वीरीं : भेदु नाहीं : ॥ ६ ॥ छ ॥ छ ॥

( पृ. २०१ व २०२ )

वीटळ : ॥ नाट

आधी चेतन्यें आपेतें करीं : मग संचरें तारुणवनी : कामक्रोध तुज देखोनी : जाती पळोनी : ॥ यारा वाटा : ॥ १ ॥ तुज पाठीं कोण धावें । कवण टाकी कवण पावे : काम क्रोध जग मोहावे : कासया सीरवावे : पोटीं पाये : ॥ २ ॥ माया मोहो जाळी तुटेळ पळ : आहे : गरळ मा कैचा व्याळ : का रे स्मरतोसी गोपाळ :

\\/ पृ. २०२

मीथ्या व्याकुळ : काजेंवीण : ॥ ३ ॥ वैराग्यें दृढ होंई : ॥ नीरुता : ॥ परस्त्री तीतुकी मानीं पां माता : कासया भीतोसी चपेट घाता : वीशयांनीमीता : अल्पा-साटीं : ॥४॥ धर्माचेनी मार्गें रीघाळा कर्ण : सीध्र चक्रवर्ती : जाळा जीवीतवाहान : तया माजी सांग नाडळा कोण : ळटीकी झकवण : ॥ कां बोळोतोसी : ॥५॥ इंद्रींयां गोड तें आरोगीजे : ॥ मग धणीवरी धावा पोकारीजेः काये रे सांगो स्याहाणपण तुझें : ॥ खेचर वीसा म्हणे : अरे नामयां ॥ ६ ॥ छ ॥ छ ॥

( पृ. २०६ व २०७ )

वीठळ \\/

सात भरळी पहीले पाहरीं : ळोक व्यापारीं गुंतळे : ॥ १ ॥ धृ. ॥ येयें साते आळा चांगा : स्वरुप जगा : दावीतोसे : ॥ छ ॥ उंच परी काळा दावी जगा : केवल्य पाहा गा : दावीतो : ॥ २ ॥

\\/ पृ. २०७

जे वेळीं जोडेसें दावी हातें : अंबर तेथें घणावळें : ॥ ३ ॥ दसमीं दोंडां :

नीवृत्ती कडासने : भवंताळीं पसरीळों हरी वासनें : ॥ ४ ॥ सार हें केर्णे भरीयेळें ह्रादी : अमृत घोटी चांगदेव : ॥ ५ ॥

: ॥ वीठळ : ॥ ४

कारीसवाणी न व्हावा : सेखीं दइनवदन न दीसावा गा देवा : ॥ १ ॥ धृ ॥ मातें कोण्हीं नेणें : संखीं तुमतें ळाजीरवाणें गा देवा : ॥ छ ॥ जया तया परी तुझा चो पैं गा : वीनवी चांगा : वटेस्वरा ळींळींगा : ॥ २ ॥ छ ॥

वीठळ ४

ह्रातीं राख पाईं राख मातें राख वीठळा : ॥ १ ॥ धृ ॥ येथें रास तेथें राख : मातें राख वीठळा : ॥ छ ॥ केशवदास चांगा पांई राख : मातें राख वीठळा : ॥ २ ॥ छ ॥

वीठळ ४

अवघा सोंसार सुखाचा करीन : ॥ आनंद भरीन तीन्ही ळोक : ॥ १ ॥ धृ ॥ जाईन गे माये तया पंढरपुरा : भेटैन माहेरा आपुळीया : ॥ छ ॥ सर्व सुकृताचें फळ मीं च ळाहेन : ॥ क्षेम देईन : परब्रंम्हीं ॥ २ ॥ बाप रकुमादेवीवरा वीठ-ळाचे भेटी : ॥ आपुली सर्वसाटी करुनी ठेळा : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥*

: ॥ : वीठळ ४

जाईन यात्रे मनोरथें : श्रीवीठळातें भेटावया : १ ॥ धृ ॥ आमुचें कुळदेवत जाणा : वीठोबा राणां : पंढरीये : ॥ छ ॥ काबल्ली काखे गोधन राखे : तो हरी देखें पंढरीये : ॥ २ ॥ नीरंतरा स्वामी वीठळ राजे : नाचन भोजें : आनंदें ॥ ३ ॥

वीठळ ४

स्वप्नीच्या घायें वीवळे साचें : चेईळीयावरी म्हणे मीं न वंचें : ॥ १ ॥ धृ ॥ जन तैसें माया भुळळें : आपुळें : हीत चुकळें : ॥ छ ॥ आपीं आप असे : मीं काय जाळोंसें : ळोकां पुसे : ॥ २ ॥ बाप रकुमादेवीवरा वीठळें : गुरुमुखें खुणां उगवीळें ॥ ३ ॥ †

---

* २०८ आवटी गाथा. † ४९८ आ. गा.

: ॥ वीठळ : ॥ ѱ

जैसा आंबा वर्षत पाडी : तैसी धरीं गोडी कीर्तनीची : ॥ १ ॥ धृ ॥ न करी धात मात न ळवीं वेल्हु तेणें हा गोपाल्हु : अंतरळा : ॥ छ॥ दुधा वरीळ साये मधेंसीं गोडीं : तैसी धरीं आवडी : रामनामीं : ॥ २ ॥ जतीचा सांटा : तो वैश्णव ळाठा : म्हणतसे वीठा : नामयाचा : ॥ ३ ॥ छ॥*

( पृ. २०८ )

: ॥ वीठळ ॥ : ѱ

काये गाणीव : काये जाणीव : कये शाहाणीव : कीर्तनीची : ॥ १ ॥ धृ ॥ ठाक तोडीळे : डोल्हे मोडीळे : ळोक मानवळे : बरें गातो ॥ छ ॥ हरीचें नाम तुं गाउं नेणसी : वांयां कीर्तनीं उभा ठाकसी : ॥२॥ हरीचें नाम तुम्हीं गा रे प्रेमें : ॥ वीठा म्हणे माझ्या बापाच्या नावें : ॥ ३ ॥ †

ѱ ( पृ. २१० )

वीठळ

सेल्ली साप देखे चरेना राहंती : ठक ळागळें चीती : तैसें जाळें : ॥ १ ॥ धृ ॥ नवळ वीतळें : माझें म्यां देखीळें : बोळणें खुंटळें : बाईयानो : ॥ छ ॥ सोहंबोध कैसा अंतरीं बोल्ळळा : नीवांत राहीळा : बहीरो पीसा : ॥ २ ॥

( पृ. २३३ )

ѱ ळळीत वीठळ :

ब्रम्हं ब्रम्हीं चल्लैसी खरी : प्रगट गीता ज्ञानेस्वरी : ॥ १ ॥ धृ ॥ गीता गंभीर गंगा : ज्ञानदेवीं प्रगट जगा : ॥छ॥ तीं ही ठांई वक्र वाहे : पुर्वपरा जात आहे : ॥ २ ॥ श्लोक सात शतें : बोध चाळती कौतुकें : ॥ ३ ॥ सचीदानंद बाबा सींधु : संगम जाळा सोहंबोधु : ॥ ४ ॥ छ ॥

ѱ वीठळ

आपळा माथा आपण उडे : चरणाहुनी पळीकडे : ॥ १ ॥ धृ ॥ अउठ हात गील्हीळें : जेणें : आत्मज्ञान तो ची जाणे : ॥छ॥ आपणातें गील्ही उगल्ही :

---

* ८२ आ. गा. † ८१ आ. गा.

चंद्र जेनीराळी : ॥ २ ॥ आपणातें साना थोर : दीप जैसा नीरंतर : ॥ ३ ॥ सचीदानंद आत्मा जैसा : जाणरे बापा अनुभव तैसा : ॥ ४ ॥ छ ॥

## ॥ वीठळ

संध्या स्नान न घडे येका : तयासी कर्म अती . जड देखा : ॥ १ ॥ धृ ॥ ते जीव उधरळे उधरळे : ज्ञानदेवीं मुक्त जाळे : ॥- छ ॥ सचीदानंद बाबा साचा : त्यासी प्रसाद ज्ञानदेवाचा : ॥ २ ॥ छ ॥ छ ॥

## वीठळ ॥

नख केश वीर्य स्छंभ नेणे : शरीर राखे : येसें जगा सांगे : ॥ १ ॥ धृ ॥ तो येक ठक ळटीका जगीं : जीव्हा चाळवी पोटाळागी : ॥ छ ॥ दंड कुमंडळ मेखळी : वीभुती डोळे ळोहाकरी : ॥ २ ॥ नेणें डंश चौपदी वाणी । उदंड बोळें नव्हे ज्ञानी : ॥ ३ ॥ सचीदानंद आत्मा येक : वीकट वेशें भुळवीळे ळोक : ॥ ४ ॥ छ ॥ छ ॥

( पृ. २३८ )

## वीठळ ॥

संतजन ते साचार : राया वीठोबाचे डींगर : ॥ नामकीर्तनी अपार अहीर्णीसी गर्जती : ॥ १ ॥ धृ ॥ प्रेमे बोधळे डूळती : रामनाम जपती ॥ छ ॥ आसळेभ देहे : वेगळाळे : सदा हृदंई नीवाळे : देशकाळातें ( पृ. २३९ ) वीसरळे : ते संत माउळी : ॥ २ ॥ ते संत सचीदानंदाचीया मूर्ती : रामनाम जपती : जोगा वीनवी पुडतोपुडतीं : तें संत हो माहेर : ॥ ३ ॥

## वीठळ ॥

आळा वैस्णवांचा मेळ : पळाळा कळीकाळ : ॥ १ ॥ धृ ॥ आळे आळे हरीदास : कळीकाळावरी घाळुनी कास : ॥ छ ॥ कळमक्षां पडीळा धाक : तें पळाळी देउनी हांक : ॥ २ ॥ पैळ नामा केशवाचा : सर्वे मेळु वैस्णवांचा : ॥ ३ ॥ छ ॥*

---

* १४१० आ. गा.

## ॥ वीठळ

वींच उमटले अंबरी : गरुड झळके टकयावरी : ॥ १ ॥ धृ ॥ पैळ टका रे कोणाचा : नामा येतो केशवाचा : ॥ छ ॥ नामा येतो ळोटांगणी : परसा ळागोतो चरणी : ॥ २ ॥ छ ॥ छ ॥*

## वीठळ ॥

संख चक्रीं तनु शोभन : मुखीं नामसें गर्जत : ॥ ० ॥ धृ ॥ वैस्णव तेज रे झळाळ : सुर्यापरीस ते नीर्मळ : ॥ छ ॥ सदा नेत्रीं अनंदजळ : हृदईं सतंत गोपाळ : ॥ २ ॥ केशवदास सरणागत : त्या सांगातें पंढरीनाथ : ॥ ३ ॥ छ ॥

## वीठळ ॥

येथुनी दीसे माहाद्वार : काठी कांबळी आपार : ॥ १ ॥ धृ ॥ चांगा येतो ळोटांगणी : रुळत वैस्णांचां चरणी : ॥ छ ॥ केशवदास आनद मनी : देव बैसले सींहासनी : ॥ २ ॥ छ ॥

## ॥ वीठळ

उभारीले गरुड टके : वैस्णंव संमारभें नीकें ॥ १ ॥ धृ ॥ दुरुसेनाचेनी भोजें : आणीकें नाहीं मज काजें : ॥ छ ॥ टाळ मृंदाग झणकारती : वैस्णव हरीनामें गर्जती : ॥ २ ॥ मस्तकी नीर्माल्य तुळसी : ॥ मीं डींगरुं वीठळा : ॥ ३ ॥ कंठ भरला तुळसीमाळी : पवीत्र गाणें नामावोळी : ॥ ४ ॥ तेणें अनंदें मी गगनाचा : सीवदास म्हणे कुंडशाचा : ॥ ५ ॥ छ ॥ छ ॥

## : ॥ : वीठळ ॥

गरुडटके ज्याचा भारी : कुंचे झंळकती अंबरी ॥ १ ॥ धृ ॥ पैळ आळे वारकरी : नामें गर्जते पंढरी : ॥ छ ॥ येक बागडीं धरीती : ॥ येक हुंबरी घाळीती : ॥ २ ॥ येकां हातीं चीपळीया : येक वाताती टाळीया : ॥ ३ ॥ तयां देखोनी पंढरीनाथ : ॥ मोहोरे सामोरा धांवंत येत : ॥ ४ ॥ देवां भक्तां जाल्या भेटी : ॥ धोंगडा ळोळे वाळवंटीं ॥ ५ ॥ छ ॥

## वीठळ ॥

गांवं नेणें परी गाईन : नाचों नेणें परी नाचैन ळाज आळी तरी दवडीन : तुझीये

---

* १६ आ. गा.

भक्ती कारणें : ॥ १ ॥ धृ ॥ तरी मीं नेणता नीळाजीराः ॥ हरी तुजळागी दातारें : ॥ छ ॥ नेणतपणे काये

( पृ. २४० )

शाहाणीव मीरवीत : जैसें मातेपुढें आप्त : म्हणे पणाभी वीस्वनाथ : गात वात तुज पुढां : ॥ २ ॥ छ ॥

वीठळ ॥

पेंधा म्हणे रुसीकेसी : आरुश बोचडें हें परीयेसी ॥ १ ॥ धृ ॥ या रे नाचों अवघे जन : गांवं हरीनामकीर्तन : ॥ छ ॥ कान्हो पाटक बागडा : ॥ नाचे वैस्णवां पुढा : ॥ २ ॥ छ ॥

वीठळ ॥

वेद गणीतां मर्यादिला : ॥ तरी तुं अगाध बा वीठला : ॥ १ ॥ धृ ॥ येव्हढें माप कैचें थोर : ज्याणें उमाने तुमंचा पार : ॥ छ ॥ शेश वर्णीतां श्रमला : जीव्हा दुखंड होउनी ठेला : ॥ २ ॥ म्हणौनी कान्हो पाठक उगा : मौने मवीं पांडुरंगा ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

वीठळ ॥

गाये तो गाणु : नाचे तो नाचनु : परीसे तो जाण : भेदवादी : ॥ १ ॥ धृ ॥ नव्हे तो संतु : योगी ना भक्तु : जो लोकांतु : डंब करी : ॥ छ ॥ पढे तो पढता : उपळवी भक्ता : कवीत्व करीता : ख्याती ळागी ॥ २ ॥ पाठक कान्हो म्हणे वरदळ ळटीकें : जवं जीव सात्वीकें : वीनटेना : ॥ ३ ॥

वीठळ ॥

परमानंद जोगा

चंदना आंगीचा परीमळ, : नीघे नीर्जीवां कास्टाचा हृदई रीघे (?) ॥१॥ धृ ॥ येसें जयाचें बोळणें आहे : तयाची मज दाखवा सोये : ॥ छ ॥ वचन जवं वीसंवे कानी : तवं तो परीपाकु ची मनी : ॥ २ ॥ श्रवणद्वारा पीयुश रीघे : बोसंडोनी : मग बाहेर नीघे : ॥ ३ ॥ ववेकसुखें वीचरे जनीं : सुबुद्धी सदा मनी : ॥ ४ ॥ जोगा म्हणे नामभेदे : तो साधु : अनुभवी तो ची परमानंदु : ॥ ५ ॥

॥ : ॥ वीठळ : ॥

चंद्ना अनीळें : अनेत्र चंदन : तरी तया पुश्पी रमताती : ते सांग कोण : ॥ १ ॥ धृ ॥ तरुमुळ डाळ पुश्पें अनंदाची : कैसीं फळें पीकलीं तयाचीं ॥ छ ॥ परीवार प्रसाद : परीसुची आघवा : अंतरगर्भी प्रतीमा : ते कोण माहादेवा : ॥ २ ॥ जोगा म्हणे हरीगुण : तनु मनु भुळवण : तरी परमानंदा : तुझें कोण पा दर्शन : ॥ ३ ॥ छ ॥

: ॥ वीठळ : ॥ ॥

रोमाच रवरवीतु : स्वेदबींदु ढळमळीतु पाहातां नेत्र उन्मळीत : मग मीळोत मागुते : ॥ १ ॥ धृ ॥ यैसा हृदईं प्रकटसी : कै माझ्या नरहरी ॥ छ ॥ तुज देखतां तनु कांपे : मन बुधी पैं हारपे : सकळ ही अहंभाव लोपे : येक तत्व ची उरे : ॥ २ ॥ अस्ट ही भाव सात्वीक गुण : प्रेमें भरीत

॥ ( पृ. २४१ )

अंतकरण : ते मज देईं गा नारायेणा : जोगा शरण तुज आला : ॥३॥ छ ॥

॥ वीठळ

हृदईं प्रगटला साकार : जो लावण्ये गुणसागर : परमानंदें वाहे पुर : तेणे गहींवर न संवरे : ॥ १ ॥ धृ ॥ प्रेमे पाझरती लोचन : पाहातां जगजीवन : ॥छ॥ मेघश्याम पाहातां आपेंआप : डोळ्यां लागलें वडप : अस्ट ही सात्वीकांचें रोंप : हृदये आलां उगवलें ॥ २ ॥ भक्ती भावें घोल्हावलें : प्रेमफळासी पैं आलें : नव-वधा हें पीकलें : परमानंद म्हणे जोगा ॥ ३ ॥ छ ॥

वीठळ ॥

वाचा लोधावली गुणां : स्वरुपीं राहीले लोचन : चरणी स्थीरावलें मन : जग-जीवन देखीलीयां : ॥ १ ॥ धृ ॥ तो म्यां देखीला देखीला : वीठळ पंढरीचा राजा ॥ छ ॥ भानु बींबें अती सुढाळ : मन मंडीत वक्षेस्छळ : चरणी तेंजाचे झळाळ : मुगुटीं कीरणें फांकती : ॥ २ ॥ यैसा नयेनी देखीला : तो मज अनु-भाई जाला : ॥ जोगा वीनवीतो वीठला वोसंडला अनंदु : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

॥ वीठळ : ॥

संत आलीयां अवसरी : नवळ आरतीयांची परी : आनंदले नरनारी : परमा नंद प्रगटले : ॥ १ ॥ धृ ॥ मन नीवालें नीवालें : कैसें समाधान जालें ॥ छ ॥

धावया आळींगण : बाह्या येतसे स्फुराण : सजल्ळ जाळे लोचन : जैसे मेघ वर्षेती : ॥ २ ॥ आजी सुदीन सोहळा : संत जीवनाची कल्ळा : जोगा वीनवीतो सकल्ळा : भेटी परमानंदेंसी : ॥ ३ ॥

\ ᗐ वीठळ

तुझेनी श्रवणे दातारा : नेत्रीं आश्रुचीया धारा : हे तनु कांपे थरथरां : अहंभाव नीमाळे ॥ १ ॥ धृ ॥ येसा सोहळा भोगीती : न कल्ळे दीन कीं राती : ॥छ॥ शरीर आपुळें न म्हणे । तन्हीं पाल्हेजे श्वेदकणे : सर्वांगी रोमांच उठणें : तुझेनी श्रवणें : दातारा : ॥ २ ॥ मन बुधी वीरे ते उन्मनी : दृस्टी पुंजाल्ळे : नयेनी : यका शरण जनार्दनी : अनुसंधानी लागलीयां : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

वीठळ ᗐ

धृ ॥ सीर वीकळें चरणासी । वाचा तुझीया नामासी : आइकें प्रल्हाद पुरपती : नयन तुझीया : रुपासी : ॥ छ ॥ परीचर्या दंडपाणी देहे घाळीन लोटांगणी : ॥१॥ वछरा म्हणे संतसंगीं : कांहीं नुरे चीं येमाळागी : ॥ छ ॥ छ ॥

(पृ. २४२–४३)

वीठळ ᗐ

भक्ती हे घोंगडी : पांघुरलों फुडी : उतरलों थडी : भवनदीची : ॥ १ ॥ धृ ॥ घोंगडें सांदी उभा मांहांद्वारीं : वाचे नीरंतरी : नामघोश : ॥ छ ॥ रगठीया पाटोल्या दीधलांसे गांठी : केली संवसाटी : घोंगडीयां ॥ २ ॥ जोगया स्वामी : गोपाल्ळ हरी : घोगंडीयां थोरी : देतु असे : ३ ॥ छ ॥

ᗐ (पृ. २४३)

अवघीं घोंगडीं नेळी हाटा : दाणी चोहोटां पंढरीये : १ ॥ धृ. घोंगडें सांदी छपावया जाये : ॥ १ ॥ धृ ॥ मागुता चांगा नये : गे माये : ॥ छ ॥ छपीतां घोंगडें देर्सीळें घरें : राखीलें उदारें : पांडूरंगे : ॥ २ ॥ घोंगडीया त्याणें घातल्ळी मीठी : सौंसारासी तुटी : म्हणे चांगा : ॥ छ ॥*

---

* ७७ आ. गा.

( पृ. २५० )

## भानुदास : वीठळ ॥

आकाश वरी पडों पाहे । ब्रह्मगोळ भंगा जाये : वडवानळ त्रीभुवन खाये : तें तुझी च वास पाहें : ॥ १ ॥ धृ ॥ न करीं आणीकांचा पांगीळा : नामधारक तुझा आंकीळा : ॥ छ ॥ सप्त ही सागर समरस होती : तैं हे वीळया जाईळ क्षीती : पंच माहाभुतें प्रळये पावती : तैं तुं च माझा सांगाती : ॥ २ ॥ भळतैसें जड पडो भारीं : नामं न संडी न टळें नीर्धारीं : पतीव्रता जेवी प्राणेश्वरी : भानुदास म्हणे अवधारीं : ॥ ३ ॥ छ ॥ †

## वीठळ ॥

जाडीचें घोंगडें येव्हडींये रानी : कानीचीं कुंडळें देतीं जगा जोती : ॥ १ ॥ ॥ धृ ॥ वोळखीळा वोळखीळा वोळखीळा खुंणा पंढरीचा राणा : ॥छ॥ होये नव्हे येसा संशये गमळा : नीर्धारीता वीस्वव्यापक देखीळा : ॥ २ ॥ हृदयेमंदीरी दाटूनी धरावा : हे खुन जाणे भानुदास देवा : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

## वीठळ ॥

गोरे सावळे धनुवाडे : येक चाळती येकां पुढें : ॥ १ ॥ धृ ॥ राम नीळीये गुढरी : कनकदंडें चौरें वरी : ॥ छ ॥ स्वप्न सांगे मंडोधरी : ळंका वेढीळी वानंरी : ॥ २ ॥ गुढी घेउनी हनुमंत चाळे : रामळक्ष्मण वीजई जाळे : ॥ ३ ॥ सेंदुरगीरीचा तळवटी : सीते रामा जाळी भेटी : ॥४॥ सेंदुरगीरी केळा अवतार : भानुदासाचे दातार : ॥ ५ ॥ छ ॥ छ ॥

## वीठळ ॥

आजी साळ या ळोचनी : का ग बोळती आंगणी ॥ १ ॥ धृ ॥ हर्षे फुरतीसे बाहे : राम भेटईळ माये : ॥ छ ॥ जाळा त्रीभुवनी उल्हास : ळळीत गातो भानुदास : ॥ २ ॥ छ ॥

॥ ( पृ. १८६ )

## : ॥ भक्तनामावळी : ॥

### : ॥ वीठळ : ॥

नुपेक्षी श्रीहरी : आपुळीयां नीजदासां : ॥ येसा भरवसा सत्य माना : म्हणउन मीठी घाळा दृढ त्याच्या पांया : पीतांबरें छया करीळ हरी : ॥ १ ॥ धृ ॥

---

† ५७ आ. गा.

कटीकें मध्येळ पतीतपावन भीद : ॥ शुकार्दीक वेद सास्त्र आहे : ७१ ॥ प्रल्हादा रक्षीलें अग्नींजत्ळा भेणें : पडतां शस्त्रें त्रुणतुळये जाळी : न तुटे न भगें कस्ट गेळे वा : [ या ! ] दैत्य वधुनीयां मुक्ती दीव्ही : ॥ २ ॥ रावणा गांजीतां : जाळा शरणांगत : चीरंजीवी मुक्त बीभीशेणु : वीमान ळेका दीव्ही : स्थापीयेळा राजीं : अहीक्य परत्र काजी : मीळोनी गेळा : ॥ ३ ॥ दुर्वासा गांजीता दाही गर्भवास अंबरुसा पाश : मुक्त केळा : साहोनी वेधना सोडवीलें दासा : भीदें रुशी-केशा जगी तुझीं : ॥ ४ ॥ अनंयाती रातळा ब्रह्मबीज होता : तया सायोजीता : मुक्ती दीव्ही : पुत्रस्नेहें करून अंती आलें नाम : अजमेत्ळा परमपदप्राप्ती : ॥५॥ वाटा तींटा पाडी न वीचारी पातक संत सनकादीक : देवद्वीज : ॥ अनुतापें श्री-राम : मानसी धरीळा : बधमुक्त केळा वाळमीक रुसी : ॥ ६ ॥ अर्जुनाच्या काजा साडीयेळी भाक : हारी अवसेक अंगीकारी : आपण ळटीका जाळा : भीस्म साच केळा : भक्तांचा आंपीळा : गोपीराजु : ॥ ७ ॥ मायां गांजीयेळा उतानचरणसुत : जाळा शरणागत : धुरु तुज : अढत्ळपद दीव्हें अभंग कदा-कात्ळी : भीदें वनमात्ळी : साच तुझीं : ॥ ८ ॥ द्वारावतीहुनी केलें सीघ्र येणें : नीज भकाकारणें कुपात्ळु वा : मातापीत्रुसेवा करीतां न पाहे : गोउनीयां राहे : पुंडळीक : ॥ ९ ॥ भावार्था कारणें प्राशण केलें दुध : देउत्ळ प्रसीध : फीरावलें :॥ मेळी गाये ज्याळी कासीयात्रे जातां : द्रव्य देउनी कांता : समोपीळी : ॥ १० ॥

( पृ. १८७ )

अतीथ्य केलें त्याची सर्पद्रुस्टी भार्या वांचउन नामयां सांभात्ळीलें : माता पिता पुत्र अस्त्री दासी सहीत : जाळा शरणागत सर्वस्वंसीं : ॥ ११ ॥ अग्नीत न जत्ळे उदकांत न बुडे : गांजीता न पडे हस्तीमुपी : ॥ राजा प्रजा सकत्ळी : दंडीळा स्वजनी : कबीरा नीजभुवनी : स्थापीयेलें : ॥ १२ ॥ सोन्यांचें जानीवें दीव्हें रोहीदासा : सात्ळेग्राम सगीसा आणीयेळा: ॥ रापीयेळी राज : केळा सरता ळोकी : भक्तां उणें सेपी : येउं नेदी : ॥ १३ ॥ जनमीत्र म्हणौनी ळोक हांसती तया : वाघ आणुनीयां देसी जरी : ॥ सत्य जालें भीद कीर्ती जाळी ळोकी : न घळी व्याघ्रामुपी : तुझ्या दासां : ॥१४॥ रीण फेडीयेलें देहेअवसानी : प्रतक्ष पैठणी देपीयेलें : येसें मुक्त केलें येका जनार्दना : का रें नारायेणा न रीगा शरण ॥१५॥ पोटी ठाव दीव्हा पुत्र अस्त्री सुनेसी :आणी चौथीयासी : नीजदासा :॥ पुरंधर वीठळ केळा जीवनमुक्त ॥ येसा पंढरीनाथ : कुपात्ळु हा ॥ १६ ॥ वीश पाजीयेलें मरावी म्हणौनी : मीरांबाई ध्यानी तत्पर सदा : रक्षुनी तीयेसी : मुर्ती हीरवी जाळी : उपात्ळु देवां केळी : जैसी तैसी : ॥ १७॥ रायें पाचारी तों ळागळा

उसीर : करीतसे येर संतसेवा : त्याच्या रुपें सेवा केळी राजयाची : यैसा त्या सेनाची राखे ळाज : ॥ १८ ॥ अंध सुरदास दीव्ही द्रुस्टी तया : आप आपणीयां : दाषवीळें : ॥ नीज भक्तांचे ळळे पाळी क्रुपासींधु : ॥ होये पुत्र पत्नी बंधु : त्यांचे घरी : ॥ १९ ॥ उदक घेता मीठी : पडीली नकासी : ॥ केला रुशीकेशी धावा तुझा : ॥ गरुड धाडी तो ही : पडीला स्वासोस्वासी : स्वयें गजईंद्रासी : सोडवीळे : ॥ २० ॥ चोष्यामेळ्याचे आंबे भक्षीयेळे : जगामाजी केळें सनाथ तया: ॥ बारां दींवसांचा वछरा राषीळा : मांया टाकीयेळा : वेणुंनादीं : ॥ २१ ॥ राजा कोपो- नीयां माउंस दीव्हें षावया : फुळें करुनी तया गाजो

V ( पृ. १८८ )

नेदी : ॥ मुक्त केळी कासी : स्वहीत पां-( ! ) ळो कां : कान्हयां पाठकां राषी- येळें : ॥ २ ॥ यैसे भक्तराये संकटीं रक्षीळे : ॥ काया वाचा मने जाळे शरणागत : ळटीका म्हणवी दास : तयांसी नुपेक्षी : पाहा कोल्हीयासी : गांजों नेदी : ॥२३॥ यैसा पांडूरंग राखे नीजदास : ॥ भक्त म्हंणवी त्यासी : भये नाहीं : संत ज्ञाते काये सांगणें तुम्हांस : पाई वीठळदास ठाव मागे : ॥ २४ ॥ छ ॥

## संताजीची वही

( पृ. १८० )

### ९ षेचराची आरती: ॥

भळा रे भळा तुं : सानां ना थोरु : सांगणीचा तीरु : करी वीर मारु : अभेद् भेदकु तुंगरु वा नागरु : तुज साधु संत क्रुपा आदीनाथ वरु : ॥ धृ ॥ जये जये आरती : जये सोपानदेवा : वोवाळी षेचरु बीसा जीवीचीया जीवा : ॥छ॥ धन्ये तुझें देषने : तुं प्रेमाचा पुतळा : अवेत्क वेत्कीं तुंवां आणीळी कळा : अनुंभवेंवीण बोळणें तो मुरडळा काळा : त्राहें त्राहें अपराधु : षेचरुवीसा तारीळा : ॥ २ ॥ भावेंवीण जीणें : तें ळाजीरवाणें : तैसें तें ज्ञान पुढीळांचें पोसणें : ॥ दुसरीयाचें बोळ आइकोन स्याहाणें : भ्रांती थोरी पडीळी : जाणींव ज्ञानें : ॥ ३ ॥ तेथे ज्ञानाचे सागर : भत्कराज माउळी : नीत नवें प्रेम अमृत षोळी : सर्व इंद्रीयेंद्वारें उन्मत भरळी : ते साद्रुस्य मांडूनी : मागुतीं गर्भवासा गेळीं : ॥ ४ ॥ प्रतीउत्तर देतो : माझा पीता : रंणसोरीया : षाई वीकत्ळ जातां : हें आईकोन

सोपान : चरणावरी माथा : अवचीता : लो उचलुन क्षेम देतो : षेचरवींसा मागुता : ॥ ५ ॥ छ ॥ छ ॥

### १० चांगदेवांची आरती

वटेस्वरु देवो तारकु माझा : दैवांची उजरी : दीनकर शेभा : आदीअंती सोम झळकत नभा : तैसी तप्तीतीरी : साधुसंताची सभा : ॥ १ ॥ धृ ॥ जये जये आरती : तेथें प्रेमाच्या धारा : वर्शत अंमृतराज : गेळा सागरा : ॥ छ ॥ तेथीचे उद्गार न समाती देही : उन्मत्ळोत थडी गेळी ज्ञानडोहीं : पाठी ना पोट आदीअंतु नाही : त्रीकाळ ग ती : ते साधुसंत पाहीं : ॥ २ ॥ तेथ मुक्ताई तारु : चांगया पोहोनारु : गेळा पैळ थडीये केळा पै उतारु : वटेस्वरी गर्जता : नाही आपपरु : सोपा आल्ंगी : वीसोबा षेचरु : ॥ ३ ॥ साधुसंतां वीरीं गर्जता अंबर टाल्ळ श्रुती गरुडटके यांचे भार : जये जये शंकरा कोदाटलें : माहांद्वार : ळोत्ळती संनकादीक : सेवीती ब्रह्मं अपार : ॥ ४ ॥ साधुसंतां चरणीं ब्रीदांचा तोडरु : कल्ळीकाल्ळा रीगु नांहीं : नामाचा गजरु : सुद्रसेन घरटी फीरे अवस्वरु चांगा म्हणे अवघा जाळा वटेस्वरु : ॥ ५ ॥ छ ॥ १० ॥ छ ॥

---

## संताजीची वही

(पृ. १८३)

### प्रसो भागवंताची आरती: ॥

क्षार उदक देउन मधुरता आळी : तैसी ळवणस्छीती : अमृत घोळी : तयाचा अंतरीं : प्रवृती मुराळी : परी साषरेची गौळ्यता : कवणें हो आणीळी : ॥ १ ॥ धृ ॥ जये जये आरती : प्रेमसींधुपुरा : ऐक्य ऐक्य : केळों तुंवा येकसरा : ॥ छ ॥ नीत्य प्रेमें जागती : जागरणी : जागा : आणीक उधरण जगा सांगा : येकी येकादसी : पुन्ये भाळें तें पाहा गा : द्वादसी ळाधळी : तें भग्तांसी मागा : ॥ २ ॥ येसे परउपकारी : ळोल्ळांवें त्यांचे द्वारां : तेंच केशवध्यान : येर ळटीके सवंसारी : त्यांचे रंगणांची सीत्ळा : देवा मज करीं : ते येतां जातां चरण ठेवीती वरी : ॥ ३ ॥ तीहीं उधरीलें माझें कवंटे : पुर्वज उधरण दीसे वैकुंठवाटे : हरीदासांचे भार : मीरवसाती : गरुडटके गोमंटे : ॥ धन्ये तप्तीतीरी : बरवें वाल्ळुवंट : ॥ ४ ॥ ळाधळों समसुख कासींये जातां : वीस्वनाथ प्रेमा : चीया

संताः ॥ बाणळी वीस्थी पंढरीनाथा : जीकडे तीकडे देषे हरीदास गर्जेता : ॥ ५ ॥ नीउती सोपान : हे ज्ञानेस्वर : चांगदेव मुक्ताई : वटेस्वर : अवघया आवघा : साक्षांतकारु : ॥ ६ ॥ त्याचे चरणीचा रजरेणु : हा नामदेव सीपा : पाहाता अनुभव : सकळार्थ सोपा । हे येकी च मुर्ती : पावळे अशषा : सकळा चरणी : हा परसो भागीवंत देषा : ॥ ७ ॥ १५

## वही २ बाळोजीची

( पृ. २२६ )

हस्ताक्षर बाळोजीचें नव्हे

श्री

तुजं आसता मज गाजीती जन : मग काय जीणे देवा तुझे : आनाथाच नाथ येसे ह्मणवीसी : करुणा कैसी नये तुज : आनाथ ह्मणउणी धरीयेले दुर : मग कैसा दातारः ह्मणवीसी : भागु ह्मणे मन न सोडावे आता : पावे कृपावंता पांडुरंगा ॥ ७ ॥

वीठल

कृपेच्या सागरा : मायेबापा ज्ञानेस्वरा : देहेभावे हो सोडुनी : बा माझ्या धरा ध्यान : जेने पाशान तारीले : मुख प × वेद बोले भींती चालवीली औसी कृपाळु माउली ॥ औसा कृपाळु भक्ताचा : मायबाप आमचा ॥ हाची प्राण घ्यावे बा माझ्या ला वोवाळावे ॥ वीस्रांतीचा ठाव भागु म्हणे ज्ञानदेव ॥ १ ॥

आलो तुझ्या दर्शनासि भेट दयावि बा आम्हासी ॥ सर्व संत हो राउळि मीरे येकली तळमळी ॥ करुणा आईक वीठाई मज बाळा भेट देई ॥ देव आले हो बाहेरी ॥ मज नेले खाद्यावरी॥ भागु म्हणे भेट जाळी ॥ माझी चींता ही हारळी :

काज नाही हो जनासी : रीझवावे त्या देवासी : जन हासतील मज : आता जाले मी नीर्लज ॥ १ ॥ मागे पुढे नाही कोन्ही ॥ सख्या वीठला वाचुनी : आनाथाचे करीतो काज : ह्मणोनी भरोसा आहे मज ॥ भागु म्हणे झाले नीर्भई ॥ आहे माझी वीठई ॥ ४ ॥ ७ ॥

मी रे अपराधी मोटी : मज घालावे बा पोटी : मी रे ताम्हुल अज्ञान : म्हुण का देउं नये स्तन : आवघ्या संता तु भेटसी : मी रे के (का?) ली परदेसी : भागु म्हणे वीठोबासी : मज धरावे पोटसी ॥ ५ ॥

साधुचा संग धरी रे : श्रीहरी स्मर नीरवी वाणी : भक्ती धरी दृढ कामे तजी रे : साधुचा संग धरी रे ॥ १ ॥ मायाजाळे हे मृगजळ पाहे : गुतसी परी गती नाही बरी रे ॥ साधुचा ॥ २ ॥ दुस्तर डोही बुडसी पाही : तारू हे वीठल नाम धरी रे ॥ साधुचा ॥ ३ ॥ कीर्तणरंगी : होसी आभगी : भाग्य रज तुज नमन करीरे ॥ साधुचा ॥ ४ ॥

## वही ३ बाळोजीची

( पृ. १५२ )

श्रीमगल्लमुर्ती

सनत्क सनदन संनत्कुमार : सनातन : हे ब्रम्हनदन चौघे जिणे : नारद परीसुर वसीस्ट वामदेव : मैत्रया शुकदेव श्याप्यायेन हे : ॥ १ ॥ हरी वेदास नीत्य स्मरण करीता : कुस्ण पावीजे थाप देउनी कुतांता : ॥ छ ॥ हंनुमतु सेखु येमजनकु : सद्दाग भीस्नु ईतीमाजी जड भरथ कवी हरी अंतरीक्ष प्रबुध पीपळायेन : अवीरहोत्र हे : ॥ २ ॥ द्रुमीळ नृप यम सकर भाजन : सौरस अंबरुसी दास श्रीहरीचा : प्रळहाद् बल्ली धृवपद् अढल्ली सुत देवाजवल्ली : हरी वेंक्र हे : ॥ ३ ॥ यु द्रुल्ला सा भीस्म वीदुर उधव उतम बीभीशण जाण राम आकीत तो : सुदाम देवो : वीप्र पुण्ये सीळोक: यौधीस्टीर जवल्लीळ अंकुर अंतर गहें : ॥ ४ ॥ हरीस्चद्र शीश्री रीपुरीरवा धुंधुमारी मचुकुद श्रीहरी रकुमागद धौम्ये भुरीशण : परीक्षीती सुजाण : अतीदेव पावन : पुंडरीक हे : ॥ ५ ॥ भीमकी ती कुस्णा गोपीका येज्ञपत्न्या युयुधान करुणारुप जाळया : जटायु सव्येसाची माल्ली सुदामा चीती पीगल्ला व्याधमुर्ती तुल्लाधार हे : ॥ ६ ॥ ये ही अंनता हरीदासी तारीलें जगासी : जे पूर्ण हरीसी शरणागत : चीमताणो प्रसादें कौंडण्य गोत्री वदे पीश्या बहीन्याने जातीवेदें स्मरणे केलें हे : ॥ ७ ॥ छ ॥ छ ॥

## वही ३ बाळोजीची

( पृ. ९९-१०० )

भगतनामावळी वीठळ

सौसारा येउनी बहुत पाप केलें : नाहीं आठवीलें देवराया : कळ्पनेच्या संगें बहुत कस्ट जालें : अतर पडीलें सद्बुधीसी : ॥ १ ॥ धृ. ॥ मासें सोडवणे धावा

सेकल्लीक : साधु संत माये बाप : सके माझें : ॥ ५ ॥ नारद प्रल्हादा : उधव रकुमांगदा : व्यास वसीष्ट अगंदा बीभीशणा कपीळ भारद्वाज : गरुड माझा चीतीं : बल्ली भीश्म अगस्ती : अंबरुशी : ॥ २ ॥ अक्रुर अजामेळ : योगी सनकादीक : हनुमंत : वाळमीक सुदामदेव वीदुर : श्रीयाळ वीदेही जनक : परीक्षीती शुक : उपमन्यं : ॥ ३ ॥ अर्जुन आणी धृव पुंडलीक भग्ता नीत ज्याचें आर्त : माझा मनी नीवृती ज्ञानराज : सोपान नामयां : गोरक्षी माझीया माहीयेरा : ॥ ४ ॥ मुग्ताई कबीर परसो भाग१-( पृ. १०० ) ता : यांसी आठवीतां : सुष वाटे : वीसोवा सेचर आणीक चांगया : परमानंद जोगया : रामानंदा : ॥ ५ ॥ रोहीदास आणी जनमेत्र नागा : भानुदास जगा : आवडता : दींगांबर जणरुद्र येकाजनार्दन : आनत माचे गाण केशवदास : ॥ ६ ॥ पुरंधर वीठळ जदेव मानसी : नीत्य ध्यान ज्यासी : भगवंताचें : अंतदेव मीरांबाई : आणी कुर्मदास गोपीचंद्र व्यास : वृंदावन : ॥ ७ ॥ दास धना पीपा सेन सुरदास : नरहरीनंदा आस करीन तुझी : वीमल्लानंद अंतानंद परसराम पोजी : परमानंदा तुझी पाहे वास : ॥ ८ ॥ काको मडका भावानंद आणी माधवदास : नीत्य जया वास : जगंनाथी : तानसयेन गोवींददास : नाभा कमाळ : आणीक जमाळ : कबीराचें : ॥ ९ ॥ आस करणं केवळ कुबा सुरसरानंद : तुळसीदास मकुंद कर्माबाई : मुरारी हरीदास : नामा पाटक : वळभनंदनु : राघोदास : त्रीळोचन : चोपा मेल्ला : आणी नरहरी सोनार : आणी गोरा कुंभार : वछराज वंका गंगाधर : सचीदानंदबाबा : कान्हया पाटका सांवतया : ॥ ११ ॥ माधव चक्रपाणी : हरीदास कान्हयां : नीरंतरा माझीया माहीयेरा : वीठळ नारायेण माहादेव गोवींद : जननीत्यानद : रामदास : ॥ १२ ॥ माहादेव पाटक : परमानंद पाहीं : वीठळदासा येई धावणेयां : नंददास आणी दंडवत्या नरहरी : कान्होंपात्र नागरी : नामयांची : ॥ १३ ॥ घाटमंदास दीवाकर नयन्होदास : हरी गोपाळा वास : अल्लंकापुरी : भग्त रामेस्वर तुकोबा गोसांवी : नीत्य ध्यान जीवी ज्याचें असे : ॥ १४ ॥ मुढ तरावया केळा अवतार : माझा अंगींकार करा आतां : ऐसीया संतासी करीन वीनंती येतों काकुळती : मनोधर्में : ॥ १५ ॥ आणीक साधुसंत भग्तराज अपार : वर्णावया पार : कैचा मज : आपळें म्हणोनी अगीकारा मज : लागली असे अस चरणाची : ॥ १६ ॥ संतांच्या स्मरणें पापताप जाये : म्हंणोनीयां धाये मोकळीळी : तुमंचा पांई वीसरु न पडो सर्वथा : यावें गा अंनता कृपादान : ॥ १७ ॥

# वही ४.

( पृ. १२२ )

: ॥ अरती : ॥

तुं ची तु अत्माराम : नव्हेसी देहधारी : स्तुती जरीं होये : झडो माझी वैखरी : पातकी मुढ जन : पडतील आघोरी : यालोंगी अवतार : केला महीवरी : ॥ १ ॥ धृ ॥ जय जया भग्तराया : धर्ममुर्ती तुकया : आरती ववाल्वीन : भावें तुझीयां पायां : ॥ छ ॥ जये जया भग्तराया : ॥ छ ॥ तुझु ठाई असे ब्रंम्हं : कोन्हा न कल्वे नेम : जन हे काई जानें : ॥ अनुभवीतो राम : टाकुनी अभीमान : जीवीं धरीले प्रेम : ॥ बोलोनी म्हीमा तुझा : जना दील्हा वीश्राम : ॥ २ ॥ अद्भुत महीमा तुझा : काये वर्णु दातारा : उदकवीण अनें : दीवस कर्मीले तेरा : ॥ आता हे यैसी प्राप्ती : काये घडेल येरां : ॥ उदकी कागदा गा : दीन राखीले अठरा : ॥ ३ ॥ येकतां तुझें वचन : मन होये उन्मन : सचिदानंद गाभा : तुझा ठाई पुर्ण : नीत्य हे असो माझें : तुझा ठाई पुर्ण : नीत्य हें असो माझें : तुझा पाईं अनुसंधान : करुणी क्रुपादान : देई इतुकें जाण : ॥ ४ ॥ शास्त्रें आणी वेदांत : सीस्टाचार समस्त : आणीला येकवाक्या : जन केले कुतार्थ : वीशेश रामेस्वरा : प्रेम दील्हें वहुत : वीनवीतो दास वीठा : ठेवीं मस्तकीं हात : ॥ ५ ॥ छ ॥ छ ॥

( पृ. १४६ )

माझीयां पीतीयाची जोडी ॥ चाळीस लक्ष चौऱ्यानव कोडी ॥१॥ त्यामाजी फुटकी कवडी ॥ तुज न सोडी र विठ्ठला ॥ ॥ माझ दे माझ्या बाचं दे ॥ छ ॥ केळफाट कीं बोर फाट : नामयाचं वीठं पीसाळलें ॥ २ ॥ छ ॥

तुकोबाचे अभंग पांच कोटी : साटी लक्ष ॥ छ ॥ छ ॥

## ६७ शाम नारायण देशपांडे रामदासी

( रा. दत्तो वामन पोतदार )

या नांवाच्या एका कवीचीं ३ गणेशस्तवनें व एक नवश्लोकात्मक किरकोळ काव्य अशी कविता नुकतीच एका बाडांत आढळली. पैकीं दोन गणेशस्तोत्रें सबंद असून अनुक्रमें २२ व २३ श्लोकांचीं आहेत. व तिसऱ्याचे आरंभींचे ४

व शेवटचे ४ मिळून आठ श्लोक मिळाले आहेत. बाकीचे श्लोक असलेलीं पानें फाटून गेलीं आहेत. या फाटलेल्या पानावर उपरोक्त किरकोळ नवश्लोकात्मक काव्याचे ७।८ श्लोक होते. ते गेले. फक्त पहिला व शेवटचा अर्धामुर्धा असे राहिले आहेत. " अंतीं नर्क तयासि भोगवि हरी त्या कारणें या मती " असा यांतील प्रत्येक श्लोकाचा शेवट दिसतो. त्रुटित गणेशस्तोत्र २०. श्लोकांचें आहे.

पहिल्या गणेशस्तोत्रांतील २२ वा म्हणजे शेवटचा श्लोक असा:—

नमस्कार केला गुणानंदरासी ।
कवी देशपांड्या भला रामदासी ।
ह्मणे सुत नारायेणाचा जनाला ।
भजावें तुम्ही वो गुरु मोरयाला ॥ २२ ॥

दुसऱ्या स्तोत्राचा शेवटील म्हणजे २३ वा श्लोक येणेंप्रमाणें:—

ह्मणे शाम नारायणाचा अनाथ ।
धरा भक्ति हे मोरयाची त्वरीत ।
तेणें धन्य हा वंश होईल जाणा ॥
सदा सर्वदा येश बाणेल गुणा ।

दोन्ही श्लोकांवरून कवीचें सबंद नांव
" शाम नारायण देशपांडे रामदासी " असें निघतें.

## ६८ मृत्युंजय ब्राह्मणी

( रा. दत्तो वामन पोतदार )

मृत्युंजय हें नांव संतमालिकांतून पुष्कळदां आढळतें. मृत्युंजय ब्राह्मणीकृत प्रकाशदीप व स्वरूपसिद्धि—हा ग्रंथ बहुधा पहिल्याचाच भाग असावा—हीं प्रकरणें 'महाराष्ट्रकवी' तून पूर्वी प्रसिद्ध झालेलीं आहेत.

भक्तविजयाच्या ४१ व्या अध्यायांत शांतब्राह्मणी नामक 'बेदरच्या बादशाहाचें' चरित्र वर्णिलें आहे. या नांवाचा किंवा वर्णनाचा कोणी च यवन राजा बेदरास किंवा दुसऱ्या कोणत्या हि दक्षिणेकडील जुन्या मुसुलमानी राजांत आढळत नाहीं. महीपती लिहितो कीं हा उपरति होऊन पंढरीस आला. तेथें—

त्रिरात्र लोटतां त्वरित ॥ प्रसन्न जाहला रुक्मिणीकांत ॥ 'विवेकसिंधू'चें पुस्तक शाक्षात दिधलें स्वप्नांत ॥ आणूनी ॥ ४८ ॥ सहजानंद स्वामी कल्याणांत ॥ तयाचा उपदेश घेई त्वरीत ॥ स्वप्नीं सांगतां पंढरीनाथ ॥ जाहला जागृत ते काळी ॥ ४९ ॥

त्याप्रमाणें शांतब्राह्मणी सहजानंदास 'त्वरित भेटला' त्यांनीं

'मग त्यासी उपदेश देऊनी पाहे ॥ नाम ठेविलें मृत्युंजये ॥ नारायणपुरासी वास्तव्ये ॥ जाउनी लवलाहे पैं केलें ॥ ५५ ॥'

'नारायणपूर हें गांव कल्याणीपासून एक कोसावर आहे.' कल्याणीकर सहजानंद स्वामींचा काळ शके १४६० असा रा. देव यांनीं शोध करून दिला आहे. अर्थात्, वरील माहितीवरून मृत्युंजयाचा काळ १४५० ते १४८० शके हा ठरतो.

शांतब्राह्मणी बेदरच्या बादशाहाचा आश्रित असेल. भक्तलीलामृतांत 'मृत्युंजय महायोगी' असा एक निर्देश महीपती करतो. कांहीं संतमालिकांतून मृत्युंजयास योगी हें उपपद लावण्यांत आलेलें आहे. एका बाडांतील प्रकाशदीपांतील ३ ऱ्या अध्यायाच्या शेवटीं " ब्राह्मणीं मृतोंजी म्हणे भले ॥ योगीराजु ॥७७ ॥ " असा उल्लेख आहे.

---

## ६९ शके १५५५ तील सूर्यग्रहण

( रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन )

१ काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें व यादी ४३८ इत्यादि साधनांच्या आधारें शहाजीच्या हालचालींचा त्रोटक वृत्तांत देतांना, रा. वि. का. राजवाडे यांनीं शके १५५५ तील सूर्यग्रहणासंबंधीं ओझरता उल्लेख केला आहे. " १६३३ त मुरार जगदेव व शहाजी यांनीं दौलताबादेवर म्हणजे मोंगलावर स्वारी केली. ह्याच स्वारींत कोरेगांवनजीक तुळापुरीं त्यांना सोमवारीं सूर्यग्रहण पडलें. ह्या पर्वकालाची तीथ मल्हार रामरावानें शके १५५५ श्रीमुखनाम संवत्सर भाद्रपद वद्य ३० सोमवार म्हणून दिली आहे व ती बरोबर आहे. "१६३३ ऱ्या ३३ सप्टेंबरीं सोमवारीं

सूर्यग्रहण दिसत होतें, " हा तो उल्लेख होय. ( म. इ. सा. खं. ४, प्रस्तावना, पृ. ४३।४४ ). सदरील मजकुरास पोषक असें एक ' टांचण ' मला वे. शा. सं. प्रल्हाद गंगाधर उपाध्ये, तळेगांव–ढमढेरे यांच्या दफ्तरीं मिळालें. सदरहु पर्वकालीं पंडित मुरार जगदेव यांनीं ज्या सोळा ब्राह्मणांस ' नागरगांव ' अग्रहार दिला त्यांपैकीं मशारनिल्हे प्रल्हादबोवा ह्यांचे मूळपुरुष ' भानभट तळेगांवकर ' हे एक असल्यामुळें व सदरील गांवचा उपभोग उपाध्ये मजकूर हे परंपरेनें आज तागायत घेत असल्यामुळें, सदरहु प्रसंग व 'मंडळा' स सादर करण्यांत येत असलेलें टांचण ह्यांच्या विश्वसनीयतेबद्दल इतिहासचिकित्सकांस आतां कोणती हि शंका घेण्याचें कारण नाहीं. टांचण बाळबोध लिपींत लिहिलेलें असून, त्याचा शेवटचा भाग मालकाच्या हलगर्जीपणामुळें गहाळ झालेला आहे ! हा गहाळ झालेला भाग पुरा करून दिल्याबद्दल व ह्याच प्रसंगासंबंधानें रा. ढेरे* यांच्या संग्रहांतील 'अग्रहार-पत्र' मिळवून दिल्याबद्दल मी माझे संशोधक मित्र श्री. गंगाधर नारायण मुजुमदार यांचा अत्यंत ऋणी आहें.

२ पर्वकाळासंबंधीं माहिती; पंडित मुरार जगदेव यांस सदर 'टांचणां'त दिलेल्या बहुमानाच्या पदव्या; पंडितजींच्या गोत्राचा नामोच्चार; गजदान, अश्वदान, गोशतदान, सुवर्णरजतादि चोवीस प्रकारचीं तुळामहादानें; भूमिदानाप्रीत्यर्थ दिलेला अग्रहार इत्यादि गोष्टींनीं सदर ऐतिहासिक प्रसंगावर बराच उजेड पडतो. ह्या सर्व गोष्टींचा 'टांचणां'त अंतर्भाव झाला असल्यामुळें त्यांचा येथें पुनरुच्चार न करणें हें च उचित.

३ अवरंगजेब बादशहानें सदर गांवीं हत्तीची तुळा केली; व यामुळें या गांवास ' तुळापूर ' असें नांव मिळालें वगैरे प्रकारची जी हकीकत अन्यत्र आढळते, त्याशीं आज उपलब्ध होत असलेल्या 'सनदे'मुळें विरोध येतो. तुळापुरापासून सुमारें दीड मैलावर पूर्वीच्या नागरगांवीं असलेल्या व हल्लीं तुळापुरच्या शिवेंत समाविष्ट झालेल्या ' नागरमल ' नामक खंडोबाचें अस्तित्व ही बाब हि चिंतनीय नाहीं असें कोण म्हणेल ? एवंच, ' टांचणां'त व ' सनदे'त उल्लेखिलेलें नागरगांव हेंच हल्लींचें तुळापूर असून, शके १५५५ तील सूर्यग्रहणप्रसंगीं त्यास तुळापूर ही संज्ञा मिळाली हें निर्विवाद आहे.

४ क्षेत्राच्या दृष्टीनें तुळापुरचें महत्व सामान्य नसून छत्रपति संभाजीमहाराजांच्या वधानें तर तें इतिहासप्रसिद्ध च आहे. महाराजांची ' समाधि ' येथें च

---

* ढेरे यांच्या दफ्तरखान्यांत बरीच ऐतिहासिक सामुग्री असल्याचें कळतें. मशारनिल्हे ढेरे यांनीं सदर सामुग्रीचा एखाद्या संशोधकास कृपाळूपणें उपयोग करूं दिल्यास, इतिहासप्रिय महाराष्ट्र त्यांचा सदैव ऋणी होईल.

असून, ती अत्यंत निकृष्टावस्थेत आहे. तुळापूर येथील घाट, संगमेश्वराचें देवालय, महाराजांची समाधि व नागरमलाचें देवालय हीं स्थलें प्रेक्षणीय होत.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

( लेखांक १ )

श्रीगणेशाय नमः श्रीमहागणपतये मंगलमूर्तये नमः नमस्तस्मै महेशाय यस्य संध्यात्रयस्थलात् । यातायातं प्रकुर्वन्ति त्रिजगत्पतयोऽनिशम् ॥ स्वस्ति श्रीनृपशालिवाहनशके १५५५ श्रीमुखनामसंवत्सरे दक्षिणायने वर्षाऋतौ भाद्रपदे मासे कृष्णपक्षे अमावास्यायां सोमवासरे घटिका ११ पले १ हस्तनक्षत्रे घटिकाः ६ पलानि १८ ऐंद्रयोगे घटिका २२ पले १ तत्कालनागकरणे एवं पचांगशुद्धौ अस्मिन् पुण्यकाले केतुग्रस्ते दिवाकरे सूर्योपरागे महापर्वणि श्रीमद्वसिष्ठकुलजलधिमहारत्नभूतः परमप्रतापप्रहृतारातिगेहिनीनयनपूरपूरितपारावारः श्रुतिस्मृतिसदाचारणपावितावनितलमहादानानुदानकृतार्थीकृतदीनानाथोऽनेकान्नसमजीविनाखिलान्नजनसत्कीर्तिचंद्रिकयापि संसारतापतप्तविबुधजनः (!) धर्मावताराजाधिराज-महाराज-राजश्री-पंडित-मुरारि-जगदेवप्रभुः सार्वभौमः ॥ इंद्राणीभीमरथीसंगमे सकलपातकनाशकत्वेन पुराणप्रसिद्धे पुण्यक्षेत्रे रविग्रहस्पर्शकाले सब्रह्मसमाजः स्नानश्राद्धादि नैमित्तिकं सांगं विधाय मुख्यकल्पमनुस्मृत्य सांगं साभरणं गजदानमश्वदानं गोशतदानं च कृत्वा शास्त्रविहितमार्गेण सुवर्णरजतादिचतुर्विंशतिसंख्याकानि तुलामहादानानि सांगानि तदैव कृत्वा तद्धनेन दीनानाथान् ब्राह्मणांस्तत्तन्मनोरथैः पूरयित्वा भूमिदानार्थं तत्रैव नागरग्रामसंज्ञकमाम्रवृक्षांतर्वैयादि स्वसीमासहितं राजरेखया शतत्रयवराहपरिमितभूमिकमग्रहारसंज्ञकं कृत्वा संगमनित्यग्रहारनाम निर्दिश्य शतत्रयवराहपरिमितभूमिके षोडशाधिकद्विशतवराहपरिमितभूमिकं पृथगपास्याष्टादशभागान् क्रमान् कृत्वा । तत्र भागद्वयं संगमेश्वरस्य दीपदान-अभिषेक-नैवेद्यार्थमुपकल्प्यावशिष्टषोडशभागानेकैकंशमेकैकस्मै विभज्य दत्तवान् । तत्र तावत् षोडशब्राह्मणानाम् नामानि इमानि ।

१ सोनभट देवगिरिस्थ २ नरसिंहभट अग्निहोत्री ३ त्र्यंबकभट नांदुरकर ४ त्र्यंबकभट मुदामे ५ त्र्यंबकभट खेडकर ६ भानभट तळेगांवकर ७ महादेवभट पुरंदरे ८ त्र्यंबकभट पुराणिक ९ पुरुषोत्तमभट वैष्णव १० भानभट वैष्णव ११ गोपतिभट ढेरे १२ आपदेव चित्राव १३ बाळपाठक नाशिककर १४ रंगनाथभट ग्रामज्योतिशी १५ सोमनाथभट ग्रामज्योतिषी १६ पुंडलिक हरिदास पंढरपुरकर.

* 'वराह' हें काय माप असावें ?

एवं षोडशब्राह्मणेभ्यो दत्त्वाऽवशिष्टचतुरशीतिवराहपरिमिते भूमिके चत्वारिंशद्वराहपरिमितभूमिकं स्वपुत्रपौत्रादिसंतत्यर्थं वृत्तिं प्रकल्प्यावशिष्टचतुश्चत्वारिंशद्वराहपरिमितभूमिकं पृथगपास्य तच्चतुर्धा समांशं विभज्यैकमंशं श्रीकालिदासकविश्रेष्ठेभ्यो दत्त्वैकं वररुचये दत्त्वैकं त्रिमलभट-पुरोहिताय दत्त्वैकं रायारायाय दत्त्वाऽवशिष्टवराहचतुष्टयपरिमितं भूमिकं गौडाय गृहनिर्मित्रे दत्त्वैवं राजरसेया शतत्रयवराहपरिमितभूमिकं क्षेत्रं चतुर्विंशतिधा पूर्वोक्तप्रकारेण संविभज्य ब्राह्मणेभ्यः अग्निहोत्राध्ययनाध्यापनादि धर्मानुष्ठानार्थं दत्तवान् । अत्र पूर्वोक्तविभागक्रमेण स्वस्वक्षेत्रोत्पन्नान् (°यान्न) चयोपचययोर्दातृसंततेः सबंधो नास्ति किंतु ब्राह्मणानामेवेत्युदकधारापूर्वकं दत्तवान् । इदं श्रीमत्प्रभुपुत्रपौत्रादिवंशजैः संरक्षणीयं तथा च भाविभूपालैरपि संरक्षणीयम् । अन्यथा आकल्पं पितृभिः सह नरके वासो भविष्यतीति । एतदर्थे धर्मशास्त्रं । स्वदत्तां परदत्तां वा यो हरेच्च वसुंधरां । षष्टिर्वर्षसहस्राणि विष्ठायां जायते क्रिमिः ॥ १ ॥ दानपालनयोर्मध्ये पालनं तु विशिष्यते । दाता स्वर्गमवाप्नोति स्वर्गं मोक्षं च पालकः ॥ २ ॥ इति मुख्य पत्रपंक्तयः ॥ ७५ ॥

* मूळ नकलेतील ढोबळ चुका दुरुस्त केल्या आहेत.

मुद्रा

# अग्रहारपत्र

( ढेरे यांचे दफ्तरांतील )

( लेखांक २ )

वेदमूर्ति समस्त ब्राह्मण मौजे नागरगांव ऊर्फ तुळापूर तर्फ सांडस प्रांत पुणें यांसि दिल्हे अग्रहारपत्र ऐसेजे वेदमूर्ति खंडभट बिन बापदेवभट तुळापुरकर व देवभट बिन कचेश्वरभट ब्रह्मे यांणीं शाहूनगर नजीक किल्ले सातारा येथील मुक्कामीं स्वामी संनिध येऊन विनंती केली जे समस्त ब्राह्मण वास्तव्य क्षेत्र मजकूर यांस पूर्वीं राजेश्री मुरार जगदेवराव यांणीं मौजे मजकूर चतुःसीमा पूर्वमर्यादेप्रमाणें कुलबाब कुलकानू हलीपट्टी व पेस्तरपट्टी देखील जल तरु तृण काष्ट पाषाण निधि निक्षेप सहित धारादत्त अग्रहार इनाम करून देऊन विजापुरकर पादशहाचीं पत्रें करून दिलीं त्याप्रमाणें महाराज राजेश्री शाहाजीराजे व थोरले कैलासवासी महाराज यांनीं पत्रें करून देऊन मौजेमजकूर पूर्ववत प्रमाणें समस्त ब्राह्मणांस इनाम अग्रहार चालविला त्याउपरी अलमगीर बादशहाचा मुक्काम तुळापूर मजकुरीं होता ते समयीं समस्त ब्राह्मणांनीं पूर्वील पत्रें पादशहाचीं दाखवून अर्ज केला त्यावरून अलमगीर पातशहांनीं दिवाणी परवाना करून देऊन

मौजे मजकूर समस्त ब्राह्मणांस इनाम चालविला व महाराज राजेश्री काकासाहेब यांनीं इनाम चालविला कुलबाब कुलकानू देखील सरदेशमुख व इनाम तिजाई हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी खेरीज हक्कदार करून इनाम करून दिल्हा यानंतर महाराज राजेश्री स्वामींनीं हि आपलें पत्र राज्याभिषेक शके ४५ विलंबीनाम संवत्सरे आश्विन बहुल दशमी मंदवारी पत्र करून दिल्हे आहे जे मौजे मजकूर सर्व-मान्य पूर्वीपासून अग्रहार इनाम आहे त्याप्रमाणें करार असे म्हणोन महाराज स्वामींनीं पत्र दिल्हे आहे त्याप्रमाणें मौजे मजकूर समस्त ब्राह्मण वास्तव्य क्षेत्र मजकूर सर्वमान्य इनाम चालत आहे पूर्वील पत्रें आहेत तीं जीर्ण जाहलीं आहेत भोगवटियास महाराज स्वामींनीं पत्रें करून देऊन मौजे मजकूर समस्त ब्राह्मण क्षेत्रमजकूर यांस वंशपरंपरेनें अग्रहार इनाम चालविला पाहिजे म्हणोन विनंति केली व पूर्वील पत्रें आणोन दाखविलीं तीं मनास आणोन स्वामी कृपाळु होऊन मौजे मजकूर तुम्हां समस्तांस अग्रहार इनाम आहे त्याप्रमाणें स्वराज्य व मोगलाइ अम्मल एकूण दुतर्फा देखील इनाम तिजाई कुलबाब कुलकानू हल्लीपट्टी व पेस्तर-पट्टी देखील सरदेशमुखी व सरपाटिलकी जल तरु तृण काष्ट पाषाण निधि निक्षेप सहित खेरीज हक्कदार करून तुम्हां समस्त ब्राह्मणांस क्षेत्र मजकूर पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें मौजे मजकूर चतुःसीमा पूर्वमर्यादेप्रमाणें समस्त ब्राह्मण अग्रहार इनाम अनुभवून सुखरूप राहणे येविशीं पत्रें चैत्र वद्य नवमी इंदुवासर रक्ताक्षी नाम संवत्सरे छ २४ रविलावल चिटणिशी पत्रें

१ समस्त ब्राह्मणाचें नांवें
१ मोकदम मौजे मजकूर
१ देशमुख व देशपांडे
१ देशाधिकारी
१ रा. पंतप्रधान

## ७० पेशव्यांच्या मूळ पुरुषासंबंधीं कांहीं नवीन माहिती*

( रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन )

श्रीमंत पेशवे यांचे नाशिक येथील तीर्थोपाध्ये हिंगणे यांचे विद्यमान वंशज वे. शा. सं. भालचंद्र गोपाळभट हिंगणे, घरनंबर २२०१, नाव दरवाजा, नाशिक

* सदरहु लेखांत एकंदर अकरा नोंदी असून, प्रत्येक नोंदीसमोर ती ती नोंद कोणत्या वहींत आहे, व ती कोणत्या पानावर आहे यासंबंधीं नंबर दिलेले आहेत, उदाहरणार्थ, पहिल्या नोंदीसमोरील '४/३५' हा आंकडा घ्या. ह्यांतील '४' ही संख्या वहीचा नंबर दर्शवितें, व खालील '३५' ह्या आंकड्यावरून वहींतील पानाचा बोध होतो.

यांचे दप्तरांची चाळना करीत असतां, पेशव्यांसंबंधीं व विशेषतः पेशव्यांच्या मूळ पुरुषासंबंधानें निर्णयात्मक अशी नवीन च माहिती सुदैवानें उपलब्ध जाहली. तीर्थोपाध्यांच्या दप्तरांत तीर्थविधी करण्या स गेलेल्या लोकांची पद्धतशीर नोंद असून, त्यांच्या वह्यांत बहुतेकांचें हस्ताक्षरच असतें असें मजला माहीत असल्यामुळें, त्यांचे वह्यांतील पेशव्यांनीं स्वहस्तानें केलेली प्रत्येक नोंद मीं मोठ्या काळजीनें उतरून घेतली. सदरील नोंदा जशाच्या तशा कालानुक्रमानें प्रथमतः खालीं देऊन, त्याविषयींची थोडीबहुत चर्चा मंडळास सादर करितों.

हिंगण्याचे दप्तरीं पेशव्यांसंबंधानें नोंदी आहेत त्याः—

( १ ) ३४/५

शके १६०१ सीधार्थी नाव सवत्सरे मार्गेस्वर
वद् १३ ते दीवसीं लिखितं वीठल विस्वनाथ
आजे अंताजीपंत भट उपनाव गोत्र गारग्य
व बंधु जानो वीस्वनाथ व रुद्राजी वीस्वनाथ
व बाळाजी वीस्वनाथ गाव × × रसूर (?) ता।
श्रीवर्धन देसाई आपले ( नासीक ) क्षेत्रीचे तीर्थ
पुरोहीत वेदमुर्ती ( चिंतामणभट ) हिंगणे जे आपले
वसी येतील ( ) तील हे लिहिले सही.

सदरहु लेख विठ्ठल विश्वनाथ याचे हातचा असून, अत्यंत महत्वाचा आहे लेख बालबोधींत लिहिलेला आहे

( २ ) १/२

लिखितं राधाबाई भ्रतार बाळाजीपंत सासरे
विसाजी विसाजीपंत अजसासरे विसाजीपंत
पुत्र बाजीराय व चिमामाजी उपनाव भट
गोत्र गार्ग्य व गाव श्रीवर्धनेचे देशायी
राजाजे पेश्वे अपले नाशिकचे तीर्थ पुरो-
हित चिंतामणभट हिंगणे जे कोण्ही वंशी
येतील ते या पुजीतील पूर्वापर असे हे
लेहले सही.

सदरहू लेख बालबोधींत लिहिलेला असून, येथून तेथून तो खुद्द बाईचे हातचा आहे. बाळाजी विश्वनाथ पेशवे ह्यांचे बायकोस लिहितां वाचतां येत होतें हें इतिहासज्ञांस विदित आहे च. सदर लेख कोणत्या मित्तीस लिहिला हें समजण्यास

मार्ग नाहीं. तथापि ह्या नोंदींचे मागील व पुढील अशा दोन्ही नोंदींवरून, हा लेख शके १६३५ ते १६३९ पर्यंतच्या कालावधींत केव्हां तरी लिहिला हें निर्विवाद आहे.

(३) ४/१८

लिखितं राधाबाई भ्रतार बाळाजीपंत सासरे
विसाजीपंत आजे सासरे आंताजीपंत पुत्र
बाजीराऊ व चिमाजी उपनाव भट गोत्र
गार्गे गाव श्रीवर्धनचे देशाई हली वस्ती
सातारा पेशवे आपले नासिकचे तीर्थ उपाधे
चिंतामणभट हिंगणे पूर्वील परापर आसे ती
पूर्वील लिहिले पाहोन आपन आज्ञा करून
लेहविले आसे हे परापर आपले वौसीचे
येतील ते तुम्हास पुजितील हे नासकी
यात्रेस येऊन लेहोन दिधले आसे हे
लिा सही

वरील लेख मोडींत असून, तो बाईचे आज्ञेवरून दुसरे कोणी तरी लिहिलेला आहे. लेख कोणते तारखेचा हें निश्चिततेनें सांगतां येणें कठीण च आहे.

(४) ५/३

वेदशास्त्रसंपन्न राजश्री चिंतामणभट हिंगणे

वास्तव्य नासीक स्वामीचे सेवेसी.

विद्यार्थी बाजीराऊ बलाळ प्रधान नमस्कार. विनंती उपरी
क्षेत्र नासीक येथील तीर्थ उपाध्येपण तुम्हास दिल्हे आहे त्यास
क्षेत्र मजकुरी आणीक एक ब्राह्मण आहे तो तीर्थरूप नानोपंत
काका यांचे पत्र आपणाजवळ आहे म्हणतो त्यास ते पत्र
नानोपंत काका यांचे अक्षर खरे जाहाले तरी तीर्थ उपा-
ध्येपण निमे त्यास व निमे तुम्हास देऊन जर त्याजपासी
पत्र आहे ते नानोपंत काकाचे अक्षरचे नव्हेसे जाहाले
तरी क्षेत्रींचे अवघे उपाध्यपण आमचे स्वामीचे असे
तु × × × × × पुजीत जाऊन शके × × ×

३५

नाम सवत्सरे मार्गसीर्ष शुध नवमी. ( इं ) दुवार लोभं
आसो दीजे देसमुख राजपुरी ( या ) चा माहाल लिहून
दिल्हे सही हे विनंती

लेखन
सीमा

सदरहू नोंद मोडींत असून, अनेक दृष्टींनीं मनन करण्यासारखी आहे. क्षेत्रस्थ उपाध्यांमध्यें साहजिकच उत्पन्न होत असलेली चुरस व पेशव्यांच्या मनाचा समतोलपणा व न्यायप्रियता हीं सदरहू लेखांत प्रामुख्यानें दृष्टीस पडतात. लेख शके १६५२ मार्गशीर्ष शु० ९ चा आहे हें तद्दिनर विश्वास्य पुराव्यावरून हि सिद्ध आहे.

( ५ ) ६/५१

वेदमूर्ती चिंतामणभट हिंगणे यांस सा। नमस्कार
लिखितं चिमणाजी बलाळ देशमुख प्रा। दंडाराजपुरी क्षेत्र नासीक
येथील तीर्थ उपाध्यपण तुम्हास दिल्हे असे, आपले वंशपरंपरेनें
चालेल फाल्गुन सुध प्रतीपदा पिंगल नामसवछर

हा लेख मोडींत असून, सर्व खुद्द चिमाजी आप्पांचे हातचा आहे.

( ६ ) ६/५२

विद्यार्थी बाळाजी बाजीराव नमस्कार विनंती
आम्ही तीर्थास आलों. वेदमूर्ति चिंतामणभट हिंगणे यांस
पुजलें. तीर्थ उपाध्यपण वडिलानीं पूर्वापर स्थापना केली
असे पुढें हि येणेप्रमाणेंच चालवावें हे विनंती शके १६५९
पिंगल नाम संवत्सरे फाल्गुन शुध प्रतीपदा सौम्यवासरे उपनाव भट गोत्र गार्ग्य श्रीवर्धनकर देसाई.

हा हि लेख मोडींत असून, येथून तेथून खुद्द श्री. बाळाजी बाजीराव यांचे हातचा आहे. श्री. चिमणाजी बल्लाळ हे आपले पुतणे श्री. नानासाहेब ह्यांसह नाशिक येथें आल्याचें लेखांक ५ व ६ ह्यावरून लेखावरून स्पष्ट होतें.

( ७ ) ६/५२

विद्यार्थी सदाशिव चिमणाजी नमस्कार.

वडिलानीं तुम्हास पुजीले त्याप्रमाणे आपण पुजूं
शके १६६६ रक्ताक्षीनाम संवत्सरे माघ शुध १ मंगळवार
हे विनंती.

हा लेख मोडींत असून, साशांचे हातचा आहे.

( ८ ) ६/५२

तीर्थरूप नाना व भाऊ याणी लिहून दिल्हे.
त्याप्रमाणें रघुनाथ बाजीराव तत्पर आसे हे विनंती

हाही लेख मोडींत असून, श्री. रघुनाथरावदादासाहेब यांचे हातचा आहे. लेखा-वर मित्ती नसल्यामुळें, तो केव्हांचा ? हें ओळखण्यास साधन नाहीं. तत्रापि तो शके १६६६ चे नंतरचा आहे, हें निश्चित होय.

( ९ ) ६/५१

शके १६७६ भावनामसंवत्सरे वाो रा चिंतामणभट हिंगणे
यांस द्वारकाबाई देशमुखीण का श्रीवर्धन प्रा राजपुरी भ्रतार
अंताजीपंत उपनाम भट गोत्र गार्ग्य आपले तीर्थपुरोहितपण तु-
म्हास लिहून दिल्हे असे हस्ताक्षर हरि विश्वनाथ भावे.

लेख मोडींत च आहे. ही द्वारकाबाई कोण ? पेशव्यांची जवळची नातलग असावी.

( १० ) ६/७५

विद्यार्थी माधवराव नारायण प्रधान नमस्कार
विनंती उपरी क्षेत्र नासीक येथील तीर्थोपाध्येपण
वडिलांही तुम्हास लिहून दिल्हे आहे त्याप्रमाणें मान्य
असे. मित्ती मार्गसीर्ष शुद्ध १५ शके १७०६ क्रोधी-
नाम संवत्सरे हे विनंती.

हा हि लेख मोडींत असून, एका दृष्टीनें तर फार महत्वाचा आहे. श्रीमंत आपले वयाचे दहावे वर्षी अक्षर कोणत्या रीतीनें काढीत हें ह्यावरून स्पष्ट दिसतें. अक्ष-राची मोडणी किंत्तेवजा असून, त्याबद्दल आदर उत्पन्न होतो.

( ११ ) ७६

रावसाहेबानी लिहिले ते बाजीराव रघुनाथ

यांस मान्य असे. शके १७११ सौम्यनाम संवत्सरे फाल्गुन शुा ३ भौमवासर उपाध्ये हिंगणे नासीकचे.

लेख मोडींत असून, तो श्री. बाजीराव रघुनाथ यांचे हातचा आहे.

येणेंप्रमाणें ११ नोंदी हिंगणे यांचे दप्तरीं सांपडतात. ह्यांपासून ऐतिहासिक-दृष्ट्या कोणती नवीन माहिती आपणांस मिळते तें थोडक्यांत पाहूं.

पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ ह्यांचेसंबंधानें शके १६२९ पूर्वीची फारशी माहिती उपलब्ध नाहीं; इतकेंच नव्हे, तर बाळाजी विश्वनाथ यांचा जन्मकाल, त्यांची गृहस्थिति, त्यांचें बालपण इत्यादि महत्वाच्या गोष्टींसंबंधानें अद्याप पूर्ण अज्ञान आहे. बाळाजी विश्वनाथासंबंधानें अत्यंत जुना असा लेखी उल्लेख म्हटला म्हणजे परशरामाजवळील पेढे गांवच्या बाळ गवळ्याच्या सांगण्यावरून शके १६१९ चे सुमारास पडलेल्या ब्रह्मेंद्रस्वामीच्या व बाळाजी विश्वनाथाच्या भेटीसंबंधानें होय. ( ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र, पृ. ४, व रा. राजवाडेकृत म. इ. सा. खंड २, पृ. २ ). आजच्या 'लेखमालें'तील पहिल्या लेखांतील बाळाजीचा उल्लेख हा उपरिनिर्दिष्ट उल्लेखावरून सुमारें १८ वर्षांनीं जुना असून, पुष्कळ ऐतिहासिक गोष्टींवर स्वतंत्ररीत्या प्रकाश पाडण्यास समर्थ आहे. शके १६०१ मध्यें बाळाजीचा वडील भाऊ विठल यानें स्वदस्तूर लिहून ठेविलेला लेख ह्या गोष्टीनें तर ह्यास अतोनात महत्व आलें आहे. अशा ह्या महत्वाच्या लेखावरून ज्या गोष्टींचा कायमचा निर्णय होतो त्या गोष्टी ह्याः—

( अ ) ह्या लेखावरून पेशव्यांच्या मूळपुरुषाचें, अर्थात् बाळाजीच्या आजाचें नांव निर्णीत होतें. प्रकाशित अशा कोणत्या हि ऐतिहासिक कागदपत्रांत आजपर्यंत बाळाजीच्या आजाचें नांव दाखल नाहीं. अतएव ही माहिती अश्रुतपूर्व असून महत्वाची आहे.

( आ ) विश्वनाथपंतांस मुलें किती होतीं व तीं कोणकोणतीं ह्या गोष्टींचा हि ह्या लेखानें कायमचा निकाल लागतो. काव्येतिहाससंग्रहाच्या ४९६ व्या यादींत ' पेशव्यांची वंशावळ ' दिली आहे. त्यांत विसाजीपंतांस १ कृष्णाजी, २ जानोजी, ३ रुद्राजी, व ४ बाळाजी असे चार पुत्र असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. नं. १ च्या लेखांत कृष्णाजीचा पत्ता नसून, त्याऐवजीं विठल विश्वनाथाचें नांव आहे; इतकेंच नव्हे, तर शके १६०१ तील सदरहू लेख खुद्द विठल विश्वनाथ याचे हातचा आहे. सबब १६०१ त विसाजीपंतांस अनुक्रमें १ विठल, २ जानोजी, ३ रुद्राजी,

व ४ बाळाजी असे चार मुलगे होते, हें निःसंशय आहे. काव्येतिहाससंग्रहांतील 'टिपण' अगदीं अलीकडील असल्यामुळें, अशा स्थितींत ऐतिहासिकदृष्ट्या जास्त महत्व कोणास द्यावयाचें, हें ठरलेलें च आहे,

ह्या व अशा च प्रकारच्या कित्येक गोष्टी नमूद करितां येण्यासारख्या आहेत. बाळाजी विश्वनाथासंबंधानें जुना पत्रव्यवहार श्रीवर्धन व जंजिरा यांचे आसपास व तसें च सचीव, पुरंदरे, थोरात इत्यादिकांच्या दप्तरीं सांपडण्यासारखा आहे, एवढें जातां जातां सुचवून वे. शा. सं. भालचंद्र गोपाळभट हिंगणे ह्यांचे त्यांनीं केलेल्या मदतीबद्दल मनःपूर्वक आभार मानितों.

# ७१ तळेगांव-ढमढेरे येथील देवालयांवरील शिलालेख

( रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन )

## १. उत्तरेश्वर

श्री शके १६३० सर्व
धारी संवत्सरे दक्षि
णायने कार्तिके मासे शु
क्ल पक्षे प्रति

सदरहु शिलालेख उत्तरेश्वर नामक देवालयाचे दरवाजावर आहे. लेखाचे दोन भाग असून मध्यंतरी गणपतीची मूर्ति कोरलेली आहे. गणपतीस शेंदूर वगैरे लावण्याची पद्धत अव्याहत सुरू असल्यामुळें, व इतर आनुषंगिक कारणांमुळें, लेखाचीं अक्षरें साहाजिकच बुजलीं होतीं. उघड च आहे कीं, अक्षरें लावण्यास बरीच मेहनत पडली. लेखाचा दुसरा भाग न लागल्यामुळें, पूर्वार्ध काय तो वर दिला आहे. देवालय महाजन यांनीं बांधल्याचें म्हणतात; व ग्याझिटिअरकारांनीं हि सदर दंतकथेचा च अनुवाद केला आहे. परंतु लेखाच्या उत्तरार्धापैकीं जो थोडाबहुत भाग लागतो त्यावरून सदर देवालय महाजन यांनीं बांधिलेलें नसून, 'उत्तरेश्वर' हें नांवही त्या कालचें नाहीं, हें स्पष्ट दिसतें. लेख बराच जुना असून, शुद्ध आहे.

## २. सिद्धेश्वर

स्वस्ति श्री नृपशालि
वाहन शक १६५४ परि
धावि संवत्सर चैत्र शु
ध १ श्री सिद्धेशालयं मा
हाद् सेटिसुत मोरसेटि
करंजे व स्वबंधु अपाकृतं

हा लेख देवालयाचे दक्षिण अंगचे भिंतीचे शेंड्यावर आहे. अक्षरें ठशाप्रमाणें कोरल्यामुळें, शिलालेख वाचण्यास अडचण पडत नाहीं. लेख साधारणपणें शुद्ध आहे. सदरहू देवालय तळेगांव-ढमढेरे येथील जोशी कुळकर्ण्यांपैकीं शिंद्यांचे पदरीं फडणिशीचें काम करीत असलेल्या एका पुरुषानें बांधिलें असा जनसमज आहे; परंतु उपरिनिर्दिष्ट शिलालेखानें सदर गोष्टीचा कायमचा निर्णय लागतो. ग्याझि-टिअरकार हि वरील दंतकथेचा अनुवाद करितांना पूर्ण घसरले आहेत. कदाचित् वरील शिलालेख त्यांच्या पाहण्यांत आला नसावा. देवालयाचा मुख्य भाग करंजे यांनीं च बांधिला असून, ओंवऱ्या, तट वगैरे बाकीचा भाग फडणिसांनीं बांधिला असें मानण्याकडे मनःप्रवृत्ति होते. देवालयाची व्यवस्था फडणिसांच्या वंशजाकडे चालू आहे, ह्या गोष्टीनें वरील विधानास बळकटी येते.

ह्या लेखाचें आणखी एका दृष्टीनें महत्व आहे. मोरशेट करंजे ही एक ऐति-हासिक व्यक्ति असून, तिचा व परंपरेनें करंजे घराण्याचा पेशव्यांशीं विशेष घरोबा होता. करंजे हे पेशव्यांचे सावकार होते. सदर लेखावरून, मोरशेट करंजे ह्याचे बापाचें नांव महादशेट असें होतें, व शके १६५४ त मोरशेट हयात होता अशी ऐतिहासिक नवीन माहिती मिळते.

## ३. भीमाशंकर

श्रीशालीवाहान शके
१६६४ दुंदुभी शवत्सरे फाल
गुन शुध १ + + भीमाशंक
र देवालय नीर्मीत मोरशेटी
व अपाजी करंजे सुत धनशेटी

लेख देवालयाचे बाहेरील दगडावर खोधणीनें खोदला आहे. लेख फारच अशुद्ध आहे,

## ४. मारुती.

स्वस्ति श्री नृप शालीवान शके १६९९
हेमलंबी संवत्सरे श्रवन शुद १ श्रीमा
रुति चरनी तत्पर यादोजी वा वरधाजी मे
टे शीपी नीरतरः मल्लार जीवन जोतीशी
दादोजी व भवानजी वा काडोजी चापे पार्थ

सदरहु लेख वेशीसमोरील मारुतीचे देवालयावर बाहेरील अंगास उजवे बाजूस उत्तरेकडील खणाचे वर आहे. शुद्धाशुद्धतेचा विचार यथातथा च आहे. इतर लेखांपेक्षां विशेष हा कीं, मुहूर्त देणारा जोशी व कारागीर यांचीं नांवें ह्यांत दाखल आहेत.

## ५. काकडेश्वर

स्वस्ति श्री नृप शालिवाहन शक
१७१२ साधारण नाम सवत्सरे का
र्तीक शुद्ध १ श्री काकलेशाल
य तलग्रामक कुलकरणि जोति
षि बापूजी आत्मज सदाशिवेन
यत्नकृत ॥

सदरहू लेख गांवाचे मध्यभागीं असलेल्या काकडेश्वर नांवाचे देवालयावर आहे. लेखांत संस्कृताची ऐट घातली आहे.

# ७२ तुकारामबोवांचे अस्सल अभंग

( तच्छिष्य संताजी जगनाडे यानें स्वतः लिहिलेले )

( रा. दत्तो वामन पोतदार, पुणें )

१. तुकारामबोवांच्या चौदा टाळकऱ्यांपैकीं संताजी तेली जगनाडे हा एक होय. यानें तुकारामादि साधूंचीं कवनें स्वहस्तानें लिहून ठेविलेली एक वही तळेगांव, दाभाडे येथें त्याच्या वंशजापाशीं आहे. वहीच्या अस्सलपणाबद्दल वाद च नाहीं. १९०२ च्या सुमारास 'केसरीं'त रा. पांगारकर यांनीं व तदनंतर 'विश्ववृत्त' मासिकांत ( वर्ष २ अंक ९ ) म. इ. राजवाडे यांनीं यासंबंधानें सविस्तर लेख

प्रसिद्ध केले. त्यांत संताजीच्या हातच्या सह्या, मित्या, शक ( १५६८–१६१० ) वगैरे कोठें कसे आहेत तें व्यवस्थित दिलें आहे.

२. संताजी तुकारामाच्या अगदीं जिवलगांपैकीं एक असल्यामुळें त्यानें लिहिलेले अभंग म्हणजे तुकाराममहाराजांच्या मुखांतून ते जसे साक्षात् स्रवले तसेच दिलेले हें उघड आहे. अर्थात् ह्या संहितेच्या प्रामाण्याबद्दल अधिक लिहिणें नलगे.

३. तूर्त वहींतील ४१ पृष्ठापर्यंतचे—म्हणजे संताजीची वहींतील पहिली सही येईपर्यंतचे—सुमारें ९९ अभंग उतरून आणले आहेत. त्यांची भाषा तर अर्थात् छापील सर्व गाथ्याहून भिन्न आहे. शिवकालीन भाषा समजण्यास हें एक मोठें साधन होईल. तत्कालीन पत्रव्यवहारांतून आढळणारें उकारबाहुल्य यांत दृष्टोत्पत्तीस हि येत नाहीं. हे व इतर प्रश्न फार विचार करण्यासारखे आहेत. असो.

४. पण संताजीची ही वही तर सर्वत्रांना माहीत आहे व कै. शंकर पांडुरंग व विष्णुशास्त्री यांनीं ' इंदुप्रकाशां ' तून जो पहिला तुकारामबोवांचा गाथा प्रसिद्ध केला, त्या वेळीं तळेगांवच्या या वह्यांचा त्यांनीं उपयोग केला होता अशी सर्वत्र समजूत आहे. पण सदर छापील गाथ्याशीं मीं खाली दिलेले अभंग जो अतिशय बारकाईनें ताडून पाहील, त्याच्या चटकन् ध्यानांत येईल कीं, वरील बात झूट आहे.

भाषा-भेद तर पदोपदीं स्पष्टपणें नजरेस येईल च आणि त्या गाथ्यांत तर जरा एक रेंसभर फरक आढळला कीं, पाठभेद द्यायला कसूर केलेली नाहीं ! शिवाय अर्थदृष्टीनें हि महत्वाचे असे पुष्कळ भिन्न पाठ संताजीच्या लिखाणावरून निघतात. मासल्याकरितां हे पाहाः—

| संताजी पृष्ठ | इंदुप्रकाश अभंग संख्या. |
|---|---|
| ३– करावया सती व्रत | १५५४ सत्य करावया व्रत |
| ३।४ सींधुपात्र न पुरे शाही | १६१३ पत्र सिंधु न पुरे शाही |
| २१ हरुशें नाचों घनघाई | १४३ हरुषें नाचा धरा धाई |
| ४८ जयाचीये गावीं | २३४० जयाचीये द्वारीं |
| ४९ बहुवस जन | २३४१ बहु वसे जन |
| ४६ त्याच्या चीतासी वीस्रांती | २३३५ त्यांच्या चितनें विश्रांति |
| २० अवघे वर्तमान | ७३५ आदि वर्तमान |
| १९ माझ्या नमस्कारा वीठोबासी | ५४९ माझ्या नमस्कारा विठोबाच्या |
| ६ मोडुन मजारी बांधावी | २३७३ मोडून मदार बांधावी |
| ५ अवकळेच्या त्या परी | २३७० अवकळा त्या परी |

शिवाय तळेगांवप्रतीवरून म्हणून जे पाठभेद इंदुप्रकाश गाथ्यांत आहेत ते व संताजीचे पाठ पाहिले तरी त्यांत ठिकठिकाणीं भेद आढळेल. त्याचप्रमाणें धरणेकरी ब्राह्मणाबद्दलच्या उल्लेखाची दोन्ही ठिकाणची शब्दयोजना पाहिली तरी हि हें च सिद्ध होतें कीं या छापील गाथ्यांत जिला तळेगांवप्रत म्हटलें आहे ती जगनाडयाची ही प्रत नव्हे. जगनाडयाची दुसरी एखादी प्रत मानल्यास एक च अभंग दोन ठिकाणीं निरनिराळा लिहिण्याइतका संताजी मूढ होता असें म्हणण्याची आपत्ति येईल.

तात्पर्य, सद्रहू अस्सल वही इंदुप्रकाश गाथ्याच्या विद्वान् संपादकद्वयास उपलब्ध झाली नव्हती हें च खरें. एरवीं तिचा उपयोग झाल्यावांचून राहता ना. तो योग आज आला असून तुकाराममहाराजांच्या अस्सल वाक्प्रवाहांत मज्जन करण्याची ही भाग्यसंधि सर्व महाराष्ट्रीयांस मिळत आहे.

५. संताजीचें अक्षर सुवाच्य, टपोरें व वळणदार आहे. वहीचीं पहिलीं अकरा ११ पानें गेलीं आहेत. वारंवार हजारों भाविकांनीं हात घांसल्यामुळें पहिलीं पहिलीं पानें पुसट झालीं आहेत. त्यामुळें अक्षरें कोठें नीट लागत नाहींत. संताजीच्या लिपींत

ल = ळ ; ळ = ल्ळ ; स = ष – स–ष्य.

श्री = श्री ; इ – ई = ई ; उ = उ – ७.

आढळून येणारा हा प्रकार जुन्या वह्या नित्य पाहणाराच्या परिचयाचा च आहे. लेखन एकजात पद्धतशीर व नियमबद्ध असल्यामुळें 'अशुद्ध' या दोषारोपास पात्र नाहीं.

६. संताजीच्या या वहींत प्रत्येक पद्याच्या डोक्यावर 'वीठल' अशी अक्षरें असून, ᗐ अशी एक खूण हि हटकून असावयाची च.

क्वचित् ११२ ठिकाणीं एखादें अक्षर गळालें आहे. उ. पृ. ४९८ 'नारायेण'-च्या ऐवजीं 'नाराण'.

सूचना:—अक्षरें लागत च नाहींत किंवा गेलीं आहेत तेथें + खूण व संशयास्पद आहेत तेथें ? खूण केली आहे.

अभंगाच्या डोक्यावरील आंकडे शंकर पांडुरंगाच्या इंदुप्रकाश गाथ्यावरून घातले आहेत.

# जगनाडे याचे वहीची नकल

पृ. १२

सुर्पे गोवी ! सी भोजाना ॥ ळपउनीयां आपणा ॥ २ ॥ येकें येक बुझावीसी : तुका म्हणे टक होसी : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

वीठळ | १२२७ ॥

आम्हां जाणों तुझा भाव : द्रुढ ॥ धरीयळे पाव : ॥१॥ धृ ॥ फांको नेदु चुकावीता : ॥ नेघो थोडें बहु देतां : ॥ बहुतां दीसांचें ळीगाड : ॥ आळें होत होत : जड ॥ २ ॥ तुका म्हणे (ॐ) आता : नेघो सर्व मही देता : ॥ ३ ॥ छ ॥ ४छ ॥ छ॥

वीठळ ॥

+ सुनीयां अ + ती जोडी दीव्हीी तुझे ! हातीं ॥ १ ॥ धृ ॥ त्याचे हे चीं उपकार : ॥ अंतीं आम्हासी वेव्हार : ॥ नामारुपा जाळा ठाव : ॥ कोण म्हणत तुज देव ! येक : ॥ तुका म्हणे हारी तुळा ठा(व) दीव्हा घरी : ॥ ३ ॥

* पृ. १३।१४ वरील 'पायिकवळी'चें हस्ताक्षर संताजीचें नाहीं सबब सोडलें. 'वीठळ' हि नूतन अभंगारंभसूचक खूण हि तेथें नाहीं. शाई-टाक सर्व च भिन्न आहे.

( पृ. १५ ) | ॥ ३४४७

न करावी चींता : भये न धरावे चीता : ॥ १ ॥ धृ ॥ दासां साहे नारायेण : होये रक्षींतां आपण : ॥ छ ॥ नळगे प्रीहार : काहीं योजावे उतर : ॥ २ ॥ न धरावी संका : ॥ नये बोळो ह्मणे तुका : ॥ ३ ॥

वीठळ | २३८४ ॥

पडतां जड भारी : दासी आठवावा हरी : ॥ १ ॥ मग तो होउं नेदीं सीण : आड घाळी सुद्रसेन : ॥ छ ॥ नामाच्या चींतने वारा वाटा पळती वीघ्नें : ॥ २ ॥ तुका ह्मणे प्राण : देवा करावा आर्पण : ॥ ३ ॥ छ ॥

वीळळ | १५५४ W

.. आपुळीया ळाजा : धांवे भक्ताचीया काजा ॥ १ ॥ धृ ॥ नाम धरीळें दीना-नाथ करावया सती व्रत : ॥ छ ॥ अनाथ नीवारी : छाया पीतांबरें करी : ॥२ ॥ उभा करंकटीं ; तुका म्हणे या च साटीं : ॥ ३ ॥ छ ॥

वीठळ | १६१३ W

गर्जतां पवाडे : जेथे श्रुती मौन्य पडे : ॥ १ ॥ धृ ॥ तेथे माझी वाचा वाचा कीती : ॥ पुरे कराया अस्तुती : ॥ छ ॥ सीणळी सहश्र तोंडें : शेशा फणी येसें धेंडें ॥ २ ॥ तुका म्हणे मही : सींधुपात्र न पुरे शाही : ॥ ३ ॥ ॥ छ ॥ छ ॥

वीठळ | ९४० W

येव्हडा प्रभु भावे : ॥ त्याणें संपुश्टी राहावें : ॥ १ ॥ धृ ॥ होये भक्ती केळा तैसा : पुरवी धरावी ते इछा : ॥ छ ॥ येव्हडा जगदानी : मागे तुळसीदळ पाणी : ॥ २ ॥ आळा नामारुपा : तुका म्हणे जाळा सोपा : ॥ ३ ॥ छ ॥

वीठळा | २९८६ W

पाहातां रुप डोळा भरे : अंतर नुरे वेगळे : इछावसें पेळ माडीं : अवघे सा ( डी बाहेरी ॥ १ ॥ धृ ॥ तोहा नंदा नंदनु बाइये : यासी काय परीचार : ॥ छ ॥ दीसोतो हा नव्हे तैसा : असे दीसाव्यापक : ळा घ वाहे पोळसाटी : ॥ होतां भेटी पसरावें : ॥ २ ॥ म्हणउनी उभी ठाकें ॥ परतळें या वाटा : आड करून जावं तुका जो यां ळोका दावी तो ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

पृ. १६ | २३७० W

वीठळ

नाहीं घाटावें ळागत : येका सीतें कळे भात ॥१॥धृ॥ क्षीर नीवडा तें पाणी : चोंची हंसाचीये आनी : ॥ छ ॥ आंगडें फाडून गोदडें करीं : अवकळेच्या त्या परी : ॥ २ ॥ तुका म्हणे कण : ॥ भुसींकैंचे होये सीण : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

वीठळ | २३७१ W

साळोमाळो हरीचे दास : म्हणउनी केळा नास : ॥ १ ॥ धृ ॥ अवघें बचमंगळ केळें : म्हणती येकाचें आपुळें : ॥ छ ॥ मोडुनी संतांची वचनें ॥ करीतीं आपणा भुशणें : ॥ २ ॥ तुका म्हणे कवी : जंगामध्यें रुढी दावी : ॥ ३ ॥ छ ॥

वीठल | २३७२ ☫

जायांचे अळंकार : बुडउनी होती चोर : ॥ १ ॥ धृ ॥ त्यांस ताडनाची पुजा योग घडे बरा वोजा : ॥ छ ॥ अभीत्लासाच्या सुखें : ॥ अंतीं होती काळीं मुखें : ॥ २ ॥ तुका म्हणे चोरा : हीये भुभसेन मातेरा : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

वीठल | २३७३ ☫

काळउनी विश : केळा अमृताचा नास ॥१॥ धृ ॥ येश्या अभांग्याच्या बुधी : ॥ सत्य मोडी नाही सुधी : ॥ छ ॥ नाक कापुन लावी सोनें : कोन अळंकार स्वर्णें ॥ २ ॥ तुका म्हणे बावी : मोडून मजारी बांधावी : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

वीठल | २३७४ ☫

कुण भुसाच्या आधारें : + + नीवडीता बरें : ॥ १ ॥ धृ ॥ काये घो + + + धा(?)नी ताकामधी घाटी लोणी : झुइनीपुढें चेंटा : काये ळप-वीसी चाटा : ॥ २ ॥ तुका म्हणे ग्रान दीमाषाचे तें भनंभन : ॥ ३ ॥ छ ॥

वीठल | २३७५ ☫

वीकळ तेथें वीका : माती नावं ठेउनी बुका : ॥ १ ॥ धृ ॥ हातीं नीवा(?)डाचा ठाव : खरें षोटें नीवडीता भाव : ॥छ॥ गन्हवरं + वी(?)धी पोठ वाढवीलें चींधी ॥ २ ॥ लाऊ जाणे वी ? ल्हे तुका मा (?) या आणी कळहे ॥ ३ ॥

पृ. १७

वीठल | २३७६ ☫

वीशई अद्वये : त्यासी आम्हां बोलों नये : ॥ १ ॥ धृ ॥ देव तेथुनी नीराल्ला : असे नीह्‌काम वेगल्ला : ॥ छ ॥ वासनेची गुंती : तेथें कैंची ब्रम्हंस्थीती : ॥ २ ॥ तुका म्हणे अस्था देहीं येथें नाहीं जमेती ॥ ३ ॥ छ ॥

वीठल | २३७७ ☫

नमीतों देवा : माझी येके ठाई सेवा : ॥ १ ॥ धृ ॥ गुण अवगुणं नीवाडा : म्हैस म्हैस रेडा रेडा : ॥ छ ॥ जनी जनार्दन : ॥ साक्षी त्यासी लोटांगण : ॥ तुका म्हणे षडे : नीवडूं दळणी घडघडे ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

वीठळ | २६६८ \\//

आपलें मरण पाहीलें म्यां डोल्लां : तो जाला सोहोल्ला : अनुउपम्यें : ॥ १ ॥ ॥ धृ ॥ अनंदें द्राटली तीन्ही त्रीभुवनें सर्वात्मकपणें भोग जाला : ॥ छ ॥ येकदेसी होतों अहंकारें अथीला त्याच्या त्यागें जाला सुकाल्ल हा : ॥ २ ॥ फीटलें सुतक जन्ममरणाचें : मी माझ्या संकोचें दुरी जाळों : ॥ ३ ॥ नारायेणा दिल्हा वसतीचा ठाव : ॥ ठेउनीयां भाव : ठेलों पाई : ॥ ४ ॥ तुका म्हणे दील्हें उमटुनी जगी : घेतलें तें आंगीं लाउनीयां : ॥ ५ ॥ छ ॥

वीठळ | २६६९ \\//

बोलविला देहे आपुलेनी हातें : ॥ हुतासीलीं भुतें ब्रह्मा आमी : ॥ १ ॥ धृ ॥ येक वेल्ले केलें सकल्लकारण : आंतां नारायेण नाराण ॥छ॥ : अमृतसंजीवनी नीववीली घाई : आंगें नये ठाई : ॥ हारपली : ॥ २ ॥ येकादसी केलें जाग्रण उपवास : ॥ बारांवां दीवस भोजनाचा : ॥ ३ ॥ अवघीं कर्मे केली कुशस्फोटापासी : समत्र येकेसी उरला नामा : ॥ ४ ॥ तुका म्हणे आंतां आनंदी अनंदु : ॥ गोवींदी गोवींदु : वीस्तारला : ॥ छ ॥ २ ॥ छ ॥

पृ. १८

वीठळ \\// | २६७०

पींडदान पींडे ठेवीलें करुनी : तील्ल तील्लवणी मुल्लत्रई : ॥ १ ॥ सारीलें संकल्प येका ची वचनें : ब्रह्मीं ब्रह्मां अर्पणें : सेवटीच्या ॥ छ ॥ सवे आपसव्य बुडाली अकर्मी : ॥ येकायेक वुर्मी येको वीस्णु : ॥ २ ॥ पीत्रुपुत्रत्वाचें जालें अवसान : जनी जनार्दन अभेर्देसी ॥ ३ ॥ आहे तैसी पुजा पावली सकल्ल : सहज तो काल्ल साधीयेला : ॥ ४ ॥ तुका म्हणे केला अवघ्यांचा उधार : आतां नमस्कार सेवटीचा : ॥ १५ ॥ छ ॥ ३ ॥

---

वीठळ \\// (सदर अभंग इंदु० गाथ्यांत सांपडत नाहीं.)

स्वामीसेवा गुरुभक्ती : पीत्रुवचन सेवा पती : ॥ १ ॥ धृ ॥ हे च वीस्णुची माहापुजा : भाव न धरीतां दुजा : ॥ छ ॥ असत्य नोबलें नुर्घे : ॥ दुषवे आणीकांच्या दुर्षे : ॥ २ ॥ नीस्चेयाचें बळ : तुका म्हणे ते च फळ : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

वीठळ | ५६१ \\//

कोण जाणे कोणा घडे उपासना : कोण या वचना : प्रती पावे : ॥ १ ॥

॥ आतां माझा श्रोता वग्तातुंची देवा : करावी ते सेवा : तुझी च म्यां : ॥छ॥ कुशळ चतुर येथे न सरे ते : करीतीळ रीतें : तर्कमतें : ॥ २ ॥ तुका म्हणे जाळें केणे येक घरीं : मज आण हरी : तुम्हां गांठी ॥ ३ ॥ छ ॥

वीठळ | ३५५७ V

क्षेरळा सागर : गंगा वोघें मीळे : आपण ची पेळे : आपणासी ॥ १ ॥ धृ ॥ मधीळ ते वाव अवघी उपाधी : तुम्हां आम्हां मधी : ते ची परी : ॥ छ ॥ घट मठ जाळे आकासाचे पोटीं : वचनेची तुटी : तेथे ची तें : ॥ २ ॥ तुका म्हणे बीजें बीज दाषवीळें : ॥ फळ पुस्प आळें गेळें वायां : ॥ ३ ॥

वीठळ | १६५४ V

दुधाचे घागरी : मद्याचा बुंद : पडीळायां सुध : नव्हे मग : ॥ १ ॥ तैसें खळा मुखें न करावें श्रवण : अहंकारें मन वीटाळळें : ॥ छ ॥ काये करावी. तीं बतीस लक्षेणें : नाक नाहीं तेणें वायां गेळें : ॥ २ ॥

पृ. १९

तुका म्हणे अन जीरों नेदी मासी : ॥ आपळीया जैसी सवंसर्गें : ॥ ३ ॥ छ ॥

वीठळ | ८०१ V

असो आतां येसा धंदा : तुज गोवींदा आठउं : ॥ १ ॥ धृ ॥ रक्षिता तूं होसी जरी : काये येरी करावें : ॥ छ ॥ काया वाचा मन पाई राहे ठई करूं तें : ॥ २ ॥ तुका म्हणे गाईन गीती : रुप चीतीं धरुनी ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

वीठळ | ३१७ V

येथीचीया अळंकारें : काये परें पुजन : ॥ १ ॥ वैकठीचीया ळाउं वाटा : ॥ सर्व सांटा : ते ठाई : ॥ छ ॥ येथीया नासीवंतें : काये रीतें चाळउं : ॥ २ ॥ तुका म्हणे वैस्णवजन : माझे गण समुदाये : ॥ ३ ॥

वीठळ V | १३०२

अवघीयांच्या आळों मुळें : येक वेळ न्यावया : ॥ १ ॥ धृ ॥ सीध सी होवें सीध होवें : आधी ठावें : करीतों ॥ छ ॥ जोंवरी ते घटीका दुरी : आहे उरी तो काळ : ॥ २ ॥ मंगळांचे वेळे उभे : आसा शोभे सावध : ॥ ३ ॥ अवघीयांचा योग घडे : तरी च जोडे : स्ळाघीता : ॥ ४ ॥ तुका म्हणे पाहे वाट : बहुत आटी करुनी : ॥ ५ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

७८१ | वीठळ \|/

धनें देहुं गांवं : पुनेभुमी ठाव : तेथे नांदे देव पाडुरंग : ॥ १ ॥ धृ ॥ धन्ये क्षेत्रवासी लोक दईवाचे : उचारीती वाचेनामघोश : ॥छ॥ कर कटी उभा वीस्वाचा जनिता : वामार्गा ते माता रखुमाई : ॥ २ ॥ गरुड पारी उभा जोडु यां कर ॥२॥ अस्वथ समोर : उतरा मुखे : ॥ ३ ॥ दक्षेणे शंकर ळी + हरेस्वर : शोभे गंगातीर : इद्रायेणी : ॥ ४ ॥ + + लक्षुमी नारायेण बलात्लार्चे बन : तेथ आधीस्ठान : सीधेस्वर : ॥ ५ ॥ वीघ्रराज द्वारी : बहीरवं बाहेरी : हनुमंत सेजारी : सहीत दोघे : ॥ ६ ॥ दास तुका तेथे करीतो कीर्तन : हृदई चरण वीठोबाचे : ॥ ७ ॥ छ॥

वीठळ | ६४ \|/

भोरपयाने सोंग पाळटीलें वरी : बग ध्यान धरी मछा जैसा : ॥ १ ॥ टील्ले माल्ला मेद मुद्रा लावी आंगी : देखो नेर्दी ज ! ही

पृ. २० \|/

फाते जैसा : ॥ २ ॥ ढीवर या मछा : चारा घाळी जैसा : भीतरील फांसा फल्लों नेदी : ॥३॥ पाटीक हें स्नहेवादें पसु पाल्ली : कापावया नल्ली : तयासाटी : ॥ ४ ॥ तुका म्हणे तैसा भळा मीं लोकात : परी कृपावंत पांडूरंग : ॥५॥छ॥ छ ॥

वीठळ \|/ | ५६२

आमचा वीनोद तें जगा मरण : करीती भावहीण : देखोवेखी : ॥ १ ॥ न कल्ले संतंत हीताचा वीचार : तों हीं दारोदार : घाती फेरे : ॥ २ ॥ वंदाळे वंदावे नींदोळे नींदावे : येक गेळे जावें : त्या च वाटा : ॥ ३ ॥ तुका म्हणे कोण्ही नाईके सांगता : होती येमदूता वरपडीं : ॥ ४ ॥ छ ॥

वीठळ | \|/ ५६३

दीप घेउनीयां धुंडीतां आंधार : ॥ भेटे हा वीचार अघटीत : ॥ १ ॥ धृ ॥ वीस्णुदास आम्हीं नीर्मो कल्लीकाल्ला : भुळों मृगजल्ला न घडें तें ॥ छ ॥ उधल्लीतां मातां : रवीकल्ला मल्ले : हें केसें न कल्लें । भाग्येहीना : ॥ २ ॥ तुका म्हणे त्रुणे झांके हुतासेन : हे तवं वचन : वाउगें ची : ॥ ३ ॥

वीठळ \|/ | ५२२

मृत्यळोकी आम्हां आवडती परी नाहीं येका हरीनामावीण : ॥ १ ॥

॥ धृ ॥ वीटळें या चीत प्रपंच्यापासुनी : वमन तें मनीं: वैसळेंसे : ॥ छ ॥ सोने रुप धन मृतकिसमान : मानीकें पाश्यान पडे तैसे : ॥ २ ॥ तुका म्हणे तैश्या दीसतीळ नारी : रीसांचीया परी : आम्हां पुढें : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

वीठळ

एक अभंगाची जागा सोडली आहे.

पृ. २१

वीठळ \|/ | १५६३

संतासी तों नाहीं सन्मानाची चाड : परी पडे दोड अव्हेरीता : ॥ १ ॥ धृ ॥ म्हणउनी तया नव जावें ठाया : ॥ होतुसे घात या दुबळ्याचा : ॥ छ ॥ भावहीना आड येतीसे असंका : उचीतासी चुका घाळावया : ॥ २ ॥ तुका म्हणे जेथे संकोच दुरुसेणें : तया ठाया जाणें : अनुचीत : ॥ ३ ॥

वीठळ \|/ | २७२५

म्हणउनी जाळों क्षेत्रीचे सन्यांसी चीत आशापासी : आवरुनी : ॥ १ ॥ धृ ॥ कदापी ही नव्हे सीमाउळंघण : ॥ केलें विसर्जन अव्हानी च ० ॥ छ ॥ पारीखा तो आतां जाळा दुजां ठाव : दृढ केळा भाव : येकवीध : ॥ २ ॥

मुळांत ४ बोटें जागा सोडली आहे.

पृ. २२

वीठळ \|/ | ८६६

वत्लें बाह्याकारें संपादीलें सोंग ॥ नाहीं जाळा त्याग अंतरीचा : ॥ १ ॥ धृ ॥ येसें येतें नीत्य माझ्या अनुभवा : मनासी हा ठावा समाचार : ॥ २ ॥ जाग्रुतीचा नाहीं आठव स्वप्नी : जातो विसरोनी सकळ हें : ॥ ३ ॥ प्रपंचा बाहेरी नाहीं जाळें चीत : केळे करी नीत्य वेवसाव : ॥ ४ ॥ तुका म्हणे मज भोरप्याचे परी : जाळें सोंग वरी : आंत तैसें : ॥ ५ ॥

वीठळ \|/ | ८६७

म्हणवीतों दास ते नाहीं करणी : आंतवरी दोनी भीन भाव : ॥ १ ॥ गातों नाचोतों तें दाषवीतो जना : प्रेम नारायेणा नाहीं आगीं : ॥ २ ॥ पावीजे तें वर्म न कळे ची काहीं : ॥ बुडाळों या डोहीं : डंबाचीये : ॥ ३ ॥ भांडवळ कात्लें : हातोहातीं नेळें : माप या ळागळें : आयुश्यासी : ॥ ४ ॥ तुका म्हणे वांयां गेळो येसा दीसें : होईळ या हांसें : ळोकीकाचें : ॥ ५ ॥ छ ॥ छ ॥

वीठळ \|/ | ८६८

न करकतां काये करावा उपाव : ॥ जेणें राहे भाव : तुझा पाईं ॥ १ ॥ येउं-नीयां वास करीसी हृदई : यैसें घडे कईं कासयाणें : ॥ २ ॥ साच भावें तुझें चींतन मानसी : राहे हें करीसी : कईं देवा : ॥ ३ ॥ ळटीकें हें माझें करुनीयां दुरी : ॥ साच तुं अंतरीं : येउनी राहें : ॥ ४ ॥ तुका म्हणें मज राषावें पतीता:॥ आपुळीया सता : पांडूरंगा : ॥ ५ ॥ ७ ॥ ७ ॥

वीठळ \|/ | ३४४८

भाडवळ माझें ळटीक्याचे गाठी : ॥ उदीम तो तुटी यावी हाची : ॥ १ ॥ धृ ॥ केसी तुझी वाट पाहों कोण्या तोंडें : भोवंती कीं(?)रें ? भाडें गर्भवास : ॥७॥ चहुं षाणीचीया रंगळोसें रंगें ॥ सुस्ट दुस्ट आंगें धरुनीयां : ॥ २ ॥ बहुतांचे बहु पाळटळों सव्लें : बहु आळे काव्ले रंग आंगा : ॥ ३ ॥

पृ. २३

उकळुनी नये दावीतां अंतर : ॥ घडीचा पदर सारुनीयां : ॥ ४ ॥ तुका म्हणे करी : करी ? गो व ळ्रें सं ? वंसाटी : आपळा पाळटीं : संगें देवा : ॥ ५ ॥ ॥ ७ ॥ ७ ॥

वीठळ \|/ | ५४९

जऱ्हीं माझी कोण्हीं कापीतीळ मान तऱ्हीं नको आन वदों जीव्हे : ॥१॥ धृ ॥ सकळां इंद्रीयां हे माझी वीनती : नका होउं परतीं पांडुरंगा : ॥ ७ ॥ आणि-काची मात नाइकावी कानीं : आणीक नयेनी न पाहावें : ॥ २ ॥ चीता तुं रे पाई राहावें अषंडीत : ॥ होउनी मिश्रीत येकवीध : ॥ ३ ॥ चाळा पाये हात हें ची काम करा : माझ्या नमस्कारा वीठोबासी ॥ ४ ॥ तुका म्हणे तुम्हां भये काये करी : ॥ आमंचा कैवारी : नारायेण : ॥ ५ ॥

वीठळ \|/ | ७५९

येक भाव चीती : तरी न ळगती युग्ती : ॥ १ ॥ धृ ॥ कस्ळो अळे अनुभवें : म ? ज माझीया ची जीवें : ॥ ७ ॥ आठव चीपुरे : सुष अवघें मोहरे : ॥२॥ तुका म्हणे मन पुजा इछी नायेण

३७

वीठळ ॥ | ७३५

मनोमये पुजा : बहु पर्हाये केशीराजा : ॥ १ ॥ धृ ॥ घेतो कल्पनेचा भोग : न मानेती बाहेरंग : ॥ छ ॥ अंतरींचें जाणे : अवघे वर्तमान षुने : ॥ २ ॥ तुका म्हणे कुडें : केसें सरे याचें पुढें : ॥ ३ ॥

वीठळ ॥ | ५७८

थोडें परी नीरें : अवीट तें घ्यावें वरें : ॥ १ ॥ धृ ॥ घ्यावें ज्याणें नये तुटी : बीज वाढे बीजापोटीं : ॥ छ ॥ चीत ठेवीं गोही : आणीकांसीं चाड नाही : ॥ २ ॥ आपळें तें ही फार : तुका म्हणे राषें सार : ॥ ३ ॥ छ ॥

वीठळ

* मुळांत जागा मोकळी चार ओळी

पृ. २४ ( अर्धे कोरें )

२१० | : ॥ काळा : ॥ ॥

आजी वोस अबरावती : काळा पाहावया येती : ॥ देव वीसरती : देहेभाव आपुळा : ॥ १ ॥ धृ ॥ अनंद न समाये मेदीनी : चारा वीसरळीं र पाणी : तटस्त होउनी गाई ठेळीं स्वापद : ॥ छ ॥ जें देवांचें देवत : उभें आहे या रंगात : ॥ गोपाळां सहीत : ॥ क्रीडा कान्होया : ॥ २ ॥ जया सुषाची सीराणी : तें च पावळें मेदिनी तुका म्हणे मुनी : न ळभे जें धुंडीता : ॥ ३ ॥

१४३ : ॥ काळा : ॥ ॥

हा रस अनंदाचा : घोश काळा हरीनामाचा : कोण दइवांचा : भाग ळा:हे येथीळ : ॥ १ ॥ धृ ॥ पुन्यें पाहीजे बहुत : जन्मातरींचें संचीत : ॥ होइळ करीत : आळा आधीकारी तो : ॥ छ ॥ काये पाहाता भाई : हरुशें नाचों घनघाई : पोटभरी काहीं : घेतां उरीं नेठवी : ॥ २ ॥ जें सुष द्रुस्टी आहे : तें च अंतरी जो ळाहे : तुका म्हणे काये : कन्ळीकाळ बापुडें : ॥ ३ ॥

पृ. २५

## : ॥ श्रीवीठळ : ॥

### तुकावा गोसांवी यांचा काळा : \/ | १४८

येमुने पावत्ळी : गडीयां बोळे वनमाळी : ॥ आणां सीदोऱ्या सकत्ळीं : काळ। करुं आजी : अवघें येके ठांई : करुनी सवाद त्याचा पाहीं : मजपासी आहे तें ही तुम्हां माज़ी देतों : ॥ १ ॥ धृपद : ॥ म्हणती बरवें गोपाल्ळ ॥ वांती सकत्ळ : मोहोरी पावे अनंदें : ॥छ॥ षडकीं सोडीयेळा मोटा : अवघा केळा येकवटा : काळा करुनीयां वांटा : गडीयां देतो हरी : ॥ येकापुढें येक : घाळी हात पसरी मुष : ॥ गोत्ळां पावे ! तया सुष : आधीक ची वाटे : ॥१॥ धृ ॥ म्हणती गोड जाळें : म्हणती गोड जाळें : आणीक देंई नाहीं पोट धाळें ॥ छ ॥ हात नेतो मुषापासी : येर आशा तोंड वासी : षाये आपण तयासी : दावी वांकुळ्या : ॥ देउनीयां मीठी : पत्ळे ळागतीळ पाठी ॥ धरून काढीतीळ बोटीं : मुषामाजी षाती : ॥ ३ ॥ धृ ॥ म्हणती ठकडा रे : म्हणती ठकडा रे : ॥ ठकडा कान्हा ह्मांसा ळावी भरी राणा : हुम करीतो शाहाणा : पाठोपाठीं त्याचा : ॥ छ ॥ अवघींयांचें षाये कवत्ळ कुस्ण माझी माये : ॥ सुरवर म्हंणती हाये : सुषा अंतरळों : ॥ येक येका मारी : हूंगा तोंडा पाठीवरी : गोत्ळा न साहावे हरी : ॥ म्हणे पुरे आंतां : ॥ ४ ॥ धृ ॥ घेतो काकुळती : येतो काकुळती : ॥ गोळा न सावे श्रीपती : ॥ म्हणे षेत्ळो ळों (पृ. २६) आतां नीगुती : सांगो आदरीळें : ॥ छ ॥ आनंदाचे फेरीं माजी घाळुनीयां हरी : येक घाळीती हुंबरी : वाती सींगें पावे : ॥ षांकडे चोबडे : षुडे येक मुडेये येक ळुडे : ॥ कुस्णा आवडतीं पुढें : बहु भावीक ते : ॥ ५ ॥ धृ ॥ करी कवतुक : करी कवतुक : त्यांचें देषोनीयां मुष : हरी षांट(?)नसे सुष : षदषदा हांसे : ॥ छ ॥ येकयेकांचें उचीस्ट : षातां न मनीती वीट : केळीं ळाजतीं तीं धीट : ॥ आपुळीया संगें : ॥ नाहीं गेळी ज्याची भुक : त्याचें पसरवी मुष : अवघींयां देतो सुष : सारीषें ची हरी : ॥ ६ ॥ धृ ॥ म्हणती भळा भळा: म्हणती भळा हरी तुझी संगती रे बरी : ॥ आतां चात्ळवीसी तरीं : न वजों आणीका सवें : ॥ छ ॥ गाई वीसरळ्या चार : पक्षी स्वापदाचें भार : जाळें येमुनेचें स्थीर : जत्ळ वाहों ठेळें : ॥ देव पाहाती सकत्ळ : मुषें घोंटू नीयां ळात्ळ : धन्य म्हणती गोपात्ळ : धीग्य जाळों आम्हीं : ॥ ७ ॥ धृ ॥ म्हणती कैसें करावें : म्हणती कैसें करावें : ॥ येमुनाजत्ळीं होंवें : `मछ शेश घ्यावया ॥ छ ॥ सुरवरांचें थाट : भरळें येमुनेचें तट : ॥ तवं अधीक ची होंट : ॥ मटमटी वाजवी : ॥ आनंदें सहीत : क्रीडा करी गोपीनाथ : म्हणे येमुनेत हातः नका धोउं कोण्ही : ॥८॥ धृ ॥ म्हणती जाणे जीवीचें । म्हणती जाणे जीवीचें : ॥

ळाजे त्या केइचें : शेश याचें : थोरीवे : ॥ ७ ॥ धन्य दीवस काल्ल : आजी फावला गोपाल्ळ : म्हणती धाळों रे सकळ : तुझीयान हातें : ॥ मानवळे गडी : येकयेकाचि आवडी : दहीं षादळें परवडी : धनीवरी आजी : ॥ ९ ॥ धृ ॥ तुझा संग बरवा : तुझा संग बरवा : नीत्य आम्हां या देवा : ॥ येसें करुनी चारावें : ॥ ७ ॥ तवं म्हणे वनमाळी : पृ. २७

घ्या रे काठीया कांबळीं : आंतां जाउं घेरळींमेल्ळी : गाई चारावया : तुका म्हणे प्रेमें धाळीं : कोण्हां न साहावे चाळी : ॥ गाई गोपाळांसी केळी : आपणं यां सरी : ॥ १० ॥ धृ ॥ आजी जाळा आनंदु : आजी जाळा आनंदु : चाळे परमानंदु : ॥ सर्वे आम्हां सहीत ॥ ७ ॥ १० ॥ ७ ॥ ७ ॥

## १४४ | : ॥ काळा : ॥

अवघे गोपाल्ळ मीत्ळोनी या रे करुं काळा : काये कोणाची सीदोरी : येसी पाहों द्या मळा : ॥ नका कांहीं मागें पुढें ठेउं येथे : घरें च बोळा : बंची वचळा तोची रे येथें भोवंडू त्याळा : ॥ १ ॥ धृ ॥ घेतल्या वांचुन झाडा नेदीं आपुळें कांही : गोही येकायेक बहुतें : देती मोकल्ळें नाहीं : ॥ ताक सांडी येर काळवीं भात भाकरी दहीं : आळें घेतो मधीं बैसळा नाहीं आणवी तेंहीं ॥ ७ ॥ येक नाहीं धीर तांतडी : दीव्ह्या सोडन मोटा येक सोडीती गांठी रे : येक चाळती वाटा : ॥ येक उभा भार वाहोनी : पाहे उगा ची घोटा : येक ते सारुनी आराळे : आंतां येसे ची घाटा : ॥ २ ॥ येकीं थीरावील्या गाई रे : यकें वत्ळ त्या देती : ॥ येकांच्या फाकल्या वोढाळा : फेरे भोंवते पाती : येक चाराबोरां गुंतळे : नाहीं जेवन चीती : ॥ येक येकां चळा म्हणंतां येक हुंबरी घेती : ॥ ३ ॥ येकीं येकें वाटा ळावीळीं भोल्ळी नेणंती मुळें : आपण घरीं च गुंतळे : मात्ळा नासीळीं फुळें : गांठीचें तें सोड नावडे : षाये अइतें दीव्हें : सांपडल्ळे वेठी भार रे : वोझीं वाहाता मेळे : ॥ ४ ॥ येक ते माया गोवीळे घरीं बहुत कामें वार्ता ही नाहीं तेथीची : नया काहीं च ठावें : जैसें सीत्ळें होतें संचीत : तैसें ळागळें षावें : हातोहातीं गेळे वेचो–पृ. २८ ॥

नी मग पडीळें ठावें : ॥ ५ ॥ येकीं हातीं पाई घटे रे आंगीं ळावीळ्या राषा : येक ते सोळीवं बोडके : येकीं सपाट सीका : येक ते अत्ळसी तत्ळी रे : वरी वाढळ्या काषा : ॥ सीदोरी वांचुन भुंधी रे : केळा अवघ्यां वाषा : ॥ ६ ॥ तुका म्हणे कान्होबा आम्हां वादून द्यावें : आहे नाहीं आम्हांपासीं रे तुज अवघें ठवें : ॥

मांकिळांतां तुज शरण आम्ही कोणास जावें : ॥ कृपावंतें कृपा केळी रे : पोट भरे तों षावें : ॥ ७ ॥ छ ॥

२०९ | : ॥ काळा ॥

गोपाळ म्हणती कान्होबा : या रे कांही मागों : आपुळाळी आम्ही जीवींची तया आवडी सांगो : येक म्हणती उगे रे उगे मागें ची ळागों : ॥ नीजों नका कोण्हीं घरी रे : आजी अवघे जागों : ॥ १ ॥ धृ ॥ जाणोनी नेणता हरी रे : मधीं उगाची बैसे : ॥ नाइकोनी बोळ आईके कोण कोणाचे कैसे : येक येकाच्या संवादा जाण नीमत्ळे यैसे : ॥ पोटींचें वोंठास आणवी : देतो तयांस तैसें : ॥छ॥ येक म्हणती बहु रे आम्हीं पीडळों माया : नेंदी दहीं भात सांदोरी : ताक घाळीते प्येया : ॥ तापळों बत्ळीतां गोधनें : नाहीं जीवन छाया : ॥ आतां मागों पोटभरी रे : याच्या ळागोनी पायां : ॥ २ ॥ येक म्हणती अरे तुमचें पोट तें कीती : गाई म्हैंसी घोडीं मागों रे : ॥ धन संपती हती : कन्या कुमरें दासी रे बा जां व री सु प ती : देव गडी कान्होबा आमुचा : आम्हां काये वीपतीं : ॥३॥ येक म्हणती बेटे हो कोण करी जतन : गाढव तैसें च घोडं रे याचा कोण तो मान : ॥ ळागे बवरोग वाहातां : पांदी चौघे जन : ॥ हातीं काठ्या डोया बोडक्या हींडों मोकत्ळें राण : ॥ ४ ॥ येक म्हणती + + णी रे बहु सावजें फार : फाडफाडुं पाती डोत्ळे रे : पाये नेतीळ कर :

पृ. २९ ॥

राखोनी राखे आपणा यैसा कैंचा सुर : ॥ बैसोनी राहों घ[illegible]ं रे : कोण करी हे चार : ॥ ५ ॥ घरीं बैसळीयां बहुतें बहु सांगती कामें : रीकामें कोण्हांस नावडे यैसें आम्हांस ठावें : चौघां मधीं बरें दीसेसें तेथे नेमक होवें ळपोनी षेत्ळतां सहज :॥ भळें गडीयां सवें : ॥ ६ ॥ येक म्हणती गडी ते भळे मीत्ळती मता : केळी तयां परी चाळे परी आपुळी सता : ॥ नसावें तेथे तैसें षेत्ळ हानती ळाता : ॥ रडी येक येका गेळीयां : गोधत्ळ उडती ळाता : ॥ ७ ॥ येक म्हणती षेत्ळतां : उगीं राहाती पोरें : यैसें काये घडों सके रे : कोण्ही ळाहान थोरें : ॥ अवघीं येतो राग रे : येका म्हणतां बरें : संगें वाढे कत्ळहो : राहावें येकाकी च बरें : ॥ ८ ॥ येक म्हणती येकळा रे : जासीळ कोठे : सांडी मांडी हें वाउगें : तुसे बळ ची षोटे : ॥ अवघीयांची सांदोरी तुझे भरीळी मोटे : ॥ ठांई राहा उगे ठांईचे : का रे सीणसी वाटे : ॥ ९ ॥ तुका म्हणे काहा ये काहाण्यां रे : सांगाळ गोस्टी : वाटावे तुमचे बोळ रे : भुका ळागळ्या पोटी जागा करुं या रे कान्होबा : मागों कवत्ळ तारी : धाळे गडी तुका ढेंकर देती वीठळ कंठी : ॥ १० ॥ छ ॥

: ॥ काळा :॥

* येथून पाऊण पान कोरें.

पृ. ३० ✓

## : ॥ श्रीवीठळ : ॥ | २०७६

आंगें आनुभव जाला मज : संत रज चरणाचा : ॥ १ ॥ धृ ॥ सुखी जाळों या सेवने : ॥ दुख नेणे या वरी : ॥ छ ॥ नीर्माल्याची तुळसीदळे : वीस्णुजळें : चरणीची : ॥ २ ॥ तुका म्हणे भाव सार : करुनी फार : मीश्रीत : ॥ ३ ॥ ॥ छ ॥ छ ॥

## : ॥ वीटळ : ॥ ✓ १०३८

देवासी आवतार : भक्तासी संसार : दोहींचा विचार येकपणें : ॥ १ ॥ धृ ॥ भक्तांसी सोहोळे देवाचीया आंगें : ॥ देवत्यांच्या सगें : ॥ सुख भोगी : ॥ २ ॥ देवें भक्तां रुप दीव्हासे आकार : ॥ भक्ती त्याचा पार वाखानीळा : ॥ ३ ॥ येका आर्ये दोन्हीं जाळीं हीं नीर्माण : देवभक्तपण : स्वामीसेवा : ॥ ४ ॥ तुका म्हणे येथे नाहीं भीन भाव : ॥ भक्त तो ची देव : देव भत्क : ॥ ५ ॥

## : ॥ वीठळ : ॥ २४५ ✓

संतांचे गुणदोश आणीतां मना : केळा या उगाणा सुकृताचा : ॥ १ ॥ पल्लिनीयां पुष्प पाहे परीमळ : चीरुनी केळी केळ : गाढव तो : ॥ २ ॥ तुका म्हणे गंगे अन्नीसी वीटाळ : ळावी तो चांडाळ : दुख पावे : ॥ ३ ॥

## ३४४१ : ॥ वीठळ : ॥ ✓

संत संगती न कराषा वास : येखादे गुणदोश आंगा येती : ॥ १ ॥ धृ ॥ मग तया दोशां नाही परीहार : होये अपहार सुकृताचा : ॥ छ ॥ तुका म्हणे ते नमस्काराषे दुरुन : अंतरी धरुन राहें रुप : ॥ २ ॥ छ ॥ छ ॥

## : ॥ वीठळ : ॥ : ✓ १५६३

* संतासी तों नाही सन्मानाची चाड : परी पडे दोड अव्हेरीता : ॥ १ ॥ धृ ॥ म्हणउनी तया नव जावें ठाया : होतुसे घात या दूबळांचा : ॥ छ ॥ भावहीनां आड येतासे असंका : उचीतासीं चुका : घाळावया : ॥ २ ॥ तुका म्हणे जयां संकोच दरुसेनें : तया ठाया जाणें : अनुचीत : ॥ ३ ॥

---

* पूर्वी आला च आहे. (संताजी पृ. २१.)

: ॥ वीठळ : ॥ १२३९ ✓

संतांपासी बहु असावें मर्यादा : फळकटाचा धंदा : उर फोडी : ॥ १ ॥ धृ ॥ बासर (?) तो भुंके गाढवाचे परी : उडे पाठीवरी दंड त्याणें : ॥ छ ॥ समये नेणें नें वेडें चाह्राटळ : अवगुणांचा वोंगल्ळ : मान पावे ॥ २ ॥ तुका म्हणे काये वाये चाल्ळवाणी : हागवण घाणी पीटीपीटी : ॥ ३ ॥ छ ॥

पृ. ३१ ✓

: ॥ वीठळ : ॥ ३०७६

संताच्या हेल्ळना : बाटैळ जें तोंडं : प्रत्तक्ष तें कुंड : चर्मकार्चें : ॥ १ ॥ धृ ॥ मैसळीचें वीर्य अैस्या अनुभवें : आपळें परावें : नाही सल्ळा : ॥ छ ॥ सत्यासी जो सोध काढी तो चांडाळ : ॥ धरावा वीटाल्ळ : बहु त्याचा : ॥ २ ॥ तुका म्हणे प्रड्या केळी या च साटीं : कांही माझे पोटी : ॥ संका नुरो : ॥ ३ ॥ छ ॥

: ॥ वीठळ : ॥ ✓ १५५७

हरींजनाची कोन्हा न घडावी नींद : साहात गोवींदा : नाहीं त्याणें : ॥ १ ॥ ॥ धृ ॥ रुपा येउनीयां : धरी अवतार : भक्तां आभयेंकर : खल्ळां कस्ट : ॥ छ ॥ दृपदीच्या कोपें : कौरवांची शांती : होउनां श्रीपती : सांहे केळा : ॥ २ ॥ न साहे ची बम्र पांडवांसारीखा : धुडावीळा सखा बल्ळीभद्र : ॥ ३ ॥ दुर्वास या आळा छल्ळं अवरुसीं : सुद्रसेन त्यासी : जाल्ळींत फीरे : ॥ ४ ॥ तुका म्हणे आंगीं राखीळी दुर्गंधी अस्वस्थामा वधीं : पांडवकुमंरा : ॥ ५ ॥ छ ॥ छ ॥

: ॥ वीठळ : ॥ १२०४ ✓

संताचा महीमां : तो बहु दुर्गम : शाब्दीं कांम नाहीं येथे : ॥ १ ॥ बहु घड जऱ्हीं जाळी म्हैस गाये : तरी होईळ काये : कामधेनु : ॥ २ ॥ तुका म्हणे आंगें होंवं नें आपण : तरी च महीमान : येईळ कल्ळों : ॥ ३ ॥ छ ॥

: ॥ वीठळ : ॥ १२०५ ✓

नाहीं संतपण मीळत हाटीं : हींडतां कपाटीं : रानी वनीं : ॥ १ ॥ नये मोळ देना धनाचीया रासी : नाहीं तें आकासी : पाताल्ळीं तें : ॥ २ ॥ तुका म्हणे मीळे : जीवाचीये साटीं : नाहीं तरी गोस्टी : बोळों नये : ॥ ३ ॥ छ ॥

निर्णयसागर गाथा १५६० : ॥ वीठळ : ॥ ✓

संताचीये पांई माझा वींश्वास : राहींळोंसें कास : धरुनी त्यांची : ॥ १ ॥ धृ ॥

तेंची माझें हीत करीती सकळ : जेणें हा गोपाळ : कृपा करी : ॥ छ ॥ भागलीयां मज वाहतील कडे : त्यांचीयाणें जोडे : सुकृत हें : ॥ २ ॥ तुका म्हणे रुप धरीन आवडी : वचन तें न मोडी : बोलीले ते : ॥ ३ ॥

१७९६ : ॥ वीठळ : ॥ V

गंगाजळा पाहीं पाटीपोट नाहीं : अवगुण तो नाहीं : अमृतासी : ॥ १ ॥ रवी दीपकाळीमां : काये जाणे हीरा : आणीका त्रीमीरां : नाश तेणे : ॥ २ ॥



कर्पुर कांडणी : काये कोंडा कणी : सींधु मेळवणी : काये चाळे : ॥ ३ ॥ परीस चींतामणी : आणीकांचा गुणी पाळटला नव्हे तैसें ॥ ४ ॥ तुका म्हणे तैसे जाणा संतजन : सर्वत्र संपुर्ण : गगन जैसे : ॥ ५ ॥

५६० : ॥ वीठळ : ॥ V

फीरंग्या वाघर : लोखंडाचे ईत्ले : परी ते नीराळे : गुणमोलें : ॥ १ ॥ पायेरी प्रतीमा : येक ची पाशाण : परी तें महींमान : वेगळालें : ॥ २ ॥ तुका म्हणे तैसी नव्हे जनापरी : संतजना सरी सारीखीया : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

३७४ : ॥ वीठळ : ॥ V

संतसंग होवा : ॥ भळतीये परी : होवें त्याचे द्वारी : स्वानयाती : ॥ १ ॥ धृ ॥ रामनाम तेथे होईळ श्रवण : घडळ भोजन उचोस्टाचें : ॥ छ ॥ कामारी बटीक : दीनपने रंक : तेथे भळे : ॥ २ ॥ तुका म्हणे सर्व हीत त्या सांगती : घडेळ पंगती : संताचीया : ॥ ३ ॥ छ ॥

२०१५ : ॥ वीठळ : ॥ V

संताचीये घरी : दास मीं कामारी : दारीं परवरीं : लोळतसें : ॥ १ ॥ धृ ॥ चरणीचे रज लागती आंगास : तेणें बेताळीस : उधरती : ॥ छ ॥ उचीस्ट जमा : करीन पत्रावळो : घाळीन कवळी : मुखामाजी : ॥ २ ॥ तुका म्हणे मीं : आंणीका वीचारें : नेणें हेची सरें : मानीतसें : ॥ ३ ॥

२०१३ : ॥ वीठळ : ॥ V

वैस्णवांची कीर्ती गाईली पुराणीं : सांही अठराजनी : चहुं वेदी : ॥ १ ॥ येसें कोन्ही दावा : ग्रंथाचे वाचक : कर्मठ धार्मीक : पुन्यसीळ । आदीनाथ शंकर :

नारद मुनेस्वर : शुका ऐसा थोर : आणीक नाहीं : ॥ २ ॥ तुका म्हणे मुगुटमणी हे भक्ती : आणीक वीश्रांती : आरतीया : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥

१४४५ : ॥ वीठळ : ॥ V

भक्तांचा महीमा : भक्त चि जाणंति : दुर्लभ; या गती : आणीकांसी ॥ १ ॥ जाणोंनी नेंणते : जाले तेणें सुखें : नोबलोनीं मुखें : बोलताती ॥ २ ॥ आभेदोनी भेद : राखीयेला आंगी : ॥ वाढावया जगीं : प्रेमसुख : ॥ ३ ॥ टाल्ल घोल्ल कथा : प्रेमांचा सुकाल्ल : मुढ लोकपाल्ल : ॥ तरावया ॥ ४ ॥ तुका म्हणे हे आहे तयां ठावें : जीहीं येकाभावें : जाणीतलें : ॥ ५ ॥

पृ. ३३

३०४८ : ॥ वीठळ ॥ : V

भक्ती प्रेमसुख : नेणवे आणीकां : पंडीतवाचका : ज्ञानीयांसी : ॥ १ ॥ अत्मनीस्ट जऱ्हीं जाले जीवनमुक्त : तऱ्हीं भक्तीसुख : दुर्लभ त्यां ॥ २ ॥ तुका म्हणे देव कृपा करील कांही : तरी च हें ठाई पडेल वर्म : ॥ ३ ॥

७१३ : ॥ वीठळ : ॥ V

सांटवीला हरी : जीहीं हृदयेमंदीरी : ॥ १ ॥ धृ ॥ त्याची सरली येरझार : जाला सकल्ल व्यापार : ॥ छ ॥ हरी आला हाता : मग कैंची भये चींता : ॥ २ ॥ तुका म्हणे हरी : कांहीं उरों नेदी उरी : ॥ ३ ॥

३४५० : ॥ वीठळ : ॥ V

जें ज्याचें जेवन : तें ची याचकासी दान : ॥ १ ॥ धृ ॥ आंतां जाउं चोजवीत : जेथे वसतील संत : ॥ छ ॥ होती धाल्लीं पोटें : मागें उरलीं उर्चास्टें : ॥ २ ॥ तुका म्हणे धांवं : पुढें खुटैल हावं : ॥ ३ ॥

३४५१ ॥ : वीठळ : ॥ V

धरावा तो बरा : ठाव वसतीचा थारा : ॥ १ ॥ धृ ॥ नीजवील्लीयां जागवीती । नीज पुरउनी देती ॥ छ ॥ येक वेवसाव : त्यांचा संग त्यांचा जीव : ॥ २ ॥ हीनें केलें हीत : गोही येक येक्यचीत : ॥ ३ ॥ वीशमांचें काही : आड तया येक नाहीं : ॥ ४ ॥ तुका म्हणे घरी : घरा येतील ते परी : ॥ ५ ॥ छ ॥

३८

त्याचीया चरणा : माझें दंडवत : ज्यांचें धनवीत : पांडूरंग : ॥ १ ॥ धृ ॥ तेथे माझा जीव पावला वीसावां : ॥ म्हणउनी हांवां भरळासे : ॥ छ ॥ चरणींचे रज लावीन कपाळा : जे पदें राउळा : सोये जाती : ॥ २ ॥ आणीक ते भाग्यें : येथे कुरवंडीं : करुनीयां सांडी : इंद्रा येसी : ॥ ३ ॥ वैस्णवांचा घरीं : देवाची वसती : वीस्वास हा चीती : सत्य भाव : ॥ ४ ॥ तुका म्हणे सखे : हरीचे जे दास : आतां पुढें आस नाहीं दुजी : ॥ ५ ॥ छ ॥

२४७४ : ॥ वीठळ : ॥ V

नसतां अधीकार : ॥ उपदेसासी बळत्कार : ॥ नाहीं तरी केळे होती चा ! र : ॥ माकड आणी गारुडी : ॥१ ॥धृ॥ भीन भीन राज बोळ : ॥ मीथ्या रजवनें फोळ ॥ नसतां बुढीं बोळ : बीज पेरी मुर्ष तो : ॥ छ ॥ नये बांधी ! गांठीं :॥ पदरा आणी येसी तुटी : ॥ असतां कसवटी : अरे सीरटांचे अनुभव : ॥ २ ॥ उपदेस करी तुका : मेघवृस्टीने आईका : सकळपा(?)सी धोका : ज ह ञ तें उ त र म ! : ॥ ३ ॥ छ ॥

* लेखणी या अभंगास निराळी.

पृ. ३४ कोरें ( सबंद )

पृ. ३५

श्रीवीठळ

अळकापुरीस ज्ञानदेवाचे देउळीं धरनें बैसला ब्राम्हण : त्याबदूल तुकोबानें अभंग केळे : ॥ ३१ येकतीस :

२३१७

श्री पंढरीशा पतीतपावना : ॥ येकी वीज्ञापणा : पायांपासीं : ॥ १ ॥ अनाथा जीवांचा तुं काजकैवारी : ॥ येसी चराचरी : ब्रीदावळी ॥ २ ॥ न संगतां कळे अंतरींचें गुज : ॥ आतां तुम्ही ळाज : तुज देवा : ॥ ३ ॥ आळीकर त्याचें करीं समाधान : ॥ अभयाचें दान देउनीयां : ॥ ४ ॥ तुका म्हणे तुं च पेतळे दोहीं ठाईं : ॥ नसैळ तो देईं : धीर मज : ॥ ५ ॥ छ ॥

२३१८ : ॥ वीठळ : ॥ V

अगा ये उदारा अगा वीस्वंभरा : ॥ रघुमाईच्या वरा पांडूरंगा : ॥ १ ॥ अगा सर्वोत्तमा : अगा क्रुस्णारामा : ॥ अगा मेघशामा : वीस्वजनीत्या : ॥ २ ॥

अगा कृपावंता : जीवदान तुं दाता : ॥ अगा सर्व सता : धरीतीया : ॥ ३ ॥ अगा सर्वजाणा : अगा नारायेणा : ॥ करुणावचना चीत द्यावें : ॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं अधीकार तैसी : ॥ सरती पायांपासीं : केळीं मागें : ॥ ५ ॥ छ ॥ छ ॥

२३१९ वीठळ : ॥ V

नव्हें दास खरा : परी जाळा हा डांगोरा : ॥ १ ॥ धृ ॥ यास काये करुं आंता :॥ तुं हें सकळ जाणता : ॥ छ ॥ नाहीं पुन्य गाठी : जें हें वेचुं कोण्हा साटी : ॥ तुका कासया उपाधी : ॥ वाढवीळी कृपानिधी : ॥ ३ ॥ छ ॥

२३२० वीठळ V

तुजवीण सता : ॥ नाहीं वाचा वदवीता : ॥ १ ॥ धृ ॥ यैसें आम्ही जाणों दास : ॥ झाळों म्हणउनी उदास : ॥ छ ॥ तुम्हीं

पृ. ३६ V

दीव्हा धीर : ॥ तरी हें मन जाळें स्थीर : ॥ २ ॥ तुका म्हणे आड : ॥ केळों मी हें तुझें कोड : ॥ ३ ॥ छ ॥

२३२१ वीठळ : V

काये मीं जाणता : ॥ तुम्हाहुनींया अंनंता : ॥१॥ धृ ॥ जो हा करुं अतीशये : ॥ काये तुम्हां दया नये : ॥ छ ॥ काये तुज नाहीं कृपा : ॥ वीस्वाचीयीं मायेंबापा : ॥ २ ॥ तुका म्हणे वाणी : माझी वदे तुम्हांहुनी : ॥ ३ ॥ छ ॥

२३२२ : ॥ वीठळ : ॥ V

काये ज्ञानेस्वरी उनें : ॥ तीहीं पाठवीळें धरणें : ॥ १ ॥ धृ ॥ म्हणउन जाणवीळी मात : आइकोनीयां ळीखींत : ॥ छ ॥ जन्हीं जाणें धनीं : ॥ वदवीं सेकवाचीं वाणीं : ॥ २ ॥ तुका म्हणे सेवा : ॥ होता सांभाळीं हा ठेवा : ॥ ३ ॥ ॥ छ ॥

२३२३ : ॥ वीठळ : ॥ V

हेंउनीयां डोई : ॥ पांई जाळों येके सोई : ॥ १ ॥ धृ ॥ कारण तें तुम्हीं जाणां : ॥ मीं तराळ नारायेणां : ॥ छ ॥ प्रसंगीं वचन : ॥ दीव्हें तें च पावें अनं : ॥ २ ॥ तुका म्हणे भार : तुम्हीं जाणा थोडें फार : ॥ ३ ॥ छ ॥

: ॥ वीठळ : ॥ २३२४ ❘❘❘

नको काहीं पडों ग्रंथांचीये भरी : ॥ सीघ्र वत करीं : हें ची आतां : ॥ १ ॥ ॥ धृ ॥ देवाचीये चाडे आळवावें देवा : वोस देहेभावाः ॥ पाडूनीयां : ॥ छ ॥ साधनें घाळीती काळाचीये मुषी : ॥ गर्भवासा सेषीं : न चुकतीं : ॥ २ ॥ उधारीचा मोक्ष होये नव्हे यैसा : पतनासी इच्छा अवसेक : ॥ ३ ॥ रोकडी पातळी अंगसग जरा : ॥ आतां उजगरा कोठवरी : ॥ ४ ॥ तुका म्हणे धाळी नामासाटी उडी : पांडूरंग थडी : पाववीळ : ॥ ५ ॥ छ ॥ ८ ॥

: ॥ वीठळ : ॥ ❘❘❘ २३२५

देवापासी नाहीं मोक्षाचें गांठोळें : ॥ आणुनी नीराळें : द्यावें हातीं : ॥ १ ॥ ॥ धृ ॥ इंद्रीयांचा जये साधुनीया मन : ॥ नींवीश का–

राम राम राम राम जय राम

पृ. ३७ ❘❘❘

रण आहे तेथे : ॥ छ ॥ उपास पारणी अक्षरांची आटी : ॥ सत्कर्मा सेवटी यैसें फळ : ॥ २ ॥ आदर संकळ्प वारीं अतीशये : ॥ सहज तें काये दुप जाणें : ॥ ३ ॥ सपनींच्या घायें वीवळसी वांयां : रडे रडतीयां सवें मीथ्या : ॥ ४ ॥ तुका म्हणे फळ आहे मुळापासीं : ॥ शरण देवासी : जांई वेंगीं : ॥ ५ ॥ छ ॥ ९ ॥

२३२६ : ॥ वीठळ : ॥ ❘❘❘

तजोळें भेटवी आनुनी वासना : ॥ दावीळ्या जना काये काज : ॥ १ ॥ धृ ॥ आळवावें देवा भाकुनी करुणां : ॥ आपुळीया मना साक्ष करीं : ॥ छ ॥ नाहीं जावें यावें दुरुनी ळांगत : ॥ आहे साक्षभुत अंतरींचा : ॥ २ ॥ तुका म्हणे हा आहे कृपासींधु : ॥ तोडी भवबंधु : तात्काळ : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥ १० ॥

२३२९ वीठळ ❘❘❘

पाहोनीयां ग्रंथ करावें कीर्तन : ॥ तेव्हां आळें जाण फळ त्यासी : ॥ १ ॥ धृ ॥ नाहीं तरीं वांयां केळी तोंडपीटी : ॥ उरी ते सेवटी : उरळी च : ॥ छ ॥ पढोनीयां वेद हरीगुण गावे : ॥ ठावे ते जाणावे तेव्हां जाळे : ॥ २ ॥ तप तीर्थाटण तरी कार्येसींधी : स्थीर राहे बुधी : हरीचा नामीं : ॥ ३ ॥ यागयेज्ञादीक काये दानधर्म : ॥ तरी फळ नांमं कंठीं राहे : ॥ ४ ॥ तुका म्हणे नको कावाडाचे भरी : ॥ पडों सार धरीं हे ची येक : ॥ ५ ॥ ११ ॥

२३२७ : ॥ वीठळ : ॥ V

गोवींद गोवींद मना लागलीयां छंद : ॥ १ ॥ धृ ॥ मग गोवींद ते काया : ॥ भेद नाहीं देवा तया : ॥ छ ॥ अनंदलें मन प्रेमें पाझरती लोचन : ॥ २ ॥ तुका म्हणे अली : जेवी नुरे ची वेगली : ॥ ३ ॥ छ ॥ १२ ॥

२३२८ वीठळ V

ज्यांचें जया ध्यान : ते च होये त्याचें मन : ॥ १ ॥ धृ ॥ म्हणउनी अवघें सारा ॥ पांडुरंग द्रुढ धरा : ॥ छ ॥ सम पुन त्याच पावे ? : ॥ उभा व्यापक इटे ठाये : ॥ २ ॥ तुका म्हणें नभा : परता : अनुचा ही गाभा : ॥ ३ ॥ १३ ॥

२३३० पृ. ३८ V

: ॥ वीठळ : ॥

सुर्ये पावें अनं : ॥ त्याचें करावें चींतन : ॥ १ ॥ धृ ॥ ज्याचे दील्हे त्यासी पावे : ॥ फल आपणांसी फावें : ॥ छ ॥ असे हा आधार नाम त्याचें वीस्वंभर : ॥ २ ॥ नाहीं रीता ठाव : ॥ तुका म्हणे पसरीं भाव : ॥ ३ ॥ छ ॥ १४ ॥

२३३१ वीठळ V

संकोचोन काये जालासी लाहान : ॥ घेई आपोशण : ब्रह्मांडाचें : ॥ १ ॥ करुणीं पारणें : आंचवें संसार : ॥ उसीर उसीरां लाउं नको : ॥ छ ॥ घरकुलानें होता पाडीला आंधार:॥त्याणें केलें फार कासावीस : ॥२॥ झुगारुनं दुर लपवीलें काये : ॥ तुका म्हणे वाये : कवतुकाचे : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥ १५ ॥

२३३२ : ॥ वीठळ : ॥ V

माझ्या बापें मज दीधले भातुकें : म्हणउनी कवतुकें : क्रीडा करीं : ॥ १ ॥ ॥ धृ ॥ आल्ली केली पुढें बोलीलों वचन : ॥ उतम हें दान : आलें याचें : ॥ छ॥ घेउनी वीभाग जावे लवलाह्या : ॥ आलेती त्या ठाया : आपुलीया : ॥ २ ॥ तुका म्हणे ज्ञानदेवीं समुंदाये : ॥ करा मीं पाये : येईन वंदु : ॥ ३ ॥ छ ॥ छ॥ ॥ १६ ॥

२३३३ : ॥ वीठळ : ॥ V

ज्ञानीयांचा तुं राजा मांहाराव : ॥ म्हणती ज्ञानदेव येसें तुम्हां : ॥ १ ॥ धृ ॥ मज पांमरा हे काये थोरपण : पाईंची वाहान पांईं बरी ॥ छ ॥ ब्रह्मांदीक जेथे

तुंम्हां बोल्लणें : आणींक तुल्लने : काये पुरे : ॥ २ ॥ तुका म्हणे नेणें युक्तीचीं बोली : म्हणउनी ठेवीली पाईं डोई : ॥ ३ ॥ १७ ॥

२३३४ वीठळ : ॥ ||

बोलीलीं उतरें वेडी वांकुडी लेंकुरें : ॥ १ ॥ धृ– ॥पद करा क्षेमा आपराध : माहाराज तुम्हीं सीध ॥ छ ॥ नाहीं वीचारीला अधीकार म्यां आपुला : ॥ २ ॥ तुका म्हणे ज्ञानेस्वरा राखा पांयांपें कींकरा ॥ ३ ॥ छ ॥ १८ ॥

देवाचा धावा अभंग ७ सात उपदेस अभंग ११

२३३५ वीठळ

काये तुम्हीं जाणा : ॥ करूं अव्हेर नारायेणा : ॥ १ ॥ धृ ॥ तरी या ळटीक्याची गोही

पृ. ३९ ||

नीवडीली दुसरे ठांई ॥ छ ॥ कल्लों अंतरीचा गुण : नये फुटल्या वांचुन : ॥ २ ॥ आणीलें अनुभवा : ॥ जनाच्या हें : ज्ञानदेवा : ॥ ३ ॥ पुढें कोण्हीं भीती : ॥ त्याच्या चीतासी वीस्रांती : ॥ ४ ॥ तुका म्हणे बीजापोटीं ॥ फल्ल तैसें च सेवटी : ॥ ५ ॥ १९ ॥

२३३६ वीठळ ||

अवीस्वासीयांचें शरीर सुतकी : ॥ वीटाळ पातकी भेद वाहे : ॥ १ ॥ त्याचा येळ काये जाइळ मांडवा : ॥ होता तैसा ठेवा आला पुढें : ॥ छ ॥ मातेचे संकल्प होवा राजबींडा : ॥ कपाल्लीचें तोंडा : उभें राहे : ॥ तुका म्हणे जैसा कुचराचा दाना : ॥ परपाकीं जाणा : पोटा तैसा : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥ २० ॥

२३३७ वीठळ ||

तामसाचीं तपें पापाची सीदोरी : ॥ तमोगुणें भरी घातलें ते : ॥ १ ॥ धृ ॥ राज्यमद आड : सुखाची संपती : ॥ उलंघुन जाती : नरयेगांवां : ॥ छ ॥ इद्रीयें दमीली ईछा जीवीं (?) ॥ जीवी नागवी तो ठांवीं : नाहीं पुढें : ॥ २ ॥ तुका म्हणे हरीभजना वांचुन : करीतीं तो सीण : पाहों नये : ॥ ३ ॥ छ ॥ २१ ॥

२३३८ वीठळ ||

हरीकथे वांचुन ईछीती स्वहीत : ॥ हरीजन चीत न घला तेथे : ॥ १ ॥ धृ ॥

जाईल भंगोन आपुळा वीस्वास : ॥ अवघीया : नास कारणाचा : ॥ ७ । ज्याचीये बैसावें भोजनपंगती : ॥ त्याचीये संगती तैसें पावें : ॥ २ ॥ तुका म्हणे काये जाळेती जाणते : देवा हीं परते : थोर तुम्हीं : ॥ ३ ॥ २२ ॥

२३३९ | वीठळ V

सेवकें करावें स्वामींचें वचन : ॥ त्यासी हुंतुंपण कामा नये : ॥ १ ॥ धृ ॥ घेईळ जीव कां सारीळ परतें : भंगळीयां ची तें : सांदी जना ! : ॥ ७ ॥ पयेंतें दावावी रवी केवीं वाट (?) : ॥ आपळें ची नीट : उसंतावें : ॥ तुका म्हणे तो ज्ञानाचा सागर : ॥ परीं नेंदी आग्रर भीजो भेदें : ॥ ३ ॥ ७ ॥ ७ ॥ २३ ॥

२३४० वीठळ

जयाचीये गावीं सोन्याचा पींपळ : आगीं : येसें बत्ळ रेडा बोळे : ॥ १ ॥ धृ॥

पृ. ४० V

करीळ तें काये नव्हे मांहाराज : ॥ परी पाहे बीज : सुध आंगीं ॥ ७ ॥ जेणे हे घातळी मुर्काची गवांदी : ॥ मेत्ळवीळी मांदी : वैस्णवांची : ॥ २ ॥ तुका म्हणे तेथे सुषा काये उणें राहे समाधाने : चीतार्चीया : ॥ ३ ॥ ७ ॥ ७ ॥ २४ ॥

२३४१ वीठळ V

बहुतां छंदाचें बहुवस जन : ॥ नये वांटू मन त्यांच्या संगें : ॥ १ ॥ धृ । करावा जतन आपुळा वीस्वास : ॥ आंगा आळा रस अवडीचा : ॥ ७ ॥ सुखाची समाधी हरीकथा माउळी : ॥ वीश्रांती साउळी : सीणळीयांची : ॥ २ ॥ तुका म्हणे बुडे बांधोनी दगड : ॥ तेथे काये कोड : धांवांयाचें : ॥ ३ ॥ ७ ॥ ७ । ॥ २५ ॥ ७ ॥

२३४२ वीठळ V

हरीचे कथे नाहीं : वीस्वास ज्याचे ठांई : ॥ १ ॥ धृ ॥ त्याची वाणी अमंगत्ळ : कान उंदीराचें बीत्ळ : ॥ ७ ॥ सांडुनी हा रस : करीती आणीक सायास तुका म्हणे पीसी : ॥ वांयां गेळीं कीती येसीं : ॥ ३ ॥ ७ ॥ २६ ॥

२३४३ वीठळ V

परम अमृताची धार : चाळे देवा हे समोर : ॥ १ ॥ धृ ॥ उर्धवाहेनी हरी-

कथा ! मुगटमनी संकळां तीर्था : ॥ छ ॥ सीवाचें जीवन : जाल्ठी मांहांदोश कीर्तन : ॥ २ ॥ तुका म्हणे हरी : ॥ स्तुती वाणी इची थोरी : ॥ ३ ॥ छ ॥ ॥ २७ ॥

२३४४ वीठळ

आतां माझ्या मना : ॥ इची घडो उपासना : ॥ १ ॥ धृ ॥ येसें करीं गा पांडुरंगा : ॥ प्रेम बोसंडेसें आंगा : ॥ छ ॥ सर्वकाल्ठ नये : ॥ वाचे वीट आड भये ॥ २ ॥ तुका वैस्णवां संगती : ॥ हें च भोजन पंगती : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥ ॥ २८ ॥

२३४५ वीठळ

उपास कराडीं : तीहीं करांवीं वापुडीं : ॥ १ ॥धृ॥ आम्हीं वीठोबाचे दास : ॥ चींता झुगारावी आस : ॥ छ ॥ भक्ती–

पृ. ४१

च्या उतकर्शे : ॥ नाहीं मुक्तीचें हीं पींसें : ॥ २ ॥ तुका म्हणे बल्ठ : आगीं आमुच्ये सकल्ठ : ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥ २९ ॥

२३४६ वीठळ

करवीली तैसी केली कटकट : ॥ वांकडें का नीट : देव जाणें ॥ १ ॥ कोणा कारणें हें जालेंसे नीर्मान : ॥ देवाचें कारण : देव जाणें : ॥ २ ॥ तुका म्हणे मी या अभीमाना वेगल्ठा : घालुनी गोपाल्ठा : भार असें ॥ ३ ॥ छ ॥ छ ॥ ३० ॥

२३४७ वीठळ

तुम्हीं येथे पाठवीला धरणेंकरी : त्याची जाली परी : आईका तें : ॥ १ ॥ धृ ॥ काये पुढें वाढउनीयां वीस्तार : ॥ जाला समाचार : आईका तो : ॥ छ ॥ देवाचें उचीत येकादश अभंग : ॥ मांहांफल्ठत्याग : ॥ करुनी गेला : ॥ २ ॥ तुका म्हणे सेवा संमर्पुनी पाईं : ॥ जालों उतराई : ठावें असो : ॥ ३ ॥ छ ॥ ३१ ॥

ज्ञानदेवी ब्राम्हंण धरणे बैसला होता : दीवस ४२॥ बेताळीस : या कारणें तुकावा गोसांवीं याणी अभंग केले येकतीस ३१ हें लीहीं सही : ॥ हस्त अक्षर : संताजी तेली जगनाडे : कसबे चाकण: वीठळ

* पुढें पान ४१ बाकी कोरें.

# ७३ आळंदीची पंचक्रोशी

( रा. दत्तो वामन पोतदार )

१. अलंकापूर ऊर्फ आळंदी हें ' जुनाट ' ' शिवपीठ ' असल्याबद्दल नामदेवाचे गाथ्यांत अनेकदां ( आवटी गाथा, अभंग ७१३ ) वर्णन आलें आहे ही मध्ये असलेली ' पंचक्रोशी ' हि अर्थात् फारच ' पुरातन ' ( अ. ७०७, ७६१, ७३६ इ. ) होय. हें सर्व वर्णन ' शैवागमिं बोलिलें सें ' ( अ. ७२५ ) असें नामदेव लिहितात. शिवसांप्रदायी नामदेवानें उल्लेखिलेला हा शैवागम किंवा ' शैवशास्त्रग्रंथ ' ( अ. ७०८ ) कोणता ?

२. सदरहू पंचक्रोशीचें वर्णन 'आलिंगन पडलें दृढ' या अभंगांत (अ. ७२२) आलें आहे. त्यावरून आळंदीची पंचक्रोशी येणेंप्रमाणें:—

( १ ) पूर्वेसः—मातुलिंग = केशवराज

( २ ) पश्चिमेसः—इंदुरी = ब्रह्मेश्वर

( ३ ) उत्तरेसः—खेटक ( खेड ) = सिद्धेश्वर

( ४ ) दक्षिणेसः— ( पुणें ) = पुण्येश्वर व नागेश्वर

या चोहोंपैकीं इंदुरी व खेड हीं प्रसिद्ध च आहेत. इंदुरीस सांप्रत 'ब्रह्मेश्वरा'चें देऊळ आहे किंवा नाहीं, असल्यास त्याचें माहात्म्य कितपत आहे, वगैरे माहिती प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे. हल्लीं पुण्यास कुंभारवेशीजवळ दर्गा आहे तोच पूर्वीचा पुण्येश्वर हें प्रसिद्ध च आहे. सोमवारांतील नागेश्वराचें स्थान हि पुरातन असल्याबद्दल ख्याति आहे. हीं दोन्ही स्थानें आतां वरील अभंगांतील उल्लेखावरून निःसंशय नामदेवाच्या पूर्वींचीं म्हणजे ६०० वर्षांपूर्वींचीं होत, हें उघड आहे. आतां नामदेव ज्याअर्थीं यांना पुरातन म्हणून वर्णितो त्याअर्थीं तर तीं फारच प्राचीन ठरतात. माझे मित्र रा. पां. न. पटवर्धन यांना मिळालेल्या राष्ट्रकूटांच्या पहिल्या कृष्णराजाच्या ताम्रपटांतील उल्लेखावरून तर पुण्याचा अतिप्राचीनपणा चांगला च सिद्ध झाला आहे. पुण्याबद्दल लिहितांना Gazetteer कारांनीं टॉलेमी Ptolemy च्या Punnatta चा उल्लेख करून हें च पुणें असावें असें सुचविलें आहे; तिकडे शोधकांनीं लक्ष द्यावें असें जातां जातां सुचवितों.

३ सदरील 'पंचक्रोशी' त पूर्वेस असलेलें ' मातुलिंग ' सांप्रत कोठें आहे ? श्री. नान्यासाहेब मेहेंदळे यांच्या पहाण्यांत एका वारकऱ्याजवळ सदर पंचक्रोशीचा एक

नकाशा आला होता. त्यांत पूर्वेस मरकळ पंचक्रोशींत दाखविलें होतें. मरकळास केशवराजाचें स्थान हि आहे असें म्हणतात. परंतु आळंदीपासून खेड, इंदुरी व पुणें हीं तिन्ही जितक्या अंतरावर साधारणपणें आहेत त्यापेक्षां मरकळ फार जवळ म्हणजे आळंदीला अगदीं खेटून आहेसें नकाशावरून स्पष्ट दिसतें. शिवाय मातुलिंग या नांवाचा मरकळ या नांवाशीं मेळ हि घालतां येत नाहीं. थारकाईनें विचार करून पाहतां तळेगांव ढमढेऱ्याच्या नजीक च निंबगांव म्हाळुंगें म्हणून एक गांव आढळलें. हें आळंदीच्या पूर्वेस येतें. शिवाय अंतराला हि जवळ नाहीं. इतकें च नव्हे तर म्हाळुंगें हें नांव मातुलिंगाशीं इतकें जुळतें आहे कीं वरील सर्व विवेचनावरून मातुलिंग म्हणजे मरकळ नसून ( निंबगांव ) म्हाळुंग च होय, असा बळकट ग्रह होतो. ह्या निंबगांव-म्हाळुंग्यास जर केशवाचें देऊळ असेल किंवा पूर्वी असल्याबद्दल दाखला मिळेल तर मग ह्या माझ्या अनुमानाला सिद्धांताचें च स्वरूप प्राप्त होईल. तेव्हां या बाबतींत विशेष शोध होणें जरूर आहे.*

४. अभंग ७३६ मध्यें व्यासादिकांकडून हि या तीर्थाचा महिमा वर्णिला आहे. त्यांतील पुढील महत्वाचा भाग नवीन च आहेः—

स्कंदासी उपदेशस्थान । लोहोगिरीस येथून ॥ पुरुरवा पुण्यक्षेत्रमहिमान । पूर्वी येथूनीचि जालें ॥ ९ ॥ येथून भीमरथी नदी । भीमाशंकरीं घेऊनि गेला नंदी ॥ तेथुनी उगमीं पडली सर्वांआधीं । मग शंकरें तेथें स्नान केलें ॥ १० ॥ तें भीमामाहात्म्य प्रसिद्ध । तो हा सिद्धेश्वर अगाध ॥ महा योगेश्वर निजबोध । अलंकापूर पाटणीं ॥ ११ ॥

या लोहोगिरीचा उल्लेख पुनः ७३८ व्या अभंगांत असा केला आहेः—

" लोहोगिरी सुवर्णाचळ । त्यावरी अलंकापुरी " ॥ ३ ॥

हा लोहोगिरी कोणता ? आळंदी–चऱ्होलीच्या दक्षिणेस लोहोगांव आहे तें तर नव्हे ?

---

* माझे मित्र रा. पांडुरंगपंत पटवर्धन यांनीं सदर स्थळीं शोध केल्यावरून खालील माहिती कळलीः—

( १ ) सांप्रत येथें निंबगांव म्हाळुंगें व शिवतकार म्हाळुंगें अशीं दोन गांवें आहेत. मध्यें फक्त नदी आहे. पैकीं शिवतकार म्हाळुंग्यास फक्त दोनच घरें आहेत. देऊळ वगैरे नाहीं.

( २ ) निंबगांव म्हाळुंगें येथें कुळकर्ण्याचे घरास लागून एक दोन खणी दगडी खोली आहे. त्यांत समोर च कोनाड्यांत एक ' लक्ष्मीनारायणाची' चतुर्भुज, शुभ्र दगडाची, अनधिष्ठित, किंचित् विद्रूप केलेली सुमारें हातभर उंचीची मूर्ति पडलेली आहे, जवळच एक सुंदर पंचमुखी शिवलिंग आहे. सुमारें ५०।६० वर्षांपूर्वीं एका तुळशीवृंदावनांत कोणा सोनारास सदर शिवलिंग सांपडलें व तें त्यानें येथें आणून ठेविलें असें सांगतात.

५. ७२२ अभंगांत ९ व्या चरणांत ' सेटक ग्रामीं भागीरथी ' असें म्हटलें आहे तेथें ' भागीरथी ' बद्दल ' भीमरथी ' असावयाला पाहिजे.

६. आळंदीस ' त्रिवेणी गुप्त असे ' ( ७१३ ) असा उल्लेख बहुत वेळां आला आहे, त्याचा खुलासा अभंग ७०३ मध्यें असा आढळतोः—

इंद्रायणी दक्षिणवाहिनी । भागीरथी मणिकर्णिका दोन्ही ॥ इया मिळालिया त्रिसंगमीं । पुण्यभूमि तुझिये ॥ ४ ॥

७. असो ! वरील विवेचनावरून पुणें प्राचीन आहे एवढें च नव्हे, तर तें फार पुरातनचें ' क्षेत्र ' आहे हें निर्विवाद सिद्ध होत आहे.

नामदेवाचे गाथ्यांतील ज्ञानेश्वर–समाधिमहिमा–तीर्थावळी वगैरे भाग चिकित्सक दृष्टीनें शोधण्यालायक आहे. या कामीं नामदेवांची संहिता जितकी शुद्ध मिळेल तितकी हवी आहे; एवढें लिहून वर मी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर शक्य तितका प्रकाश पाडण्याची शोधकांस विनंति करतों.

## ५७ चोंभा कवी

( रा. दत्तो वामन पोतदार )

रा. राजवाडे यांनीं भा. इ. सं. मं. १८३३ च्या अहवालांत चोंभा नामक कवीचें ' उदाहरण ' संपादिलें आहे. सदर कवीचें नांव ' महाराष्ट्रकवी 'त छापलेल्या रंगनाथ निगडीकरांच्या संतमालिकेंतील पुढील ओंवींत आलें आहेः—

चोंभा साळ्या रसाळ । नरहरी एकनाथ मैराळ । शिवराम अनंत गोपाळ । वंदूं त्रिम्मळ अक्रूर ॥ ३९ ॥

# ७४ महीपतीचे गुरु मोरोबा तांभेरकर

( रा. वि. ल. भावे )

भारत–ऐतिहासिक–संशोधक–मंडळाच्या दुसरे सालच्या अहवालांत लेखांक दहामध्यें संत–चरित्रकार महीपतिबोवा यांचा गुरु नरहरी होता असें म्हटलें आहे; व पुराव्यादाखल कांहीं पदें दिलीं आहेत.

या लेखांकांत दाखल केलेलीं पदें महीपतिबोवा–ताहराबादकराचीं नसून निराळ्या च एका महीपतीचीं आहेत. ताहराबादकर महीपतीचा गुरू तुकाराममहाराज हें प्रसिद्ध आहे. महीपतीस तुकारामाचा अनुग्रह स्वप्नांत झाला होता. महीपतीनें प्रत्यक्ष अनुग्रह मोरोबा तांभेरकर या नांवाच्या एका पुण्यपुरुषाचा घेतला होता. महीपतीबुवा ताहराबादकरांच्या घरचीं व त्यांच्या कांहीं शिष्यमंडळीचीं दप्तरें मीं तपासलीं आहेत. त्यांवरून महीपतीबोवा ताहराबादकराचा व शिवदिन-केसरीचा बिलकुल संबंध नाहीं असें म्हणतां येतें. अहवालांत ज्याचीं पदें दिलीं आहेत त्या महीपतीचीं अनेक पदें असून लावण्या हि आहेत. हा महीपति नाथ–सांप्रदायी होता. लावण्या वेदांतपर बऱ्या च आहेत. याचीं कांहीं पद्यें काव्य-संग्रह–कारांनीं छापलीं तेव्हां हि हा संतचरित्रकार महीपति असें च म्हटलें आहे. व यास भक्तविजयांत शेवटीं नरहरी हा शब्द आला आहे असें प्रमाण दिलें आहे. हें प्रमाण अगदीं व्यर्थ आहे असें भक्तविजयांतील ओंवी पाहून कोणाचे हि लक्षांत येईल.

या दोहोंशिवाय शनैश्वराचें चरित्र गाणारा तात्याजी महीपति हि महाराष्ट्राच्या परिचयांतला च आहे.

आतां महीपतिबुवा ताहराबादकरांनीं वारकऱ्यांबरोबर विठोबास पाठविलेलें एक पत्र देऊन हा लेख पुरा करतों.

जय क्षीराब्धिवासा अनंता । अनंतशायी मायातीता ॥<br>
भक्तवत्सल पंढरिनाथा । रुक्मिणीकांता श्रीविठ्ठला ॥<br>
सेवेसी विज्ञप्ती ऐसी । येत होतों श्रीपंढरिसी ॥<br>
पांच कोस प्रथम दिवशीं । नांदुरासी पातलों ॥<br>
एक रात्र क्रमोनि तेथ । प्रातःकाळीं उठलों त्वरित ॥<br>
अश्वावरुनि अकस्मात । ग्रामदूरीं पडियेलों ॥<br>
तेणें देहदुःखें करून । विकळ मूर्च्छित पडलों जाण ॥

चित्तीं झालें तुझें स्मरण । अगाध महिमान संतांचें ॥
इष्टमित्र आप्तव्याही । डोली करूनि आणिले गांवीं ॥
चित्तवृत्ती विठाबाई । तुझे पायीं लागली ॥
त्रितापाचे विस्तार किती । पत्रीं ल्याहावें तुजप्रती ॥
शरीरीं किंचित् नाहीं शक्ती । लेखणी हातीं धरवेना ॥
अंतरसाक्ष चैतन्यघन । जाणसी जीवाची निजखुण ॥
आरुष म्हणोनि तुजकारण । पत्र लिहूनि पाठवूं ॥
सेवटील हेत आहे साचा । संबंध तोडी या देहाचा ॥
ठाव इछितसे पायांचा । आणिक वाचा न बोले ॥
मागे भक्तां पावलासि अंतीं । तें यथार्थ करी रुक्मिणीपती ॥
विष्णुदास महिपति । सेवेसि विनंती करीतसे ॥

## ७५ 'मोरोपंत व महीपती'

( रा. वि. ल. भावे )

महाराष्ट्रकवि मोरोपंत व महाराष्ट्रचरित्रकार महीपतीबोवा ताहराबादकर यांचा विशेष स्नेहसंबंध होता. व बोवांचे ठिकाणीं पंतांचें प्रेम हि फार होतें ही गोष्ट महशूर आहे. बोवांचे पश्चात् त्यांचे वडील चिरंजीव विठोबादादा यांचा व पंतांचा हि संबंध प्रेमाचा असे. पंतांच्या कृती विठोबादादा फार आदरानें वाचीत. पंतांची आर्या पाहून त्या बरहुकुम आपण कीर्तनांत म्हणण्याकरतां पदें रचावीं व केव्हां केव्हां पंताजवळून तशीं रचून घ्यावीं असा सांप्रदाय विठोबादादांचा असे.

पंतांनीं आपलें 'संशयरत्नावली' हें प्रसिद्ध काव्य महिपतीबोवांचे पांडुरंग-स्तोत्र पाहून रचलें असावें किंवा त्याची प्रथम कल्पना तरी पांडुरंगस्तोत्रावरून पंतांस सुचली असावी, असें तें स्तोत्र वाचलें असतां वाटतें. सदहू पांडुरंगस्तो-त्राच्या शेवटील २५।३० ओंव्या पुढें देतों म्हणजे याची खात्री सर्वांस पटेल.

महिपतीबोवाचे चरित्रांत अथवा इतर कोठें पंतांनीं याचा उल्लेख केला असल्यास मला माहीत नाहीं.

श्री

हें संतांचे मुखें करुनि । कीर्तनीं ऐकलें चक्रपाणी ॥
त्याचा विश्वास धरूनि मनीं । तुझे भजनीं लागलों ॥

आतां समर्थासी असेल उचित । तैसें करावें माझें हित ॥
उपेक्षा करशील निश्चित । तरी हसतील संत तुजलागीं ॥
देवा तूं ब्रह्मांड नायक । तुझे रोमरंध्री सकळ लोक ॥
तो तूं पुंडलिकासी देवोनि भाक । उभा सन्मूख तिष्टशी ॥
तें रूप धरुनिया चित्तीं । तुज आठवितो रुक्मिणी पती ॥
ऐसी ऐकुनियां विनंती । करुणा चित्तीं कां नये ॥
मज वाटतें रूप सगूण । टाकूनि आतां झालासि निर्गूण ।
म्हणून ब्रिदाचा अभिमान । सोडिला संपूर्ण ये काळीं ॥
कां माझे दोष दारुण । भस्म न होती तुझिया स्मरणें ॥
म्हणूनि निष्ठूर करुनि मन । दिधलें टाकून मजलागीं ॥
कां निजभक्त लाविती प्रीति । ध्यानांत गोविलें श्रीपती ॥
म्हणून न ऐकसी माझी विनंती । ऐसें चित्तीं वाटतसे ॥
कीं ऐसें वाटतें माझिया मनांत । तुज लेंकुरें झालीं बहूत ॥
म्हणूनि निष्ठूर करुनि चित्त । मज निश्चित उपेक्षिलें ॥
यात्रा मिळाली अधोक्षजा । कीं राउळीं मांडिली महापूजा ॥
तेथेंच प्रेमा लागला तुझा । विसर माझा पडला कीं ॥
कीं संचीत माझें ओखटें । जाणुनी तुजला भय वाटे ॥
मग निष्ठूर करूनी मन मोठें । येत येत वाटे परतलासी ॥
कीं डोळे झांकून कठीणपण । सांडुनी देवपणाचा अभिमान ॥
म्हणून विनंती न ऐकून । दिधलें टाकून मजलागीं ॥
कीं कलीचें बळ दुर्धर जाण । म्हणुनी न करिसी माझें धावणें ॥
कीं प्रेमळभक्ताचें ऐकूनी कीर्तन । तेथें बैसून श्रवण करिसी ॥
तुझी कीर्ति अद्भुत झाली देवा । म्हणुनी न ऐकसी माझा धांवा ॥
कीं घडोनी आली नाहीं सेवा । म्हणुनी केशवा मोकलीलें ॥
कीं हा समय अमंगल जाण । म्हणुनी न करिसी माझें धांवणें ॥
कीं आडवी येऊनी माता रुक्मिण । तूतें धरूनी बैसवीलें ॥
कीं मी पतीत साचार । घडला सकळ दुराचार ॥
सांगता अपराधाचे विस्तार । शिणेल फणिवर व्यर्थची ॥
अंतर साक्ष तूं चैतन्य घन । माझीया कर्माची जाणसील खुण ॥
आतांचि गुणदोष निवारून । भवबंधन निरसावें ॥
तुझिया नामा वांचूनि जर । अन्य उपाय केले फार ॥
तरी हंसतील सकळ वैष्णववीर । म्हणतील निर्धार यासी नाहीं ॥
कल्पतरूखालीं बैसलो जाण । तेथें क्षुधित अन्नाविण ॥

तरी हा शब्द सुरतरू कारण । जाण संपूर्ण पावती ॥
कीं काम धनूचें पाडस पय । अजा पावसी चाखू जाय ॥
तरी तीस म्हणती बुरठ गाय । पंढरीराय जाणसी तूं ॥
तृषा लागतां चातकास । त्यानें मेघाची करावी आस ॥
तेवीं संकट पडतां आम्हांस । तूज सायास आळवावें ॥
बाळकासीं क्षुधा लागतां नेटें । त्यानें मातेच्या स्तनी घ्यावें झटें ॥
तेवीं आम्हांस पडतां संकटें । तेव्हां तुझी वाट पहावी ॥
नातरीं पाडस क्षुधित जालें वनीं । तेणें सायासें धुंडावें हरणी ॥
तैसें संकटीं चक्रपाणी । तुजलागुनी आळवावें ॥
कीं पतिव्रता इच्छी परमार्थ । तिनें आपलें पतीचें घ्यावें तीर्थ ॥
तेवीं कामक्रोधादि पीडीतां बहूत । भजन निश्चित करावें ॥
गगनीं नक्षत्रें आहेत बहुत । परी चकोरासी तोषवी रोहिणीकांत ॥
तेवीं आम्हां पतिताचे हित । तुजविण निश्चित कोण करी ॥
बाळकासी क्षुधा लागतां पोटीं । तेव्हां कासव पाहे कृपादृष्टीं ॥
तैशा परी जगजेठी । मजही शेवटीं रक्षावें ॥
जरी मी वायां गेलों येथें । तरी हास्य होईल पिशुनांत ॥
आतां आपणांस असेल उचित । तैसें निश्चित करावें ॥
ब्रिदासी बोल लागेल तत्वतां । ऐसें न करी पंढरीनाथा ॥
महिपती चरणीं ठेवोनि माथा । विनंती अनंता करितसे ॥
स्वस्तिश्री पांडुरंग स्तोत्र । नित्य पठती भाविक नर ॥
निश्चय देखोनि रुक्मिणीवर । पुरवी मनोरथ तयाचे ॥
इति श्री पांडुरंगस्तोत्र संपूर्ण ॥

## ७६ ऐतिहासिक टिपणें

( रा. बा. दा. मुंडले )

### १. बहादुरवाडीचा वृत्तांत-दंतकथा वगैरे

सातारा जिल्ह्यांतील वाळवे तालुक्यांत 'बहादुरवाडी' या नांवाचा एक देशमुखी इनामाचा गाव आहे. ह्या गावाच्या उत्पत्तीसंबंधानें पुढील दंतकथा प्रचलित आहे:—

हल्लीं हा गाव ज्या ठिकाणीं वसला आहे तेथें सुमारें २५० (?) वर्षांपूर्वी केवळ माळ–रान होतें. त्याच्या आसपास शिगाव कोरेगाव, कणेगाव, तांदुळवाडी, गोटखिंडी, मालेवाडी, भडकिंबे हीं गावें सभोवार होतीं व आहेत. ह्या माळरानांत विजापूर दरबारचा खजिना ४० हजार होन लुटला गेला. (केव्हां?) तेव्हां ती बातमी विजापुरास समजतां च तेथून एक अंमलदार-वजीर–चौकशीस त्या ठिकाणीं आला. त्यानें कोल्हापूरकर (?) व आसपासचे सर्व जमीनदार, देशमुख वगैरे यास बोलावून हा खजिना गेला ती जागा कोणाच्या हद्दींतली म्हणून चौकशी केली तेव्हां त्या जागेचें स्वामित्व कोणी कबूल करीना. कारण, जर कबुल करावें तर खजिना भरून द्यावा लागणार. याकरतां जो तो टाळाटाळ करूं लागला तेव्हां महिपतराव घोरपडे ह्या नावाच्या एका मराठ्या गृहस्थानें पुढें होऊन बादशहाच्या वजिरास सांगितलें कीं, सदर रान आम्हास देत असाल तर आम्ही खजिना भरून देतों. वजिरानें बादशहाच्या अनुमतीनें ती गोष्ट कबूल केली व त्यावरून महिपतरावानें खजिन्याची रकम भरपाई केली. तेव्हां विजापूरच्या बादशहाकडून त्यास त्या रानाची ६। चावराची ( ६।×२० चावर = १२० बिघे. ) सनद व देशमुखी मिळाली. मग त्यानें तेथें किल्ला व वाडा बांधून वस्ती वसविली. गावाभोवतीं तट व दोन खंदक केले. पैकीं तटाचा पडका भाग व बुरूज आणि खंदकाची जागा अद्याप पहावयास मिळते. त्यानें गांव वसविला त्या वेळेस त्यास ' बहादुरबिंडा ' असें नाव दिलें. पुढें कालांतरानें ह्या नावाचे ' बहादुरवाडी ' असें रूपांतर झालें. ही गोष्ट त्या गावाचें वैभव व माहात्म्य नष्ट झाल्यावर झाली असावी. सातारचें राज्य खालसा होईपर्यंत येथें सरळ–औरस वंश होता पुढें. दत्तक वंश सुरू झाला व अद्याप तो चालू आहे. या वंशजांनीं पूर्वीची बादशाही सनद नष्ट करून टाकली. ती कोर्टांत वादाच्या पुराव्याकरतां कांहीं वर्षांपूर्वीं आली होती तेव्हां त्या वादाशी संबंध असलेल्या माणसांनीं पाहिलेली आहे. त्यांत कुलकानु माफ असून सूर्य चंद्र आहे तोंपर्यंत सदर जागेचा उपभोग घ्यावा अशा अर्थाचा मजकूर असल्याचें एका माहितगार वृद्ध गृहस्थानें मला सांगितलें. बहादुरबिंडा गाव व तेथील किल्ला वसविल्यावर महिपतराव घोरपडे उर्फ देशमुख यानें वाळवें, यडेनिपाणी, येलूर, कणेगांव, नागठाणें वगैरे सभोंवतालच्या सुमारें १८ गावावर देशमुखी अंमल सुरू केला. वर दिलेल्या गावांपैकीं बहुतेक गावांत देशमुखीबद्दलच्या इनाम जमिनी अद्याप ह्या वंशाकडे आहेत. महिपतराव चांगला शूर लढवय्या होता व त्याच्या जवळ लोकहि पुष्कळ असत. कसरती, आखाडे वगैरे ह्या गावांत फार चालत त्यास अनुसरून ' बहादुरबिंडा, सवाई आखाडा × × × × × × × × × × × ×——अशा अर्थाची लावणी कलगीतुरेवाले लोक म्हणत ती अद्याप हि क्वचित् ऐकूं येते. महिपतरावानें याप्रमाणें बादशहा-

करून त्याचा खजिना भरून देऊन सनद मिळविली व तो शिरजोर झाला हें सांगलीकरांस रुचलें नाहीं यामुळें त्यांच्या ह्यांच्या वारंवार चकमकी होत व हें वैर वंशपरंपर कित्येक वर्षें चालूं होतें. महिपतरावाच्या मागून पुढे दोन तीन पिढीपर्यंत जे पुरुष त्याच्या देशमुखीचे मालक झाले त्यांचीं नांवें ' महिपतराव ' अशीं च ठेविलीं होतीं. यांपैकी दुसरा महिपतराव हयात असतां गोटखिंडीनजीक सांगली-करांची व त्याची चकमक झाली ( सांगलीकरांचें नांव चिंतामणराव सांगतात. ) त्यांत सांगलीकरांच्या फौजेचा मोड झाला. त्यांच्या बाजूनें बाबाजी म्हणून एक मराठा सरदार लढत होता तो पडला त्याचा घोडा बहादुरवाडीच्या शिवेंत आला तो बहादुरवाडकरांनीं धरला. पुढें तो मेला तेव्हां त्याचें थडगें बांधून त्यास ' बाबज्या घोड्याचें थडगें ' असें म्हणूं लागले. त्या थडग्यावर घोड्याची प्रतिमा काढलेली असून तें अद्याप पहावयास मिळतें.

याच घराण्यांतील ३ रा महिपतराव हा मोठा शूर व मुत्सद्दी होता. तो पुण्यास पेशव्यांच्या दरबारीं असे व बहादूरवाडीच्या देशमुखीचें काम त्याचा धाकटा भाऊ खंडेराव पहात असे. हा फार मानी व शूर होता. याच्यासंबंधानें अशी गोष्ट सांग-तात कीं, एकदां मकरसंक्रांतीस चालू वहिवाटीप्रमाणें यानें आपल्या १८ गांवांस संक्रांतीचे रोखे पाठविले. तेव्हां येड्याचा इनामदार शेवाळे यानें त्याचा रोखा फेंकून दिला. हें वर्तमान त्याच्या शिपायानें त्यास गणपतीच्या* सदरेंत येऊन सांगितलें. तेव्हां तो संतापानें लाल झाला. तशांत तो घरांत उठून गेल्यावर त्याच्या आईनें त्याला सहज म्हटलें कीं, ' कासाराला बोलवावें कीं नाहीं ? ' घरांतील बायास बांगड्या भरावयाच्या होत्या म्हणून आईनें हे शब्द उच्चारले परंतु खंडेरावास वाटलें कीं, आपला अपमान झालेला आईस कळला म्हणून तिनें आपला हा उप-हास केला. तेव्हां आईचे ते शब्द ऐकतां च खंडेराव उत्तर न करतां बाहेर आला व त्यानें मोतद्दारास बोलावून घोड्यास लगाम घालावयास सांगितलें. खोगीरसुद्धां घालूं दिलें नाहीं. मोतद्दारानें घोड्यास लगाम चढवितां च तो हातांत तेगा ( तरवार ) घेऊन येड्यास तडक निघून गेला व शेवाळ्याच्या वाड्यांत जाऊन त्यानें त्याचें डोकें उडविलें! व तसाच परत आला. पुढें शेवाळ्याच्या माणसांनीं पेशव्यांकडे फिर्याद केली. ही हकीकत खंडेरावाचा पुण्यास असलेला बंधु महिपत-राव यास समजली तेव्हां त्यानें खंडेरावास वेड्याचें सोंग घेण्यास कळविलें. त्याप्रमाणें खंडेरावानें केलें. पुढें पेशव्यांनीं बहादुरवाडीच्या वतनावर जप्ती पाठवून महिपतरावास जाबसाल विचारला तेव्हां त्यानें आपला बंधु दिवाणा–वेडा–अस-ल्याचें सांगून वेळ मारून नेली. पेशव्यांस हि कांहीं करतां येईना. परंतु देशमुख

* ही देशमुखांची कचेरीची बसण्याची जागा किल्ल्यांतील वाड्यांत होती.

४०

फार उन्मत्त झाला असें वाटून पेशव्याच्या मंत्र्यांनीं पेशव्याच्या अनुमतीनें त्यास नकळत शासन करण्याची एक युक्ती काढली. ती अशीः—

पेशव्यांचा एक हत्ती मस्त झाला होता म्हणून त्यास खंदकांत सोडलें होतें. त्या हत्तीस ताळ्यावर आणण्याचें काम पेशव्यांनीं महिपतरावावर सोंपविलें. हेतू हा कीं, हत्तीनें त्यास मारलें तर आयतेंच बरें झालें. हत्ती त्यास एकट्यास आटोपणार नाहीं असें त्यांना वाटत होतें. म्हणून मुद्दाम ही कामगिरी त्याच्याकडे दिली. ही कामगिरी ऐकतां च महिपतराव पेशव्यांचा डाव समजला परंतु तो जातीचा मोठा शूर व धाडसी असल्यामुळें त्यानें ती कामगिरी नाकारली नाहीं. उलट ती करून दाखवून पेशव्यांच्या सल्लागारांची फजिती करण्याचा बेत त्यानें केला. लगेंच त्यानें आपल्या अंगावर चिलखत चढविलें व आपल्या आवडत्या घोड्यावर स्वार होऊन हातांत एक तीक्ष्ण भाला घेऊन हत्ती ज्या खंदकांत होता, तिकडे वळला. खंदकाजवळ येऊन पहातो तों हत्ती मदानें उन्मत्त होऊन सारखे फुस्कारे टाकीत व पाय आदळीत असल्याचें त्याला दिसून आलें. तेव्हां खंदकाभोंवतीं टेहाळणी करीत करीत, हळूच एका बाजूस फळ्या होत्या त्यावर त्यानें आपला घोडा वळविला व हत्तीची नजर चुकवून त्याच्या तोंडाच्या जांघाडांत त्यानें एक भाला जोरानें मारला. तो हत्तीच्या दाढेंत घुसला. त्याबरोबर त्यानें थैमान सुरू केलें. परंतु आपला वार चांगला मर्मीं बसला आहे हें महिपतरावाच्या तेव्हांच लक्षांत आलें व त्यानें भाला बाहेर ओढण्यास सुरुवात केली. त्याबरोबर हत्ती नरम होऊन चीचीं करूं लागला. कारण दाढेंत घुसलेलें भाल्याचें फळ बाहेर काढण्याच्या मिषानें महिपतराव जसजसा भाला खेंचूं लागला तसतशा हत्तीच्या वेदना असह्य होत चालल्या. त्याच्या दाढेंत अडकलेलें तें फळ बाहेर निघेना. याप्रमाणें बराच वेळ दमणूक झाल्यावर हत्ती अगदीं नरम आला व महिपतराव वळवील तिकडे वळूं लागला. एवढ्या अवधींत महिपतरावाच्या अंगांतूनही घामाच्या धारा सुरू झाल्या. हत्ती नरम–पूर्ण नरम–आला आहे असें पहातांच त्यानें वस्त्रानें आपल्या तोंडावरील घाम पुसला व हत्तीस भाल्यानें वळवून खंदकाबाहेर काढून आपला घोडा पुढें व हत्ती मागें अशा रीतीनें तो पेशव्यापुढें येऊन उभा ठाकला. तेव्हां पेशव्यांनीं प्रसन्न होऊन त्याच्या धाडसाची व शौर्याची तारीफ केली. व काय पाहिजे तें माग म्हणाले. त्यावेळीं आपल्या गांवावरील जप्ती उठवून आपल्या बंधूस क्षमा करण्याबद्दल महिपतरावानें विनंती केली. ती ध्यानास आणोन पेशव्यांनीं जप्ती उठविण्यासंबंधानें ३ ओळींची सोडचिठ्ठी दिली. ही सोडचिठ्ठी तीनच ओळींची होती व तिचाही पूर्वोक्त खटल्यांत पुराव्याचे कामीं उपयोग झाल्यानंतर ती नष्ट झाली. असें सांगतात कीं, अलीकडील एकदोन पिढ्यांत ह्या घराण्याचे

बहुतेक कागदपत्र वावड्या व पतंग यांच्या रूपानें नामशेष झाले! ते जर असते तर बराच महत्वाचा इतिहास त्यांत सांपडला असता यांत शंका नाहीं. इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर बहादुरवाडीकरांच्या देशमुखी उत्पन्नावर बोरगांवचा नरवा शिंदा हा आपला हक्क सांगूं लागला तेव्हां त्याबद्दल चौकशी होऊन पूर्वोक्त सनद, सोडचिट्टी व इतर कागदपत्र यांच्या आधारें. शिंद्याचा दावा रद्द होऊन बहादुरवाडीकरांचें घराणें कायम राहिलें व त्यास हल्लीं तो सबंध गांव इनाम आहे. मराठी मोगल राज्यांत देशमुख हे मोठे सत्ताधीश व वैभवशाली लोक होते. त्यांची जरब व अंमल कडक असे. हल्लीं जसे कलेक्टर तसेच पूर्वीचे देशमूख होते. हत्तीचा मद उतरणारा महिपतराव फार दांडगा व सशक्त होता त्याचें चिलखत अद्याप बहादुरवाडीस वाड्यांत आहे तें एका गड्यास उचलण्यास मुष्किल पडते!

---

*वरील हकीकत एका वृद्ध माहितगार माणसाकडून जशी मला समजली तशी च दिली आहे. त्यांत ऐतिहासिक दृष्टीनें पुष्कळ उणीवा आहेत. स्थूलमानानें बहादुरवाडी व तेथील देशमुखांचें घराणें यांच्या उत्पत्तीचा व वाढीचा इतिहास त्यावरून लक्षांत येण्यासारखा आहे. परंतु वरील हकीकतींतील खालील गोष्टींसंबंधानें जास्त व निश्चित अशी विश्वसनीय माहिती मिळणें जरूर आहे. त्या गोष्टी ह्याः—

( १ ) विजापूर दरबारचा खजिना लुटला त्याचा काल

( २ ) त्यावेळीं विजापुरास बादशहा कोण होता व खजिना जेथें लुटला गेला तो प्रदेश कोणाच्या अंमलाखालीं होता ?

( ३ ) ज्यानें खजिना भरून दिला तो महिपतराव घोरपडे मूळचा कोठला होता ?

( ४ ) खजिन्याची चौकशी करण्यास आलेला वजीर ऊर्फ अंमलदार कोण ?

( ५ ) 'बहादुरपिंडा' याचें बहादुरवाडी हें रूपांतर केव्हां व कां झालें ?

( ६ ) सांगलीकराशीं झालेल्या चकमकीचा काल सांगलीकरांचें नांव चिंतामणराव सांगतात त्यावरून पडताळा पहावा तर चिंतामणराव अनेक झाले तेव्हां त्यांपैकीं कोणता ?

( ७ ) शेवाळ्याचा खून व महिपतरावाचे हत्ती ताल्यावर आणण्याचें कृत्य कधीं झालें ? त्यावेळीं पेशवा कोण होता व या दंतकथेस आधार आहे काय ? खून

झाल्यामुळें जप्ती झाली व पुढें सोडचिट्टी मिळाली ह्या गोष्टी खऱ्या आहेत. कारण सोडचिट्टी पुराव्याकरितां कोर्टांत आली होती असें सांगतात.

वरील ७ बाबींपैकीं बाब १ व ७ यांचा निर्णय मूळ सनद व सोडचिट्टी पहावयास मिळती तर तत्काळ होता; परंतु तीं नष्ट झालीं आहेत. त्यांच्या नकला कोठें दुसऱ्या ठिकाणीं एखाद्या संशोधकास सांपडल्या तर ह्या बाबीवर पुष्कळ प्रकाश पडेल व कालनिर्णय करण्यास अवकाश सांपडेल. खुद्द देशमुखाच्या घराण्यांत त्यांचा मागमूस नाहीं. मूळ कागद तर नष्ट झाले च पण नकला हि नाहींत असें समजतें!

## २

सातारचे शेवटचे महाराज आपासाहेब यांचे कारकीर्दींत तेथील दरबारांत हर्षे, आगटे, महाजनी व शिर्के या घराण्यांतील तत्कालीन पुरुषांचें फार वजन असे. त्यांच्याशिवाय पान हालत नसे. यावरून तत्कालीन एका कवीनें पुढील आर्या केली व ती अद्याप बऱ्या च वृद्ध माहितगार माणसांच्या तोंडून ऐकूं येते. ती अशीः—

आर्या

हर्षे, आगटे, महाजनि, नृपमातुल खंडेरावजी शिर्के।
याविरहित दरबारीं अन्यजनाचा कधीं न पद शिरके ॥

पैकीं हर्षे यांचें घराणें साताऱ्यास आतां दिसत नाहीं निदान प्रसिद्ध तरी नाहीं. आगटे व महाजनी हीं घराणीं अद्याप आहेत पण खालावलीं आहेत.

## ३

सातारचें राज्य खालसा झालें तेव्हां त्या वेळच्या वाळवें तालुक्यांतील लोकांत नवीन राज्यासंबंधानें पुढीलप्रमाणें बोलवा असेः—

" आतां कालेकटारी व्हायची आहे ३६ कायदे होणार आहेत; लाकडाची डोरली* व्हायची आहेत°. अलिप्शन बहादुराचा झेंडा फडकायचा आहे. लोक अर्भुज होतील. वगैरे "

°ह्या वाक्याचा अर्थ ' पुढें धातु राहणार नाहीं '.

*तत्कालीन लोकस्थितीचे निदर्शक ह्मणून हे उद्गार टिपून टेवण्यासारखे आहेत.

# ७७ उकारविशिष्ट जुनी वाक्प्रचारांतील मराठी भाषा

( रा. वा. दा. मुंडले )

जुन्या मराठी भाषेंत उकारात्मक शब्दांचीं रूपें फार आहेत; किंबहुना त्या भाषेचें जुनें स्वरूप ओळखण्याचें तें एक साधन च आहे असें ह्मटलें तरी चालेल. प्रो० सालढाणा यानीं प्रकाशित केलेलें इंग्रजी लिपींतील स्टीफन्सकृत मराठी खिस्तपुराण व रा० राजवाडे यांनीं प्रसिद्ध केलेली ज्ञानेश्वरी या दोन ग्रंथांत अशा प्रकारचीं रूपें फार आहेत. रा० राजवाडे यांनीं खिस्तपुराणाची चर्चा 'विश्ववृत्त' मासिकांत व आपल्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत केली असून आपल्या पोथीचें अस्सल व जुनें स्वरूप प्रस्थापित करण्याकरितां त्या पुराणांतील भाषेचा–भाषेच्या स्वरूपाचा–आधार घेतलेला आहे. तात्पर्य, जुनी मराठी भाषा ओळखावयाची झाल्यास वरील दोन ग्रंथांतील उकारविशिष्ट शब्दांच्या साह्यानेंच ती ओळखिली पाहिजे ही गोष्ट आतां बहुतेक निर्विवाद ठरल्यासारखी आहे. म्हणजे ज्ञानेश्वरकालीन अथवा तत्पूर्वीची जी मराठी भाषा असेल त्यांत वरील प्रकारचीं रूपें सडकून असावयाचीं; तीं नसतील तर ती भाषा आधुनिक आहे असें खुशाल मानावें, असा सिद्धांत या बाबतींत प्रस्थापित होऊं पहात आहे. वरील दोन ग्रंथांतील भाषेमुळें हा सिद्धांत परिणत अवस्थेप्रत येऊन पोहोंचला आहे व त्यास पुष्टि देणारें असें आणखी एक साधन मला नुकतेंच उपलब्ध झालें आहे. जुन्या मराठी भाषेचें वरील स्वरूप केवळ तत्कालीन शिष्ट व मान्य अशा ग्रंथांत च तेवढें सांपडतें असें नाहीं; तर तें त्या वेळेपासून महाराष्ट्रांत प्रचलित असलेल्या कित्येक गीतांत व वाक्प्रचार ऊर्फ म्हणी अथवा उखाणे यांत हि असलेलें दिसून येतें. हीं गीतें, म्हणी व उखाणे मराठ्यांच्या व कुणब्यांच्या स्त्रियांच्या तोंडीं अद्याप हि आहेत. आज केक वर्षें पिढ्यानपिढ्या त्यांच्या स्त्रीसमाजांत हीं प्रचलित आहेत व जात्यावर दळतांना किंवा गुणदोष दाखविण्याचे बाबतींत दाखला देतांना त्यांचा उच्चार अद्याप हि कुणबी किंवा मराठा यांच्या स्त्रीकडून केला जातो. अशा प्रकारची सुमारें ४० गीतें ऊर्फ म्हणी खालीं दिल्या आहेत त्यांचा भाषाशास्त्राच्या दृष्टीनें मराठी भाषेचा अभ्यास करणारास पुष्कळ उपयोग होईल असा भरंवसा आहे. खालील गीतें व म्हणी जरी भाषाशास्त्राचा अभ्यास करणाराकरितांच मुख्यतः देण्यांत येत आहेत तरी सामान्य वाचकास हि तीं वाचून एक प्रकारची मौज वाटेल व त्यांतील कित्येक यांमुळें तर त्यांची खाशी करमणूक हि होईल.

हीं गीतें एका मराठा कुणबाऊ वाडींतील एका वृद्ध स्त्रीकडून पैदा केलीं आहेत.

१ चांगलं तुझपणु, माझ्या जिवाला करवंतु[1], चांदे[2] गळीनं मिरवतु.

२ तुझ्या जिवासाठी उभी राहिली सडकेंतु[3], येतो चंदन भडकतु.

३ फुलला तरवडु सोन्यापरिस सवाई, पुतराचि सर काय करील जावाई.

४ तांबड्या मंदिलाला रुपये देती आटुं[4], तुझी संबल्याजोगी पाटु[5].

५ नटतु नटतु एवड्या रातिचा कुठं जातु, कांन्या[6] खुतनीवरी लेतु.

६ भरली सभमंद कोण जरी पटक्याचा, खेळु बघितु नाटकाचा.

७ तुळशीला घाली पाणी वली पडद धोतारु, हौशा मागित पुतरु.

८ गरभिणी नारी तुझ्या गरभाचं एलौंळु, हौशा तिचा कंतु न्हाणी लावितु पनाळु.

९ थैसवा झाली नारु आपुल्या मोहरातु, सांग्यावरी पोतं देती[9] तलावं बाजारीतु.

१० लोकांचं लगिनु बघिती जाता येता, गेला दिवस घेतादेता.

११ जावई पावणा सासुबाईला हरीखु, जाइ शेवंती फुलाचा माळिणी तुरा गुंफु.

१२ जावई पावणा सासुबाईला उल्हासु, लावी तुपाचा तैलासु[14].

१३ कुण्या सैदवाचा जावाई मनहारु, सासु करिती जयजयकारु.

१४ भरल्या तिनिसांजा गाई म्हशीची लांबडु, गवळ्या झांझडु.

१५ हाती दवतलेखणी जातो घाटनं लिवितु, सुभेदाराला बोवितु[15].

१६ अष्टीच्या[16] धोतराची घालितु कानपट्टी, सुभदाराच्या जातो भेटी.

१७ चौगुल्याचं[17] बाळु दिवाणाच्या तोंडी, [17]पाटिलाचं बाळु सुभदाराला देतु मांडी[18].

१८ पाटिलापरासु चौगुला मानाचा, वाटी झुबडा पानाचा.

१९ पाटिलापरासु चौगुला जबरदस्तु, उभ्यानं टाकी रैसंतु[19].

२० चौगुल्याची मुली नग सांगुस वाडचैरु, कागदाचा बैस्ता[21] तुझ्या बापाच्या डोईवरु.

---

१ काळजी ( दृष्ट वगैरे लागेल ह्मणून ). २ मुलगा. ३ रस्त्यावर. ४ आठ. ५ पाठ. ६ पूर्वी खुतनीचा पायजमा घालून त्यावर कांचा बांधण्याची चाल असे त्यास अनुसरून हा उल्लेख आहे. ७ डोहाळे. ८ नवरा. ९ करिती. १० ढंग. ११ बाजारांत. १२ आनंद. १३ अज्ञार्थी क्रियापदाचें रूप ' गुंफ '. १४ तपास. १५ बोलावितो. १६ टेवणीच्या. १७ पूर्वी चावडीवर चौगुला अंगणात बसलेला असे व त्यास वरचेवर अधिकारी कामाकरितां बोलावीत त्यास अनुलक्षून हें वाक्य आहे. १८ पाटील चावडींत सुभेदाराजवळ मांडीला मांडी लावून बसतो अशा अर्थानें हा उल्लेख आहे. १९ रसत-पैशाची थैली. २० डौल. २१ रुमाल; दप्तर.

२१ पाटिलाची लेकु जशी पुरणाची पोळी, सोताकुणब्याची जात तेची उतावळी.

२२ सेड्यागावीच पाटिलु सळन मळक, पेट गाविचं पाटिलु चांदासारिख ढाळिकुं[22].

२३ गावा आल बंडबिजु[23] तराळा हाबुर्डुंबु[24], पाटिल नाहीं सैंचु[25].

२४ गावा आल बडबिजु तराळा नाहीं निजु, हैंय[26] पाटिल बाळरांजु[27].

२५ पाटान जात पाणी धोंड्याभोवतनं शेवाळु, मनी कपट ठेऊनि बोल बोलतु केर्वेळु[28].

२६ भरल्या तिनिसांजा जात्याला घिरघिरु, उभी लक्ष्मी सवार्पोरु[29].

२७ पावसाची फळी इजचा भडिमारु, सडका सोडुनी झाला स्वारु.

२८ बंधुजि म्हणितु कर बहिणाला माझ्या रोटी, भावज गुजर बोलती गहू सपलीच्या पोटीं.

२९ बंधुजि म्हणितु वाढ बहिणाला दुधभातु, भावज गुजर बोलती म्हशिनं दिली लाँतु[30].

३० बंधु म्हणितो कर बहिणाला माझ्या भातु, भावज गुजर बोलती साळी लिपणाच्या आंतु.

३१ बंधुजि पावणा जिवाला उल्हासु, लावी तुपाचा तलासु.

३२ बंधुजि घेतु चोळी भावज गुजर दीना दोरा, चांदोंच्या[31] जिवावरी काय चांदणी तुझा तोरा.

३३ वाजत गाजत मेघु निघाला लगना, कुरी येटकुं[32] सजना.

३४ वळवाचा पाऊस मेघुराजा मातइला, चौंड्यावरी[33] मुठ बाळ कुणब्याचा नटइला.

३५ वाजत गाजत मेघु निघाला लगनाला, इज गर्जति गगनाला.

३६ सुताराचा सांक[34] गुळ कशाचा वाटितु, नवा नांगर येटितुं[35].

३७ मेव्यामधि मेवा अधिक लेकराचा, बत्तासु साखरचा.

३८ संचिताची रेघु कपाळाच्या आंतु, येडी झाली नारु जोशाला दावी हातु.

३९ पहाटच्या पाऱ्यामंदि कोंबडा भांग देतु, चांद दिवाणी[36] माझा जातु.

४० माळिण सौंदविति[37] येसींचं[38] गौंजारु[39], नाडमंयाचा शेजांरु[40].

---

२२ स्वच्छ. २३ वरिष्ठ अथवा मोठा अधिकारी. २४ धकेबुके, धांवपळ. २५ सभेंत म्हणजे चावडींत. २६ आहे. २७ अज्ञान, लहान. २८ गोजिरवाणें (साजिरें). २९ सव्वाप्रहर. ३० लाथ. ३१ नवऱ्याच्या. ३२ धर, जोड. ३३ बीं पेरण्याच्या कुरीचें तोंड. ३४ शांत. ३५ धरतो, जोडतो. ३६ चावडीस. ३७ शोभविती. ३८ यशाचें. ३९ गाजर. ४० शेजार शेतांत माळीण काढणी मोडणीच्या वेळीं गाजरें घेऊन आल्यास तें यशदायक समजलें जात असे त्यास अनुलक्षून हा उल्लेख आहे.

# ७८ रा० रा० वि० का० राजवाडे आणि कुंडल्या


( लेखकः-काशिनाथ नारायण साने, बी. ए. )

इ० सं० मंडळाच्या शके १८३२ च्या अहवालांत पृष्ठ ८२ ते ८७ एथें रा० रा० विश्वनाथपंत राजवाडे यांनीं मंडळापुढें ५१ कुंडल्या दाखल केल्या त्या छापिल्या आहेत. त्यांविषयीं थोडें लिहिणें आहे तें एणेंप्रमाणें:—

१. थोर पुरुषांच्या जन्मकुंडल्यांस कांहीं महत्त्व आहे म्हणूनच अर्थात् त्या मंडळापुढें आणिल्या. त्यांवरून कांहीं ऐतिहासिक शोध लागेल ह्या समजुतीनें त्या संगृहीत केल्या असाव्या, किंवा थोर पुरुषांच्या कुंडल्यांवरून कांहीं ठाम सिद्धांत फलज्योतिषी यांस बांधतां यावे, अगर जे सिद्धांत किंवा अनुमानें पूर्वीं त्यांनीं बांधिलीं असतील त्यांचें परीक्षण करतां यावें, हाही उद्देश त्यांचा संग्रह करण्यांत असावा. परंतु कुंडली कोणत्या पुरुषाची हें अहवालांत कांहीं स्थळीं स्पष्ट होत नाहीं. रा० राजवाडे यांनीं ही गोष्ट टीपा देऊन अगर उपोद्घात करून स्पष्ट करणें जरूर होतें. उदाहरणार्थ ' प्रतिनिधी सातारकर ' यांची कुंडली. प्रल्हादसुत गदाधर प्रतिनिधी सोडून दिले तरी परशुराम त्रिंबकापासून प्रतिनिधींचे ६।७ पुरुष झाले, त्यांपैकीं ही कुंडली कोणत्या पुरुषाची हें समजण्यास मार्ग नाहीं. मोघमपणें कुंडली देण्यांत अर्थ नाहीं हें उघड आहे. त्याप्रमाणेंच मिरजकर व इचलकरंजीकर जहागिरदार यांचे पुरुष बरेच झाले आहेत. तेव्हां नुसतें ' मिरजकर, ' ' इचलकरंजीकर ' असें कुंडलीच्या वर म्हटल्यानें त्यांतून कोणत्या पुरुषाची जन्मकुंडली हें कसें समजावें ? ही माहिती रा० राजवाडे यांनीं द्यावयास पाहिजे होती. विद्यमान जहागिरदारांच्या त्या कुंडल्या असतील तर तसेंच सांगणें जरूर होतें. या कामीं मोघमपणा उपयोगी नाहीं. त्याप्रमाणेंच " बाळासाहेब पटवर्धन अप्पासाहेबांचा पुत्र ", " अप्पासाहेब सांगलीकर " वगैरे व्यक्तींचीं पूर्ण नांवें व ते कोणाचे कोण सांगणें जरूर होतें. ही माहिती रा० राजवाडे यांस कदाचित् असेल, पण सर्वांस तशी माहिती असणें शक्य नाहीं. सदरप्रमाणेंच पृष्ठ ८५ " बाबा मेणवलीकर", " निपाणकर ", " गोपी नागदार "; पृष्ठ ८६ " श्रीपादभट "; पृष्ठ ८७ " मानसिंग ", हे पुरुष कोण, त्यांची प्रसिद्धी कशाबद्दल वगैरे माहिती देणें अवश्यक होतें. ह्या माहितीच्या अभावीं त्या कुंडल्यांस कांहीं मूल्य नाहीं.

२. पृष्ठ ८४ वर " चिंतामण बल्लाळ पेशवे " यांची कुंडली आहे. ह्या नांवाचा पुरुष पेशव्यांचे घराण्यांत झाला असल्याचें माहीत नाहीं. चिमणाजी अप्पा याचें मूळ नांव " चिंतामणी " असून त्यास लाडुकपणानें पुढें " चिमणाजी ", " चिमाजी " असें म्हणूं लागले कीं काय ? किंवा चिंतामण बल्लाळ असें नांव


घालण्यांत रा० राजवाडे यांची सपशेल चुकीच झाली आहे ! ही कुंडली चिमाजी अप्पाचीच असल्यास ती 'बाजीराव बल्लाळ' याच्या कुंडलीशीं सर्वथैव मिळती अशी आहे, हें कसें ? बाजीराव वडील व चिमाजी धाकटा बंधू असें असतां त्या उभयतांच्या जन्मकाळची ग्रहस्थिती एकसारखीच कशी असूं शकेल ? किंवा हे बंधू यमल म्हणजे जुळे असून त्यांचा जन्म एका कालींच झाला ? मला उपलब्ध असलेल्या चिमाजी अप्पाच्या कुंडलींतील ग्रहस्थिती बाजीरावाच्या कुंडलींतील ग्रहस्थितीशीं तंतोतंत मिळती अशीच आहे. तेव्हां हे जुळे बंधू होते कीं काय ? ह्या गोष्टीचा शोध झाला पाहिजे. किंवा कुंडल्या देण्यांत चुकी झालेली आहे ? चिमाजी अप्पाची कुंडली अशीः—




रा० राजवाडे यांनीं दिलेल्या कुंडलींत ( चिंतामण बल्लाळच्या ) शुक्र, शनि दर्शविलेले नाहींत, आणि केतूचें स्थान चुकीनें कुंभ पडलें आहे तें मीन पाहिजे.

२ संस्थान ग्वाल्हेर येथील राजज्योतिषी यांच्या एका स्नेह्याकडून मला कांहीं थोर विभूतींच्या जन्मकुंडल्या मिळाल्या आहेत. त्यांशीं रा. राजवाडें यांनीं दिलेल्या जन्मकुंडल्या ताडून पाहतां दोहोंमध्यें कांहीं फरक दिसून आला. त्याकरितां मला उपलब्ध झालेल्या त्या त्या पुरुषांच्या कुंडल्या रा. राजवाडें यांच्या कुंडल्यांशीं इतर मंडळीसही ताडून पाहतां याव्या व त्यांतून खरी कोणती हें ठरवितां यावें, म्हणून त्या येथें देतों.

( १ ) परशुरामभाऊ पटवर्धन




पृष्ठ ८४ वरील कुंडलींत जन्मलग्न मेष आहे. येथें दिलेल्या कुंडलींत तें 'तुला' आहे. ग्रहांची भावस्थिती दोहोंत एकसारखी आहे, म्हणजे जन्मस्थ गुरु, चतुर्थस्थानीं चंद्र इत्यादी.

( २ ) बाजीराव बल्लाळ–पृष्ठ ८५ मधील कुंडलींत शुक्राचें स्थळ दर्शविलेलें नाहीं. शुक्र द्वादशस्थानीं मीनराशिस्थ ( उच्च ) ग्वाल्हेर कुंडलींत दिलेला आहे. सबंध कुंडली देण्याचें कारण नाहीं. चिमाजी अप्पाच्या कुंडलीसंबंधानें वर मजकूर आला आहे च.

( ३ ) बाळाजीपंत नातू.





एथें रवि जन्मस्थ कन्याराशीस आहे. पृष्ठ ८५ एथें तो द्वादशस्थानीं सिंहराशिस्थ आहे.

( ४ ) युधिष्ठिर धर्मराज.





पृष्ठ ८७ एथें दिलेल्या कुंडलींत रवीचें स्थान साफ चुकलें आहे. शनीचें दाखविलें च नाहीं. तें कर्कराशीस रिपुस्थानीं पाहिजे. ग्वाल्हेर कुंडली बाजूस देत आहें.

( ५ ) नाना फडनीस.




पृष्ठ ८७ वर जन्मलग्न वृषभ आहे. ह्या कुंडलींत 'तुला' लग्नीं जन्म आहे. ह्याखेरीज ग्रहांची स्थिती अगदीं च भिन्न अशी आहे.

( ६ ) श्रीरामचंद्रजी अयोध्याधीश.




पृष्ठ ८८ एथें जन्मलग्न ' मिथुन ' दिलें आहे. एथें कर्कलग्नीं जन्म झाला असें दाखविलें आहे. ग्रहस्थिती दोहोंत सारखी च म्हणजे दोन्ही कुंडल्यांत त्या त्या राशीस तो तो ग्रह आहे. पण भावस्थितींत मोठा फरक पडतो. जन्मलग्न कर्क हें च खरें असें पुढील श्लोकावरून सिद्ध होईल.

नक्षत्रेऽदितिदैवत्ये स्वोच्चसंस्थेषु पंचसु ।
ग्रहेषु, कर्कटे लग्ने वाक्पताविंदुना सह ॥


वाल्मीकिरामायणम्

( ७ ) श्रीकृष्ण द्वारकाधीश.




एथें जन्मलग्नांत फरक असून ग्रहस्थितींतही फरक आहे.

ह्याशिवाय ज्योतिर्विद् दिननाथ उज्जयिनीकर यांनीं ठरविलेली श्रीकृष्णाची जन्मकुंडली रा. ब. चिंतामणराव वैद्य ह्यांच्या 'एपिक इंडिया' (Epic India) नामक ग्रंथांत दिलेली आहे ती अशीः–





वरील कुंडलींत व दिननाथ यांच्या कुंडलींत जन्मलग्न एक च म्हणजे वृषभ आहे. ग्रहस्थितींत बरा च फरक आहे. जायास्थानीं मंगळाचे घरीं शुक्र ग्वालेर कुंडलींत आहे; दिननाथ यांच्या कुंडलींत शुक्र रिपुस्थानीं स्वगृहीं दिलेला आहे. राहू, केतु, गुरू याची स्थळें ही बदललेलीं आहेत. एथें फलज्योतिषीमंडळानें खरी कुंडली कोणती तें ठरवावें. श्रीकृष्णचरित्र सर्वांस माहीत आहे च.

४. रा. राजवाडे यांनीं न दिलेल्या अशा कांहीं थोर विभूतींच्या जन्मकुंडल्या मला वरकलम ३ मध्यें लिहिलेल्या मार्गानेंच उपलब्ध झाल्या, त्या मंडळाचे संग्रहार्थ एथें [illegible] (अ) पुराणप्रसिद्ध विभूती, आणि (आ) ऐतिहासिक विभूती, असे दोन भाग केले.


(अ) पुराणप्रसिद्ध विभूती.

(१) कुंतीपुत्र अर्जुन.



अर्जुनाच्या [illegible] असें आहे. तें त्याचा जन्म उत्तराफल्गुनी [illegible] झाला म्हणून पडलें, असें [illegible] लिहिलें आहे त्यावरून पाहिला चंद्र कर्कस्थ, नसतां सिंहस्थ किंवा कन्यास्थ पाहिले.


(२) कुबेर उत्तरदिक्पती.



(३) दिलीप (रामचंद्राचा पूर्वज).




(४) दुर्योधन कौरवेश्वर.




या कुंडलींत चंद्र दर्शविलेला नाहीं.


(५) भगीरथ (स्वर्गांतून गंगा मृत्युलोकीं आणणारा).



(६) यम (सूर्यपुत्र)




(७) रावण (लंकानाथ)




## (आ) विभूती ऐतिहासिक.

(१) जयाजीराव शिंदे (हल्लींच्या माधवराव शिंद्यांचे जनक)




(२) तुकोजीराव होळकर (हल्लींच्या तुकोजीरावांचे आजे)




ह्या कुंडलींत मंगळ, राहू, केतू यांची स्थळें दिलेली नाहींत.


(३) ...राव राजवाडे (सर).




(४) बाळाजी विश्वनाथ पेशवे.




( ५ ) माधवराव बल्लाळ पेशवे



( ६ ) महाराणी विक्टोरिया चक्रवर्तिनी.



५. याशिवाय पुर्णेदफ्तरमध्यें उपलब्ध होणारी बाळाजी बाजीराव पेशवे यांची कुंडली स्पष्टग्रहांसुद्धां देऊन हा लेख संपवूं. ही कुंडली रा० गोगटे यांच्या बाळाजी बाजीरावाच्या चरित्रांत दिलेली आहे.



जन्मकाल मार्गशीर्ष वद्य १३ सह १४ घ. ४१ पळें ५२, ज्येष्ठां प्रथमचरण, शके १६४३. स्पष्ट ग्रह:—

| र. | चं. | मं. | बु. | गु. | शु. | श. | रा. | के. | लग्न. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ७ | ० | ७ | ७ | ७ | ७ | ८ | २ | ४ |
| ६ | १९ | १५ | २२ | ६ | ९ | २१ | २२ | २२ | २० |
| ११ | २७ | ५२ | १४ | २ | १३ | ५ | ५० | ५० | ४५ |

## ७९ दोन जुन्या सनदा.

( संपादकः-रा० का० ना० साने, बी. ए. )

‡

वेद[1]मूर्ती गोपाळभट बिन श्रीधरभट

वास्तव्य माभळेश्वर

( अष्टकोनी शिक्का **)

स्वस्ति श्री शके १५७४ नंदननाम संवछरे फाल्गुन सुधे[2] प्रतिपदा रविवासरे§ ते [3]दिनी[4] गोसावी[5] यांप्रती विद्यार्थी सिवाजीराजे दंडवत विनंती उपरी. स्वामी मले थोर आनुस्ठाते[6], सूर्यउपासनी, पद्महस्ती[7] येसे जाणोन, आपण, जिजाबाईआऊसाहेब व वेदमूर्ती प्रभाकरभट[8] उपाधे यांच्या विद्यमानें, स्वामीपासून मंत्रउपदेशे[9]

---

‡ 'श्री' कार फाटून नाहींसा झालेला आहे.

१. ही श्रीशिवाजीराजे यांची वर्षासन दानपत्राची सनद, महाबळेश्वरीं, वो गोपाळभट यांचे वंशज वे० शा० मोर दीक्षित बिन नारायण दीक्षित यांजकडे सांपडली. ती मोडी लिपींत आहे. तिची ही बालबोध लिपींत नकल दिली आहे, ती मोडी असलेप्रमाणेंच उतरली आहे. मोडींत लिहिलेल्या अशुद्ध शब्दांचीं शुद्ध रूपें, संक्षेपादिकांचा अर्थ, इत्यादि टीपा देऊन पुढें व्यक्त केलें आहे.

** प्रतिचंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥ शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

हा अष्टकोनी शिक्का सनदेवर मारलेला आहे; पण त्यांतील अक्षरांची शाई बहुतेक उडून गेली असल्यानें तीं लागत नाहींत. शिवाजीमहाराजांच्या मुद्रेवर वरील श्लोक कोरलेला असतो, पण तो शके १५७४ मध्यें तसाच होता किंवा कसें तें कळण्यास तूर्त मार्ग नाहीं. वरील दोन ओळी व खालची 'स्वस्ती श्री' इ० ओळ ह्यांच्या मध्येंच शिक्का मारलेला आहे.

२. सुध = शुद्ध.

§ गत शक १५७४ च्या फाल्गुन शुद्ध १ स शुक्रवार येतो-( सीवेल आणि दीक्षित यांचे पुस्तकावरून ). संपादक.

३. ह्या दीर्घवर्तुळ शिक्क्यावरील अक्षरांचाही उमज होत नाहीं. बहुधा तो शामराजपंत रांझेकर यांचा शिक्का असावा. शामराजपंत हे राजांचे पहिले पेशवे.

४. दिनी = दिनीं. सप्तमीच्या प्रत्ययाच्या अनुस्वार पुढही बहुधा गाळलेलाच आहे. तृतीयेच्या प्रत्ययांच्या व इतर ठिकाणच्या अनुस्वारांची दशा तीच झालेली आहे.

५. गोसावी = गोस्वामी = इंद्रिय-निग्रही.

६. आनुस्ठाते = अनुष्ठाते, अनुष्ठान करणारे. 'अ' आणि 'आ' ह्यांबद्दल 'आ' असेंच अक्षर सर्वत्र घातलें आहे. ह्या दोन स्वरांचा भेद मोडी सनदेंत केलेला नाहीं.

७. पद्महस्ती = पद्महस्त = यशस्वी आणि यश देणारे.

८. प्रभाकरभट उपाधे—हे महाराजांचे परंपरागत उपाध्याय होत.

९. मंत्रउपदेश—हा मंत्र कोणता तें समजण्यास मार्ग नाहीं. बहुधा शिवपंचाक्षरी मंत्र असावा असा तर्क आहे. मूळांत 'मंत्र' या शब्दांत अनुस्वार नाहीं.

संपादिला. स्वामी आपले गुरु. स्वामीस आपण आपले आभ्योदयार्थ[10] सूर्यप्रीत्यर्थ अनुष्ठान सांगितले. प्रतिवर्षी वर्शासन[11] द्यावयाची मोईने[12] आसे बिता[13]

वर्शासन

| | |
|---|---|
| नख्त होन पा[14] | गला नवसेरी[16] बारुले |
| १०० | मापे खंडी |
| वजन टकबंदी[15] | ४ तांदूळ |
| ०।४ तूप | ४ नागली |
| ०।४ तेल | —— |
| —— | ८ |
| ०॥१ | |

सूर्यप्रीत्यर्थ आनुस्ठान प्रतिवर्षी करावे त्यास सामग्री व पूजा.

| | |
|---|---|
| आरक्त वस्त्रे २ | वजन चंदन |
| आनुष्ठानसमई | ००५ सुंठ[17] |
| नेसावयास व आसन | ००५ आरकें[17] |
| १ पीतांबर | —— |
| १ शाल | |
| १ आसन | |
| —— | |
| ३ | |

येणेंप्रमाणें होन पा येकसे, व गला नवसेरी बारुले मापे खंडी आठ, वजन टकबंदी सवा आठरा मण आरक्त वस्त्रे दोनी,[18] पितांबर येक व शाल येक प्रमाणें वरशासनें[19] व पूजासामग्री मोईन दानपत्र करून दिल्हे आसे. स्वामीनी आमचे

---

१०. आभ्योदयार्थ = अभ्युदयार्थ. वर टीप ६ पाहा.

११. वर्शासन, वरशासन = वर्षासन. श, ष, स ह्यांचा भेद लिहिणारा फारसा करीत नाहीं.

१२. मोईन = वार्षिक नेमणूक.

१३. बिता = बितपशील.

१४. पा = पातशाही.

१५. टकबंदी = टंकबंदी = टांकांनी बांधलेले, टांकांनी केलेले, ७२ टांकांचा शेर हें माप धरून केलेले.

१६.

१७.

१८. दोनी = दान.

१९. वर टीप ११ पहा.

आभ्योदयार्थ सूर्यप्रीत्यर्थ प्रतिवरसी[२०] अनुष्ठान उत्तरोत्तर करावे व मंत्रउपदेशही स्वामीचे वंशपरंपरेनें आमचे वैशपरंपरेस[२१] करावा. आपण संकल्पपूर्वक प्रतिवरसी वरशासन दानपत्र करून स्वामीस दिल्हे. हे आपले वैशपरंपरेनें उत्तरोत्तर चालवावें. यास आन्यर्थी[२२] करू तरी श्री माहादेवै[२३] साक्ष. स्वामींनी निरंतर देवापांसी[२४] आमचे कल्याण इच्छावें. लेखनालंकारें. O§

२ O[२६]

स्वैस्ति श्री राज्याभिषेक शके ८ दुर्मतिनाम संवछरे कार्तिक सुध शस्टी रवि-

---

२०. प्रतिवरसी = प्रतिवर्षी.

२१. वैशपरंपरेनें = वौशपरंपरेनें = वंशपरंपरेनें. मोडी सनदेंत बालबोध 'वै' अक्षर घातलेलें आहे.

२२. आन्यथा = अन्यथा = फरक, फेर.

२३. माहादेव = महादेव-राजे यांचा कुलस्वामी, त्याची शपथ ही.

२४. एथें अनुस्वार 'सी' वर असावयाचा तो 'पा' वरच दिलेला आहे. असे अनुस्वार मागें पुढें दिलेले जुन्या लेखांत आढळतात. गाळलेले तर बहुत असतात.

२५. ही सनद शके १५७४, फाल्गुन मासी, म्हणजे सुमारें इ० स० १६५३ च्या मार्च महिन्यांत दिली. त्या वेळीं महाबळेश्वरचा डोंगर जावलीचे चंद्रराव मोरे यांच्या ताब्यांत होता. जावलीचें राज्य शके १५७७ म्हणजे इ. स. १६५५ मध्यें शिवाजींनें घेतलें. शिवाजीचे प्रथम गुरु गोपाळभट महाबळेश्वरकर हे होत, हें ह्या सनदेवरून सिद्ध होतें. आणि माते जिजाबाईचे आपल्या मुलाच्या अभ्युदयार्थ यत्न करेस चालू होते हेंही ह्या सनदेवरून दिसून येतें.


ही सनद व इतर राजपत्र गृह दग्ध झालें तेव्हां नष्ट झालीं म्हणून श्रीशाहूमहाराज यांच्या सनदेंत गोपाळभटजीचे नातू शामभट यांनीं विदित केल्याचें लिहिलें आहे (भा. इ. सं. मंडळ अहवाल शके १८३२) त्याजविषयीं शोध करतां, आगीच्या धांदलींत कागद गहाळ झाले ते बहुधा दग्ध झालें असें वाटून शामभटजींनीं तसें निवेदन केलें असावें आणि मागाहून तीं पत्रें सांपडलीं असावीं, असें वे० मोर दीक्षित यांचें म्हणणें आहे तें सयुक्तिक दिसतें.

§ हा शिक्काही स्पष्ट नाहीं. पण "मर्यादेयं राजते" किंवा "मर्यादेयं विजयते" असे शब्द त्यांत कोरलेले असावेत.

२६. 'श्री' कार फाटून नाहींसा झाला आहे.

२७. ही सनदही वेदमूर्ती मोर दीक्षित महाबळेश्वरकर यांजकडूनच मिळाली. पहिले शिवाजीराजे यांची सनद शके १५७४ मधील, ही दुसरी बहुतेक त्याच अर्थाची संभाजी राजे यांची राज्याभिषेक शके ८ म्हणजे शके १६०४ मधील, व गुंदस्त सालीं उपलब्ध झालेली शाहू राजे यांची राज्याभिषेक शके ३६ म्हणजे शके १६३२ मधील, अशा तीन सनदांची सांखळी जुळते. शिवाजी व संभाजी राजे यांचीं वर्षासनपत्रें दग्ध झालीं म्हणून शाहू राजे यांच्या सनदेंत मजकूर आहे; परंतु तीं पत्रें खरोखर दग्ध झालीं नव्हतीं. गहाळ झालेलीं होतीं. तीं मागाहून सांपडलीं, असें दिसतें.

षासरे क्षेत्रीयें[२८] कुलावतंश सिंहासनाधीस्वर श्री राजा शंभु छत्रपती स्वामीयांनी[२९] राजश्री कासी रंगनाथ देशाधिकारी व लेखक प्रांत जाउली यासी आज्ञा केली




‡ ऐसीजे; वेदमूर्ती रामभट बिन गोपालभट अग्नहोत्री माभलेस्वरकर यानी हुजूर येऊन विदित केले की

अपले[३०] पिते गोपालभट बिन श्रीधरभट याजपासून महाराज कैलासवासी[३१] यानी मंत्रउपदेश[३२] घेऊन आपल्या अभ्योदयाकार्णे[३३] सूर्येप्रीत्यर्थ अनुस्ठान सांगितले त्यास वर्षासन दानपत्र मोईन करून आमचे पिते यासि दिल्ही. तेणेप्रमाणे चालत अले अहे. सांप्रत महाराजे[३४] चालविले पाहिजे, म्हणऊन विदित केले. तेणेप्रमाणे दानपत्र दाखविले व सुभाचे पत्र दाखविले. त्यास असल पत्रामधे लिहिले कीं, स्वामी भले थोर अनुस्ठाते सूर्येउपासनी पद्महस्ती ऐसे जाणोन अम्ही स्वामीपासून मंत्रउपदेश संपादिला. त्यावरून आपल्या अभ्योदयार्थ सूर्येप्रीत्यर्थ अनुस्ठान सांगितले त्यास वर्षासन प्रतिवरुसी यावयाची मोईन केली असे. बीता[३५]

---

२८. 'क्षत्रियकुलावतंस', 'सिंहासनाधीश्वर' इत्यादि पदव्या शिवाजी राजे यांच्या वरील सनदेंत नाहींत तें योग्यच; कारण ती सनद, राज्याभिषेक शके १५९६ ह्या वर्षी झाला, त्या पूर्वीची आहे. वरी ऽ पदव्या राज्याभिषेक समयीं शिवाजी महाराजांनीं घेतल्या, 'छत्रपती'ही तेव्हांपासूनच ते आपणांस ह्मणवूं लागले.

२९. प्रत्ययादिकांचे अनुस्वार बहुधा गाळलेले आहेत.

‡ हा बदामी आकाराचा किंवा नेत्राच्या आकाराचा शिक्का निळो मोरेश्वर पिंगळे पेशवे यांचा. शंभुराजाचा शिक्का या सनदेवर नाहीं. शाहूराजे यांच्या सनदेवरही खुद्द त्यांचा शिक्का नाहीं. यावरून राजाचा शिक्का राजपत्रावर न घालतां फक्त प्रधानांचा असला ह्मणजे पुरे, असें दिसतें. 'मर्यादेयं विराजते' असा शेवटीं शिक्का असतो तो अर्थात् राजाचा.

३०. ह्या सनदेंत 'अ' आणि 'आ' ह्यांबद्दल सर्वत्र 'अ' हेंच अक्षर वापरलें आहे. पहिल्या सनदेंत सर्वत्र 'आ' आहे.

३१. ह्मणजे शिवाजीमहाराज.

३२. 'मंत्र' याजमधीलही अनुस्वार गाळलेला आहे!

३३. कार्णे=कारणें.

३४. महाराजे=महाराजानें, महाराजांनीं.

३५. 'बितपशील' यांतील 'बी' पुढेंही दोन काने दिलेले आहेत. 'बी' पुढं दोन काने दिल्यावर मग 'तपशील' लिहिण्याचें कारण नव्हतें.

वर्षासन

| | |
|---|---|
| होन पातशाही शंभर | गला नवसेर चारुले |
| वजन टांा | मापे खंडी |
| ०।४ तूप | ४ तांदूळ |
| ०।४ तेल | ४ नागली |
| ---- | ---- |
| ०॥।३ | ८ |

सूर्येप्रीत्यर्थ अनुस्ठान प्रतिवरुसी यास सामोग्री व पूजा.

| | |
|---|---|
| अरक्त वश्रे[36] | वजन टांा |
| अनुस्ठान समई | चंदन |
| नेसावयास व असन | ००५ शुभ्र चंदन |
| १ पितांबर | ००५ अरक्त चंदन |
| १ शाल | ---- |
| १ असन | ०।० |
| ---- | |
| ३ | |

येणे होन पा येकसे व गला नवसेर चारुले मापे खंडी अठ व वजन सवा अठरा मण व अरक्त वश्रे दोनी व पितांबर येक व शाल येक व असन येक येणे-प्रमाणे दानपत्र करोन दिल्हे. स्वामींनी अमचे अभ्योदयार्थ सूर्येप्रीत्यर्थ अनुस्ठान प्रतिवरुसी करावे व मंत्रउपदेशही स्वामीचे वौषपरंपरेने अमचे वौषपरंपरेस करावा. अपण संकल्पपूर्वक वर्षासन दानपत्र प्रतिवरुसी करून दिल्हे असे. अपले वौषपरंपरेने स्वामीचे वौषपरंपरेस उत्तरोत्तर चालवावे. याति अन्नथाँ[37] करूँन[38] तर श्री माहादेव साक्ष. स्वामींनी निरंतर देवापासीं आमचे कल्याण इछावे. ऐसे दानपत्र महाराज अबासाहेबँ[39] कैलासवासी स्वामींनी भट गोसावी यास करून दिल्हे ते मनास आणून, व सुभाचें पत्र मनास आणून, त्यावरून राजश्री अबासाहेबाचे संकल्पित आहे ते चालवावे हे अम्हास अगत्य जागोन, हाली वेदमूर्ती रामभट बिन गोपालभट

३६. वश्रे = वस्त्र.

३७. अन्नथा = अन्यथा, दुसरा प्रकार.

३८. करून = करूं. 'ऊं' कारांत प्रथमपुरुषी क्रियापदाच्या आणि 'ऊं' कारांत निमित्त वाचकाच्या ऐवजीं 'ऊन' प्रत्ययान्त शब्द जुन्या लेखांत पुष्कळदां आढळतो. तें बहुधा 'ऊं' मधील अनुस्वाराच्या उच्चारासाठीं असावें; नाहीं तर 'करूं' आणि 'करू' (करा) ह्यांचा घोंटाळा व्हावयाचा.

३९. शिवाजीमहाराजांस 'आबासाहेब' असें म्हणत असत. आबा = बाप.

यास वर्षासन सदरहू प्रा सनद करून दिल्ही असे. पूर्वी नख्त होन पा। १०० येकसे हुजूर पोतांपैकीं[40] पावत होते व वरकड जिनस सुभां पावत होता त्यास हुजूर. ऐवज न पावे म्हणवून नख्तें[41] व जिनस सदरहूप्रमाणे सुभे मजकुरावरी देविले असे तेणेप्रमाणे भट गोसावी यास साल दरसाल पावीत जाणे. ताज्या पत्राचा उजूर न कर्णे.[42] तालीक[43] लेहून घेऊन असल पत्र भोगवटियास परतोन भट गोसावी यापासीं देणें. * * * *

मर्यादेयं
विजयते

# ८० थोरले माधवरावांची नऊ कलमी यादी

( रा. सं. चि. मेहेंदळे )

माधवरावसाहेब यांचा कर्नाटकांतील स्वारीपासून च राजयक्ष्मा रोग बळावयास लागला होता. यामुळें ती स्वारी अर्धवट सोडून ते पुण्याकडे परत फिरले. बरे होण्याची आशा सुटली व परमेश्वरसाधनासाठीं मौजे थेऊर येथें शके १६९४ त आषाढमासीं जाऊन राहिले. तेथें मुक्काम असतां छ. ३० जमादिलाखर (आश्वीन शु. २ शके १६९४ सोमवार) या दिवशीं ही यादी कारभारी, मुत्सद्दी व सरदार यांच्या खातरजमेनें पुरी करून घेऊन कारभारांतील लढे, वाडवडिलांनीं दिलेलीं अभिवचनें पुरी करणें, वगैरे बाबतींत श्रीमंत निश्चित झाले. सदर यादीची अस्सल प्रत उपलब्ध झाल्यास मुत्सद्यांपैकीं कोणी कोणी हमी घेतली हें कळून येईल.

---

४०. हुजूर पोतांपैकीं = खुद्द महाराजांच्या द्रव्यभांडारांतून.

४१. नख्त होन पूर्वी महाराजांच्या द्रव्यभांडारांतुन मिळत असत ते संभाजीनें सुभ्यावर टाकिले. "हुजूर ऐवज न पावे" असें कां झालें कोण जाणें! सुभ्याहूनही गांवांवर या नख्त ऐवजाची वांटणी झाली व ती तशीच पुढें चालत होती असें समजतें. हल्लीं वर्षासनाची रकम सुभ्याकडून मिळते ती वाईच्या मामलेदाराकडून.

४२. न कर्णे = न करणें.

४३. तालीक = नकल.

* * * * हीं अक्षरें स्पष्ट नाहींत. पण तीं 'लेखनालंकार' अशीं असावीं.

नानाफडणीस, हरिपंत फडके व कोट्यधीश परांजपे वगैरे हमीदार राहिल्याचें बखरीतून नमूद आहे.

२ रा. बळवंतराय कल्याणराय ठाकूर यांनीं 'थोरले माधवराव पेशवे यांची हकीगत' या आपल्या इंग्रजी निबंधांत, पान ६५ वर Briggs च्या पुस्तकाच्या आधारें पेशवे यांनीं ता. ३० ऑगष्ट १७७२ रोजीं मृत्युपत्र केल्याचा उल्लेख केला आहे. या तारखेशीं यादींतील तारखेचा मेळ नाहीं.

३ या यादीची नक्कल कै. हडपसरकर यांचे संग्रहांतून असलेले नकलेवरून माझे कारकून कै. गोरे यांनीं मिळविली होती.

नक्कल श्रीगणपतीची .

यादी सुासलास सबेन मया अ ऌफ

१ दौलतीस कर्ज आहे ते वारावयाचे त्यास गुरुजीजवळ ऐवज आहे तो घेऊन नुर्त निवळ कर्ज असेल त्यास द्यावा व दुसरा ऐवज दौलतेसंबंधी मसलत न करितां आधीं कर्ज वारावे मग दौलतसंबंधी जसे करणे तसे करावे [ कर्ज वारण्याविसी (चित्ता)पासून जलद्री करून वारूं कदाचित् जरूरीची मसलत पडल्यास करावी लागेल शपतपूर्वक लिा प्रों करूं दौलतसंबंधीं ऐवजानें कर्ज वारून गुरुजीकडील ऐवजामाफक कर्ज राहील तेव्हां ऐवज घेऊन रोकडीचें कर्ज वारूं ]

१ कोकणांत देशांत इजारे जाहाल्यामुळें रयतास सुख नाही त्यास बारकाईनें मनास आणून थोरलांचे रीतीनें जलेल जाहाले असेल ते नीट करून प्रजापालण करावे

१ श्री कासी प्रयाग ही दोन्ही स्थळे सरकारांत यावी असा तीर्थरूपांचा हेत होतां त्यास प्रस्तुत करावयाजोगे दिवस आहेत दाहावीस लक्षाची जाहागीर मुबदला पडली तर देऊन दोनी स्थळे हस्तगत करावीं प्रयत्न करावा

१ तीर्थरूप मातुश्री बाईसाहेबांचा हेत कासीस जावयाचा आहे त्यास सुपथा पडल्यावर यात्रा घडवावी

१ तीर्थरूप भाऊसाहेबांची क्रिया माघमासी जरूर करावी काकूबाई जाऊन या राहूत उत्तमप्रकारें क्रिया करावी

१ कासीचे ब्राह्मणांस वर्षासनें आहेत तीं पि (दि?) ढी करून देऊन वरशास पावती करीत जावी

१ कासीस दोन लक्ष ब्राह्मणभोजन करावे दक्षणा दोन पैसे प्रो द्यावी *

१ तीर्थस्वरूप दादासाहेबांस पांच लक्षाची जहागीर निवळ लावून द्यावी याहून थोडेबहूत अधिक मागितल्यास त्यांचा संतोष राखून मर्जी प्रसंन राखावी [ निदान सात लक्षाची जाहागीर देऊन मर्जी राखू अधिक कांहीं मागूं लागलियासी ऐकूं नये ]

१ श्रावण मासाचा धर्मादाव पूर्वीपासून चालत आला आहे त्यास यावत् दौलत चालवावा पांच लक्षांची दौलत राही तावत् कालपर्यंत चालवावा यासी अनमान करूं नये

---

९

[ नऊ कलमे सदरहू लिहिले अन्वये शपतपूर्वक करू ]

छ. ३० जाखर सलासबैन मया अलफ मुा थेऊर

## ८१ कांहीं शब्दांची व्युत्पत्ति

( रा. वि. का. राजवाडे )

( १ ) अग

अ ( निपात ) = ( अकच्क ) अक = अग

( २ ) अगग

अंगक ( अकच्क अंग ) = अगग

( ३ ) अगडबंब

अगदः च असौ बंबः च = अगदबंबः = अगडबंब, निरोगी लठ्ठ

( ४ ) अगा ( स्मरणे )

आ ( स्मरणे ) = (अकच्क) अका = अगा !

( ५ ) अगे

ए ( निपात ) = ( अकच्क ) अके = अगे

( ६ ) अगो

ओ (निपात) = ( अकच्क ) अको = अगो

---

* पेशव्यांच्या घराण्याचा उत्कर्ष व्हावा म्हणून नारायण दीक्षित पाटणकर यांनीं अनुष्ठान केलें. तदंगभूत एक लक्ष ब्राह्मणभोजन व एक कोटी दुर्वादल समर्पण प्रतिवर्षी करण्याचें व्रत थोरले बाजीराव यांचे वेळेपासून पेशवे यांनीं पत्करल्याचें प्रसिद्ध आहे. यास अनुलक्षून हें कलम घातलें असावें.

( ७ ) अचाट ( फार, अतिशय )

अत्यर्थ = अच्चट्ट = आचाट = अचाट. अचाट पाणी पितो = अत्यर्थं पयः पिबति

( ८ ) अजंभट

अत्यम = अज्जम=अजम्

अजम्+भट = अजंभट

( ९ ) अठी–अठळी ( गऱ्याची )

अष्ठि = अट्ठि = अठी

अष्ठिलिका = अट्ठिलिआ = अठळी

( १० ) अत्या

अंतिका = आंतिआ = आंत्या = अत्या. अंतिका म्हणजे वडील बहीण. अत्या हा शब्द वडील बहिणीला मराठींत लावतात.

( ११ ) अदळणें

अद् ( खाणें ) + ल ( स्वार्थक )= अदळ.

( १२ ) अदळणें म्हणजे खाणें.

भाकऱ्या अदळ म्हणजे भाकऱ्या खा

कुत्सितार्थक

( १३ ) अरब

वाजिवाहार्वगंधर्वहयसैंधवसप्तयः (अमर–द्वितीयकांड-क्षत्रियवर्ग ४५ ) येथें अर्वन् शब्द घोडा या अर्थी आलेला आहे. क्षीरस्वामी अर्वति याति इति अर्वा अशी व्युत्पत्ति करतो. व्युत्पत्ति हटानें वाटेल तशी होते. माझ्या मतें अर्वन् शब्द देशवाचक आहे. ज्यांना सध्यां अरब म्हणतात त्यांचें मूळ नांव अर्वन् व त्यांच्या देशाचें हि नांव अर्वन्. अर्व देशांतील घोडा तो अर्वन्. हा देश वाचक अर्व शब्द ऋग्वेदांत येतो.

( १४ ) अरेहल्या

आर्यहलं (बलात्कारे निपातः)=अरेहल्या. पाणिनीच्या वेळेपासून हा निपात बैलांना हांकतांना करीत आले आहेत.

( १५ ) अल्लाद्

आरात् ( जवळ, संनिकृष्ट ) = आलाद् = अल्लाद्. त्यानें चेंडू अल्लाद् झेलला = तेन चिंधुकः आरात् सेलितः

( १६ ) अवा ( स्त्री )

अवावा ( ब्राह्मण स्त्री ) = अवा

अवावा ब्राह्मणी

( १७ ) अवाच्या सवा

सपाद् = सवाअ = सवा

अपाद् = अवाअ = अवा

स्यः = त्यः = च्या

अपादः स्यः सपादः = अवा च्या सवा

पाव नसलेला सवा = पावाखेरीज सवा = म्हणजे अशक्य; एकावर पाव असल्याखेरीज सवा होत नाहीं. सबब, कोणी मनुष्य कांहीं अशक्य कोटींतील गोष्ट बोलूं लागला म्हणजे पावाखेरीज सवा करूं जाणाऱ्याच्या कोटींत त्याची गणना करण्याचा प्रघात महाराष्ट्रांत आहे.

( १८ ) अव्हेरणें

अवधीरणं = अवहीरणँ = अव्हेरणें

( १९ ) अस्वल ( पशुविशेष )

ऋक्ष + ल ( स्वार्थक ) = अक्षल = अस्वल

क्ष = ख    ऋ = अ

( २० ) अळशी

अतसी = अडशी = अळसी

( २१ ) आउक्षवन्त

आयुष्मान् = आउक्षवन्त

( २२ ) आगखाडा (आगीचा खड्डा)

अग्निखदा = अग्गिखडा = आगखाडा = आखाडा; कारंडव्यूह

( २३ ) आगस्ता

आगस्तिकः = आगस्ता

( २४ ) आचँवणें

आचमनं = आचँवणें

( २५ ) आचवणें

आच्यवनं = आचवणें

आचँवणें म्हणजे पाणी तोंडांत घेणें. आचवणें म्हणजे मुकणें. स प्राणान् आच्यवते = तो प्राणांस आचवतो म्हणजे मुकतो. स आचमते = तो आचँवतो ( पाण्यानें )

( २६ ) आचुक

आशकु (अकच्क ), = आचकु आचुक म्हणजे ताबडतोब

( २७ ) आडनीड

अर्धस्निग्ध = अड्ढनिड्ढ = आडनीड तो आडनीड वागतो = सः अर्धस्निग्धं वर्तते

( २८ ) आडुळसा ( वनस्पति )

आटरूषक = आडळूसअ = आडुळसा

( २९ ) आता !

तो आला नाहीं, आता ! आदह ( अव्यय प्रकरणम्, कुत्सने )

( ३० ) आतां

आतः इतोपीत्यर्थे ( तत्वबोधिनी ) आतां काय म्हणतोस = इतोपि किं भणसि, आतः किं भणसि

आतः = आता, आतां

अनुनासिक वैकल्पिक

( ३१ ) आदळणे ( हापटणें )

आदल् ( हापटणें ) = आदळ

( ३२ ) आधमणी ( माप, वजन )

अर्धमानिका = आधमणी ( स्त्री )

( ३३ ) आपटशील–त्रिपटशील

आपत्विपत् = आपटविपट

( ३४) आपसुक–का ( शीघ्र. निपात )

अमू शुकं (अमू शैघ्रये, शुकं शैघ्रये ) = आमसुक = आपसुक. आपसुक म्हणजे अतिशीघ्र. आपसुक या सर्वनामाहून निराळा.

( ३५ ) आपरूप ( विलक्षण )

आपर्तुक ( अप + ऋतु = अपर्तु ) =आपरुक = आपरूप

क–स्थाने अज्ञानेन पः

हें फळ ह्या दिवसांत आपरूप आहे म्हणजे आपर्तुक आहे.

( ३६ ) आंबटवेल

अंबष्टवल्ली = आंबटवेल

( ३७ ) आरण

आरण्यक = आरण. आरण्यक

म्हणून जो वेदाचा भाग आहे त्याला भिक्षुक प्राकृतांत आरण म्हणतात,

( ३८ ) आरत ( अशिष्ट )

आर्ति = आरत

पुरा संवत्सरादार्त्तिमारुष्यसि । गोपथ-ब्राह्मण, प्रथम प्रपाठक ॥ ३१ ॥

( ३९ ) आरबट ( माणूस )

आरभट ( हिंम्येबाज ) = (लक्षणेनें) आरबट ( आरंभशूर )

( ४० ) आन्ये !

शाकटायनस्तु आर्य इति प्रतिबंधे ( अष्टाध्यायी–तत्वबोधिनी–अव्ययप्रकरणम् ) आन्ये, अन्ये, हे निपात मराठींत प्रतिबंधार्थक आहे, अन्ये ! अथवा अरे ! गप्प बैस. किंवा नुसतें अन्ये ! आन्ये !

( ४१ ) आवंतणें

आमंत्रणं = आवंतणें

(४२) आलाडपालाड अल्याडपल्याड

आरात्तात् परात्तात् = आलाडपालाड, अल्याडपल्याड जवळून आणि दुरून

( ४३ ) आळसबिळस

आलसविलस = आळसबिळस

( ४४ ) आळा

अलं = आळा, अलकम् (साकच्)= आळा, आळा म्हणजे पुरे, मर्यादा

( ४५ ) आळा

अलं ( enough, पुरे ) = आळा ( पुल्लिंग ). आळा घालणें = पुरें म्हणून थांबवणें

( ४६ ) आळें ( किड्यांचें )

आलं = आळें, आलं म्हणजे कृमी व कीटक यांच्या अंड्यांचा समुदाय

( ४७ ) आक्राळविक्राळ

आकरालविकराल = अक्राळविक्राळ= (कराल म्हणजे वांकडें,) वांकडीतिकडी

( ४८ ) आस्रा ( घराचा )

अश्रि ( घराचा कोपरा ) = आस्री = आस्रा, घराच्या आस्र्याला म्हणजे घराच्या कोपऱ्याला

( ४९ ) आस्वल

अच्छभल्ल = अस्सभ्हल = आसवल=आस्वल, (ऋक्षाच्छभल्लभालूकाः।) अमर ।

( ५० ) इतिश्री

विश्रि ( मृत्यु ) = इश्री = इतिश्री इतिश्री (म्हणजे समाप्ति) या शब्दाच्या धर्तीवर ति मध्यें घुसडली. विश्रिपासून निघालेली इतिश्री म्हणजे मृत्यू

इति + श्री म्हणजे समाप्ति

( ५१ ) इत्सा

आदित्सा ( घेण्याची इछा ) = आइत्सा = इत्सा. वस्तूची इत्सा = वस्तु मिळविण्याची इच्छा. इत्सा आणि इछा हे मराठींत दोन भिन्न शब्द आहेत.

( ५२ ) इराण

इरिणं ऊषरं ।' इराणांत ऊषर म्हणजे ओसाड रानें अतिशय, सबब आर्यांनी त्या प्रांताला इरिण म्हटलें;–तें च नांव अद्याप चालूं आहे.

### ( ५३ ) इश्शेरें

विस्रं = इश्शरँ = इश्शेरें

विस्रं आमगंधिः ( अमर ) = दुर्गंध, वाईट, मलिन, दुष्ट. इश्शेरें भांडें म्हणजे मलिन भांडें. इश्शेरे माणूस म्हणजे मलिन माणूस.

इश्शेरे बायको म्हणजे मलिन बायको तात्पर्य, इश्शेरें हा शब्द मराठींत एकारान्त आहे.

### ( ५४ ) इसव

विसर्प = इसव ( गर्दे–वाग्भट )
= विसाप

### ( ५५ ) उकिडव (वा–वी–वें)

उत्कटक = उक्कडअ = उकडव = उकिडव ( वा–वी–वें ). नासीतोत्कटकस्थितः । वाग्भट–अष्टांगहृदय – सूत्रस्थान–द्वितीयाध्याय श्लोक ३६.

उत्कटिक = उक्कडिअ = उकिडव डवरील इ क वर नेली.

### ( ५६ ) उगमणें–उमगणें

अवगमनं = उगमणें, उमगणें (वर्णविपर्यय )

### ( ५७ ) उगांच

उकत्र् + च = उगांच

उकत्र् (अप्रयोजने निपातः )

### ( ५८ ) उचलणें

उच्छ्रयणं = उचलणं = उचलणें

### ( ५९ ) उंटाड

उष्ट्राढ्यः = उंटाड

गृध्राढ्यः = गिधाड

महिषाढ्यः = म्हैसाड

बष्काढ्या = भाकाढ ( विऊन फार महिने झालेली )

व्याघ्राढ्यः = वाघाड

येथें आड प्रत्यय संस्कृत आढ्य पासून निघाला आहे.

स्थूराढ्य = थोराड

इ. इ. इ.

### ( ६० ) उठाणू

उथास्नु = उठाणू.

वर येणारें गळूं वगैरे

### ( ६१ ) उडत ( ता–ती–तें )

उद्यत् = उडअत = उडत.

उडतें ऊन म्हणजे उद्यत् सूर्योष्णं

### ( ६२ ) उतराणी

उत्तमारणिका = उत्तराणी

### ( ६३ ) उताणसा ( सा–सी–सें )

उत्तानशयः = उताणसा.

तो उताणसा निजतो = स उत्तानशयः शेते

### ( ६४ ) उतर वयांत

उत्तरे वयसि = उतर वयांत

उत्तराति वयसि = उतार वयांत

उत्तरे वयसि = उत्तर विशींत

### ( ६५ ) उदेल ( ला–ली–लें )

( वद् ) उदित + ल = उदिअल = उदेल ( ला–ली–लें ). अशी वाचा उदेली = ईदृशा वाक् उदिता ( उदेली म्हणजे बोलिली गेली ) ( वद् ) वद् + ल = वदल ( ला–ली–लें ).

( ६६ ) उंबरा

उंबरक ( दाराच्या वरची फळी ) = उंबरा

( ६७ ) उशीर

उच्चिरं ( अतिशय कालातिपात ) = उशीर

( ६८ ) एकदम्

एकपदम्=एकदम् (अकस्मात्) (तत्व-बोधिनी ) तो एकदम आला म्हणजे अकस्मात् आला

( ६९ ) एकोपा

एकात्मता = एकाप्पआ = एकाग = एकोपा

( ७० ) ऐशी

तो आला म्हणजे त्याची ऐशी पूजा करतो = यदा स आयास्यति तदा तस्य अतिथ्यीं पूजां करिष्ये. श्यानं अति अतिथ्यी = कुत्याहून हि जास्त. ऐशी ह्या शब्दाचा ईदृशी या शब्दाशीं येथें कांहीं एक संबंध नाहीं.

( ७१ ) ऐंसा

अंजसा ( शीघ्रे ) = अंयसा = ऐंसा तो ऐंसा पळाला = सः अंजसा पलायितः

( ७२ ) ओकणें

आवचू = आऊक = ओक. आवचनं ओकणें ( बोलणें )

( ७३ ) ओकळ ( ला-ली-लें )

उक्त ( वच् निष्ठा + ल ( स्वार्थक ) = उक्त + ल = ओकल ( ला·ली·लें ) ओकला म्हणजे बोलला. तो काय काय ओकला ? म्हणजे तो काय काय बोलला ?

( ७४ ) ओच्या ( निपात )

आहोस्वित् = होचिअ = होच्या = ओच्या

(७५) ओटी (बायकांची किंवा गोईची)

उधस् = ओढी = ओटी

( ७६ ) ओढ, ओढणी

उदन्या ( तृष्णा ) = उडण्णा = ओढणी=ओढ, पाण्याची ओढ लागली आहे, येथें ओढ शब्द उदन्या शब्दापासून निघालेला आहे.

( ७७ ) ओढगस्त

उपधाग्रस्त = ओढगस्त. उपधा म्हणजे खोटेपणा. त्यानें ग्रस्त जो तो

( ७८ ) ओढल

आकृष्ट = आउड्ढ=ओढ. ओढ + ल ( स्वार्थक ) = ओढल ( ला-ली-लें ) आवह धातूपासून हि ओढळ शब्द निघतो, परंतु त्याचा अर्थ निराळा.

( ७९ ) ओढा ( औषधाचा )

उपधा ( वर ठेवणें ) ओढा

( ८० ) ओढावणें

उपधावन = ओढावणें, ओढावणें म्हणजे जवळ येणे

( ८१ ) ओणवणें

उपनमन = ओणवणें

( ८२ ) ओंवण

उल्ब = ओल्ब = ओंवण, उल्बण असा शब्द असावा. घराचें जें पांघरूण तें उल्ब. पोटांतील गर्भाचें जें वेष्टण तें उल्ब. गवताचें ओंवण म्हणजे गवताचें पांघरूण घराकरितां.

( ८३ ) ओंबी

उम्बी = ओंबी ( गव्हाचें कणीस, गवताचें कणीस )

( ८४ ) ओभड

उद्बद्ध = उब्बड = ओबड = ओभड प्रोद्बद्ध = फार ओभड. उद्बद्ध म्हणजे लठ्ठ, बेसुमार आकाराच्या. वाग्भट–अष्टांगहृदय–अध्याय ३–श्लोक ८९

( ८५ ) ओवा

यवानः = ओवा

( ८६ ) ओवा

उपाय = उवाअ = ओवा. ओव्यानें रोग जातो आहे तेथें मंत्र कशाला ? असा प्रयोग मराठींत हरहमेष करितात. येथें ओव्यानें म्हणजे औषधोपायानें. ओवा नामक तिक्त वनस्पतिबीजाचा येथें कांहीं संबंध नाहीं.

( ८७ ) ओळख ( आठवण )

उल्लेख = ओलेख = ओळख
वस्तुतः पूर्वगोष्टीची आठवण या अर्थी ओ-ळख असा मूळ शब्द. परंतु अवलक्ष म्हणजे पहाणें या अर्थी जो ओळख शब्द आहे त्याच्यासारखा च ह्या ओलेख शब्दाचा उच्चार मराठींत सध्यां झालेला दिसतो. त्यानें सूर्य, गुरु, बुध हे तारे ओळखले म्हणजे चांगले स्पष्ट पाहिले.

( ८८ ) ओळें

अशुक्ल = असुकल = अहुअल = अउअळ = ओअळ, ओवळ, ओळ ( ळा–ळी–ळें) अशुक्ल वस्त्र म्हणजे ओळें वस्त्र. मी इतक्या दिवस ह्या शब्दाचें व्युत्पन्न नानाप्रकारें करून पाहिले. परंतु खरी व्युत्पत्ति सांपडावयाला हा काल लागला.

( ८९ ) ओस (निर्जन)

अ + उषित = ओसिअ = ओस
अवस = ओस

( ९० ) औट

अर्धचतुर्थ = अर्ध च तत् चतुर्थ च एक, दोन, तीन असे पदार्थ मोजून चवथा पदार्थ जो होता तो अर्धा होता. तेव्हां अर्धचतुर्थ म्हणजे तीन आणि चवथा जो अर्धा तो. म्हणजे औट. अर्धचतुर्थ = अद्धुट्ट = अउट्ट = औट अर्धचतुर्थी मात्रा ( गोपथब्राह्मण–पूर्व–प्रथम प्रपाठक ) = औटावी मात्रा, साडेतीन मात्रा

( ९१ ) अंतर

अंतराय=अंतरा=अंतर. सासू सुनेला अंतर करीत नाहीं = श्वश्रूः स्नषायै अंतरायं न करोति. अंतर म्हणजे प्रतिबंध, अडथळा, इजा. सा तव जीविता-न्तरायं करिष्यति = ती तुझ्या जीवाला अंतर करील. (कारंडव्यूह अश्वराजवर्णनम्)

( ९२ ) अंमळ

अम्नर् (अल्पार्थे निपातः) = अम्मल = अंमळ

( ९३ ) कचमणें

कश्मलं प्रबलो मोहः ॥ कश्मल = कसमल = कचमण. मरणाऱ्याचा जीव कचमतो म्हणजे प्रबळ मोह पावतो.

( ९४ ) कट्टा ( पक्का )

कटखादक = कट्टा खादाड. कट म्हणजे अति, पुष्कळ ( उत्कट )

( ९५ ) कडदूर-कडदोर-कडदोरा

कटित्र = कडतर = कडदूर-दोर-दोरा. कटित्र म्हणजे कटीचें रक्षण करणारी वस्तु.

( ९६ ) कढी

क्वथिका = कढिआ = कढी

( ९७ ) कपळा (दांताचा)

कपालः = कपळा. शातयत्यणुशो दंतात्कपालानि कपालिका. वाग्भट-उत्तरस्थान-अध्याय २१

( ९८ ) कमावणें

कामय् = कामव = कमाव. कमावणें म्हणजे मिळविणें, पाहिजे असणें, हवें असणें. आयुः कामयमानेन = आयुष्य कमाविणाऱ्यानें. द्रव्यं कामयमानेन उद्योगः कर्तव्यः = द्रव्य कमावणाऱ्यानें उद्योग करावा.

( ९९ ) करटी, करोटी, करवंटी

करोटि = करोटी, करटी, करवंटी. नारळाची, डोक्याची वाटी, पात्रविशेष.

( १०० ) करडणें

क्रथनं = करडणें

( १०१ ) करणें

कल = कर.

कलयति धरित्रीं तृणसमां = पृथ्वीला तृणवत् करतो.

तो मला तुछ करतो = स मां तुछं कलयति

तो मला मूर्ख करतो = स मां मूर्खं कलयति

( १०२ ) करतोबिरतो

कुरुते विकुरुते = करतो बिरतो. विरु = विकर = विअर = बिर. इ. इ. बिरतो हा कांहीं तरी जोड शब्द नाहीं. करतोबिरतो म्हणजे बरें करतो वाईट करतो.

( १०३ ) करमर

करमर्दिका = करमर. (कैयदेव पथ्यापथ्यविबोध )

( १०४ ) करोल

क्रूर = करूर = करोर = करोल. करोल म्हणजे क्रूरकर्मा, साहसी. त्याचा कोठा करोठ आहे, पांच शेर दूध पचवितो = तस्य कोष्ठः क्रूरः, पंच पलान् पयसः पाचयति ।

( १०५ ) कलथणें, कलंडणें, कलडणें

कुथ ( उलटें फिरविणें ) = कलथ. कुथनं = कलथणें, कलथनें, कलंडणें, कलडणें.

( १०६ ) कवचा

कवचक = कवचा. कवचा म्हणजे बाहेरील पातळ तुकडा

( १०७ ) कळप

कलापः = कळप. कळप म्हणजे समूह

( १०८ ) कळमळणें, कळमणें

क्रुम् = कळम. क्रुमनं = कळमणें. क्रुम् + म्लै = कळमळणें. अहं क्राम्यामि + म्लामि = मी कळमळतो. मला कळमळतें = मया क्रुम्यते म्लायते

( १०९ ) कळमळ

क्रामम्लानि = कळमळ ( स्त्री )

( ११० ) कळवळणें

क्रुवनं = कळवळणें. दुसरा ळ आगंतुक

( १११ ) कागदी

वाईट रोग तो कागदः। कागदः यस्य अस्तीति कागदी. कागदी जवान् म्हणजे कागदी युवा

( ११२ ) काढणें

कृष् = काढ. पुरा संवत्सराद् आर्त्तीं आकृष्यासि = पुरें वर्ष दुःख काढशील. मीं वर्षभर ताप काढला, वगैरे वाक्यांतील, दुःख काढणें, ताप काढणें, हा संप्रदाय वैदिक कालापासून आहे.

( ११३ ) काढणें ( तुझें )

क्राथनं = काढणें. थांब, तुझें काढतों = त्वभ्यस्त, तव क्राथयामि. संस्कृतांत पष्ठि, सबच मराठींत षष्ठि.

( ११४ ) कानकुडें

कर्णकुंडलं = कण्णकुडुल = कानकुडें.

( ११५ ) कामकरी

कर्मकरः = कामकरी. भृत्याजीवः

( ११६ ) कामगार

कर्मकारः = कामगार. विना भृतिं कर्मसंपादकः ( क्षीरस्वामी-अमर )

( ११७ ) कामसू

कर्मशूर = कामसूअ = कामसू
र = अ
काम करण्यांत पटाईत

( ११८ ) कामाटी

कर्मयष्टि = कामाटी (लेखनकामाटी-एकनाथ )

( ११९ ) कारट ( टा-टी-टें )

कृतकः एव कार्तकः
कार्तकः = कारटअ = कारटा
कार्तकी = कारटी
कार्तकं = कारटें
मानीव पुत्र तो कृतक-निंदार्थी मराठींत कारटा

( १२० ) कारभार

कार्यभारः = कारभार

कारबार ह्या फारशी शब्दाशीं कांहीं एक संबंध नाहीं-स्वतः कारबार हा शब्द संस्कृत कार्यभार ह्या शब्दापासून निघालेला आहे. कारभार हा शब्द नामयाच्या जनीच्या अभंगांत येतो

( १२१ ) कारवाई-कारवई

कार्मता = कार्वई = कार्वाई.
कार्मः कर्मशीलः ( अमर )

( १२२ ) कालथा

क्रथकः = कालथा

( १२३ ) काळुसलेलें

कलुषायितं = काळुसलेलें (स्वार्थे ल) काळुसलेलें म्हणजे गढूळ

( १२४ ) काळें कुट्ट

कालं कृष्णं = काळें कुट्ट. कृष्ण = कुष्ठ = कुट्ट. जसें, विष्णु = विठ्ठु

( १२५ ) काळेंनिळें

कालनील ( अमर ) = काळेंनिळें

( १२६ ) काळेंभोर

कालं बहुलं = काळेंभोर. बहुल ( कृष्ण ) = भउर = भोर. भोर म्हणजे काळें. र = ल.

कपिल=कबिर; किल-कीर (ज्ञानेश्वर-अव्यय) या दोन ठिकाणीं लचा र होतो.

( १२७ ) कां होई नां

कामं भवतु नाम

कामं = कां

नाम = नां

( १२८ ) काळेंसांवळें

कालश्यामल (अमर) = काळेंसांवळें

( १२९ ) कांदा ( अकलेचा )

कंद = काँदा. कंद म्हणजे गड्डा

( १३० ) किडाळ

कीट = किडाळ ( आळ, प्रत्यय )

( १३१ ) किंवणा

कृपणः = किंवणा

( १३२ ) किरीम

कृमि = किरीम

( १३३ ) किसोरी

कृशोदरी = किसोअरी = किसोरी पानळपोटी (स्त्री )

( १३४ ) किळस

किलास = किळस ( त्वग्रोग )

( १३५ ) कुट्टण कुट्टूण, कुट्टून

कृत्स्न = कुट्टण. कुटूण कुटूण प्रश्न विचारतो = कृत्स्नकृत्स्नप्रश्नान् अनुयुंक्ते

( १३६ ) कुडबुड्या

क्षुद्रबुद्धिः = खुड्डबुद्धि = कुडबुडी क्षुद्रबुद्धिकः=कुडबुडया. कुडबुडया जोशी म्हणजे क्षुद्रबुद्धि ज्योतिषी

( १३७ ) कुढा

कुधीः ( दुष्टबुद्धिः ) = कुढी, कुढा

( १३८ ) कुंभा ( देवकुंभा )

कुंभ ( योनिः ) = कुंभा

( १३९ ) कुयाड

कुयं ह वै नाम कुत्सितं भवति । उत्तर-गोपथब्राह्मण-षष्ठः प्रपाठकः । कुयाड शब्दांतील आड प्रत्यय आढ्यदर्शक आहे. हें कुयाड काय आहे ? म्हणजे ही कुत्सित अनिष्ट गोष्ट काय आहे ?

( १४० ) कुरडणें

कुथनं = कुरडणें

( १४१ ) कुरंडी

कुरंटिका = कुरंडी

( १४२ ) कुसूर, कसूर

कुसृतिः निकृतिः शाठ्यं ( अमर-प्रथमकांड-नाट्यवर्ग ३० ) कुसृति म्हणजे लुच्चेगिरी. कुसृति = कुसूर, कसूर, कुचराई, कसुराई

( १४३ ) कोठार

कूटागार = कोठार. कूटागाराः सुवर्ण-खचिता दृश्यन्ते स्म । (कारंडव्यूह)

( १४४ ) कोड

कोट=कोड. त्वक्पुष्पं कोटस्तुमंडलं ॥ (केयदेव-पथ्यापथ्यविबोध)

( १४५ ) कंकुष्ट

काककुष्ट = कंकुष्ट

( १४६ ) कंड

कंडू = कंड

( १४७ ) कळंभट

कलुण = कल्हण = कळम्. कळम् + भट = कळंभट

( १४८ ) खरखरीत

खरखरित = खरखरित-रीत. स्वरः सूक्ष्मश्चलोऽनिलः । वाग्भट-सूत्रस्थान खर म्हणजे खडबडित

( १४९ ) खराटी

क्षरयष्टि=खराटी (स्त्री.) खराटा (पु.) स्त्रीलिंगापासून पुल्लिंग निघालें आहे.

( १५० ) खरूज

खर्जू = खरूज

( १५१ ) खंदक

स्कंधक = खंदक

( १५२ ) खपणें ( मरणें )

क्षपणं = खपणं

( १५३ ) खवखव

क्षवथुः क्षवः ॥ क्षव = खव

( १५४ ) खवडा ( थट्टा )

क्ष्वेल्-क्ष्वेड् थट्टा करणें. क्ष्वेलिका-क्ष्वेडिका= खवेडिआ = खवेडी=खवडी क्ष्वेडित = खवेडिअ = खवडा. क्ष्वेलित म्हणजे थट्टा, मस्करी

( १५५ ) खाणें (राग, क्रोध, गम वगैरे)

क्षम् = खावं. क्षांत्वा = खाऊन. राग खाऊन = रागं क्षांत्वा

( १५६ ) खाणें ( मन )

माझें मन मला खातें, या वाक्यांत खाणें हा धातू संस्कृत क्षण्पासून निघाला आहे. क्षणणं = खणणं = खाणें. खातें म्हणजे इजा करतें

( १५७ ) खाल ( ली )

खतल = खअल = खाल. ख म्हणजे खळगा, रिकामी जागा.

( १५८ ) गच्च

गृध्य = गज्झ = गज्ज = गच्च
गर्धः अभिलाषातिशयः
गच्च म्हणजे खडकून

( १५९ ) गणंभट

बहुतेक सर्व भिक्षुकांच्या नांवांत मकार विकल्पानें उच्चारतात. त्या बहुतेक ठिकाणीं तो अनुस्वार अण्णा = अण्ण = आण् = ण् = अनुस्वार अशा परंपरेनें आलेला आहे. उदाहरणें:—

गणभट व गणंभट
नानाभट व नानंभट
तात्याभट व तातंभट
बजाभट व बजंभट
कृष्णभट व कृष्णंभट

गणाण्णाभट = गणण्भट = गणंभट

नानाण्णाभट = नानूणूभट=नानंभट
कृष्णाण्णाभट = कृष्णणूभट=कृष्णंभट
इ. इ. इ.

( १६० ) गम

गम ( अविचार ) = गम

( १६१ ) गमणें ( वेळ घालवणें )

गम्यू – गम्याति
गम्यन = गम्मण= गमणें

( १६२ ) गमू

अगमत् = गमणें
अगच्छत् = गचणें

( १६३ ) गमे ( समजे )

गम्यते = गमे ( कर्मणि )
मज गमे = मे गम्यते

( १६४ ) गरज

गृध्य = गरज्ज = गरज

( १६५ ) गरजू

गृध्नक = गरज्जअ = गरजू

( १६६ ) गरती

गृहपत्नी = घरअत्ती = घरत्ती = गरती

( १६७ ) गरदे

हें आडनांव कऱ्हाड्यांत आहे.
अगारदाही गरदः कुंडाशी सोमविक्रयी
( मनुस्मृति तृतीयोध्याय, १५८ )
गरदः मरणहेतुद्रव्यस्य दाता (कुलूक)

गरद ब्राह्मण म्हणजे मारण्याच्या हेतूनें विषद्रव्य देणारा वैद्य ब्राह्मण–गरद याचा मराठी अपभ्रंश गर्दे.



( १६८ ) गरवें ( भात )

( गुरु ) गरीयस् = गरवें
तयार होण्याला फार काल लागणारें भात

( १६९ ) गळपर्णे

गलपर्न = गळपर्णे

( १७० ) गारदी

हें आडनांव महाराष्ट्रब्राह्मणांत आहे.
अगारदाही = (अलोप) गारधी=गारदी
फ्रेंच Guarde' पासून निघालेला गारदी शब्द निराळा.

( १७१ ) गुण्या ( पुरुषनाम )

गुण्यः = गुण्या

( १७२ ) गुदखीळ

गुदजो गुदकीलः स्यात् ॥
( केयदेव–पथ्यापथ्यविबोध )
गुदकील = गुदखीळ

( १७३ ) गूळ

गुल ( बारीक गोळी ) = गूळ
( आगकाडीच्या शेवटाची गोळी )

( १७४ ) गुलकंद

गुल + कंद = गुलकंद
गुल म्हणजे गूळ व कंद म्हणजे गोळा, फुगलेला पदार्थ

( १७५ ) गुळगुळित

गोलगोलित = गुळगुळित

( १७६ ) गायमान्या ( अति नम्र )

गांमन्यः = गायमान्या

( १७७ ) गालगुद

गलगदः = गालगुद. कंठरोगः गलगदः ॥ (केयदेव–पथ्यापथ्यविबोध)

( १७८ ) गालगुंड

गलगंड = गालगुंड

( १७९ ) गांटोडी

ग्रंथकुटी = गांठऊडि = गांठोडी

( १८० ) गांडूळ

गंडूपद = गांडूअड = गांडूल = गांडूळ. ( वाग्भट–यंत्रविध्यध्याय )

( १८१ ) गोखरू

गोक्षुरः = गोखुर = गोखरूं

( १८२ ) गोचीड

गोश्वेड = गोचेड = गोचीड

( १८३ ) गोडसे ( आडनांव )

गोष्ठश्य = गोट्ठस्स = गोडस ( सा–सी–सें )

( १८४ ) गोणाबाई ( स्त्रीनाम )

गोणा ( संस्कृत स्त्रीनाम ) = गोणा

( १८५ ) गोणताट

गोणीतर= गोणताट

गोणीतर म्हणजे लहान गोणी

( १८६ ) गोरापान

गौरः पाण्डुः = गोरापाण = गोरापान. पाण्डु = पाण्ड = पाण = पान

( १८७ ) गोरा लख्ख

गौरः अवलक्षः = गोरा लख्ख

अवलक्ष = ( अव लोप ) = लख्ख

( १८८ ) गोरी

पी हळद आणि हो गोरी, या वाक्यांत गोरी ह्या शब्दाचा अर्थ पिवळी असा आहे.

पीतो गौरो हरिद्राभः ( अमर )

गौर = गोर ( रा–री–रें )

( १८९ ) गोळा

गुल्मस्तु जाठरो ग्रन्थिः ॥

( केयदेव–पथ्यापथ्यविचार )

पोटांत गोळा झाला आहे म्हणजे गुल्म झाला आहे.

गुल्मः = गुल्ला = गोळा

( १९० ) गंकार ( गकाराची बाधा )

गमकार ( अविचार ) = गंकार

गकाराची बाधा म्हणजे अविचाराची बाधा. गकाराची बाधा म्हणजे गर्वाची बाधा म्हणून समजतात, परंतु तें निराधार आहे.

( १९१ ) घर ( बायको, स्त्री )

गृहाः ( क प्रत्यय ) = घर

नवरा म्हणतो:–घरांत विचारा म्हणजे बायकोस विचारा. गृहाः म्हणजे बायको

गृहान् अन्तिकं = घरांत

( १९२ ) घरगुती

गृहगुप्त = घरगुत्त = घरगुत (ता-ती-तें)

घरांतल्या घरांत गुप्त ठेवावयाचें चोळणें वगैरे

( १९३ ) घरमेढी

गृहमेधिन् = घरमेढी

( १९४ ) घाण

सिंघाणक स्तु नासोत्थः ॥

सिंघाणक = घाण

नाकांतली घाण म्हणजे सिंघाणक ऊर्फ शेंबूड. मुलाचें नाक पुसतांना घाण

पुसली म्हणून शब्द योजतात. तेथें घाण हा शब्द सिंघाणक शब्दाचा अपभ्रंश होय.

( १९५ ) घोटून ( गाणें )

घुष्ट = घुट्ट = घोट

घोटून म्हणजे घोष करकरून

( १९६ ) घ्या

घ ( प्रातिलोम्ये निपातः ) = घ्य = घ्या

( १९७ ) चक्क

प्रत्यक्ष = फार चक्ख = फार चक्क = चक्क

प्रत्यक्षं ब्रूते म्हणजे चक्क बोलतो. चक्क म्हणजे डोळ्यासमोर

( १९८ ) चट

चटु(प्रिये निपातः ) = चट

चट काम करतो म्हणजे आनंदानें काम करतो

( १९९ ) चंद्रकोर

चंद्रकेयूर = चंद्रकोर ( अलंकारविशेष )

( २०० ) चरणें ( गळूं वगैरे )

शॄ = शर = सर = चर

व्रण चरत चालला = व्रणः शीर्यमाणः वर्तते

( २०१ ) चातुर

( सं. ) चातुर म्हणजे शहाणा. हा शब्द मराठी लावण्यांत प्रियकरार्थक आहे.

( २०२ ) चांदोबा दाखविणें

दामोदरकराघातविव्हलीकृतचेतसा ।
दृष्टं चाणूरमल्लेन शतचंद्रं नभस्तलं ॥

चांदोबा दाखविणें म्हणजे उताणा पाडून मनुष्याच्या कानशिलांत अशी चपराक मारणें कीं त्याला शंभर चंद्र दिसूं लागावे, तिरमिरी येऊन.

( २०३ ) चारगट

चारभट ( हियेबाज ) = चारहट = चारगट ( चावट )

( २०४ ) चाळणें ( कौलें )

चाळ (घराच्या पिंजरीवरील भाग ) तो नीट करणें म्हणजे चाळणें

( २०५ ) चिरा

चीवर = चिरा

चिराबाइली

( २०६ ) चिरी

चीवर ( री ) = चिअरी = चिरी

लहान मुलीचें लहान लुगडें म्हणजे चिरी

( २०७ ) चीप ( लवकर, जलद )

क्षिप्रं = चिप्पं = चीप

चीप येतोहे = क्षिप्रं आयाति

( २०८ ) चेंगट

उच्चिंगट ( तामसी माणूस ) = चेंगट ( दिरंगाई करणारा माणूस )

( २०९ ) छाकछुक

संकसुक ( अस्थिर ) = छंकछुक = छकछुक = छाकछुक

( २१० ) छाटणें

शातनं = छाटणें

( २११ ) छानदार, शानदार

सांद्र = सानदर = शानदार, छानदार, छांदार, शांदार

( २१२ ) छानणें

क्षालनं = छाननें (परटाची भाषा)

( २१३ ) छाया ( घर )

छाया । शर्म । अज्म । इति द्वाविंशतिः गृहनामानि ॥ ( निघंटु )

बसायला कुठें तरी छाया पाहिजे. ह्या वाक्यांत छाया या शब्दाचा अर्थ गृह असा आहे, व तो प्रथमतः वैदिकांनीं निघंटूतून वापरलेला असून, नंतर सामान्य लोकांत पसरला.

( २१४ ) छावा

शावक = छावा

शावकः शिशुः । ( अमर )

( २१५ ) जखम

यक्ष्मन् = जख्खम = जखम

( २१६ ) जडाव

( जतु ) जातव = जाडव = जडाव

( जडावाचा दागिना म्हणजे लाखेनें मिश्र असा सोन्याचा दागिना )

( २१७ ) जर्जर

झर्झर = जर्जर

रे रे गुर्जर झर्झरोसि समरे-

( प्रतापरुद्रीयम् )

( २१८ ) जती

यांत्रिकः = जत्तिअ = जती

यति = जती

महायांत्रिक म्हणजे ज्योतिषी. जती या शब्दाचे मराठींत दोन अर्थ आहेत, ( १ ) यति व ( २ ) ज्योतिषी. व दोन अर्थ दोन निरनिराळ्या संस्कृत शब्दांपासून आलेले आहेत.

( २१९ ) जवान

युवन् = जुवन् = जवान

जवान् म्हणजे तरुण

जवान हा शब्द फारशींत हि आहे; परंतु तो त्या भाषेंत संस्कृततुल्य किंवा पूर्ववैदिक भाषेंतून गेलेला आहे.

( २२० ) जळपळणे

जाजल्पनं = जळपळणें ( चरफडणें )

( २२१ ) जळंभट

जह्णण = जळण = जळं

जळं = भट = जळंभट

( २२२ ) जातर्

जातु = जातर्

जातु दुग्धं पिब = जातर् दूध पी

जातु नाम एकवारम्

( २२३ ) जानपछान

ज्ञानप्रत्याज्ञान = जानपचात्तान = जानपछान

( २२४ ) जानवसा

यज्ञवास्तु = जन्नवासा = जानवसा

वऱ्हाडी लग्नरूपी यज्ञ करण्यास ज्या घरांत उतरतात तें घर

( २२५ ) जिकीर

जिगीर्षा = जिगीर = जिकीर

पदार्थ गिळण्याची इछा

( २२६ ) जिकीर

चिकीर्षा = चिकीर = जिकीर

पदार्थ विकत घेण्याच्या वेळीं दाखविलेली कचाटी

( २२७ ) जिकीर

जिघृक्षा = जिघीर = जिगीर

पदार्थ घेण्याची इच्छा

( २२८ ) जिवाणू

जायिष्णु = जिवाणू

( २२९ ) जेष्ठमध

यष्टीमधु = ज्येष्ठमध

( २३० ) जोंग

वंशकागुरुराजार्हलोहकृमिजजोंगकम्
( अमर-द्वितीय-नृवर्ग १२६ )

हिमालयाच्या उत्तरेस लोकांना जोंग म्हणतात. कोणता हि भूगोल पहा.

तात्पर्य, अमराच्या काळीं हि या प्रदेशांना जोंग हें च नांव होतें.

अगुरु जोंग प्रदेशांत होतो म्हणून त्याला जोंगक म्हणत.

( २३१ ) जोगमेढी

योगमेधिन् = जोगमेढी

( २३२ ) जोड ( कुस्तीचा )

योध = जोढ = जोड

मला कुस्तीला जोड द्या = युद्धार्थं योधं ददत

( २३३ ) जोडा

युतयोः वधूवरयोः इदं योतकम् ।
युतौ म्हणजे वधूवर, नवराबायको
यौतक = जोडअ = जोडा

( २३४ ) झकीत, झकत ( निपात )

तो झकत् येईल म्हणजे तो अपमान होऊन येईल.

धकिन् विपर्यं

धकिन् = झकित् = झकत

( २३५ ) झणीं, झणे, झणं

शनैः = सणे = झणे, सणं, झणीं
सणीं म्हणजे शीघ्र

( २३६ ) झांकणें

झप् to cover = झाँख = झाँक

झप् बद्दल झंप् किंवा झाप् असा धातू असावा.

( २३७ ) झाडणी ( केरसुणी )

साधारणी ( कुंचिका ) = झाहारणी = झाडणी

( २३८ ) झाडणें ( संपविणें )

( स्वद् ) स्वाद् = झ्वाड = झाड (णें)

झाडून सगळें काम केलें = स्वाठयित्वा सर्वं कर्म कृतं ।

( २३९ ) ( डोळे ) झांप, झांपड

स्वाप = झ्वाप = झाप = झाँप

डोळेझांप = नेत्रस्वाप

झ्वाप असा उच्चार अशिष्ट अद्याप करतात

( २४० ) झालर

झल्लरी = झालर

( २४१ ) झुट् ( निपात )

जुत् ( कुत्सने निपातः ) = जुट् = झुट्, छुट, छट, हुट्

( २४२ ) झुरका ( तंबाखूचा, दारूचा, विडीचा )

सरकः ( दारू पिण्याचें कृत्य ) = झरका, झुरका

( २४३ ) झुरणें

शॄ = झुरणें

शीर्यते वन एव वा = वनांत झुरतो

( २४४ ) झ्याद

( निपात ) स्यात् न गमिष्यामि =

इयाद्!, नाहीं जाणार= May be, I wont go

इयाद् = काय होईल तें होवो.

इयाद् हा शब्द शिवी नाहीं. शिवी असती तर लोक सररहा घरांत बायकांपोरांदेखत तो उच्चारते ना

( २४५ ) इयाद मारी

स्यात् मारी = इयाद् मारी

मारी म्हणजे दुर्गादेवी (स्मशानांतील)

स्यात् मारी म्हणजे मारी असेना.

हे दोन शब्द हि गाळी नाहींत.

( २४६ ) टरकणें

तर्क = टरक

टरकणें म्हणजे बुद्धि चंचळ होणें

( २४७ ) टरबुज

तरंबुज = टरबुज

तरत् अंबु = तरंबु ( कर्कंधुवत् समास ) तरंबुनि जातें तरंबुजं

( २४८ ) टवका

त्वक् = टवक

त्वचा ( का ) = टवका

टवका म्हणजे बाहेरील पापुद्रा

( २४९ ) टाकणें

त्याग = टाक

टाकणें म्हणजे त्यजणें, सोडून देणें

( २५० ) टाकळा ( वनस्पति )

तर्करी वैजयंतिका ।

( केयदेव-पथ्यापथ्यविबोध )

( २५१ ) टिरी, टीर

त्रिक = टिरअ = टीर-री

( २५२ ) टेर

टटरी मृषावादः

( २५३ ) टोचणें

तोदन = टोचणें

द = च

( २५४ ) टोलवणें

तर्जनं = टलअणं = टोलवणं

( २५५ ) ठणठण, ठणाठणा

स्त्यानं स्त्यानं = ठाणं ठाणं = ठाणठाण
= ठणठण = ठणाठणा

स्त्यानं नाम शब्दायमानं

( २५६ ) ठार

स्तृह् = ठरह् = ठार

स्तृह् इजा करणें

( २५७ ) ठाळ

स्थाल = ठाल

जेवायचें पात्र

( २५८ ) ठीक

स्थाने ( युक्ते ) = ठीक

( २५९ ) ठेप

टिपृ पाठवणें धाडणें. टेप = ठेप जन्मठेप = जन्मभर पाठविणें.

( २६० ) डग्गा

( स्त्री ) ढक्का = डग्गा ( पुल्लिंग )

( २६१ ) डबा-डबोलें

द्रव्यकं = डव्वअ = डव्वा = डबा

बापानें डबा पुरून ठेवला आहे. येथें डबा म्हणजे द्रव्य

( २६२ ) डभ्र

( वैदिक ) दभ्र ( अल्प ) = डभ्र

( अल्पदर्शक ) डभ्र

( २६३ ) डरणें

द्रु-द्रव = डरणें ( पळणें )

( २६४ ) डरणें

दर = डरणें ( भिणें )

( २६५ ) डाल, डाली

डल्लकं = डाल ( वंशपात्रं )

( २६६ ) डाह, दहा, धा

दाहः = दाहा, दहा, धा

दाह = डाह

( २६७ ) डाहळा

लाङ्गुलः = डागळा=डाअळा= डाहळा

नारिकेरस्तु लांगली ( अमर )

लांगलवत् शाखा अस्य लांगली ( क्षीरस्वामी ). डाहळी म्हणजे लहान फांदी

( २६८ ) डिचका

डित्थकः = डिचका

श्यामरूपो युवा विद्वान्सुंदरः प्रियदर्शनः।
सर्वशास्त्रार्थवेत्ता च डित्थ इत्यभिधीयते ॥

मराठींत डिचका म्हणजे शहाणा

( २६९ ) डुचक ( का-की-कें )

दुष्कृत = डुर्सांकिअ = डुचकिअ = = डुचक ( का-की-कें )

( २७० ) डुडळ

डुंडुलः = डुडुळ ( घुबड )

( २७१ ) डुरकणें

द्रेकृ शब्दे । द्रेकृ = डिरकृ धातु द्रोकृ असा असावा. द्रोकृ = डुरकृ डुरकणें म्हणजे बैलाचा शब्द

( २७२ ) ढ

ढः निर्गुणः इति एकाक्षरकोशः

( २७३ ) ढकलणें

अधिकृ = ( अलोप ) ढिकरणें = ढिकलणें = ढकलणें

त्याला त्यांनीं न्यायाधिशापुढें ढकलला = तैः सः न्यायाध्यक्षस्य पुरतः अधिकृतः

( २७४ ) ढेप

डिपृ गोळा करणें

डेप = ढेप ( गुळाचा गोळा )

( २७५ ) ढब्बू

अधिभू = (अलोप) ढिभू = ढबू = ढब्बू

ढब्बू म्हणजे मोठा माणूस, त्यावरून लठ्ठ, आयदी

( २७६ ) ढब्बू ( पैसा )

लठ्ठ पैसा तो ढब्बू

( २७७ ) ढेरणें ढोरणें

ध्रेकृ शब्दे ।

ध्रेकृ = ढेर = ढेरणें, किंवा ढोरणें.

गुरूं ढोरतें म्हणजे झोंपताना विशिष्ट शब्द करतें.

मूळ धातु ध्रोकृ असा हि असाना.

( २७८ ) ढोल

ढोलः वाद्यविशेष

ढक्काढोलप्रिया ( रुद्रयामल )

( २७९ ) ढोर

धिग्वण्या-योगवा ज्जातः पुत्रो दुर्मरसंज्ञकः।
स कुर्या चर्मपात्राणि जीवनाय निरंतरम् ॥

जातिविवेकः ॥

ढोहरु इति ख्यातः ॥

धिग्वणीच्या ठाईं अयोगवापासून

झालेला जो पुत्र तो दुर्भर होय. तो चामड्याचीं पात्रें करतो.

दुर्भर = डुहूहर = ढोर

( २८० ) ढालगज

( द्राघीयस् + जंघा ) दीर्घजंघा = ढालजँग = ढालजग = ढालगज

जिच्या जंघा लांब आहेत अशी स्त्री–अशा बाईसारखी वागणारी मुलगी

द्राघ = ढाल

( २८१ ) ढास

ऊर्ध्वश्वास = ढास

उडुआस = ढ्हास = ढास

( २८२ ) ढाळणें ( थकणें )

द्राह् = द्राहूर = ढाल = ढाळ द्राह् थकणें.

( २८३ ) ( काळें ) ढूस

धूसर = ढूसअ = ढूस

( २८४ ) ढमण्णा

अधमर्णः = ( अलोप ) ढमण्णा

ढमण्णा म्हणजे दरिद्री, गरीब, देणेदार.

( २८५ ) तमण्णा

उत्तमर्णः = तमण्णा ( उलोप )

तमण्णा म्हणजे धनिक, धनवान्

प्रश्नः–तूं कोण तमण्णा लागून गेला आहेस !

उत्तरः–मी तमण्णा नाहीं ढमण्णा आहे.

( २८६ ) तवकीर

त्वक्क्षीरी क्षीरिका शुभा ॥

( कैयदेव–पथ्यापथ्यविबोध )

त्वक्क्षीरी = तवखार = तवकीर

( २८७ )

तरन्त = टरांव ( बेडकाचें ओरडणें )

( २८८ ) तरवणी

तरत् पानीयं = तरावणीअँ = तरावणी = तरवणी

( २८९ ) तळी

(वैदिक) तळित् इति अंतिकनाम (निघंटु)

तळित् = तळिअ = तळी

तळी म्हणजे जवळ

ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायांत, भीष्मा तळीं, असे शब्द येतात; तेथें तळी या शब्दाचा अर्थ जवळ असा आहे.

( २९० ) तन्हेवायिक

त्र्यहैहिकः। ईहा चेष्टा तस्यां भवं ऐहिकं । त्र्यहपर्याप्तं ऐहिकं धनं अस्य अस्ति इति त्र्यहैहिकः ॥

( मनु–चतुर्थाध्याय ७, कुल्लूक )

त्र्यहैहिक = तन्हैहिक = तन्हेवाइक

तन्हेवाईक म्हणजे तीन दिवसांपुरतें धान्य ठेवणारा, निरिच्छ, बेफिकीर.

( २९१ ) ताकतोय

तक्रतोयः = ताकतोय, ताकतय

( २९२ ) तांदुळजा

तंदुलीयः = तांदुळजा

( २९३ ) तिउड, तेड

त्रिवृत = तिउड, तेड

( २९४ ) तिखें

तीक्ष्ण = तिखें ( लोखंडाची जात )

( २९५ ) तिरीप

तृप = तिरीप

( २९६ ) तिरपें ( वाईट )

तृप्र = तिरप ( पा-पी-पें )

तृप्र म्हणजे दुःख

( २९७ ) तिरमिर

तिमिर = तिरमिर

ति पुढील र केवळ दुसऱ्या रच्या अनुषंगानें उच्चारलेला आहे. नेत्रयोः पुरतः तिमिरं याति = डोळ्यापुढें तिरमिर आली.

( २९८ ) तिबेट

त्रिविष्टप = तिविट्टअ = तिबेट

( २९९ ) तुलटी

तुलायष्टि = तुलटी

( ३०० ) तुराटी

तूरयष्टि = तुराटी

( ३०१ ) तुरट

तुवरिष्ट = तुअरिट्ट = तुरिट = तुरट

तुवर स्तु कषायः ( अमर )

( ३०२ ) तूण, तुणीची शिवण

तुन्नसेवनी=तुणीची शिवण(गर्दे–वाग्भट)

तुन्न = तूण

( ३०३ ) तूप

स्नूत ( वैदिक ) = तूप

स्नुत म्हणजे चर्बीनें माखलेलें

( ३०४ ) त्यां

सः = तो

स्यः = त्यो

त्यत् या सर्वनामाची एकवचनी प्रथमी स्यः म्हणून देतात; परंतु त्यः असें हि रूप असावें. त्यः = त्यो

हा त्यो शब्द अशिष्ट लोक सध्यां योजतात.

( ३०५ ) थबकन्

स्तब्ध = थब्ब = थब

स्तब्धकारं = थबकन्

( ३०६ ) दगड ( निपात )

धगित् = दगिड = दगड

तो काय दगड काम करतो.

( ३०७ ) दत्त्या

( देव ) दत्तक ( दुर्दैवी दत्त ) = दत्तअ = दत्ता, दत्त्या ( एकशेष )

रामक = राम्या इ. इ. इ.

( ३०८ ) दयाळ ( प्रिय )

दयित + ल ( स्वार्थक ) = दइअल = दयाळ ( ळा–ळी–ळें )

लावण्यांत व कवितेंत दयाळा ( संबोधन, पुल्लिंग ) दयाळे ( संबोधन, स्त्रीलिंग ) हे शब्द येतात व त्यांचा अर्थ प्रिया, प्रिये असा आहे. दयालु ( मायाळु ) या शब्दाशीं या दयाळ शब्दाचा कांहीं एक संबंध नाहीं.

( ३०९ ) दस्त

दस्–दस्त ( दस् नाश–करणें ) त्यानें त्याला दस्त केलें म्हणजे त्याचा नाश केला

फारसी दस्त शब्दाहून हा संस्कृत दस्त शब्द निराळा

(३१०) दा { अदात् = देणें<br>अयच्छत्=एचणें,देणें }

( ३११ ) दाद ( रोगविशेष )

दद्रु = दाद

( ३१२ ) दाद ( मागणें )

( दय् पौनःपुन्य ) दाद्य = दाद ( संरक्षण, दया ) दाद मागणें म्हणजे संरक्षण, दया Sympathy मागणें

( ३१३ ) दारोटा, दारवटा

द्वारकोष्ठ = दारओट्ट = दारोटा

द्वारकोष्ठे च मुक्तापटकलापप्रलंबितानि । (कारंडव्यूह)

( ३१४ ) दीड

अध्यर्ध = ( अलोप ) दिड्ढ = दीड

ज्ञानेश्वरी व्याकरणांत द्व्यर्ध या शब्दापासून दीड या शब्दाची व्युत्पत्ति कशी तरी केली आहे. परंतु ती समाधानकारक नाहीं. दीड ह्या अर्थी अध्यर्ध हा शब्द संस्कृतांत योजितातः—

तद्वद्दंतर्मुखं तस्य फलं अध्यर्ध अंगुलम् ॥ १० ॥

(वाग्भट-सूत्रस्थान-षड्विंशोध्यायः ।)

येथें अध्यर्ध म्हणजे १½ ऊर्फ दीड

अर्थात् दीड या शब्दाची ही व्युत्पत्ति खरी.

( ३१५ ) दीडमिश्या

दीर्घश्मश्रुः = दीरमिश्या = दीडमिश्या

दीडमिश्या म्हणजे लांब आहे मिशी ज्याची तो

(गोपथब्राह्मण-द्वितीयप्रपाठकपूर्वभागः।)

( ३१६ ) दीड शहाणा

दीर्घचक्षणः = दिड्ढ सहण्णः = दीड-शहाणा

( ३१७ ) दुडदुड

द्रुतंद्रुतं = दुडदुड ( धावणें )

( ३१८ ) दुडकी ( चाल )

द्रुतका = दुडकी

दुडकी चाल म्हणजे दुडदुड चाल

( ३१९ ) दुट्ट ( ट्टा-ट्टी-ट्टें )

द्विष्ठ = दुट्ठ = दुट्ट

दुट्ट म्हणजे दोन ठिकाणीं रहाणारें

वाक्यान्यपि द्विष्ठानि भवंति ।

(पातंजलमहाभाष्यं ।)

( ३२० ) दुधी

दुग्धिका = दुधी

( ३२१ ) दुपारी

द्विप्रहरिका = दुपहरिआ = दुपारी

( ३२२ ) देवळे

देवल हें आडनांव सध्यां महाराष्ट्र-ब्राह्मणांत आहे.

(मनुस्मृति—अध्याय तिसरा. श्लोक १५२कुल्लूकः)—देवलः प्रतिमापरिचारकः।

देवकोशोपभोजी च नाम्ना देवलको भवेत् ।

देवल म्हणजे प्रतिमेचा परिचारक ब्राह्मण

देवल हें आडनांव निराळें. तें देवल-ऋषिनामापासून आलें आहे.

( ३२३ ) देव्हारा

देवतागाराः= देवआआरा = देवारा= देव्हारा

( ३२४ ) दांतखीळ

दंतकील = दांतखीळ

( ३२५ ) धग

दग्ध = धग्ग = धग

( ३२६ ) धरसणें

धर्षणं = धरसणें

( ३२६½ ) धाड

धाटी = धाड

अस्माकमग्रे धाटी निपतिता

( धर्मदत्तचरितम् )

( ३२७ ) धिमा, धिम्मा

धीमत् = धिमा, धिम्मा

धिमा म्हणजे विचारपूर्वक वागणारा

( ३२८ ) धिवसा ( ज्ञानेश्वरी )

अध्यवस्या = ( अलोप ) धिवसा, धिवंसा

( ३२९ ) धुई

दूति = दूइ = धुई (कामकरीण)

( ३३० ) धुरु

ध्रुवं = धुरु

( ३३१ ) धेंडसें

डिंडिशः = धेंडसें

( ३३२ ) धोतर

धौतवस्त्र = धोतअर = धोतर

( ३३३ ) धोतरजोडा

धौतवस्त्रयुग = धोतअरजोडा
= धोतरजोडा

( ३३४ ) ध्येन

अध्ययन = ( अलोप ) ध्येन

गीतेचें ध्येन करतो म्हणजे अध्ययन करतो. हा ध्येन शब्द सध्यां देशस्थांत, बायकांत व अशिष्टांत हमेश ऐकूं येतो. हा ध्यान शब्दाहून निराळा.

( ३३५ ) नग ( अव्यय )

नाकिः ( वर्जने निपातः ) = नगि = नग

( ३३६ ) नको

६ नकं (अकच्क) — १ न्यक्, २ नक्क, ३ नरु, ४ नकम्, ५ नकिःनिपात — नको

( ३३७ ) नांदुरुख

नंदिवृक्षः = नांदुरुख

( ३३८ ) नपेक्षां ( अव्यय )

अनपेक्षा = नपेक्षा

तृतीया नपेक्षां

गोविंदा आला तर बरें; नपेक्षां तूं निघून जा. येथें नपेक्षा हें अव्यय आहे; व त्याचा अर्थ, त्याच्या येण्याची अपेक्षा न धरतां, असा आहे.

( ३३९ ) नागदवणा

नागदमनी = नागदवणा

( ३४० ) नाणवटी

नाणवंटक = नाणवटी

नाण्याचा वटवडा करणारा जो तो, सराफ. नाणावटी, नानावटी, हें आडनांव गुजराथ्यांत अद्याप आहे.

नामांकनं = नाआंअणं = नाणें

हा शब्द संस्कृतांतून प्राकृतांत आला आहे.

( ३४१ ) नारिंग

नारंको योगसारे (वै) नारंगो योगिको मतः ॥ (केयदेव–पथ्यापथ्यविबोध)

नारंक = नारिंग

( ३४२ ) नानी ( स्त्रीनाम )

नना ( आई ) = ननी = नानी

( ३४३ ) नाळगुद

नालगदः = नाळगुद

३४४ ) नाहक ( निरपराधी )

अनागस् = अनाकह = नाहक

त्यानें त्याला नाहक मारिलें = तेन सः अनागाम् मारितः ।

कवह याचा विपर्यय फारसी नाहक शब्द निघाला.

( ३४५ ) निक (का-की-कें), नक्की

निकामम् = निकावं = निकें

निकामम् इच्छेप्रमाणें, यथेष्ट, पुष्कळ

निक = निक्र = नक्की

( ३४६ ) निपट

निःस्पष्ट = निप्पट = निपट

अति स्पष्ट तें निपट

( ३४७ ) निपटनिरंजन

निःस्पष्टनिरंजन = निपटनिरंजन

( ३४८ ) निरपणें

निर्वपनं = निरपणें

निरपणें म्हणजे चाटूनपुसून खाणें.

( ३४९ ) निरवणें

निर्वर्तनं = निरवअणं = निरवणें

संसारं निर्वर्त्य, संन्यासं कुरु = संसार निरवून संन्यास कर.

( ३५० ) निरांजन

नीराजनं = निरांजन

रावरील अनुस्वार आगंतुक.

( ३५१ ) निवेद ( अन्न )

( न्यदः ) निन्यद = निवेद (अन्न)

( ३५२ ) निसुक

निःस्वक = निसुक ( दरिद्री )

( ३५३ ) निसते ( समयीं )

निशीथे = निसीते = निसते

निसते समयीं म्हणजे निशीथसमये

निजते हा ज मध्य शब्द निराळा.

निशीथ ह्या शब्दांत शी शयन करणें हा धातू आहे. निशीथ म्हणजे शयन करण्याचा वेळ

( ३५४ ) नीड-नीट

स्निग्ध = निद्ध = नीड = नीट

नीट बोल = स्निग्धं वद

( ३५५ ) नीम

नेम ( अर्धा ) नीम

( ३५६ ) नेम

नेमिः वज्रः । (निघंटु ।)

त्यानें नेम मारिला, या वाक्यांत नेम हा शब्द हत्यार या अर्थी वापरलेला आहे.

नेमि = नेम

त्यानें नेम मारिला ह्मणजे त्यानें हत्यार मारिलें.

( ३५७ ) नेमके

नेम ( कांहीं ) कक = नेमका ( some few )

( ३५८ ) न्याहारी

अह्नाहारी = न्हाआरी = न्याहारी

अह्न् = दिवस    अह्ना = दिवसा

(सां) आहारी म्हणजे जेवण, अन्न घेणें

न्याहारी ह्मणजे दिवसाचें जेवण

( ३५९ ) पचा

प्रत्ययः = पच्चअ = पचा

त्याचा पचा झाला = तस्य प्रत्ययः जातः ( स्त्रीलिंग ) पर्चा ( प्रतीति )

( ३६० ) पचाडा

प्रत्यादेशः = पच्चाडा ( निंदा )

( ३६१ ) पछाडणें

पश्चादयनं = पच्छाडअण = पछाडणें

( ३६२ ) पठार

प्रस्थाहार = पट्ठाआर = पठार

प्रस्थे सानौ ( क्षीरस्वामी–अमर–द्वितीयकांड–वनौषधिवर्ग–श्लोक ७९ टीका )

पठार म्हणजे डोंगराच्या माथ्यावरील प्रदेश

( ३६३ ) पडदणी

परिधानी = पडिदाणी = पडदणी

( ३६४ ) पडदा

परिधा = पडिधा = पडदा

( ३६५ ) पडसें

( पु. ) प्रतिश्यायस्तु पीनसः ।

प्रतिश्याय = पडिसाअ = पडसें

( ३६७ ) पडळ

पटलं त्वंधता स्मृता ॥

(कैयदेव–पथ्यापथ्यविबोध)

डोळ्यावर पडळ आलें आहे म्हणजे अंधता आली आहे.

( ३६८ ) पडेल

पतयालु = पडआल = पडयाल = पडेल

( ३६९ ) पडोशी ( पहा़डे )

प्रत्यूपे = पडूसी = पडोशी

( ३७० ) पढतमूर्ख

प्रति ( नि ) विष्ट = पडि ( णि ) इट्ट = पडि ( णि ) ट्ट = पडिट्ट = पडट्ट = पढत

पढत हा शब्द प्रतिविष्ट किंवा प्रतिनिविष्ट शब्दापासून निघालेला आहे. पठ धातूशीं कांहीं एक संबंध दिसत नाहीं.

( ३७१ ) परजळणें

परिजलनं = परजळणें, परचळणें

( ३७२ ) परत जाणें

प्रतियानं = परत जाणें

( ३७३ ) परत भेट

प्रत्यभ्यदनं = परत भेट

( ३७४ ) परता

प्रताम् ( ग्लानौ निपातः ) = परता

( ३७५ ) पत्राज, पत्राजा

प्रत्रसा = पत्रझा = पत्राजा = पत्राज

पत्राज म्हणजें भय

( ३७६ ) पही ( पाहुणा )

पथिन् = पहि = पही

( ३७७ ) पत्नी

येथें नी हा स्त्रीलिंगी प्रत्यय लागला आहे. इंद्र याचें स्त्रीलिंग इंद्राणी. येथें नी प्रत्यय आहे. तो च नी प्रत्यय पति ह्या शब्दाला लागून पतिनी असें पूर्ववैदिक रूप होत होतें. ह्या पतिनी शब्दाचा वैदिक अपभ्रंश पत्नी. इंद्रभर्व० इत्यादि सूत्राच्या पुढें पाणिनीनें पत्नी हा शब्द साधण्यास, खरें म्हटलें असतां, एक सूत्र द्यावयाचें होतें व तेथें असें सांगावयाचें होतें कीं पति ह्या शब्दाला नी हा स्त्रीप्रत्यय लागतांना त्याच्या ति चा लोप होतो.

( ३७८ ) पन्हें

पानकं = पन्हें

( ३७९ ) परतणें

प्रत्ययनं = परतअण = परतणें

( ३८० ) परत उत्तर

प्रत्युत्तर = परत उत्तर

( ३८१ ) परवड

प्रवृत्तिः = परवडि = परवड

सुखार्थाः सर्वाः प्रवृत्तयः = सुखाच्या सगळ्या परवडी

( ३८२ ) पसरणी (वनस्पतिविशेष)

प्रसारिणी = पसरणी

( ३८३ ) पहचणें, पोहोचणें

प्रस्थानं = पहचणं = पहचणें = पोहोचणें

ग्रामं प्रति प्रस्थाति = गावातें पोहोचतो

( ३८४ ) पहिल्या विशींत

प्रथमे वयसि = पहिल्या विशींत (सप्तमी)

विंशति या संख्याशब्दाचा येथें कांहींएक संबंध नाहीं.

( ३८५ ) पाऊसबिऊस

प्रावृष् विप्रुष् = पाऊस बिऊस

विप्रुष् ( थेंब )

(३८६) पाठचा (सूर्य), पाठचें (ऊन)

प्रातस्त्य = पाटच = पाठच (चा-ची चें)

पाठचें उन्ह म्हणजे सकाळचें ऊन; पाठीवरचें ऊन नव्हे.

( ३८७ ) पाठस (सा-सी-सें)

पृष्टशय = पाठस ( सा-सी-सें )

( ३८८ ) पातडी ( पिशवी )

पाटलिका = पात्तडिआ = पातडी

( ३८९ ) पापरा

पर्परिक = पापरिअ = पापऱ्या, पापरा

येन पीठेन पंगवः चरंति स पर्पः ।
पर्पेण चरति पर्पिकः ।

गाडींत बसून जो पांगळा भिक्षा मागतो तो. गाडींत बसून भिक्षा मागणाऱ्यांची ही परंपरा पाणिनीच्या वेळेपासूनची आहे!

( ३९० ) पापा ( पुरुषनाम )

पापः ( संस्कृत पुरुषनाम ) = पापा
( हें नाम सध्यां बाटलेल्या मुसलमानांत आढळतें )

( ३९१ ) पारठी

प्रष्ठौही गर्भिणी गौः

प्रष्ठौही = पारठाइ = पारठी

पारठी गाय म्हणजे गाभणी गाय

( ३९२ ) पारपाडणें

परिपारणं = पारपाडणें

एवं कुलपुत्रावलोकितेश्वरो बोधिसत्वो महासत्वः सत्वान् धर्मं देशयति, परिपारयति, निर्वाणभूमिमुपदर्शयति ।
(कारंडव्यूह-अष्टमप्रकरणम्।)

( ३९३ ) पासाव, पासून

पार्श्वात् = पास्साअ = पासाव

पार्श्वात् = पासून

जसें गृहात् = घरून

नगरपार्श्वात् = नगरपासून

नगरस्य पार्श्वात् = नगरापासून

( ३९४ ) पालक

पालक्या = पालक

( ३९५ ) पाहतो

स्पृहयति = पाहे, पाही

स्पृहयति यवानां प्रसृतये = जवांचा पश्याला पाहातो

स्पृहयति = वांछति = पाहातो.

( ३९६ ) पांढरेंफेक

पांडुश्वेतं = पांढरेंफेक

( ३९७ ) पांढरें सफत

पांडुश्वेतं = पांढरें रुफेत

( ३९८ ) पांढरें शुभ्र

पांडुरं शुभ्रं = पांढरें शुभ्र

( ३९९ ) पारोस ( सा–सी–सें )

पर्युषितं = पर्उसिअ = पारुस = पारोस ( सा–सी–सें )

पारोसें म्हणजे शिळें

( ४०० ) पाल्हाळ

पल्लवित = पालइअ + ल (स्वार्थक) = पालाल = पाल्हाळ

अलं पल्लवितेन = पाल्हाळाला आळा घाला.

( ४०१ ) पिकदाणी

पिकादिनी = पिकदाणी

( ४०२ ) पिचकणें, पुचकणें

उपस्कृ = (उलोप) पचक = पिचक

पस्करणं = पिचकणें

दहीं पिचकलें म्हणजे दहीं कुजून नासून बिघडलें

उपस्कृतं पूतिगंधादियुक्तं

( ४०३ ) पिचलेलें ( दहीं वगैरे )

पिच्छिलं = पिचलें

पिचल + ल ( स्वार्थक )=पिचलेलें

( ४०४ ) पिंजळी

पिंजूल = पिंजळी

एकविंशत्या दर्भपिंजूलैः पावयंति ।
(ऐतरेयब्राह्मण)

पिंजूलि असा हि संस्कृत शब्द असावा.

( ४०५ ) पित्तपापडा

पीतपर्पटः = पित्तपापडा

( ४०६ ) पिवळें–हिरवें

पीतंहरितं = पिवळें हिरवें

हरित = हरिअ = हरिव = हिरव ( वा–वी–वें )

येथें हिरवें म्हणजे पिवळें, असा अर्थ आहे.

( ४०७ ) पिळणें

पीडनं = पीळणें

स मां पीडयति = तो मला पिळतोय्-

( ४०८ ) पीठवन

पृष्टिपर्णि = पीठवन

( ४०९ ) पुसणें ( सन्मान करणें )

पुत्रः पितरौ पुस्तयति = पुत्र पितरांस पुसतो

पुस्त = पुस्स = पुस किंवा

पुस्त = पुस्थ = पुच्छ = पुस

( ४१० ) पुकारा

पुत्कारः = पुकारा (धर्मदत्तचरितम्)

( ४११ ) पुटकुळी

पिटका = पिटकुळी ( स्वार्थे ल )

( ४१२ ) पुऱ्या विशींत

पूर्वे वयसि = पुऱ्या विशींत

(४१३) पुसकन्, फुसकन्, फुसकुली

पुस् पोसयति पाद् वगैरे सोडणें.

( ४१४ ) पेंड ( मोत्याचा )

( मुका ) पिंडः = पेंड

( ४१५ ) पोटली ( पुरचुंडी )

पोट्टली = पोटली, पोटळी

( ४१६ ) पोत ( वस्त्रविशेष )

पोत = पोत

( ४१७ ) पोतें

पौतवं ( धान्याचें माप ) = पोतें

पोतेंभर धान्य

( ४१८ ) पोत

पोत = बोट = बोट Boat

( ४१९ ) पोळ ( भाजणें )

प्लोष = पोळ

( ४२० ) प्राण

अन्न मिळतां मिळतां रोज प्राण जातो

अन्ने मेलिष्यति नित्यं अपराण्हः भवति, जायते ।

अपराण्हः = पराण्ह = प्राण्ह = प्राण

( ४२१ ) फटफटित

स्फटस्फटित = फटफटित

(४२२) फतुकलें, फतकल (लठ्ठ बाईचे विस्तृत कुल्ले )

फल्क ( विस्तीर्ण शरीर ) = फतकल फतुकलें

( ४२३ ) फरक, फारकत्

फलति विशीर्यते इति फलकः

फलक = फरक ( भेद )

फलकृत्य = फारकत्

( ४२४ ) फरारी

परापहारी = पराअआरी = परारी = फरारी

तो द्रव्य घेऊन फरारी झाला म्हणजे परापहारी झाला.

द्वितीयार्थः— पळाला

( ४२५ ) फलकण-फळकट

फलिकरण (ऐतरेय ब्राह्मण) = फालिकण्ण = फलकण = फलकट

( ४२६ ) फाटणें

स्पर्ध = फड्ड = फट्ट = फाट

तेन सह वा तस्मै स्पर्धते = स्पार्शी फाटतो, फाटून आहे.

( ४२७ ) फार पुराणा

प्रपुराणः = फार पुराणा

प्र = फार

( ४२८ ) फुणगी

स्फुलिंग = फुणिग = फुणगी

( ४२९ ) फेस

तुझा फेस काढीन

तव स्फिचौ कर्षिष्यामि म्हणजे तुझे कुल्ले ओढीन.

स्फिच् = फिस = फेस

( ४३० ) फोड

स्फोट = फोड

( ४३१ ) बच्चा

वयस्य = बअच्च = बच्च

( संबोधन ) बच्चा

बच्चा म्हणजे मित्र

वत्स या शब्दापासून निघालेला बच्च शब्द निराळा. त्याचा अर्थ मूल, पोर.

घरोबरीच्या माणसांना जो बच्चा शब्द मराठींत लावतात तो वयस्य ह्या संस्कृत शब्दापासून निघालेला आहे

( ४३२ ) बच्चीं

अपत्यानि = (अलोप) वच्चाँइँ = बच्चीं

ह्या शब्द मराठींत प्रायः अनेकवचनी नपुंसकलिंगी वापरतात

( ४३३ ) बजरबट्टु

वज्रवृत्त = वजरवट्ट = बजरबट्ट = बजरबट्टु

४३४ बिर्जा ( स्त्रीनाम )

वीर्या = बिर्जा

कारंडव्यूहे नागकन्यानामानि

( ४३५ ) बट्टा

वस्तः ( वस्तिः ) = बट्टा

बट्ट्यांत म्हणजे वस्तींत

( ४३६ ) बट्ट्या

वस्तिकः = बट्टिआ = बट्ट्या

( ४३७ ) बडवर्णे

विधमनं = बिडवणँ = बडवणें

विधमनं = निहननं

(रामायण–सुंदरकांड-सर्ग६०-श्लोक१०)

( ४३८ ) बड ( डा–डी–डें )

वाढ = बड ( डा–डी–डें )

वाढमुष्णं । वाग्भट–अष्टांगहृदय–सूत्र-स्थान–अध्याय ५–श्लोक २८

( ४३९ ) बनी ( स्त्रीनाम )

वनिता = वणिआ = बणी = बनी

४६

('४४० ) बरें कां, बरं कां, बरीक

बरं कं = बरं कां, बरीक

कं निदार्या सुखे वा निपातः

त्याची बरीक नोकरी गेली

बरीक = बरं कां (Do you see)

( ४४१ ) बलूल (आळशी, भित्रा )

(बल + ऊल ) = बलूल

( ४४२ ) बवा

भवत् = बवअ = बवा,

( ४४३ ) बवा, बावा, बोवा बुवा

भवत्=बवअ=बवा, बोवा, बुवा, बावा

( ४४४ ) बस ( निपात )

पशु ( सम्यगर्थे निपातः) = वसु = बसु = बस

बस = उत्तम, पुरे

( ४४५ ) बहुत, बहूत

प्रभूत = पहूत = बहूत = बहूत, बहुत

अस्य लक्ष्मी रपि प्रभूता जाता (धर्मदत्त-चरितम् ) = त्याला द्रव्य हि बहुत जालें

या बहुत शब्दाचा बहु या संस्कृत शब्दाशीं कांहीं एक संबंध नाहीं

( ४४६ ) बळ

वलय = वळ

रोगविशेष

( ४४७ ) बळस

बलासः स्नेहभूस्थिरः ॥

केयदेव–पथ्यापथ्यविबोध

बलास = बळस, बळसा

लहान मुलांच्या घशांतून श्लेष्मा निघतो तो बळस

( ४४८ ) ब्याद ( भांडखोर माणूस )

विवादक = बिआदअ = ब्यादा=ब्याद

व्याधि या शब्दाशीं कांहीं संबंध नाहीं

( ४४९ ) बाई

भगवती = बअवई = बावी = बाई

ये बाई = एहि भगवती

बाई भिक्षा वाढ = भवति भिक्षां देहि

भवती = बअई = बाई

( ४५० ) बात ( हकीकत )

वार्त्ता = वत्ता = बत्ता = बात

( ४५१ ) बात ( अडथळा )

व्याघात = बाहात = बात

हें काम होणार नाहीं म्हणजे काय बात आहे = काय अडथळा आहे.

( ४५२ ) बादली

फालं कार्पासं बादरं ( अमर-द्वितीय-कांड-नृवर्ग १११ )

बादर म्हणजे कापसाचें वस्त्र, कापड

बादरकं = बादल ( ला-ली-लें )

मराठशाईत आहेरार्थ बादली देत असत.

( ४५३ ) बाप

द्व्यात्मन् = बाप्प = बाप

तो माझा बाप आहे म्हणजे तो माझा दुसरा आत्मा आहे.

( ४५४ ) बामणबुवा

ब्राह्मणब्रुवः = बामणबुवा

( ४५५ ) बाबा

भावः = बाबा

( ४५६ ) बावासा

भवादृशः = बावाइसा = बावासा

त्वादृशः = तूसा

मादृशः = मीसा

कृष्णादृशः = कृष्णसा

तात्पर्य हा स ( सा-शी-सें ) प्रत्यय दृश ह्या संस्कृत प्रत्ययापासून आलेला आहे व तो मराठींत वाटेल त्या नामाला लागतो.

( ४५७ ) बास

वयस्य = वअस्स = बास्स = बास

= बाह = बा

विठ्ठलबास, कान्हबास वगैरे नांवें मानभाव ग्रंथकारांत फार. ह्या नांवांतील बास हा शब्द संस्कृत वयस्य शब्दापासून निघाला आहे व त्याचा अर्थ Companion, associate असा आहे.

मराठींत गणबा, गोंदबा, वासबा वगैरे शब्दांतील बा हा अवयव हि ह्या संस्कृत वयस्य शब्दापासून च निघालेला आहे.

( ४५८ ) बासन

भाजन = बासन

बासन म्हणजे भांडें

( ४५९ ) बाहणें

आवाहनं = बावाहणँ = बाहणें

बाहणें म्हणजे बोलाऊन आणणें

हा शब्द जुन्या मराठींत आढळतो.

( ४६० ) बाहार ( फुलांचा )

व्याभारः = बाहार = बाहार

किंवा

भारः = बाहार

( ४६१ ) बाळभट

बाल + भट = बाळभट

( ४६२ ) बिळंभट
बिह्लण = बिल्लुण = बिळम्
बिळम् + भट = बिळंभट
( ४६३ ) बाळंभट
बह्लण = बल्लुण = बाळण = बाळम्
बाळम् + भट = बाळंभट
बाळ म्हणजे मुलगा या शब्दाशीं कांहीं एक संबंध नाहीं.
( ४६४ ) बांडगी, बांड
बन्धकी = बांडकी = बांडगी, बांड
ती बांड आहे म्हणजे पुंश्चली आहे.
( ४६५ ) बांध ( नदीचा )
बंध = बांध
( ४६६ ) बिजौरा
बीजपूरक = बिजौरा
( ४६७ ) बिनसणें
विनश् = बिनस(णें)
कुसंगेन पुत्रो विनश्यति ( धर्मदत्त-चरितम् )
( ३६८ ) बिरड्या ( वालाच्या वगैरे )
विरूढिका = बिरुडिआ = बिरुड्या= बिरड्या
विरूढक म्हणजे मोड आलेलें धान्य.
( ४६९ ) बिलगणें
विलग्न = बिलगणें
( ४७० ) बिशी ( धर्मशाळा, उतरण्याची जागा )
( वि + शी ) विशय = बिशी = भिशी
( ४७१ ) बिंग
व्यंग = बिंग
( ४७२ ) बीड ( लोखंडाचा प्रकार )
कीटाद्दशगुणं मुंडं मुंडात्तीक्ष्णं शताधिकम् ।
कांतं लक्षगुणं प्रोक्तं बिडालं च तदर्धकम् ।।
बिडाल = बीड
( ४७३ ) बीत
द्वितय = बितअ = बीत ( फाशांची )
( ४७४ ) बीद्-बिद्।
विधा ( प्रकार ) = बिद्
अनेकवचन बिदा
त्याच्याजवळ लपंडावच्या किती तरी बिदा आहेत म्हणजे प्रकार आहेत.
( ४७५ ) बुवा
भूतः = बूआ = बुवा, बूआ, बुआ, बोवा, बोआ.
( ४७६ ) बुवा
पुमान् = बुवाँ = बुवा ( पुरुष )
सः पुमान् अब्रवीत् = तो बुवा बोलला.
( ४७७ ) बेची, बेचा
वयस्या = बइच्चा = बेचा, बेची
वयस्यः = बइच्चा = बेचा
बेचा व बेची, हीं दोन मराठींत आवडतीं नांवें आहेत.
( ४७८ ) बेजार
विज्वर = बिज्जर = बेजर = बेजार
विशिष्टः ज्वरः विज्वरः
चिंताविज्वरः = चिंतेनें बेजार
( ४७९ ) बेटें-टा-टी
विथक् ( शैथिल्ये ) = बिठअ = बिटा, बेटा ( टा-टी-टें )
बेटा म्हणजे जलदीं, शीघ्र
( ४८० ) बेटा
द्विता (वैदिक) खरोखर या अर्थी

द्विता = बीटा = बेटा

काय बेटा झालें = किं द्विता संवृत्तं ?

( ४८१ ) बेवड–बीवड

विवृद्ध = विवड्ढ = बेवड = बीवड

उगाच वाढलेलें गवत

४८२ बेस्वाद ( बेचव )

विस्वाद = बिस्वाद = बेस्वाद

( ४८३ ) बिसुमार–बेसुमार

विस्मारं = बिसुमर = बिसुमार = बेसुमार

बेसुमार म्हणजे ध्यान न ठेवितां

बेसुमार काम करतो म्हणजे मागेंपुढें लक्ष्य न ठेवितां काम करतो.

फारसी बेसुमार शब्द निराळा.

( ४८४ ) बेहेडा

विभीतक = बिहीडअ = बेहेडा

( ४८५ ) बेंगरूळ

व्यंगरूप = बेंगरूअ

बेंगरूअ + ल ( स्वार्थक ) = बेंगरूअल

बेंगरूळ

तो मनुष्य बेंगरूळ आहे म्हणजे रूपानें व कृतीनें व्यंग आहे. ह्या शब्दाचा बंगळूर या नगरवाचक शब्दाशीं कांहीं एक संबंध नाहीं.

( ४८६ ) बोक, भोक

वक्त्रं = वोक्कं = बोक, भोक

वक्त्राढ्यं = बोकाड, भोकाड

भोकाड म्हणजे तोंड

( ४८७ ) बोडक ( का–की–कें )

वर्धक = वड्डकं = बोडक ( का–की–कें )

वर्धक म्हणजे कापलेलें, केंस कापलेलें, जिचे केंस कापले किंवा काढले किंवा भादरले आहेत ती बोडकी

ज्याच्या डोक्यावरती केंसांचें किंवा वस्त्राचें आच्छादन नाहीं तो बोडका

ज्याच्या वरती कुसळांचें आच्छादन नाहीं, तें बोडक्याचें भात

( ४८८ ) बोडन्ती

वृध् – वर्ध् कापणें

वदन्तीप्रमाणें वर्धन्ती

वर्धन्ती = वड्डन्ती = वोडन्ती = बोडन्ती

बोडन्ती म्हणजे कापणी, केंसांची कापणी, हजामत ( कुत्सितार्थक )

( ४८९ ) बोडस (आडनांव ब्राह्मण)

वृद्धोक्षः बुड्ढोस्स = बोडोस = बोडस

( ४९० ) बोवा, बावा

भगवत् = बअवअ = बोवा, बावा

अचा उच्चार ओ होऊन

या बवा = एहि भवन्

बुवा आला (पोरांना भीति दाखवतांना)

= भूतः आगतः

ये बावा = एहि भाव

बावा आले = भगवन्तः आगताः

एथें बोवा ! आपलें कांहीं चोलत नाहीं

एथें बोवा ! = अत्रभवन् ! ( संबोधन )

( ४९१ ) ( पुं. ) भगु, बगु

( भाई, विशेषनाम )

भग = भगु, बगु

( ४९२ ) भटंभट

बृहत्तम = भत्तम = भट्टम = भट्टम्

= भटम्

भटम् + भट = भटंभट

( ४९३ ) भर ( संग्राम )

भर इति संग्रामनाम । (निघंटु )

वादाच्या भरांत तो वाटेल तें बरळतो, येथें भर याचा अर्थ युद्ध, संग्राम असा आहे.

( ४९४ ) भरणें

भर्व् ( भर्वति ) अत्तिकर्मा ( निघंटु )

तो अन्न भरतोहे = तो अन्न खातो आहे = सः अन्नं भर्वति

(प्रयोजक) आई मुलाला अन्न भरवते.

( ४९५ ) भलंदन

भलंदन हें एका ऋषीचें व गोत्राचें नांव आहे. भलंदन म्हणजे मराठींत अगडबंब पुरुष

( ४९६ ) भलारी

भारहारः = भाळार = भलारी

भलारी म्हणजे भारा वाहणारा पानांचा वगैरे

( ४९७ ) भागी ( स्त्रीनाम )

भागधेयी ( संस्कृत स्त्रीनाम ) = भागी ( धेय गळालें )

( ४९८ ) भागी ( स्त्री )

भागीरथी = भागी ( एकशेष )

( ४९९ ) भारंगी

भार्गी = भारगी = भारंगी

( ५०० ) भारीस ( सा-शी-सें )

भृश = भारिस ( सा-शी-सें )

( ५०१ ) भिकुभट

भिक्षु = भिख्खु = भिकु

( ५०२ ) भिकंभट

भीष्म = भीख्म = भिकम्

भिकम् + भट = भिकंभट

( ५०३ ) भिझवणें

अभिध्या = भिज्झा = भिज

देवानां भिजवा=देवान् अभिध्यायथ

( ५०४ ) भीड, भिडू

अभीष्टा = भिट्ठ = भिडा ( स्त्री )

सार्थवाहस्य अभीष्टः = सार्थवाहाच्या भिडेचा

(खेळांत) माझा भिडू = मे अभीष्टः

( ५०५ ) भुईआंवळी

भूम्यामलकी = भुईआंवळी

( ५०६ ) भुईपोई

भूम्युपोदका = भुईपोई

( ५०७ ) भेदरणें

विद्रवणं = विदरणँ = बेदरणें = भेदरणें ( फार डरणें )

( ५०८ ) भेदरणें

भीदरणं = भेदरणं ( भीतीनें डरणें )

( ५०९ ) भुर (रा-री-रें)

बभ्रु = भुर ( रा-री-रें )

अ चा व उ चा विपर्यय

( ५१० ) भुरक ( का-की-कें)

भृतक = भुरअक = भुरक ( का-की-कें )

भुरका म्हणणे द्रव्य घेऊन तेवढ्यापुरतें काम करणारा

( ५११ ) भोकाड ( तोंड )

बुक्क = बोक्क = भोक

विस्तारदर्शक भोकाड

त्यानें भोकाड पसरलें म्हणजे त्यानें तोंड वासलें

( ५१२ ) भोत

पोत = वोत = बोत = भोत

( ५१३ ) भांडवल

भांडपद्म् = भांडवड= भांडवल

( ५१४ ) मनाई, मनी (स्त्रीनाम), मनू

मनायी ( मनोः स्त्री ) = मनाई = मनी

मनावी ( मनोः स्त्री ) = मनाउई= मनू

( ५१५ ) मनी, मनु

मनसा = मणहा = मणी = मनी, मनु
(कारंडव्यूह किन्नरकन्यानामानि)

( ५१६ ) मर्वा

मरुबक = मरुअअ = मर्वा

( ५१७ ) मळवटा

मलपट्टः = मळवटा

कपाळाला मळवटा भरणें म्हणजे वेढथ कुंकू किंवा गंध लावणें

( ५१८ ) मागवाला

मार्गपालः = मागवाला

( ५१९ ) मातक्यान्

माकीम् = मात्कीम् = मातकियान्
= मातक्यान्

( ५२० ) मातेरें

( मृत्तरं ) मार्त्तर्यं = मात्तरँ = मातेरें
मृत्तिकेहून हि वाईट अशी दशा किंवा
( मृततरं ) मार्ततर्यं = मातअरँ
= मातेरें मृत्यूहून हि वाईट अशी दशा

( ५२१ ) मात्रा

मात्रा म्हणजे पोटभर मित अन्न, मोजकें अन्न. आम्ही दिवसांतून एकदां मात्रा देतों, असा भाषणसंप्रदाय आहे. येथें मात्रा म्हणजे मिताहार

( ५२२ ) मारू

माङ् ऋधक् = मारू
ऋधक् सत्ये निपातः
मारू म्हणजे खरे तर, उत्तम, बेश

( ५२३ मुग्दळ

मुद्गदलं = मुग्गदळ = मूगदळ = मुग्दळ

( ५२४ ) मुधलीं, मुदलीं

मुधा ( व्यर्थे निपातः ) +ल ( स्वार्थे ), = मुधाल = मुधली, मुदली, मुदलांत, तो मुधली हें काम करीत नाहीं
मुधली म्हणजे व्यर्थ

( ५२५ ) मुसकी

मुष्कः ( अंडकोशः ) मुसक
स्त्रीलिंग ( मराठी ) मुसकी
गवादि मांजराची मुसकी वैदू लोक विकतात. मुसकी म्हणजे अंडकोश

( ५२६ ) मुसमुशित

मृत्स्नमृत्स्नित = मुसमुशित

( ५२७ ) मुळा

मूलक = मुळा

( ५२८ ) मेढी

मेधिन् = मेढी

हें महाराष्ट्रब्राह्मणांत आडनांव आहे.

( ५२९ ) मैलापूर

महिलापुरं = मैलापुर ( मद्रास शहाराचा एक भाग )

( ५३० ) मोजणें ( सहन करणें )

मृष् = मुस = मुझ = मोझ = मोजणें

मा त्याला मोजीत नाहीं=अहं तं न मृष्ये

गणनाथर्क मोजणें मेजणें हे शब्द निराळे.

( ५३१ ) मोरावळा, मुरांबा, मोरांबा

मूर्ताम्लः = मूर्रआवळा = मोरावळा
= मूर्रआम्ब = मोरांबा

मोरांबा किंवा मोरावळा या शब्दांतील आंबा, आंवळा ह्या शब्दाचा आंबा किंवा आमलक या शब्दांशीं कांहीं एक संबंध नाहीं. मोरांबा किंवा मोरावळा जसा आंब्याचा किंवा आवळ्याचा करितात, तसा सफरचंदाचा, खारकेचा किंवा इतर अनेक फळांचा करतात व त्या त्या फळांच्या साखरेंत मुरविलेल्या त्या त्या आम्लास त्या त्या फळाचा मोरावळा किंवा मुरांबा ही संज्ञा देतात.

( ५३२ ) मोळी

मौली = मोळी

मौले गता मौली

डोक्यावर असलेली ती मोळी, डोक्यावरील ओझें

( ५३३ ) मंचर

महत्सरः = मच्चर = मंचर

हें जुन्नराजवळील एका गांवाचें नांव आहे. ही व्युत्पत्ति जर खरी असेल, तर पुरातन काळीं येथें मोठें सरोवर असावें.

( ५३४ ) म्हणून ( निपात )

माङ् अन्वक्=माङअनू =माङून=मनून
= म्हणून

माङ् = मग

अन्वक् म्हणजे नंतर

म्हणून म्हणजे मग नंतर

तो दारू प्याला, म्हणून मेला = मग नंतर मेला

( ५३५ ) यंव

एवं ( निपात उक्तपरामर्शे ) = यंव

अनवक्रमौ

( ५३६ ) रडतान ( भावे )

अनध्यायो रुद्यमाने समवाये जनस्य च
॥ १०८ ॥ (मनु–चतुर्थाध्याय )

रुद्यमाने रोदनध्वनौ । भावे लकारः ।
( कुल्लूक )

रडतांना पढूं न ये, या वाक्यांत रडतांना हें रूप भावे रडतान या कृदन्ताचें सप्तमीचें रूप आहे.

मराठींत भावे, कर्मणि व कर्तरि एक च रूप होतें

( ५३७ ) राघू

राघू ( नाम ) म्हणजे कर्ता माणूस. त्याचें ममतादर्शक रूप राघू

राघू = राघ = राघू

तो काय राघू आहे= तो मोठा कर्तासवरता आहे

(५३८)राजमान्या(मराठ्याचें आडनांव)

राजानं मन्यः = राजमान्या

( ५३९ ) राड

द्राड् तुकडे तुकडे करणें

द्राड् = राड

( ५४० ) रामवाडी

आरामवाटिका = रामवाडी

( ५४१ ) रावत्या ( शूद्रनाम )

रेवत्याः अपत्यं पुमान् रैवतिकः

रैवतिक = रैवतिअ = रैवत्या = रावत्या

( ५४२ ) रिठा

अरिष्टक = रिठा ( अलोप )

( ५४३ ) रुकार

रै करोति ( अव्ययप्रकरणम्, ददाति )
= रुकारतो

रुकारणें म्हणजे देणें, होय म्हणणें.

( ५४४ ) रुखरुखित

रूक्षरूक्षित = रुखरुखित

( ५४५ ) रुचीबेरुची

रुचिविरुची = रुचीबेरुची

विरुचि वाईट रुचि

( ५४६ ) रूपबेरूप

रूपं विरूपं = रूपविरूप = रूपबेरूप

फारशी बे शीं कांहीं संबंध नाहीं.

(५४७) रुप्या (मारवाडी पुरुषाचें नांव)

रूप्यः = रुप्या ( मूलार्थ सुंदर )

( ५४८ ) रोख

अपरोक्ष = रोख ( अ व प यांचा लोप )

अपरोक्ष निंदा म्हणजे रोख निंदा

( ५४९ ) रोशेल

रोहिसतैल = रोइसएल = रोशेल = रोशेल

( गर्दे-वाग्भट )

( ५५० ) लखभट

लक्ष = लख्ख = लख

लख + भट = लखभट

लख्या, लखु, लख्या वगैरे अपभ्रंश आहेत.

( ५५१ ) लखंभट

लक्ष्मण = लखण् = लखम्

लखम् + भट = लखंभट

( ५५२ ) लखणशेट

लक्ष्मण = लख्खण = लखण

लखणशेट व शिरळशेट या शब्दांचा अर्थ एक च

( ५५३ ) लबक ( देशविशेष )

लंपाक किं कंपसे

(प्रतापरुद्रीयम्)

तिबेटाच्या बाजूला लब्याक, लबक नांवाचा प्रांत आहे

( ५५४ ) लाख-लाख्या

लाघ्, लाखृ सामर्थ्ये

लाख = लाख

लाख माणूस म्हणजे समर्थ माणूस

लाख्या बारगीर म्हणजे समर्थ शूर शिपाई

लायक या फारशी शब्दापासून ल्याक् हा शब्द मराठींत आला आहे. त्याचा व समर्थार्थी लाख शब्दाचा कांहीं एक संबंध नाहीं

( ५५५ ) लाघवी ( हांजी हांजी करणारा, मर्जी संपादन करणारा )

श्लाघाविन् = लाघावी = लाघवी

लाघावी व लाघवी हीं दोन्हीं रूपें भाषेंत प्रचलित आहेत.

( ५५६ ) लाज ( कासोटा )

( पुं. ) लंज ( कासोटा ) = लाँज = लाज ( स्त्री )

त्यानें लाज सोडिली आहे म्हणजे त्यानें कासोटा सोडला आहे.

कोणी बाई म्हणतेः–त्यानें माझी लाज काढिली म्हणजे त्यानें माझा कासोटा फेडिला.

( ५५७ ) लाडी ( स्त्रीनाम )

लडहा ( सुंदर ) = लाडी

( ५५८ ) लाँच

( स्त्री ) लंचा = लाँच ( स्त्री )

( ५५९ ) लांबबिंब

लंबविलंब = लांबवींब = लांबबिंब

विलंब = विअंब = बिंब

( ५६० ) लिवणें

लिप् = लिव

संस्कृतांत लिहिणें या अर्थी दोन धातू आहेत, लिख् व लिप्. लिख्पासून लिहिणें व लिप्पासून लिवणें. लिवणें हा शब्द महाराराष्ट्रांत ब्राह्मणेतर जाती हमेश योजतात, व हा शब्द शुद्ध आहे, लिहिणें या शब्दाचा अपभ्रंश नाहीं.

( ५६१ ) लुची

रुचित = लुचिअ = लुची

श्राद्धांत रुचितं म्हणून तृप्तिप्रश्न कारितात.

लुची जीभ म्हणजे रुचकर अन्न खाणारी जीभ.

( ५६२ ) लुसलुशीत

श्लक्ष्णश्लक्ष्णित = लुसलुशित



( ५६३ ) लोढणें

अवगारं अंतःपुरं अवरोधनं ( अमर–द्वितीयकांड–पुरवर्ग ११ )

रोधन = लोढण

लोढण म्हणजे स्त्री

वडिलांनीं आमच्या गळ्यांत हें लोढणें अडकविलें आहे म्हणजे स्त्री अडकविली आहे. लोढणें ( रोधन ) याचा अर्थ प्रतिबंध असा हि आहे. त्यामुळें हा शब्द मराठींत हि द्व्यर्थक आहे.

( ५६४ ) वचक-वचकणें

वष्क = वसक = वचक

वष्कन = वचकणें

वष्क म्हणजे पहाणें

( ५६५ ) वागणें

वगि गतौ। धातुपाठे भ्वादिः ।

वग = वागणें म्हणजे चालणें

तो कसा वागतो म्हणजे चालतो

( ५६६ ) वाघांटी

व्याघ्राटक = वाघांटी

( ५६७ ) वाटी ( घुडघ्याची )

( वैदिक ) अष्ठीवत् = अठि = आठि = वाटी

( ५६८ ) वादवीद

वादविवाद = वादवीआद = वादवीद = वादव्याद

( ५६९ ) वापवणें ( धोतर )

वै–वायति–वापयति ( शोषणें ).

वापन = वापवणें

नवें कोरें धोतर धुणें, शुष्क करणें।

( ५७० ) वायस

वयस् = वायस ( सर्व पक्षी, केवळ कावळा च नव्हे )

सर्व पक्षी ह्या अर्थी हा शब्द तुकाराम योजितो.

( ५७१ ) वारूळ

श्लीपदं पादवल्मीकं ॥

वल्मीक = वारूळ

( ५७२ ) विटी ( दांडू )

वीटा = इटीदांडू खेळण्याचा लाकडाचा दोन चार बोटांचा तुकडा

आ = ई ( मराठी स्त्रीलिंग )

( ५७३ ) विणणें विणणें

वयति विवयति = विणणें विनणें

विनणें निरर्थक जोड शब्द नाहीं.

( ५७४ ) विरजणें

विरंजन = विरंजणें

दूधाचें रूपरंग बदलणें म्हणजे विरजणें

विरजण म्हणजे दूधाचें रूपरंग बदलणारी वस्तु आम्लादि.

( ५७५ ) विचकटणें, विसकटणें, विसकडणें

वि-स्कंद् = विचकड = विचकट = विसकट

विष्कंदन = विचकटणें

विष्कंद म्हणजे चारी दिशांनीं उधळून देणें.

( ५७६ ) विचकणें

विकचीरु = विचकणें

( ५७७ ) विचकून ( पहाणें )

विचक्ष् म्हणजे सूक्ष्म दृष्टीनें पहाणें

विचक्षण = विचकणें

( ५७८ ) विजवट (टा–टी–टें )

विजयवर्तिका=विजवट्टिआ = विजवटी

विजयवर्तिक = विजवट्टिअ = विजवटा

( ५७९ ) विजवटा ( अति शहाणा, लक्षणेनें अति मूर्ख )

विद्यावत् = विज्जावट = विजवट (टा–टी–टें )

( ५८० ) विधुर

विगतः धवः यस्याः सा विधवा ।

विगता धुरा यस्य सः विधुरः ।

धव म्हणजे नवरा; धुरा म्हणजे बायको.

धू धातूपासून धव व धुरा हे शब्द निघाले आहेत. धवन करणारा जो तो धव; धवन करून घेणारी जी ती धुरा.

( ५८१ ) विसकरणें

विष्किर = विसकिर = विसकर

विसकरणें

( ५८२ ) विसमणें, विसंबणें

विश्रमण = विसमणें, विसंबणें

विश्रामः = विसावा

( ५८३ ) विसावण ( ऊन पाण्यांत )

( वि + शो पातळ करणें )

विश्यान = विसाण, विसावण

पाण्यांत विसाण घालणें म्हणजे थंड पाणी घालून ऊन पाणी पातळ, क्षीण करणें.

( ५८४ ) विसंभणें

विश्रंभणं = विसंभणें

( ४८५ ) विळखणें

विलक्षणं = विळखणें

मी त्याला विळखणें असा प्रयोग आढळतो.

( ५८६) विळखा

( स्त्री ) विश्लिक्षा = विळिखा = विळखा ( पु. )

( ५८७ ) वेचणे बेचणें

वेचनं विवेचनं = वेचणें बेचणें

( ५८८ ) वेडझवा

एडधवः ( बहिरा नवरा ) = एडझवा

( ५८९ ) वेडबंब

एडबंबः = वेडबंबः

( ५९० ) वेडामुका

एडमूकः = वेडामुका

( ५९१ ) वेणा ( प्रसूतीच्या )

वेदना = वेअणा = वेणा

( ५९२ ) वेसवा

वेशः पण्यस्त्रिया भृतिः। तया यो जीवति स्त्री पुमान् वा स वेशवान् ।
( मनु–चतुर्थाध्याय- ८४, कुल्लूक )

वेशवान् = वेसवा

वेसवा म्हणजे कुंटीण किंवा कुंटण

( ५९३ ) वेळणी

विल आछादणें

वेलनी = वेळणी

( ५९४ ) वैरणें

( वि + ईर ) वीरणं = वैरणें

भात वैरणें म्हणजे भात भांड्यांत घालणें.

( ५९५ ) व्याजबीज

व्यायव्ययः = व्याजबीज

आय = आज

विआय = व्याज

विशेषेण आयः = व्यायः

व्यय = बीज

( ५९६ ) शपत् ( निपात )

शंवत् ( अंतःकरणे, अभिमुख्ये )=शपत्

येईल तर शपत् इत्यादि वाक्यांत हा निपात मराठींत आढळतो.

( ५९७ ) शहाण ( णा–णी–णें )

विचक्षणवतीं वाचं वदेत् ( ऐतरेय ब्राह्मण )

वेदकालीं कोणाला हि कांहीं काम सांगतांना असे शब्द योजीतः—

" देवदत्त, विचक्षण, गां आनय "

म्हणजे देवदत्त या संबोधनापुढें विचक्षण हें विशेषण उच्चारीत.

( विचक्षण ) चक्षण = सहण = शहाण

देवदत्ता, शहाण्या, गाय आण.

हा प्रयोग सध्यां हि आपण मराठींत करतों

( ५९८ ) शाम्या

शर्मन् = शाम्या

( ५९९ ) शाई

श्यावा = श्याई = शाई

शामिका = शाइआ = शाई

शाई म्हणजे काळा रस हा प्रथम अर्थ. नंतर कोणत्या हि रंगाच्या लिहिण्याला योग्य अशा रसास शाई हें नांव पडलें.

( ६०० ) शाळू

शयालु = श्यालु = शाळू

( ६०१ ) शिसव, शिसू

शिंशपा = शिसवा = शिसव = शिशवी

( ६०२ ) शिकरण

शिखरिणी = शिकरण (केळ्याची वगैरे)

( ६०३ ) शिबें

सिध्म = सिब्व = शिबें

( ६०४ ) शिरकणें

स्रेरु गतौ । धातुपाठ. भ्वादिः ।

स्रेक् = शिरक्

तो इकडे शिरकत नाहीं म्हणजे गमन करीत नाहीं. शिरणें धातू निराळा.

( ६०५ ) शिरळशेट–शिराळशेट

श्रीलश्रेष्ठिः = शिरळ शेट = शिराळशेट

शिराळशेट म्हणजे धनाढ्य शेट

श्रील हें विशेषनाम हि आहे सामान्य-नाम हि आहे.

( ६०६ ) शिवर ( रा–री–रें )

शपिरः = शविरा = शिवरा ( शिव्या देणारा, तोंडाळ )

( ६०७ ) शिंकणें

शृंख् ( शिंकणें ) = शिंक

(आपस्तंबीय धर्मसूत्र)

( ६०८ ) शिंवशिंवणें

चिमिचिमायते = शिंवशिंवते

( ६०९ ) शेक

सेक = शेक

अग्निसेकः = आगीचा शेक=अग्नीयशेक

( ६१० ) शेंज ( ओळी, अन्योन्य-संनिकर्ष )

शय्या = शेज

या पदानां परान्योन्यं मैत्री शय्येति कथ्यते। (प्रतापरुद्रीययं–काव्यप्रकरणम्)

पुस्तकें एका शेजेनें लावणें, म्हणजे ओळीनें एकमेकांना चिकटून ठेवणें.

( ६११ ) शेतभात

क्षेत्रभक्तिः = शेतभात

भक्ति म्हणजे तुकडा, भाग

भात म्हणजे तांदूळ या शब्दाचा येथें कांहीं एक संबंध नाहीं.

( ६१२ ) शेवगा, शेगवा

शिग्रा = शेगवा, शेवगा (गर्दे–वाग्भट)

( ६१३ ) श्रु { श्रवति = सराव
अश्रुणोत्=सुनणें,सुनावणें

( ६१४ ) सई

सती = सई

सईबाई = सती

( ६१५ ) सई

सखि = सहि = सइ = सई

कसा जातो पाहूं तो सई = कथं गच्छति पश्याम स्तावत् सखे

सई या शब्दाचें संबोधन सये

सई हा शब्द पुलिंगी हि आहे व स्त्रीलिंगी हि आहे. सया, सय्या हे हि शब्द सखि शब्दापासून निघाले आहेत व ते लावण्यांत अर्थात च फार येतात.

( ६१६ ) सखुली ( ममत्वदर्शक )–ला–लें

सखी शब्दाचें ममत्वदर्शक सखु

सखु + ल = सखुल ( ला–ली–लें )

( ६१७ ) सज्जीखार

स्वर्जिकाक्षार = सज्जिआखार
= सज्जीखार

( ६१८ ) सफेत

श्वेत = सवेत = सपेत = सफेत

सफेत हा फारशी शब्द संस्कृतांतून फारशी भाषांत गेलेला आहे.

( ६१९ ) समधात

समधातु = समधात

त्याची प्रकृति समधात आहे = तस्य प्रकृतिः समधातुः

( ६२० ) सयाजी

सख्यः = सय्या
किंवा सखि = सया
बहुमानार्थी सय्याजी किंवा सयाजी

तात्पर्य सयाजी हा शब्द संस्कृत सख्य किंवा सखि ह्या दोन शब्दांपासून मराठींत आला आहे.

( ६२१ ) सवाशे ( ब्राह्मण )

ब्राह्मण्यां जायते वैश्याद्योसौ वैदेहिकाभिधः। शूद्रान्ते रक्षणं राज्ञा कुर्यादनुपमो हि सः ॥ सामान्य-वनिताः पोष्या स्तासां भाटी च जीविका। तस्योक्ता शूद्रधर्माणां नाधिकारोऽस्ति कश्चन ॥ सावासी ॥
(जातिविवेक)

सावासी = सवाशे (अनेकवचन)

( ६२२ ) सळ ( पोटांत )

शल्य ( शरीरांत घुसलेली बाह्य वस्तु )
= सळ, सल

ल्य = ळ किंवा ल

( ६२३ )

सहस् = सहज
सहज म्हणजे शीघ्र

( ६२४ ) सहजात

सहसा = सहजा = सहजात
त आगंतुक

( ६२५ ) सहजा सहजीं

सहसा सहसि = सहजा सहजीं

( ६२६ ) संचळ ( खार )

सौवर्चल = सौच्चळ = संचळ

( ६२७ ) साखरनिंबू

शर्करानिंबूक = साखरानिंबू = साखरलिंबू

( ६२८ ) साठीचें भात

षष्ठिकः = साठी

( ६२९ ) सारखा

साक्षात् ( प्रत्यक्षे ) = साखा र मध्यें येऊन सारखा

तो सारखा बघत होता = सः साक्षात् पश्यन् आसीत्

( ६३० ) साल ( झाडाची त्वचा )

शल्क ( नपुंसक ) = साल ( स्त्री )

( ६३१ ) साळवन ( वनस्पति )

शालिपर्णी = सालवन

( ६३२ ) सांगणें पांघणें

संख्यापनंप्रख्यापनं = सांघणेंपांघणें

( ६३३ ) सांडगा

शांडाकः = सांडगा

( ६३४ ) सांवरी

शाल्मली = सांवरी

हा वृक्ष निराळा सालच्याहून

( ६३५ ) सांवरी

शंबरी = सांबरी = सांवरी

( ६३६ ) सांडस

संदंश = सांडस ( वाग्भट–यंत्रविधि )

( ६३७ ) सी–स

आसात् इति अंतिकनाम ( निघंटु )

आस ह्याची पंचमी आसात्

आस ह्याचा सप्तमी आसे

गृहस्थ आसे = घरा + आसीं =घरासीं
= घरास

त्या घरास परसूं आहे म्हणजे त्या घराजवळ परसूं आहे.

हें स–सी प्रवचनीय मराठींत वैदिक आसात् या अव्ययापासून आलेलें आहे.

( ६३८ ) सुग्रण

सुग्रहिणी = सुग्रण

ती, बाई, सुग्रण आहे हो म्हणजे ती सुग्रहिणी आहे, संसार दक्षतेनें पाहणारी आहे.

( ६३९ ) सुट ( टा–टी–टें )

स्वस्थ = सुट्ठ = सुट

सुटा मनुष्य, सुटी बाई, सुटें मूल.

सुटी बाई सैंपाकाला हवी = स्वस्था स्त्री स्वयंपाकाय भाव्या

( ६४० ) सुनवाहिरी

शूनबधिरता = सुनवहिरी

शून म्हणजे सुजलेलें

( ६४१ ) सूर

स्वर = सूर

स्वरवाहनं = सूर वाहणें

( ६४२ ) सूं

शु ( शैघ्ये ) = सू = सूं

( ६४३ ) सोख

शोप = सोख

शरीरशोष = शरीरसोख

पाण्याचा सोख म्हणजे पाण्याचा शोष

( ६४४ ) सोद ( दा–दी–दें )

स्वद ( सुष्टु अत्ति ) = सोद ( दा–दी–दें )

चांगलें खाणार ( रा–री–रें )

सोदी जीभ म्हणजे चांगलें मिष्टान्न खाण्याला सवकलेली जीभ

श्राद्धांत, स्वदितं ? असा प्रश्न श्राद्धदेवांना करतात

( ६४५ सोनी–सोन्ही ( बालिका नाम)

सुस्नाता = सुण्हाआ = सोण्ही = सोन्ही = सोनी किंवा

सुवर्णा = सुअण्णा = सोण्णा = सोणी-सोनी

( ६४५ ) सोदा

शूद्रक = सूद्अ = सोदा

अरे सोद्या, म्हणून लहान मुलांना म्हणतात

शूद्रक म्हणजे लुच्चा शूद्र

( ६४६ ) सोसवाहुली

सोत्सुक = सोत्सुअ = सोस

भावुक = भाउअ = बाहु

बाहु + ल ( बाहुल )

( स्त्री ) बाहुली

सोस + बाहुली = सोसबाहुली ( सोत्सुकभावुका )

कोणत्या हि पदार्थाविषयीं अत्यंत उत्सुक मुलीला हा शब्द लावितात.

( ६४८ ) सोळें

शुक्ल = सुकल = सुअळ = सोळ (-ळा-ळी ळें ), सोवळें

सोळें वस्त्र म्हणजे शुक्ल वस्त्र

( ६४९ ) सोम्या

आयुष्मान् भव सौम्य । असा आशीर्वाद संस्कृतांत प्राचीन कालीं देत. कोणाला ही सौम्य म्हणत. ह्या सौम्य शब्दापासून मराठी सोम्या शब्द निघाला आहे.

. सौम्यक = सोम्या

( ६५० ) सोंग

स्वंगा = सोंग ( लक्षणेनें कुरूप स्त्री )

शोभनं अंगं यस्याः सा स्वांगा

( ६५० ) सोंगळ

सुमंगल = सोंगळ

( ६५१ ) स्वछ उज्वळ

स्वच्छं उज्ज्वलं = स्वच्छ उजळ

( ६५३ ) ( झाडणें ) सँवाँरणें

संमार्जनं = सँवाँरअणँ = संवारणें = संवरणें

( ६५४ ) हट् ( संबोधने, निपात )

अट् = हट्

अट् ( अव्ययप्रकरणम्, संबोधने )

( ६५५ ) हणतो बिणतो

हन्ति विहंति = हणतो बिणतो

विहन = बिअण = बिण

विहनन = बिअणण = बिणणें

बिणतो हा कांहीं तरी जोड शब्द नाहीं.

हाणतोबिणतो म्हणजे हाणतो जोरानें हाणतो.

( ६५६ ) हमजू, हमजा

अहंयु ( लढवय्या ) = हंजू = हमजू-हमजा

हमजा हे नांव मुसलमानांत आहे, परंतु तें संस्कृतोत्पन्न आहे.

( ६५७ ) हसतो बिसतो

हसति विहसति म्हणजे हसतो व थट्टा करतो.

( ६५८ ) हळवें ( भात )

लघीयस् = हळवें

तयार होण्याला थोडा काल लागणारें भात.

( ६५९ ) हायच ( चा-ची-चें )

इहत्य = हैच्च = हायच (चा-ची-चें)

हा शब्द गांवढे सध्यां योजतात

हायचा म्हणजा इथचा

( ६६० ) हाट्ये

हाटिकः = हाटिआ = हाट्या

अनेक वचन हाट्ये, हाटे

हें आडनांव महाराष्ट्रांत आहे.

बाजारांत व्यापार करणारा जो तो हाट्ये.

( ६६१ ) हाँ ( अव्यय )

ह (वैदिक) = (अकच्क) = हक
= हअ = हा = हाँ

तो आला हाँ = स आयातः ह
त्वं ह तत्र गछ = तूं हाँ तेथें जा
त्वं तत्र ह गछ = तूं तेथें हाँ जा
त्वं तत्र गछ ह = तूं तेथें जा हाँ

( ६६२ ) हैबत (पुरुषनाम मराठ्यांत )
अहीवत् = हैबत ( राव )

( ६६३ ) होकार

साधुकारः = हाहुकार = होकार
तेन साधुकारः दत्तः = त्यानें होकार दिला

( ६६४ ) होय बा, हो बा

हो बत = होबअ = होबा, होय बा

( ६६५ ) हिंव्या (हींव ज्याला येतें तो)
हिम्यः = हिंव्या

( ६६६ ) हुडुत्

( सं.) हुडुत् म्हणजे बैल

* अन् + हुडुत् = अन् + उडुत् = अनुडुत् ( किंचित् न्यून ऊन असा हुडुत् )

( ६६७ ) हुडुत तुझा बा झवँ

हुडुत् तव पिता तावत् किंवा यावत् = बैल तुझा बाप तर ह्याहून या वाक्यांत जास्त गर्ह्य भाग नाहीं. हुडुत्, झवं वगैरे शब्दांचे अर्थ न कळल्यामुळें हीं असलीं वाक्यें गालिप्रचुर भासतात. महाराष्ट्रांत असलीं वाक्यें रागांत, थट्टेंत लहानथोरांच्या बोलण्यांत हमेशा येतात. त्यांचा खरा अर्थ न कळल्यामुळें महाराष्ट्रांतील सरसगट सर्व लोक अभद्र भाषण करणारे असतात, असा कित्येक परदेशीयांचा अभिप्राय पडला. तो अर्थात् अज्ञानजन्य होता, हें उघड आहे.

( ६६८ ) हुळा ( हरभऱ्याचा )

होलक = हुलअ = हुळा

( ६६९ ) हेटकर

हेतिकर = हेटिकर = हेटकर
हेति म्हणजे कुऱ्हाड, परशु

( ६७० ) हें ( अव्यय )

इति = इइ = ई = ही = हें
अहं गछामि इति उक्त्वा = मी जातों हें म्हणून; वयं गच्छामः इति उक्त्वा = आम्ही जातों हें म्हणून;
येथें इति व हें अव्ययें आहेत.

( ६७१ ) होपण ( निपात )

अहोबत = होपत = होपण

( ६७२ ) हौस

अवस् ( वैदिक तृप्ति ) = हवस = हौस

मनिची हौस म्हणजे मनाची तृप्ति

## ८२ शक ६९० मधील १ ला कृष्णराज राष्ट्रकूट याचा ताम्रपट

(रा. खं. चिं. मेहेंदळे)

१ या ताम्रशासनाचे तीन जाड पत्रे आहेत. या तीन पत्र्यांस डावे अंगास मुद्रेची कडी घालण्यासाठीं भोंक पाडलें आहे, ही कडी तोडून पत्र्यांतून मोकळी केली आहे; तिजवर कमलस्थित लक्ष्मीची मूर्ति जोडाचे ठिकाणीं मुद्रा म्हणून कोरली आहे. मूर्तीस दोन हात आहेत. राष्ट्रकूटांचीं इतर ताम्रशासनें छापलेलीं आहेत त्यांत कांहींत गरुड-मुद्रा आहे व कांहींत विष्णु-मुद्रा आहे. पत्र्यांची लांबी १३॥ इंच, रुंदी ७ इंच व जाडी सुमारें $\frac{1}{8}$ इंच आहे. यांतील लिपी शक ६९७ मधील पिंपरी येथील राष्ट्रकूटांचे ताम्रपटांतील लिपीसारखी च आहे.

हा ताम्रपट शक १८३४ त आश्विनमासीं रा० रा० पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांस कसबे तळेगांव ढमढेरे येथें रा. श्रीपती विश्वनाथ कासार यांचे जवळ सांपडला. यांत कांहीं अक्षरवटिका भूम्यंतर्गत क्षारानें पुसट झाली आहे. हा अस्पष्ट भाग राष्ट्रकूटांच्या प्रसिद्ध झालेल्या इतर ताम्रशासनांतील भागांवरून रा० रा० देवदत्त रामकृष्ण भांडारकर व प्रो. काशीनाथ बापू पाठक यांचे साहाय्यानें लावला आहे.

आजपर्यंत राष्ट्रकूट घराण्यांतील पहिला कृष्णराज यानें खुद्द दिलेलें ताम्रशासन उपलब्ध झालें नव्हतें. राष्ट्रकूटांच्या दानपत्रांतील बरेचसे श्लोक या दानपत्रांत आलेले आहेत; तीन चार नवीन आहेत. या शासनांतील "पूनकविषयान्तःपाति" हा उल्लेख पुणें प्रांतांतील लोकांच्या दृष्टीनें कौतुकाचा व ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचा आहे. हा पुणें प्रांत केवळ नांवावरून इतका जुना मानण्यास खात्रीचीं साधनें आजवर उपलब्ध नव्हतीं.

हल्लींप्रमाणें त्या वेळीं हि हें पुणें त्या नांवानेंच मोडणाऱ्या प्रांताचें मुख्य ठिकाण असावें. या शासनांत उल्लेखिलेल्या गांवांचीं वगैरे नांवें थोड्याशा अपभ्रष्ट रूपानें सध्यां हि प्रचारांत आहेत.

या शासनांत राजसिंघ, कक्कराज, किष्णराज, भित्यं:, अट्ट वगैरे रूपें प्राकृत उच्चाराप्रमाणें लिहिलेलीं आहेत. ही गोष्ट हि मननीय आहे.

या शासनांत आलेलें राष्ट्रकूटवंशवर्णन या च राजांच्या इतर शासनांत आलेल्या वर्णनाशीं अगदीं जुळतें आहे. अकालवर्ष शुभतुङ्ग कृष्ण यांचा मुलगा वल्लभ

ऊर्फ गोविंदराज—ज्याला जैनांचे हरिवंश पुराणांत वल्लभ असें म्हटलें आहे—याचे विज्ञप्तीवरून त्याच्या बापानें हि ब्राह्मणांस देणगी ( ब्रह्मदाय ) दिलेली आहे. हें दान जेव्हां दिलें त्या वेळीं गङ्गराजांचे वर केलेल्या स्वारींत विजय पावून मण्णनगर येथें सैन्याचा तळ पडला होता. ही गङ्गराजांवरील स्वारी व विजय ह्या गोष्टी राष्ट्रकूटांचे चरित्रांत नवीन आहेत (Bombay Gazetteer Vol. I Part 2 Page 389 ).

पत्रा पहिला आंतील बाजू ।

१ ॐ स्वस्ति स वोव्याद्वेधसा धाम यन्नाभिकमलं कृतं [ । ] हरश्च यस्य कान्तेन्दुकलया कंमलंकृतं [ ॥ ] आसीद्विषत्ति

२ मिरमुँद्यतमण्डलाग्रो ध्वस्तिन्नयं(य)न्नभिमुखो रणशर्वरीषु [।] भूपः शुचिर्व्विधुरिवाप्तदिगन्तकीर्त्ति

३ गोविन्दराज इति राजसु राजसिङ्घः ॥ तस्यात्मजो जगति विश्रुतदीर्घकीर्त्तिरार्त्तार्त्तिहारि [ ह ]

४ रिविक्रमधामधारी [ । ] भूपस्त्रिविष्टपनृपानुकृतिः कृतज्ञ [ : ] श्रीकक्कराज इति गोत्रमणिर्ब्बभूव ॥

५ तस्य प्रभिन्नकरटच्युतदानदन्तिदन्तप्रहाररुचिरोल्लिखितांसपीठः [ । ] क्ष्मापः क्षि

६ तौ क्षपितशत्रुरभू [ त् ] तनूजः सद्राष्ट्रकूटकनकाद्र [ द्रि ] रिवेन्द्रराजः ॥ तस्योपार्जिततपस

७ स्तनयश्चतुरुदधिवलयमालिन्या [ : । ] भोक्ता भुवः शतक्रतुसदृशः श्रीदन्तिदुर्ग्गराजोभूत् [ ॥ ]

८ यस्याजौ राजसिंघ( ह )स्य वित्रस्ता वैरिवाराणात् [ । ] स्तं ( तं ) लज्ज [ ज्जा ] स्तम्भमुन्मूल्य ज्ञा [ ज्ञ ]—

---

१ कम् = मस्तक. २ उद्यतमण्डलाग्रः = चद्रपक्षीं, ज्याचें बिंब वर उगवून आलें; राजाचे पक्षीं = ज्याचें बाकदार खड्ग वर उचललें गेलें आहे. ३ हें विरामचिन्ह येथें नको. ४ सिङ्घः = सिंहः ५ धाम = तेज. ६ वारणाः असें पाहिजे.

पत्रा दुसरा पहिली बाजू।

९ यत्ते (न्ते) क्वापि नो गताः [॥] काञ्चीशकेरलनराधिपचोलपाण्ड्य-श्रीहर्षवज्रटविभेदविधानदक्षं [।] कार्णा

१० टकं वलैमनन्तमजेयमन्यैर्भि(भृ)त्यैः कियद्भिरपि यत्स(स्स)हसा जिगाय [॥] अभ्रूविभंगमगृहीतनिशा

११ तशस्त्रमज्ञातमप्रणिहिताज्ञमपेतयत्नं (।) यो वैल्लभं सपदि दण्डबलेन जित्वा राजाधिराजपरमे

१२ श्वरतामवाप [॥] तस्मिन्दिवं प्रयाते वल्लभराजे कृतप्रजाबाध[ः] श्रीकक्कराजसूनुर्म्महीपति [ः] कृष्णरा

१३ जोभूत् [॥] तस्य स्वभुजपराक्रमानि [ः] शेषोत्सारितारिदिक्चक्रं [।] कि (कृ) ष्णस्येवाकि(कृ)ष्णं चरितं श्रीकि(कृ)ष्णरा

१४ [जस्य] [॥] [शु] भतुङ्गतुङ्गतुरगप्रवृद्धरेणूद्ध्वंरुद्धरविकिरणं [।] ग्रीष्मेपि नभो निखिलं प्रावृ

१५ ट्कालायितं स्पष्टं ॥ उद्दामदर्पनिर्भरमहाबलप्रचलितस्य भूपृष्ठे [।] शक्नोति को निरोद्धुं प्रसरं वरनरस [स्य कृष्ण]

१६ स्य ॥ दीनानाथप्रणयिषु यथेष्टचेष्टं समीहितमजस्रं [।] तत्क्षणम-कालवर्षो वरिषति सर्व्वार्त्तिनिर्म्मथनं ॥ तस्या

१७ भवद्भुवनपद्मविकासभास्वान्संग्रामसागरविमन्थनमन्दराद्रि [ः।] दू (दु) ष्टारिसन्ततिलतापरशुर्म्महात्मा सूनुः

१८ क्षितीशतिलक [ः] प्रभुतुङ्गनामा ॥ सत्पात्रदानवर्षेण ध्वस्तैस्तंभेन पद्मिनी [।] [गजे] नेव क्षता येन पुष्क [रे]

पत्रा दुसरा दुसरी बाजू।

१९ णारिसन्तति [ः] निन्यं सा प्रकृतिस्थिरा ततचला वर्णोज्वा(ज्व)-ला सुप्रज [श्] श्लाघ्या सद्विषयोपभोगसुभ

२० गा भावैर्भृशं भूषिता [।] विस्रब्धं कटकप्रसाधिततनुर्विश्वंभरा भोगिना भुक्ता येन चिरं निजेव वनिता

---

७ वलं = बलं = सैन्य. ब च्या ठिकाणीं व लिहिलेला आहे. ८ हा वल्लभ म्ह० पश्चिम चलुक्य कुळींतला दुसरा कीर्तीवर्मा; ह्याची राजधानी बादामी होती. ९ 'वर्षति' असें पाहिजे. १० येथें अर्थात् दुसरे कांहीं ऐतिहासिक गोष्टींचा उल्लेख असावा अशी शंका येते.

२१ का[11]श्रीगुणालंकृता [ ॥ ] तेनेदमनिलविधुचंश्चलमवलोक्य जीवितं मसारं [ । ] क्षितिदानपरमपु

२२ ण्यप्रवर्त्तितो ब्रह्मदायोयं [ ॥ ] गोविंदराजविज्ञपनया स च पृथिवी-वल्लभमहाराजाधिराजपरमेश्वरपरमभट्टारक

२३ श्रीमदकालवर्षदेवः सर्वानेवराष्ट्रपतिविषयपतिमहत्त[12]रादीं (दीन्) त्स-माज्ञपयत्यस्तु वो

२४ विदितं यथा मातापित्रोरात्मनश्च पुण्ययशोभिवृद्धये शकनृपतिसंव-त्सरशतषट्के

२५ नवत्युन्त (त्त) रे प्लव[13]ङ्गवर्षे वैशाखामावास्यायामादित्यग्रहे गङ्गानामु-परि विजयस्कन्धावारे

२६ मण्णे[14]नगरे करहाटदश[15]सहस्रान्तःपातिभ्यो ब्राह्मणेभ्यः वासिष्ठ[16]श्रीकुमार विज्ञपनया जैव[16]

२७ न्तिफणैयविज्ञपनया च कुमारिग्रा[17]मो नाम ग्रामो दत्तः तत्र च अनेक-विप्रनृपाग्रजपूज (जा) पू

२८ जिताय अशेषवेदशास्त्रार्थविशारदाय भट्टवासुदेवाय भागौ द्वौ [ प्रतिपादि ] तौ खंभ[18]ग्रामा [ त् ] बोरिम[19]ग्रा

---

११ येथें हि कांची राजधानीचा उल्लेख अभिप्रेत आहेसा दिसतो. १२ महत्तर= गांवचा किंवा कसब्याचा मुख्य अधिकारी. याचें हल्लींचें अपभ्रष्ट रूप याच अर्थी 'मेहतर' असें प्रचारांत आहे. १३ ' प्लवङ्ग ' हा गतसंवत्सर धरिला आहे. शक ६९० चे वैशाखी अमावास्येस सूर्यग्रहण होतें. ता० २३ मार्च ७६८. १४ मण्णे हा गांव म्हैसूर प्रांतांत नेळमंगलाचे उत्तरेस आहे. मण्यपूर ही आठवे शतकांत गङ्गराजांची राजधानी होती. १५ ग्रामसमूहांचा ह्या प्रकारचा उल्लेख फार पूर्वीपासून ह्या वेळपर्यंत प्रचारांत आहे. उदाहरणार्थ हैवेपंचशत, कोंकणनवशत, कोंकणच-तुर्दशशत, करहाटचतुःसहस्र, चाकणचौऱ्याशी, सुरतअठ्ठाविशी, इ० इ०. १६ ह्यांबद्दल कांहीं माहिती मिळत नाहीं. कदाचित् हीं मर्जीतील दरबारी माणसें असावीं. १७ Topo sheets 232–233 अगर Survey of India Atlas Sheet No 37 या नकाशांवरून कुमारिग्राम इत्यादींचीं स्थानें बरोबर लक्ष्यांत येतात. कुमारिग्राम = कोरेगांव कानकाट्याचें अगर कोरेगांव मुळा. १८ खंभग्राम = खामगांव टेक. १९ बोरिमग्राम = बोरी; बोरीभरक व बोरीऐंदे.

२९ माद्दाडिमै[२०]ग्रामात्पश्चिमतः खदिरवेणै[२१]पर्व्वतादुत्तरतः अलेन्दिय[२२]ग्रामा [त्] थिउर[२३]ग्रामाच्च पूर्वतः

३० मुइलनद्या[२४] दक्षिणतः एवं चतुराघाटविशुद्धः भमरोपरा[२५] अरलु[२६]-सिन्दि[२७]ग्राम । तडवले[२८]

३१ एते [ : ] सहितः पूनकविषयान्तःपाती सर्वबाधारहितः स चागामि नृपतिभिरस्मद्वंश्यैरन्यैर्व्वा स्वदा

३२ यनिर्व्विशेष [ म् ] परिपालनीयः ॥ उक्तं च भगवता व्यासेन बहु-भिर्व्वि (र्व) सुधा भू (भु)क्ता राजभिः सगरादिभिः ।

३३ यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा फलं ॥ तडाकानां सहस्रेणा-श्वमेधशतेन च [ । ] गवां कोटिप्रदाने

३४ न भूमिहर्ता न शुध्यति ॥ स्वदत्तां परदत्तां [म्] वा यो हरेत वसु-न्धरां [ । ] षष्टिं (ष्टिं) वर्षसहस्राणि विष्ठा

३५ यां जायते क्रिमिः [॥] ऋणहर्ता भूमिहर्त्ता हारयिता च ते त्र (त्र) यः । नरका [ त् ] न निवर्त्तन्ते यावदाभू

३६ तसंप्लवं ॥ यः संपद्भिरनुद्धतः परहितव्यासंगिनी यस्य धीः [ र् ] यस्तंचाप्युपकर्तुमिच्छति सुहृ......

३७ ...... [ । ] ...... नरेन्द्रवृन्दसहितश्रीकृष्णराज (जा) ज्ञया प्रीत्येदं

३८ लिखितं तदुन्नतयशःप्रोद्भासनं शासनं ॥ * * * [२९]

---

२० दाडिमग्राम = डाळिंब. २१ खदिरवेण या पर्वताचें हल्लींचें नांव काय तें समजत नाहीं. नकाशांत रारोसे, सुरकी अशीं दोन नांवें अभि-प्रेत डोंगरांच्या ओळीस दिलेलीं आहेत. ह्या च पर्वतावर दोलेश्वर, भुलेश्वर इत्यादि स्थानें प्रसिद्ध आहेत. परंतु सीमेनें उल्लेखित केला गेलेला पर्वत वरील डोंगरांचे ओळीखेरीज दक्षिणेचे बाजूस दुसरा कोणता नाहीं. या डोंगरावर खैराचीं झाडें आहेत व हा डोंगर कन्हा व मुळा या दोन नद्यांमध्यें आहे २२ अल-न्दियग्राम = चोराची आळंदी. २३ थिउर = थेऊर; प्रसिद्ध गणपतिस्थान. २४ मुइल = मुळा व मुठा यांचा पुण्यास संगम होऊन पुढें पूर्वेस जी नदी वाहत जाते ती नदी मुळा नदी म्हणून प्रसिद्ध आहे; वरील सर्व गांवांच्या उत्तरेस ही नदी आहे. २५ भमरोपरा = भवरापूर. २६ अरलुव = उरळी ( कांचन ). २७ सिन्दिग्राम = सिंदोणी, सिंदवणें. २८ तडवले = तरोडे, तुरडी. २९ येथें शेवटीं चक्र, शंख व चक्राकार पद्म अशीं तीन चिन्हें कोरलीं आहेत.

# मराठी तर्जुमा

१ ॐ स्वस्ति. ब्रह्मदेवानें ज्याच्या नाभिकमलाचे ठिकाणीं आपलें ठिकाण केलें तो तुमचें रक्षण करो, आणि रुचिरचंद्रकलेनें ज्याचें मस्तक भूषित झालें आहे असा शिव हि तुमचें रक्षण करो! २ युद्धरूपरात्रींचे काळीं वर उगवून आलेल्या चंद्रबिंबाप्रमाणें ज्याच्या बांकदार खड्गाचें टोंक वर उचलल्या बरोबर शत्रुरूपी अंधकाराचा नाश होतो असा चंद्रासारखा चकाकणारा व दिगन्तकीर्ति ह्मणून (राजांत श्रेष्ठ असा) गोविंदराज राजा झाला. ३ त्याला श्रीकक्कराज ह्मणून मुलगा होता. त्याची कीर्ति जगांत लांबवर ऐकूं येई. तो दुःखितांचें दुःख हरण करणारा, श्रीविष्णूचे सारखे पराक्रमाचें तेज त्याचे अंगीं दिसे; इंद्रा सारखी त्याची कृति असून तो कृतज्ञ होता, व आपले कुलाला भूषण झाला. ४ त्या कक्कराजाला इंद्रराज नामें मुलगा झाला. त्यानें आपले शत्रूंचा क्षय केला. फुटलेल्या गंडस्थलांतून मद वाहत जाणाऱ्या हत्तींच्या दांतांच्या धडका त्याचे खांद्यांवर बसून ती घासले जात व त्यांस शोभा येई. यामुळें तो उत्तम राष्ट्रकूट राजा हेमकूट पर्वता सारखा च दिसे. [ येथें कूट या शब्दांत खुबी आहे ] ५ त्यानें केलेल्या तपश्चर्येचें फल ह्मणून त्यास दन्तिदुर्ग नामें मुलगा झाला. हा चतुःसमुद्रवलयांकित पृथ्वीचा पति असून इंद्रा सारखा होता. ६ युद्धांत घाबरून आपलाले लज्जारूपी खांब उपटून ह्या नृपश्रेष्ठाचे हत्तिरूप शत्रू कुणीकडे पळून जात तें कळत नसे. ७ ह्यानें आपल्या थोड्याशाच नोकरांकरवीं दुसऱ्या कोणास अजिंक्य झालेल्या कर्नाटकी सैन्यावर क्षणांत जय मिळविला. हेंच कर्नाटकी सैन्य कांचीचा राजा, केरलांचा राजा, चोल व पांड्य देशाचे राजे, श्रीहर्ष आणि वज्रट यांचा धुव्वा उडविण्यास समर्थ होतें. ८ ज्या वल्लभानें ह्याचे आज्ञेकडे दुर्लक्ष करून प्रयत्न करण्याचे सोडून दिलें त्याचा पराजय आपले सैन्याकडून हल्ला करवून ह्यानें केला व राजाधिराज परमेश्वर ही पदवी मिळविली. वल्लभाचा पराजय करण्यांत ह्याला तीक्ष्ण शस्त्रांचें ग्रहण करावें लागलें नाहीं व भोंवया हि चढवाव्या लागल्या नाहींत. ९ तो वल्लभराजा स्वर्गास गेल्यावर श्रीकक्कराजाचा मुलगा कृष्णराज नामें करून राजा झाला व त्यानें प्रजेला पीडा केली. १० ह्या श्रीकृष्णराजानें आपल्या बाहुबलानें व पराक्रमानें सर्व शत्रुवर्गाचा नायनाट केला व त्यामुळें ह्याची कारकीर्द कृष्णचरिताप्रमाणें अकृष्ण ह्मणजे उज्ज्वल झाली. ११ ह्या कृष्ण ऊर्फ शुभतुंग राजाच्या खंद्या घोड्यां (च्या टापां)नीं उंच धूळ उसळे व त्यामुळें सूर्यकिरणांस अडथळा होऊन ग्रीष्म ऋतूंत हि आकाश अगदीं वर्षाऋतूंतल्या सारखें दिसे. १२ कृष्णास

जसा अर्जुन सहाय तसे ह्या कृष्णराजाचे दिमतीस हि श्रेष्ठ पुरुष होते. वास्तव मोठ्या ताठ गर्वानें फुगलेल्या व बलवान् अशा या राजाची स्वारी पृथ्वीवर बाहेर निघूं लागली असतां तिला कोण अटकाव करणार! १३ हा कृष्ण ऊर्फ अकालवर्ष दीन, अनाथ व राजकृपेची अपेक्षा करणाऱ्या लोकांवर त्यांना जें इष्ट असेल त्याचा सतत व तत्काल वर्षाव करतो व हें करतांना अर्थिलोकांस जें इष्ट त्या अनुरूप याची करणी असून त्या सर्व लोकांची पीडा तो समूळ नाहींशी करतो. १४ जगद्रूप कमलास उमलावयास लावणारा सूर्य च, युद्धरूप समुद्राचे मंथनांत जो केवळ मंदर पर्वतासारखा (स्थिर), दुष्ट शत्रूंच्या समुदायरूपी वेलींना जो कुऱ्हाडीसारखा, उदारमनाचा आणि नृपांमध्यें प्रमुख असा प्रभुतुंग नांवाचा त्याला मुलगा होता. १५ ज्याप्रमाणें एकदां हत्ती योग्य ठिकाणीं (म्ह० नदींत) आपले मदाचा वर्षाव करून आपला बंधनस्तंभ मोडून आपले सोंडेनें कमळांच्या वेलींचा नाश करतो त्याप्रमाणें योग्य स्थानीं (म्ह० प्रधानादिकांवर) देणग्यांचा वर्षाव करून, अडथळे नाहींसे, करून, आपले तलवारीचे पात्यानें शत्रुसमुदायाचा या प्रभुतुंगानें क्षय केला. १६ या राजानें भर्ता म्हणून बरींच वर्षें स्वस्त्रीप्रमाणें पृथिवीचा उपभोग स्वस्थपणें घेतला. त्याची स्त्री जशी स्थिरवृत्तीची असून तिचीं मुलेंबाळें तिचे भोंवतीं वावरत तशी पृथिवी हि स्वतः निश्चल असून (तिचे पृष्ठभागावरील) वस्तुजात मात्र अस्थिर आहे; त्याची स्त्री जशी वर्णानें उजळ व उत्तम संततीमुळें कौतुकास्पद तशी पृथिवी हि पतीचे यशानें शोभणारी व चांगले प्रजाजनामुळें वर्णनीय अशी आहे; त्याची स्त्री चांगल्या वस्तूंच्या उपभोगामुळें जशी धन्य व लीलांमुळें अतिशय शोभणारी तशी पृथिवी हि चांगले देशभाग याचे वहिवाटींत असल्यामुळें धन्य आणि नाना वस्तूंनीं भरलेली अशी आहे; याचे स्त्रीचें शरीर जसें कंकणादि अलंकारांनीं सजविलेलें तसें पृथिवीचे पृष्ठभागास राजधान्यांनीं शोभा आलेली; आणि याची स्त्री जशी मेखला घातलेली तशी पृथिवी हि कांचीसारख्या शहरांनीं खचलेली होती. १७ वाऱ्याप्रमाणें व विजेप्रमाणें आयुष्य हें क्षणिक व असार आहे ही गोष्ट त्याला पटून जमिनीचें दान देण्यांत जें मोठें पुण्य लाधतें तदनुसार ब्राह्मणांस हें दान देण्यास तो प्रवर्तला आहे. गोविंदराजाचे विज्ञप्तिवरून पृथ्वीपति महाराजाधिराज परमेश्वर परमभट्टारक श्रीमंत अकालवर्षदेव महाराज राष्ट्रपति, देशाधिकारी व महत्तरादि सर्व अधिकाऱ्यांस पुढें लिहिलेप्रमाणें आज्ञा करीत आहेत. आमचे आईचें, पित्याचें व स्वतांचें पुण्य व यश यांच्या अभिवृद्ध्यर्थ शक ६९० प्लवंग संवत्सरीं मिति वैशाख वद्य ३० स सूर्यग्रहणसमयीं, मुक्काम मण्णनगर येथें गंगराजावरील स्वारींत असतांना वासिष्ठ श्रीकुमार व जैवन्तिकर्णेय यांनीं विनविल्यावरून करहाटदशसहस्र नामक देशांत राहणारे ब्राह्मणांस कुमारिग्राम नांवाचा गांव

आम्हीं दान दिला आहे. त्यापैकीं अनेक ब्राह्मण व राजे यांनीं ज्यास अग्रपूजेचा मान दिला आहे, असे जे वेदशास्त्रसंपन्न वासुदेव भट्ट यांस दोन भाग दान दिले आहेत. यांसि चतुःसीमाःपूर्वेस स्तंभग्राम ( खामगांव टेक ), बोरिमग्राम ( बोरी भरक ) व दाडिमग्राम ( डालिंब ); दक्षिणेस खादिरवेण डोंगर; पश्चिमेस आळंदी व थेऊर; आणि उत्तरेस मुळानदी. येणेंप्रमाणें चतुःसीमापूर्वक हा कोरेगांव भवरापूर, उरळी, सिंद्रोणी आणि तडवळ ह्या चार गांवांसह पुणें प्रांतांत आहे. हें तुम्हांस कळावें. गांवास कोणता हि ( मालकीचा ) उपसर्ग नाहीं. आमच्या वंशांतील अगर दुसऱ्या पुढें होणाऱ्या राजांनीं यांत व स्वतां दिलेल्या दानांत भेदभाव न करतां ही देणगी चालवावी. यास प्रमाण भगवान् व्यासांचें वचन. तें असें कीं सगरादि बरेच राजांनीं या पृथिवीचा उपभोग घेतला आहे. या पृथिवीवरील जमीन ज्या वेळीं ज्याचे ताब्यांत असते त्या वेळीं त्यालाच तिचें ( म्ह० ती दान दिल्याचें ) फळ मिळतें. दान दिलेल्या भूमीचें हरण करणारा हजारों तलाव बांधून, शंभर अश्वमेध करून, तसेंच कोट गाई देऊन हि भूमिहरणाचे पापांतून सुटत नाहीं. स्वतां अगर दुसऱ्यानें दान दिलेल्या भूमीचा जो अपहार करतो तो साठ हजार वर्षें विष्ठेंत किडा जन्मत राहतो. घेतलेलें ऋण परत न करणारा, भूमीचा अपहार करणारा व करविणारा असे हे तिघे पापी जगताचा प्रलय होईतों नरकांतून बाहेर निघत नाहींत. १८ संपत्तीमुळें जो माजला नाहीं, ज्याचे बुद्धीस परहित करण्याची हौस, जो कोणी मित्र याचेवर उपकार करण्याचें मनांत आणी, ............इतर राजांचे मंडळींत असलेल्या श्रीकृष्णराजाचे आज्ञेवरून व त्याचे मर्जीनरूप हें शासन लिहिलें असे. या दिलेल्या शासनानें आधींच मोठी असलेली त्याची कीर्ति जास्त खुलो !

# सूची.

☞ रा. राजवाडे यांनीं व्युत्पादिलेले शब्द अकार विल्यानें लाविले आहेत म्हणून त्यांचा व मेस्तकपुस्तकाचा समावेश सदरहू सूचींत केला नाहीं.

अ


अक्कलकुवा ६
अकबराबाद १३८
अगाये उदारा आगा विश्वंभरा २९७
अग्रजस्तोत्र २०४
अच्युतबावा १५९
अच्युतराय २१०
अच्युतवर्ष–आचरस १३४
अटपाडी ( गांव ) २०५
अणुपणमार्ग १२२
अद्वैत १५५
अद्वैतानंद १६८
अध्यात्मरामायण १५८
अनंत १५६
अनंत पाध्ये वारले २२९
अनंत १४७।१४८
अनुबाई २३
अपरोक्षानुभूतीवर टीका १५५
अफगानिस्तान १२९।१३०
अबदुल कादर १०६
अबदुल सलाम ऊर्फ विसाजीराम १४४
अबासाहेब ( महाराज ) ३३०
अभिलषितार्थ चिंतामणी पद्यकार १३२
अमदाबाद बेदर कोणीं वसविलें ?
२०६।२०९
अमलानंद १५९
अमानतखान दिवाण १४३
अमीन १३८
अमृतजयानंद ६२
अमृतराव काशीस गेले २१९
अमृतराव विश्वनाथ १०९
अमृतानंद १६८
अमृताष्टक १५५
अर्जुनाची ( कुंतीपुत्र ) कुंडली ३२३
अलियागचें पत्र ११५
अलंकापूर ऊर्फ आळंदी ३०४
अल्लाउद्दिन खिलजी १३६
अल्लाउद्दिन हसन गंगु ब्राह्मणी व नासीर २०६
अवघा संसार सुखाचा करीन २५०
अवघी घोंगडी नेली हटा २५६
अवघीयाच्या आलो मुत्ले २८५
अवघे गोपाळ मिळोनि यारे करूं काला २९१
अवरंगाबाद १४३।१४५।१४६
अविस्वासी याचे शरीर सितोकी ३०१
अष्टप्रधान ९३
अष्टावक्रगीतेवर टीका १५५
अष्टोत्तरशतनामतुलशी १५५
अष्टोत्तरशत शिवबिल्वपत्री १५५
असूरिया १३०
असो आतां यैसा धंदा २८५
अहमदनगर १४२
अहमदशाहा २१०
अहमदशाहास राज्य कसें मिळालें ? २०७

अहमदशहा सुलतानशहा २०९
अहमदाबाद ऊर्फ पाटोदें १३७।१३९
अहल्याबाईची आठवण १५
अहवाल (शके १८३३) १७८
अंकुश पुराण २०३
अंताजीपंत २७१।२७२
अंबाई १३७।१४१।१४३
अंबाजी लोहगांवकर २४७
अंबा जोगाई १४।१५२
॥ येथील राममठ १६५

## आ

आईसाहेब (राजारामाची स्त्री) २१५
आऊबाई साहेब घाटगे २२०
आकाश वरी पडों पाहे २५७
आकूबाई सिंदे २२१
आगरी कुणबी २०
आजमगड ९१
आजि तुम्ही ऐका ५९
आजी ओस अवरावती २८९
आतां माझ्या मना ३०३
आत्मबोध व आत्मसुत्र १४८।१४९
आत्मबोधागर टीका १५५
आत्मसिद्धि १५५
आत्माराम दुबे पुरोहीत १९४
(श्री) आदित्यशक्ति १७४
आधीं चैतन्यें अपयित्रें करी २४९
आनंदतनय १६४
आनंदतनयाची थोडीशी माहिती १६५
आनंदराव भिकाजी रास्ते ११८
आनंदीबाईसाहेब २२०।२२१
आपचंद मठ ६५।१५४।१५५।१६१।
१६५।१६६।१६७
आपदेव चित्राव २६८
आपला भक्त भीष्म पडीयेला रणीं २४८
आपळा माथां आथण ऊडे २५१
आपळोया ळाजा २८२
आपळें मरण पाहिलें म्यां डोळां २८४
आपाजी करंजे (घनसेटी यांचा पुत्र) २७७
आपाजी कुरबावांकर १६
आपाभट यांस पत्रें १२४
आपुळें म्हणवीसी २४८
आबाजीपंत पुरंधरे यास दिवाणगिरी २१५
आमचा विनोद ते जागा मरण २८६
आरद १२८
आरती हरिहर १६७
आरती भगवद्गीतेची १६७
आरत्या (बहुविध) १५४
आर्यागीता व रा. पांगारकर २३०
आर्यागीता-रचनाकाळ २३१
आर्यागीतेबद्दल हंसाची हकीकत २३०
आर्याभागवतामध्यें गीता २२३
आलमगीर बादशहा ९१
आलमगीर बादशहाची स्वारी ९१
आलिंगन पडलें दृढ ३०४
आलों तुझ्या दर्शनासी २६१
आवंढया २४४
आष्टें ११७
आहिल्याबाईसाहेब (कागलकराची कन्या)
२२९
आळा वैष्णवांचा मेळ २५२
आळंदीची पंचक्रोशी ३०४
आक्षेप (महाराष्ट्र वाङ्मयावरील) १६३
आंगें अनुभव जाळा मज २९३
आंग्रे सरखेल ८८
आंबाराम भट १२५

## इ-ई

इंग्रज व परांजपे १२०
इंग्रजाचा गृहस्थ १७५
इंग्रजांची मसलत ११६
इंग्रजाचें निशाण १२०-१२२
Itsing १३५
इदलशहा २१३
इन्दुरी ३०४
इन्द्रकेशिदेव वर्ष=इन्द्रकेशिदेवरस १३४
इमत पाटील ९२.
इराण १३०
ईश १५९

## उ-ऊ

उडिया जगन्नाथ २१०
उत्तरगीतेवर पदें १५५
उत्तरदिशेचा गृहस्थ १२३
उत्तरदिशेचें संधान १२३
उत्तरेश्वर २७६
उदयगिरी ११
उद्धवलिंग कवि १६७
उद्धव स्वामींचे गुरू ११
उब्दोधनाथ २५
उब्दोधनाथकृत श्रीज्ञानेश्वरचरित्र २५
उद्योगपर्व १६८
उद्योगपर्वाची पोथी ( लेखन काल)१६८
उधानुकाठीवरी ७३
उनशब्देव १८७
उपदेशक्रमपद्धति १५४
उपदेशरत्नाकर २४
उपनिषदर्थप्रकाश ११
उपासकराडी ३०३
उभारिले गरुड टके २५३
उमाबाईसाहेब २१९।२२०
उषाहरण (चौंभाकृत ) १८१

## ए-ऐ

एकनाथ १६२
एकनाथाचा एक अभंग १६१
एकादशी १५४
ऐसे नोहे निर्मळपण १६२

## ॐ

ॐकार १५४
ॐकार वर्णन २४
ॐकारेश्वराचें वर्णन १९४

## क

कजील बाशखान १३८
कण भुसाच्या आधारें २८३
कतलबाज खान १४२
कथाकामधेनु १५४
कदंब शिलालेख १७२
कदंब हरिवर्मा १७७
कदंबाची राजधानी १७७
कनिष्ठ बंधुस्तोत्र २०४
कपिलगीतेवर श्लोकबद्ध टीका १५४
कपिलेश्वर १९०
करविळी तैसी केळी वटवट ३०३
करिमुल्ला सुलतान २१०
करुणामृत ६६
कर्मविपाकाचा कर्ता ६२
कर्मान २०६
कन्हामाणिकपूर १३५
कलबुर्गे २०८
कलावंतिणीच्या अर्ज २११
कलावंतिणीची फिर्याद २४०
कलिंग १२८

कल्पदेववर्ष—कल्पदेवरस १३
कल्याणी १५४।१५५।१५९
कल्लोल १८४
कस्कादिगण १२८
कळवण १७६
काकडेश्वर २७८
कातकर (री) शब्दाची व्युत्पत्ति १२८
कातकर (री) शब्दाची गॅझेटीअर (बॉम्बे)-
ची व्युत्पत्ति १२९
कानंगो देसाई ३
कानडयाचें पत्र १०५
कानपाटील ९२
कान्हो पाठक याचे अभंग २५४।२४८
काये गाणीव २५१
काये तुम्ही जाणा ३०१
काये मी जाणतां २९८
काये ज्ञानेश्वरी उनें २९८
कारस्कर १२८
कारस्कर शब्दाचा उपयोग १२८
कारस्करो वृक्षः १२८
कारीस वाणी न व्हावा २५०
कालयवन १५४
कावेरी १५६
काशी कवि १८३
कासी रंगनाथ देशाधिकारी ३२९
काळउनि विशा २८३
काळा २८९—२९२
काळा कोट १३४।१४०
काळाराम १४
काळोजी १४
कीर्तिवर्मन् १७४
कुक्कुरमुंडे ५।६
कुटे पाटील ९२
कुढाळखोरें ९६
कुबेराची कुंडली ३२३
कुवार आईसाहेब २२०
कुसाबाईसाहेब २२८
कुळकर्णीचा हक्क ५८
केज १६५
केतुवर्ष = केतरस १३४
केशवदास चांगा याचे अभंग २५०।२५३
केशवराज ३०४
केसरिनाथ २५
केसो विठ्ठल भिडे ११८
कोई वंदो कोई निंदो ५
कोकिळ कोण ? १३
कोकिळाची कविता सांपडण्याचा संभव १४
कोण जाणें कोणा घडे उपासना ? १८५
कोण मला सोडवील प्राणसंकटीं ६५
कोनेरीनाथ १५९
कोनेरीबावा १५९
कोरान्न २३९
कोरेगांव १४७
कोरेगांवचा वकील १४८
कोल्हटकर ( रायगडचा ) ११३
कंसवध १५४
कांठी (संस्थान) ६
कुंडलीश १४८।१४९
कुंडशाकि १७५
कुंभारवेशीजवळील दर्गा ३०४
कोंडु १४८।१४९
कृत्यंकुर १५५
कृपेच्या सागरा २६१
कृष्णकैशोरावस्था १५४

कृष्णकौमार्यावस्था १५४
कृष्णजन्म १५४
कृष्णतारुण्यावस्था १५४
कृष्णपौंगडावस्थेवर पदें १५४
कृष्णराय २१०
कृष्णराव १०२
कृष्णलीला १५४
कृष्णाची कुंडली ३२२
कृष्णाजो बायदेव १३७।१३८।१४१
१४२।१४३।१४४
कृष्णाजी नाईक १७
कृष्णाजी नाईक जोशी व पांगारकर १७
कृष्णाजीनाईकास शाहू छत्रपतीनें दि-
लेलें इनाम १९
कृष्णाजीपंत (प्रतिनिधि) २१७
कृष्णाजीबाबा देव १४१

## ख

खान १३८
खेचर विसा याचा अभंग २४९
खेड ३०४
खांडोवन १८३

## ग

गजगौरी १५४
गजेन्द्रमोक्ष १५४
गणपतिजन्म १५४
गणपतिदेववर्म-गणपतिदेवरस १३४
गणपतलिंग ६
गणेश १६८
गणेशस्तोत्रें (शामनारायणकृत) २६४
गदाधर प्रल्हाद यास प्रतिनिधींचीं वर्षें
२१६
गरुड टके ज्याचा भारी २५३
गरुड दरवाजा ९०
गर्जना पवाडे २८२
गर्भगीतेवर टीका १५५
गिरिधर १६३
गिरिनाथ १६४
(श्री) गिरिलाल १६४
गीताचंद्रिका १५५
गीतार्णव ११
गुप्तशक १७६
गुरू कोण व सद्गुरू कोण ? ११
गुरूगीतेवर टीका १५५
गुरूचीं अष्टकें १५५
गुरुजी ३३२
गुरुनाथ १६४
गुरुप्रशंसा १५५
गुरुमर्यादा (संस्कृत) १५४
गुरुमहावाक्यपद्धति १५४
गुरुस्तुति २०३
गुरुस्वप्नानुभव १८७
गुरुसांप्रदाय पद्धति १४४
गुरुविंशति १५५
गुर्वर्चन १५४
गुलटेकडी १००
गुलशनाबाद १३८।१४४
गृहनिंदा १५५
गोकर्ण-माहात्म्य १६८
गोदूबाई १५६
गोपतिभट ढेरे २६८
गोपाळकरी ६९
गोपाळकाला पद्धति १५४
गोपाळ पांडुरंग शेट सांपळे ८७
गोपाळभट बिन श्रीधरभट ३२६
गोपाळ म्हणतो कान्होबा २९२
गोपाळ रामराव १६१

गोपिकाबाईंचा हेतु ३३२
गोपीगति १५५
गोमती ८
गोराराम १४
गोविंद खंडेराव चिटणीस ९३
गोविंद गोविंद मना लागलीया छंद ३००
गोविंद बरवा १४५।१४७
गोविंदभट ९३
गोविंद मोतीराम शेट सापळे ७५
गोविंदवर्ष = गोविंदरस १३४
गोविंदसेटी १११
गोसावी ( दौलतगीर ) १०१
गौडाचार्य सरस्वती ९४
गंगरसपंत २०७
गंगा ८
गंगाई १३९
गंगा जत्ला नाहीं पाठीपोट नाहीं २९५
गंगाधर कोकिळांचा समाधी १३
गंगाधर को. चा वंशवृक्ष १३
गंगाधर गोविंद ८९
गंगाधरराव भिकाजी रास्ते ११८
गंगाबाई २३
गंगाबाई ( पेशवीण ) ११०
गंगाबाईसाहेब २२१
गंगाराम बुवा २४७
गंभीरानंद १५९
गः व गिः १३२
गांव नेणें परी गाईन २५३
गुंजाळ ८२
गुंडोबाबा १५९
गोंदा २३७

### घ

घनचक्राचा बुरूज ८९
घोषयात्रा २३३

### च

चकते शब्दाची व्युत्पत्ति १२९
चकते यांचें राज्य १२९
चखताई १२९
चट्टय १३२
चट्टग १३२
चटोरी १४१
चष्ट ( देव ) १३२
चाकण किल्ला ८८
चाठोरी १३८।१४४
चालुक्य १७३।१७४
चालुक्यांचीं बिरुदें १७५
चालुक्याचे मांडलिक १७२
चाळकराव २०९
चाळकापुरी २०९
चित्तनिंदा १५५
चित्तपावन ९६
चिद्गानंद १६८
चिमणाजीपंत १०५
चिमणाजीपंत चिवलकर ११६
चिमणाजी बल्लाळ यांची नोंद २७३
चिमणाजी माधव २१७
चिमणाजी माधवाचें दत्तविधान २१८
चिमणाजी माधव यास धरिलें २१७
चिमाजी आप्पा २१७
चिमाजी आप्पाची कुंडली ३२०
चिमाबाई पाटणकर २२१
चिमाबाई साहेब २२०
चिलया चरित्र १४९
चीन १३०
चीपोळण १०७
चेदीशक १७६

चैतन्यांकित देवदास ६४
चौक्या मारिल्या ( शिंयानीं ) १००
चंदना अनि तुळे २५४
चंदना आंगींचा परिमळ २५४
चंद्रोज १४१।१४२।१४३
चंदी २१४
चंदोद १४२
चंद्रसिंग ६
चंद्रात्मज रुद्र १६८
॥ चें नमन १६८
॥ ची गुरुपरंपरा १६८
चंद्रात्मजा १६९
चंद्रावती २
चंद्रावळीवर्णन ५८
चंद्रिका ( गीता ) १५५
चांगदेवाचा एक अप्रसिद्ध अभंग ६१
चांगदेवांचा अभंग २५०
चांगदेवांची आरती २६०
चांगा २४९
चांगा याचा अभंग २५६
चांगा वटेश्वराचा अभंग २४८।२५०
चांदराज कवराज नाईक ९१।९२
चिंचणेर ७५
चिंतामण बल्लाळ पेशवे ३१९
चिंतामणी ६७
चिंतामणीचा गुरु कृष्ण ६८
चिंतामणीचें गोत्र ६८
चौंभा १८१।३०६
चौंभाकृत उदाहरण १८१

## छ

छंदप्रकाश २०४
छंदोरत्नाकर १८३

## ज

जकार १२२
जगज्जीवन १४५
जगज्जीवन पंडित प्रतिनिधी ९३।२१६
जगज्जीवन परशुरामपंत, या प्रतिनिधीपद २१६
जगमित्रनाग १४
जगमैत्र नागा याचा अभंग २४८
जनरालसाहेब १२३
जनाबाईचा थालीपाक २३१
जनाबाईची घोषयात्रा २३३
जनार्दन २।२५६
जयदेव २४
जयरत्न ११
जयपुर १६८
जयपुरोद्धारिनिः १७६
जयरामपंत १०५
जयरामपंत व बाजीपंत १०५
( श्री ) जयशक्ति १७४।१७५।१७६।१७०।१७१
जयसिंह १७३
जयसिंहस्तुति १९२
जयाचिये गांवीं सोन्याचा पिंपळ ३०२
जयाजीराव यांची कुंडली ३२४
जरासंधयुद्ध १५४
जरी तुज देवाची चाड २४७
जरी माझी कोण्ही कापितील मान२८८
जलसमाधी ( ब्रह्मानंदांनीं घेतली ) १३
जसवंत ९।२
जसवंताची तीर्थयात्रा ३
जसवंत व भिल्लराजा २
जसवंत व भीमस्वामी १

जसवंत व महीपती १
जसवंत व रघुनाथदास १
जसवंत व राजा ४
जसवंताचा काळ ९
जसवंताचा वंशवृक्ष ८
जसवंताचे चमत्कार १।४।५
जसवंताचें बाळपण २
जसवंताचे राजास उत्तर ४
जसवंताच्या मुला ८
जसवंतास तुलसीदासाचें दर्शन ३
जसवंतास दर्शन २
जाईन याचे मनोरथें २५०
जाडों घोंगडें येव्हडींये रातीं २५७
जानो विश्वनाथ २७१
जायांचे अळंकार २८३
जार्व्हिससाहेब ८९
जिजाबाई ८८
जिजाबाई आऊसाहेब ३२६
जिजाबाईसाहेब ( तारगळ शिंदे यांची कन्या ) २२०
जिजाबाईसाहेब २२२
जिवाजार व हवालदार १२०
जें ज्याचें जेवन २९६
जैतापुर १८४।१८५
जैतुग १३३
जैतुगि १३२।१३३
जैतोजी १३३
जैतूक १३३
जैत्रपाल १३२।१३३
जैसा आंचा वर्णन पाडी २५१
जोशी व पाध्ये १७
ज्याचे जया ध्यान ३००
ज्योतीपंत दादायुधकर ७४
ज्योतीपंत ॥ महाभागवत ७४
ज्योतीपंत व वेदव्यास ७५
ज्योतीपंताचा काळ ७५
ज्योतीपंताचा मठ ७५
ज्वालामुखी १९०

ट

टायको १३१

ठ

ठेवुनियां डोई २९८

ड

Dr. Fleet डॉक्टर फ्लीटचा तर्क १७३-१७४
" डोमगांव अंक १८' ६४

ढ

ढेरे यांचें दप्तर २६७

त

ताजिलें भेटवी आनुनी वासना२९९
तलाटी ९०
तलाई ५
तळगांव ढमढेरे २७६
तात्याजी २
तात्याजी महिपती ३०७
तापीस्तोत्र २०४
तामसाची तपें पापाची सिदोरी ३०१
ताराबाई आईसाहेब २१९
तिबट १३०
तिमण्णा दीक्षित १५६
तिमाजी १३७।१३९।१४३
तिमाजीपंतास प्रतिनिधिपद २१५
तिमाजी बायेद्‌रू १३७।१४१
तिमाप्पा वोनुरी १६
तिवरे घाट १०७
तिवरे घाठाची बातमी ११३

तीर्थावली १८३
तीर्थोपाध्ये हिंगणे २७०
तुका १६२
तुकारामाचे अभंग २८१–३०३
तुकारामाचें निधन २४५
तुकारामाच्या अभंगांची संख्या २६४
तुकारामबुवांचा एक अभंग ७३
तुकारामभक्त २४७
तुकाराममहाराजांचें एक पद २६२
तुकाराममंडळीचें कार्यक्षेत्र २४७
तुका विप्र व चांदोरकर ८०
तुकाविप्र व पांगारकर ८०
तुकाविप्र व बाकरे ७९
तुकाविप्र व मस्तुरकर ८०
तुकाविप्राचा काळ ७९
तुकाविप्राचा प्रयाणकाळ कोणता ? ७९
तुकोजीराव होळकर यांची कुंडली ३२४
तुकोबा गोसावी यांचा काळ २८९
तुज असतां मज गांजिती जन २६१
तुजवीण सता २९८
तुझेंनि श्रवणें दातारा २५६
तुम्ही येथें पाठवीला धरणेंकरी ३०३
तुर्क १३०
तुर्कस्थान १३०
तुळ १८८
तुळशा गी भांडे हवालदार ८९
तुळशीदास २
तुळशीदासाचा नेम ३
तुळापूर येथील प्रेक्षणीय स्थळें २६८
तुळापूर हेंच नागरगांव २६७
तूंची तूं आत्माराम २६४
तूळजा १८४
तोतया इंग्रजाची वस्त ११५
तोतयाकडील विषय सांपडला १०३
तोतया घाट चढतो १००
तोतया चिपोलनास आहे १०७
तोतयाचें साताऱ्या कडील संधान ११०
तोतयांच्या खुळाची उभारणी ११२
तोतया जांबुळपाड्यास आहे १०१
तोतया व मिलाफी असामीस शिक्षा १०९
तोतया रात्रोजी आंग्रे यांणीं धरला १०३।११७
तोतया राजमाचीहून पळाला १०७
तोतया व आनुबाईचा ( इंचलकरंजी ) पुराणिक ११३
तोतया व आंग्रे ११२
तोतया व इंग्रज १११
तोतया व ग्रँड डफ १२६
तोतया व दादासाहेब १०५।११२
तोतया व पुणें दरबार १२३
तोतया व बारामतीकराचा कारकून १०९
तोतया व रामचंद्र नाईक १०७
तोतया व सखाराम बापू १२३
तोतया केव्हां सोडला ? ९९
तोतया हवालीं झाला १०४
त्याचीया चारणा २९७
त्या माजी मोक्ष नाहीं रे १६६
त्रिवर्ग ( तोतया विरुद्ध ) १२४
त्रिविक्रम १३५
त्रिविक्रम शक्य (चल्क्य) १३४।१३५
त्रिमलनाथ १६४
त्रिंबक ५८
त्रिंबकचे रोखे (रास्ते यांनीं जावें)१०३
त्रिंबकजी डेंगळे १५।१६
॥ व त्याचें साथीदार १६

त्रिंबकपंत २१७
त्रिंबक सुर्याजी १०१
त्र्यंबकभट खेडकर २६८
त्र्यंबकभट नादुरकर २६८
त्र्यंबकभट पुराणिक २६८
त्र्यंबकभट सुदामे २६८

### थ

थत्ते १५०
थोडें परी निरें २८९

### द

दत्तकवी १४९।१५०
दत्तजन्म (मुकुंदकृत) १९७
दत्तजन्मरचनास्थल व काळ १९९
दत्तात्रय १५९
दूतिप्रेषण २०३
दत्तोपंत थथ्थे १४५
दयाबाईसाहेब २२१
दयाराम मुकुंद यांचा सत्कार १९२
दक्षिणामूर्ति स्तोत्रावर टीका १५५
दाजी उधळे १६
दादा १०१–१०३
दादाचे रोखे चालले १०३
दादाजी कोंडदेव कुळकर्णी ८८
दादाजी जगन्नाथाचें पत्र ११५
दादा पळतो १०५
दादा शास्त्री ११८
दादा शास्त्र्याची पत्रें १२४
दादासाहेब ३३३
दादासाहेबांचें राजकारण १०५
दादेगांवकर देवदास ६५
दादेगांवकर देवदास समर्थ सांप्रदायी ६५
दादेभट १०८
दादोजी २७८
दानलीला २०३
दालभ्य रुषी ९६
दास १४
दासबोध १४८।१४९।१६१।१८१
(श्री) दासविश्रामधाम १२०
दासोपंतकृत ग्रंथांची यादी १०
दासोपंताचा गीतार्णव व पद्‌र्णव १५४
दासोपंतांचा वंशवृक्ष १२
दासोपंताचें चरित्र १२
दासोपंताच्या व्याख्येचा विशेष १०
दासोपंताविषयीं आणखी माहिती १०
दिनकर १२
दिनकरराव राजवाडे यांची कुंडली ३२४
दिपाजीराव येरुणकर १०७
दिलीपाची कुंडली ३२४
दीनदत्तपदांकित मुकुंद १८२
दीप घेऊनियां धुंडितां अंधार २८६
दीपरत्नाकराचें रचनास्थल २४
दुधाचे घागरी २८५
दुर्गशक्ति ( २ ) १७५
दुर्गाबाईसाहेब २२०
दुर्जन सिंह १९३
दुर्योधनाची कुंडली ३२३
दुरंगबाजी ७
दृश्यविवेक १५५
देवशक्ति १७६
देवगिरीचा रामदेवराव १३५
देवगिरीचे यादव १३२
देवदास १४।६३
देवदास चैतन्य सांप्रदायी ६५
देवदास व देव ६३
देवदास व पांगारकर ६३

देवशर्मा आत्रिगोत्री ९६
देवापाशीं नाहीं मोक्षाचें गाठोळें २९९
देवासी अवतार २९३
देहनिंदा १५५
दैवाचे धुंडण १८४
दौलतगीर १०९।११३
दौलतगीर गोसावी १०१।११३
दौलताबाद १३६।१३७।१४०
दंतीदुर्ग १७६
द्रव्यनिंदा १५५
द्वारकाबाई देशमुखिणीची नोंद २७४

## ध

धनें देहू गांव २८६
धरणें करी ब्राह्मण २९७
धरावा तो वारा २९६
धुंडिराय १४९
धोंगडा याचा अभंग २५३
धोंडोपंत १२४–१२५

## प

पकार पर्वत १२२
पटवारी १४३
पडतां जड भारी २८१
पणाभी वीस्वनाथ याचा अभंग २५४
पदार्णव ११
पद्मकुंड १८४
पद्मनाभ पंडित ६७
परमात्मानंद १६८
परमानंद जोगा याचे अभंग २५४।
२५५।२५६
परमं अमृताची धार ३०२
परशराम रामचंद्राचें पत्र ११७
परशुराम जन्म १५४
परशुराम त्रिंबक २१५
परशुरामपंत २१७
परशुरामपंत यांस प्रतिनिधिपद २१६
परशुरामभाऊ पटवर्धन यांची कुंडली
३२०
परशुराम रामचंद्र २१७
परसा याचा अभंग २५३
परसो भागीवंत २६१
परळी १४
परळी वैद्यनाथ १४
परळीचे ब्राह्मणांस पेशव्यांची दे-
णगी १५
पराडकर १३५
परंपरा (एकनाथी) १४६
परांजपे ( रावसाहेबांजवळील ) ११०
पर्भणी १४
पल्लव १७४।१७६
पल्लवराष्ट्र १७३
पहिला पुलकेशी १७३
पाटणचा शिलालेख १३१।१७७
पाटवर्दी १४३
पाटवर्दे १४४
पाटीलबावा १११।११५
पाटीलबावाची मसलत ११६
पाटोदें १३७
पाटोद्याचे देशपांडे १३६
पाणीबारा गांव ८
पादुकाष्टक (संस्कृत) १५५
पानखेड २४
पार्वती १५६
पार्वतीबाई ९९।१०२।११०
पार्वतीबाईची शपथ १०२
पाहतां रूप डोळां भरे २८२
पाहोनीया ग्रन्थ करावें कीर्तन २८४

पितास्तोत्र २०४
पडिद्दान पीडे ठेविलें करोनी २८४
पुण्येश्वर ३०४
पुत्रानिंदा १५५
पुत्रस्तोत्र २०४
पुरुषोत्तमभट वैष्णव २६८
पुरंदर किल्ला २१७
पुलकेशी १७३
पुलकेशी (पहिला व दुसरा) १७४।१७५
पूर्णानंद १५६।१५७।१५८।१५९
॥चें चरित्र १५६
पूर्णानंदान्वे शिवरामस्वामी १५४
पृथिवी वल्लभ १६९
पेटा गिरे ९०
पेशवाई १५४
पेशव्यांचे नोंदींचें महत्व २७५
पेशव्यांचे मूळ पुरुषासंबंधीं कांहीं नवीन माहिती २७०
पेशव्यांच्या शिकारखान्याची जागा ८२
पैठण २५
पैशाची लिपी २७
पोईनाडी ११५
पोहणें २४२
पोहा २४२
पोरजिट् साहेब ९०
पंचक्रोशीचा एक नकाशा ३०४
पंचपदी प्रातःस्मरण १५४
पच गौड ते कोण ? ९५
पंच द्रविड ते कोण ? ९५
पंचीकरण १५५
पंचीकरण (पुन्हां) निराळें १५५
पंचीकरण (ज्ञानेश्वराचें) २४७
पांडुरंग स्तोत्र ३०८
पांड्यदेव वर्ष = पांड्यदेवरस १३४
पिंपरी १८
पुंडलीक हारदास पंढरपूरकर २६८
पेंधा म्हने रुसांकेती २५४
पौंड्र १२८
प्यारी ८
प्रकाशदीप २६५
प्रकाश रत्नाकर २४
प्रतापजी राजे यांस राज्याभिषेक २१९
प्रतापशा १
प्रतिनिधीपदाची सुरवात २१४
प्रतिनिधिपदाची घालमेल २१८
प्रदोष पंचपदी १५४
प्रबोध सुधाकरावर टीका (पदें, १२ अध्याय) १५५
प्रभाकरभट उपाधे ३२६
प्रभात मासिक ८०
प्रभु कोण ९५
प्रभुनंदनकृत श्रीखंड्याचें चरित्र १६६
प्रभुप्रकरणीं दोन निवाडपत्रें ९३
प्रन्हाद जन्म १४४
प्रन्हाद निराजी वारले २५४
प्रवृति–निवृति–ऐक्यता–रत्नावली ७५
प्रसन्नानंद १६८
प्राणून १२८
प्रेमप्रकाश (निवृत्तिनाथ) २४७
Ptolemy चें Punnatta ३०४

## फ

फत्तेखान १३७।१३९
फरजंद १३७
फिरगोजी खाडे ८६
फिरोजाबाद कोणीं वसाविलें २०६।२०८

फिरंग्या बाबर २९५
फोंड १६१

### ब

बकार १२२
बचाजीपंत ११३
बळें बाळात्कारें संपादिलें सोंग २८७
बहिग १३२।१३३
बयाजी नरसिंह १३७
॥ बरवा १४५।१४६
बलाराम १०६
बहादुरवाडीचा वृत्तांत ३१०
बहिराजातवेदाचा गुरु ६७
बहिराजातवेदाची कुळदेवता ६७
बहिरा जातवेदकृत भागवत दशम-स्कंध ६६
बहिरा जातवेद व गोपाळ कवी ६९
बहिरा जातवेद व डॉ. चिपळोणकर ६९
बहिरा जातवेद व बाळोजी जगनाडे ७०
बहिरा जातवेद व श्रीधरस्वामी ६८
बहिरा जातवेद हा च बहिरंभट पैठण-कर ६९
बहिरा जातवेद हा विष्णु विश्वनाथ ६७
बहिरा जातवेदाचें गोत्र ६८
बहिऱ्या जातिवेदाचा अभंग २६२
बहिरो पीसा याचा अभंग २५१
बहिरोपंत उधो योगदेव २१५
बहिरो मोरेश्वर यास प्रधानपद २१५
बहुतां छंदाचें बहु वर्से जन ३०२
बळवंतराय कल्याणराय ठाकूर ३३२
बागलाणांतील साधु (मुकुंदकृत) २०४
बागुलदेश १८४
बाजीराव बल्लाळ याची नोंद २७२
बाजीराऊ व चिमाजी २७२
बाजीराव बल्लाळ यांस प्रधानपद २१५
बाजीराव बल्लाळ वारले २१६
बाजीराव बल्लाळाचा शिक्का २०
बाजीराव रघुनाथ २१७
बाजीराव रघुनाथाची नोंद २७५
बाजीराव रघुनाथाचें पत्र १६
बाजीराव रघुनाथ महाडास पळाले २१८
बाजीराव रघुनाथ यांस वस्त्रें २१८
बाजीराव रघुनाथ यांस इंग्रजानें पुण्यास आणलें २१९
बाजी सर्फखान १४३
बाणगंगा १८४
बानाजीराव अनगळ १२५
बाप रकुमा देवीवरा २५०
बापू १०२
बापू गायकवाड सेटफलकर १६
बापूजीपंत १०५
बापूजी श्रीपत ६१
बापूजी हरि ११३
बापूदेव मुकुंदाचा पिता १८५
बापू बरडकर १६
बापोजी हरि १०८
बाबराचें आडनांव १२६
बाबा उपाध्याय २२४
बाबिलोन १३०
बाबूजी नाईक १०२
बाबूजी नाईक तोतयाकडे मनुष्य पाठ-वितात १०२
बाबूजी नाईक बारामतीकर १०९
बाबूराव कृष्ण १०६
बाबूराव कृष्णाचा हेतू १०८
बाबूराव कृष्णाची निष्ठा ११०
बाबूराव कृष्णाचीं पत्रें १०६–११०

बाबूराव कृष्ण व खुळांतील माणसें १०८
बाबूराव कृष्ण व तोतया १०६
बाबूराव कृष्ण व तोतयाचें खूळ ११०
बाबूराव कृष्ण व नाना १०७।१०८
बाबूराव कृष्ण व रामचंद्र नाईक १०७
बाबूराव कृष्ण व श्रीमंत १०८।११०
बायदेऊ १३७
बारामतीकराच्या कारकुनास भुर्दण्ड ११०
बालनाक ९२
बालाई १३७
बालाराव १०४
बावडेकर १८
बा सखीये सांगा तिणीं ६१
बाह्यविषय निंदा १५५
बाळपाठक नाशिककर २६८
बाळाजी गणेश ११३
बाळाजी जनार्दन २१७
बाळाजीपंत नातूंची कुंडली ३२१
बाळाजीपंत प्रधान ९३
बाळाजी बाजीरावाची कुंडली ३२५
बाळाजी बाजीरावाची नोंद ८०
बाळाजी बाजीरावास प्रधानपद मिळतें २१६
बाळाजी बाजीराव वारले २१६
बाळाजी बावाजी १०२
बाळाजी विस्विनाथ २६९
बाळाजी विश्वनाथाची कुंडली ८५
बाळाजी विश्वनाथ यांचा मृत्यु २१४। २१५
बाळाजी विश्वनाथ यांस प्रधानपद २१५
बाळाबाई निंबाळकर २२१
बाळूजीचें अक्षर २४६
बाळूजीच्या वहींतील मजकूर २४५
बीजराव २०९
बुद्ध १५३
बुद्धाची मूर्ति १५९
बुद्धवर्ष = बुद्धरस १३४
बुधावळ ६
बुल्हरचा तर्क १२८
बेज ८
बेदरी ठाणें ९१
बेलापूर १०७
बोधबासष्टी १५५।१५७
बोधामृत १५५।१५७
बोप्पस्वामी १७१
बोपदेव १३१।१३२
बोरठें ५।९
बोरनार १८६
बोलवीला देहे आपुलेनि हाते २८४
बोलिल्लीं उतरें वेडीं वांकुडीं ळेंकरें ३०१
बौधायन धर्मसूत्र १२८
बिंबि उपटलें अंबरीं २५३
बुंदेलखंड १९३
ब्रह्मवर्ष = ब्रम्हरस १३४
ब्रह्मानुभव स्तोत्र २४
ब्रह्मानंद १६८।१५९
ब्रह्मानंद ( मुकुंदराज ) १३
ब्रह्मेश्वर ३०४
ब्रह्मेन्द्रस्वामी व बाळाजी विश्वनाथ यांची भेट २०५
ब्रह्मैक्यवृत्तीवर टीका १५५
ब्रह्मैक्य स्वरूप १५५
ब्रह्मोत्तरखंड १५४
ब्रह्म ब्रह्मांचळेंसी खरी २५१
Briggs ३३२

ब्लॅक होल ( Black Hole ) १३६

भ

भक्तनामावळी (विठ्ठलदास याची) २५७
भक्तविजय ७१
भक्तांचा महिमा २९६
भक्तिचंद्रिका २२४
भक्ति ज्ञान वैराग्य यांवर पदें १५४
भक्ति प्रेमसुख २९६
भक्ति हे घोंगडी २५६
भगवद्गीता ( मोरोपंतांची ) २२३
भगवद्गीतेवर चंद्रिका १५५
भगवानसिंग ६
भगवंतपंत २१७
भगवंत भैरव थथ्थे १४६।१४७
भगिरथाची कुंडली ३२३
भटंभट ढेरे ८२
भरत नामावळी २६२
भट्टकेदार १८३
भर्तृहरी १३४।१३५
( श्री ) भल्लशक्ति १७५।१७७
भवानजीचे चापे २७८
भविष्योत्तरपुराण १३५
भाऊसाहेबांची क्रिया ३३२
भागवताचा दशमस्कंध ७४
भागवताच्या एकादश स्कंधावर श्लोक-
बद्ध टीका १५४
भागवतावीराल प्राकृत टीका ७४
भागवंताची आरती २६०
भागु २४५
भागु कोण ? २४६
भागुचा अभंग २६१।२६२
माडवळ माझे ळटिक्याचे गाठी २८८
भानभट तळेगांवकर २६७।२६८
भानभट वैष्णव २६८
भानुदास २५७
भानुदास याचा अभंग २५७
( श्री ) भानुशक्ति १७३
भालेराव राजा २०९
भावार्थदीपिका १४५
भास्कराचार्य १३१
भास्करराव २०९
भिकाजी नाईक कोलटकर ११६
भिमराय १००
भिमा शंकर २७७
भिवराव १०१–१०३
भिक्षुगीत २४
भीमकुंड १८४
भीमवर्ष–भीमरस १३४
भीमेश्वर १८४
भैरवी टीका ६७
भैरवी टीकेची भाषा ६८
भोगाजी १६

म

मकार १२३
मक्का १४४
मखतशहाफकीर २०९
मगोराम १३८
मचवा २४२
मजमुपद २१५
मत्कुमखानजादा २०९
मत्कुमखान व लोहार २१०
मदारुल माहामी १३७
मध्य आशिया १३०
मध्य देश १७३
मध्वाचार्य स्तोति २०३
मनीषापंचक १५५

मनोनिग्रह १५५
मनोमये पूजा २८९
मरहूमीखान १३८
मराठी ख्रिस्तपुराण(स्टीफन्स् कृत) ३१६
मराठी गद्य १३१
मलजी १४४
मलजीराजे निंबाळकर १२
मलीक अंबर १३७।२१३
मत्तक १३३
मल्लग १३३
मल्लगि १३२
मल्लुगि १३२।१३३
मल्हार जीवन ज्योतिषी २७८
मल्हारी ५८
अहमद् अमी अमीनखान १४३
महांकाळ बुरुज ८९
महा कांतार १२८
महादजी कुटे ९३
महादजी सिंदे १०३
महादचा २३
महादा २३७
महादाजी अंबाजी पुरंदरे ९३
महादाजी सिंदे ११९
महादाजीपंत नार्लेपोतेकर १६
महादाजी बल्लाळ यांचें पत्र ११६
महादाजी रघुनाथ ८९
महादाजी रघुनाथ बिवलकर ८९
महादाजी सिंदे याचें पत्र ११७
महादेव आचा १४
महादेव भट्ट आठले ९३।९७
महादेव १४७।१४८
महादेव भट पुरंदरे २६८
महाराणी व्हिक्टोरीयाची कुंडली ३२५
महाराम १६३
महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग २३४
महाराष्ट्र धर्म १६१
महाराष्ट्र राज्य १६१
महाराष्ट्र सारस्वत १०
महाराष्ट्र कवी १०
महिपतराव कृष्ण १२०।१२३
महिपतराव डेंगळा १६
महीपति ( नाथसंप्रदायी ) ३८७
महिपतीचा गुरु तुकाराममहाराज ३०७
महिपतीबुवाचें पत्र ३०७
महिपती व मृत्युंजय ब्राह्मणी २६६
महंमदाचा धर्म १२९।१३०
माझ्याचार्पे मज दिधलें भातुकें ३००
माणिकबाबा १५६।१५९।१५९
माणिक नगर १५९
(श्री) माणिकप्रभू १५४
मातास्तोत्र २०३
मातुलिंग ३०४
मातृदेववर्प=मायिदेवरस १३४
मानाजी फांकडे १००
माधवराव १८५
माधवराव ( थोरले ) यांची नऊ कलमी यादी ३३१
माधवराव नारायण प्रधान ९७
माधवराव नारायण यांचा जन्म २१७
माधवराव नारायण यांस वस्त्रें २१७
माधवराव नारायणाची नोंद २७४
माधवराव नारायण वारले २१७
माधवराव बल्लाळ यांस वस्त्रें २१६
माधवराव बल्लाळ यांची कुंडली ३२५
माधवराव बल्लाळांचा काळ २१६
माधवराव बल्लाळ यांचे स्त्रीचें सहगमन २१६

माधवराव व अनंत वेदांती १६१
मायासिद्धि १५५
मारुति २७८
मालगि १३३
मालोजी १३३
मालोजी घोरपडे १००
मालोजी नाईक निंबाळकर १००
मालोजी नाईक सितोळे ८२
माव्हाळ ( क्षेत्र ) १५९
माहाजन २७६
माहेश्वरदेववर्ष=माहेश्वरदेवरस १३४
मित्रस्तोत्र २०४
मिराचाईचें आख्यान २३३
मीरसाहेब ९३
मी रे अपराधी मोटी २६१
मुकुंद १८२–२०५
मुकुंद (जन्मभूमी) १०३
मुकुंदराज १३२
मुकुंदराज चरित्र १३
मुकुंद व नंदलाल १९३
मुकुंद व प्रयागभट १९३
मुकुंद शिवराम व रंगनाथ ( तुलना ) २०४।२०५
मुकुंदांचें कर्ज १८८
मुकुंदाचा जन्म शक २०४
मुकुंदांचा तीर्थोपाध्यायांनीं घेतलेला लेख १९५
मुकुंदाची कविता १९६
मुकुंदाची तीर्थयात्रा १८७।१८८।१८९। १९०।१९३।१९४
मुकुंदाची तीर्थयात्रा समाप्त १९६
मुकुंदाची पोटार्थ वृत्ती १९२
मुकुंदाची राजद्वारीं सेवा १८८
मुकुंद कवित्वस्फूर्तीचा काल १८६।२०४
मुकुंदाचे ग्रंथ २०३।२०४
मुकुंदाचे चरित्रांतील कांहीं महत्वाचे शक २०४
मुकुंदाचे बरोबरीची मंडळी १८८
मुकुंदाचें पत्र १९१
मुकुंदांचा हट्ट १९५
मुकुंदानीं देह ठेविला १९६
मुक्तामाला २२४
मुकेश्वर १८३
मुकेश्वर कवीस नमन १६८
मुदई १२५
मुरार जगदेव व शहाजी यांची स्वारी २६६
मुरार जगदेव २६९
मुरारी जगदेव २६८
मुसलमान व साधु २०६
मुल्हेरीचा किल्ला २
मुळ वदनांचा अंगळ हातांचा ७०
मूलस्थान = मुलतान १८९
मूलस्थानचा महिमा व वर्णन १८९
मूलस्थानचें दूषण १८९
मृत्युंजय ब्राह्मणी २६५
मेरुदास १४७।१४८
मेरो नेम सुनो जसवंता ३
मैनाबाईसाहेब २२१
मोअर्ज्जामाची बंधमुक्तता १८८
मोडी-मोरी-मौर्यो २७
मोरसेट २७७
मोरो त्रिमल पुरंदरी २१४
मोरो त्रिमल पुरंदरोला पेशवाई दिली २१४।२१५
मोरो त्रिमल पुरंदरीचा मृत्यु २१५
मोरोपंत २२३

मोरोपंताची गीता रचण्याची कल्पना २२५
मोरोपंताची गीतेची प्रत नाहीं २२४
मोरोपंताचे गीता रचतांना गुरु २२६
मोरोपंताचें धोरण २२३
मोरोपंत व विठोबादादा चातुर्मास्ये २२३
मोरोपंताच्या गातार्यांचा विशेष २२६
मोरोबा तांभेरकर (महिपतीचे गुरु) ३०७
मोरोबादादा ९९
मोरो बापूजी १०५
मोरो हरी १०५
मोहनदास वाटाड्या १९०
मोहबत १३८
मंगल १२९।१३०
मंगलशब्दाची व्युत्पत्ति १२९
मंदग १२९
मंदोचलावर गमन १९३
मोंगल १२९।१३०
मोंगल शब्दाची व्युत्पत्ती १२९
म्लेंछ १२९
म्हणवितो दास ते नाहीं कारणी २८७
म्हणवूनी जाले क्षेत्रींचे संन्यासी २८७
म्हणे ऐकपा माझें वचन १३

## य

यमाची कुंडली २३४
यमाजी शिवदेव ९३
यशवंत दरवाजा ८९।९०
यशवंतराव महादेव प्रभु ९३
यशोदा गवळणी संवाद २०३
यादी ( दोन ) २१३
यादोजी वर्धाजी मेटे २७८
यास्तव ज्ञानेश्वर समर्थ १५९
युधिष्ठिर धर्मराजाची कुंडली ३२१
( श्री ) येकनाथ १५८।१६८
येकभाव चीती २८८
येका १५७
येकेहाळी मठ १५६
येकेहाळी १५८।१५५
येथीदोन्ना अलंकारें २८५
येथुनि दिसे महाद्वार २५३
येमुने पावलीं २९०
येऱ्हडा प्रभू भावें २८२
येसाजी कुटे ९१
येसूबाई निंबालकर २२१
योगवासिष्ठसारावर टीका १५५
योगेश्वरानंद १६८

## र

रगोजी चाटोरीकर १३८
रघुनाथजी बावा १२३
रघुनाथदास १
रघुनाथ बाजीराव यांस प्रधान पदाचीं वस्त्रें २१६
रघुनाथ बाजीरावाची नोंद २७४
रघुनाथराव नारायण १०५
रघुनाथ हणमंत यास प्रतिनिधीपद २१५
रजावंद १४३
रत्नाकर उपदेश २४
रत्नाकरभट १९२
रत्नाकर व पटवर्धन २५
रत्नाकर स्वामी २३
रत्नाकराचा वंशवेल २४
रत्नाकराचा काल २४
रत्नाकराची समाधि २४
रत्नाकराचे गुरु २४
रत्नाकराचे ग्रंथ २४
रत्नाकरास साक्षात्कार २४
रवीराव सिंदे लोणीकर १६

राघव रंक १६४
राघवसुत ५९
राघोजी १४४
राघोजी आंग्रे १०३।१०८।११७।११९।
१२५
राघो नारायण परांजपे ११६
राघोपंत १०५
राजक १३३
राजकी १३३
राजग १३३
राजगि १३२।१३३
राजमणी स्वामी १५९
राजमाची १०७।११९
राजमाची गेली १०१
राजवाडे १५५।१६२।१७८
राजवाडे आणि कुंडल्या ३१९
राजवाडे व तुकाचित्र ८०
राजवाडे व देवदास ३३
राजवाडे व ख्रिस्तपुराण ३१६
॥ यांची ज्ञानेश्वरी ३१६
राजसबाईसाहेब २१९
राजाराम १४७।१४८
राजारामप्रासादीकृत भक्तमंजरीमाला
८०
राजाराममहाराज २१९
राजारामास राज्याभिषेक २१४
राजूजी १३३
राज्योपाध्ये १९२
राधाबाईची नोंद २७१।२७२
रॉबर्टसन ८५
राम १५६
(श्री) रामचंद्रजीची कुंडली (अयोध्याधीश) ३२१
रामचंद्र नाईक १०७।१०९
रामचंद्र नाईक परांजपे ११९
रामचंद्र नाइकाची पत्रें ११०।१२४
मचंद्र नारायण ८३
रामचंद्र निलकंठ आमात्य १६०।१६१
रामचंद्रपंत कारभारी २१५
रामचंद्र बल्लाळ १२७
रामचंद्र बाबूराव १६
रामचंद्र महादेव १२०।१२३
रामचंद्रराव खानविलकर ८७
रामचंद्र शिवदेव ११४।११५
रामजन्म १५४
रामतुळशी १५५
रामदास १४७।१४८
रामदासाचा दासबोध १३६
(श्री) रामदासीग्रंथमाला १६०
रामदेवराय १३५।१३६
रामदेवरायाचें राज्य गेलें १३५
रामदेवराव १३५
रामपुरराजा रतनसी १९३
रामभट ९३
रामभट बिन गोपालभट ३२९।३३०
रामभारथी १७८
रामराजा ८९
रामराव नारायण ९९।१०१
रामशास्त्री प्रायश्चित देतात ११९
रामसेना ९०
रामाजी कोनेर १२
रामाजी गोसावी २०४
रामानंद २४।१५९।१६८
रामायणावरील कविता ७५
रामार्यावर टीका १५५
रायरेश्वराचा डोंगर ११५

रावणाची कुंडली ३२४
राष्ट्रकूट १३२।१७३।१७६
॥ यांचा पहिला कृष्णराज याचा
ताम्रपट ३०४।३७६
राहूजी गोपीनाथ सबनीस १४०
रुक्मण्णा पंडित १५६
रास्ते १०३
रास्ते कोण्या ठिकाणीं गेले १०५
रुद्राजी वैद्य चांदवडकर १४३
रुद्राजी विश्वनाथ २७१
रुस्तुमखान १४२
रेवस्वामी १६१
रोदेहयाद १४१
रोमांच रवरावित २५५
रंगनाथ भट ज्योतिषी २६८
रंगोजी १४१।१४४
रंगोजी पटवारी १३८।१४४

## ल

लघुगीतेवर टीका १५५
ललितपद्धति १५४
लवाकुशाख्यान २०४
लक्ष्मणपंत १०५
लक्ष्मणपंत महादेव रानडे ११८
लांचलचक पत्र (अनंत वेदांतीचे) १६१
लिलाधरबावा २२४
लिंगदेह १५५

## व

वजीरगड ९१
वटेश्वरू देवी तारकू माझा २६०
वद्दिग १३२
वराह ( क्षेत्रमाप ) २६८
वरंध्याघाटाची बातमी ११४।११५
'वल्लभ' उपपद १७५
( श्री ) वल्लभभानुशक्ति १७०
वल्लभी १७६
वष्णुदास ७।८
वाक्यपदीयकार १३५।१३५
वाक्यवृत्तीवर टीका १५५
वाग्भट अष्टांगसंग्रहसंहिता १५०
वाचा लोभावळी गुणा २५५
वाडीकर व कोल्हापुरकर यामधील
झटापट ८५
वातापी १७३।१७४
वातापीचा पहिला विक्रमादित्य १३५
वादगि १३३
वादिक १३३
वादुगि १३२
वामन जन्म १५४
वालेर ६
वासुदेव बाबा १०४
वासुदेव बाबाचीं सूत्रें ११३
वासुदेव महादेव ११६
वासुदेव शेट सांपळे यांस पत्र ८७
विक्रमादित्य १७४।१७८
विक्रमादित्य (१ ला) १७३
विक्रमादित्य निकुंभ १७०
विरवल्या २४३
विजयदुर्ग ११८
विजयदुर्ग किल्ला बांधिला ८८
विजयदुर्गाचें वर्णन ८८।८९
विजयदुर्गाचे दुरुस्तीसखर्च ८९।९०
विजयदुर्गाचे खाडीस खर्च ९०
विजयदुर्ग किल्यास खर्च ८८।८९
विजयदुर्ग नांव कोणी ठेविलें! ८८
विजयशक्ति १७५
विजयानगरच्या विध्वंसाची
बखर २०६

विठ्ठलकवी १८३
विठ्ठलबावा १५९
विठ्ठल रघुनाथ कामत ८९
विठ्ठळवाडी १११
विठ्ठलविश्राम ११७
विठा २३७
विठोबाचीं मंदिरें ७४
विदलशहा २१३
विद्यामृत १५५
विनायक माधवराव २१८
विनायकी लिपी २६
विनायकी लिपीची विशेष २६
विमलानंद १६८
विरह गुरुगीता १५५
विवेकम्मा १५६
विशई अद्वये २८३
विश्वरूपनमन २४
विश्वंभर गोसावी ११
विष्णुदास ६
विष्णुदासनामा १७८
विष्णुदासनामाकृत शुकाख्यान १७८
विष्णुदासाची विस्खळित ओंवी १८२
विष्णुदासनाम्याचें कपोताख्यान १७८
विष्णुदासनाम्याचें गुरूस नमन १७८
विसा खेचर ७१।१७८
विसाचा धंदा ७१
विसाजी गोपीनाथ सबनवीस १४३
विसाजीपंत २७१
विसाजीपंत जोग १०२।१०३
विसाजीराम १३९–१४४
विसाजीराम ख्वाहरजादे १३९
विसोजीराम १३९
वीकळ तेथें वीका २८३
वीठल विस्वनाथ याची नोंद २७१
वीठा नामयाचा अभंग २५१
विठा याची आरती २६४
वीरसंगीया राजा २०९
वीरेश्वर दीक्षित १०८
वीरणदास ७
वृत्तरत्नाकर १८३
वेणुगीत १५५
वेताळ बुरूज ८९।९०
वेद गणितां मर्यादळा २५४
वेषक १३३
वेसग १३३
वेसगी १३२।१३३
वैकुंठस्वामी १५९
वैद्यनाथ ज्योतिर्लिंग १५
वैराग्य १५५
वैराग्य रत्नाकर २४
वैस्णवाची कीर्ति गाइलीं पुराणीं २९५
वंग १२८
व्यास १६८
व्यंकटनाथ १६८
व्यंकटेशकवी ५९
व्यंकटेश स्तोत्र ६४
Vernacular Translation Society १६१

## श

शकलोक १२९।१३०
शकद्वीप १३०
शकस्थान १३०
शनवारवाडा व गॅझेटीयर ८१
शनवारवाड्याची आग ८१

शनवारवाड्यांत श्रीसमर्थांचा उपदेश १६१
शनवारवाड्यांतील कोनशिळा ८१
शर्व १५२।१५३
शहाजी भोंसले खानवटकर यांचे पुत्र २२०
शहाजीमहाराज यांचे जनानखान्याची नांवनिशी २२२
शहाजी राजे ८८
शहा व नियत उल्ला २०६
शाइस्ताखान १४३
शातवाहन १३०
शामराजपंत राक्षे २१४
शाहूमहाराजांनी दिलेली एक सनद ६१
(श्री) शाहूमहाराजांची रोजनिशी १६१
शिवगोसावी ११
शिवछत्रपती सिंहासनारूढ झाले २२०
शिवछत्रपतींचा कैलासवास २२२
शिवजी कासार २४७
शिवदास कुंडशाचा (याचा) अभंग २५३
शिवदिन केसरीचा मठ २५
शिवदिन केसरीचें एक पद ५९
शिवरामपंचक १५५
शिवपंचाक्षर स्तोत्रावरटीका १५५
शिवमोहिनी १५४
शिवराम १५७।१५८
शिवराम दशक १५५
शिवरामविंशति १५५
शिवरामसा तपस्वी १९५
शिवरामस्वामी १५५।१५६।१५८।१५९
शिवरामस्वामींचा मठ १५९
शिवरामस्वामींची पुण्यतीथ १५९
शिवरामस्वामींची समाधी १५९
शिवरामस्वामींचे ग्रन्थ १५४।१५५
शिवरामाष्टक १५५
शिवशर्मा अत्रिगोत्री ९६
शिवषडाक्षरमंत्रावर टीका १५५
शिवाजीचा राज्याभिषेक २१४
शिवाजीचा जन्म ८८
शिवाजी महाराज ८८।२१९
शिवाजी व बादशहा ८८
शिवाजी व शाहाजी ८८
शिवाजीराजे (राजारामाचा मुलगा) २१५
शिवाजीस मंत्रोपदेश ३२६
शिवापराधक्षमापन्न स्तोत्रावर टीका १५५
शिष्यस्वरूपप्राप्तिलक्षण १५४
शुकाष्टक १५५
शेणवयी कोण ? ९६
शेणवी शब्दाची व्युत्पत्ति २७
शैवागम ३०४
शंकर १६५
शंकरभट १८४
शंकरतनय १६५
शंकरराव देव ६३
शंकराचार्यस्तौति २०३
शंकराचें देवालय १६०
शंकराजी भानगीरे ६१
(राजा) शंभु क्षत्रपति ३२९
श्यामदास ८
श्रावण मासाचा धर्मादाव ३३३
श्री जयशक्ति १७३
श्रीधरस्वामी ६८

श्रीनिवास गंगाधर यांस प्रतिनिधिपद २१६।२१७
श्रीनिवास परशुरामाचा शिक्का २०
श्रीपतराव यांस प्रतिनिधीपद २१६
श्रीपंढरीशा पतीतपावना २१७
श्रीभानुशक्ति १७३
श्रीरामसांवत ऊर्फ रावसाहेब ८६

## ष

षडानन जन्म १५४
षष्ठ (देव) १३२
षेचराची आरती २५९
षोडशनामान्वित दत्त स्तोत्र (मुकुंदकृत) २०३

## स

सईबाईसाहेब (तुळजोजीराव घाटगे सजाराव कागलकर यांची कन्या) २२०।२२१
सकार १२३
सकार बाईसाहेब २२०।२२१
सखाराम केशव यांची धांदल १०४
सखारामबापूचीं पत्रें १०३–१०५
सखाराम भगवंत २१७
सगर राजा १३०
सचीदानंद बावाचे अभंग २५१।२५२
सच्चिदानंदाचिया मूर्ति २५२
सत्कार्योत्तेजक सभा १५५।१५८
सत्याश्रय १७०
सदानंद १५९
सदानंदाची पुण्यतिथी १५९
सदानंदाची समाधी १५९
सदाशिव केशव १०५
सदाशिव चिमणाजी याची नोंद २७४
सदाशीव नाईक १७
सदाशीवपंत कुरणे ११४
सदाशिवभट सिंत्रे ९९
सद्गुरू-अष्टक २४
सद्गुरू दर्शन १८६
सद्गुरू वियोग २०४
सद्गुरू श्रीव्यंकटेश १६८
सद्गुरुस्तवन (मुकुंदकृत) २०१
सद्गुरुस्तवनग्रन्थाचा काल २०१
सद्गुरू स्तोत्र २०४
सनत्क सनंदन सनत्कुमार २६२
सनदा (दोन जुन्या) ३२६
सभे न ळगते ळावी २४८
समर्थ १६०।१६२
(श्री) समर्थप्रताप १६०
समुद्रमंथन १५४
सरखेल १११।११२
सरदेसाई १६१
सवाया एकाक्षरी १९९
सवाया एकाक्षरी ग्रंथाचा काल २०१
ससा व कूत्रा यांचा ‘ तमासा ’ २०८
सहजानंद १५९
सहजानंद स्वामींचा काळ २६६
सहदेव भाडळी १३२
साखरमाता १८४
सार्जोष १३९
सात भरली पहीलें पाहरी २४९
सातारच्या किल्याची व्यवस्था १०६
सातारच्या बागेची व्यवस्था ११४
सातारा दरबार ११४
सिद्धेश्वरमहादेव ९१

सिवाजी शंकर ८२
सिवाजी पंत १२४।१२५
सिंव्हपर्वत १२२।१२३
सीतास्वयंवर ५८।५९
सीर विकळे चरणाशी २५६
सीवाजी गोविंद १२
सुदामचरित्र २०३
सुनन्देव १८७
सुनीयाअतीजोडीदिल्ही २८१
सुपे ९२
सुखाराव १०१
सुरुखान १३७।१४०
सुवर्ण दुर्ग ११३
सुर्ये गोवीसीं भोजना २८१
सुर्ये षार्वे अनंतें ३००
सूर्य कुंड १९४
सूर्यग्रहण (शके १५५५) २६६
सूर्य आंबू १८४
सेऊणदेशचे यादव १३२
सेवकें करावें स्वामीचें वचन ३९२
सैदअबदुलवाह १३८
सोमभटदेवगिरीस्थ २६८
सोनशास्त्री १२५
सोनाजी देशमुख १३८।१४०
सादूचा सग धरीरे २६२
साधूंचे दोन वर्ग १८३
सावाजी अनंत २०५
सावाजीचा अंत २१३
सावाजीचा शाप २१३
सावाजीचें गुणवर्णन २१८
सावाजीचें चातुर्य २१०।२११
सावाजीवरील तुफान २१२
सावाजी व अर्वाचीन कोश २०५
सावाजी व कलावंतीण २१०
सावाजी व पातशाहीण २१०
सावाजी व महमद् गवान २०६
सावाजी व मोल्सवर्थ २०५
सावता १६१
सावळाराम १४।१५
सावळाराममठांतलि मूर्ती १५
सावित्री २३
सासवड ९२
साळोत्रा १४९
साळो माळो हरिचे दास २४२
सिदोजी नगसिंगराव ८२
सिनल टेकडी १२४
सिद्धानंद २४
सिद्धेश्वर २७७।३०४
संताजीच्या वहींतील अन्य लिखित
मजकूर २४४।२४५
संताजीच्या वहींतलि कविता २४५
संताजी तेली जगनाडे २७७
संताजी व तुकाराम यांचा संकेत २४८
संताजी जगनाडे २४४।२४७
संताजीची खूण २९०
संताजीची प्रत व तळेगांवप्रत २८०
संताजीची समाधी २४७
संताजीची वही व इंदुप्रकाशगाथा २७९
संताजीचें आडनांव २४७
संताजीचे वहीचें महत्व २७९
संतापासी बहू असावी मर्यादा २९४
संतासी तों नाहीं सन्मानाची चाड
२८७।२९३
संदेहहरण १६३
॥ कोठें व केव्हां केला ! १६४
॥ ग्रंथाचा कर्ता ! १६४

संध्या स्नान न घडे एका २५२
संभाजी छत्रपति यांचा जन्म २२१
संभाजी महाराज छत्रपति २१९
संभाजी महाराजांची समाधि २६७
संभाजी महाराजांनीं कैलासवास केला २२०
संभाजी राजे करवीर यांचा काळ २२२
संशय रत्नावली ३०८
संसारा येऊनी बहुत पाप केलें २६२
सांटवीळा हरी २९६
सांड रांडे टाक रुका नको क बोल १६२
सांगळे घराणें ८६
सांप्रदायांतील (समर्थ) पत्रव्यवहार १७०
सिंधगुप्तस्य सूनुः वाग्भट १५१।१५२।१५३
सिंदे व ब्राह्मण ११३
सिंहगड ११९
सिंहगडचा बंदोबस्त १०१
शिंदे १००
सुंदरकांड ( मुकुंदकृत ) २०२
सुंदरकांडरचना २०२
सुंद्राबाई साहेब २२०
सेंद्रक १७२।१७४
सेंद्रक म्हणजे हलींचे शेंद्रे १७६
सोपान १६८
सोपानपंचक १५५
सोमदेववर्प=सोविदेवरस १२४
सोमनाथभटग्राजोतिषी २६८
सौवीर १२७
संकोचोन काये जाळासी लहान ३००
सखचक्रीननुशोभत २५३
संगमचरित्र २४
संतआळोया आवसरी २५५
संतजनतसोचार २५२
संतमहिमा २९४
संतमालिका १५५
संतलक्षण १५५
संत संगति न करावा वास २९३
संतसंगहोवा २९५
संतार्चियेघटि २९५
संताचिया पायीं माझा विश्वास २८४
संताचे गुणदोष आणिती मना २९३
संताच्याहेतुळना २९४
सेंद्रकांचा ताम्रपट १६९
सेंद्रकांचा व चालुक्यांचा अत्यंत निकट संबंध १७५
सेंधव्याचा घाट २
स्फुट १५५
स्वीनिंदा १५५
स्वीस्तोत्र २०४
स्वप्नींच्या घायें वविळे साचे २५८
स्वरूपसिद्धि २६५
स्वर्गारोहण ( नामदेवकृत ) २४५
( श्री ) स्वसुखोन्नाम १४९
स्वानुभव दिनकर १२
स्वामीसेवा गुरुभक्ति २८४
स्वेत गोविंद १४७।१४८

## ह

हकार १२२
हउपसरकर यांचा संग्रह ३३२
हनमंत दरवाजा ९०
हनगळचा कदंब वंश १३२
हमीदखान १४०
हरिकथेवांचुनि इच्छिति स्वहित ३०१

हरिदास १४७।१४८
हरिपंत फडके याचीं स्वदस्तुरचीं पत्रें ९९–१०३
हरिहर २३
हरीचे कथे नाहीं ३०२
हरी जनाची कोन्हा न घडावी निंदा२९४
हर्जी राजे तूवर ९१।९२
हस्तामलकावर टीका ०५५
हातीं राख पाई राख १५०
हा रस आनंदाचा २८९
हासन गंगु ब्राह्मणी ( किताब ) २०७
हासन व धनगर (हेमगवड) २०८।२०९
हिराजी २३
हुमल–तुल–मुलकी १३७
हेमाद्री १३१।१३२
हेमाद्रींचें मेस्तक २७
होनप देशपांडे ८२
होळकराची गर्दी २१८
हंसानंद १६८
हिंदु समाजाचा आद्य पाया १८४
हिंदुस्थान १३०
हृदईं प्रगटळा साकार २५५

क्ष

क्षार उदक देउनी मधुरता आली २६०
क्षेरळा सागर २८५

ज्ञ

ज्ञानी याचा तूं राजा महाराव ३०१
ज्ञानी यांचा राव ज्ञानदेव ज्ञानेश्वर १३१।१३२।१५३
( श्री ) ज्ञानेश्वर १६२
ज्ञानेश्वर नामदेव येकनाथ रंगी रंगनाथ निजानंदीं १५८
ज्ञानेश्वरांचा जन्मशक २५
(श्री) ज्ञानेश्वरांची ओवी १८२
ज्ञानेश्वरांनीं भित चालविली २५
ज्ञानेश्वरीचा सांप्रदायिक अर्थ १५६
ज्ञानेश्वरी पद्धती १४५
ज्ञानेश्वरी १३१।१५३
ज्ञानेश्वरी ( राजवाड्यांची ) १९६